# यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र

## खंड पहिला

। कृष्णाकांठ ।

# यशवंतराव चव्हाण

## आत्मचरित्र

## खंड पहिला

## कृष्णाकांठ ।

**अध्यक्ष**

**शरद पवार**

**उपाध्यक्ष**

**हुसेन दलवाई©**

**कार्याध्यक्ष**

**अरुण गुजराथी**

**सरचिटणीस**

**श.गं. काळे**

**खजिनदार**

**डॉ. रविंद्र बापट**

**विश्वस्त**

**मोहन धारिया**

**शिवाजीराव पाटील निलंगेकर**

**डॉ. निळकंठराव कल्याणी**

**प्रि.पी.बी.पाटील**

**राम प्रधान**

**गुलाम गौस**

**लक्ष्मण माने**

**वसंतराव कार्लेकर**

ज्ञानेश्वर खैरे
सौ. सुप्रिया सुळे
शासन प्रतिनिधी
शासन प्रतिनिधी

# । कृष्णाकांठ ।

## यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र
खंड पहिला

लेखक
यशवंतराव चव्हाण

प्रकाशक / सर्वाधिकार
© यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई
जन. जगन्नाथ भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१

ई बुक प्रथमावृत्ती
२००६

ई बुक निर्मिती
संगणक प्रकाशन,मुंबई
५/ ६, शांती निवास , संत रामदास रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

विशेष आभार :

सौ.वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान, कराड

'आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला
आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी
सौ. वेणूताई हिच्या स्मृतीस'

## अनुक्रम


प्रकरण पहिले : जडण घडण

प्रकरण दुसरे : वैचारिक आंदोलन

प्रकरण तिसरे : निवड


## प्रकरण पहिले

### जडण घडण

प्रसिद्ध कवी श्री. गोविंदाग्रज यांची एक प्रख्यात कविता आहे. तिचे शीर्षक आहे 'कृष्णाकाठीं कुंडल'. 'कृष्णाकाठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं' अशी काहीशी त्या कवितेची ओळ होती. मी लहानपणी कविता वाचायला लागल्यापासून माझ्या आवडत्या कवितांपैकी ही एक कविता आहे. आणि ती आवडती का, तर कुंडल हे माझ्या आजोळच्या देवराष्ट्राच्या जवळचे दोन-तीन मैलांवरचे गाव. त्यामुळे ही कुंडलची कविता म्हणजे देवराष्ट्रातील कविता असे माझ्या मनाने घेतले. कृष्णाकाठी जसे कुंडल नव्हते व आजही नाही, त्याचप्रमाणे देवराष्ट्रही कृष्णाकाठी नव्हते व आजही नाही; पण तरीसुद्धा आम्ही सर्वजण स्वत:ला कृष्णाकाठची माणसे समजतो. त्याला कारण आहे. कृष्णेत आणि कुंडल किंवा देवराष्ट्र यांच्यामध्ये चार-दोन

मैलांचे अंतर आहे. पण कृष्णाकाठच्या सुबत्तेची निदान सोबत तरी लाभली आहे, असा एक दिलासा आम्हां मंडळींना वाटत असे आणि म्हणून कृष्णेबद्दलचे प्रेम हे बाळकडूसारखे माझ्या मनात आहे.

सातारा जिल्ह्याच्या टोकावरील डोंगराच्या कुशीत वसलेले देवराष्ट्र हे एक लहानसे गाव. गावाचा आसमंत ऐतिहासिक अवशेषांनी भरलेला. इथे लेणी आहेत, देवळे आहेत, गावाच्या नैऋत्येस महादेवाची पुरातन मंदिरे उभी आहेत. सर्वांत जुने देऊळ समुद्रेश्वराचे, म्हणजेच महादेवाचे. गाव त्याला 'सागरोबा' म्हणते. गावचे हे दैवत. डोंगरही सागरोबाचा. आसपासच्या टेकड्यांत ऋषी-मुनींच्या गुहा आहेत. असे म्हणतात, की देवराष्ट्र हे एका राज्याचे ठिकाण होते. सातवाहनाच्या राज्यानंतर महाराष्ट्रात जी अनेक लहानमोठी राज्ये उदयास आली, त्यापैकी एक देवराष्ट्र होय. या राज्याची राजधानी कौंडिण्यपूर, म्हणजे आजचे कुंडल होती, असे म्हणतात. देवराष्ट्राच्या राजाचे नाव कुबेर होते. अशीही कथा आहे. कुबेरेश्वराचे देऊळही इथे आहे.

देवराष्ट्राच्या नैऋत्येला असलेल्या सागरेश्वराचे मंदिर पार करून, दीड-दोन मैलांची सागरेश्वराची खिंड ओलांडून खाली आल्यावर कृष्णेचे खोरे लागते. आजच्या स्वातंत्र्योत्तर काळातील तेथली सुबत्ताही जाणवते. पूर्वीही तेथे सुबत्ताच होती, याची कल्पना त्या परिसरातील असलेल्या गावांच्या नावांवरून येते. दही, दूध, तूप, या पूर्वीच्या काळी प्रचलित असलेल्या सुबत्तेच्या लक्षणांची कसोटी मानली, तर कल्पना येईल, की ओळीने त्या परिसरात, कृष्णेच्या काठी असणारी दुधारी, दह्यारी, ताकारी, तुपारी या नावांची गावे का आहेत.

संपूर्ण कृष्णाकाठ हा माझ्या प्रेमाचा, आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. महाबळेश्वरात उगमापासून निघावे आणि कृष्णामाईच्या काठाकाठाने थेट राजमहेंद्रीपासून तिच्या मुखापर्यंत जावे, असे मला नेहमी वाटते. बदलत्या पात्राची भव्यता पाहावी, निसर्गाचे सुंदरपण मनात साठवावे, तीरावरच्या गावांना भेटी

द्याव्यात, लोकांच्या ओळखी करून घ्याव्यात, पिकांनी डोलणारी शेते पाहावीत असे अजूनही मनात येते.

महाबळेश्वरात एकाच ठिकाणी पाच नद्या उगम पावतात. डोंगराच्या वळचणींतून वेगवेगळ्या अंगांनी वाटा काढीत सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच बहिणींचे परस्परांवरचे प्रेम मोठे अमर्याद. जन्मस्थळापाशी त्यांचे वेगळे अस्तित्व दिसते; पण ते तेवढ्यापुरतेच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे, तोच त्या हातात हात घालून, गोफ विणून, एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. मग मात्र यांतील कृष्णा कोणती, कोयना कोणती, वेण्णा कोणती? दिसते, ती एक धार. गोमुखातून ही शुभ्र धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत वेगवेगळ्या वाटांनी या बहिणी निघून जातात. पुढे कुठेतरी डोंगरावरून उड्या मारताना त्या दिसतात. परंतु एक गोष्ट मात्र खरी, उगमापासून शंभर मैलांच्या आतच या बहिणींचा मिलाफ होतो आणि कराडपासून पुढे या सर्वजणी कृष्णामय बनूनच सागराच्या भेटीसाठी निघतात. जरा धारदार अंगाची कोयना कराडला, आपल्या बहिणीला- कृष्णाबाईला कडकडून भेटते. संगमावर मग आनंदाचा कल्लोळ होतो. या ठिकाणी पोचलेल्या या सर्वजणींचे पंचामृत मोठ्या पात्रात साठते आणि सुगंधित आणि चविष्ट बनून पांथस्थांची तहान शमविण्यासाठी आणि आसपासच्या परिसरास दिलासा आणि ओलावा देण्यासाठी पूर्वमुखी होऊन दक्षिणेकडे निघते.

कृष्णेच्या नावाशी आम्ही या कारणामुळे अगदी मनाने लहानपणापासून निगडित झालो आहोत. त्याला आणखी एक कारण आहे. उत्तरेला नीरा व दक्षिणेला वारणा यांमधला भूखंड हा पूर्वीच्या काळात सातारा जिल्हा या नावाने प्रसिद्ध होता. उत्तरेला नीरेच्या पंखाखालची, दक्षिणेला येलूर, तांदुळवाडी ही वारणाकाठची गावे असा हा परिसर होता. या सगळ्या भूखंडामधून वाहणारी प्रमुख नदी म्हणजे कृष्णाच आहे. ह्या कृष्णेच्या काठी वाई, कराड, सांगली यांसारखी जशी महत्त्वाची शहरे आहेत, तशीच उत्तम शेतीमुळे प्रसिद्ध असलेली अनेक खेडीही आहेत.

ऐतिहासिक काळातही या परिसरातून अनेक कर्तबगार व्यक्ती निर्माण झाल्या आहेत. कृष्णाकाठच्या मेणवलीशी नाना फडणविसांचा संबंध आहे, तसाच उंब्रजशी धनाजी जाधवांचा आहे.

अशा या भूप्रदेशामुळे त्याला कृष्णेचा मुलूख असेच आम्ही मानतो. अगदी शास्त्रशुद्ध दृष्टीने विचार केला, तर कृष्णा खोरे हे याच्यापेक्षाही विस्तृत असे आहे. पण तो वेगळा प्रश्न आहे. सहवासाने, भावनेने कृष्णामाईशी आम्ही सर्व निगडित आहोत. बांधले गेलो आहोत. कृष्णेच्या काठची आठवण झाली, म्हणजे बालपणची आणि ऐन तरुणपणातील जीवनाची जडण-घडण करणा-या काळाची आठवण येऊन मन आजही कसे हेलावून जाते.

देवराष्ट्र हे माझे जन्मगाव आणि आजोळ असल्यामुळे माझ्या अगदी लहानपणच्या आठवणी ह्या देवराष्ट्राच्या आठवणी आहेत. माझ्या जीवनातल्या पहिल्या पाच-चार वर्षांच्या ज्या आठवणी आहेत, त्या देवराष्ट्र, वडगाव, कुंडल, ताकारी या गावांशी निगडित आहेत. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्रीगणेशा आहे. पुढे मी राजकीय कामानिमित्त आणि सरकारी कामासाठी देशांतर्गत आणि सर्व जगातही खूप फिरलो. तरी पण या परिसराची ओढ माझ्या मनात कायमची राहिली आहे. असे का होते, ते मला माहिती नाही. पण वस्तुस्थिती ही अशी आहे.

कुतूहल आणि जिव्हाळा वाटावा, असाच हा परिसर आहे. देवपण घेऊन जन्माला आलेले हे गाव, पण याच्यात राष्ट्र ही कल्पना सामावलेली आहे. सागरोबाच्या चोहोबाजू आनंदबनाने भरलेल्या. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ येथे सार्थपणे वावरत असतात. सुपीक जमिनीत बी पेरले, म्हणजे चांगले फोफावते, तशी इथली माणसे आणि मने! या मातीचा गुण आणि माणसांचे मोल हिंडता-फिरता दिसू लागते.

समुद्रात स्नान केले, की त्रिलोकांतील तीर्थक्षेत्रांचे पुण्य मिळते, अशी जुनी माणसे

मानतात. त्याचप्रमाणे अमृतसेवनामुळे सर्व जीवनरसांचे सेवन घडते, असेही म्हणतात. इथे मात्र साक्षात समुद्रेश्वरच कुंडात उभा आहे आणि त्याच्याच प्रेमामृताने 'सोनहिरा' वाहतो आहे. या लहानशा नदीला लोक ओढा म्हणतात. तिथे डुंबण्यातच माझे बालपण गेले. त्यातील अमृतमय पाणी माझ्या पोटात आहे. 'सोनहि-या'ची ही अमृतभूमी, म्हणजेच माझे हे आजोळ. माझा अंकुर अवतरला, तो इथेच.

या गावाची ही पार्श्वभूमी असली, तरी माझे आजोळचे घर हे या गावातल्या एका सामान्य शेतक-याचे घर होते. सबंध कुटुंबाचे पालनपोषण करील, एवढीही जमीन त्यांच्याजवळ नव्हती. त्यामुळे शेतीला धरून दुसरा काही जोडधंदा करण्याखेरीज त्यांना मार्ग नसे. कधी इतरांच्या शेतीवर मजुरी, तर कधी काही दुसरे एखादे काम, असा खाक्या होता. ह्या परिस्थितीमध्ये मी पहिली पाच-चार वर्षे काढलेली आहेत.

माझी पहिली शाळा देवराष्ट्राची आहे. गावच्या पश्चिमेला उंचशा पठारावर एका तळ्याच्या काठी असलेली दोन-तीन खोल्यांची शाळा मला आजही प्यारी वाटते. पहिला श्रीगणेशा मी तिथे शिकलो. तो शिकविणारे माझे पहिले शिक्षक बंडू गोवंडे यांना मी आजही स्मरतो. मन लावून काम करणारे प्रेमळ शिक्षक ही त्यांच्याबद्दलची माझी आठवण आहे. गोवंडे मंडळी ही देवराष्ट्राची राहणारी असल्यामुळे त्यांना सर्व विद्यार्थ्यांबद्दल एक प्रकारचा जिव्हाळा होता. गावचाच मास्तर आणि गावचीच मुले असा संबंध असल्यामुळे कधी कधी फायदा असतो, त्यातला तो कदाचित असेल.

अशा गावी माझा जन्म १९१३ च्या १२ मार्च रोजी झाला. शाळेचे सर्टिफिकेट एवढाच त्याचा पुरावा आहे. मी माझ्या आईचे पाचवे किंवा सहावे अपत्य असल्यामुळे माझ्या जन्माची नोंद कोणी ठेवण्याची काळजी घेतली नाही. त्याकाळी त्यांना अशा गोष्टींची जरुरीही वाटत नसावी. माझा जन्म, म्हणजे काही महत्त्वाचा सुवर्णक्षण आहे, अशी काही परिस्थिती नव्हती. आज मला अनेक मंडळी, 'तुमची

निश्चित जन्मतारीख सांगा' असे म्हणतात, तेव्हा त्यांना मी हीच तारीख सांगतो. आणि हीच जन्मतारीख मी माझा जन्मदिवस म्हणून पाळतो आहे. परंतु शंभर टक्के हीच माझी जन्मतारीख आहे, असे छातीठोकपणे मी काही सांगू शकणार नाही. मात्र माझ्या आईने व आजीने मला माझ्या जन्मवेळेची तपशीलवार माहिती माझ्या लहानपणी सांगितली होती. पुढे आईला विचारून मी ती निश्चितही केली होती.

आमचे चव्हाणांचे मूळ गाव, खानापूर तालुक्यात ढवळेश्वर म्हणून एक छोटेसे गाव आहे, ते आहे, असे मला सांगण्यात आले आहे. माझ्या आईने मला सांगितलेली ही हकीकत आहे. ढवळेश्वरला ब-यापैकी असलेले चव्हाण कुटुंब कुणा सावकाराला दुस-याच्या एका कर्जाकरिता जामीन राहिले. त्या  सावकाराची कर्जदाराकडून फसगत झाल्यानंतर जामीनदाराचा जमीन-जुमला ताब्यात घेऊन या चव्हाण कुटुंबाची त्या गावातून मुक्तता झाली. ढवळेश्वरहून विटे जवळ, म्हणून त्या कुटुंबाने प्रथम येथे वास्तव्य केले. ही घटना कदाचित माझ्या पणजोबांच्या आधीची असली पाहिजे. विट्याला आल्यानंतर कमी पिकणारी थोडीफार जमीन त्यांनी घेऊन तीवर आपला उदरनिर्वाह चालविला होता आणि तशाच परिस्थितीत ते विट्याला राहत होते.

माझ्या आजोबांचे नाव वाघोजी चव्हाण आणि त्यांच्या वडिलांचे-म्हणजे माझ्या पणजोबांचे नाव राणोजी चव्हाण. माझ्या पणजोबांच्या वडिलांचे नाव बाळोजी व आजोबांचे नाव हिरोजी होते. इथपर्यंत माहिती माझ्या आईने मला दिलेली आहे. माझ्या आजोबांना दोन मुलगे होते : एक रामचंद्र चव्हाण व दुसरे बळवंतराव चव्हाण. थोरले चार पुस्तके शिकले असल्यामुळे शेती सोडून बेलीफ म्हणून सरकारी नोकरी करू लागले.

पुढे काही दिवसांनी, शेतीवरती भागत नाही, म्हणून त्यांनी आपल्या धाकट्या भावासाठी म्हणजे माझ्या वडिलांसाठी खटपट केली आणि त्यानांही बेलिफाची नोकरी मिळवून दिली. त्यांची नेमणूक विटे, दहिवडी, कराड अशा ठिकाणी अदलून

बदलून होत असे. माझा जन्म झाला, त्यावेळी त्यांची नेमणूक कराडला होती. कराडला ते बरीच वर्षे राहिले. असे हे दोन्ही भाऊ बेलीफ म्हणून काम करत होते.

कुटुंबाची काही पार्श्वभूमी ध्यानात यावी, म्हणून मी ही हकीकत नोंदली आहे. यावरून कल्पना येईल, की माझ्या आजोबांचे घर काय किंवा वडिलांचे घर काय, हे सामान्य छोट्या शेतक-याचे घर होते आणि सामान्य शेतक-याच्या आयुष्यात वाट्याला येणा-या ज्या गोष्टी असतात, त्या सर्व आमच्याही वाट्याला आल्या होत्या. गाव सोडून नोकरीनिमित्त भटकावे, अधून-मधून शेतीकडे लक्ष देण्यासाठी गावाकडे जाऊन काही हाती येते का पाहावे, असा माझ्या वडिलांच्या जीवनाचा खाक्या होता.

माझे लहानपण हे इतर लक्षावधी गरीब घरातील मुलांच्याप्रमाणे गेले आहे. खेड्यांत राहणा-या छोट्या व गरीब शेतकऱ्यांची संख्या त्यावेळी सगळीकडे पुष्कळ होती. अशा एका कुटुंबातील मी एक, म्हणून माझ्या जीवनामध्ये इतरांपेक्षा फार काही विशेष होते, असे नाही. सर्वसामान्यतः अडचणी आणि गरिबी यालाच तेव्हा जीवन असे नाव होते, असे म्हटले, तरी चालेल. हे सर्व सांगण्याचा हेतू एवढाच आहे, की आम्ही भोगलेल्या गरिबीचे अतिरंजित वर्णन मी करू इच्छित नाही. ग्रामीण जीवनातील त्यावेळचा हा सर्वसामान्य अनुभव होता.

ब-यापैकी शेती असलेली दहा-पाच कुटुंबे, आणि व्यापारउदीम, सावकारी करणारी दहा-पाच कुटुंबे सोडली, तर बाकीच्या सर्व लोकांच्या जीवनाचा व राहणीमानाचा स्तर बहुधा एकच होता. कोणी तेली, कोणी सणगर, कोणी धनगर, कोणी मराठा असत; पण शेतकरी म्हणून दिवसभर काबाडकष्ट करावेत आणि आपले जीवन कंठावे, असेच चित्र माझ्या कल्पनेप्रमाणे, त्या वेळच्या सर्वच गावांमध्ये होते, असे म्हटले, तर अतिशयोक्ती होणार नाही.

माझ्या लहानपणाच्या अनुभवाची ही पार्श्वभूमी आहे, त्यामुळे मला अशा स्तरांतील

व परिसरातील मुला-माणसांबद्दल एक प्रकारचे कौतुक व जिव्हाळा आहे. मग ती कोणत्याही जातीची का असेनात, त्यांचे-माझे तेव्हाच जमून जाई. हा अनुभव मला माझ्या आजोळी आला. आणि हाच अनुभव मी कराडला शिक्षणासाठी स्थिर झालो, तेथेही आला. आजोळच्या घरी आमचा शेजार लहान, छोट्या जमातींतील माणसांचाच होता. सणगर, धनगर, मुसलमान, रामोशी यांचा शेजार हा माझ्या आयुष्यातील एक विशेष ठेवा आहे, असे मी नेहमीच मानत आलो आहे. त्यामुळे त्यांची घरे, त्यांची राहणी, त्यांच्या चालीरीती ह्या नकळत मला आपल्याच वाटत असत. माझ्या कल्पनेप्रमाणे, माझा हा त्यावेळचा अनुभव आणि त्यातून निर्माण झालेली भावनात्मक स्थिती ही मला पुढच्या आयुष्यात अतिशय उपयोगी पडली.

देवराष्ट्राला एखादे वर्ष शाळेत गेल्यानंतर मी पुन्हा कराडला शाळेत जाऊ लागलो. पण त्याच्या आधीच माझे वडील १९१७ सालच्या प्लेगमध्ये वारले. मी वडिलांच्या प्रेमाला वयाच्या चवथ्या वर्षी पारखा झाल्यामुळे त्यांचे मी पाहिलेले रूप, चेहरा-मोहरा, शरीराची ठेवण या गोष्टी मला फार स्पष्टपणे आठवत नाहीत. एक गोष्ट मात्र निश्चितपणे आठवते, ती त्यांच्या शेवटच्या आजारात ते कराडहून देवराष्ट्राला आले, तेव्हाची आहे. कराडला प्लेग सुरू झाला, म्हणून त्यांनी आपले सर्व कुटुंब, मुलेबाळे यांना देवराष्ट्राला आपल्या सासुरवाडीला पाठविले होते. आणि आमच्या मामांनी त्यांच्या लहानशा घरात ही सर्व कुटुंबीय मंडळी राहू शकणार नाहीत, म्हणून महिंद वाड्याच्या शेजारी असणा-या एका वाड्यातल्या दोन खोल्यांत आमच्या कुटुंबाची व्यवस्था करून दिली होती. आमच्या मामांच्या घरापासून हे घर तसे जवळ होते. त्यामुळे दिवसभर आम्ही मामांच्या घराच्या दाराशी रस्त्यावर खेळत असू. मी त्यावेळी चार वर्षांचा असेन.

असाच एकदा मामांच्या घरापाशी मी इतर मुलांशी खेळत असताना समोरून येणारे माझे वडील मला दिसले आणि मी धावतच जाऊन त्यांना बिलगलो. पण त्यांनी मला नेहमीप्रमाणे उचलून कडेवर घेतले नाही. त्यांनी माझा हात हाताशी घेतला आणि मला सांगितले,

"बाळ, आपण घरी जाऊ या. मला बरे नाही."

मी त्यांच्या बोटाला धरून घरी आणले, आई-वडिलांचे काय बोलणे झाले, मला कळले नाही. परंतु आईने वडिलांना अंथरूण टाकून दिले आणि त्यावर ते पडले. मला कल्पना नव्हती, की त्यांचे ते शेवटचे अंथरुण असेल.

त्यांना अंथरुण घालून दिल्यानंतर माझी आई घाबरून गेली, दु:ख करू लागली. मला त्यातले काही एक कळत नव्हते. गावातल्या लोकांची ये-जा सुरू झाली. त्यामुळे कल्पना आली, की काही तरी गंभीर प्रसंग आहे. पण त्याच्या परिणामाची मला मुळीच कल्पना नव्हती. मरण म्हणजे काय असते, हे मला माहीत नव्हते. एक-दोन दिवसांतच वडिलांची प्रकृती अतिशय गंभीर झाली आणि त्यातच ते मरण पावले. त्यांच्या शेवटच्या क्षणी आम्हां सर्व मुलांना घराबाहेर आणून, समोरच असलेल्या एका तुळशीच्या कट्ट्यावर घोंगडे टाकून त्यावर बसवले होते. थोडा वेळ मध्ये गेला आणि एकदम आम्ही आमच्या आईच्या दु:खाचा हंबरडा ऐकला. कावरीबावरी होऊन सर्व भावंडे तुळशीचा कट्टा सोडून घराकडे जाऊ लागलो. पण इतरांनी आम्हांला अडवले नि सांगितले,

"बाबांनो, येथेच थांबा, घरी जाऊ नका."

ही आठवण आजही मला व्यथित करते. माझ्या आईची समजूत काढणे कोणालाच शक्य नव्हते. तिचा शोक अनावर होता. माझी आजी, मामा तिची समजूत घालत असले पाहिजेत, असे लांबून दिसत होते. माझ्या वडिलांची मला जी आठवण आहे, ती एवढीच.

यापुढचे माझे सारे आयुष्य पितृप्रेमाला वंचित असेच गेले. त्यामुळे आईचे प्रेम दुपटीने वाढले असले पाहिजे, असे माझे मत आहे. तिने आम्हांला दिलासा दिला,

जिव्हाळा दिला. आमच्याकडे पाहून तिने आपले दु:ख गिळले. ख-या अर्थाने वडिलांनंतर आम्ही अक्षरश: पोरके झालो होतो. आजी व मामांचा आसरा होता; पण त्यालाही काही मर्यादा होत्या. माझ्या आईकडून मी तिच्या पुढच्या प्रपंचाची जी हकीकत ऐकली आहे, तीवरून पुढचे सर्व काही तिला एकटीला एकाकी पद्धतीने करावे लागले.

आपल्या माहेरी फार दिवस राहणे तिला शक्य नव्हते. प्लेगचे दिवस संपताच आम्ही कराडला जेथे भाड्याच्या घरात राहत होतो, त्या घरी आलो. पुढे काय, असा प्रश्न होता. घरात मिळवता हात नव्हता. शेतीचे उत्पन्न चुलत्यांच्याकडून केव्हा काही मिळाले, तर मिळे, अशी परिस्थिती होती. शेती हा व्यवसाय स्वतः न करणा-याचा नव्हे. त्यात जो राबेल, त्यालाच काही तरी मिळते. इतरांना ते कसे मिळणार? आमच्या आईने कष्ट करून चार-सहा महिने तरी आम्हांला धीर दिला आणि जगवले.

यावेळी माझे थोरले बंधू ज्ञानदेव हे सतरा-अठरा वर्षांचे होते. माझ्या वडिलांचे अनेक बेलीफ मित्र माझ्या आईच्या सांत्वनासाठी येत आणि आपण काही तरी प्रयत्न करू, असे सांगून जात. माझे वडील अतिशय प्रामाणिक आणि निष्ठेने काम करणारे गृहस्थ होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल समव्यवसायातील मंडळीना आपुलकी होती. विशेषतः कराडचे त्यावेळचे मुन्सफ यांनाही सहानुभूती होती. त्यांनी माझ्या आईला बोलावून धीर दिला, आणि सांगितले,

"तुमच्या थोरल्या मुलाला बेलिफाची नोकरी द्यावी, अशी मी शिफारस करतो."

मला त्या मुन्सफाचे नाव आजही माहीत नाही, याची मला खंत आहे. पण आमच्यासाठी खूप खटपट करणारे माझ्या वडिलांचे मित्र बेलीफ श्री. शिंगटे यांची आठवण मात्र झाल्याशिवाय राहत नाही. माझ्या थोरल्या बंधूंना नोकरी मिळावी, म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. त्या खात्यात त्यांच्याही ओळखी-पाळखी होत्या

आणि एकमेकाला मदत करण्याची त्यावेळची परंपराही होती. त्यांनी अशी कल्पना सुचवली, की आमच्या आईने आपल्या दोन धाकट्या लेकरांना बरोबर घेऊन, सातारला तेव्हा असलेले जिल्हा न्यायाधीश अधिकारी-कोणी इंग्रज गृहस्थ होते, त्यांना जाऊन भेटावे.

त्याप्रमाणे एके दिवशी रात्रीच्या रेल गाडीने आम्ही कराड स्टेशनहून सातारला जायला निघालो. सातारला रेल्वेने जायचे, म्हणजे कोरेगावपर्यंत जायचे. आणि तेथून अकरा मैल बैलगाडीने सातारला जावे लागत असे. मोठ्या पहाटेस आम्ही कोरेगाव स्टेशनवर उतरलो आणि तेथून एका बैलगाडीने - त्यावेळी तिला तिकडे छकडा म्हणत असत, त्यातून सातारला जाण्यास निघालो. बैलाच्या गळ्यातल्या घंटेचा मंजुळ आवाज आणि त्या नादात अर्धवट झोपेत व अर्धवट जागत केलेला तो प्रवास अजूनही माझ्या लक्षात आहे. या प्रवासात श्री. शिंगटे आमच्या बरोबर होते. त्यांनी आपल्या ओळखीच्या ठिकाणी आम्हांला नेले व दुपारी जिल्हा न्यायाधीशाच्या कोर्टात घेऊन गेले. सातारच्या न्यायाधीशाचे कोर्ट म्हणजे सातारचा राजवाडा. त्या राजवाड्याचे त्यावेळी पाहिलेले ते धूसर चित्र अजूनही माझ्या डोळ्यांपुढे अंधूक तरंगत आहे. आम्ही दोन्ही लहान भावंडे आणि माझी आई कोर्टात बराच वेळ थांबलो होतो. मध्येच येणारे-जाणारे आमची मोठ्या सहानुभूतीने चौकशी करीत होते. थोड्या वेळाने श्री. शिंगटे आम्हांला म्हणाले,
"चला, तुम्हांला साहेबांच्या पुढे उभे करायचे आहे."
- आणि ते आम्हांला त्यांच्या ऑफिसमध्ये दुस-या एका अधिका-याकडे घेऊन गेले, इतके मला स्मरण आहे.

आम्ही तेथून परत निघालो, तेव्हा आमच्या आईच्या डोळ्यात आंनदाचे अश्रू होते; कारण जिल्हा न्यायाधीशांनी माझ्या वडिलांच्या रिकाम्या जागी थोरल्या बंधूंना बेलीफ म्हणून घ्यायचे कबूल केले होते आणि तसा आदेशही दिला होता.

ही आठवण मी अशासाठी देतो आहे, की एका इंग्रज अधिका-याची माणुसकीची वागणूक प्रत्यक्ष अनुभवण्याचा प्रसंग माझ्या कुटुंबावर आलेला आहे, याची नोंद व्हावी.

आम्ही तेथून कराडला परतलो आणि एक-दोन आठवड्यांतच माझ्या बंधूंना नोकरीवर रूजू होण्याचा हुकूम मिळाला. आमचे घर थोडेसे स्थिरावले आणि कष्टप्रद का होईना, परंतु जीवनाचा पुढचा प्रवास सुरू झाला. माझ्या वडिलांच्या अकाली निधनाने कुटुंबावर आलेले संकट काहीसे सावरले होते. तरीसुद्धा आम्हांला आमच्या आजोळचा आसरा धरूनच चालण्याची जरूरी होती.  त्यामुळे प्रत्येक वर्षी दिवाळीच्या सुट्टीत किंवा एप्रिल-मे महिन्यांतील उन्हाळ्याच्या सुट्टीत कराडहून देवराष्ट्राला जाण्याचा आमचा कार्यक्रम हा आमचा नित्यक्रम होता. यामुळे माझे माध्यमिक शिक्षण पुरे होईतोपर्यंत देवराष्ट्र या गावाशी माझा संबंध सतत राहिला. त्यामुळे त्या गावातील सामाजिक परिस्थिती, तेथे पाहिलेली माणसे, तेथे आलेले अनुभव, ही सर्व माझ्या भावनाशील जीवनाचे अपरिहार्य अंग बनली आहेत.

देवराष्ट्र गावाची त्या  वेळची लोकसंख्या दीड-दोन हजारांची असावी. या छोट्या लोकसंख्येत सर्व जाती-जमाती होत्या. पाटलांची दोन घराणी तेथे होती. एक मोरे पाटील यांचे आणि दुसरे महिंद पाटील यांचे. यांशिवाय माझ्या आजोळचे घाडगे, म्हस्के, मुळीक, भोसले अशी आणखी पाच-पंचवीस मराठ्यांची घरे होती. धनगर वस्तीही काही प्रमाणात होती. दहा-पंधरा कुटुंबे तरी त्यांची असावीत. संख्येने दुसरे दोन मोठे समाज म्हणजे मुसलमान आणि रामोशी. यांच्याशिवाय व्यापार-उदीम करणारी काही लिंगायत व दोन-तीन गुजराती कुटुंबे सधन व सुखी अशी होती. लिंगायत मंडळीही अशीच ब-या परिस्थितीतली होती. दोन्ही पाटील घराण्यांतील फक्त  चार-दोन घरेच सुस्थितीत होती; कारण त्यांच्या शेतांत विहिरी वगैरे असल्यामुळे  ब-यापैकी पीकपाणी व साधने होती. पण बाकीची मात्र सामान्य स्थितीतली मंडळी होती.  मुसलमान समाज हा फारसा शेतीत नव्हता, परंतु दुसरे

काही छोटे-मोठे उद्योग  करून ते लोक आपले जीवन कंठीत होते. गावात दहा-पाच मंदिरे होती. तशाच एक-दोन मशिदीही होत्या.
रामोशी समाज हा संख्येने बराच होता आणि गावात त्यांचा दबदबाही होता.  हा समाज मागासलेला होता, परंतु अस्पृश्य मानला जात नसे. शेजा-यापाजाऱ्यांमध्ये त्यांची वर्दळ असे. त्यांचा धंदा निश्चित काही नव्हता; परंतु अधून-मधून शेतीवर कामाला जाण्याचा उद्योग ते करीत असत. आणि गरिबीने आपला संसार चालवीत असत. एक-दोन घरांच्या खेरीज बाकीच्यांना सुव्यवस्थित बांधलेली घरे राहायला नव्हतीच. दगड एकमेकांवर रचून उभ्या केलेल्या भिंती आणि त्याही उंचीने कमी. पावसाळ्यात कशी तरी राहायची सोय होईल, अशी केलेली व्यवस्था. अशा, कशा तरी वस्तीमध्ये ही मंडळी राहात होती. ही वस्ती माझ्या आजोळच्या घराला लागून होती. त्यामुळे त्या समाजातल्या अनेकांशी माझी ओळख झाली होती. आणि तेथे गेल्यानंतर आमच्यामध्ये खेळायला येणा-या मुलांत जशी मराठ्यांची व मुसलमानांची मुले असत, तशीच रामोश्यांची मुलेही येत असत.  त्यामुळे कधी कधी त्यांच्या वस्तीत जाण्याचा प्रसंग येत असे. तेथे मी त्यांच्या बरोबर खेळलो आहे, हिंडलो-फिरलो आहे. लहानपणापासून त्यांच्या संगतीचा व निकट सहवासाचा हा अनुभव असल्यामुळे माझ्या मनात त्या समाजाविषयी कायमची आपुलकी घर करून राहिली आहे.

गावात मध्यम स्थितीपासून ते उत्तम स्थितीत असलेली दहा-पंधरा ब्राह्मण कुटुंबेही होती. त्यांची काहीशी जमीनदारी होती. मुलेबाळे शिक्षणासाठी बाहेरगावी जात. परंतु माझ्या लहानपणी या मंडळींबद्दल गावात एक  प्रकारचा आदर असल्याचे मी पाहिले होते. पण या आदराच्या पदराखाली झाकलेले असे एक अंतर होते, त्याची जाणीव नंतर मला पुढे पुढे होऊ लागली.

असा हा, अनेकविध, वेगवेगळ्या स्तरांवरचे जीवन जगत असणारा, वेगवगळ्या संस्कृतीच्या पाकळ्या असणारा छोटासा समाज त्या गावामध्ये नांदत होता.

त्या गावाचा भौगोलिक परिसरही एका अर्थाने महत्त्वाचा होता. याचे मुख्य कारण या परिसरामध्ये असणारी महत्त्वाची देवालये. या गावाच्या नैर्ऋत्येला असलेल्या सागरेश्वराच्या मंदिराचे ठिकाण हे एक मन खेचून घेणारे असे स्थान होते. लिंगोबा हे दुसरे ठिकाण. लहान-मोठ्या डोंगराच्या कुशीत बसलेली ही देवस्थाने म्हणजे मनाला प्रसन्न करणारी चैतन्यस्थाने आहेत. कराड ते ताकारी या कृष्णेच्या खो-यातून वर जाणा-या मडंळींना सागरेश्वराची ही खिंड आणि सागरेश्वराचे मंदिर यांना भेट दिल्याशिवाय पुढे जाताच येत नसे. त्यामुळे सागरोबा आणि देवराष्ट्र यांच्यामध्ये एक प्रकारचे अतूट नाते निर्माण झाले आहे.

या गावच्या उत्तरेला दोन-तीन मैलांवर एक लहानसा ओढा वाहतो. तो ओढा या गावातल्या शेतीच्या ब-याचशा भागाला स्पर्श करून जातो. त्यामुळे त्याचे महत्त्व आहे. त्याचे नाव सोनहिरा. हा सोनहिरा माझ्या मनामध्ये फार मानाचे स्थान ठेवून आहे. मला माझी आई आठवली, की देवराष्ट्र आठवते आणि मग सागरेश्वर, सोनहिरा यांची आठवण येते; आणि सोनहिरा म्हटले, म्हणजे मला माझ्या आईची आठवण येते. लहानपणी अशी जी काही स्थाने भावनांना स्पर्श करून जातात, ती केव्हा केव्हा आपल्या मनामध्ये कायमची महत्त्वाची प्रतीके बनून जातात, तसेच या स्थानांचे झालेले आहे.

देवराष्ट्रामध्ये तशी सुपीक जमीन थोडी आहे. त्यावेळी फक्त पाच-चार ठिकाणी पाण्याच्या विहिरी आणि त्यांच्या भोवताली असणारे हिरवे मळे एवढीच काही सुबत्तेची ठिकाणे होती, बाकी सर्वत्र कोरडवाहू शेती आणि त्या जिरायती कोरडवाहू शेतीवर काबाडकष्ट करणारे शेतकरी असे कष्टाचे चित्र डोळ्यांना दिसत असे आणि अनुभवाला येत असे.

गावाच्या या आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवर गावकीच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मी जसा वयाने वाढत गेलो, तसा येत गेला. पुढे मी अनेक वर्षे या गावी

येत राहिल्यामुळे त्यातील काही गोष्टी ज्या मी वेळोवेळी पाहिल्या, त्या काही या गावापुरत्याच मर्यादित होत्या, असे नव्हते. या गरिबीच्या पार्श्वभूमीवर राहणारी माणसे ही माणुसकीला पारखी झाली नव्हती. ही त्यांतली मनाला ऊब देणारी गोष्ट आहे.

या समाजात माझ्या लहानपणी पाहिलेली काही माणसे आणि त्यांच्या काही आठवणी लोभसवाण्या आहेत. आमच्या आजोळच्या घराशेजारी असणा-या मुसलमान कुटुंबांशी असणारा घरोबा, त्याचप्रमाणे शेजारच्या सणगर आणि धनगर मंडळींशी असणारा जिव्हाळा हे त्यावेळचे सगळे आठवले, म्हणजे जातीजातींतील वैमनस्य ही समस्या पुढे केव्हा, कशी निर्माण झाली, हे समजत नाही. एकमेकांशी माणुसकीच्या नात्याची बांधिलकी होती.

एक गोष्ट मात्र सांगितली पाहिजे, की या सर्व समाजापासून दूर व गावाबाहेर राहणा-या महार, मांग, चांभार या मंडळींचा गावाशी फार कमी संपर्क असे. आणि जो असे, तो काही, ज्या माणुसकीचे मी वर कौतुक केले, तिच्याशी सुसंगत होता, असे म्हणता येणार नाही. आज दलितांचा प्रश्न म्हणून आम्ही ज्या प्रश्नाकडे पाहात आहोत, तो दलित समाज तेव्हा या गावगाड्याच्या बाहेर जे एक वेगळे जीवन जगत होता, त्याला जीवन हे नाव द्यायचे, की नाही, हाही एक वेगळा प्रश्न आहे.
पण मी येथे उल्लेख करत होतो, त्या लहानसहान जमातींचा. पाटील मंडळींची घराणी मानाची होती आणि त्यांमध्येही इज्जतदार वडीलधारी मंडळी सर्वांना सांभाळून घेण्याचा प्रयत्न करीत असत. पण त्याच्या पाठीमागचे एक  सूत्र होते. मी जे पुढे अनुभवाने समजलो, त्यावरून राज्य शासनाशी जुळते मिळते घेऊन नमून राहणे हे त्या सूत्राचे नाव होते, असे म्हटले, तरी चालेल. छोट्या-मोठ्या लोकांनी गावच्या पाटलाला मानावे. गावच्या पाटलांनी शेजारच्या पोलीस ठाण्यावरच्या पोलीसांना मानावे, अशी रीत होती. गावचा तलाठी हा कर्ता माणूस मानला जात असे. आणि या सगळ्यांत मोठी असामी म्हणजे तालुक्याचा मामलेदार जेव्हा गावी

येई, तेव्हा त्याची कोण सरबराई होत असे ! मुलाबाळांपासून तो मोठ्यांपर्यंत गावात कोणीतरी मोठा पाहुणा येणार, म्हणून गडबड असायची.

शासनाला भीतीने नमून वागण्याची ही प्रवृत्ती त्या वेळच्या जीवनाचे एक गृहीतकृत्य होते.  त्यामुळे पुढे ज्या राजकीय चळवळी झाल्या, त्यांचा लवलेशही तेथपर्यंत त्यावेळी पोचलेला नव्हता. शिक्षण कमी, बाहेरच्या जगाशी संपर्क कमी, आहे त्यात समाधान मानण्याची वृत्ती, कुणाच्या अध्यात मध्यात न पडावे, असे तटस्थ राहावे, हे धोरण, हीच तेथल्या जीवनाची रीत होती. त्यामुळे त्यात गतीही नव्हती. आणि प्रगतीही नव्हती. या गावचा आलेला हा अनुभव पुढे मी कार्यकर्ता म्हणून जेव्हा जिल्हयात इतरत्र हिंडू -फिरू लागलो, तेव्हाही थोड्याफार फरकाने मला पुन्हा आला. काही ठिकाणी सुबत्ता जास्त असे. तेथील धनिक लोकांची आक्रमकता गरीब माणसाच्या बाबतीत मात्र जास्त असे. हा एवढा फरक कोठे कोठे जरूर जाणवला.  पण शासनाच्या विरूद्ध आवाज काढायचा नाही, हा त्या वेळच्या शेतकरी समाजाचा आणि शेतकरी समाजावर अवलंबून राहणा-या ग्रामीण समाजाचा जणू स्वभाव बनून गेला होता.

माझ्या लहानपणी माझ्या गावात मी पाहिलेली काही माणसे, त्यांचे स्वभावविशेष माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. मी लहानपणी त्या गावी गेलो, की काही ठिकाणे अशी होती, की तेथे मी हमखास जाऊन येत असे. त्यांमध्ये वयाने पन्नाशीला आलेला बाबू तेली हे एक मोठे नमुनेदार व्यक्तिमत्त्व होते, दिवसातून एक-दोनदा तरी बाबू तेल्याच्या घरी गेल्याशिवाय मी राहत नसे. आजोळच्या घराशी त्याचे जवळिकीचे संबंध असल्यामुळे ते ही मला मोठ्या प्रेमाने वागवीत असे. त्याच्या घरात तेलाचा घाणा सुरू असे. भुईमुगाच्या शेंगा एका मोठ्या लाकडी घाण्यात टाकून त्याच्या भोवती फिरणारा बैल व त्याच्या पाठीमागे हिंडणारा बाबू तेली हा मला नेहमी आठवतो. चक्राकार फिरणा-या बैलाच्या पाठीमागे त्या घाण्यावर एक जागा असे. त्या जागेवर बसून किती तरी वेळ मी मजेने काढला आहे.  हा

बाबू तेली मला अधून मधून वेगळ्या गोष्टी सांगे. देवराष्ट्रातल्या माणसांच्या खोड्या सांगे नि खूप हसवी. सोललेल्या शेंगा देऊन माझा पाहुणचारही करीत असे. याच्यासारखी आणखीही कित्येक माणसे होती.

रामोशी गल्लीतील काही मुलांच्याबरोबर देवराष्ट्राच्या माळावर केलेल्या उनाडक्या मला आजही आठवतात. एके दिवशी दुपारनंतर देवराष्ट्रापासून दोन मैलांवर असलेल्या डोंगरावर करवंदे खाण्याकरता म्हणून चार-सहा मुलांची टोळी गेली होती. त्या मुलांचा डोंगर चढण्याचा सराव व करवंदे काढण्याची कुशलता पाहून मी काहीसा शहरी झालो आहे, याची जाणीव वयाच्या आठव्या दहाव्या वर्षी झाली. पण मला करवंदांपेक्षाही या मुलांच्या संगतीत एक वेगळीच चव आली होती. मी कराडसारख्या एका मोठ्या गावातून सुट्टीसाठी तेथे येत असल्यामुळे मला ते थोडे अदबीने आणि प्रेमाने वागवीत असत. ते ज्या गोष्टी करू शकतात, त्या करण्यात आपण मागे नाही, हे दाखविण्याचा माझा प्रयत्न असे. पण तो नेहमीच यशस्वी होत नसे. मला आठवते, एकदा सोनहि-याच्या काठी आम्ही गेलो होतो. अनपेक्षितपणे ओढ्याला एकदम पाणी आले. अशा ओढ्याच्या पाण्याला, नदीच्या पाण्यापेक्षा जास्त ओढ असते. मला वाटते, ही ओढ जास्त असते, म्हणूनच त्याला 'ओढा' म्हटले जात असेल. ओढ्याचे पाणी एकदम चढत असे. आणि तसे ते चार-दोन तास राहून निघून जात असे. मी कोयनेमध्ये पोहायला शिकलो होतो. या पोहण्याच्या शहरी अनुभवाच्या आधारावर, ज्या दिवशी सोनहि-याला थोडे पाणी जास्त आले होते, त्या दिवशी त्या ओढ्यात पोहण्यासाठी म्हणून मी अंग टाकून दिले. मला वाटले होते, की मी त्या ओढ्याचे अरूंद पात्र केव्हाच, सहज पोहून जाईन. परंतु प्रत्यक्ष अनुभव काही वेगळाच आला. पोहण्याचा थोडा-फार प्रयत्न करून पुढे गेल्यानंतर, मध्य धारेच्या जवळपास असताना मला इतकी ओढ लागली, की मला असे वाटले, की मी आता बुडून जाणार. माझा धीर काहीसा खचला होता आणि शरीर पण थकून जाणार, असे वाटू लागल्यानंतर मी काठावरच्या बरोबरच्या मित्रांना हाक दिली. त्यातल्या दोघा-तिघांनी उड्या टाकल्या आणि मला मदत करून ओढ्याबाहेर काढले. क्षणभर मनात असे येऊन गेले, की आपण आज बुडणार

होतो; पण ओढ्यात पोहण्याची सवय असणा-या मित्रांनी मला आज वाचविले होते. मी काहीसा शरमिंदा झालो होतो. मला वाचविणारी मुले माझी चेष्टा करू लागली आणि म्हणू लागली,

"आमचा सोनहिरा कृष्णा-कोयनेपेक्षा जबरदस्त आहे, हे लक्षात आले का?" त्यांचे म्हणणे एका अर्थाने खरे होते. कृष्णा-कोयनेचे मोठेपण हे तर खरेच आहे; पण सोनहि-याचे स्वत:चे काही महत्त्व आहे, हे माझ्या अनुभवास आल्यामुळे मी त्यांना तशी कबुली दिली. सोनहि-यामध्ये माझा पुनर्जन्म झाला, अशी काहीशी भावना तेव्हापासून माझ्या मनात आहे.

देवराष्ट्र येथील आणखी किती तरी आठवणी आहेत. त्या सगळ्या देऊ लागलो, तर सगळा वेळ व जागा यातच जाईल, म्हणून हे आवरते घेतले पाहिजे. पण त्यांतली एक आठवण घेतल्याशिवाय हे काम पुरे होणार नाही.

मी इंग्रजी शाळेत जाऊ लागल्यानंतर जेव्हा देवराष्ट्राला येत असे, तेव्हा आमच्या आजोळच्या घरचे एक मित्र श्री. सखाराम म्हस्के यांचे व माझे वारंवार संभाषण होई. ते मला नेहमी म्हणायचे,

"तू किती शिकणार आहेस?"

मी सांगत असे,

"जितके जास्त शिकता येईल, तितके मी शिकणार आहे."

ते मला म्हणायचे,

"मामलेदार होण्याइतके तू शिकशील का ? "

मी त्यांना उत्तर देई,

"हो, इतके तर नक्कीच शिकेन."

मग पाणावलेले डोळे करून ते मला म्हणायचे,

"हो, जरूर हो मामलेदार. मामलेदार झाल्यानंतर विट्याला बदली करून घे. आणि आपल्या देवराष्ट्राला भेट द्यायला ये. मग पाटील आणि सगळी मंडळी जमली

असतांना तू मला नावाने हाक मारून आपल्याजवळ बोलावून घे. माझी गावात केवढी मोठी इज्जत वाढेल !"

ही एक नमुनेदार आठवण आहे. यात शिक्षणाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन काय होता आणि शासनाशी संबंध असल्यानंतर सामाजिक प्रतिष्ठा वाढते, ही भावना समाजात कशी रूजली होती, त्याचे हे बोलके चित्र आहे किंवा एक नमुना आहे.

पुढे पुढे मी त्यांना सांगत असे,
"मी काही मामलेदार वगैरे कधी होणार नाही."
कारण तोपर्यंत माझे विचार वेगळ्या दिशेने वाहू लागले होते. ते मी त्यांना समजावून सांगितलेही नाही व सांगून काही उपयोगही नव्हता. परंतु त्या माणसाची भोळी आशा आणि त्यातील आपलेपणाचा भाग यांमुळे ही गोष्ट आणि हे संभाषण मला नित्य आठवते.

पुढे मी मंत्री झाल्यानंतर त्यांची-माझी भेट झाली. त्यांना आनंदही झालेला दिसला. परंतु मी मामलेदार न होता मंत्री झालो, यात त्यांना खरे समाधान झाले, की नाही, हे माहीत नाही. मामलेदारकीचे त्यांचे स्वप्न मी काही पुरे करू शकलो नव्हतो, ही गोष्ट मात्र खरी आहे !

शेतीशी संबंध असलेला माणूस नजीकच्या राजकीय सत्तेला फार वरिष्ठ मानतो, हा माझा अनुभव यापुढेही मला येत गेला. देवराष्ट्राच्या या अनुभवाची शिदोरी माझ्या मनाला एक प्रकारचे शिक्षण देत होती. कार्यकर्ता म्हणून कार्य करण्यास लागणारी जी मनाची तयारी असावी लागते आणि सामाजिक जाणिवांची माहिती असणे आवश्यक असते, ती यातून मिळत गेली.

आजोळी माझ्या आईला सर्वजण 'आक्का ' म्हणत असत. ती घरात सर्वांत मोठी,

म्हणून आला-गेला माणूसही आक्काच  म्हणत असे. आजोळी घरी असताना एकदा आजीला विचारले, तेव्हा ती म्हणाली,
"आक्काचं नाव देवाचं आहे. विठाई आपला देव आहे."
आजी काय म्हणते, ते मला कळत नव्हते.  पण ती काही तरी चांगले म्हणाली, असे वाटले.
याच वेळी बोलण्याच्या ओघात माझ्या नावामागची कथाही तिने सांगितली. ती म्हणाली,
"तुझ्या जन्माच्या वेळी आईला फार त्रास झाला. ती बेशुद्ध झाली. आपलं गाव खेडेगाव. दवापाण्याची सोय नाही. घरगुती औषधपाणी केलं, पण गुण येईना. माझ्या जिवाला घोर लागला. अखेर सागरोबाला साकडं घातलं आणि देवाला काकुळतीनं विनवलं, आक्काला जगवण्यात माझ्या हाताला यश दे, तुझी आठवण म्हणून मुलाचं नाव यशवंत ठेवू."  सागरोबानं ऐकलं. म्हणून तुझं नाव यशवंत ठेवलं."

आजीने इडापिडा टळो, म्हणून गालांवरून बोटे उतरली आणि कडकड मोडली. तिच्या डोळ्यांत पाणी जमले.

रात्री आजीने दृष्ट काढली आणि सागरोबाचा अंगारा लावला.

'विठाई' व 'यशवंत' या दोन नावांमागचा इतिहास प्रथमच मला समजला. आईच्या प्राणाची साक्ष म्हणून माझे नाव यशवंत आहे, हे कळल्यापासून आई हाच माझा प्राण झाली.

माझ्या थोरल्या बंधूंना नोकरी मिळाल्यानंतर ते काही दिवस कराडमध्ये होते. नंतर त्यांची बदली होऊन ते विट्याला गेले. परंतु माझ्या आईने निर्णय घेतला, की दोन्ही धाकटी मुले घेऊन तिने कराडलाच राहावे आणि त्यांचे शिक्षण पुरे करावे. माझ्या आईचा हा एक ध्यास होता. तिने स्वीकारलेला मंत्र होता, की शिक्षण ही

शक्ती आहे. ती मिळवली पाहिजे. आपल्या मुलांचे शिक्षण पुरे केले पाहिजे. या दृष्टीने तिने घेतलेला हा निर्णय आमच्या आयुष्याला दिशा द्यायला मूळ कारणीभूत आहे, हे मला स्पष्ट दिसत आहे. आणि तिच्या या निर्णयाच्या निमित्ताने आम्ही कराडकर झालो. त्यानंतर कराडशी जो संपर्क आला, तो कायमचाच. तेच आमचे गाव झाले आणि कार्यक्षेत्रही झाले.

माझी आई शाळेत शिकली नव्हती. पण शिक्षणाचे मोल ती मनोमन जाणत होती. आमच्या घरची तशी गरिबीच असली, तरी संस्कारांनी आई श्रीमंत होती. ही श्रीमंती आम्हा मुलांपर्यंत पोचविण्याचा तिचा सततचा प्रयत्न होता. 'देव आपल्या पाठीशी आहे ', ही तिची निष्ठा होती. त्यामुळेच ती संकटकाळी कधी डगमगली नाही. आम्हांला ती सतत धीर देई. पहाटे दळण दळताना-

*'नका, बाळांनो, डगमगू*
*चंद्र-सूर्यावरील जाई ढगू....'*

ही दिलासा देणारी ओवी तिच्या मांडीवर झोपून मी कितीतरी वेळा ऐकली आहे.

उत्तरेकडून येणारी कृष्णा आणि दक्षिणेकडून येणारी कोयना यांचा समोरासमोर येऊन प्रीतिसंगम होतो व मग नदीचा प्रवाह सरळ पूर्वेकडे वाहतो. या संगमामुळे होणा-या काटकोनात वसलेले दोन नद्यांच्या काठचे गाव, म्हणजे कराड. हे फार प्राचीन असे गाव आहे व तसा इतिहासही आहे. आजही तसे ते मोठे शहर नाही, ५५-६० हजारांची लोकसंख्या असावी. पण मी त्या गावात जेव्हा वाढत होतो, तेव्हा त्याची १५-१६ हजारांची लोकवस्ती होती. सर्वजण एकमेकाला ओळखू शकतील, अशी परिस्थिती होती. थोड्या फार प्रमाणात आजही तशीच आहे.

गाव जरी लहानसा कसबा असले, तरी त्याला स्वत:चे एक व्यक्तिमत्त्व होते आणि आहे. व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र. विद्याव्यासंगाची व ज्ञानोपासनेची जुनी परंपरा. कृष्णाकाठी बहुधा ब्राहमण वसती. कोयनाकाठी मराठा व इतर जमाती यांचे वास्तव्य. गावाच्या मध्यवस्तीत व्यापारी पेठ, मंडई आणि उंचवट्यावर मुस्लिम

मोहल्ले. गावाच्या पूर्व बाजूला हरीजनांचे वाडे.  सर्वसामान्यतः एकमेकांशी संबंध ठेवून राहण्याची रीत या गावात होती. माझ्या विद्यार्थिदशेत या गावात एक हायस्कूल आणि कसेबसे चालणारे एक सार्वजनिक वाचनालय होते. पण हे वाचनालय व्याख्याने व चर्चा यांचे महत्त्वाचे केंद्र असे. या गावाला राजकीय परंपरा होती. राष्ट्रीय विचारांची चांगली जाण असलेल्या अनेक व्यक्ती येथे होत्या. आळतेकर पिता-पुत्र, श्री. पांडुअण्णा शिराळकर, बाबूराव गोखले, गणपतराव बटाणे, किसनलाल प्रेमराज ही त्यांतली वानगीदाखल काही नावे. लोकमान्य टिळकांचे स्मारक म्हणून गावातील प्रमुखांनी येथे इंग्रजी शाळा सुरू केली. सांस्कृतिक क्षेत्रातले हे एक महत्त्वाचे पाऊल होते. आज कराड हे एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले आहे, त्याची ती सुरुवात होती. या लहानशा गावाला राजकारणाचा मोठा नाद होता. देशातल्या महत्त्वाच्या सर्व राजकीय चळवळींचे प्रतिनिधी तेथे होते. आणि ते सर्व क्रियाशील होते.  अशा गावाच्या संस्कारांत मी वाढत होतो.

कराडच्या वातावरणामध्ये आम्ही जेव्हा वाढत होतो, तेव्हा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये काही नवे प्रवाह आणि नव्या शक्ती काम करत होत्या. योगायोगाने कराडमध्ये ज्या भागात व ज्या जागेमध्ये आम्ही भाड्याने राहात होतो, तिथे कराडमधल्या खानदानी मराठा कुटुंबाची महत्त्वाची वस्ती होती. कराडमध्ये जिला डुबल आळी म्हणत असत, तेथे आम्ही राहात असू. ही मराठा समाजातील प्रतिष्ठित कुटुंबे असल्यामुळे व कराड हे मध्यवर्ती व महत्त्वाचे स्थान असल्यामुळे तेथे बरीचशी मोठी मंडळी येत-जात असत. त्या मंडळींच्या तेथे चालू असलेल्या बोलण्या-चालण्याचा भाग जो आम्ही ऐकत असू, त्यावरून त्यांच्या विचारांची कल्पना येऊ लागली. आम्हांला समजू लागले, की बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी सत्यशोधक चळवळ किंवा पुढे तिला राजकारणामध्ये ब्राह्मणेतर चळवळ असे स्वरूप आले; ती वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्यासाठी बहुजन समाजातल्या मुला-मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे, वाचन केले पाहिजे, सार्वजनिक कामांत भाग घेतला पाहिजे. अशा तऱ्हेचे मानसिक व वैचारिक वातावरण त्यावेळी तेथे होते.

या सुमाराला कराडमध्ये एक महत्त्वाची व्यक्ती या चळवळीत काम करत होती. आणि ती व्यक्ती म्हणजे श्री. भाऊसाहेब कळंबे.

प्राथमिक शिक्षणाचे तिसरे वर्ष पुरे केलेले (ट्रेन्ड) एक उत्तम गुरूजी, असा त्यांचा पूर्वी लौकिक होता. परंतु क्रांतिकारकांशी संबंध असल्याच्या संशयावरून त्यांना नोकरी सोडावी लागली होती. डुबल आळीतील प्रसिद्ध असा बाळनाथ बुवाचा मठ हे त्यांनी आपल्या कार्याचे केंद्र केले होते. अत्यंत बुद्धिमान, उत्तम वक्ते, उत्तम लेखक असा या गृहस्थांचा लौकिक होता. श्री. जवळकरांनी चालविलेले 'कैवारी' हे वृत्तपत्र या श्री. भाऊसाहेब कळंब्यांनी कराडमध्ये प्रथम प्रसिद्ध करून काही दिवस चालविले होते. नंतर ते मुबंईहून प्रसिद्ध होत असे. बहुजन समाजातील तरुण पिढीला सत्यशोधकीय विचार व संस्कार देण्याच्या हेतूने त्यांचे शिक्षण नव्या पद्धतीने करण्याची गरज आहे, असे मत ते मांडत असत. त्यासाठी त्यांनी आम्ही राहत होतो, त्या गल्लीतील एक मोठा वाडा भाड्याने घेऊन त्या ठिकाणी 'विजयाश्रम' या नावाची एक संस्था सुरू  केली. या आश्रमात शिक्षणासाठी राहण्याकरता काही मुलांची त्यांनी निवड केली. माझे मधले बंधू गणपतराव या आश्रमात विद्यार्थी म्हणून राहायला गेले आणि त्यांच्या मनावर त्या विजयाश्रमाचे संस्कार झाले. ते मला तेथे नेहमी काय घडते, ते अधून मधून सांगत असत आणि श्री. भाऊसाहेब कळंब्यांचे कर्तृत्व किती मोठे आहे, याची कल्पना देत असत. त्यामुळे आम्ही सर्वजण भारावून जात असू.

श्री. कळंब्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आज जेव्हा मी पाठीमागे वळून पाहतो, तेव्हा एक गोष्ट कबूल केली पाहिजे, की ते खरोखर एक प्रतिभाशाली गृहस्थ होते. परंतु त्यांनी कुठलेही एक काम स्थिर मनाने पुढे नेले नाही. त्यांना अनेक नव्या कल्पना सुचत असत आणि नवी कल्पना सुचली, की जुन्या कल्पनेचा त्याग, ही त्यांची कामाची पद्धत होती. त्यांनी ज्या निर्धाराने ही कामे सुरू केली, ती जर चालू राहिली

असती, तर कदाचित त्यांतून एक वेगळीच संघटना आणि वेगळ्या कर्तृत्वाची माणसे निर्माण झाली असती. परंतु ते होणार नव्हते.

ते उत्कृष्ट शिल्पकारही होते. मोकळा वेळ मिळेल, तेव्हा ते संगमरवरी मूर्ती तयार करण्याचे काम करत असत. मला माझ्या लहानपणाची आठवण आहे. बाळनाथबुवांच्या मठामध्ये ते एका संगमरवरी दगडातून सुंदर अशी दत्ताची मूर्ती तयार करीत होते. तेव्हा आम्ही काही मुले तेथे जाऊन, लांब उभे राहून ते हे कलापूर्ण काम कसे करतात, ते तासन् तास कुतूहलाने पाहत असू.

भाऊसाहेब कळंब्यांनी कराड तालुका, पाटण तालुका, वाळवे तालुका, येथल्या बहुजन समाजांतील अनेक कार्यकर्त्यांना आपल्याकडे आकर्षून घेतले होते. आणि या कार्यकर्त्यांची वर्दळ तेथे सतत चालू असे. आम्ही सर्व लहान मुले मोठ्या आदराने आणि कौतुकाने हे सर्व पाहत असू. माझ्या मधल्या बंधूंच्या या 'विजयाश्रमा'च्या प्रेमामुळे आणि श्री. भाऊसाहेब कळंबे यांच्याविषयीच्या आदरामुळे माझ्याही मनात ते विचार घोळत असत आणि त्यांबद्दल आकर्षण व आदर वाढत होता. नाही म्हटले, तरी सत्यशोधकीय व ब्राह्मणेतर चळवळीचे संस्कार मनावर नकळत होतच होते.

याच काळात, म्हणजे १९२७ किंवा त्यापूर्वीचे साल असेल. श्री. भास्करराव जाधव हे तेव्हाच्या मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे उमेदवार म्हणून आमच्या जिल्ह्यातून उभे राहिले होते. त्यावेळी मला निवडणुकीच्या बारकाव्यांची माहिती नव्हती. पण श्री. भास्करराव जाधव हे आपले प्रतिनिधी असावेत, अशी जी बहुजन समाजाची इच्छा होती, तिच्याशी मी सहमत होतो आणि तीमुळे मी भारावूनही गेलो होतो. त्या निवडणुकीत मी एक स्वयंसेवक म्हणून काम करू लागलो आणि त्यासाठी कराडशेजारच्या चार-दोन गावी जाऊन आलो. निवडणुकीशी माझा जो संबंध आला, तो इतक्या लहान वयात आला आणि तेव्हापासून तो आजतागायत टिकला आहे.

श्री. भास्करराव जाधव निवडून आले आणि मुंबई राज्याचे दीवाण झाले. त्या वेळी मंत्र्यांना दिवाण म्हणत असत. आम्ही सर्व मंडळी फार आनंदी झालो.

याच काळात केव्हा तरी दुसरी एक घटना घडल्याची मला आठवण आहे. कराडला हल्ली जेथे आमचे घर आहे, त्याच्यापुढे एक मैदान आहे. या मैदानात महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध राजकीय जोडी श्री. केशवराव जेधे आणि श्री. दिनकरराव जवळकर यांची एक तुफान सभा झाली. मी 'तुफान' शब्द अशासाठी वापरतो आहे, की माणसे फार तुफान गर्दीने जमली होती, या अर्थाने नव्हे; पण या सभेमध्ये श्री. दिनकरराव जवळकर यांनी केलेले भाषण हे अगदी तुफान किंवा खळबळ माजवणारे होते. त्यांनी व्याख्यानाचा विषय ठेवला होताः 'ब्राह्मणांचे भवितव्य'. ब्राह्मण समाजाविषयी अत्यंत कठोर अशी टीका त्यांनी भाषणात केली होती. मी ते भाषण लक्ष लावून ऐकले होते. त्या सभेत त्यांनी लिहिलेले 'देशाचे दुश्मन', हे पुस्तकही वाटले जात होते.  त्याची एक प्रत मी मिळवली आणि पुढे ती वाचून काढली.

मी या सभेचा उल्लेख एवढ्यासाठी करतो आहे, की या सभेनंतर माझ्या मनामध्ये एक संघर्ष सुरू झाला. त्याची परिणती अशी झाली, की मी मनाने आणि विचाराने आमूलाग्र बदललो. मी त्यानतंर माझे मधले बंधू गणपतरावांशी त्यावेळच्या माझ्या समजुतीप्रमाणे चर्चा करू लागलो. वेगळे प्रश्न विचारू लागलो. विशेषतः, श्री. जवळकरांनी टिळकांच्यावर केलली टीका ही बरोबर नव्हती, असे माझ्या मनाने घेतले, कारण तोपर्यंत मी थोडे - फार वाचू लागलो होतो. लोकमान्य टिळक हे इंग्रजांविरूद्ध लढणारे एक सेनापती आहेत, अशी माझी भावना होती. त्यामुळे अशा थोर माणसावरती टीका करणारी माणसे ही इंग्रजांचे मित्र तर नाहीत ना ? अशा तऱ्हेची शंका व विचार माझ्या मनात येऊन गेला होता. मला आश्चर्य वाटते, की त्या छोट्या वयात माझ्या मनात हा विचार आला. आणि परिणामी या सर्व प्रकारानंतर मी ज्या वातावरणात राहत होतो आणि वाढत होतो, त्याच्यापेक्षा वेगळे ठिकाण, वेगळी सहवासाची माणसे शोधणे याची गरज आहे, असे वाटू लागले.

मी मराठी सातवी इयत्तेच्या वर्गात शिकत होतो, त्यामुळे मला समज होती. वृत्तपत्र-वाचनाचीही सवय लागली होती. परंतु त्यावेळी जी वृत्तपत्रे मला वाचायला मिळत असत, ती म्हणजे पुण्यात प्रसिद्ध होणारा 'विजयी मराठा' आणि बेळगावाहून प्रसिद्ध होणारा 'राष्ट्रवीर' ही ब्राह्मणेतर चळवळीचा पुरस्कार करणारी होती. ती एकाच व एकांगी विचाराचा परखड प्रचार सतत करत असल्यामुळे त्यांचा थोडा-फार परिणाम मनावर झालेलाच होता.

त्यानंतर तेव्हा मी या संकुचित व दूषित क्षेत्रातून प्रयत्न करून बाहेर पडलो व इतर काही मंडळींच्या संपर्कात आलो, त्यांमध्ये मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे असे पहिले नाव म्हणजे माझे जुने मित्र हरिभाऊ लाड यांचे. शरीराने ते काहिसे ठेंगू व अपंग आहेत. पण मनाने मोठा धैर्यशाली माणूस, असा त्यांच्याबद्दलचा माझा अनुभव आहे. ते आपल्या छोटेखानी दुकानात बाहेरची वृत्तपत्रे घेत असत. त्यामध्ये पुण्या-मुंबईची पत्रे असत. त्यामुळे या माणसाशी संबंध आल्यानंतर बाहेरची वृत्तपत्रे वाचण्याची सोय झाली आणि सवयही लागली. यांमध्ये जसे पुण्याहून प्रसिद्ध होणारे 'मजूर' हे पत्र आम्ही वाचत असू, त्याचप्रमाणे मुंबईहून प्रसिद्ध होणारे साप्ताहिक 'श्रद्धानंद' हेही वाचू लागलो. त्यामुळे मनावर अधिक व्यापक स्वरूपाचे संस्कार व्हायला सुरुवात झाली. हरिभाऊ व्यापारी समाजातील होते. त्यामुळे त्यांना ब्राह्मणेतर चळवळीबद्दल फारसे आकर्षण नव्हते. पण त्यांचा त्याला काही विरोधही नव्हता. त्यांच्याशी माझ्या त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये मला हे दिसून आले. परंतु त्यांच्या मनात हिंदुत्ववादासंबंधाने काहीसे आकर्षण होते. मी, नाही म्हटले, तरी त्यांच्या या मताला काही काळ पाठिंबा व होकार देत राहिलो. आणि स्थानिक परिस्थितीमध्ये काही वेगळे कार्य सुरू केले पाहिजे, असा त्यांचा-आमचा विचार सुरू झाला. या आमच्या विचारातून आम्ही मुलामुलांनी 'शिवछत्रपती मंडळ' सुरू केले. हरिभाऊ आमच्यापेक्षा वयाने मोठे होते. परिस्थितीने त्या वेळी ते बरे होते. व्यापारी वगैरे मंडळींमध्ये त्यांच्या ओळखीपाळखी होत्या. त्यावेळचे कराडातले प्रसिद्ध पुढारी आणि व्यापारी श्री. गणपतराव ऊर्फ भाऊसाहेब बटाणे यांचा व त्यांचा चांगला घरोबा होता. तेव्हा त्यांच्या मदतीने आम्ही हे काम सुरू केले. श्री. बटाणे यांचे थोरले

चिरंजीव शिवाजी बटाणे हेही आमच्या मंडळाचे प्रमुख सदस्य म्हणून काम करू लागले. बटाणे यांच्या मंदिरामध्ये दरवर्षी गणेशोत्सव साजरा होत असे आणि कराडमध्ये त्याला एक प्रतिष्ठाही होती. त्या उत्सवासाठी एक मेळा काढण्याची कल्पना आम्ही मुलांनी ठरवली. आणि मी स्वतः त्या मेळ्यामध्ये वर्ष, दोन वर्ष तरी गाणी गात फिरत होतो. या मेळ्यासाठी काही पदे करून देण्याचाही मी प्रयत्न केला होता, अशी आठवण आहे.

मी ही सर्व गोष्ट यासाठी सांगतो आहे, की ब्राह्मणेतर चळवळीच्या संकुचित दृष्टिकोनातून बाहेर पडून काही केले पाहिजे, अशी जी माझ्या मनाची ओढ सुरू झाली होती, त्याला आता कोठे तरी एक नवे कार्यक्षेत्र मिळाले. नवे मित्र मिळाले आणि त्यांच्याशी चर्चा करण्यात मी रममाण होऊन गेलो. त्या सर्व मंडळींशी माझे संबंध पुढे जन्मभर चांगले राहिले. हरीभाऊ आजही आहेत. त्यांनी तुरूंगाच्या अनेक वा-या केल्या. अजून ते थोडे-फार कष्टप्रद आयुष्य काढत आहेत. परंतु त्यांची-माझी ओळख माझ्या मनाला कलाटणी देणा-या महत्त्वाच्या वळणावर झाली, म्हणून ती मला महत्त्वपूर्ण वाटते आणि उल्लेखनीयही वाटते. कारण एका संस्काराच्या चाकोरीतून बाहेर पडून नव्या दिशेने चालण्यास मी या वेळी सुरुवात केली.
आम्ही सुरू केलेला शिवजयंती उत्सव पुढे कित्येक वर्षे चालू राहिला. त्यासाठी व्याख्याने, भजने असे कार्यक्रम आम्ही करत असू. व्याख्यानासाठी कधी कधी बाहेरून लोकांना बोलवत असू. मला आठवते, आम्ही पुण्याच्या 'स्वराज्य' पत्राचे तेव्हाचे संपादक श्री. विनायकराव भुस्कुटे यांना निमंत्रित केले होते. व्याख्याने ही काही तेव्हा लोकप्रिय नव्हती. गणेशोत्सवातल्या मेळ्यांच्या कार्यक्रमांना आणि भजनांच्या कार्यक्रमांना मात्र चांगलीच गर्दी असे. पण व्याख्यानासाठी ओढून ताणून व गोळा करून माणसे आणावी लागत. श्री. भुस्कुटे यांच्या भाषणाला आम्ही कशी तरी पन्नास एक माणसे जमा करू शकलो. परंतु त्यांनी श्रोते कमी आहेत, म्हणून आपल्या व्याख्यानाचा विषय बदलला नाही. किंवा त्यांना जो विषय मांडायचा होता, त्या विषयाच्या मांडणीमध्ये कोठे काटछाटही केली नाही. श्री. विनायकराव भुस्कुटे

यांची माझी पहिली ओळख या उत्सवानिमित्ताने झाली. ती पुढे १९३२ साली ते आणि मी एके ठिकाणी जेलमध्ये असताना अधिकपक्की झाली.

या रितीने काही सार्वजनिक काम प्रत्यक्ष करण्याला माझी सुरुवात झाली आणि त्यामुळे वेगवेगळ्या माणसांशी संबंध आले. गावात मी सर्वत्र ओळखला जाऊ लागलो. आपण एक सार्वजनिक कार्यकर्ता आहोत, याची मलाही जाणीव होऊ लागली. यासाठी वाचन केले पाहिजे, अधिक समजून घेतले पाहिजे, अशा भावनेने प्रयत्नशील राहिलो.

या सुमाराला मी माझी मराठी सातवी पास करून, कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये एका वर्षात तीन इयत्ता पास करण्याचा कोर्स पुरा करून हायस्कूलचा विद्यार्थी बनलो. एक वेगळे क्षेत्र, वेगळी माणसे आणि एका वेगळ्या वातावरणात मी आलो. या सुमाराला माझ्या वाचनाची सवय पक्की झाली, अशी माझी आठवण आहे. लायब्ररीतून आणि मित्रांकडून हरिभाऊ आपट्यांच्या कादंब-या आणून वाचायला सुरुवात केली. आणि पुस्तकांचा नाद सुरू झाला. मिळेल तेथून पुस्तक घ्यावे आणि ते वाचावे, असा सपाटा मी सुरू केला. वाचनाची आवड निर्माण झाली, हे खरे; पण त्यामध्ये फारशी शिस्त नव्हती. काय वाचावे आणि काय वाचू नये, याचे कोणी मार्गदर्शन करीत नव्हते. त्यामुळे जे हाताशी येईल, किंवा कोणी उत्तम आहे, अशी शिफारस करील, किंवा जे आवडेल, ते मी वाचत होतो. पण पुढे जसजसा काळ गेला, तसतसा मग माझा मीच आवडीने काय वाचावे आणि काय वाचू नये, हे ठरवू लागलो. 'विजयी मराठा' आणि 'राष्ट्रवीर' या मर्यादित वाचनाच्या कक्षेबाहेर गेलो होतो. आणि माझ्या वयाच्या मनाने मी अधिक गंभीर लेखन वाचायचा प्रयत्न करीत होतो. केळुसकरांनी लिहिलेले 'छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र' मी मन लावून वाचले. तसेच शिवरामपंत परांजपे यांचे "काळा'तील निबंध" मी वाचण्याचा प्रयत्न केला. केळुसकरांचे मराठी सरळ, साधे होते, ते समजत गेले; पण शिवरामपंत यांचे मराठी हे मोठे अवघड वाटत असे. खरे म्हणजे त्यांचे मराठी हे एका अर्थाने संस्कृतच होते. आणि संस्कृतचा मला गंध नसल्यामुळे त्यातली

महत्त्वाची सौंदर्यस्थळे मला फारशी समजत नसत. पण विचांराचा धागा धरून मी ते वाचन सुरू ठेवले.

या वाचनानंतर माझ्या मनावर आणि विचारांवर काही वेगळे संस्कार झाले आणि त्यांमुळे मी माझे बंधू गणपतराव यांच्याशी अधिक चर्चा करू लागलो, वाद घालू लागलो. श्री. भाऊसाहेब कळंबे यांच्या 'विजयाश्रमात' त्यांनी घेतलेले त्यांचे संस्कार आणि माझे संस्कार यांत फरक पडत चालला होता. मी त्यांना पेचात टाकणारे प्रश्न विचारू लागलो. बहुजन समाजाने शिकले पाहिजे, हे खरे, पण ते कशासाठी ? निव्वळ नोकरीसाठी, की देशासाठी काही विशेष करण्यासाठी? असे माझे साधे, सरळ प्रश्न असत. निव्वळ ब्राह्मणांना विरोध करून बहुजन समाजाचे हित कसे होईल? या माझ्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळत नसत. त्यांची एक बाजू ते अशी सांगत असत, की ब्राह्मणांचा द्वेष केलाच पाहिजे, असा आग्रह नाही; पण सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक बाबतींत या मडंळींनी इतर समाजाची गळचेपी केलेली आहे, यातून मुक्त नको का व्हायला ? आणि या संदर्भात एके दिवशी त्यांनी मला वऱ्हाडमधील पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेले महात्मा ज्योतिराव फुले यांचे एक छोटे चरित्र वाचायला दिले. माझ्या माहितीप्रमाणे मराठीत लिहिलेले महात्मा फुल्यांचे हे पहिलेच चरित्र होते. माझे बंधू म्हणाले,
"तू हे वाच. मग आपण त्यानंतर बोलू."
त्यांना 'विजयाश्रमात' महात्मा फुल्यांच्या विचारांची जी शिकवण दिली गेली होती, तिच्या आधारावर ते बोलत होते. महात्मा फुल्यांचा विचार मूलगामी आहे व तो काही नवीन दिशा दाखवतो आहे, असे मलाही वाटले. त्यांनी उभे केलेले काही प्रश्न तर निरूत्तर करणारे होते. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडविल्याखेरीज देशाचे कार्य होणार नाही, हा त्यांच्या विचारांचा सारांश माझ्या मनामध्ये ठसला.

गणपतरावांशी नंतर माझी जी चर्चा झाली, त्यावेळी मी त्यांना सांगितले, की

महात्मा फुल्यांचे चरित्र वाचल्यानंतर मला काही तरी नवीन वाचल्यासारखे वाटले. त्यांनी उभे केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत; पण त्यासाठी कोठल्या तरी एका जातीचा द्वेष केला पाहिजे, ही गोष्ट काही मला पटत नाही. जे समाज मागे पडले आहेत, त्यांना जागृत करणे, त्यांच्यात नवीन धारणा निर्माण करणे हाच एक मार्ग उत्तम आहे, अशी माझी बाजू होती. आम्ही एकमेकांचे विचार समजत होतो, त्यामुळे एकमेकांचे ऐकून घ्यायचे आणि वाचत राहायचे, असा समेट आम्ही दोघांनी केला.

ह्या सर्व चर्चेचा माझ्या मनावर एक परिणाम असा झाला, की पुष्कळसे असे महत्त्वाचे प्रश्न आहेत, की जे आपल्याला अजून आकलन होत नाहीत व ते आपण समजावून घेतले पाहिजेत, हे तीव्रतेने जाणवले. यासाठी मोठ्या आणि शहाण्या मंडळींशी बोलले पाहिजे, इतरांशी संभाषण आणि संवाद केला पाहिजे, अशीही जाणीव झाली. आणि तेच करण्याचा मी निर्णय केला. माझ्या त्या वयात मी एका स्थित्यंतरातून चाललो होतो, त्याची ही साक्ष आहे.

पुढे मी टिळक हायस्कूलचा विद्यार्थी झालो आणि टिळकांच्या संबंधाने पुष्कळच वाचायला मिळाले. त्यांचे चरित्र, त्यांच्या लेखांची पुस्तकेही आम्हांला वाचावीच लागत असत. कारण कराडच्या या शाळेत एक चांगली प्रथा अशी होती, की टिळकांचे विचार आणि आयुष्य यासंबंधाने विद्यार्थ्यांमध्ये निबंध-स्पर्धा आणि वक्तृत्व-स्पर्धा दरवर्षी घेत असत. या दोन्हींमध्ये भाग घेण्याची माझी उत्सुकता असे आणि त्यासाठी हे वाचन मला अपरिहार्य झाले. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा जबरदस्त परिणाम भावनांवर झाला आणि जाती-जमातींचे जे प्रश्न आहेत, त्यांच्या बाहेर राहून काही राष्ट्रीय स्वरूपाचे असे जे प्रश्न आहेत, त्यांसाठी आपण, काही तरी केले पाहिजे, हा विचार माझ्या मनामध्ये आला. नाही म्हटले, तरी माझ्या मनामध्ये टिळक आणि ज्योतिराव फुले यांची तुलना होऊन गेली. या दोघांच्या विचारांमध्ये मला कोठे साम्य दिसले नाही. यामुळे थोडी खंत होती; पण शेवटी ही दोन्ही मोठी माणसे आहेत. आपण हा मोठा, की तो बरोबर, या उद्योगात आत्ताच पडू नये, असे माझ्या त्या वयातल्या मनाने घेतले आणि तो तुलनेचा विचार मी

सोडून दिला. पण एक गोष्ट मात्र मनाशी निश्चित होती, की दोघांनी सांगितलेले विचार हे महत्त्वाचे आहेत. स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला, आणि गरिबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समानता निर्माण झाली पाहिजे, हा विचार महात्मा ज्योतिराव फुल्यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्त्वाचे, म्हणून दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत, या निर्णयाला मी माझ्या मनाशी आलो.

कराडच्या टिळक हायस्कूलप्रमाणेच पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयातही दरवर्षी वक्तृत्व-स्पर्धा होत असत. त्या स्पर्धेत भाग घेण्याची मला तीव्र इच्छा होती. १९३१ साली पुण्यात होणा-या त्या स्पर्धेत मी भाग घेतला.  पुण्याला जाण्या-येण्याचा प्रश्न होता, पण तो श्री. शिवाजीराव बटाणे यांनी सोडविला. विद्यार्थ्याला तेथे आयत्या वेळी विषय देऊन दहा मिनिटे बोलायला सांगत. 'ग्रामसुधारणा' हा विषय देऊन मला बोलायला सांगण्यात आले. माझे भाषण ऐकून परीक्षक खूश झालेले दिसले. त्यांनी मला आणखी दहा मिनिटे वेळ वाढवून दिला. भाषण झाल्यावर सर्वांनी माझे कौतुक केले व त्या स्पर्धेत मला पारितोषिक मिळाले.  तेच पुढे १९३२ च्या जानेवारीमध्ये झालेल्या माझ्या शिक्षेच्या वेळी दंडापोटी सरकारजमा झाले.
आम्ही साजरा करीत असलेल्या शिवजयंती उत्सवाची हकीकत मी पूर्वी सांगितली आहे. त्यावेळी मला एक मजेदार अनुभव आला. भाषणाला माणसे कमी येत, पण शाहिरी पोवाडे आणि संगीत भजनांचे जे कार्यक्रम असत, त्यांना लोक तुफान गर्दी करत. अशा गर्दीची मला यापूर्वी सवय नव्हती. त्यामुळे जमलेली गर्दी हे समारंभाचे यश, असे एक नवीन समीकरण माझ्या मनाशी होऊ लागले. महाराष्ट्राचे तेव्हाचे प्रसिद्ध शाहिर खाडिलकर यांच्या पोवाड्याचे कार्यक्रम आम्ही दरसाल करत असू. त्यावेळी खाडिलकर हे अत्यंत लोकप्रिय आणि विद्वान शाहीर होते.

पोवाड्यांच्या कार्यक्रमाप्रमाणेच टाळ आणि मृदंग यांच्या साथीचे संगीत भजन हा एक नवा प्रकार मला अनुभवायला मिळाला. स्वातंत्र्य-संग्रामातील पुढील काळातील माझे एक ज्येष्ठ स्नेही काशिनाथपंत देशमुख यांनी आम्हांला सुचविले,

"आपण या शिवजयंतीच्या कार्यक्रमात भजनाचे कार्यक्रम ठेवू या, त्या क्षेत्रातील नामांकित लोक निमंत्रित करू या."

मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ती सूचना मान्य केली आणि त्यावेळी त्या क्षेत्रात नामवंत असलेले कृष्णा बागणीकर, भागवत हणबरवाडीकर, म्हैसूरकर महाराज, औंधचे आंधळे पण अत्यंत नाणावलेले मृदंगवादक दाजी गुरव यांना आम्ही निमंत्रण दिले. या कार्यक्रमाची जाहिरात छापून प्रसिद्ध केली. गावात आणि आसपासच्या खेड्यांत या जाहिराती वाटल्या. या कार्यक्रमाला थोडा खर्च येणार होता. त्यासाठी आवश्यक ते पैसे श्री. बटाणे कुटुंबीय आणि हरिभाऊ लाड यांच्या प्रयत्नांमुळे उभे करता आले. रात्री नऊ वाजता कार्यक्रम सुरू होणार होता. त्याच्याआधी जवळ जवळ तासभर लोकांची गर्दी तेथे होऊ लागली. खेड्यापाड्यांतून मुद्दामहून लोक आले होते. इस्लामपूर, नेरले या लांबच्या गावांहूनही लोक टोळीटोळीने मुद्दामहून आले होते. मला हे सगळे नवीन होते. गाण्याचा कान मला होता, आणि आहे; परंतु ही संगीत भजने इतकी लोकप्रिय असतील, असे मला वाटले नव्हते. रात्री नऊ वाजता कार्यक्रम सुरू झाला आणि जवळ जवळ पहाटे दोन-अडीच वाजेपर्यंत तो चालू होता. बैठक, अर्थात याला बैठक म्हणायची, की काय, हा वेगळा प्रश्न आहे, फारच रंगली, यात शंका नाही. कृष्णा बागणीकरांनी बागेश्री रागात एक अभंग इतका सुरेख गायला, की त्या जाहीर चौकात बसलेला तो श्रोतृवर्ग अगदी तल्लीन होऊन गेला. आणि तो अभंग जेव्हा संपला, तेव्हा लोकांनी टाळ्यांचा मनमुराद गजर करून पसंती व्यक्त केली.

मी ही लहानशी आठवण अशाकरता देतो, की गायनाच्या क्षेत्रातील महाराष्ट्रीय लोकजीवनातले हे नवे दालन मी प्रथमच पाहत होतो. त्यानंतर पुढे कित्येक वर्षे माझ्या सुटीच्या दिवसांत काशिनाथपंत देशमुखांच्याबरोबर मी अनेक गावी स्थानिक संगीत भजनांच्या बैठकांना जात असे. काही दिवस ही भजने ऐकण्याचा छंदच मला लागला होता, असे म्हटले, तरी चालेल. काही वेळा मी घराबाहेर रात्रीच्या रात्री राही. त्यामुळे आई आणि बंधू गणपतराव दोघेही रुष्ट होत. पण मी जेव्हा त्यांना, मी

कुठे व कशाकरता जातो, हे सांगितले, तेव्हा त्यांची काहीशी समजूत पटायची. पण शिक्षणाकडे दुर्लक्ष होते, म्हणून त्यांची तक्रार चालूच राही.

हा जसा भजनांचा छंद काही काळ केला, तसाच चैत्र-वैशाखांत गावोगावी होणा-या जत्रांच्या निमित्ताने होणारे तमाशांचे फड पाहण्याचाही छंद मी केला. आमची शाळेतील अशाच काही छंदी मित्रांची एक टोळीच बनली होती. खेड्यांतील तमाशे आणि कुस्त्या आवडीने पाहायचा हा नादच त्यांनी घेतला होता. देवराष्ट्राच्या निमित्ताने मला ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी माहिती असली, तरी या जीवनातील सांस्कृतिक बाजू या निमित्ताने समजून येऊ लागली. रामा कुंभार, सावळजचा तातोबा मांग आणि निसरे-नावडीचा एक तमासगीर - आज त्याचे नाव माझ्या लक्षात नाही, या तमासगिरांचे तमाशे आठ-दहा मैलांच्या अंतरावर जेथे असतील, तेथे पाहण्यासाठी आम्ही जात असू. त्यावेळी मी इंग्रजी शाळेत पाचवी-सहावीत असेन. शाळेतील संमेलनाच्या निमित्ताने एकदा बर्नार्ड शॉच्या 'डॉक्टर्स डायलेमा' या नाटकातील एका प्रवेशातले काम मी केले होते. त्या निमित्ताने बर्नार्ड शॉ यांच्या नावाची ओळख झाली होती. या तमाशा बघण्याच्या माझ्या नादात बर्नार्ड शॉच्या नावाचा मी केलेला एक मजेदार उल्लेख मला नेहमी आठवतो.

कराडपासून स्टेशन रोडने रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या एका गावी असाच एक नामांकित तमाशा होणार होता. त्या गावातील आमच्या एका मित्राने आम्हांला जेवायचे निमंत्रण दिले होते, म्हणून आम्ही संध्याकाळी जायला निघालो. पाच-सहा जण होतो. आम्ही कृष्णा नदीची फरशी ओलांडून एक मैल गेलो असू, नसू, तो समोरून येणारे आमच्या शाळेचे शिस्तप्रिय ड्रिल मास्तर समोरून येताना दिसले. मी बरोबरच्या मुलांना सांगितले, की आपण कुठे जातो आहोत, हे जरी नक्की सांगितले नाही, तरी आपण मास्तरांशी मुळीच खोटे बोलायचे नाही. माझ्या अपक्षेप्रमाणेच झाले. आम्हां मुलांना पाहिल्यावर मास्तरांनी विचारले,
"कोठे चाललात, रे एवढ्या संध्याकाळी ? "
मी पुढे होऊन सांगितले,

"आम्ही स्टेशनवर चाललो आहोत. तेथे टॉम शॉ येणार आहे. त्यांना बघायचे आहे."
ड्रिल मास्तरांनी आम्हांला विचारले,
"हा कोण टॉम शॉ ?"
मी त्यांना सांगितले,
"हा बर्नार्ड शॉचा भाऊ आहे."
आमचे उत्तर मास्तरांना पटलेले दिसले आणि ते म्हणाले,
"जा जा, चांगले आहे."

ते पुढे निघून गेल्यानंतर आम्हांला हसू आवरले नाही. हसत खिदळत त्या मित्राच्या घरी पोहोचलो आणि त्याला ही कहाणी सांगितली, तेव्हा फारच मजा आली.

ही सबंध रात्र आम्ही आमच्या मित्राच्या गावी घालवली.

ग्रामीण तमाशातले बरेचसे यश हे त्यातल्या लावणी म्हणण्याच्या लकबीवर, नाचणा-या बाईच्या वा पुरुषाच्या लावण्यांवर, हावभावांवर अवलंबून असे. त्याचबरोबर त्यात काम करणा-या सोंगाड्याच्या हजरजबाबीपणावर आणि चतुर संभाषणशक्तीवरही अवलंबून असे. सोंगाड्या हा प्राणी मराठी लोकनाट्यातला विनोदी पुरुष असतो आणि हे काम करणारे कलावंत लोक फार सहजस्फूर्त काम करीत असत. त्यांच्यासाठी कोणी, हल्ली नाटकासाठी जशी संहिता लिहितात, तशी लिहून तयार केलेली नसे. वर जो मी हजरजबाबीपणा म्हटले, तो यासाठी. त्यामध्ये त्यांचे बुद्धिचापल्य आणि संभाषणचातुर्य प्रकर्षाने दिसत असे.

कुस्त्यांच्या बाबतीतही असेच झाले. जत्रेच्या निमित्ताने गावोगाव कुस्त्यांचे फड होत असत. चांदीची कडी आणि फेटे बक्षीस म्हणून दिले जात असत. ऐन उमेदीचे तरणेबांड कुस्त्या खेळत असत. त्यामुळे रंग भरत असे. गावोगाव तालमी असत. गावाच्या पहिलवानाला गावकऱ्यांनी मदत करावी, असा संकेत असे. त्यामुळे

कुस्त्यांचे फड चांगले रंगत असत.

गावागावांमध्ये, भागाभागांमध्ये स्पर्धा असे. पुढे नामांकित झालेले असे अनेक पहिलवान अशा फडावर येत. त्यांना फडात गोलाकार फिरवत असत व त्यांना कोणी जोडीदार मिळाला नाही, तर बक्षीस देऊन त्यांचा जयजयकार होत असे. दरसाल रंगणारा कुस्त्यांचा फड  म्हणजे आमच्या देवराष्ट्राचा. श्रावणातला सरता सोमवार सागरेश्वराचा जत्रेचा दिवस. सोमवारी पालखी फिरे आणि मंगळवारी कुस्त्यांचा फड भरे. घाटाखालील व घाटावरील अशा दोन बाजूंमध्ये स्पर्धा सुरू होई. आणि चवदा-पंधरा वर्षाच्या वयापासून तो ऐन पंचविशीतील पहिलवानांच्या चांगल्या कुस्त्या तेथे होत असत. निदान पन्नास हजार माणसे अशा या कुस्त्यांच्या फडाला जमत असत, हे मी पाहिले आहे. गाव त्यासाठी मोठी वर्गणी जमा करे, कामाची वाटणी करीत असत. आणि अत्यंत शिस्तीने हा फड पुरा करत असत. या फडामुळे पुढे नामांकित झालेले आणि आमच्या राष्ट्रीय चळवळीत कार्य करू लागलेले साहेबराव कडेपूरकर हे पहिलवान मी प्रथम पाहिले. पुढे त्यांचा-माझा, त्यांची कुस्ती हा पेशा संपल्यानंतर, राजकीय क्षेत्रातला मोठा स्नेह जमला. सातारा जिल्ह्यामधील माझ्या सर्व कामाला व मला पाठिंबा देणारा माझा तो एक सहकारी बनला, याची आठवण माझ्या मनातून जात नाही.

वेगवेगळ्या पुस्तकांच्या वाचनांतून मी नवे विचार समजावून घ्यायचा जसा प्रयत्न करीत होतो, तसेच ग्रामीण जीवनाशी असलेला माझा भावनात्मक संबंध अधिक दृढ होईल, या दृष्टीने मला नकळत या ग्रामीण सांस्कृतिक क्षेत्राशीही मी समरस होत होतो. मला माझ्या वाचनाने जसे घडविले, तसेच या ग्रामीण संस्कृतीच्या अनुभवाचे हे जे स्रोत आहेत, त्यांतूनही मी जडलो-घडलो, असे म्हटले, तरी चालेल.

दिवस असे चालले होते. त्यामध्ये एक वर्ष कराडला प्लेगचा प्रादुर्भाव झाला. शाळा बंद झाल्या, परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. आम्ही गावाबाहेर कोयनेच्या पलीकडे, सातारा रोडच्या लगत तात्पुरत्या झोपड्या बांधून राहायला गेलो. आम्ही ज्यांच्या

घरी राहत होतो, त्यांनी आमच्यासाठीही एक छोटी झोपडी बांधून दिली होती. जेवणखाण आणि रात्रीचा मुक्काम शेतीवरील झोपडीमध्ये, आणि दिवसाचे चार-सहा तास गावामध्ये, असा माझा कार्यक्रम होता. गावात गेल्याशिवाय करमतच नसे. बाजारहाट गावात असे. दररोजची वर्तमानपत्रे येण्याची ठिकाणे गावातच असत. रानात राहायला गेलेली इतर कुटुंबांतील मुलेही दिवसा गावात येत असत. त्यामुळे दिवसा गावात व रात्री रानात वस्ती, असा आमचा दिनक्रम चालू होता. माझे थोरले बंधू त्यावेळी नोकरीसाठी विट्याला असत. मी आणि आई फक्त कराडला असू. माझे मधले बंधू गणपतराव प्लेगमुळे कराडची शाळा बंद होती, म्हणून काही महिन्यांसाठी तासगावच्या शाळेत गेले. निदान अभ्यासक्रम बुडू नये, हा हेतू होता. त्याप्रमाणे जवळ जवळ चार महिने ते तासगावात आणि आम्ही कराडात, अशी वाटणी झाली होती. गणपतराव अधून मधून तासगावहून कराडला येत.

या बंधूंचे माझ्यावर मोठे प्रेम होते. उंचीने मध्यम, काळासावळा वर्ण, चेह-याची धाटणी थोडी-फार माझ्यासारखीच, डोक्याला रंगवलेला फेटा, हातामध्ये छत्री आणि डुलत डुलत चालण्याची सवय हे त्यांचे विद्यार्थिदशेपासूनचे नजरेसमोर असलेले चित्र अखेरपर्यंत कायम राहिले. माणसांची ओळख करून घेण्यात व मैत्री जमविण्यात ते अतिशय पटाईत असत. लोकांचे प्रश्न समजून घेऊन त्यात त्यांना मदत करावी, ही त्यांची पहिल्यापासूनची हौस. त्यामुळे त्यांच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या मंडळींतही ते लोकप्रिय होते. त्यांना खेळण्याचा नाद असे. विशेषतः त्यांच्या वयाच्या विद्यार्थ्यांबरोबर ते फार उत्तम कुस्ती खेळत असत. टिळक हायस्कूलमधल्या एका कुस्त्यांच्या स्पर्धेत त्यांनी अतिशय उत्तम कुस्ती करून बक्षीस मिळविले होते. ही अटीतटीची कुस्ती मी पाहायला गेलो होतो. आणि ती कुस्ती व त्यातील त्यांचे प्रावीण्य पाहून मला माझ्या भावाबद्दल नितांत आदर वाटला. त्यांच्याइतकी चांगली कुस्ती मला येत नसे; परंतु त्यांच्याबरोबर मी तालमीत जात असे. अधून मधून त्यांच्या आग्रहाने मी फेटाही बांधत असे. त्यांची शरीरप्रकृती माझ्यापेक्षा उत्तम असे.

माझ्या गाण्या-भजनाच्या नादामुळे व्यायाम करण्याचा जरी मी फारसा प्रयत्नच केला नाही, तरी चालण्याचा पुष्कळ व्यायाम होत असे. अधून मधून तालमीतही जाण्याचा प्रयत्न करीत असे; परंतु त्यामध्ये नित्यक्रम असा कधीच आला नाही. एक गोष्ट मात्र मी नियमाने केली आणि ती म्हणजे पोहण्याचा व्यायाम. माझ्या बंधूनी मला सांगितले,
"दुसरे काही करत नाहीस, निदान पोहत तरी जा."

त्यामुळे आमचे घर जरी कोयनेकाठी होते, तरी स्नानासाठी आम्ही कृष्णा संगमावर जात असू.  माझ्या सोनहि-याचा पोहण्याचा मी पूर्वी अनुभव सांगितला आहेच; पण पुढे मी पोहण्यात चांगलीच प्रगती केली आणि सुट्टीच्या दिवशी निदान दीड-दोन तास पोहत राहण्याचा व्यायाम मी केला, त्याने मला पुष्कळ मदत झाली.

मी माझा पुष्कळ वेळ नको त्या कामांत खर्च करतो, असे गणपतरावांना वाटे. आणि त्यांचे बरोबरही होते. मी त्या वेळी परीक्षेत कधी नापास झालो नाही. परंतु फार उत्तम मार्क्सही कधी मिळविले नाहीत.  हे जसे प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत घडले तसेच ब-याच अंशी पुढील शिक्षणाच्या बाबतीतही असेच म्हणता येईल.

गणपतराव स्वतः अतिशय बुद्धिमान होते. परंतु आमच्या घरच्या आपत्तीने आणि परिस्थितीने त्यांना त्यांचा शिक्षणक्रम पुरा करता आला नाही. माझ्या अनुभवाप्रमाणे ते उत्तम खेळाडू आणि लोकप्रिय विद्यार्थी होते. ते जर सर्व वेळ राजकारणात पडले असते, तर त्यांनी चांगलेच नाव कमाविले असते, असा माझा अंदाज आहे. पण त्यांना कुटुंबाच्या प्रश्नातच स्वतःला वाहून घ्यावे लागले. माझ्यासाठी त्यांनी आपल्या शिक्षणाचाही पुढे त्याग केला आणि माझे शिक्षण पुरे व्हावे, म्हणून प्रयत्न केला.

मी कराडच्या प्लेगच्या दिवसांची हकीकत सांगत होतो. सकाळी उठल्यानंतर न्याहरी

करावी आणि कृष्णेच्या संगमावर स्नानास जाऊन पोहत राहावे आणि त्यानंतर दिवेकर वैद्य यांच्या बैठकीत आलेली नवीन वृत्तपत्रे वाचत बसावे, असा माझा कार्यक्रम असे. दिवेकर वैद्यांचा हा दवाखाना म्हणजे जणू एक वाचनालयच होते. पुण्या-मुंबईची पत्रे वाचण्यासाठी काही स्नेही येथे जमत. गावातली बाबूराव गोखले यांच्यासारखी चार-दोन प्रतिष्ठित माणसे तेथे येत असत. त्यांत मीही एक इंग्रजी शाळेत जाणारा मुलगा जाऊन बसत असे. प्रथम प्रथम काहीसे नवखे नवखे असे वाटले - दिवेकर वैद्यांनाही आणि मलाही; पण पुढे ओळख झाल्यावर मला त्यांनी आपल्यांतलाच एक म्हणून स्वीकारला, असे म्हणायला हरकत नाही. मी रोज तेथे जाऊन मुंबईहून येणारे 'श्रद्धानंद', 'नवा काळ', 'विविधवृत्त' त्याचप्रमाणे पुण्याहून येणारे 'ज्ञानप्रकाश', 'केसरी' ही नियतकालिके वाचत असे. कधी कधी त्या वाचनालयाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चाही रंगत असत. त्या चर्चा मोठ्या बोधप्रद असत. मी त्या सगळ्या ऐकत असे; पण त्यांत कधी भाग घेत नसे. कारण भाग घेण्याची माझ्यात शक्ती नव्हती. परंतु लक्षपूर्वक ऐकणे म्हणजेच शिक्षण घेणे आहे, असे माझे मत झाले.  आणि मी कित्येक महिने हा क्रम असाच चालू ठेवला. पण मला या चर्चा ऐकून, बहुश्रुत होऊन नवी माहिती मिळत असली, तरी त्या चर्चाचा एकंदर सूर माझ्या सुराशी मिळणारा नव्हता, याचीही मला जाणीव झाली. मनातील हा संघर्ष असा सुरूच राहिला.

त्याच वेळी देशामध्ये मोठ्या घडामोडी होत होत्या. सायमन कमिशन हिंदुस्थानामध्ये आले आणि त्याला फार मोठा प्रतिकार झाला. त्याच्यावर संपूर्ण बहिष्कार पडला. वृत्तपत्रांत यासंबंधी आलेले टीकात्मक लेख आणि चर्चा मी मन लावून वाचत होतो. दिवेकर वैद्यांच्या बैठकींतही त्यासंबंधी चर्चा होत. त्याही मी मन लावून ऐकत होतो. क्रांतिकारक चळवळींनीही याच वेळी एक नवीन उग्र रूप धारण केले होते. सायमन कमिशनच्या बहिष्काराच्या आंदोलनात, पंजाबमध्ये लाला लजपतराय यांच्यावर लाठीमार झाला आणि देशामध्ये सर्वत्र एक असंतोषाची लाट पसरली.

अनेक क्रांतिकारकांना तुरूंगात डांबण्यात आले. तेथे त्यांचे अनन्वित छळ केले गेले. नोकरशाहीचा ज्यांच्यावर राग होता, अशा अनेकांना लाहोर कटाच्या जाळ्यात गुंतवले होते. याच सुमारास किंवा याच्या थोडे पुढे-पाठीमागे माझ्या भावविश्वात क्रांती करणारी एक विशेष घटना घडली. ती घटना म्हणजे यतींद्रनाथ दास यांनी सुरू केलेले आमरण उपोषण.

वस्तुतः लाहोरच्या कटाशी यतींद्र दासांचा दूरान्वयानेही संबंध असल्याचा पुरावा इंग्रजांकडे नव्हता; परंतु २० सालच्या असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतल्यामुळे सरकारचा त्यांच्यावर दात होता. पाच वर्षांत त्यांना चार वेळा तुरूंगात डांबण्यात आले. चौथ्यांदा जेव्हा ते मैमनसिंगच्या तुरूंगात होते, तेव्हा त्यांचा इतका छळ झाला, की वैतागून त्यांनी जेल सुपरिंटेंडेंटशी दोन हात केले. त्यामुळे त्यांना अंधारकोठडीची प्रखर शिक्षा देण्यात आली.
राजकीय कैद्यांना गुन्हेगारासारखी मिळणारी वागणूक पाहून सात्त्विक संतापाने यतींद्रांनी तुरूंगात उपोषण सुरू केले होते. त्या अगोदरच सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनीही उपोषण सुरू केले होते. या उपोषणाने त्यावेळी सर्व देशाचे लक्ष खेचून घेतले होते. पहिले चार-सहा दिवस गेल्यानंतर सर्वांनाच अतिशय काळजी वाटू लागली आणि मी तर आमच्या शेतावरच्या झोपडीतून गावामध्ये, यतींद्रनाथांच्या उपोषणात त्यांची प्रकृती कशी आहे, हे पाहावे, म्हणून वृत्तपत्र पाहण्यासाठी दररोज येऊ लागलो.

क्रांतिकारकांच्या या उपोषणाने मी अस्वस्थ झालो होतो. यतींद्र दासांची प्रकृती उपवासामुळे दिवसेंदिवस खंगत चालली होती. माझी अस्वस्थताही प्रत्येक दिवशी वाढत होती. वर्तमानपत्रांतून त्यावेळी येणारी वर्णनेही हृदयद्रावक होती. यतींद्रनाथांच्या शरीरावर प्रेतकळा आल्याचे वाचून तर मी बेचैन झालो, घायाळ झालो. क्षणाक्षणाला ते मृत्यूसमीप जात असल्याची कल्पना मला अस्वस्थ करून सोडीत असे. ब्रिटिश सरकारचा निष्ठुर अमानुषपणा यमासही लाजविणारा आहे, असे

मला वाटे. जामीन देण्याच्या अटीवर सरकारने त्यांची मुक्तता करण्याचा अनुचित उदारपणा दाखवला. पण स्वतः यतींद्रनाथांची अशा नामुश्कीला तयारी नव्हती. त्यापेक्षा इहलोकीच्या बंदिवासातून सुटका करून घेण्याचे त्यांनी ठरवले असावे.

अखेर तो दुष्ट दिवस उगवला. एके दिवशी लाहोरच्या तुरूंगात भर दुपारी एकच्या सुमारास प्रखर सूर्याला साक्षी ठेवून त्यांनी प्राणाहुती दिली. मातृभूमीसाठी कणाकणाने झिजून त्यांनी तेजस्वी आत्मार्पण केले.

या घटनेने मी बेचैन झालो. माझ्या बालमनावर या घटनेचा खोलवर परिणाम झाला. देशासाठी प्राणार्पण करणारे यतींद्र माझे कोणी निकटचे आप्त आहेत, असे मला वाटू लागले.

दैनंदिन व्यवहार चालू होते. पण मनातून मी कोठे तरी हरवलो होतो. दुःखाच्या खोल गर्तेत सापडलो होतो. कुठे जावे, काय करावे, कोणाला सांगावे, काही सुचत नव्हते. बधिर मनाने मी रानातील झोपडीकडे चालू लागलो. चालता चालता रडायलाही लागलो. सा-या चराचरात वातावरण मला कुंद वाटू लागले.

वस्तीवर पोहोचलो, तेव्हा कडुसे पडले होते. जमिनीवर अंग टाकले आणि निपचीत पडून राहिलो. पोटात भूक असूनही अन्नावरची वासना उडाली होती. रात्रीच्या अंधारात आकाशात शून्य दृष्टीने पाहात होतो. त्यातील तारकापुंजात यतींद्रनाथ कुठे दिसतात का, हे वेड्यासारखे पाहात होतो. परंतु जवळजवळ ९० दिवस किंवा कदाचित अधिकही असतील, एका मानसिक क्रांतीतून यतींद्रनाथांनी धैर्याने हे उपोषण पुढे चालू ठेवले. राजबंद्यांच्या हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेच्या निषेधार्थ केलेला उपवास म्हणजे एक मोठी तपश्चर्या होती. त्यांची तपश्चर्या त्यांच्या मृत्यूने त्यांनी पुरी केली.

एवढे मात्र खरे, की या घटनेमुळे माझ्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल झाला. देशात

घडणा-या घटनांचे अर्थ समजावून घेण्याच्या मनस्थितीपर्यंत पोहोचलो. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यातून बाहेर पडण्याचा माझा विचार पक्का झाला. आपण आपले जीवन देशकार्यालाच वाहायचे, हा निर्णय माझ्या मनाने घेतला. छोट्या छोट्या जातीय किंवा धार्मिक प्रश्नांचे थोडे-फार आकर्षण त्यापूर्वी माझ्या बालवयात होते. पण माझे विचार आता हळूहळू स्पष्ट होत चालले होते, हेही तितकेच खरे होते. संकुचित वृत्तीने काम करण्यापेक्षा कुठल्या तरी व्यापक दृष्टीने काम केले पाहिजे, अशी मनाची घडण होत होती. यतींद्रनाथांच्या मृत्यूने माझा दृढनिश्चय झाला आणि हा प्रश्न मी माझ्यापुरता सोडविला. कणाकणाने आणि क्षणाक्षणाने ज्यांच्यासाठी देहत्याग करावा, अशी ध्येये आणि कामे या देशात आहेत. एका अर्थाने माझा आपल्या मनाशी निर्णय झाला. मला माझ्या आयुष्याचे सार समजले आणि सूर सापडला, असे म्हटले, तरी हरकत नाही.

प्लेग संपल्यानंतर रानातून गावात आल्यानंतर मी माझ्या मित्रांशी याबाबत बोलू लागलो, चर्चा करू लागलो. तेव्हा माझ्या मित्रांकडूनही मला अनुकूल प्रतिसाद मिळत गेला. छत्रपती मंडळ आणि हरिभाऊ लाड यांच्याभोवती आम्ही तरुण मंडळी एका नव्या विचाराने भारून काम करू लागलो. गणपतराव तासगावाहून परत आले होते. त्यांच्याशीही मी याबाबत बोललो. त्यांनी सांगितले, "तुला पटतअसेल, तसे कर. पण आपल्या कुटुंबाची परिस्थिती तू नजरेआड करू  नकोस." पुढे ते म्हणाले, "आपल्यासाठी आपले थोरले बंधू घरापासून दूर राहून नोकरीचे कष्ट  करीत आहेत. आपली आई आपल्यासाठी कष्ट करून आपले शिक्षण करते आहे, हेही विसरू नकोस."

त्यांचे हे म्हणणे ऐकून मी पुन्हा संभ्रमात पडे. वाटे, की गणपतराव म्हणतात, ते खरे आहे. माझी आई ही आम्हां सर्वांची शक्ती होती. आम्ही काय वाचतो आणि काय बोलतो, हे ती ऐकत असे, पण तिला त्यात भाग घेता येणे शक्य नसे. पण तिला वाटे, की आपली मुले काही ब-या गोष्टी बोलतात, काही तरी नवीन बोलतात. पण तिने आमच्या कामात किंवा विचारात कोठेही आडकाठी घातली नाही. पण एक

गोष्ट खरी होती, की ती आमच्यासाठी फार खस्ता खात होती. थोरल्या बंधूंचा पगार मुळातच कमी. त्यातून ते थोडे-फार आमच्यासाठी पाठवीत असत. उरल्या सुरल्या गोष्टींसाठी माझ्या आईने खूप कष्ट सोसले. गणपतरावांनी जेव्हा आईच्या या कष्टांची आठवण करून दिली, तेव्हा माझे मन भरून आले.

यतींद्रनाथांच्या मृत्यूने मी किती हादरून गेलो होतो, हे प्रत्यक्ष माझ्या आईने पाहिले होते. ज्या दिवशी यतींद्रनाथ वारले, तो सबंध दिवस मी जेवलो नाही. रात्री झोपलो नाही, हे तिने पाहिले होते. माझ्या मनाचा तिला अंदाज लागला नाही. तिला वाटे, आपल्या मुलाला काही तरी लागीर झाले आहे, म्हणून ती चार मंडळींत त्याच्या उपाययोजनेची चौकशी करू लागली. मी आईला सांगितले,
"मला काही झालेले नाही, तू काही काळजी करू नकोस."

पुढे तिला माझे म्हणणे पटले. तिने माझी चिंता करायचे सोडून दिले. ती म्हणे, "बाबा, तू वाचतोस, हिंडतोस, फिरतोस-हे सगळे चांगले आहे. पण कुणा वाईटाच्या नादाला लागू नकोस. आपण गरीब असलो, तरी आपल्या घराची श्रीमंती आपल्या वागण्या-बोलण्यात आहे, रीतिरिवाजांत आहे, ती कायम ठेव. तुला कुणाची नोकरी-चाकरी करायची नसली, तरी माझी हरकत नाही. मी कष्ट करून तुझे शिक्षण पुरे करीन. पण तू ह्या शिक्षणामध्ये हयगय होईल, असे काही करू नकोस. तुम्ही शिकलात, तर तुमचे दैव मोठे होईल."

आईने एका अर्थाने, आम्हांला तिच्या या विचाराने जीवनाचे एक तत्त्वज्ञानच दिले होते. प्रपंच तीच चालवत होती. त्यामुळे त्यातल्या अडचणी तिला माहीत होत्या. परंतु ती धीर मात्र देत असे आम्हांला.

आईच्या म्हणण्याचा गणपतरावांच्यावर फार परिणाम झाला आणि आपल्या कुटुंबाचे नशीब आपल्या कर्तबगारीने आपण बदलले पाहिजे, असा काही तरी विचार त्यांच्या मनात येऊ लागला. मॅट्रिकच्या वर्गात ते शिकत होते, तेव्हा, आम्ही ज्यांच्या घरी

राहत होतो, त्या श्री. डुबल यांच्या कुटुंबातील एक विशेष सुशिक्षित, करते-सवरते तरुण गृहस्थ यांनी एक कल्पना काढली, की शेती करण्यासाठी दूर इंदूर संस्थानात जावे. त्यांनी या योजनेत गणपतरावांना सामील केले. परिस्थिती अशी होती, की इंदूर संस्थानामध्ये बरीचशी अशी शेती होती व ती पडून होती. श्री. बाबुराव डुबल हे त्या तरुणाचे नाव. पुढे ते सैन्यातले मोठे अधिकारी होऊन निवृत्त झाले, त्यांनी या इंदूरच्या जमिनीच्या प्रकरणात तपशीलवार माहिती मिळवली आणि बरेचसे पैसे खर्च करून ती शेती करण्यासाठी इंदूरला जाण्याचे त्यांनी निश्चित केले.
गणपतरांवानी त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्धार केला. त्यांनी आपला निर्धार आईला व मला सांगितला. थोरल्या बंधुंनाही पत्राने कळविला. भाऊ हे धाडस करतो आहे, त्याला काही हरकत नाही, असे मला वाटले; पण माझ्या आईला त्यांची कल्पना आवडली नव्हती. तिने गणपतरावांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण गणपतरावांनी तिची समजूत काढली,
"असे रखडत जीवन काढण्यापेक्षा अशा प्रकारचे काही तरी नवीन धाडस केले पाहिजे. हे धाडस जर आम्ही आता केले नाही, तर आपण आहो असेच राहू. किती दिवस असे तू आमच्यासाठी कष्ट उपसत राहणार? आम्हांलाच काही तरी केले पाहिजे."

आईने चर्चा बंद केली आणि जायला परवानगी दिली आणि महिना, दोन महिन्यांच्या तयारीनंतर श्री. बाबुराव डुबल आणि माझे बंधू गणपतराव हे दोघेही इंदूरला जमीन मिळविण्यासाठी गेले.

इंदूरला पोहोचल्यानंतर गणपतरावांची आम्हांला जी पत्रे आली, त्यांत इंदूर संस्थानातल्या एका जिल्ह्यात मरोठ म्हणून एक तालुक्याचे गाव होते. त्याच्या आसपास दीड-दोनशे एकरांचा जमिनीचा एक मोठा हिस्सा त्या दोघांनी शेती करण्यासाठी आपल्या नावावर करून घेतला आहे, असे लिहिले होते. गणपतराव दूर परप्रांती गेल्याने, नाही म्हटले, तरीमला थोडी खंत होती. परंतु धाडस करून ते काही तरी नवीन करत आहेत, याबद्दल अभिमानही वाटत होता. त्यांच्या मार्गात

अडचणी येतील, याची कल्पना नव्हती आणि मी कधी फारसा विचारही केला नव्हता. तारुण्यसुलभ असा हा साहसी प्रयत्न होता. परंतु अशा तऱ्हेचे शेतीचे काम करण्यासाठी साधनांची आणि संपत्तीची भरपूर तयारी पाठीमागे लागते. ती या दोघांनीही केली नव्हती. जी थोडी-फार केली होती, ती प्रत्यक्ष काम सुरू केल्यानंतर संपली आणि मग त्यांच्यापुढे अडचणी उभ्या राहिल्या. त्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी काही पैसे उभे करावे किंवा काय, असा प्रयत्न करण्यासाठी श्री. बाबुराव मरोठहून कराडला परत आले, तेव्हा माझ्या आईला थोडासा धक्का बसला. तिने बाबूरावांना विचारले,

"गणपतची तब्येत कशी आहे? तुम्ही परत आला, त्याला का नाही आणलेत ? "

त्यांनी सांगितले,

"मी त्याला तेथे राहायला सांगितले आहे. साधन-सामग्री घेऊन मी पुन्हा परत जाणार आहे."

पण हे खरे ठरले नाही. साधन-सामग्रीची जुळवाजुळव ते करू शकले नाहीत. त्यांनी इंदूरला परत जायचे नाही, असे ठरविले आणि आम्ही मात्र मोठ्या अडचणीत सापडलो.

आईचा जीव बेचैन झाला. आणि ती बेचैन झाली, म्हणजे मी खूप निराश होई. कधी कधी डोळ्यांत पाणी उभे राही. माझा भाऊ दूरच्या प्रदेशात एकटा काय करील, या चिंतेने मन व्याकूळ होई. बाबुरावांच्याकडून पत्ता घेऊन गणपतरावांना मी एक लांबलचक पत्र लिहिले. पत्र भावनाप्रधान होते. त्यामध्ये विचार असे काही असतील असे मला वाटत नाही. आई किती दुःखी आहे, हे मात्र मी त्यांना कळविले आणि परत या असे विनविले. गणपतरावांचे उत्तर आले की जवळ जवळ पन्नास-साठ एकरांमध्ये त्यांनी पेरणी केली आहे. आणि ती पिके थोड्याच दिवसांत हाताशी येतील, अशी परिस्थिती आहे. परंतु ती पिके काढायची झाली, तर त्यासाठी लागणारे भांडवल आणि मनुष्यबळ त्यांच्याजवळ नाही. बाबुराव तिकडे आले आहेत.

ते ही सर्व व्यवस्था करून येतील या आशेवर मी येथे टिकून आहे. अर्थात आम्ही त्यासाठी काहीच करू शकत नव्हतो. त्यामुळे बाबूराव काय करतील, याची वाट पाहण्याखेरीज आम्हांला काहीच मार्ग नव्हता.

बाबुराव इंदूरला परत जाण्याची चिन्हे काही आम्हांला दिसेनात. ते साधन-सामग्री जमविण्यापेक्षा चांगली नोकरी मिळवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या ओळखीपाळखी, नाती-संबंध, सधन मंडळींच्यामध्ये असल्यामुळे एखादी चांगली नोकरी मिळविणे त्यांना अवघड नव्हते. तशी ती त्यांनी मिळवली आणि ते सैन्यात दाखल झाले.

महिनाभर वाट पाहून, मी गणपतरावांना आईच्या संमतीने पुन्हा पत्र लिहिले आणि सर्व वस्तुस्थिती कळवली. हा महिना आम्हां सर्वांना काळजीचा आणि निराशेचा गेला. गणपतरावांची आणि आमची या बाबतीत फसवणूक झाली, असेही वाटले. पण हाती साधने आणि भांडवल नसताना अशा उद्योगात जाणे ही आमची पहिली चूक आहे, हेही आमच्या ध्यानात आले. आईने मला सांगितले,
"गणपतीला लिही, की असेल ते सर्व टाकून परत निघून ये."

मी माझ्या आईचा निरोप गणपतरावांना पत्राने कळविला. आणि त्यानंतर ते एके दिवशी परत आले. त्यांची प्रकृती खालावली होती. तेथील सर्व चिंतांनी बेजार झाल्यामुळे त्यांचे वजनही खूप कमी झाले होते. त्यांची ती दशा पाहून आम्ही सर्व कटुंबातील मंडळी गहिवरून गेलो. माझे थोरले बंधू या सर्व बाबतींत थोडेसे तटस्थ होते. ते आपली नोकरी सांभाळून काम करण्याच्या प्रयत्नात होते. आणि आम्हांला जेवढी मदत करणे शक्य होते, तेवढी करत होते. कुटुंबाच्या मार्गदर्शनाचा सर्व भार आईवर होता आणि ती आपली कामे सांभाळून हे सर्व करीत होती. माझी आई निरक्षर होती. पण मनाने अतिशय सुसंस्कृत होती. गणपतराव परत आल्यानंतर तिने त्यांना सांगितले,

"इंदूरला जाण्यात तू चूक केलीस, आता इतरांना दोष देऊ नकोस. कारण त्यामुळे अकारण कडवटपणा तयार होईल. आपली चूक आपण दुरुस्त केली पाहिजे. तू परत शाळेतजायला सुरुवात कर."

गणपतरावांनी आईचा हा सल्ला मानला आणि त्या वर्षाच्या परीक्षेला बसण्यासाठी प्रयत्न सुरू केला. पण पुन्हा काही त्यांचे मन शाळेत रमले नाही. आईला कष्ट करू द्यायचे नाहीत, असे त्यांनी निश्चित ठरवले आणि शाळेचा नाद सोडून एक स्थानिक नोकरी पत्करून त्यांनी आपला जीवनक्रम सुरू करण्याचे ठरविले. त्यावेळी ते मला म्हणाले,
"आईने कष्ट करायचे नाहीत, आणि तू तुझे शिक्षण पुरे करायचे. कुटुंब चालविण्याची जबाबदारी आता माझ्यावर आहे."

-आणि ती त्यांनी अखेरपर्यंत पार पाडली. याबद्दल आम्ही कुटुंबातली सर्व मंडळी त्यांच्याबद्दल कृतज्ञ आहोत.

मी वर सांगितले, की माझी आई सुसंस्कृत होती, हे तिच्या वागण्या-बोलण्यावरून दिसतच असे. आमच्या गरिबीच्या घरात का होईना, पण कोणी आले-गेले, तर त्यांचा शक्तीप्रमाणे योग्य तो पाहुणचार करण्यास ती कधीच चुकली नाही. कधी कधी नात्यातली आणि देवराष्ट्राची आठ आठ, दहा दहा मंडळी आमच्या घरी पाहुणे म्हणून येत असत. त्या सर्वांचे तिने केले. ती म्हणत असे,
"आपण अर्धपोटी राहावे, पण आल्या-गेलेल्याला पोटभर जेवू घालावे."

देवाधर्मावर तिची श्रद्धा होती. रामायणाच्या कथेबद्दल तिला फार आदराचा भाव असे. कराडच्या एका मंदिरात रामायणाची कथा चाले. तिथे जाऊन ती महिनोगणती ऐकत असे. अधून मधून ती मलाही घेऊन जात असे. तिच्याबरोबर जाऊन ऐकल्यामुळे रामकथेत मलाही रस निर्माण झाला. आईला रामायणाची सगळी कथा प्रसंगासहित माहिती असे. मी तिला उलटे सुलटे प्रश्न विचारीत असे. ती म्हणे,

"तू शिकला आहेस, ते वाचून पाहा. मी जे ऐकले आहे, ते भक्तिभावनेने खरे मानते." (रामकथा ही तेव्हांपासून माझी आवडती कथा आहे.)

आज त्यासंबंधी अनेक शंका माझ्या मनाशी येतात. परंतु रामायण हे एक काव्य आहे, त्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, परंतु तो काही इतिहास नव्हे, अशी माझी भावना आहे. काव्य हे आलंकारिक व अतिशयोक्तिपूर्ण असते. काही काल्पनिक गोष्टी काव्यात योजाव्या लागतात. तशा त्यातही असल्या पाहिजेत. परंतु असे असूनही भारतामध्ये रामकथेवर जनसामान्यांचे जबरदस्त प्रेम आहे हे तितकेच खरे. मी उत्तर हिंदुस्थानात आल्यानंतर हे प्रत्यक्ष पाहिले. तुलसीदासाच्या रामायणावर आधारलेली रामलीला दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार या ऐन हिंदी भागांमध्ये अत्यंत श्रद्धेने आणि प्रेमाने ऐकली व पाहिली जाते. याची कल्पना प्रत्यक्ष पाहून, अनुभव घेतल्यावाचून येणार नाही. अक्षरशः हजारो लोक, तासन् तास बसून रामलीलेची सगळी कथा दिवस अन् दिवस पाहत असतात आणि शेवटी एका भल्या मोठ्या रावणाच्या मूर्तीचे दहन टाळ्यांच्या गजरात करून तो दिवस साजरा करतात. माझ्या मते रामायणात अनेक व्यक्तिचित्रे गडद रंगांत उभी केली आहेत. पण यांतील केंद्रस्थानी कोण आहे? कथेच्या नावाप्रमाणे रामच असावेत. आणि दिसतेही तसेच. परंतु मी जितका अधिक विचार करतो, तसे मला वाटते, की केंद्रस्थानी असलेले व्यक्तिमत्त्व रामाचे नाही. तर ते सीतेचे आहे. सीतेचे स्थान या कथेचा प्राण आहे. सीतेच्या जीवनाभोवती ही करूण कहाणी गुंफली आहे. याला 'रामायण' म्हणण्यापेक्षा 'सीतायन' किंवा 'सीतायज्ञ' म्हणावे, हे अधिक उचित, अशी माझी भावना आहे.

आई माझ्याकडून अधून मधून साखरेबुवांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' वाचून घेत असे. ज्ञानेश्वरी समजायला जरा अवघडच. जुनी भाषा असल्यामुळे वाचून घेत असे. त्यातला अर्थ मलाही जसा समजायला पाहिजे होता, तसा समजत नव्हता. पण मी वाचे, ते ती भक्तिपूर्वक ऐकत असे. एका आठवड्यात मी तिला दोन अध्याय वाचून दाखविले, तेव्हा मी तिला विचारले,

"आई, तू हे सगळे ऐकून घेतलेस, त्याचा सारांश तुझ्या मनाशी काय आला? ".
तिने मला एका वाक्यात सांगितले,
"कृष्णदेव अर्जुनाला सांगतात, की तू आपला 'मी' पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत राहा. असे सगळे ते सांगत आहेत आणि ते बरोबर आहे." गीतेचा इतका सरळ, साधा आणि सोपा आशय मी दुस-या कुण्या पंडिताकडून ऐकलेला नाही. तिची समज चांगली होती. मन धैर्यशील होते आणि उदार होते. आमची खरी शाळा आमची आई होती.

एकदा मी, आमची आजी आणि आई असे तिघे मिळून पंढरपूरला गेलो. कराडपासून पंढरपूर जवळ जवळ ८० मैल आहे. आमच्या कराडच्या मारूतीबुवांच्या मंडपातून कार्तिकी-आषाढीला पालखी जाते. आणि बरोबर चार-दोन बैलगाड्या जातात. मी, आजी आणि आई एका गाडीत इतरांबरोबर निघालो. अट अशी होती, की आम्ही तिघांनी एकाच वेळी गाडीत बसायचे नाही. कुणी तरी एकाने चालले पाहिजे, म्हणजे गाडीत बसणा-या सगळ्यांची सोय होईल. त्याप्रमाणे मजल, दर मजल करीत आमचा प्रवास सुरू झाला होता. माझ्या आजीचे वय तेव्हा साठाच्या पुढे होते. त्यामुळे तिला आम्ही गाडीत बसण्याचा आग्रह करीत असू. परंतु तिची प्रकृती काटक होती. ती म्हणे,
"मला काय झाले आहे ?"
आणि तीही चालण्यामधला आपला हिस्सा उचलत असे.

रोज दहा-पंधरा मैलांचा प्रवास करावा आणि रात्री रस्त्याच्या कडेला मुक्काम टाकून राहावे, असा आमचा क्रम होता. पालखीसमोर चाललेले रात्रीचे भजन ऐकत बसावे. तीन दगडांची चूल मांडून, भाकरी-पिठले शिजवून घ्यावे आणि उघड्या मैदानावर झोपून राहावे, असा हा जवळ जवळ एक आठवड्याचा कार्यक्रम चालू होता. अर्धे एक अंतर मी चाललो असेन. कधी गाडीत, कधी चालत या पद्धतीने आम्ही शेवटी पंढरपूरला पोहोचलो.

यात्रेला जमलेली इतकी विलक्षण गर्दी यापूर्वी मी कधी, कुठे पाहिली नव्हती. राहण्याची गैरसौय तर होतीच. पण अशा या अव्यवस्थेत आणि आरोग्याच्या दृष्टीने फारशा सुविधा नसतानाही ही माणसे इतकी गर्दी करून या यात्रेला जमतात कशी, याचे मला मोठे आश्चर्य वाटले.

एकादशीच्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनासाठी लागलेल्या रांगेमध्ये आम्ही सर्व उभे राहिलो. किती तास उभे राहिलो, लक्षात नाही; पण चार तासांपेक्षा जास्त वेळ उभे होतो, असा अंदाज आहे. शेवटी आम्ही एकदाचे कसेबसे मंदिरात पोहोचलो. गंध, अक्षता, फुले, कापूर, ऊद, धूप, इत्यादी पूजा-साहित्याच्या संमिश्रणातून निर्माण झालेला - आपल्याकडील सगळ्याच देवळांत असतो, तसा वास सर्वत्र दरवळत होता. टाळमृदंगाच्या साथीने विठ्ठलनामाचा गजरही दुमदुमत होता.

गर्दीमुळेमी घामाघूम झालो होतो. कोणी तरी सांगितले, की हा गरूडखांब आहे, मी जाऊन त्याला हात लावला. कोणी तरी ओरडले,
"हात लावायचा नाही" आणि नंतर त्यानेच माझ्या आईला सांगितले, "बाई, तुमच्या मुलाला सांभाळा."

शेवटी विठ्ठलाच्या मूर्तीपर्यंत कसे बसे पोहोचलो. तेथे बसलेले पुजारी-बडवे देवासमोर एक क्षणदेखील कोणाला थांबू देत नव्हते, ढकलून पुढे काढीत होते, माझी उंची त्यावेळी स्वाभाविकच कमी होती. देवाच्या पायांवर डोके ठेवण्याइतका मी उंच नव्हतो. कोणी एक पुजारी माझ्या आईवर खेकसला,
"चला लवकर येथून "

पण आईने त्या सगळ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून, मला उचलून विठ्ठलाच्या पायांवर घातले आणि मग आम्ही तेथून परतलो.

त्यानंतर मी अनेक वेळा पंढरपूरला गेलो आहे. पण माझ्या या पहिल्या दर्शनाची आठवण मी विसरत नाही. नावलौकिक मिळाल्यानंतर, सत्ताधारी झाल्यानंतर, मी विठ्ठलाचे निवांत दर्शन अनेक वेळा केले आहे. पण खेकसणा-या बडव्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून, आईने उचलून विठ्ठलाच्या पायांवर जे घातले, त्याची अपूर्वाई मला नेहमीच जास्त वाटत आली आहे. गर्दीतले ते चार-दोन दिवस, चंद्रभागेच्या वाळवटांत पडलेले ते भजनाचे फड आणि तेथे चाललेली मनसोक्त भजने, त्यांचे ते ठराविक आवाज आणि चित्र आजही माझ्या डोळ्यांसमोर येतात. नवल वाटते, की असे हे शेकडो वर्षे पंढरपूरला चालू राहिले आहे.

पुढे पुढे, मी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतो, यामध्ये श्रद्धेचा भाग किती, असे लोक मला विचारीत. मी त्यांना नेहमी सांगत आलो, की "मी कुठल्या एका दगडाच्या मूर्तीत ईश्वर आहे, असे कधी मानत नाही. परमेश्वर म्हणून कुणी एक व्यक्ती कुठे बसून आहे आणि सर्व जग चालविते आहे, असे माझे मत नाही. परंतु आपल्याला न समजणारी अशी एक जबरदस्त शक्ती आहे व तिचे अस्तित्व मानणे आवश्यक आहे, त्याशिवाय अनेक गाष्टींचा उलगडाच होत नाही."

बुद्धिवादाने, ईश्वर आहे, हे सिद्ध करता येत नाही; तसेच तो नाही, हेही सिद्ध करता येत नाही, म्हणून ज्या ठिकाणी शेकडो वर्षे समाजपुरुष नतमस्तक होत आला, तेथे नतमस्तक होणे मी श्रेयस्कर मानतो. मंदिरात जाण्याच्या पाठीमागची माझी भावना हीच आहे. याच भावनेने मी तुळजापूरला जातो, प्रतापगडला जातो. यामध्ये देवभोळेपणाचा भाग नसतो. परंतु हे करण्याने माझ्या मनाला एक प्रकारचे आंतरिक समाधान लाभते, ही गोष्ट मी कबूल केली पाहिजे.

अशा तऱ्हेने कालक्रमणा चालू होती. माझ्या कुटुंबातील आई-भावांच्या सुखदुःखाची साथ, माझे कार्य, छंद आणि वाचन यांमध्ये मी वाढत होतो. परंतु एका छंदाबद्दल सांगावयाचे राहून गेले. आणि तो म्हणजे नाटकांचा.

महाराष्ट्रातील इतर गावांसारखेच आमच्या कराडलाही नाटकांचे वेड होते.

आमच्या वेळी कराडात गणेशोत्सवात नाटकांचे प्रयोग करणारे दोन-तीन गट होते. पैकी रविवार पेठेतील एक व शनिवार पेठेतील दुसरा एक वेगळा गट होता. गणेशोत्सवात ते हौसेने पौराणिक आणि ऐतिहासिक नाटके बसवीत असत. उघड्या रस्त्यावर स्टेज बांधून तेथे ही नाटके होत. हजारो माणसे जमत. तेव्हा लाऊड-स्पीकरची व्यवस्था नव्हती. स्पष्टपणे ऐकू येत नसे, तरीसुद्धा माणसे शांतपणे बसून राहत असत.

मी तीन-चार वर्षे तरी ओळीने ही नाटके आवडीने पाहत होतो. नाटकातले बरेवाईट मला हळूहळू समजायला लागले. नाटकातील काम करणा-या लोकांच्या ओळखी व्हायला लागल्या. त्यामुळे माझे स्नेहसंबंध वाढत गेले. मी गावात जवळ-जवळ सर्वांच्या ओळखीचा झालो होतो.

आमच्या गावी होणा-या या नाटकांमध्ये वर निर्देश केलेल्या दोन गटांखेरीज सुशिक्षित मंडळींचा आणखी एक गट होता. त्यांनी बसविलेले श्री. औंधकर लिखित 'बेबंदशाही' नाटक मी पाहिले. बळवंतराव जाधव म्हणून आमच्या गावात एक प्रतिष्ठित व्यक्ती होऊन गेली. त्यांना नाटके बसविण्याचा फार शौक होता. ते या बाबतीत नेहमी पुढाकार घेत, हे मला माहीत होते. त्यांनी हे नाटक लागोपाठ दोन-तीन वेळा केले. तिन्ही वेळा हे नाटक पाहायला मी गेलो. सहस्रबुद्धे मास्तर संभाजीचे काम करीत आणि बाबूराव गोखले कलुशा कब्जीचे काम करीत. कुठल्याही धंदेवाईक  नटापेक्षा उत्तम अशी या दोघांची कामे होत. इतकी वर्षे झाली, तरी मला या नाटकांचे प्रयोग पाहिल्याची व जेथे ही झाली, त्या थिएटरची आठवण आहे.

नाटक कंपनीची नाटके मी मोठ्या हौसेने पाहत असे. 'आनंदविलास नाटक मंडळी'

ही आमच्या कराडला वर्ष, दीड वर्षाने भेट देत असे. मास्टर दीनानाथ मंगेशकर व रघुवीर सावकार या प्रसिद्ध नटांच्या नाटक कंपन्यांची नाटकेही कराडला होत. पिटातल्या स्वस्त तिकिटांच्या जागेत बसून मी ती सगळी नाटके मनमुराद पाहिली आहेत. रात्री नऊ-साडेनऊला नाटक सुरू व्हायचे, ते पहाटे तीन-चार वाजेपर्यंत चालू राहायचे. 'मृच्छकटिक'नाटक तर यापेक्षा अधिक वेळ चाले. त्यातली संगीताची मैफल तर फारच रंगत असे.

नाटक पाहता पाहता नाटकात काम करावे, अशी इच्छा मला झाली. आमच्या शाळेच्या संमेलनातील 'माईसाहेब' या नाटकात किर्लोस्करवाडीला एका प्रयोगात मी काम केल्याचे आठवते. आमच्या नाटकांचे सूत्र-संचालन श्री. बाबूराव गोखले यांनी केले होते.

मला याच्यापेक्षा दुसरी चांगली नाटके पाहावीत, अशी इच्छा असे, पण योग येत नसे. बालगंधर्व, केशवराव दाते या नामवंत नटांची नावे नुसती ऐकत होतो. पण प्रयत्न करूनही त्यांची कामे पाहायला मिळत नसत. केशवराव दाते यांच्या महाराष्ट्र नाटक कंपनीचे नाटक कोल्हापूरला आहे, असे समजले. आणि त्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाची जाहिरात 'नवा काळ' मध्ये मी पाहिली आणि मनाने ध्यास घेतला, की हे नाटक पाहिले पाहिजे. गावात माधवराव घाटगे नावाचे माझे एक मित्र होते. ते नुकतेच ट्रेन्ड शिक्षक म्हणून नोकरीला लागले होते. त्यांची नेमणूक कराडलाच झाली होती. माझ्यापेक्षा ते वयाने थोडे मोठे होते; पण आमची मैत्री जुळली होती. माझ्यावर प्रेम करणारे हे गृहस्थ होते. मी माधवरावांना म्हटले,
"केशवराव दाते यांचे काम पाहण्यासाठी कोल्हापूरला जायचे काय?"
नुकताच त्यांचा शाळेच्या नोकरीचा पगार झाला होता आणि त्यांच्या खिशात पैसे होते. ते मला म्हणाले,
"जरूर जाऊ या. परंतु कोल्हापूरमध्ये राहणार कुठे? माझी कुणाशी तेथे ओळख नाही."
मी म्हटले,

"नको कोणाची ओळख. दुपारच्या मोटर सर्व्हिसने कराडहून निघून संध्याकाळी कोल्हापूरला जायचे. कुठे तरी हॉटेलात चहा-फराळ करून नाटक पाहून झाले, की थेट स्टेशनवर येऊन रात्रीच्या गाडीने कराडला परत येऊ."

माधवरावांना माझी सूचना पटली आणि आम्ही दोघे कोल्हापूरला त्या वेळच्या मोटर सर्व्हिसने गेलो. कोल्हापूरला पोहोचायला तीन तास लागत असत. दुपारनंतर आम्ही निघालो. संध्याकाळी दिवे लागण्याच्या वेळी कोल्हापूरला पोचलो. कोल्हापूरची काहीच माहिती नव्हती. विचारीत विचारीत पॅलेस थिएटरकडे गेलो. तिकीट-विक्री सुरू होती. दोन तिकीटे घेतली. शेजारच्या हॉटेलमध्ये जाऊन चहा, भजी खाल्ली आणि थिएटरमध्ये जाऊन आपल्या जागी बसलो. आम्ही एवढ्या लांबून कोल्हापूरला 'प्रेमसंन्यास' पाहायला आलो होतो. पण कोल्हापूरकरांना 'प्रेमसंन्यास' पाहण्याची फारशी आवड दिसली नाही. कारण अर्धे अधिक थिएटर मोकळेच होते. नाही म्हटले, तरी अशा गोष्टींचा मनावर परिणाम राहतो. नाटक सुरू झाले. आणि जयंताच्या भूमिकेत मी केशवराव दात्यांना पाहिले. त्यांचा अभिनय, शब्द उच्चारण्याची पद्धत मला फार आकर्षक वाटली. ज्यासाठी मी आलो होता, त्याचे चीज झाल्यामुळे मला समाधान झाले.

रात्री दीड-दोनच्या सुमारास नाटक संपले.

आता पुढे काय करायचे, असा आमच्यापुढे प्रश्न होता. तेव्हा पॅलेस थिएटरपासून चालत आम्ही रेल्वे स्टेशनपर्यंत गेलो. रेल्वे स्टेशनवर तेव्हा कराडला जाणारी कुठलीच गाडी नव्हती. पॅसेंजर वगैरेही तेथे कोणी नव्हते. सर्व एकदम शांत शांत होते. पांघरायला गरम असे काही नेले नव्हते. फक्त अंगावरचे कपडे होते. निदान स्टेशनच्या भिंतीचा आडोसा तरी होता. पण आमची पंचाईत केली रेल्वेच्या पोलिसाने ! त्याने चौकशी सुरू केली,
"गाडी नसताना तुम्ही स्टेशनमध्ये काय करीत आहात?"

कदाचित त्याचे बरोबरही असेल. तो आपले काम करीत असेल, पण आमची गैरसोय होऊ लागली. आम्ही त्याला सर्व खरे सांगितले.

"आम्हांला सकाळपर्यंत वेळ काढावयाचा आहे. सकाळच्या गाडीने आम्हांला कराडला परत जायचे आहे."

"निव्वळ नाटक पाहण्यासाठी तुम्ही इतके दूर आलात का?" त्याने विचारले.
आम्ही हो म्हटले.

मला वाटते, पोलिसांतही काही काही चांगली माणसे असतात. कदाचित तोही नाटकाचा शौकीन असावा.
"तुम्ही खुशाल बाकावर झोपा. तुम्हांला कोणी त्रास देणार नाही." असे त्याने सांगितले.

अशा रीतीने उरलेली रात्र मंद प्रकाशात, थंडीने कुडकुडत का होईना, त्या स्टेशनवर, बाकड्यांवर अंग टाकून काढली. दुस-या दिवशी सकाळच्या गाडीने कराडला परत आलो.

विद्यार्थिदशेतले आमचे हे प्रयोग माझ्या घरातील सर्व मंडळींना पसंत होते, असे नाही. पण झालेली हकीकत मी त्यांना खरी सांगे.

कराडला एकदा 'बालमोहन नाटक मंडळी' ही लहान मुलांची नाटक कंपनी आली होती. त्यांची ती सुरेख पात्रे पाहून आम्हांला वाटले, की त्यांच्या-इतकेच लहान होऊन या नाटक कंपनीत सामील व्हावे .

घाटगे मास्तर आणि मी अखेरपर्यंत नाटकांचे शौकीन राहिलो.

हे सर्व छन्द, हे सर्व उद्योग चालू असतानादेखील माझ्या विचारातून मनात निर्माण झालेली राष्ट्रप्रेमाची मूळ ऊर्मी हीच मला टिकाऊ वृत्ती दिसली आणि बाकीचे सर्व हे छन्द ठरले.
मी आता सोळा वर्षांचा झालो होतो. १९२९ साल संपत आले होते. देशामध्ये राष्ट्रीय चळवळीने आक्रमक स्वरूप घेतले होते. पंडित जवाहरलाल नेहरू हे या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. वसाहतीचे स्वराज्य, की संपूर्ण स्वराज्य, याचा निर्णय या अधिवेशनात लागणार होता. यामुळे या अधिवेशनाकडे माझे आणि माझ्या सर्व मित्रगणांचे लक्ष लागले होते. हरिभाऊ लाडांच्या व्यापारी छापखान्यात आमच्या मित्रांची टोळी जमे. आणि या सर्व गोष्टींचा ऊहापोह आम्ही तेथे करीत असू. आता काही महत्त्वाची वृत्तपत्रे व्यवस्थित येऊ लागली होती. व्यापारी प्रेस आता आमच्या बैठकीचा अड्डा झाला होता. हरिभाऊंना माणसांची आवड होती. आम्ही त्यांच्याकडे बैठकीसाठी जमत असू, हे त्यांना आवडत असे. तेथे आम्हांला घरच्यासारखेच वाटत असे.

तेथे झालेल्या या सर्व चर्चांतून आम्ही असा विचार केला, की या घडामोडींतून देशात काही तरी चांगले व नवे निर्माण होणार आहे. आणि आपण सर्वांनी मिळून जे काही करता येणे शक्य असेल, ते यावेळी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काय करावयाचे, या संबंधी नक्की काही ठरत नव्हते. निश्चित काही माहितीही नव्हती. पण आमच्या मनाची मात्र संपूर्ण तयारी झाली होती. आम्ही त्यावेळचे कराडचे प्रमुख व्यापारी आणि पुढारी श्री. भाऊसाहेब बटाणे यांना हरिभाऊ लाडांसह जाऊन भेटलो. आणि आमच्या मनात काय आहे, हे त्यांना सांगितले. त्यांनी ऐकून घेतले. आमच्या बरोबर त्यांचा मोठा चिरंजीव शिवाजीराव हा फार उत्साही असा मुलगा होता. भाऊसाहेब बटाण्यांनी हरिभाऊंना सांगितले,
"आपल्या शहरातील जी राष्ट्रीय काँग्रेसची मंडळी आहेत, त्यांची व या मुलांची भेट घालून द्या."

त्याप्रमाणे त्यावेळी महाराष्ट्र प्रांतिकचे पदाधिकारी असलेले कराडचे सदाशिवराव आळतेकर यांना आम्ही भेटलो. त्यांना बरे वाटले. परंतु परिस्थिती निश्चित काय रूप घेईल, याची त्यांना फारशी कल्पना नव्हती. गांधी आणि कॉँग्रेसवर श्रद्धा असलेले ते गृहस्थ होते. त्यांची ही परंपरा पुढे त्यांचे पुत्र प्रसिद्ध वकील गणपतराव आळतेकर यांनी चालविली. सातारा मतदार संघातून पार्लमेंटचे सभासद म्हणूनही ते पुढे निवडले गेले होते.

लाहोरच्या रावी नदीच्या तीरावर राष्ट्रीय कॉँग्रेसचे अधिवेशन झाले आणि तेथे झालेली कॉँग्रेस नेत्यांची भाषणे वृत्तपत्रांतून वाचल्यानंतर अंगावर रोमांच उभे राहू लागले. रावीच्या तीरावर जमलेल्या या राष्ट्रभक्तांनी काही अखेरचे निर्णय घेतले होते आणि संपूर्ण स्वातंत्र्य हीच आमच्या देशाची एकमेव मागणी ठरवली होती. हे वाचून आम्हां सर्वांची मने उल्हासित झाली. त्या अधिवेशनात २६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे ठरले आणि तसे जाहीरही केले गेले.
चाललेल्या या सर्व घडामोडी आम्ही मोठ्या आवडीने वाचत होतो आणि त्यांबद्दल चर्चा करत होतो. २६ जानेवारी जसा जवळ येऊ लागला, तसा त्यात कसा भाग घ्यायचा, याची चर्चा सुरू झाली. मग आमचे असे ठरले, की त्या दिवशी आपणही एक प्रतिज्ञापत्रक तयार करून वाचावे. हे प्रतिज्ञापत्रक तयार करण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले. मी त्याप्रमाणे ते तयार केले. भावनाप्रधान अशा पाच-पंचवीस वाक्यांत ते प्रतिज्ञापत्रक होते. भाषेवर गडकऱ्यांच्या शैलीचा परिणाम होता. मी अलीकडेच खूप प्रयत्न केला; पण मला त्याची जुनी प्रत सापडू शकली नाही. माझ्या मित्रांनी त्या प्रतिज्ञापत्रकाचे स्वागत केले. ते छापून घेऊन प्रसिद्ध करावयाचे होते व वाटावयाचे होते, म्हणून दिनांक २५ लाच रात्री व्यापारी छापखान्यामध्ये आम्ही सर्वजण जमलो आणि ते प्रतिज्ञापत्रक छापून घेतले. ते छापून घेण्यास पहाटेचे चार वाजले होते. सकाळी आठ वाजता कृष्णा घाटावर झेंडावंदन होते. प्रेसमधून आम्ही आपापल्या घरी गेलो. अंघोळ करून, कपडे बदलून, पुन्हा प्रेसमध्ये जमलो आणि सर्वजण मिळून हरिभाऊंच्या नेतृत्वाखाली सात वाजता कृष्णेच्या

घाटावर पोहोचलो. आमच्या मनात उत्साह भरून राहिला होता. झेंडावंदनासाठी आमच्याखेरीज इतरही पंचवीस-तीस माणसे जमली होती. परंतु आम्हांला त्याची पर्वा नव्हती. आम्ही प्रतिज्ञापत्रक सर्वांना वाटले. झेंडावंदन झाले, स्वातंत्र्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावयाचे, अशी मनःपूर्वक शपथ घेऊन आम्ही आपापल्या घरी परतलो.

कृष्णेच्या काठाच्या त्या २६ जानेवरीची ती सुंदर सकाळ मी कधीच विसरू शकणार नाही. मनात दाटलेली भावना आता प्रकट स्वरूपात व्यक्त झाली होती. राष्ट्रीय काँग्रेसच्या तिरंगी झेंड्याखाली आज आपण प्रतिज्ञावाचन केल्यामुळे मनाची शांती वाढली. माझे राजकीय जीवन ख-या अर्थाने सुरू झाले.

२६ जानेवारी आणि नंतरचा काळ ब-याच उद्योगांत गेला. माझ्या राजकीय हालचाली तर चालू होत्याच, पण परीक्षा जवळ आल्यामुळे तिकडेही लक्ष देण्याची गरज होती. माझ्याभोवती शाळेतल्या विद्यार्थ्यांचे एक छानसे कोंडाळे निर्माण झाले होते. तीही सर्व तरुण मुले आपल्या अभ्यासाची तयारी चांगली करणारी होती. तशीच माझ्या कामाला सहानुभूती दाखविणारी आणि मदत करणारीही होती. आमच्या हायस्कूलमधल्या विद्यार्थ्यांचा एका अर्थाने मी 'स्पोक्समन' बनलो होतो. मी अजूनही त्यांचा पुढारी बनलो होतो, असे म्हणणार नाही. या वर्षी परीक्षा मार्चमध्ये होत्या. आणि त्याच सुमाराला महात्मा गांधींचा दांडी-मार्च सुरू होणार होता. मी राजकारण जास्त करीत होतो आणि अभ्यास कमी करीत होतो; परंतु तरीसुद्धा माझी परीक्षा मी पास झालो. त्याचे कारण माझे वाचन असल्यामुळे मराठी विषय मला तसा सोपा वाटत असे. आणि हा इतिहास विषयही मला अवघड वाटत नसे. संस्कृतमध्ये चांगले मार्क मिळावेत, या दृष्टीने प्रयत्न करीत असल्यामुळे त्यातही माझी प्रगती बरी होती, माझी खरी अडचण होती मॅथॅमेटिक्स्ची. त्यातले अंकगणित आणि भूमिती हे विषय माझे फार उत्तम असत. परंतु बीजगणितामध्ये मात्र माझी काही मात्रा चालत नसे. मला ते आवडतच नसे. त्यामुळे बीजगणिताचा

पेपर असेल, तर तो अक्षरशः कोरा देणे आणि राहिलेल्या दोन विषयांमध्ये पास होण्याइतके मार्क मिळविणे, अशी आमची 'स्ट्रॅटेजी' चाललेली असे.

आमच्या शिक्षक-वर्गात दोन तऱ्हेची शिक्षक मंडळी होती. एक वर्ग असा होता, की जो मूलतःच राष्ट्रीय वृत्तीचा होता. अभ्यास चांगला करून राजकीय हालचाली करणा-या मुलांना ते एक प्रकारे उत्तेजनच देत असत. मात्र त्यांची अट अशी असे, की शाळेला काही कमीपणा व नुकसान येईल, असे काही करता कामा नये. दुसरी अट अशी असे, की शाळेतले अभ्यास चांगल्यापैकी केले पाहिजेत. आमच्या शाळेचे दोन प्रमुख शिक्षक पाठक आणि दुवेदी हे या प्रकारचे शिक्षक होते. माझा अभ्यास उत्तम करून मी चळवळी करतो, म्हणून, नाही तरी, त्यांचा माझ्यावरती लोभच होता. पण दुसरे काही शिक्षक असे होते, की त्यांना असे वाटत असे, की आम्ही नको ते उपद्व्याप करतो. या शिक्षक-मंडळींना कशातच रस नसे. आणि शिक्षक म्हणूनही ते एका अर्थाने बेताचे होते. परंतु विद्यार्थ्यांनी काही आगळे करावे, हे त्यांना रूचतच नव्हते. अशा शिक्षकांचे आणि माझे फारसे जमले नाही. पण ज्यांचे जमले, त्यांच्या उबदार आठवणी आजही माझ्या मनात येतात. पाठक, दुवेदी यांची आठवण मी कॉलेज संपवून परत आल्यानंतरही माझ्या मनात जागृत होती. शिक्षक म्हणूनही ते उत्तम होते. आणि सार्वजनिक कामाची दखल घेणारेही होते. त्यांच्याबद्दल आदराची नोंद करून ठेवणे मी माझे कर्तव्य समजतो. जे शिक्षक, भोवताली जे काही चालले आहे, त्यांसबंधी एक प्रकारची उपेक्षा वृत्ती आणि उदासीनता दाखवीत होते, त्यांना तर खरे म्हणजे कशातच रस नव्हता. त्यामुळे ते शिक्षक या नावाला पात्र तरी होते, की नाही, कोण जाणे !

त्यावेळी आमच्या शाळेमध्ये शेणोलीकर म्हणून एक शिक्षक होते. ते मात्र वेगळ्या प्रकारचे होते. वर उल्लेख केलेल्या कुठल्याही दोन गटांत न बसणारे, अत्यंत वक्तशीर, व्यवस्थित आणि टापटिपीने काम करणारे शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांचे चालणे-बोलणेसुद्धा अगदी खास शैलीदार होते. त्यांना खरा शौक होता शिकविण्याचा आणि क्रिकेटचा. त्यांनी मला क्रिकेटमध्ये गुंतविण्याचा

प्रयत्न करून पाहिला. परंतु मी त्यांच्या हिशोबात बरोबर बसलो नाही. त्यामुळे त्यांनी माझा नाद सोडून दिला. आमच्या शाळेत आणि गावात त्यावेळी जे थोडे-फार क्रिकेट चालले होते, त्याचे सर्व श्रेय या गुरूजींना दिले पाहिजे.

त्यांनी एकदा आमच्या वर्गात मुलांना विचारले,
"तुम्हांला प्रत्येकाला काय व्हायचे, ते तुम्ही एका कागदाच्या चिठ्ठीवर लिहून द्या."

प्रत्येकाने आपल्यापुढे आदर्श असणा-या एका थोर पुरुषाचे नाव लिहून दिले असावे. मी माझ्या मनाशी विचार केला, की कुठल्या तरी मोठ्या पुरुषाचे नाव लिहून देणे म्हणजे आपली स्वतःची फसवणूक करून घेणे होय. मोठी माणसे आपल्या कर्तृत्वाने मोठी झालेली असतात. त्यांच्यासारखे आपण होऊ, हा विचार चांगला, पण तसा निर्णय अवास्तव, म्हणून मी माझ्या चिठ्ठीवर लिहिले :
'मी यशवंतराव चव्हाण होणार.'

मास्तरांनी सर्व मुलांच्या चिठ्ठ्या पाहिल्या आणि माझी चिठ्ठी पाहून ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले,
'अरे, तू तर चांगलाच अहंकारी दिसतोस. तू सार्वजनिक कामांत रस घेतोस, हे चांगले आहे. पण त्यामुळे तू निदान देशातील मोठ्या माणसांचा आदर्श तरी आपल्या डोळ्यांपुढे ठेवला पाहिजेस."
मी म्हटले,
"तुमचे म्हणणे खरे आहे; पण मला वाटले, ते मी लिहिले, झाले !".

हा विषय माझ्या दृष्टीने मी वर्गातच संपविला; पण त्यांनी टीचर्स रूममध्ये जाऊन शिक्षक-बंधूंशी या गोष्टीची चर्चा केली असावी. कारण पाठक सरांनी मला विचारले. ते आमचे हेडमास्तर होते. त्यांना मी झालेली खरी हकीकत सांगितली, तेव्हा त्यांनी मात्र मला सांगितले,

"यात काय गैर आहे? आपले व्यक्तिमत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करण्याची तुझी इच्छा आहे, असा त्याचा अर्थ आहे आणि तो योग्य आहे. शेणोलीकर तुला काही म्हटले असतील, तर त्याकडे तू लक्ष देऊ नकोस."

मी मागे सांगितले होते, की आमच्या शाळेमध्ये टिळक आणि आगरकर यांच्या संबंधाने निबंध आणि वक्तृत्व-स्पर्धा लावीत असत. त्यामुळे त्या दोघांसंबंधी जे मिळेल, ते आम्ही वाचायचा प्रयत्न करीत असू. त्यामुळे माझ्यात वक्तृत्वाची हौस निर्माण झाली आणि मी वक्तृत्व-स्पर्धेत आणि निबंध-स्पर्धेत भाग घेऊ लागलो. लोकमान्य टिळक यांच्यावर लिहिलेल्या माझ्या एका निबंधाला पहिले बक्षीस मिळाले होते. त्यामुळे लिहिण्याची सवयही मी वाढवीत होतो.

शाळेतला हा असा प्रकार, बाहेरही माझे लोकांशी आणि कार्यकर्त्यांशी संबंध वाढत होते. मी एक पाहिले, की कराडमधील सर्व वर्गांमध्ये देशामध्ये घडत असलेल्या परिस्थितीबद्दलची एक प्रकारची उत्सुकता व कुतूहल निर्माण झाले होते. वर्तमानपत्रे जास्त वाचली जात होती. त्यामुळे सुशिक्षित समाज व्यापारी वर्ग, यांच्याबरोबरच आमच्या कराडमधल्या छोट्या जमातींचा जो समाज होता, तो म्हणजे भोई समाज, कोष्टी समाज, शिंपी समाज यांच्यामध्येही राष्ट्रीयत्वाचे वातावरण संचारले होते, असे मला दिसले. पण या वातावरणापासून काही तरुण मुले सोडली, तर बाकीचा मुसलमान समाज तटस्थ होता. अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजामध्ये एक प्रकारची उदासीनता होती. त्याची काय कारणे असावीत, हे मला माहीत नव्हते. पण मी कार्यकर्ता म्हणून जेव्हा गावातील मोहल्ल्या मोहल्ल्यांतून हिंडत असे, आणि छोट्या-मोठ्या सभांतून बोलायचा प्रयत्न करीत असे, तेव्हा ही गोष्ट मला उत्कटतेने जाणवे. मग मी आपल्या मित्रांशी चर्चा करीत असे, की हे असे का? देशातल्या सर्व थरांतील जनतेचा सामूहिक उठाव करण्याचा प्रयत्न गांधी, नेहरू करू इच्छितात. पण येथे समाजातही कोणी काहीसे तटस्थ व कोणी काहीसे विरोधी असे वातावरण का असावे, याचे स्पष्ट उत्तर कोणाजवळच नव्हते. ज्यांचा पाठिंबा आहे, त्यांचा पाठिंबा घेऊन आपण आपले काम करीत राहावे, अशी आम्हां तरुण मित्रांची

वृत्ती होती. कराड गावाबाहेरच्या खेडेगावांमध्येही मी काहीसे कुतूहल निर्माण झालेले पाहिले. पण त्यांच्यामध्ये प्रत्यक्षात भाग घ्यावा किंवा काही करावे, अशी वृत्ती दिसली नाही. मी याचे कारण समजून घेण्याचा व तपासण्याचा प्रयत्न केला. आणि तो प्रयत्न म्हणजे मी माझे बंधू गणपतराव यांच्याशी केलेली चर्चा. ते लॅण्ड मॉर्गेज बँकेत काम करत होते. त्यामुळे त्यांचा खेड्यांतील कर्त्या शेतकरी मडंळींशी सतत संबंध येत होता. त्यांनी मला सांगितले,

"शेतकरी मंडळींनी तुमच्या या चळवळीत का यावे? तुम्ही शेतकरी मंडळींकडे जाऊन त्यांचे प्रश्न काय आहेत, हे कधी बोललात किंवा चर्चा केली आहे का? त्यांचे जे प्रश्न आहेत, ते सरकारी यंत्रणेशी संबंधित असतात. त्यामुळे सरकारविरोधी चळवळीत जाणे त्यांना परवडणारे नाही. त्यामुळे ते काहीसे दूर राहतात. तुम्ही जाऊन त्यांच्याशी भेटायचा, बोलायचा प्रयत्न कराल, म्हणजे तुम्हांला समजेल."

मी याबाबत माझ्या मित्रांशी बोललो. दोन-चार मित्रांनी सुट्टीच्या दिवशी बाहेर खेड्यांत माझ्याबरोबर येण्याचे कबूल केले. कराड शहरात मी माझ्या कामामुळे माहीत झालो होतो. पण कराड गावाच्या बाहेर खेड्यांत मला 'गणपतरावांचा भाऊ' म्हणून सांगावे लागे आणि त्या तऱ्हेनेच लोक मला ओळखत असत.

मी जेव्हां चार-सहा गावांत जाऊन तेथील काही लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा असे दिसून आले, की थोडे-फार शिक्षण झालेली जी तरुण मंडळी होती, त्यांना या चळवळीमध्ये जे नवीन चालले आहे, त्यात रस होता. पण आपण त्यात भाग घ्यावा, ही गोष्ट त्यांच्या गावातील पुढाऱ्यांच्या धोरणामुळे पटत नव्हती. गावच्या पुढाऱ्यांच्या जवळ जायची आमची ताकद नव्हती. कारण आम्ही तसे पोरसवदे होतो. आणि या पुढारी मंडळींचे सरकार-दरबारी हितसंबंध गुंतलेले असत. त्यांना स्वराज्याची चळवळ म्हणजे नसत्या उठाठेवी वाटत.

मी मात्र एक समजून चुकलो, की या चळवळीशी तटस्थ आणि विरोधी असणारे जे

शहरातील लोक आहेत आणि खेड्यापाड्यांतून पसरलेला जो ग्रामीण समाज आहे, त्यांचे मन जागे केल्याशिवाय चळवळ वाढणे अवघड आहे.

पुढे १२ मार्चला गांधींचा दांडी-मोर्चा अहमदाबादहून सुरू झाला. साबरमतीच्या आश्रमातून ते मजल, दर मजल करत दांडीच्या दिशेने वाटचाल करू लागले. आणि मी एक आश्चर्य पाहिले, की जसजसे त्यांचे एक एक पाऊल पुढे पडत होते, तसतसा देश जागा होऊन काही करू इच्छीत होता. जी माणसे मला तटस्थ आणि विरोधी वाटली होती, त्यांच्यांतही मला फरक जाणवू लागला. कराडला जाहीर सभा होऊ लागल्या. त्या सभांमध्ये यांतील काही मंडळी येऊ लागली. खेड्यापाड्यांतूनही मंडळी आवर्जून भाग घेऊ लागली. शांत, एकाकी, अविचल व स्थिर असा एखादा पाण्याचा डोह असावा आणि अचानक कुठून तरी वादळी, सोसाट्याचा वारा यावा, म्हणजे त्यावरती जसे लाटांचे तरंग उठू लागतात, तसेच शांत पहुडलेल्या या समाजाचे होऊ लागले. माझ्या डोळ्यांसमोर हे चित्र आजही येते. थोड्या दिवसांच्या अंतरामध्ये समाज कसा बदलल्यासारखा वाटू लागला. महात्मा गांधींना देशातल्या ग्रामीण व शहरी समाजाची नाडी समजलेली होती, म्हणून त्यांनी दांडी-मोर्च्याची कल्पना काढली होती. त्यांच्या या निर्णयाची एक प्रकारे कसोटीच लागली.

शेवटी सरकारला गांधीजींना पकडावे लागले. आणि या अटकेमुळे जो एक नवा प्रभाव जनतेवर पडला, त्याचे रूप अवर्णनीय आहे. गांधीजींनी सुरू केलेला मिठाचा सत्याग्रह हा आता त्यांच्यापुरता मर्यादित राहिलेला नव्हता. देशातल्या चहूबाजूला संधी सापडेल तेथे मीठ व जंगल-सत्याग्रह होऊ लागले. लोकांच्या धरपकडी सुरू झाल्या. ब्रिटिश सरकारच्या निषेधाच्या सभा आणि त्यांतून होणारी भाषणे यांतून जनजागृती होऊ लागली. मोठा रामहर्षक काळ होता तो !

आमच्या कराडला तर जवळ जवळ दररोज कृष्णेच्या घाटावर सभा होत असे. आणि त्या सभांतील भाषणे ऐकण्याकरता मी तासन् तास तेथे घालवत असे. कराड शहरातील काही वकील मंडळी फार उत्तम भाषणे करत. बाहेरचीही विद्वान माणसे

येत होती. त्यांचीही व्याख्याने होत. त्यामुळे एक प्रकारचे लोकशिक्षण होत असे. आम्हां विद्यार्थ्यांवर या सभांचा परिणाम होत असे. लहानशा सभांतून मीही बोलू लागलो होतो.

माझ्या वर्गात अहमद कच्छी म्हणून एक अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होता. त्यांचे कुटुंब आगाखान पंथातील होते. व्यापाराखेरीज काही बाहेर पाहू नये, अशी त्यांच्या घरातील कर्त्या माणसांची वृत्ती होती, पण हा मुलगा अतिशय बुद्धिमान असल्यामुळे त्याला भोवतालच्या परिस्थितीचे स्वरूप समजून घेण्याची अधिक उत्सुकता असे. जाहीर सभांना जाण्याची त्याला त्याच्या घरातून परवानगी नसे; पण मी त्याला रोज काय घडले, त्याची माहिती सांगत असे. तो माझा मोठा मित्र बनला. आणि त्याच्यावरचे भीतीचे जे दडपण होते, ते कमी करण्याचा मी प्रयत्न केला. तो अतिशय सुसंस्कृत मुलगा होता. त्याचा इंग्लिश विषय तर इतका उत्तम असे, की जणू काही तो इंग्रज कुटुंबातच वाढला आहे, असे वाटावे. मला आठवते, की एकदा मासिक परीक्षेच्या वेळी आमच्या इंग्रजीच्या शिक्षकांनी त्याला २५ मार्कांच्या पेपरला २६ मार्क देऊन त्याचा गौरव केला होता ! मी त्याच्याशी ज्या चर्चा करीत असे, त्यांतून मुसलमानांच्या तटस्थपणाचे चित्र मी थोडे-फार समजू शकलो.

उथळे म्हणून महार समाजातील माझे एक मित्र होते. तेही आमच्या बरोबर असत. आमच्यासारखे बोलत. पण या कामासाठी ते कधी आम्हांला त्यांच्या समाजात घेऊन जात नसत. मी त्यांना एकदा विचारले,

"असे का ?"

त्यांनी सांगितले,

"आमच्या समाजाची दुःखे, तुम्ही समजता, त्याच्यापेक्षा वेगळी आहेत. महात्मा गांधी डॉक्टर आंबेडकरांना का बरोबर घेत नाहीत? ते जर त्यांनी केले, तर ही गोष्ट बदलून जाईल."

पण हे सर्व प्रश्न आमच्या आवाक्याबाहेरचे होते.

मी हे सर्व अशासाठी सांगितले, की समाजाचे चित्र एक नवा अनुभव घेऊन बदलत होते, ते कशा प्रकारचे होते, त्याची कल्पना यावी, म्हणून. पण एक गोष्ट मात्र खरी, की कोणी तटस्थ असो किंवा कोणी मनातून विरोधी असो, देशात एक नवे चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. एक विलक्षण लोकजागृती झाली होती. आणि तिच्याविरूद्ध काही करावे, असे वाटणाऱ्यांच्या वृत्तीही कमजोर होत होत्या, बदलत होत्या. मी तर स्वतःला या चळवळीत मनाने लोटून दिले होते व प्रत्यक्ष कामालाही लागलो होतो. मी त्या कार्यामध्ये समरस झालो होतो.

या चळवळीच्या निमित्ताने आमच्या गावी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेच्या काही मुलांची एक फेरी आली. 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू' अशी सुरुवात करून गांधींच्या सत्याग्रहाची तत्त्वे सांगणारी गीते गात पहाटेच्या सुमाराला ते गावातून फेरी काढत. त्यांचे अनुकरण करायचे आम्ही ठरविले. आमच्या गावातील शेकडो मुले आणि मुली अशा प्रभात-फेरीत सामील होऊ लागली. सकाळी पाच वाजता ठरल्या ठिकाणी जमावे आणि वेगवेगळी गाणी म्हणत गावभर हिंडावे, असा तास, दोन तासांचा कार्यक्रम चाले. या निमित्ताने नवी गाणी तयार होऊ लागली. नवे कवीही निर्माण झाले. एक संपूर्ण नवीन चैतन्यमय वातावरण निर्माण झाले.

आमच्या कृष्णेच्या घाटावर होणा-या सभांत भाषण करण्यासाठी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे, तरुण, विद्वान, पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे एक आठवडाभर आले होते आणि तेथे त्यांची आठ-दहा भाषणे झाली. गावातील सर्व सुशिक्षित, व्यापारी आणि इतर मंडळी त्यांच्या भाषणाला तोबा गर्दी करीत असत. त्यावेळी त्यांचे वय तीस वर्षांचे होते. चेह-यावरती बुद्धिमत्तेचे प्रखर तेज होते. अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली शाल होती.

त्यांची ती व्याख्याने मी आजही विसरू शकत नाही. पारतंत्र्याची त्यांनी खूप नवी मीमांसा केली. स्वातंत्र्याचा अर्थ सांगितला. ही शेवटची लढाई आहे आणि यात

आपण सर्वस्वाचा होम केला पाहिजे, असे आवाहन केले. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

तर्कतीर्थांच्याप्रमाणेच एकदा या चळवळीच्या निमित्ताने श्री. काकासाहेब गाडगीळही भाषणासाठी कराडला आले होते. त्यावेळी मी त्यांना प्रथम पाहिले. एका मोठ्या सभेत त्यांचे भाषण झाल्याचे मला आठवते. सभेसाठी तुडुंब गर्दी झाली होती. त्यावेळी लाऊडस्पीकर नसल्यामुळे वक्त्यास उंच आवाजात बोलावे लागे. काकासाहेब भाषणासाठी उभे राहिले आणि सभेला उपस्थित असलेल्या जनसमुदायाच्या शेवटच्या टोकावर नजर पोहोचेना, तेव्हा ते समोरच्या टेबलावर चढले व टेबलावर उभे राहून त्यांनी भाषण केल्याचे मला स्मरते. त्यांच्या भाषणात देशभक्तीचे आवाहन होते, नर्म विनोद होता, खट्याळ उपरोध पण होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीवर प्रखर टीका होती. काकांचे भाषण अत्यंत कळकळीचे आणि आवेशपूर्ण झाले. त्यांच्या शैलीदार वक्तृत्वाची व बेडर व्यक्तिमत्त्वाची कायमची नोंद झाली.

माझ्या मताने तर्कतीर्थांच्या भाषणांचा वैचारिक प्रभाव सामान्य माणसावर आणि विशेषतः तरुणांवर जास्त पडला. तर्कतीर्थांच्या भाषणाची शैलीच वेगळी होती. त्याला देशभक्तीची धार होती, विचारांची एक पकड होती. त्यांच्या पहिल्या भाषणातील पहिलेच वाक्य इतके नाट्यपूर्ण व अर्थपूर्ण होते, की ते आजही माझ्या ध्यानात आहे.
मे महिन्याची संध्याकाळ होती. सुमारे पाच वाजले असावेत. सभा कृष्णाघाटावर होती. हजारो माणसे उन्हाने तापलेल्या घाटावर बसली होती. उन्हाने तापलेला कातळ त्यावर बसणा-या माणसाला भासेल इतका गरम होता. शास्त्रीबुवा बोलण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी पहिले वाक्य उच्चारले, ते असे :
"तुम्ही बसला आहात, तो घाट जसा गरम झाला आहे, तशी तुमची बुद्धी व मने गरम झाली पाहिजेत. देशाची तुमच्याकडे आज ही मागणी आहे."

चेह-यावर बुद्धिमत्तेचे तेज असलेल्या तरुण शास्त्र्याचे हे एकच वाक्य सभा जिंकून गेले.

त्यानंतर त्यांची आठ-दहा भाषणे झाली.

या दोघांची भाषणे माझ्या लक्षात राहण्याचे आणखी दुसरे एक कारण आहे. या दोघांच्या भाषणांबद्दल कराड पोलिसांनी दोघांच्यावर खटले भरले. दोन्ही खटल्यांमध्ये काही महिन्यांचे अंतर असेल. पण या खटल्यांमुळेही लोकजागृती होण्यामध्ये आणखी भरच पडली. या दोन्ही खटल्यांच्या वेळी मी मॅजिस्ट्रेट कचेरीमध्ये हजर राहून या खटल्याची संपूर्ण हकीकत व कामकाज ऐकले व पाहिले आहे; सरकारी रिपोर्टरने त्यांच्या भाषणांतील त्यांना वाटणा-या आक्षेपार्ह मजकुरांची साक्ष द्यायची. आणि ह्या वक्त्यांनी आपण हे बोललो आहोत आणि बचावाच्या कामात आपल्याला भाग घ्यायचा नाही, असे ठामपणे निवेदन करायचे. हाच परिपाठ पडला होता. माझ्या आठवणीप्रमाणे दोघांना सहा सहा महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या. तरीसुद्धा दोघेही हसतमुख होते. ते लोकांना नमस्कार करत आपल्या कोठडीत शिरल्याचे मी पाहिले आहे.

स्वातंत्र्याच्या लढ्याची ही प्रात्यक्षिके पाहत एक प्रकारचे लोकशिक्षण होत होते, असे म्हटले पाहिजे. शेकडो लोक हे खटले पाहायला आणि ऐकायला जमत असत. मग त्यावर लोकांची चर्चा चालू होई. पुन्हा त्या शिक्षेच्या नंतर निषेधार्थ जाहीर सभा होई, असे हे न संपणारे वर्तुळ होते.

एके दिवशी आमच्या कराडमध्ये सत्याग्रहाचा दिवस उगवला. असे जाहीर झाले, की शिरोड्याहून बेकायदेशीररीत्या मीठ तयार करून त्याच्या विक्रीसाठी कोणी प्रमुख मंडळी येणार आहेत. आम्ही त्यांच्या स्वागताची आणि सभेची व्यवस्था केली. ते लोक कोण आहेत. कुठले राहणारे आहेत, याची कल्पना आम्ही कुणाला येऊ दिली

नाही. बटाणे मंदिराच्या चौकात जेथे तीन रस्ते एकत्र मिळतात, तेथे संध्याकाळी सभेसाठी प्रचंड गर्दी जमा झाली आणि आता पुढे काय होणार, याची सर्वजण उत्सुकतेने वाट पाहू लागले. पोलिस बंदोबस्त कडेकोट होता. आमच्या भागातील पोलिस इन्स्पेक्टर आपल्या युनिफॉम व फौजफाट्यासह सज्ज होते. आता ही लढाई कशी जुंपते, याची लोक वाट पाहत होते, मिठाची विक्री करणारे कोल्हापूरचे श्री. निकम अनपेक्षितपणे व चपळतेने सभेच्या एका कोप-यातून येऊन व्यासपीठावर उभे राहिले आणि त्यांनी आवाहन केले,
"गांधीजींच्या आज्ञेप्रमाणे आम्ही बनविलेल्या मिठाच्या पुड्या माझ्याजवळ आहेत आणि मी त्यांची विक्री करणार आहे. जे कोणी घ्यायला तयार असतील, त्यांनी पुढे यावे."

हातामध्ये मिठाच्या पुड्या घेऊन, तो हात उभारून ते लोकांना सांगत होते.
"बोला, बोला !"

लोक एकमेकांकडे कुतूहलाने आणि उत्कंठेने पाहत होते. आता हे धाडस कोण करणार, याबद्दल औत्सुक्य होते. लोकांमध्ये एक प्रकारची धीरगंभीर शांतता पसरली. व्यापारी मंडळी ज्या कोप-यात बसली होती, तेथील एक अत्यंत सन्मान्य व्यापारी शामजीभाई हे उठले आणि त्यांनी तो पुडीचा लिलाव स्वीकारला. सभेमध्ये टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. पोलिस इन्स्पेक्टरांनी पुढे होऊन शामजीभाईंना अटक केली. हे सर्व इतक्या शिस्तीने चालले होते, की यापुढे आणखी काय होणार, म्हणून लोक वाट पाहत होते. व्यासपीठावरच्या गृहस्थांनी आपल्या खिशातली दुसरी पुडी काढली आणि पुन्हा पुकारले,
"ही दुसरी पुडी कोण घेणार ? "

सगळीकडे एकदम स्तब्धता निर्माण झाली. पुडी घेतल्यानंतर अटक होते, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते.

एक-दोन मिनिटे निःशब्द शांततेत गेली. आता पुढे कोणी येणार नाहीत, अशी लोकांची समजूत झाली. आणि तेवढ्यातच आमचे हरिभाऊ लाड आपल्या छापखान्याच्या बाजूला बसले होते. तेथून ते उभे राहिले आणि त्यांनी "ही पुडी मी घेतो आहे !" असे सांगितले.

हरिभाऊंनी त्या दिवशी फक्त मला सांगून ठेवले होते, की -
"मी यात भाग घेणार आहे. तुम्ही कोणी यात पडता कामा नये. पाठीमागचे काम पुढे चालू ठेवले पाहिजे."

त्यामुळे त्यांच्या पुढे जाऊन बेकायदेशीर मीठ खरेदी करण्याच्या धाडसाचे मला आश्चर्य वाटले नाही.

सर्व सभा स्तंभित झाली. मी पूर्वी सांगितले, त्याप्रमाणे हरिभाऊ एक बटु मूर्ती होती. शरीरामध्ये व्यंग होते. ते लंगडत चालत. तोंडात दात नसत. त्यांचे वागणे, बोलणे मोठे खणखणीत होते. त्यावेळी ते आमच्या ग्रूपचे खरे लीडरच होते. आणि मित्रही होते. मला त्यांच्याबद्दल तेव्हाही आदर होता आणि आजही आहे.

इन्स्पेक्टरांनी हरिभाऊंनाही अटक केली आणि श्री. निकम यांनाही पकडले. मग मात्र सभेमध्ये गोंधळ झाला. लोक उभे राहिले. आणि त्यांनी हरिभाऊ, शामजीभाई आणि श्री. निकम यांच्या भोवताली कडे केले. आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी धावत जाऊन लोकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी आपल्या मोटारीतून त्या तिघांना मामलेदार कचेरीत नेले.

एक - दोन दिवसांतच त्यांच्यावर खटले चालले. आणि कायदेभंगाच्या चळवळीच्या शिस्तीप्रमाणे गैरकायदा मीठ जाणूनबुजून खरेदी केले, असे या दोघांनीही कबूल केल्यामुळे मॅजिस्ट्रेटने त्यांना काही महिन्यांची सजा दिली.

या एका दिवसाने व घटनेने आमच्या गावच्या परिस्थितीत आणि माझ्या चित्तवृत्तींत खूपच फरक पडला. त्याच्या आधी भाऊसाहेब बटाणे यांनाही अटक करून नेण्यात आले होते. त्यामुळे आमच्या गावी चळवळीला उधाण आले होते, असे म्हटले, तरी चालेल.

आता चळवळ खेड्यापर्यंत पोचली होती. आम्हांला खेड्यांतून भाषणे करण्यासाठी निमंत्रणे येऊ लागली. मी आणि इतर काही कार्यकर्ते या सभांसाठी जात असू. एखाद्या गावी गेल्यानंतर काँग्रेसची सभा होणार, असे जाहीर करत. मुले गावाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जात. मग कुठे एखाद्या मंदिरामध्ये किंवा गावातल्या प्रमुख ठिकाणी असणा-या पाराच्या सावलीत आम्ही सभा घेत असू. दीडदोनशेपर्यंत माणसे जमत. लांब उभ्या राहून स्त्रियाही भाषणे ऐकत असत. आम्ही आमच्या शक्तीप्रमाणे चळवळीची माहिती श्रोत्यांना देत असू. गांधींनी केलेल्या कार्यांची हकीकत सांगत असू. सरकारने केलेल्या अत्याचाराची माहिती देत असू. आपला देश इंग्रज सरकार पिळून काढीत आहे आणि त्यामुळे आपल्या देशामध्ये अज्ञान व दारिद्र्य वाढते आहे, असे सरळ साधे, सोपे विषय मांडत असू. राष्ट्रप्रेमाचा संदेश शेवटच्या थरापर्यंत पोहोचला असल्यामुळे माणसे आमची ती भाषणे मोठ्या प्रेमाने ऐकून घेत. आम्ही त्यांना सांगत असू, की
'आपण सर्व काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येऊ या, म्हणजे आपण स्वतंत्र होऊ.'

एका गावची मला आठवण आहे. तेथे आमची सभा झाल्यानंतर एक जाणता व वयस्कर मनुष्य उभा राहिला आणि म्हणाला,
"पोरांनो, तुम्ही चांगले काम करता आहात, हे खरे; पण या निव्वळ गांधी टोप्या घालून आणि झेंडे फिरवून स्वराज्य कसे मिळणार, रे ! इंग्रज मोठा बलिष्ठ राजा आहे. तो तुमच्या बोलण्याने कसा हटणार ? त्याच्यासाठी लढले पाहिजे व तलवारीची लढाई केली पाहिजेल."

अशा अर्थाचे बोलल्यानंतर आम्ही त्याला आमच्या समजुतीने उत्तर देण्याचा प्रयत्न केला; पण त्यामुळे लोकांच्या मनात काय विचार येतात, याची आम्हांला थोडी-फार कल्पना आली. स्वराज्य मिळविण्याचा विचार लोकांना पटलेला होता. पण आम्ही म्हणतो, त्या अहिंसक पद्धतीने ते मिळणार का, हा लोकांच्या मनातला प्रश्न अनेकांच्या मनांत व अनेक स्तरांवरच्या माणसांत निर्माण होत होता. वर्तमानपत्रांतसुद्धा चळवळीबद्दल जे लिहिले जात होते, त्यामध्ये हा विचार अनेक मंडळींनी प्रत्यक्ष मांडण्याचाही प्रयत्न केला होता. शहाणीसुरती विद्‌वान माणसेही 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' अशा शब्दांत हाच प्रश्न निराळया पद्धतीने मांडत होती.

हरिभाऊ जेलमध्ये गेल्यामुळे मी आणि माझे साथी यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली होती. परंतु स्वस्थ बसायचे नाही, हा आमचा निर्णय होता. पोलिसांचे माझ्याकडे लक्ष गेले होते. आणि माझ्या बंधूंजवळ पोलिस इन्स्पेक्टरने तसा काहीसा उल्लेख केला होता. माझी आणि गणपतरावांची यावर चर्चा झाली. तेव्हा मी त्यांना सांगितले,
"मी माझे काम बंद करणार नाही; परंतु मिठाची पुडी घेऊन मुद्दामहून तुरूंगात जाण्यासारखेही काही करणार नाही. मात्र दररोज सकाळी प्रभात-फेरी काढून कराड शहरात व संध्याकाळी शाळा संपल्यानंतर आसपासच्या खेड्यांत जाण्याचा माझा लोकशिक्षणाचा कार्यक्रम मी काही बंद करणार नाही."

गणपतरावांना ही चळवळ महत्त्वाची आहे, हे पटत होते आणि म्हणून त्यांनी मला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु मला सांगितले,
"तू हे करतो आहेस, हे आईला पसंत आहे काय? हे तिच्याशी तू बोलून घे."
मी तर या चळवळीसंबंधाने माझ्या आईशी दररोजच बोलत होतो.

"तुझे शिक्षण बुडेल, ही मला चिंता आहे." असे आईने मला जरूर म्हटले होते. परंतु मी जे करतो आहे, त्यापासून मागे वळविण्याचा तिने प्रयत्न मात्र केला नाही. तिने सांगितले,

"महात्मा गांधींचे काम करतो आहेस, तुला नको कसे म्हणू मी? पण तुझा थोरला भाऊ सरकारी नोकरीत आहे. तो नाराज होणार नाही, याची काळजी घे."

तिचे म्हणणे खरे होते. माझे थोरले बंधू जे सरकारी नोकरीत होते, त्यांना माझे हे राजकीय काम बिलकूल पसंत नव्हते. त्यांनी एकदा मला स्पष्ट बोलूनच दाखविले होतेः "तुझ्या या उद्योगामुळे केव्हा तरी माझी नोकरी जाणार नि आपण सर्वजण उघडे पडणार."

पण मी त्यांच्या बोलण्याची फारशी काळजी केली नाही आणि माझे काम मी तसेच चालू ठेवले.

ह्या वेळेपर्यंत चळवळीच्या वातावरणाने, नुसते कराडच नव्हे, तर पुरा कृष्णाकाठ भारून गेला होता. गावोगावी सभा होत. बाहेरचे मोठे मोठे कार्यकर्ते सभेसाठी येत, तिरंगी झेंड्याच्या मिरवणुका निघत. आता ही चळवळ काही शहरापुरती मर्यादित राहिली नव्हती. मी कराड तालुक्यातल्या गावागावांमध्ये माहीत झालो होतो. मला लोक बोलवीत असत. सभेमध्ये मी ब-यापैकी बोलत असे. त्यामुळे माझे कौतुक होत असे.

कराड शहरामध्ये नित्यनियमाने सकाळी प्रभात-फेरी काढण्याचे काम मी तसेच चालू ठेवले होते. आणि एक दिवस प्रभात-फेरीचे काम करणा-या आम्हां दहा-पंधरा मंडळींवर खटल्याचे समन्स लागले. आणि कोर्टाचे निमंत्रण आले. आम्हांला आमच्या गावच्या वकील मंडळींनी सल्ला दिला, की ही प्रभात-फेरीची केस आपण कोर्टात लढवली पाहिजे. आणि त्याप्रमाणे आम्ही कायदेशीररीत्या ती केस कोर्टात लढवावी, अशा निर्णयाला आलो. त्यावेळी कराडचे एक काँग्रेसभक्त वकील श्री. वामनराव फडके यांनी आमचे वकीलपत्र घेतले. आणि ही केस सुरू झाली. मोठी

मजेदार केस होती. वामनराव मोठ्या विनोदी भाषेत सरकारी साक्षीदारांच्या साक्षी घेत असत. पुण्याच्या दैनिक 'ज्ञानप्रकाश'मध्ये मी या प्रभात-फेरीच्या खटल्याचा सविस्तर वृतांत प्रसिद्धीसाठी पाठवत असे. वर्तमानपत्रात त्याचे वृत्तांत आले, की पोलिस चौकशी करीत असत, की या सर्व बातम्या देतो कोण? पण त्यांना हे माहीत नव्हते, की चळवळ सुरू झाल्यापासून महत्त्वाच्या राजकीय चळळीची बातमी द्यायचे काम एक बातमीदार म्हणून 'ज्ञानप्रकाश' च्या संपादकांशी मीच पत्रव्यवहार करीत होतो. १९३१ च्या मध्यापर्यंत जवळजवळ वर्ष, दीड वर्ष वृत्तपत्र-बातमीदार म्हणून मी 'ज्ञानप्रकाश' च्या ऑफिसशी संपर्क ठेवला होता. मी लिहिलेली अनेक बातमीपत्रे 'ज्ञानप्रकाश' मधून प्रसिद्ध झाली होती. मी काही त्यांचा अधिकृत बातमीदार नव्हतो, त्यामुळे ते 'एका बातमीदाराकडून' असे त्या वृत्तावर लिहीत आणि तो प्रसिद्ध करीत. हे सहज आठवले, म्हणून ही गोष्ट आज मी प्रथमच बोलतो आहे.

प्रभात-फेरीची केस चालू असतानाच काहीतरी निमित्ताने पोलिसांनी मला बोलवून पोलिस कस्टडीत ठेवून दिले. आणि 'तुझ्यावर केस भरणार आहोत. चौकशी करतो आहोत', अशा तऱ्हेच्या गोष्टी त्यांनी मला सांगितल्या. पुढे नक्की काय झाले, मला माहीत नाही. परंतु त्यांनी मला काही न करता सोडून दिले.

मी माझा प्रभात-फेरी काढण्याचा व बाहेरगावी सभेला जाण्याचा कार्यक्रम सुरूच ठेवला. कराड तालुक्यात या वेळी या चळवळीला दोन-तीन केंद्रे बनली होती. मसूर, इंदोली आणि तांबवे. या ठिकाणचे प्रमुख कार्यकर्ते म्हणजे मसूरचे राघूआण्णा लिमये, डॉक्टर फाटक, विष्णुमास्तर निगडीकर, सीतारामपंत गरूड, त्याचप्रमाणे इंदोलीचे दिनकरराव निकम आणि त्यांचे साथी. तर तांबव्याला आमचे मित्र काशिनाथपंत देशमुख यांनी आपल्याभोवती कार्यकर्त्यांचा एक मोठा संच उभा केला होता. आणि जंगल-सत्याग्रहाचा एक मोठा कार्यक्रमही घडवून आणला होता. तेथली काही मंडळी जेलमध्येही गेली होती.

तांबव्यामध्ये मला लोकांच्या उठावाचे एक नमुनेदार चित्र पाहायला मिळाले. काशिनाथपंतांची जनतेपुढे होणारी भाषणे मी ऐकली. त्यांमध्ये गांधींच्यावर असणारी त्यांची भक्ती, अहिंसेवरचा त्यांचा विश्वास, विधायक पद्धतीने देश बांधण्याच्या कार्यक्रमाची मनाची तयारी; त्यामुळे ते लोकांवर मोठा परिणाम करीत असत. तांबवे आणि आसपासच्या भागांतील लोकांचे काशिनाथपंत देशमुखांवर फार मोठे प्रेम होते. त्यांचा नेहमीचा व्यवसाय व्यापार होता. कराडच्या बाजारपेठेत त्यांचे दलालीचे दुकान होते. जनतेतून नेता निर्माण कसा होतो, हे मी प्रत्यक्ष या निमित्ताने पाहिले आहे. काशिनाथशेटजींनी माझ्यावर प्राथमिक कार्यकर्त्याच्या अवस्थेपासून फार प्रेम व कौतुक केले. मला आपल्या भागामध्ये नेऊन जनआंदोलनाच्या प्रक्रियांचे शिक्षण दिले.

हे जसे तांबव्यामध्ये घडले, तसेच इंदोली आणि मसूरमध्येही घडत होते. मसूरचे राघूआण्णा लिमये हे तर माझे कायमचे मित्र बनले. प्रथमतः त्यांची माझी तशी ओळख नव्हती. पण एके दिवशी कराडच्या घाटावरच्या सभेत हा तरुण मुलगा चिठ्ठी पाठवून, 'मला बोलायचे आहे' असे सांगून भाषणासाठी उभा राहिला. आणि त्याने भाषण केले, ते इतके मुद्देसूद, विचार इतके स्पष्ट आणि स्वच्छ, बोलण्यामधली कळकळ आणि स्वातंत्र्याविषयीची तळमळ ही इतकी उत्कट होती, की त्या माणसाकडे मी झपाट्याने आकर्षित झालो. मी जाऊन त्यांना दुस-या दिवशी भेटलो आणि त्यांची ओळख करून घेतली. मी कराडमध्ये काम करीत होतो, हे त्यांनी पाहिले होते. चार-आठ दिवसांत मी, ज्या भागात आमचे घर होते, त्या भागात राघूआण्णांसाठी एका सभेचे आयोजन केले आणि प्रथम मी बोललो. माझे भाषण ऐकून राघूआण्णा माझ्या गळ्यातच पडले. अधिक भावनाप्रधान भाषण होते. त्यानंतर राघूआण्णांचेही भाषण झाले आणि ती सभा संपली. पण त्या दिवसापासून आमची दीर्घ मुदतीची मैत्री सुरू झाली.

राघूआण्णा पुढे १९६२ मध्ये मोटर अपघातात निधन पावले. त्या दरम्यानच्या

बत्तीस वर्षांमध्ये त्यांची माझी मैत्री अखंड राहिली. आम्ही दोघांनी कित्येक दिवस एकत्र जेलमध्ये काढले. त्याची हकीकत योगायोगाने पुढे येईल; पण इतका मनमोकळा, प्रेमळ, ग्रामीण जनतेशी शंभर टक्के एकरूप झालेला असा कार्यकर्ता मी कधीच पाहिला नाही. एक नमुनेदार कार्यकर्ता आणि जिव्हाळ्याचा मित्र म्हणून मला त्यांची नित्य आठवण राहील.

अशा तऱ्हेने चळवळ वाढत होती. माझी मित्रांची संख्याही वाढत होती. नवी जिव्हाळ्याची नाती निर्माण होत होती. आणि या सर्व मंतरलेल्या वातावरणात मी कसा बुडून गेलो होतो. या कार्यकर्त्यांपैकी काही लोक माझ्या घरी येत. माझ्या आईशी त्यांच्या ओळखी झाल्या. त्यांपैकी काशिनाथपंत आणि राघूआण्णा या दोन्ही कार्यकर्त्यांवर माझी आई आपल्या मुलासारखेच प्रेम करी. तेही तिला आईच म्हणत. यामुळे आमच्या चळवळीतील कार्यकर्त्यांशी माझी आई आणि योगायोगाने आमचे घर समरस होत गेले. त्यामुळे मला घरची मोठी अडचण पडली नाही. गणपतराव जरी आपले काम करत होते, तरी त्यांची आम्हांला सहानुभूती होती. आणि एक प्रकारे त्यांना मी जे करतो आहे, त्याबद्दल अभिमान वाटत होता. लोकांमध्ये माझ्या वयाच्या मानाने मी बरीच मान्यता पावत होतो, हे पाहून त्यांना आनंदच होत असला पाहिजे, असे मला वाटते.

या चळवळीत अधिक संघटित असा उठाव झाला, तो बिळाशी हा शिराळे पेट्यातील वारणेच्या काठचा जो प्रसिद्ध भाग आहे, तेथे ख-या अर्थाने झाला. श्री. बाबूराव चरणकर आणि साथी गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली तेथल्या जवळजवळ चाळीस गावांतील पाटील मंडळींनी सरकारी नोकरीचे राजीनामे दिले. जंगल-सत्याग्रह फार मोठ्या प्रमाणावर झाला आणि एका अर्थाने त्या भागातील ब्रिटिश सरकारचा अंमल संपला, अशी परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांना त्या भागामध्ये मोकळ्या मनाने हिंडताही येईना. सरकारी प्रसिद्धीप्रमाणे 'बिळाशीचे बंड' असे त्याला नाव दिले गेले. ते काही सशस्त्र बंड नव्हते. लोकांनी शांततेचा अवलंब करून सरकारशी सहकार्य करायचे नाही, असे ठरवले होते. ब्रिटिश राज्याचा जो कारभार चालत होता,

त्याची खुबी ही होती, की त्यांनी लोकांच्या मनात त्यांच्या सत्तेबद्दल एक प्रकारचे भय निर्माण केले होते. आणि  खेड्यापाड्यांतून पाटील, तलाठी आणि पोलिस यांच्या सहकार्याने त्यांनी आपल्या राज्याचा डोलारा उभा केला होता. बिळाशी परिसरातील त्या चाळीस-पन्नास गावांत राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने एक वेगळेच वातावरण निर्माण झाले. पाटील-तलाठ्यांना लोकांचे सहकार्य मिळेना, म्हणून त्यांनी राजीनामे दिले होते.

आम्हां चळवळीत काम करणाऱ्यांनाही हे एक अनोखे चित्र होते. तलवारी शिवाय राज्य कसे मिळणार, असा जो प्रश्न विचारला जात होता, त्याला हे खास उत्तर होते, असे म्हटले, तरी चालेल. जनआंदोलनातून एकदा का ही नवी शक्ती निर्माण केली व सरकारला असलेल्या सहकार्याचा हात काढून घेतला, की राज्य कोलमडू शकते, हा तर गांधीजींच्या असहकाराचा मूलमंत्र होता, आणि त्याचे येथे प्रात्यक्षिक चालू होते. आमच्या जिल्ह्यामध्ये बिळाशी भागात घडलेल्या या प्रयोगाचा जनमानसावर फार मोठा प्रभाव पडला आणि कायदेभंगाच्या चळवळीला उत्तेजनच मिळाले.

सरकारी प्रचारातून त्याला बंड हे नाव अशासाठी दिले गेले, की त्यामुळे तेथील जनतेवर अत्याचार करायला सरकारला पुढे सबब मिळावी. आणि शेवटी घडलेही तसेच. सातारा जिल्ह्याच्या बाहेरचे शेकडो पोलिस त्या भागामध्ये पाठविले गेले. गावागावांतून पोलिसांनी लोकांना दमदाटी देऊन भयभीत करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या घरांत शिरून त्यांना हाणामारी करण्याचाही उपद्व्याप केला. नाही म्हटले, तरी अशा संघटित पोलिस अत्याचाराचा लोकांच्या मनावर भीतिदायक परिणाम होतोच. ते तेथेही घडले. त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराची बातमी मात्र सरकारने प्रसिद्ध होऊ दिली नाही. तेथले काही कार्यकर्ते अधूनमधून कराड-सातारला येत असत. त्यांच्याकडून ह्या हकीकती समजू लागल्या. श्री. चरणकर आणि त्यांचे सहकारी यांना पकडून तरूंगात ठेवून दिले होते. इतर भागाशी त्या लोकांचा संबंध

तोडला होता. त्यामुळे आमच्या जिल्ह्यातील पुढाऱ्यांच्या मनात त्या भागातील लोकांच्याविषयी चिंता निर्माण झाली.

महिना, पंधरा दिवस जाऊ दिल्यावर, यासंबंधी काही तरी केले पाहिजे, याचा विचार करण्यासाठी कराडला श्री. पांडूआण्णा शिराळकर यांच्या माडीवर निवडक कार्यकर्त्यांची बैठक झाली. सातारहून आलेल्या एका वकिलांनी बिळाशीच्या भागातील दडपशाहीची सर्व वस्तुस्थिती सांगून एक गंभीर चित्र उभे केले. तेथल्या लोकांना दिलासा देण्यासाठी व आपण त्यांच्याबरोबर आहोत, हे दाखविण्यासाठी कुणी तरी प्रत्यक्ष त्या भागात जाऊन आले पाहिजे, असे सुचवले. सूचना रास्त होती आणि त्याचा विचार कार्यकर्त्यांत सुरू झाला. त्यातून अशी कल्पना निघाली, की दोन तरुण कार्यकर्त्यांना त्या भागात पाठवावे आणि शक्य झाले, तर बिळाशीमध्ये त्यांनी एक सभा घ्यावी. कार्यकर्ते कोण असावेत, अशी जेव्हा चर्चा झाली, तेव्हा राघूआण्णा लिमये आणि मी अशी दोघांनी जायची तयारी दाखविली. आमच्या पुढाऱ्यांच्या पुढचा प्रश्न सुटला. आणि आमच्या भेटीचा तपशील आमचा आम्हीच ठरवून, काय झाले, त्याचा रिपोर्ट जिल्ह्याच्या वरिष्ठांना कळवावा, असा निर्णय झाला.

चार दिवसांच्या आत राघूआण्णा लिमये आणि मी बिळाशीच्या भागात जाण्यासाठी एका सकाळी निघालो. आम्हांला आमच्या प्रवासासाठी व इतर खर्चासाठी काही थोडे पैसे दिले होते. एक -दोन दिवस पुरेल एवढे खाण्याचे साहित्य जवळ घेऊन आम्ही निघालो होतो.

कराड ते पेठनाका हा प्रवास आम्ही सर्व्हिस मोटारने केला व तेथे उतरलो. नेहमीच्या रस्त्याने बिळाशीपर्यंत जाणे आम्हांला शक्य नव्हते. तेव्हा पेठपासून बिळाशी हा प्रवास आम्हांला मधल्या वाटेने करावा लागणार होता.

आम्ही कोण आहोत आणि कुठे चाललो आहोत, याची माहिती कुणालाही द्यायची

नव्हती. पण त्या भागातल्या काही कार्यकर्त्यांची नावे व त्यांना विश्वास पटेल, असा परवलीचा शब्द आमच्याजवळ दिला गेला होता. या सर्व शिदोरीवर आमची बिळाशीची यात्रा आम्ही करणार होतो. पेठपासून मधल्या आडरस्त्याने चार-दोन डोंगर ओलांडून बिळाशीला पोहोचायचे होते. त्याप्रमाणे आम्ही आमचा प्रवास सुरू केला. मधल्या वाटेने निदान तीस-पस्तीस मैलांचा हा प्रवास होता.

मला चालण्याची सवय चांगली होती. राघूआण्णा तर एकदम तगडा तरूण. आमच्या जोडीमध्ये ज्येष्ठ म्हणून तेच वरिष्ठ होते. या दोन माणसांच्या सेनेचे ते सेनापती होते, मी सैनिक होतो. ते सांगतील, त्याचप्रमाणे मी वागायचे, असे आमचे ठरले होते. आम्ही पेठहून दुपारी अकरा वाजता निघालो; पण संध्याकाळी वाटेत एका ठिकाणी मुक्काम करायचा ठरले. दिलेल्या माहितीप्रमाणे ओळखीच्या माणसाची गाठ घेतली व आमची निवासाची व्यवस्था झाली. खाण्यासाठी आमच्याजवळ आमचे साहित्य ठेवले होते. त्यामुळे आम्हांला कुणाजवळ काही मागावे लागले नाही.

दुस-या दिवशी पहाटेच उठून लवकर प्रवासाला सुरुवात केली आणि दिवसभर डोंगराचा चढउतार करत करत संध्याकाळच्या सुमारास बिळाशीचे जवळ, डोंगरच्या अलिकडच्या बाजूला असलेले मंगरूळ म्हणून गाव आहे, त्या गावाच्या सीमेपाशी आलो. अजून दिवस मावळायचा होता. म्हणून काही काळ रस्त्याच्या पायवाटेच्या बाजूला असलेल्या एका शेतात बसून वेळ काढला. अंधार पडल्यानंतर मंगरूळ गावात प्रवेश केला.

आम्हांला दिलेल्या सूचनेप्रमाणे तेथील श्री. देशपांडे नावाच्या जमीनदाराच्या घरी आम्हांला जायचे होते. दिवेलागणी झाल्यानंतर आम्ही चौकशी करत देशपांड्यांच्या घराकडे निघालो. परंतु जास्त चौकशी करणे धोक्याचे होते. गाव तर लहानसे. देशपांड्यांचा वाडा तसा ओळखण्यासारखा मोठा होता. आम्ही त्यांच्या दाराशी पोहोचलो. राघूआण्णांनी त्या दारावर टकटक करून आवाज दिला. बराच वेळ काही

उत्तर येईना. त्यामुळे आम्हांला थांबावे लागले. पुन्हा आवाज केला. तेव्हा दरवाज्यापाशी येऊन कोणी तरी आतून विचारले,
"कोण आहे ? "
राघूआण्णांनी त्यांना दिला होता, तो खुणेचा शब्द उच्चारला आणि -
"आम्ही सातारहून आलो आहोत." असे सांगितले.

तो खुणेचा शब्द ओळखून सावकाशीने दरवाजा उघडला गेला आणि मंद जळणारा कंदील हातात धरून उभे राहिलेले देशपांडे यांचे दर्शन आम्हांला झाले.

आम्ही दोघेही त्यांना नवखेच होतो. त्यांनी कंदील वर करून आमचे चेहरे न्याहाळले आणि त्यांची खात्री पटली, की आम्ही कोणी पोलिसांचे लोक नाही. त्यांच्या चेह-यावर हसू जमून आले. त्यांनी मोठ्या प्रेमाने 'आत या' म्हणून सांगितले. आम्ही दिवसभर असे थकून गेलो होतो, की त्यामुळे हे स्वागत मोठे उत्तेजनकारक वाटले. वाड्याच्या ओसरीवर जाऊन आम्ही बसलो, देशपांडे यांनी आमची व्यवस्था फार उत्तम ठेवली. त्यांच्या चालीरीतीप्रमाणे त्यांनी आम्हांला हातपाय धुवायला गरम पाणी आणून दिले आणि सांगितले,
"तुम्ही थोडे पडा. थोड्या वेळाने बोलत बसू."

आम्ही अर्धा एक तास विश्रांती घेतली आणि नंतर देशपांडे यांना आम्ही कोण, कशासाठी व का आलो, याची हकीकत सांगितली. त्यांनी ती शांतपणे ऐकून घेतली आणि आम्हांला सांगितले,
"तुम्ही एक रात्र थांबा, काय करायचे, ते मी तुम्हांला उद्या सकाळी सांगेन."

रात्री जेवणानंतर दिवसभराच्या थकव्यामुळे आम्हांला गाढ झोप आली. सकाळच्या प्रहरी उठल्यानंतर देशपांड्यांनी आम्हांला सांगितले,

"आज दिवसभर अधूनमधून या भागातील प्रमुख कार्यकर्ते एकटे दुकटे येऊन तुम्हांला भेटून जातील. तुम्ही त्यांना धीर द्या. चळवळीतील सगळ्यांचा पाठिंबा त्यांच्या पाठीमागे आहे, असे त्यांना आश्वासन द्या. निदान दहा-वीस गावची माणसे तुम्हांला भेटून जातील. सायंकाळी मात्र येथून मुक्काम हलवा, मंगरूळचा डोंगर ओलांडून पलीकडे गेले म्हणजे ताबडतोब बिळाशी लागते. तेथे जाऊन, जाहीर घोषणा देऊन, छोटीशी सभा भरवता येते का, पाहायचे. मात्र हे सर्व तुमच्यावर अवलंबून आहे. तेथे तुमची सभा व्हावी, अशी थोडीफार मदत मी करेन. पण तेथे प्रत्यक्ष सभा कशी करायची, हे तुमच्या हुशारीवर अवलंबून आहे. त्या गावात पोलिसांचा कडक पहारा आहे. चळवळ्यांच्यावरती त्यांची नजर राखून असते. तेव्हा सभा होणे काहीसे कठीण आहे. शक्यता जास्त ही आहे, की तुम्ही कदाचित बिळाशीमध्ये पकडले जाल."

आमची सर्व गोष्टींची तयारी होती. त्यामुळे आम्ही याला होकार दिला.

ठरल्याप्रमाणे तास, अर्धा तासांच्या अंतराने निरनिराळ्या गावची शेतकरी मंडळी, दोन तीन-दोन तीनच्या तुकडीने येऊन आम्हांला भेटू लागली. लोकांवर झालेल्या अत्याचारामुळे ती माणसे चिडलेली होती; पण घाबरलेली नव्हती, हे पाहून आम्हांला फार हुरूप आला. जनतेची चळवळ उभी करायची, म्हणजे तिला निर्भय करावे लागते आणि ही चिवट माणसे पाहून आम्हांला इतिहास-काळातील मावळ्यांची आठवण झाली. शिवाजी महाराजांच्या काळातील या डोंगराळ भागातील लोक असेच लढले असतील, असे चित्र माझ्या डोळ्यांपुढे येऊन गेले आणि त्या लोकांच्याबद्दल आदर वाटला. निदान दहा गावची माणसे आम्हांला भेटून गेली. आम्ही त्यांना आश्वासन देत होतो,

"तुमच्या संकटाची जिल्ह्याला व राज्याला कल्पना आहे. तुमच्या बिळाशीचे नाव सर्व राज्यभर प्रख्यात झाले आहे. सर्व जनतेला तुमच्याबद्दल आदर आहे. तुम्ही एकाकी आहात, असे वाटून घेऊ नका. तुमची निर्भयता कायम ठेवा. आणि या वातावरणात कोठे ढिलाई होईल, अशी गोष्ट होऊ देऊ नका."

पोलिसांच्या अत्याचाराबद्दल या लोकांना चीड होती.

आम्ही त्यांना समजावीत होतो,
"गांधीजींनी अहिंसेचा मार्ग सांगितला आहे. याला निर्भयतेने आणि धीराने तोंड द्यायला पाहिजे."

बरीच काही प्रश्नोत्तरे, चर्चा होत होती. परिणामी एक विश्वासाचे आणि धीराचे वातावरण आम्ही या मंडळींमध्ये निर्माण करू शकलो. किंबहुना त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून आम्ही त्या दिवशीच संध्याकाळी बिळाशीला धीटपणाने जावे, असे आम्हांला तीव्रतेने वाटू लागले. हे लोक येथे इतक्या संकटात राहत असताना निदान आम्ही तुमच्याबरोबर आहोत, हे आम्ही जाहीर रीतीने प्रगट केले पाहिजे, असे आम्हांला वाटत होते.

संध्याकाळ झाली. दिवेलागणी झाली आणि देशपांडे यांचा निरोप घेऊन आम्ही त्यांचा वाडा सोडला. डोंगर ओलांडून बिळाशीच्या हद्दीत शिरायला पाऊण तासाचा वेळ होता. आमच्या हातात आमची एकेक पिशवी होती. बिळाशीपर्यंत रस्ता दाखविण्यासाठी आमच्याबरोबर एक मार्गदर्शक तरुण मुलगा देशपांडे यांनी दिला होता. त्याच्याबरोबर आम्ही आमचा प्रवास सुरू केला. गावात प्रवेश केला, तेव्हा सगळीकडे अंधार व नीरव शांतता होती. रातकिड्यांची किरकिर मात्र ऐकू येत होती. आम्ही गावाच्या जवळपास जातो, न जातो, तोच एक मोठी शीळ ऐकू आली. आम्हांला वाटले, पोलिसांना आमच्या येण्याची बातमी लागली असावी. पण आमच्या बरोबरच्या त्या तरुणाने सांगितले,
"काळजी करू नका. ही पोलिसांची शीळ नाही. ही आपल्या माणसांनी लोकांना दिलेली सूचना आहे."

मला त्यांच्या संघटना-चातुर्याचे मोठे आश्चर्य वाटले. आम्ही तसेच पुढे गावात गेलो. तेथे एक जाणते म्हातारे गृहस्थ आम्हांला भेटले. त्यांनी सांगितले,
"येथे पारावर बसा आणि काही काळजी करू नका. पोलिसांची मी व्यवस्था करून आलो आहे. थोड्याच वेळात येथे पाच-पन्नास माणसे जमतील. त्यांच्या पुढे तुमची सभा करा आणि मग तुमच्याबरोबर एक माणूस येईल. त्याच्यासोबत गावातून बाहेर पडा. तेथून पुढे कोठे व कसे जायचे, ते मात्र तुमचे तुम्ही ठरवा."

म्हातारा इतक्या आत्मविश्वासाने बोलत होता, की मला तर नवलच वाटले. त्याने सांगितले, त्याप्रमाणे आम्ही या पारावर बसलो. आजूबाजूच्या घरांतून एकेक माणूस तेथे येऊ लागला. आम्ही आमच्या पिशवीतील झेंडे काढले आणि लोकांच्या हातांतील काठ्या मागवून घेऊन त्यांवर ते बांधले आणि फडकावले. महात्मा गांधींच्या नावाने जयजयकार केला. भारतमातेचा जयजयकार केला. जमलेल्या लोकांच्या पुढे भाषणे दिली. त्यांत त्यांचा सन्मान केला.

"स्वातंत्र्यासाठी असहकाराची चळवळ कशी चालवावी, याचे आदर्श उदाहरण तुमच्या बिळाशीने घालून दिले आहे. तुमच्याबरोबर जिल्ह्यातील आणि राज्यातील इतर सर्व जनता आहे, हे सांगण्यासाठी आम्हांला पाठविले आहे. तुम्ही एकाकी नाही आहात."

जिल्ह्यामध्ये इतरत्र चळवळ कशी चालली आहे, याचीही माहिती त्यांनी दिली.

प्रत्येकी दहा-पंधरा मिनिटांची आमची भाषणे झाली आणि आमची सभा संपली. तेवढ्यात ज्या म्हातारबुवाने आम्हांला बोलावले होते, ते तेथे आले.

राघूआण्णांनी म्हाता-याला विचारले,
"येथे पोलिस पार्टी आहे, असे आम्हांला सांगितले होते; पण पोलीस तर कुठे दिसले नाहीत."

त्याने सांगितले,
"येथे आहेत जरूर, पण त्यांची मी व्यवस्था करून आलो, म्हटले ना ?  ते चिक्कार दारू पिऊन पडून राहिले आहेत. त्यांना येथे काय चालले आहे, हे माहीत सुद्धा नाही. तुमची सभा नीट झाली ना ? आता हे पोर बरोबर घ्या आणि तो दाखविल, त्या रस्त्याने बाहेर पडा. मात्र रात्रीच वारणा ओलांडून पलीकडे जा, मग कुठे तरी थांबा. मात्र तोपर्यंत थांबू नका." असा त्यांनी सल्ला दिला व सोबतीला एक मुलगा दिला.

या तरुणाला बरोबर घेऊन, तो दाखवील, त्या रस्त्याने गावाच्या बाहेर पडलो आणि शेतातील पायवाटेने पुढे चालू लागलो.

आम्ही पुढे कुठे जाणार, याची आम्हांला काहीच कल्पना नव्हती. तास, दोन तास वाटचाल केल्यावर आम्हांला वारणा नदी लागली. तो मुलगा माहीतगार असल्याने त्याने आम्हांला नदीच्या उतारावर नेऊन पोहोचविले आणि सांगितले,
"येथे नदी ओलांडून पलीकडे गेले, की कोल्हापूर संस्थानाची हद्द लागते. तेथे आम्ही निरोप पाठविला आहे. कोणी तरी तुमच्या मदतील येईल."

त्याप्रमाणे त्या रात्री गुडघ्याच्यावर असलेल्या पाण्यातून वाट काढत आम्ही नदी ओलांडली. रात्रीची वेळ, अनोळखी ठिकाण, निश्चित कुठे जायचे, याची कल्पना नसल्यामुळे वाटणारी अस्वस्थता, अशा परिस्थितीत आम्ही प्रवास करत होतो. पण आमच्यावर सोपविलेली कामगिरी आम्ही इतक्या सहजपणाने पुरी करू शकलो, याचा आंनद आणि आश्चर्य मनामध्ये होते.
नदीच्या पलीकडे गेल्यावर एक गाव लागले. आज मला त्या गावाचे नाव आठवत नाही. गावात प्रवेश करताच आम्हांला एक गृहस्थ भेटले आणि त्यांनी सांगितले,
"तुम्ही थकला असाल, तुम्हांला खायला दोन भाकरी आणून देतो. त्या तुम्ही खा व देवळात जाऊन झोपा."

आम्हांला याचीच जरूरी होती. त्याने भाकरी, चटणी आणि कांदा आणून दिला. ते खाऊन आम्ही देवळात झोपी गेलो. गेल्या दोन दिवसांच्या प्रवासाचा व अनुभवाचा विचार करताना मनात हर्ष होत होता. या साहसी जीवनात एक नाट्य होते, रोमांचकारीअनुभव होते. पकडले जाऊन तुरुंगात जाण्याची शक्यता पण होती. पण ती टळली असल्यामुळे मनामध्ये एक नवी उमेद निर्माण झाली. अशा प्रकारचे विचार करत झोपी गेलो.

सकाळी उठून पुढच्या प्रवासाची दिशा आम्ही आखू लागलो. जो कार्यकर्ता आम्हांला रात्री भेटला होता, तो आला, तेव्हा तेथून जवळपास कसे, कुठे जायचे, याची आम्ही थोडी-फार चौकशी केली. तेव्हा त्याने सांगितले, की कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावर मलकापूर नावाचे गाव थोड्या अंतरावर आहे. तास, दोन तासांच्या रस्त्यावर आहे. आम्ही तिकडे जाण्याचे ठरविले. त्या मुलाला त्या गावाकडे जाणारा रस्ता दाखविण्यास सांगितले. वाटेत आम्ही त्याच्याशी इकडच्या-तिकडच्या गप्पागोष्टी केल्या. आम्ही कोण होतो, याची त्याला थोडीफार कल्पना होती. तरी सुद्धा तो आम्हांला सांगू लागला, काल रात्री बिळाशीत फार मोठी सभा झाली आणि मग अशा प्रसंगी जी अतिशयोक्तिपूर्ण वर्णने येतात, तशी तो करू लागला. मला मनातून गंमत वाटत होती.

त्याने दाखविलेल्या रस्त्यावरून आम्ही प्रवास करून दीड-दोन तासांत मलकापूरला पोहोचलो. मलकापूर हे कोल्हापूर जिल्हयातील प्रसिद्ध गाव आहे. माझ्या कल्पनेने त्यावेळी ते एखाद्या छोट्या संस्थानिकाचे कारभाराचे केन्द्र होते. त्यामुळे तेथे व्यापार-उदीम बराचसा होता. ब-यापैकी बाजारपेठ होती. तिला लागूनच मोटार-स्टँडचे पटांगण आणि त्याच्या अवती-भोवती काही छोट्या छोट्या हॉटेल्स्ची गर्दी हे नेहमी दिसणारे दृश्य तेथेही दिसले. तसल्या एका हॉटेलात आम्ही सकाळची न्याहारी केली. आमच्याजवळचे खाण्याचे पदार्थ संपलेले होते आणि आम्हांला खूप भूक लागली होती. खिशात थोडे-फार पैसे होते. त्यामुळे खाण्यासारखे-साधारणतः

आवडीचे जे जे पदार्थ दिसले, ते आम्ही थोडे-फार मागविले. त्यानंतर पुढचा दिवस कसा काढायचा, याचा विचार आम्ही करू लागलो. राघूआण्णांनी विचारले,

"आपण आता कोठे जायचे ?"

- आणि तेच पुढे म्हणाले,

"कोल्हापूर मार्गे परत कराडला किंवा मलकापूरहून सरळ खाली कोकणात."

मी म्हटले,

"कोकणात जाऊन काय करणार ?"

त्यांनी सांगितले,

"येथून घाट ओलांडला, की साखरपे म्हणून गाव लागते, तो लहानसा मोटारींचा अड्डा आहे. त्याच्या शेजारी आमचे लिमयांचे मूळ गाव आहे. तेथे जाऊन लिमयांपैकी कोणी आहे का, ते पाहू. त्यांना भेटून पुढे रत्नागिरीला जावे, असा माझा बेत आहे."

त्यांनी रत्नागिरीचे नाव काढताच मी प्रसन्न झालो.

त्यांनी विचारले,

"रत्नागिरीला जायला तू इतका उत्सुक का ?"

मी म्हणालो,

"त्याला दोन कारणे आहेत. मी अजून समुद्र पाहिलेला नाही. समुद्र कसा दिसतो, त्याच्या काठी उभे राहिले, म्हणजे कसे वाटते, हे मला माहीत नाही. कृष्णा-कोयनेच्या पावसाळी पुराच्या वेळी काठावर उभे राहून त्यांचा भर वेगाने वाहणारा, तुडुंब भरलेला, दोन्ही तटांना धरून चालणारा विशाल प्रवाह मी अनेक वर्षे पाहिला आहे. पण समुद्र ही गोष्ट अगदीच वेगळी आहे. पण ती काय आहे, याची कल्पना पुस्तकावरून आम्ही करतो. पण प्रत्यक्षात मी तो पाहिलेला नाही. रत्नागिरीला गेलो, की समुद्र पाहायला मिळेल ही माझी अपेक्षा आहे, आणि दुसरे कारण रत्नागिरीला सावरकर राहतात. जर आपण काही करून सावरकरांना भेटू शकलो, तर बरे होईल. त्यांना पाहण्याची माझी फार इच्छा आहे."

राघूआण्णांना माझा समुद्राविषयीचा आग्रह पटला नाही, पण सावरकरांचा मुद्दा त्यांच्या मनाने ताबडतोब उचलून घेतला, आणि कराडला परत न जाता खाली कोकणात जाण्याचा आमचा निर्णय पक्का झाला.

तास, अर्ध्या तासात रत्नागिरीला जाणारी मोटर कोल्हापूरहून आली. तीमध्ये आम्ही बसलो आणि माझा कोकणचा पहिला प्रवास सुरू झाला. मलकापूर सोडून काही मैल पुढे गेल्यानंतर सह्याद्रीचा घाट लागतो. एवढ्या मोठ्या घाटातून मी यापूर्वी प्रवास केलेला नव्हता. मी पुण्यापर्यंत जाऊन आलो असल्यामुळे पुण्याच्या वाटेतील घाट मला माहीत होते. पण हा बराच लांब व अवघड घाट आहे. मोटार घाटातून जात असताना एकसारखे वळसे घ्यावे लागत असल्यामुळे माझे पोट काहीसे डचमळून व हादरून गेले होते. पण अगदीच ताब्याच्या बाहेर गेले नाही.
घाट संपल्यावर थोड्याच वेळात गाडी साखरप्याला थांबली.

आम्ही साखरप्याला उतरलो. माझ्या माहितीचे तेथे कोणीच नव्हते. राघू आण्णा तसा धीट आणि सगळ्यांशी मोकळा बोलणारा माणूस होता. त्यांनी लिमयांचे जे गाव होते (त्याचे नाव मी आता विसरलो आहे.), त्या गावाचा रस्ता कुणाला तरी विचारला आणि तो समजल्यानंतर त्या दिशेने आमची पुन्हा पायपीट सुरू झाली. लिमयांच्या मूळ गावी राघूआण्णाही प्रथमच आले होते. तसे लिमये मसूरमध्ये गेल्या तीन-चार पिढ्या राहिले होते. पण आपल्या पूर्वजांचे मूळ गाव पाहावे, ही माणसाची आंतरिक इच्छा असते. ती इतकी तीव्र असते, की त्या ओढीने माणूस बेचैन होतो. त्याच ओढीने राघूआण्णा तेथे आले होते. त्यांना मी विचारले,
"तुमचे घर-बीर येथे आहे का? "
ते म्हणाले,
"अरे, कुठले घर? आमच्या घरातल्या वडीलधा-या लोकांकडून आमचे हे मूळ गाव समजले व आम्ही मूळचे येथले, असे मी एकले आहे. तेव्हा वाटले, की लिमयांचे हे मूळ ठिकाण पाहावे."

मी म्हटले,
"आता येथे तुमच्यापैकी कोणी लिमये उरले आहेत, की काय, हे तरी तुम्हांला माहीत आहे काय?"
ते म्हणाले,
"होय. आमच्या मूळ घराण्यापैकी कोणाची तरी एक-दोन घरे येथे आहेत. त्यांची माहिती काढून, ते भेटतात का, पाहू या ! "

- आणि त्या गावात पोहोचल्यानंतर आम्ही पुन्हा लिमयांची चौकशी केली. आणि अखेर त्यांची भेट झाली. राघूआण्णांनी आपली स्वतःची सविस्तर माहिती त्यांना दिली. त्या मंडळींनी फारसे अगत्य किंवा उत्साह दाखविला नाही; पण अगदीच टाकल्यासारखेही केले नाही.

मी राघुआण्णांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले.
ते म्हणाले,
"आम्हां कोकणस्थांचा हा मूळ स्वभाव आहे. देशावर तीन-चार पिढ्या गेल्यामुळे मी देशस्थच झालो आहे; पण माझ्यावरून तू येथल्या मंडळींची कल्पना करू नकोस."

राघूआण्णांच्या बरोबर आम्ही गाव फिरून पाहिले, लिमयांच्या पूर्वीच्या ज्या खोतीच्या जमिनी होत्या, तिकडे चक्कर मारून आलो. आणि दुपारच्या जेवणासाठी राघूआण्णांच्या त्या दूरच्या नातेवाइकांच्या घरी आम्ही पोहोचलो. राघूआण्णांनी माझ्याबद्दल आधीच सांगून ठेवले होते, की मी मराठा आहे. तेव्हा त्यांच्या घरात सोप्यात माझ्यासाठी जेवणाची वेगळी व्यवस्था केली होती. आणि त्या मंडळींची आत स्वतंत्र व्यवस्था होती. हा प्रकार पाहून राघूआण्णा काहीसे ओशाळले. त्यांनी आपल्या लिमये नातेवाइकांना सांगितले.
"तुम्ही आत जेवा, मी आणि यशवंत बाहेरच जेवायला बसू."

त्या मंडळींना लिमयांचे बोलणे ऐकून कसेसेच वाटले. पण आता आम्ही त्यांच्या घरीच आलो होतो. त्यामुळे त्यांचा उपाय नव्हता. आम्ही दोघेही बाहेर बसून जेवलो. एक वेळ माझ्या मनात येऊन गेले, की मी या घरात आलो नसतो, तर बरे झाले असते. पण राघूआण्णांनी कशीबशी वेळ मारून नेली.

जेवण झाल्यावर ते गाव सोडून परत साखरप्याला पोहोचलो. तेथून पुढे रत्नागिरीला जायचे ठरले होते. राघूआण्णांनी लिमयांपैकी कोणी रत्नागिरीला आहे काय, याची आधी चौकशी करून घेतली होती आणि त्यांना तशी माहिती मिळालीही होती.

रत्नागिरीला पोहोचल्यानंतर ज्या लिमयांची चौकशी राघूआण्णा आणि मी करत होतो, त्यांच्या घरी गेलो. मला स्वतःला तिथले काहीच माहीत नसल्यामुळे राघूआण्णांच्या पाठोपाठ जाण्याशिवाय माझ्यापुढे दुसरा मार्गच नव्हता. याही लिमयांच्या घरी तसाच अनुभव येणार काय, या चिंतेने मी काळजीत होतो. म्हणून राघूआण्णांना मी सांगितले,
"राघूआण्णा, माझ्यामुळे तुम्ही अडचणीत पडू नका. येथे एखाद्या खानावळीत माझी जेवणाची स्वतंत्र व्यवस्था करा. तुमची अडचण होऊ देऊ नका."
ते म्हणाले,
"खरे, रे. पण आपल्याला रत्नागिरीत राहून सावरकरांना भेटायचे आहे ना ? मग कुठे तरी राहण्याची व्यवस्था केलीच पाहिजे. म्हणून मी माझ्या नातेवाइकांची चौकशी करून राहिलो आहे."

- आणि चौकशीअंती त्यांचा नातेवाईक सापडला. सुदैवाने हा त्यांचा नातेवाईक नव्या मनूतला होता. त्याने राघूआण्णांचे जितक्या प्रेमाने स्वागत केले, तितक्याच प्रेमाने माझेही स्वागत केले. त्यामुळे रत्नागिरीच्या या लिमयांच्या घरी आम्ही दोन दिवस मोठ्या मोकळेपणाने राहू शकलो.

आमच्या रत्नागिरीच्या भेटीचा उद्देश पुरा करण्यासाठी म्हणून पहिले काही काम केले असेल, तर ते म्हणजे राघूआण्णांना घेऊन रत्नागिरी शहर आणि रत्नागिरीचा समुद्रकिनारा पाहायला गेलो. मि-या बंदराच्या बाजूला जाऊन समुद्र पाहिला, तर चांगले दृश्य पाहायला सापडेल, असे आम्हांला एका स्थानिक इसमाने सांगितले.

बराच वेळ चालत राहिलो आणि....
मी एकदम लख्खदिशी समुद्र पाहिला.

मन हरखून गेले, प्रसन्न झाले. त्याचा केवढा अवाढव्य विस्तार होता ! सकाळच्या प्रहरी शांत वातावरणात समुद्र पाहिला, त्यामुळे त्याचे विशाल रूप कार्तिक-मार्गशीर्ष महिन्यात दिसणा-या निळ्याभोर आकाशासारखे वाटले.

किती तरी वेळ मी आणि राघूआण्णा तेथे सागरतीरी बसून होतो. तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. लाटांची धीरगंभीर गाज वातावरणात भरून राहिली होती. समुद्रावरून नजर काढावीशी वाटत नव्हती.

माझ्या आयुष्यात मी पाहिलेला हा पहिला समुद्र.

समुद्र पाहत बराच वेळ तेथे काढल्यानंतर आम्ही परतलो.

घरी आल्यानंतर राघूआण्णा म्हणाले,
"सावरकरांना भेटण्याची काही व्यवस्था होते काय, पाहून येतो."

आम्ही ज्या लिमयांच्या घरी उतरलो होतो, त्यांची सावरकरांशी जवळची ओळख होती. त्यांनी मुलाखत ठरवून घेतो, असे सांगितले.

राघूआण्णा परत आले. दुस-या दिवशी सकाळची दहाची वेळ ठरली होती. काय योगायोग आहे ! स्वांतत्र्यवीर सावरकरांच्या साहसी व्यक्तिमत्त्वासंबंधी आम्ही कित्येक गोष्टी ऐकल्या होत्या , वाचल्या होत्या. 'श्रद्धानंद' मध्ये प्रसिद्ध होत असलेली त्यांची 'माझी जन्मठेप' ही काळ्या पाण्याच्या शिक्षेची आत्मकहाणी मी अधून मधून वाचली होती. स्वातंत्र्यासाठी बेहोशीने आपले जीवन उधळून टाकणा-या त्या सावरकरांच्या मूर्तीला आपण केव्हा पाहतो, असे होऊन गेले होते.

दुस-या दिवशी सकाळी दहा वाजता आम्ही त्यांच्या घराशी गेलो. एक जिना चढून वर गेलो. आम्हांला एका मध्यमशा खोलीत, चार खुर्च्या होत्या, तेथे बसविण्यात आले. आत सावरकरांना कोणी तरी भेटायला आले होते. त्यांच्याशी ते बोलत होते. त्यांचा आवाज कानांवर येत होता. ती माणसे उठून गेल्यानंतर आम्हांला भेटण्यासाठी ते बाहेर आले. आम्ही उठून त्यांना नमस्कार केला.

मध्यम उंचीचे, काहीसे किरकोळ बांध्याचे, डोळ्यावर चश्मा आणि त्या पलिकडून पाहणारी त्यांची भेदक नजर अशी ती मूर्ती समोर आली. अंगात स्वच्छ पांढरा सदरा आणि तितकेच स्वच्छ पांढरे सैलसे धोतर, पायांत साध्या वहाणा अशा या घरगुती वेषात ते होते.

त्यांनी आमचे कुशल विचारले, आमची नावे विचारली. मी अजून हायस्कूलमध्ये शिकणारा विद्यार्थी आहे, हे ऐकून त्यांनी कौतुकाने विचारले,
"एवढा लांब प्रवास कशासाठी केला, बाळ?"

मग राघू आण्णांनी आम्ही मिठाच्या सत्याग्रहातील काँग्रेसचे कार्यकर्ते आहोत, अशी माहिती दिली. बिळाशीच्या बंडाची हकीकत त्यांना सांगितली. आणि तेथे नुकतेच जाऊन आलो, तीही हकीकत सांगितली. तेव्हा सावरकरांच्या त्या तेजस्वी डोळ्यांत काहीसे हसू दिसले.

"मोठेच पराक्रमी दिसता तुम्ही!" खळखळून हसत ते म्हणाले,

थोड्या वेळाने ते म्हणाले,
" तुम्हांला मला काही विचारावयाचे आहे काय ? "

मी सांगितले,
"निदान मला काही विचारावयाचे नाही. मला फक्त आपणांस डोळे भरून पाहायचे होते."

ते उठून माझ्याजवळ आले.
"माझ्यात बघण्यासारखे काय आहे? मी तुमच्यासारखाच माणूस. तुमच्या आधी काही वर्षे जन्माला आलो. देशसेवेचे व्रत घेतले आणि बलिदानाची प्रतिज्ञा करून कामाला लागलो. यात विशेष असे काय आहे ? आमच्या पिढीने त्यांना जे योग्य वाटले, ते करायचा प्रयत्न केला. आता तुमची नवी पिढी काय करते, ते पाहायचे आहे."

- आणि नंतर ते गंभीर होऊन खाली बसले.
त्यांना आठवण झाली नासिकच्या अनंत कान्हेरेची.
ते म्हणाले,
"तुम्ही मंडळी नेहमी मोठ्या संख्येने चांगले काम करता आहात. परंतु स्वातंत्र्य-आंदोलनासाठी जेव्हा कोणीच अवतीभोवती तयार होत नव्हते, तेव्हा एकाकीपणाने आम्ही हे राष्ट्रकार्य करीत होतो. त्यांतले अनंत कान्हेरे फासावर गेले. हल्लीचे तुम्ही लोक त्या बलिदानाला विसरला आहात, अशी मला उगीच हळहळ वाटते."

राघूआण्णांनी सांगितले,

"आम्ही कसे विसरू? आपल्याकडूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी बलिदान केले, म्हणूनच आपले दर्शन घ्यायला आम्ही आलो आहोत."

सावरकरांना बरे वाटले.
नंतर त्यांनी आमचे इतर कुशल विचारले व आम्हांला सदिच्छा दिल्या.
त्यांचा निरोप घेऊन आम्ही त्या घराबाहेर पडलो.

सागर आणि सावरकर हे रत्नागिरीत एकाच वेळी पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे रत्नागिरीची माझी आठवण ह्या भेटीशी कायमची संलग्न झालेली आहे.

दुस-या दिवशी आम्ही चिपळूणमार्गे कराडला पोहोचलो. राघूआण्णांनी जिल्ह्याच्या वरिष्ठ नेत्यांना घडलेल्या गोष्टींचा व झालेल्या कामाचा अहवाल द्यावा, असे ठरल्यामुळे मी त्यातून मुक्त झालो. मी समुद्र आणि सावरकर यांची गोष्ट माझ्या मित्रांना केव्हा एकदा सांगेन, असे मला झाले होते.

दुस-या दिवशी संध्याकाळी कृष्णेच्या वाळवंटात आमचा गप्पांचा फड बसला. बिळाशीच्या भेटीपासून समुद्र आणि सावरकर यांच्या दर्शनापर्यंतच्या सगळ्या हकीकती जेव्हा मी माझ्या तरुण मित्रांना सांगितल्या, तेव्हा त्या ते डोळे विस्फारित करून ऐकत होते. बिळाशीतल्या पोलिसांच्या झोपेमुळे आम्ही बचावलो, हे ऐकून ते खूप हसले. पण सावरकरांच्या भेटीच्या हकीकतीमुळे ते माझ्याकडे काहीशा आदराच्या भावनेने पाहू लागले. सावरकरांशी आम्ही प्रत्यक्ष बोललो, हे त्यांना खरेच वाटले नाही. मी जेव्हा ते कसे दिसतात, कसे बोलतात, याचे वर्णन सांगितले, तेव्हा मात्र ते लक्ष लावून ऐकू लागले. आमच्या भेटीचा सारा वृत्तांत व तपशील त्यांना सांगितला, तेव्हा त्यांचा त्यावर विश्वास बसला. मीही, आपण कोणी तरी आहोत, अशा रूबाबात त्यांना हे सगळे सांगत होतो.

ज्या घटनेने मला काही शिकवले आणि माझ्यावर कायमचा परिणाम केला, अशा १९३० सालच्या माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय घटनांपैकी ही एक घटना आहे.

## प्रकरण दुसरे

## वैचारिक आंदोलन

हरिभाऊ लाड येरवड्याच्या तुरूंगातून परत आले. आम्ही त्यांच्याकडून येरवड्याचे अनुभव ऐकण्यासाठी उत्सुक होतो. त्यांनी बरेच मजेदार अनुभव सांगितले. त्यांची ही साधी कैद असल्यामुळे त्यांना काही काम करावे लागले नाही. त्यामुळे आरामात बसून तुरूंगातील इकडच्या तिकडच्या गोष्टी पाहण्यास त्यांना सवड मिळाली. पण त्यांना वेगळे-एका बाजूस ठेवले होते, असे त्यांनी सांगितले. त्यांच्याकडून ऐकलेल्या सर्वच गोष्टी आता लक्षात नाहीत. पण त्यांनी सांगितलेली एक आठवण मात्र माझ्या मनाशी पक्की आहे. याच सुमाराला महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हेही याच जेलमध्ये कैदेत होते. त्यांनीही चळवळीत भाग घेतला होता. जेलमध्ये असताना हरिभाऊ व विठ्ठल रामजी शिंदे यांची अनेकदा भेट झाली. त्यांच्या शेजारच्या किंवा जवळपासच्या खोलीत हरिभाऊंना ठेवले होते. हरिभाऊ शरीराने अपंग, म्हणून त्यांच्याबद्दल जेलमध्ये सर्वांना सहानुभूती होती. विठ्ठल रामजी शिंदे तर त्यांची फारच आपुलकीने चौकशी करत. ते त्यांना काही तरी वाचायला देत.

या तीस सालच्या चळवळीचे एक वैशिष्ट्य असे आहे, की या चळवळीत ग्रामीण समाजाचा प्रतिनिधी-वर्ग मोठ्या प्रमाणात जेलमध्ये गेला. हे साधे जेलमध्ये जाणे नव्हते, तर स्वातंत्र्याचा चळवळीचे व्रत स्वीकारणे होते. निश्चेष्ट पहुडलेल्या या समाजातून ही माणसे निघाली कशी, असा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा अनेक वर्षे चाललेल्या स्वांतत्र्य-चळवळीचा समाजावर झालेला अप्रत्यक्ष परिणाम हे कारण असू शकेल, असे मला वाटते. त्याचप्रमाणे महात्मा गांधी व पंडित नेहरूंबद्दल असणारी श्रद्धा हीही कारणीभूत झाली असेल. पण महाराष्ट्राबद्दल बोलायचे झाले, तर हा जो ग्रामीण समाज हलला, त्याचे काही श्रेय विठ्ठल रामजी शिंदे आणि केशवराव जेधे

यांना दिले पाहिजे. तीस सालच्या चळवळीत हे दोघेही प्रथमपासून सामील झाले होते. आणि दोघेही कायदेभंग करून कारागृहातही गेले होते. त्याचा परिणाम ग्रामीण भागातील तरुण मुलांच्या मनावर निश्चित झाला होता. काही तरुण मुलांशी बोलताना मला हे आढळूनही आले होते. माझी वाढ वेगळ्या पद्धतीने झाली असल्यामुळे या दोघांबद्दल माझ्या मनामध्ये आदर होता. विशेषतः, ब्राह्मणेतर चळवळीपासून बाजूला निघून केशवराव जेध्यांसारखा तरुण नेता स्वातंत्र्य-चळवळीच्या मुख्य प्रवाहात सामील झाला, याचा आम्हांला आनंद झाला. विठ्ठल रामजी शिंद्यांचे व्यक्तिमत्त्व वेगळ्या तऱ्हेचे होते. त्यांची बैठक समाजसुधारकाची आणि काहीशी आध्यात्मिक अशी होती.

हरीभाऊ लाडांना मी एकदा विचारले,
"जेलमध्ये तुमचे विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी काही बोलणे झाले का?" ते म्हणाले,
"थोडे बोलणे झाले, ते मला धीर देत असत."

विठठल रामजींच्या मनात गांधींबद्दल आत्यंतिक आदर होता, असे त्यांच्या बोलण्यावरून हरिभाऊंना दिसून आले. एवढी माहिती त्यांच्याकडून मला समजली. याच्यापेक्षा त्यात जास्त प्रकाश पडेल, असे काही नव्हते. पण विठ्ठल रामजी शिंदे आणि केशवराव जेधे यांचे महाराष्ट्रातील १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीतले कार्य हे ऐतिहासिक स्वरूपाचे कार्य आहे, असे माझे मत आहे.

महाराष्ट्रात सत्यशोधक विचाराची एक चळवळ १९२२-२३ सालपर्यंत झाली. त्यावेळी तिच्यामध्ये मूळ ज्योतिबा फुल्यांच्या प्रेरणा कार्य करीत होत्या. जिल्ह्यातल्या जुन्या कार्यकर्त्या मंडळींशी बोलले, की याची थोडी-फार कल्पना येत असे. त्यानंतरही सत्यशोधक विचाराचा प्रसार करणारे केशवराव विचारे यांच्यासारखी निष्ठावान मंडळी काम करीत होती आणि त्यांना या सामाजिक प्रेरणा अजूनही महत्त्वाच्या वाटत होत्या. पण सत्यशोधक समाजाच्या पाठीमागच्या सामाजिक प्रेरणा कुठे तरी मध्येच गळून पडल्या असाव्यात आणि मुख्यतः जो प्रवाह शिल्लक

राहिला, तो ब्राह्मणेतर चळवळीचा. सरकारी नोकऱ्यांमध्ये महत्त्वाचा हिस्सा असावा, राजकीय सत्ता-जी थोडी फार होती, किंवा मिळेल, अशी आशा होती, तीमध्ये योग्य तो वाटा मिळावा, ही त्या चळवळीची ध्येये होती, असे दिसते.

१९३० ची कायदेभंगाची चळवळ मूर्त स्वरूप घेऊ लागली, आणि सर्वसामान्य जनतेचा तिला पाठिंबा मिळू लागला, तशी ब्राह्मणेतर चळवळीचे काम करणा-या मंडळींची मोठी अडचण आणि पंचाईत झाली. सरकार-दरबारी त्यांचे संबंध होते. पण आता ते संबंध उघड दाखविणे अडचणीचे होऊ लागले. सरकार दरबारातील संबंध ही आता मानाची गोष्ट राहिली नव्हती. उलट, तो लोकांच्या टीकेचा विषय होत असे. तरी सुद्धा या वृत्तीला चिकटून असणारी काही महत्त्वाची मंडळी आमच्या सातारा जिल्ह्यात होती. आमच्या जिल्ह्यातील एक प्रसिद्ध पारशी व्यापारी आणि कारखानदार श्री. कूपर व त्यांचे जिल्ह्यातील हस्तक म्हणून वावरणा-या लोकांचा एक गट अशा प्रकारचा होता. कूपरनी मोठ्या हुशारीने सातारा जिल्ह्यातील सर्व ठिकाणच्या मातबर मराठा घराण्यांशी  वैयक्तिक स्नेहसंबंधांची नाती निर्माण केली होती. ते कधी त्यांच्याकडे जात, तर त्यांना कधी आपल्याकडे बोलावून घेत. त्यांच्या अडी-अडचणींतमदत करीत असल्यामुळे हे संबंध मोठे पक्के झाले होते. ही मातबर मंडळी फार महत्त्वाची माणसे होती. विशेषतः, ग्रामीण सार्वजनिक जीवनात त्यांना फार महत्त्वाचे स्थान होते. परिस्थितीने ब-यापैकी असल्यामुळे मान-मरातबही होता. यांतल्या पुष्कळांचे वैयक्तिक जीवनही काहीसे निर्मळ होते, कूपरसाहेबांच्या मदतीने यांच्या सरकार-दरबारी ओळखीपाळखी होत्या. लहान-मोठ्या कामांत लोकांना ते मदतही करीत. त्यामुळे या लोकांचा समाजात दबदबा होता. मात्र या लोकांच्या खालचा, कूपरच्या हस्तकांचा जो थर होता, तो समाजाला नको असलेल्या हांजीखोर अशा समाजकंटकांचा होता. मी ही पार्श्वभूमी अशासाठी सांगतो आहे, की १९३० सालचा स्वातंत्र्यसंग्राम जसा अधिक लोकाभिमुख आणि शक्तिशाली बनू लागला, तसतसे ब्रिटिश सत्ताधारी बेचैन झाले. या संग्रामाविरूद्ध लोकांतून काही संघटना उभी राहते का पाहावे, म्हणून त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे मार्ग शोधून काढले व प्रयत्न केले. कधी नोकऱ्यांची आशा दाखवली, कधी पदव्यांचा

लोभ दाखवला; पण वातावरण इतके मूलगामी बदलले होते, की या गोष्टींचा काही उपयोग नव्हता. तरुण पिढी बदललेले वातावरण समजू लागली होती. आणि ती या प्रतिष्ठित मंडळींना वेगवेगळे प्रश्न विचारू लागली होती, पण असे जरी असले, तरी जो मातबर वर्ग मी वर सांगितला, त्याचे सरकारशी असलेले नाते काही तुटले नव्हते. आणि सरकारविरूद्ध उघड भूमिका घ्यायची त्यांच्या मनाची तयारी नव्हती. किंबहुना त्यांना नव्या चळवळीतून प्रत्यक्ष काही घडेल, असा विश्वास नव्हता. ही मातबर घराणी एका अर्थाने शेकडो वर्षे चालत आलेल्या सरंजामी पद्धतीचे प्रतिनिधित्व करीत होती. त्यांनी अनेक राज्ये आणि सल्तनती आलेल्या व गेलेल्या पाहिल्या होत्या. त्यामुळे लोकशाही पद्धतीने चाललेली ही चळवळ, तिची व्याप्ती, तिचा रंग, रूप आणि आकार त्यांना अगदी नवखा असल्यामुळे अजून ते जुन्या सरकार-निष्ठेला पकडून कायम राहिले होते.

आमच्या कराडला सरकारने एक नवा डाव टाकला. आमच्या गावी नगरपालिका ब-यापैकी होती. कराडचे प्रसिद्ध व्यापारी श्री. कच्छी हे तिचे अध्यक्ष होते. बरेच दिवस त्यांनी वेगवेगळ्या क्लृप्त्यांनी म्युनिसिपालिटी आपल्या ताब्यात ठेवली होती. नगरपालिकेच्या निवडणुका होत, तेव्हा ते शहराच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये आपली हस्तक असणारी पक्की माणसे उभी करून त्यांना सर्व तऱ्हेची मदत करीत असत. एक-दोन वॉर्ड सोडले, तर त्यांना मदत करणारी माणसेच बहुसंख्येने निवडून येत. अशा तऱ्हेने त्यांना जवळजवळ पंधरा वर्षे नगरपालिकेवर आपला पक्का कब्जा करून ठेवला होता. या नगरपालिकेने एक दिवस ठराव पास करून मुंबई इलाख्याचे गव्हर्नर फ्रेडरिक साइक्स यांना कराडला निमंत्रण करून त्यांना मोठ्या सन्मानाने मानपत्र द्यायचे, असे ठरवले. इंग्रजी सत्तेला विरोध करण्याच्या तीव्र वातावरणात अशा तऱ्हेचा निर्णय घेणे मूलतः हास्यास्पद होते. पण लोकमत म्हणजे काय, हे त्यांना कळत नव्हते आणि त्याची त्यांना पर्वाही नव्हती. अशी ही नोकरशाही आणि सरकारच्या कच्छपी असलेला हा जो एक वर्ग होता, त्यांच्या हे लक्षात आले नाही, की यातून एक जबरदस्त विरोधी चळवळ उभी राहील. आणि शेवटी झाले तसेच.

म्युनिसिपालिटीने असा ठराव पास करताच लोकांत प्रक्षोभ निर्माण झाला आणि या मानपत्र-समारंभाविरूद्ध लोकमत जागृत करण्याचा निर्णय चळवळीतील कार्यकर्त्यांनी घेतला. जवळ जवळ महिनाभर या मानपत्राच्या विरोधी जाहीर सभा होऊ लागल्या आणि कराड शहर आणि कराड तालुका आणि जिल्ह्यातील इतरही भाग यांमध्ये या मानपत्राचा निषेध करण्यासाठी चळवळ उभी राहिली. या निमित्ताने होणा-या कृष्णेच्या घाटावरच्या जाहीर सभांना दररोज हजारो माणसे येत, भाषणे ऐकत असत.

इंग्रज सरकारचे स्थानिक प्रतिनिधी आणि त्यांचे पाठीराखे यांच्यावर सरळ हल्ला होत असल्यामुळे हा लढा कोणामध्ये आहे, हे त्यांना आत्ता नक्की समजू लागले होते. फक्त, अदृश्य अशा ब्रिटिश सत्तेशी हा लढा नव्हता, तर आपल्याच समाजातले तिचे पाठीराखे लोक जेव्हा ही चळवळ मोडण्याच्या प्रयत्नासाठी उभे राहतात, तेव्हा त्यांना पोटतिडकीने विरोध केला पाहिजे, ही त्याच्या पाठीमागची भावना जागृत झाली होती.

ज्या दिवशी मानपत्रासाठी गव्हर्नरांचे आगमन होणार होते, त्या दिवशी, शहरात सर्वत्र पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. अनेक लोकांना पकडले जाणार, अशाही बातम्या कानी येत होत्या. तरीसुद्धा कराडच्या पुलापासून म्युनिसिपालिटीच्या ऑफिसपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हातांत काळे झेंडे धरून हजारो लोक निदर्शने करीत उभे होते. जनता तेथील नगरपालिकेच्या पाठीमागे नव्हती किंवा ब्रिटिश गव्हर्नरांच्या स्वागतासाठी तयार नव्हती, तर त्यांच्या निषेधासाठी तेथे जमली होती, याची ही साक्ष होती. माझ्या समजुतीने त्या निदर्शनामध्ये जवळ जवळ पंचवीस हजार माणसांनी भाग घेतला असेल. मी आणि माझे कार्यकर्ते मित्र अर्थातच यात पहिल्यापासून अखेरपर्यंत भाग घेत होतो.

चळवळीचे नेतृत्व कराडचे प्रसिद्ध वकील श्री. गणपतराव आळतेकर, श्री. बाबूराव गोखले आणि इतर प्रमुख मंडळी यांच्याकडे होते. मी आणि माझे मित्र त्यांचे

सहायक होतो. निषेधाच्या निदर्शनामुळे कराडचे व सातारा जिल्ह्याचे वातावरण संपूर्ण बदलून गेले होते. जनमताचे आणि जनजागृतीचे दर्शन गव्हर्नरला झाले, हे एक प्रकारे उत्तमच होते. माझ्या कल्पनेने ते जेव्हा त्यांचे मानपत्र घेऊन परत गेले असतील, तेव्हा महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या जनमानसाचे स्वरूप त्यांना ख-या अर्थाने समजले असेल.

या निदर्शनांनंतर नोकरशाही अधिक चिडल्यासारखी झाली. आपला अपमान झाला आणि तो सामान्य दिसणा-या माणसांनी केला, याचा त्यांना विषाद वाटत असावा. एक-दोन आठवड्यांतच कराडातील महत्त्वाचे वीस-पंचवीस कार्यकर्ते पकडून त्यांना सातारला नेले गेले आणि त्यांच्यावर खटला भरण्यात आला.

कच्छी हे नगराध्यक्ष या नात्याने समारंभाचे प्रमुख पाहुणे असल्यामुळे मुसलमान समाजाचे कार्यकर्ते या निदर्शनांत नव्हते, हे खरे आहे; परंतु त्या समाजातही, जे होत आहे, ते पसंत नसणारी अनेक गरीब मुसलमान माणसे होती, हे मला माहीत आहे.

सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावेळचे माझे मित्र श्री. गुलाब बागवान पहिलवान या निदर्शन-चळवळीचे महत्त्वाचे पुढारी होते. मानपत्राला विरोध करणा-या तयारीच्या ज्या सभा झाल्या, त्यामध्ये त्यांनी फार सुरेख भाषणे केली. श्री. गुलाब बागवान पहिलवान हे तीस सालच्या चळवळीत चांगलेच रंगून गेले होते. मी या गोष्टीचा उल्लेख एवढ्यासाठीच केला, की या चळवळीमध्ये सर्व समाजाचे प्रतिनिधी भाग घेत होते, हे लक्षात यावे.

या निदर्शनाचे विराट स्वरूप पाहून जे त्याच्या बाहेर होते, त्यांच्याही मनात चळवळीसंबंधी आपुलकी निर्माण झाली.

या चळवळीचे पडसाद साहजिकच आमच्याही घरी उठले. माझे बंधू गणपतराव हे

या निदर्शनाच्या चळवळीला सहानुभूती दाखवीत होते. ते निदर्शनात प्रत्यक्ष सामील झाले नव्हते. पण त्यानंतर तालुक्यातील ज्या मातबर मडंळींचा मी वर उल्लेख केला, त्यांच्याशी घनिष्ट संबंध असलेल्या काही लोकांची त्यांनी माझी भेट घालून दिली.

सहा-आठ महिन्यांपूर्वी मी या मंडळींशी बोलत असताना त्यांची जी एक उदासीनता किंवा विरोध दिसे, तो आता राहिला नव्हता. ते माझ्याकडून चळवळीची वेगवेगळी अंगे समजावून घेऊ लागले. त्यांच्या गावी, घरी येण्याचे मला निमंत्रण देऊ लागले. मग मी इतर कार्यकर्त्यांसह त्यांच्या गावी जाई व चर्चा करी. मी त्यांच्याशी वैयक्तिक संबंध प्रस्थापित करू लागलो. या निमित्ताने समाजामध्ये चळवळ कशी खोलवर पसरत होती आणि लोकजीवनात कशी मुळे धरत होती, याचा हा अनुभव आहे.

१९३० साल हे माझ्या मताने हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-चळवळीतील इतिहासाचे अतिशय महत्त्वपूर्ण वर्ष आहे. हे मी माझ्या जिल्हयापुरते किंवा महाराष्ट्रापुरते म्हणत नाही, तर सर्व देशाच्या दृष्टीने पुढे मी अनेक कार्यकर्त्यांशी बोललो, तेव्हा हे लक्षात आले, की शहरातून स्वराज्याची चळवळ जी खेडेगावांत गेली, ती १९३० च्या आंदोलनात आणि त्यामुळे एक महत्त्वाचा सामाजिक बदल झाला.

हिंदुस्थानच्या सर्व भागातला शेतकरी समाज आता विचारपूर्वक स्वातंत्र्य संग्रामाच्या पाठीशी येऊ लागला होता. महात्मा गांधींची ही मोठी देणगी होती. सबंध समाज त्यांनी ढवळून काढला होता. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा विचार वरच्या श्रेणीतल्या थोड्या पांढरपेशा विचारवंतांपुरताच मर्यादित न राहता आता तो विस्कळून लांब खेड्यापाड्यांत राहणा-या सहस्त्रावधी सामान्य माणसांपर्यंत पोहोचवला गेला होता.

हिंदुस्थानच्या जीवनात जसा या वर्षाने फरक केला, तसाच माझ्याही जीवनात केला.

मी आता अनुभवी, विचाराने समजूतदार, असा एक कार्यकर्ता बनलो. आता कामे शोधायच्या मार्गात मी होतो.

माझ्या ओळखी आता तालुक्यात आणि जिल्ह्यात होऊ लागल्या होत्या. नवे मित्र जोडले जात होते आणि एका नव्या मोठ्या कुटुंबाचे आपण सभासद आहोत, अशी भावना मनात वावरत होती. एका नव्या उत्साहाचा अनुभव मी घेत होतो.

हे सारे करीत असतानाच माझी त्या वर्षाची इंग्रजी सहावीची परीक्षा मला द्यायची होती, ती मी घाईघाईत अभ्यास करून कशी तरी दिली; पण शेवटी पास झालो. ही काही छोटी कमाई नव्हती. माझे मित्र आणि घरची माणसे दोघांनीही माझे कौतुक केले.

चळवळीतील सर्व कामे करत असतानाच मी माझी परीक्षा पण पास झालो, याचे सर्वांना आश्चर्य वाटले, पण मला त्यात काही फारसे कठीण वाटले नाही. माझी सर्वसामान्य बुद्धी व समज वाढली होती. मराठी सातवी इयत्ता पास करून इंग्रजी शाळेत आल्यामुळे माझ्या बरोबरीच्या मुलांच्या वयापेक्षा माझे वय थोडे जास्त होते. त्यामुळे अभ्यासाचे विषय शिक्षकांकडून किंवा हुशार विद्यार्थ्यांकडून मी समजावून घेत असे, तेव्हा मला फारसा वेळ लागत असे. परीक्षेत पास होण्याचे खरे कारण हेच असले पाहिजे. पण मला बरे वाटले. या निमित्ताने पुढच्या वर्षाचे काम करायला आता त्यात कोणी अडथळा आणणार नव्हते.

३१ साल उजाडले होते. जेलमध्ये जाणारे लोक परत येत होते. काही नवे जेलमध्ये जात होते. कराडमधून 'ज्ञानप्रकाश'ला एक अनाहूत वार्ताहर म्हणून मी लिहीत असे. हे माझे काम चालूच होते. माझ्या वाट्यास अनेक नवे अनुभव व ओळखी येत होत्या.

अशा परिस्थितीत याच सुमारास हिंदुस्थानच्या राजकारणातील एक महत्त्वाची

घटना घडली. महात्मा गांधींची सुटका झाली. लॉर्ड आयर्विन यांनी महात्मा गांधींना भेटीचे निमंत्रण दिले. सर्व राजबंद्यांची मुक्तता होऊ लागली होती. गांधींच्या बरोबर काँग्रेस कमिटीच्या सर्व नेत्यांचीही सुटका झाली, आणि हिंदुस्थानातील राजकीय घडामोडींना एक नवा वेग प्राप्त झाला. लोकांचा उत्साह विलक्षण वाढला. शिक्षा संपण्यापूर्वीच जे लोक सुटले, त्यांना तर आपला एक प्रकारचा विजयच झाला, असेच वाटत होते. या सर्व सुटणाऱ्यांत अजूनही बिळाशी भागातील पकडलेले लोक मात्र सुटत नव्हते, याची आम्हां लोकांना चिंता होती. बिळाशी भागातील कार्यकर्त्यांवर सरकारचा विशेष रोष होता. कारण त्यांनी तेथे लोकराज्य स्थापन करण्याचा श्रीगणेशा केला होता.

वर्किंग कमिटीच्या चर्चेनंतर गांधींना लॉर्ड आयर्विन यांनी भेटीचे आमंत्रण दिले आणि त्यांच्यामध्ये चर्चा व वाटाघाटी सुरू झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांतून झळकू लागल्या. या चर्चेच्या अंती महात्मा गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्यांत जो करार झाला, तो हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचा फार मोठा विजय ठरला. या समेटानंतरच वर उल्लेखिलेल्या काही नेत्यांच्या सुटका झाल्या होत्या. जनआंदोलनाला या प्रकारचे आलेले यश हे जनतेला दुप्पट शक्ती देते. काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस कार्यकर्ते यांना जनमनामध्ये एक नवीन आदराचे स्थान प्राप्त झाले.

आता करण्यासारखे विशेष काही नव्हते, म्हणून मी माझी परीक्षा झाल्यानंतर विश्रांतीसाठी आजोळी गेलो. माझे ते आवडते ठिकाण होते. पण या खेपेला जाताना मित्रांकडून आणि लायब्ररीमधून वाचण्यासाठी म्हणून बरीच पुस्तके गोळा करून घेऊन गेलो. जवळ जवळ तीन-चार आठवडे या खेपेला मी देवराष्ट्रामध्ये राहिलो. लहानपणी राहिलो होतो, तेव्हाची माझी दृष्टी आता बदलली होती आणि गावात मागासलेपणा किती आहे, गरिबी किती आहे, याची मला कल्पना येऊ लागली. देवराष्ट्रामध्ये चळवळीचे वारे काहीसे येऊन पोहोचले होते. परंतु गावातले कोणी जेलमध्ये वगैरे गेलेले नव्हते. दहा-पाच तरुण मुले त्या कामामध्ये रस घेणारी होती. ती माझ्याकडे नियमित येऊ लागली व चर्चा करू लागली. मला आठवते, त्यांतला

एक पोस्टमन होता. तो रोज माझ्यासाठी नवे वर्तमानपत्र घेऊन येई आणि अनेक गोष्टींची चर्चा करी. माझ्या मामांची काही बागायत शेती होती. थोडी-फार कोरडवाहू शेती होती. म्हणून मी व आमच्या आजोळच्या कुटुंबाचे मित्र म्हस्के यांच्याकडे वहिवाटीला असलेल्या, सोनहि-याच्या काठच्या आंबराईमध्ये जात असे. ओळीने असलेल्या आंब्याच्या झाडांच्या रांगा, त्यांची सुरेख सावली, आंब्याच्या झाडांना आलेला मोहर आणि काहींना लागलेले आंबे आणि त्यांचा येणारा हवाहवासा मंद वास असे मोठे प्रसन्न वातावरण तेथे असे. चैत्र-वैशाखाचे महिने असल्यामुळे आंब्याच्या डहाळीआडून सकाळी-दुपारी-संध्याकाळी ओरडणा-या कोकिळेची गीते. अशा त्या रम्य वातावरणात मी माझे दिवसचे दिवस काढत होतो. सकाळी घरून न्याहरी करून निघावे, दुपारच्या जेवणासाठी थोडेसे बांधून बरोबर घ्यावे, बरोबर आणलेली वाचायची पुस्तके काखेत मारावी आणि आंबराईच्या त्या निसर्गरम्य ठिकाणी पुष्कळ वेळ वाचन, काही वेळ गप्पा आणि मग निवांत झोप, असा दिवसभर माझा छान कार्यक्रम होता.

मी वाचायला नेलेल्या पुस्तकांत बहुतेक कादंबरी होत्या. कादंबरी वाचनाचा माझा नाद जुना आहे. माझा वाचनाचा शौकच मुळी कादंबरीपासून सुरू झाला. हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंब-या वाचून झाल्यानंतर त्यांच्या सामाजिक कादंब-या मी वाचल्या. नाथमाधवांच्या बहुतेक कादंब-या वाचून झाल्या होत्या. या वर्षी मी येताना माझ्याबरोबर 'पण लक्षात कोण घेतो' व 'मी' या हरिभाऊंच्या सामाजिक कादंब-या आणि केतकरांची 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी आणली होती.

या वर्षाची परीक्षा देताना संस्कृतचा पेपर मला काहीसा कठीण गेला. त्यामुळे आता मॅट्रिकच्या वर्षी संस्कृतकडे जास्त लक्ष द्यायचे, असे मी ठरविले होते. त्यासाठी माझ्या वर्गातील माझे मित्र आणि आमच्या गावच्या धनी कुलकर्ण्यांचे ज्येष्ठ चिरंजीव व सातारच्या 'समर्थ' साप्ताहिकाचे सध्याचे संपादक श्री. अनंतराव कुलकर्णी यांची मदत घ्यायचा प्रयत्न केला, त्यांनी आणि मी बरीच वर्षे एकाच शाळेत आणि एकाच वर्गात काढली आहेत. ते माझ्या राजकीय चळवळीचा पक्का

पाठपुरवठा करणारे मित्र होते. त्यांचे संस्कृत बरे होते. मी त्यांना विचारले, त्यासाठी ते खास प्रयत्न काय करतात? त्यांनी सांगितले, की शाळेतल्या शिक्षणाखेरीज ते तेथील एका शास्त्रीबुवाकडे संस्कृतचे अध्ययन करीत होते. शास्त्रीबुवांनी त्यांना सांगितले होते, संस्कृत अध्ययनाबरोबर वाणीची उच्चार-शुद्धी जर करायची असेल, तर संस्कृत पाठांतर भरपूर केले पाहिजे. म्हणून अनंतरावांनी मला कालिदासाचे 'मेघदूत' हे पुस्तक दिले आणि सांगितले, की यातले जे श्लोक आहेत, ते मी मोठ्याने वाचण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे संस्कृत उच्चाराला आणि वाचनाला मदत होईल. यामुळे यावेळी माझ्याबरोबर देवराष्ट्राला आणलेल्या पुस्तकांत कादंबऱ्यांबरोबर मेघदूताची सटीप, सार्थ आवृत्तीही होती. त्यामुळे मला संस्कृतच्या अभ्यासाच्या दृष्टीने त्याची मदत होत होती.

त्या आंबराईत बसल्यानंतर माझ्या मनात विचार आला, की मी मेघदूत मुखोद्‌गत का करू नये? म्हणून मी त्या महिनाभरात तसा प्रयत्न केला. अर्धअधिक 'मेघदूत' मला आजही मुखोद्‌गत आहे. या आंबराईच्या सावलीत बसून मी जेव्हा मोठ्याने-
*आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं*
*वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥*

असे उच्चारून 'मेघदूता'चे पाठांतर सुरू करीत असे, तेव्हा मला एक वेगळा आनंद मिळे, ज्ञाते कालिदासाच्या काव्यामध्ये 'मेघदूता' ला प्रथम श्रेणीचे स्थान देत नाहीत, हे मला माहीत आहे. पण काव्याच्या क्षेत्रात मेघाला आपला दूत करून आपल्या प्रेयसीला निरोप पाठविण्याची कल्पना इतकी रोमँटिक व आकर्षक आहे, की त्या कल्पनेसाठी या काव्याला बरेच स्थान दिले पाहिजे, असे मला नेहमी वाटते.

अशा तऱ्हेने पुस्तकांच्या, आंबराईच्या व कोकिळांच्या सहवासातले देवराष्ट्रामधले ते दिवस मी मजेत काढले. जुन्या ओळखीच्या ठिकाणांना भेटी दिल्या, सोनहि-याच्या

काठाने भटकलो. सागरेश्वराचे दर्शन घेतले. जुन्या परिचयाच्या माणसांशी गाठीभेटी, गोष्टी केल्या आणि पुन्हा ताजातवाना होऊन कराडला परत आलो.

शाळा सुरू व्हायला अजून काही दिवस अवकाश होता. या वर्षी मॅट्रिकचा अभ्यास असल्यामुळे अभ्यासाकडे जास्त लक्ष द्यावयाचे, असे मी ठरविले होते. पण अनपेक्षितपणे एक नवीन काम निघाले आणि माझ्या अभ्यासाच्या तयारीचा बेत तसाच राहून गेला.

साता-यात अधून मधून जिल्हा राजकीय परिषद गेली कित्येक वर्षे भरत आली होती. लोकमान्य टिळकांच्या काळापासून ती प्रथा चालत आलेली होती. ३० सालच्या चळवळीच्या यशाच्या निमित्ताने ३१ साली ही राजकीय परिषद जिल्ह्यात मोठ्या उत्साहाने साजरी करायची, असा जिल्हा प्रमुख पुढाऱ्यांनी निर्णय केला. कराड तालुका या चळवळीत अग्रस्थानी असल्यामुळे ही परिषद कराड तालुक्याने ठरवावी, असा निर्णय झाला. आमच्या तालुक्यातील मसूरच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी ही जिल्हा परिषद मसूरला भरवावी, असे निमंत्रण दिले. राघूआण्णा लिमये, डॉक्टर फाटक, सीतारामपंत गरूड, श्री. विष्णुमास्तर यांनी त्याची जबाबदारी घेतली. मसूरने हे काम आपल्या शिरावर घेतल्यामुळे साहजिकच आमच्या तालुक्यातील कार्यकर्त्यांवरही जबाबदारी आली. आणि कामाच्या वाटण्या होऊन आम्ही सर्वजण मोठ्या उत्साहाने पुन्हा कामास लागलो. मुख्य जबाबदारी मसूरकरांची होती, हे जरी खरे असले, तरी आम्हां मंडळींची जबाबदारीही काही कमी नव्हती. परिषदेला अध्यक्ष म्हणून त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष असलेले श्री. माधवरावजी अणे यांना निमंत्रित केले होते. आणि त्यांनी ते निमंत्रण स्वीकारले होते. त्यामुळे या परिषदेला अनपेक्षितपणे फार महत्व आले.

परिषदेचा दिवस उजाडला आणि मसूरमध्ये जमा झालेले तालुक्यातील आम्ही सर्व कार्यकर्ते आनंदित झालो. आमच्या जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेते तर जमले होतेच, पण पुण्याहूनही बरीच प्रमुख मंडळी आली होती. ज्यांची नावे आम्ही अनेक वेळा

वाचत होतो, अशी पुष्कळ मंडळी मुंबईहून आली होती. त्यांमध्ये सौ. लीलावती मुन्शी या हजर होत्या, हे मला स्पष्ट स्मरते आहे. परिषदेच्या कामापूर्वी परिषदेत मांडल्या जाणा-या ठरावांची चर्चा करण्याकरता जिल्हयाच्या कार्यकर्त्यांची एक विषय नियामक समिती बसली. या विषय नियामक समितीला कोल्हापूरचे प्रजा परिषदेचे प्रसिद्ध नेते श्री. माधवरावजी बागल यांना विशेष निमंत्रण देऊन बोलावून घेतले होते. विजयी झालेल्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरत असल्यामुळे राजकीय प्रश्नांवर जास्त चर्चा चालल्या होत्या. माधवरावजी अणे या समितीच्या बैठकीला हजर होते. ते राजकीयदृष्ट्या योग्य ते मार्गदर्शन करीत होते. गांधीजी राऊंड टेबल कॉन्फरन्सला जाणार होते. तेव्हा तेथे कोणत्या गोष्टींची मागणी करावी, वगैरे गोष्टींची चर्चा त्यामध्ये झाली. जनतेने मीठ आणि जंगल सत्याग्रहांमध्ये भाग घेऊन जे स्वार्थत्यागपूर्वक मोठे कार्य केले, त्याबद्दल त्यांच्या आभाराचा व अभिनंदनाचा ठरावही चर्चेत होता. या सर्व ठरावांची चर्चा चालू होती.

ही चर्चा चालू असतानाच त्यांतल्या एका राजकीय ठरावाला माधवराव बागलांनी एक उपसूचना मांडली. राजकीय मागण्यांबरोबर आर्थिक स्वरूपाच्या मागण्याही त्यांनी सुचविल्या होत्या. मी आज जेव्हा मागे वळून पाहतो, तेव्हा त्या सूचना, मला तरी, निरूपद्रवी वाटतील, अशा होत्या. सावकाराने दामदुपटीपेक्षा कर्ज वसूल करू नये, नऊ टक्क्यांपेक्षा ज्यादा व्याज आकारू नये, शेती कसणा-या कुळांना शेती कसण्याचा कायमचा हक्क द्यावा, आणि या सर्व मागण्या तातडीने अमलात आणाव्यात, असा त्या उपसूचनांचा आशय होता. परिषदेसाठी आलेले आमच्या जिल्हयाचे आणि प्रांताचे नेतेही या उपसूचना पाहून एकदम गडबडून गेले. मला त्याबद्दल आज तर आश्चर्य वाटतेच आहे; पण तेव्हाही मला आश्चर्य वाटले होते. या उपसूचनांबाबत तांत्रिक अडचणी उभ्या केल्या, तेव्हा त्याला विरोध करण्याकरता जी मंडळी उभी राहिली, त्यांत मीही जाणूनबुजून उभा राहिलो. मला आश्चर्य वाटत होते, की शेतकरी समाजाचे हे जिव्हाळ्याचे प्रश्न होते. त्यांसंबंधाने जर ही परिषद काही बोलणार नसेल आणि काही करणार नसेल, तर शेतकरी समाजाने स्वातंत्र्याच्या चळवळीत जो भाग घेतला, तो फुकट जाणार काय? शहरातल्या

पांढरपेशा वर्गातील कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना राजकीय स्वातंत्र्य प्रिय होते, पण त्यातून उद्भवणारे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न त्यांना नको होते, असा अर्थ मी मनाशी काढला आणि माझे मन अतिशय कष्टी झाले.
माधवराव बागल स्वतः उत्तम वक्ते होते. त्यांनी आपल्या वक्तृत्वाने आपले विचार समजावण्याचा प्रयत्न केला, पण सर्व व्यर्थ. अध्यक्षांनी सर्व उपसूचना नियमबाह्य म्हणून नामंजूर केल्या आणि विषय नियामक समितीचे काम संपले.

संध्याकाळी जाहीर अधिवेशन होते. माधवराव बागलांची आणि माझी तेव्हा माझ्या पोरवयामुळे ओळख नव्हती. आणि त्या वेळी ती करून घेण्याचा मी प्रयत्नही केला नाही. पण जाता जाता झालेल्या ओझरत्या भेटीत मी त्यांना एवढेच सांगितले,

"जिल्ह्यातील आम्ही काही कार्यकर्ते मनापासून तुमच्याबरोबर आहोत. तुम्ही संध्याकाळच्या जाहीर अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करा."

त्याप्रमाणे संध्याकाळच्या जाहीर अधिवेशनात प्रथमतः पाहुण्यांची ओळख, स्वागताचे सोपस्कार, हार-तुरे, इत्यादी झाल्यानंतर ठरावांचा प्रश्न उपस्थित झाला.
संध्याकाळच्या त्या जाहीर अधिवेशनाला पंधरा-वीस हजार माणसे जमली होती.
त्यांत बहुसंख्येने शेतकरी समाजच होता.

त्या दिवसांत लाऊड स्पीकरची व्यवस्था नसे, परंतु माधवरावांचा आवाज लाऊड स्पीकरसारखाच होता. त्यांनी, मी शेतकऱ्यांचा आवाज या परिषदेत उठविणार आहे, असे सांगून आपल्या भाषणाला सुरुवात केली. तेव्हा सर्व माणसे आपले प्राण कानांत आणून त्यांचे भाषण ऐकू लागली. त्यांच्या अनेक वाक्यांना टाळ्या पडत होत्या.

अध्यक्षांनी त्यांना अधिकृतरीत्या बोलण्याची परवानगी दिली होती, की नाही, मला माहीत नाही. आणि उपसूचनाही अधिकृतरीत्या ठरावाचा भाग म्हणून मांडण्याची

परवानगी दिली होती, की नाही, याची मला आज कल्पना नाही. पण माधवरावांनी आपली उपसूचना लोकांच्या मान्यतेसाठी पुढे मांडली व लोकांनी टाळ्यांच्या गजरात तिला आपली मान्यता दिली. कागदोपत्री त्या ठरावाचे काय झाले, याचे मला किंवा कोणालाच महत्त्व नव्हते. परंतु पिळल्या जाणा-या शेतकरी समाजाचे जे प्रश्न होते, ते या राजकीय व्यासपीठावर मांडण्याच्या कामात माधवराव व पर्यायाने आम्हीही यशस्वी झालो, याचा आम्हांला आनंद वाटला.

परिषद संपली. दुस-या दिवशी सर्व पाहुणे मंडळी निघून गेली. पण उरलेल्या आम्हां कार्यकर्त्यांत वादविवाद सुरू झाले. चर्चा सुरू झाल्या. कोणी म्हणत होते; माधवराव बागलांनी हे केले, ते योग्य नव्हते. एवढी मोठी राजकीय परिषद, यामध्ये अकारण वादविवाद उभा केला. माधवरावांनी वाद उभा केला, तेच बरे केले, असे मानणा-या कार्यकर्त्यांपैकी मी एक असल्याने मी त्यांची बाजू घेत होतो. स्वराज्याच्या चळवळीला काही अर्थ प्राप्त करून द्यायचा असेल, तर सामाजिक आणि आर्थिक प्रश्न यांना स्पर्श केल्याशिवाय आपली स्वातंत्र्याची चळवळ पुढेच जाऊ शकणार नाही, असे माझे मत झाले होते. आणि माझ्या राजकीय आयुष्यातला एक उत्तम धडा मी शिकलो. लहानपणी वाचलेले ज्योतिबा फुल्यांचे चरित्र आठवले आणि माझ्या बंधूंनी मला सांगितल्याचे स्मरले, की-
"तुम्ही विचारता, शेतकरी समाज चळवळीत सामील का होत नाही; पण तुम्ही शेतकरी समाजापुढील प्रश्नांचा कधी विचार केला आहे का?"

हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे, असे मला वाटू लागले आणि मी असे ठरवले, की आता यापुढे चळवळीत भाग तर जरूर घ्यायचा, पण तो डोळसपणाने घ्यायचा. देशात त्यावेळी प्रचलित असलेल्या इतर राजकीय विचारप्रणालींचा मला अजूनही स्पर्श झाला नव्हता किंवा कोण्या मोठ्या पुढा-याची गाठभेटही झाली नव्हती. माझे राजकीय शिक्षण माझ्या जीवनाच्या शाळेत होत होते. मसूरच्या राजकीय परिषदेने मला खूप शहाणे केले. गरिबांचे कैवारी कोण आणि विरोधी कोण, हे लक्षात घेऊन स्वातंत्र्याची चळवळ चालविली पाहिजे, असा विचार माझ्या मनाशी येऊन गेला.

दुस-या दिवशी आम्ही आपापल्या घरी परतलो आणि कराडातील माझ्या मित्रमंडळींशी मसूरच्या परिषदेची चर्चा करू लागलो, तेव्हा मात्र मला एका गोष्टीचा आनंद झाला, की कराडमधील माझे सर्व सहकारी मित्र माझ्याच कलाचे होते, असे दिसून आले. या प्रश्नातले बारकावे त्यांना समजत होते, असे मला वाटले नाही. पण मी जेव्हा त्यांना खुलासा केला, की माधवराव बागल बोलल्यामुळे त्याला ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा रंग देण्यापेक्षा गरीब शेतकऱ्यांच्या वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा दृष्टीने आपण त्याचा विचार केला पाहिजे. कारण दुर्दैवाने माधवराव बागल हे कोल्हापूरचे होते आणि सत्यशोधक चळवळीत मनापासून भाग घेत होते व हिरारीने प्रचारकार्य करीत होते.

त्यांनी वाळवे तालुक्यामध्ये राष्ट्रीय चळवळीच्या संदर्भात अनेक सभा आणि परिषदा घेतल्या होत्या. आणि त्यावेळीही शेतकऱ्यांचे जे प्रश्न आहेत, त्यांची त्यांनी एक तात्त्विक मांडणी त्यांतून केली होती. मसूरमध्ये त्यांनी जे मत व्यक्त केले, ते काही विशेष नवीन होते, असे नाही. ते ज्या परंपरेत वाढले होते, त्या पंरपरेचा तो कार्यक्रम होता. ती ज्योतिबा फुल्यांची परंपरा होती. त्या परंपरेशी सुसंगत अशी मानसिक भूमी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतही निर्माण केली पाहिजे, हा त्याचा खरा अर्थ होता.
परंतु निव्वळ इंग्रजांना दोष देण्याची सवय लागलेल्या मडंळींना ही गोष्ट नवीन होती. त्यांना वाटत होते, की देशातून इंग्रजांचे राज्य जावे. पण सामाजिक व आर्थिक प्रश्नांना कोणी हात लावू नये.

या मसूर परिषदेच्या निमित्ताने अनेक निरनिराळ्या कार्यकर्त्यांशी माझ्या ओळखी झाल्या. वाई, सातारा, वाळवे व तासगाव या तालुक्यांतील ग्रामीण भागातून आलेले कार्यकर्ते कोण आहेत व त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत काय कामगिरी केली, याची माहिती या निमित्ताने झाली. यांतले बरेचसे लोक पुढे माझ्या जीवनात माझे

मित्र राहिले. खाजगी व सार्वजनिक जीवनातसुद्धा आम्ही एकमेकांना साहाय्य केले, सहयोग दिला.

यांपैकी प्रमुख व्यक्ती म्हणजे वाईचे किसन वीर, वाळव्यातले आत्माराम पाटील व पांडुरंग मास्तर आणि खटाव तालुक्यातल्या कातरखटावचे गौरीहर सिंहासने ही नावे फक्त मी वानगीदाखल देत आहे. आणखीही कित्येकांच्या ओळखी झाल्या.

गौरीहर सिंहासने हे ३० सालच्या चळवळीत तुरूंगात गेले नव्हते, परंतु आपण काही करावे, अशी त्यांची इच्छा होती. कराडला बटाणे यांच्याशी त्यांचा नात्याचा संबंध असल्यामुळे त्यांचे कराडला वरचेवर येणे-जाणे होते. कराडच्या कार्यकर्त्यांचा एकमेकांसंबंधीचा असलेला जिव्हाळा पाहून आपणही यात सामील व्हावे, असे त्यांना वाटले आणि तसे त्यांनी बोलूनही दाखविले. शेती व व्यापार या दोन्ही उद्योगांत गुंतलेले असे हे नाणावलेले लिंगायत घराणे होते. या व्यापारातून बाहेर पडणे त्यांना तितकेसे सोपे नव्हते. पण काँग्रेसच्या या चळवळीत सामील व्हावे, ही त्यांच्या मनाची ओढ होती. त्यामुळे अखेर यातून बाहेर पडण्याचा त्यांनी निर्णय घेतला व ते आमच्या गोटात सामील झाले.

आबासाहेब वीर पुढे नामांकित क्रांतिकारक नेते म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांचा उल्लेख मला वारंवार करावा लागणार आहे. तीच गोष्ट आत्माराम पाटील यांची.

ग्रामीण जनतेच्या जीवनाशी समरस व एकजीव झालेले हे लोक होते, परंतु गांधीजींची सत्याग्रहाची चळवळ समाजातल्या सर्व आणि शेवटच्या थरापर्यंत घेऊन जावी, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे खेड्यांतील अस्पृश्य मानला गेलेला समाज हा या चळवळीबाबत संपूर्ण उदासीन आहे, असा माझ्यासारखाच त्यांनाही अनुभव आला होता. यासाठी खास प्रयत्न करावे लागतील, असे त्यांनाही वाटत होते. परंतु त्यांचे नेमके स्वरूप काय असावे, याची निश्चित कल्पना त्यांच्याही मनाशी नव्हती.

गौरीहर सिंहासने यांच्या नावांचा उल्लेख आला. त्यामुळे मला आणखी एका गोष्टीची सहज आठवण झाली आहे. गांधी-आयर्विन करारानंतर अनेक मोठे राष्ट्रीय पुढारी देशात दौरे करू लागले होते. त्यांतील पंडित मदनमोहन मालवीय यांचा दौरा आमच्या जिल्ह्यात आला. वाई, सातारा, कराड असे दोन-तीन दिवस ते जिल्ह्यात होते. एका छानशा संध्याकाळी कराडला पं. मालवीयजी पोहोचले. स्थानिक नेत्यांनी त्यांना कृष्णेच्या संगमावर नेऊन कराडचा परिसर दाखविला. गंगाकिनारीचा हा महान पंडित कृष्णेच्या काठावरच्या शांत अशा सांयकाळच्या सुखद हवेने प्रसन्न झाला. कारण हे सर्व त्यांनी त्यांच्या रात्रीच्या भाषणात बोलून दाखविले.

या सभेच्या निमित्ताने एक छोटीशी पण वादग्रस्त घटना घडली. आमच्या कराड शहराच्या वरिष्ठ नेत्यांनी कोणत्याही प्रकारे कार्यकर्त्यांशी विचारविनिमय न करता परस्पर ठरवून टाकले, की मालवीय याच्या होणा-या प्रचंड सभेचे अध्यक्षस्थान पुण्याहून त्यांच्याबरोबर आलेले न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांना द्यावे. सर्व कार्यकर्त्यांना जेव्हा ही बातमी कळली, तेव्हा त्यांना हे फारसे रूचले नाही.

हे असे न रूचणे हे योग्य होते, की नाही, हा वादाचा प्रश्न आहे, पण शेवटी घडली, ती गोष्ट अशी आहे, की जेव्हा सभेच्या सुरुवातीला तात्यासाहेब केळकर यांचे नाव त्या सभेच्या अध्यक्षपदासाठी सुचविले गेले, त्यावेळी दुस-या मंडळींनी नुकतेच जेलमधून परत आलेले स्थानिक पुढारी श्री. भाऊसाहेब बटाणे यांनी सभेचे अध्यक्षपद स्वीकारावे, अशी सूचना मांडली. थोडा वेळ सभेमध्ये गोंधळ माजला व अस्थिरता निर्माण झाली. परंतु यातून तडजोड निघाली, की दोघांनीही अध्यक्ष राहावे आणि त्यानुसार हे वादळ मिटले. मालवीयजींचे त्या प्रचंड सभेत साध्या, सुलभ हिंदीत सुंदर भाषण झाले.

मी किंचित वार्ताहर असल्यामुळे ह्या सभेचा घडलेला वृतांत 'ज्ञानप्रकाश'ला देताना अध्यक्षपदासंबंधी झालेला वादही बातमीपत्रात दिला. आणि तिस-या दिवशी ज्यावेळी

दैनिक 'ज्ञानप्रकाश'चा अंक आमच्या गावी आला तेव्हा त्याची सर्वत्र एकच चर्चा सुरू झाली, कारण त्या बातमीपत्राचे शीर्षकच मुळी 'तात्यासाहेब केळकरांना अर्धे अध्यक्षपद' असे दिले होते. गावात उलटसुलट चर्चा झाली, परंतु तोपर्यंत कोण वार्ता पाठवितो, याचा सुगावा काही लोकांना लागला असावा. त्यांनी ही गोष्ट आमच्यावर उलटवावी, म्हणून एक मजेदार युक्ती केली. 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकांना गौरीहर सिंहासने यांच्या नावाने पत्र लिहून 'अर्धे अध्यक्षपद दिले गेले, वगैरे सर्व चूक आहे, असे काही घडलेच नाही' असे कळविण्यात आले. 'ज्ञानप्रकाश'कारांनी दोन दिवसांनी आपल्या अंकात तेही पत्रक प्रसिद्ध केले, त्यामुळे मी काहीसा अडचणीत आल्यासारखा झालो.

आपण 'ज्ञानप्रकाश'ला खोटी माहिती लिहितो, असा त्यांचा माझ्याबद्दल समज झाला, तर ते वाईट आहे, म्हणून मी गौरीहर सिंहासने यांना भेटून त्यांनी खरेच पत्र लिहिले आहे काय, म्हणून चौकशी केली. माझी खात्री होती, की त्यांनी असे पत्र लिहिलेले नसणार. मग मी त्यांना सुचविले, की तुम्ही व मी मिळून पुण्यात जाऊन 'ज्ञानप्रकाश' च्या संपादकांना प्रत्यक्ष भेटून खुलासा केलेला बरा.

पुण्यापर्यंत आम्हां दोघांचा येण्या-जाण्याचा भाड्याचा खर्चही त्यांनी करावा व त्यांनी माझ्याबरोबर पुण्याला यावे, असे मी सुचविले. हे त्यांनी मान्य केले व एका रात्री आम्ही रेल्वेने पुण्याला निघालो. दुस-या दिवशी सकाळी पुण्याला पोहोचल्यानंतर सिंहासने यांच्या नातेवाइकांकडे आम्ही उतरलो. दहा वाजण्याच्या सुमारास 'ज्ञानप्रकाश'चे ऑफिस शोधत बाहेर पडलो.

पुण्याला या पूर्वी मी एक-दोन वेळा शाळेच्या सहलीच्या निमित्ताने आलो होतो. पुणे माहीत होते, पण पुण्याचा तपशील माहीत नव्हता. लकडी पूल ओलांडून पलीकडे गेल्यानंतर समोरच्या फर्ग्युसन कॉलेज रस्त्याने पुढे गेलात, म्हणजे 'ज्ञानप्रकाश'चे ऑफिस लागते, असे मला अनेकांनी सांगितले. त्या पद्धतीने आम्ही 'ज्ञानप्रकाश'चे ऑफिस ज्या आर्यभूषण छापखान्यात होते, तेथे गेलो.

आम्ही एका लहान गावातली तरुण मुले एकदम संपादकांना भेटण्याची इच्छा व्यक्त करू लागलो, तेव्हा तेथल्या लोकांनी आश्चर्य व्यक्त केले. आम्ही आग्रहच केला, म्हणून त्या लोकांनी त्यांच्या उपसंपादकांपर्यंत आम्हांला नेऊन पोहोचविले. मी त्या उपसंपादकांना माझी स्वतःची ओळख करून दिली.

" 'ज्ञानप्रकाश'ला कराडहून बातमी पाठविणारा मी वार्ताहर आहे." असे मी जेव्हा त्यांना सांगितले, तेव्हा त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिले.

ते म्हणाले,
"बातम्या पाठवितात, ते चव्हाण तुम्हीच काय? मला वाटले होते, की कोणी तरी मध्यमवयीन गृहस्थ असणार."
त्यांनी त्या वादग्रस्त बातमीसंबंधी अधिक चौकशी केली, तेव्हा त्यांना मी सांगितले,
"ज्यांच्या नावाने ते खोटे पत्र प्रसिद्ध झाले होते, ते सिंहासने माझ्याबरोबर आले आहेत."

तेव्हा ते म्हणाले,
"तुम्ही थोडे थांबा. प्रत्यक्ष संपादक श्री. काकासाहेब लिमये यांच्याशी तुमची गाठ घालून देतो."

त्याप्रमाणे ते थोड्या वेळाने आम्हां दोघांना घेऊन काकासाहेबांच्या ऑफिसमध्ये गेले व आमची हकीकत सांगून ओळख करून दिली. मला पाहून काकासाहेबांनाही मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी सिंहासने या नावाने आलेले पत्र मागवून घेतले आणि सिंहासने यांना एक कागद देऊन त्यावर मजकूर लिहायला सांगितला. दोन्ही अक्षरांची तुलना करून ते म्हणाले,

"तुम्ही सांगता, हे खरे दिसते, आम्ही प्रसिद्ध केलेले हे पहिले पत्र कोणी तरी गैरसमज पसरविण्यासाठी पाठविलेले असावे." त्यांनी सिंहासन्यांना सांगितले, "तुम्ही पुन्हा एक पत्र लिहून द्या. ते आम्ही प्रसिद्ध करतो."

सिंहासने यांनी काकासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे दुसरे एक पत्र स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून दिले आणि पुढे योग्य वेळी ते पत्र 'ज्ञानप्रकाश'मध्ये प्रसिद्धही झाले.

मी ही आठवण अशासाठी सांगतो आहे, की वार्ताहर म्हणून काम करण्याच्या माझ्या हौसेचा येथे शेवट झाला. मी मनाशी म्हटले, पुन्हा आता हा उद्योग करायचा नाही. पदरचा टपाल-खर्च करून राष्ट्रीय चळवळीची प्रसिद्धी व्हावी, याकरता मी हा उद्योग आपल्या मर्जीने अंगावर घेतला होता. त्यात इतक्या आपत्ती, कटकटी आणि खटपटी असतील, याची मला कल्पना नव्हती. आणि विशेषतः, त्या उपसंपादकांनी ज्या पद्धतीने माझ्याकडे रोखून पाहिले होते, त्याची आठवण होऊन मी माझ्या मनाशी एकदम अस्वस्थ झालो होतो. अशा पद्धतीने माझ्या वार्ताहर-कारकीर्दीचा अंत झाला. पण एका नामवंत दैनिकाच्या प्रसिद्ध संपादकाला भेटून आपले म्हणणे त्याला मान्य करण्यात यशस्वी झालो, याचा काहीसा आंनदही होता.

या तऱ्हेने हे वर्ष चालले होते. महात्मा गांधी सप्टेंबर महिन्यात गोलमेज परिषदेसाठी लंडनला निघाले होते. त्यांच्या बातम्यांनी वर्तमानपत्रे भरभरून येत असत. महात्मा गांधी कोणत्या जहाजाने जाणार, लंडनमध्ये कोठे उतरणार, लंडनच्या गरीब वस्तीत ते कसे राहणार, वगैरे बातम्या वृत्तपत्रांत वाचून आम्ही हरखून जात होतो. गोलमेज परिषदेला इतर पक्षांचे पुढारीही चालले होते. परंतु गांधीजींच्या जाण्यामागे जनसामर्थ्य होत. त्यामुळे सबंध हिंदुस्थान आणि माझ्या कल्पनेप्रमाणे इंग्लंडचेही लक्ष त्यांच्याकडे होते.

गोलमेज परिषदेच्या हकीकती वर्तमानपत्रांतून येऊ लागल्या व हळूहळू कळू लागले, की यातून फारसे काही फलदायी निष्पन्न होणार नाही.

वेगवेगळ्या पुढाऱ्यांनी आपापल्या धर्माच्या किंवा जातीच्या हितसंबंधांचे प्रश्न तेथे उपस्थित केले. गांधीजींनी हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या प्रश्नावर भर दिला आणि काही तडजोड निघते का, असा प्रयत्न केला. गांधीजींच्या तेव्हाच्या भाषणाचे जे वृत्तांत वर्तमानपत्रांतून येत होते, त्यांवरून काँग्रेसची जी राष्ट्रीय भूमिका होती, तिचे ते प्रतिपादन करीत होते. ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींना त्यांनी हिन्दुस्थानच्या प्रतिनिधींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करू नका, असाही सल्ला दिला. परंतु या सर्व गोष्टींचा काही उपयोग झाला नाही. यातून काही फलित निघेल, अशी जी आशा होती, ती जवळ जवळ संपली होती. त्यामुळे देशात पुन्हा सत्याग्रह-संग्राम सुरू होणार, अशा चर्चा सुरू झाल्या. पंडित जवाहरलाल नेहरू हे त्यावेळी उत्तर प्रदेशातील किसानांची चळवळ संघटित करण्यात गुंतले होते आणि त्यामुळे उत्तर प्रदेशामध्ये दडपशाहीला प्रारंभ झाला होता.

गांधीजी १९३१ च्या अखेरीस, डिसेम्बरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईस परतले, तेव्हा त्यांच्यापुढे अनेक महत्त्वाच्या समस्या वाढून उभ्या होत्या. त्यांच्या स्वागतासाठी देशातील अनेक नेते मुंबईस आले होते. पं. जवाहरलालजी यासाठीच मुंबईस निघाले असता त्यांना वाटेतच अटक झाली. १९३१ च्या मध्यात हिंदुस्थानचा व्हाईसरॉय बदलून गेला होता. लॉर्ड आयर्विनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन यांनी व्हाईसरॉय-पदाची सूत्रे हाती घेतली होती. या विलिंग्डन साहेबाची हिंदुस्थानला पूर्ण ओळख होती. कारण त्यांनी यापूर्वी मुम्बई आणि मद्रास येथील गव्हर्नरपदाची सूत्रे सांभाळली होती. इंग्लडमधील हुजूर पक्षाचे ते समर्थक होते. भारतातील राष्ट्रीय चळवळीसंबंधी त्यांना काडीचीही सहानुभूती नव्हती, असा त्यांचा लौकिक होता. दडपशाहीच्या तंत्रात ते मोठे वाकबगार होते, अशीही त्याची कीर्ती झाली होती.

गांधी-आयर्विन कराराने काँग्रेसची व गांधीजींची शक्ती जनमानसात वाढली होती. जनतेच्या अंतःकरणातले त्यांचे हे स्थान दडपशाहीच्या मार्गाने कमी करण्याचा व्यूह या माणसाने रचला होता.

गांधीजी मुम्बईमध्ये येताच वर्किंग कमिटीची बैठक झाली. उत्तर प्रदेशात व इतरत्र चालू असलेल्या किसान-चळवळी, पं. नेहरूंची अटक, वगैरे प्रश्नांचा विचार करून गांधीजींनी लॉर्ड विलिंग्डनच्या भेटीची मागणी केली. त्याला तातडीने नकार देऊन ४ जानेवारी रोजी महात्माजींनाच अटक करण्यात आली व त्यांना येरवड्याच्या तुरूंगात रवाना केले. सरकारच्या या आक्रमक धोरणाविरूद्ध सर्व देशभर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली.

जिल्ह्याजिल्ह्यांतील प्रमुख पुढारी मंडळींनाही असेच अचानक पकडून काँग्रेसविरूद्ध एक प्रकारचे युद्धच ब्रिटिश सत्तेने पुकारले. आमच्या जिल्ह्यांतील पुढारीही पकडले गेले. आमच्या जिल्ह्यांतले आणि गावातले आम्ही इतर कार्यकर्ते एकत्रित आलो आणि पुढे कोणत्या पद्धतीने कार्य करावे, याबद्दल विचारविनिमय व चर्चा सुरू झाल्या.

मी यंदा माझ्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार नाही, असे मी माझ्या घरी सांगून टाकले. माझ्या आईचे म्हणणे होते, की मी निदान मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर काय करावयाचे, ते करावे. पण मी तिला खरे ते सर्व सांगितले. माझ्या सर्व मित्रांची या नव्या चळवळीत काम करण्याची तयारी झालेली आहे. गांधीजी तुरूंगात आहेत आणि अशा वेळी मी माझ्या मित्रांपासून अलग होऊ शकत नाही. तिला माझे म्हणणे पटले नाही, पण परत तिने मला आग्रह करण्याचे सोडून दिले.
गणपतरावांनी गेले वर्षभर माझे वाढते संबंध पाहिले होते. त्यांनी मला सांगितले,
"तुला आता तुझ्या सहकाऱ्यांबरोबर राहायला पाहिजे."
त्यांचा पाठिंबा पाहून मला धीर आला आणि मी मित्रांना माझा निर्णय कळविला.
सर्व कार्यकर्त्यांना सांगितले, की
'मी तुमच्या सर्वांबरोबर आहे. जरूर तर आघाडीवर राहीन.'

मी आमच्या शाळेतील काही मित्र जमा केले. त्यामध्ये श्री. पांडूतात्या डोईफोडे, विंगकर बंधू, अनंतराव कुलकर्णी, अहमद कच्छी आणि शांताराम इनामदार,

त्याचप्रमाणे हल्लीचे रावसाहेब (पण त्यावेळचा मधू) गोगटे असे अनेक तरुण लोक होते.

मी अहमद कच्छी या मुसलमान मित्राबद्दल यापूर्वी थोडे लिहिले आहे. हा मित्र कायदेभंगाच्या चळवळीत काम करू शकणार नव्हता. तरीही त्याच्याशी माझी गाढ मैत्री जमली होती. त्याला देशासाठी काही तरी करावे, अशी हौस होती. पण स्वतःला अधिक काही करता येत नाही, तर निदान जे करतात, त्यांना साहाय्यभूत व्हावे, असे त्याला वाटे. ही त्याची मर्यादा पाहून त्याने शक्य तेवढेच करावे, असा मी त्याला सल्ला दिला. आमच्या दोघांच्याही वाचनाच्या आवडी-निवडी सारख्या होत्या. त्याला आवडलेली पुस्तके तो मला आणून देत असे. तो वर्षातून एक-दोन वेळा मुंबईस आपल्या नातेवाइकांकडे जात असे. त्या वेळी तो चांगली मराठी व गुजराती पुस्तके तेथून आणीत असे. त्याची मातृभाषा गुजराती होती. मला आठवते, १९३१ सालच्या मध्यावर मुंबईत त्या वेळी गाजत असलेले 'माझे रामायण' हे तुळजापूरकर यांचे पुस्तक तो माझ्यासाठी आठवणीने घेऊन आला. आज हे पुस्तक कोणाच्या लक्षात आहे, की नाही, हे मला माहीत नाही, पण त्या वेळी आम्हांला ते फार वाचनीय वाटले आणि आवडलेही. लेखनाची शैली आत्मकथेच्या स्वरूपाची होती. त्याच वेळी (माझी आठवण आहे, की) प्रसिद्ध व लोकप्रिय गुजराती कवी श्री. कलापि यांची काही कवितेची पुस्तकेही तो घेऊन आला. आठवड्यातील दोन-तीन तास त्यातील सुंदर कल्पना व सौंदर्यस्थळे तो गुजरातीतून मराठीत करून मला सांगत असे. माझ्यावर त्याचा लोभ होता. तो आमच्या हायस्कूलमधील अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता. मी शिक्षण अर्धवट टाकून चळवळीत पडतो आहे, याची तो चिंता करीत असे. पण माझे करणे अयोग्य होते, असे मात्र त्याला वाटत नव्हते.

अशा या बदललेल्या वातावरणात आमच्या कराड तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक २०-२२ जानेवारीच्या सुमारास तांबवे येथे आम्ही भरवली. त्या ठिकाणी बरेच कार्यकर्ते जमले होते. त्या कार्यकर्त्यांमध्ये काशिनाथपंत देशमुख आणि

राघूआण्णा लिमये हे प्रमुख होते. बैठकीत काही महत्त्वाचे कार्यक्रम ठरले. ग्रामीण भागात जंगल सत्याग्रह संघटित करावयाचा आणि जितके जास्तीत जास्त सत्याग्रही कारागृहात पाठविता येतील, तितके पाठवावयाचे, असा निर्णय झाला आणि त्याची जबाबदारी राघूआण्णा लिमये व काशिनाथपंत देशमुख यांनी आपल्यावर घेतली. माझ्यावर त्यांनी पहिली जबाबदारी टाकली, ती ही, की २६ जानेवारीचा दिवस हा सर्व ठिकाणी संस्मरणीय ठरेल, अशा रीतीने साजरा होईल, अशी योजना करावयाची. मी या कामाची जबाबदारी घेतली आणि कराडला परतलो. साधनांची थोडी-फार जुळवाजुळव केली आणि कराड तालुक्यातील प्रमुख गावी २६ जानेवारीला जाहीर झेंडावंदन व्हावे, अशा तऱ्हेची योजना आखली.

खुद्द कराड शहरातील २६ जानेवारीची तयारी करण्याचे काम मी माझ्या मित्रांच्या गटाकडे सोपविले. तालुक्याच्या महत्त्वाच्या चार-दोन गावांना कार्यक्रम संघटित करण्यासाठी मी दोन दिवसांची सायकल रपेट केली. दिनांक २५ जानेवारीला संध्याकाळी कराडला परत आल्यानंतर आखलेल्या कार्यक्रमाची कल्पना माझ्या मित्रांनी मला दिली. ती अशी, की शहरातील सर्व प्रमुख ठिकाणी रात्रीचे झेंडे लावावयाचे. त्यांत म्युनिसिपल कचेरीवर तिरंगी झेंडा लावणे ही मुख्य कल्पना होती. आमच्या मित्रमंडळींनी कायदेभंगासंबंधी लिहिलेली पत्रके व गांधींच्या अटकेबद्दल सरकारच्या निषेधाच्या घोषणा रात्री गावातील प्रमुख ठिकाणी चिकटवायच्या व हायस्कूलमधल्या आम्ही मुलांनी हायस्कूलच्या प्रांगणात असलेल्या झाडावर झेंडा चढवून दुस-या दिवशी सकाळी आठ वाजता झेंडावंदन करायचे. त्याप्रमाणे आम्ही कामाला लागलो. एका गटाने रात्री ११ च्या पुढे गुप्तपणे जाऊन म्युनिसिपल कचेरीवर झेंडा चढविला. हे मोठे कठीण काम होते. पण म्युनिसिपालिटीचे रक्षकच आम्हांला सामील असल्यामुळे ते सोपे झाले. त्याचप्रमाणे सर्व गावामध्ये आणखी काही प्रमुख ठिकाणी झेंडे लावले. बुलेटिन्स् चिकटविण्याच्या कामामध्ये मदत करण्यासाठी म्हणून मी आणि तात्या डोईफोडे गावात हिंडत होतो. त्यावेळी कराड शहरातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे चावडी-चौक, तात्या डोईफोडे त्या चौकात गेल्यानंतर बुलेटिन चिकटविण्याच्या कामात गुंतलेला

असतानाच पोलिसांनी त्याला पाहिले व पकडले. असे काहीसे होईल, अशी अपेक्षा होतीच. त्यामुळे आम्ही त्याची फारशी चिंता केली नाही. आम्ही आमच्या दुस-या कामाला लागलो. दुस-या दिवशी सकाळी ८ वाजता ठरल्याप्रमाणे आम्ही आमच्या हायस्कूलच्या पटांगणातील झाडाभोवती जमलो. आमच्यापैकी एकाने झाडावर चढून झेंडा फडकाविला आणि आम्ही सर्वांनी ध्वजवंदन करून झेंड्याला सलामी दिली. 'वंदे मातरम्' च्या घोषणा दिल्या. नंतर राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रम समाप्त केला आणि आपापल्या घरी परतलो. परंतु शाळेच्या तपासणीसाठी आलेले एज्युकेशनल इन्स्पेक्टर समोरच्या बहुलेकरांच्या बंगल्यात मुक्कामास होते. त्यांनी आमचा झेंडावंदनाचा हा कार्यक्रम चालू असतानाच तपशीलवार पाहिला होता. त्यांनी हे सर्व पाहिल्यानंतर शाळेच्या प्रमुख अध्यापकांकडे चौकशी सुरू केली.

इकडे पांडूतात्या डोईफोडे यांना पोलिसांनी पकडल्यानंतर आणखी कोण कोण साथीदार आहेत, याची चौकशी केली. तेव्हा मी समजून चुकलो, की माझे नाव सांगितले जाणार आणि अटक होण्याच्या तयारीनेच शाळेत जायला पाहिजे. त्याप्रमाणे ११ वाजता मी नित्याप्रमाणे शाळेत गेलो. शाळा सुरू झाली आणि माझ्या वर्गात बसलो. शाळेचा तास चालू होता. पण माझे त्यात लक्ष नव्हते. शाळेचा चालू असलेला तास संपण्यापूर्वीच हेडमास्तर एका पोलिस अधिका-याला घेऊन आमच्या वर्गात आले. त्यांनी मला बाहेर बोलावून घेतले.

आम्ही हेडमास्तरांच्या कचेरीत गेल्यानंतर पोलिस अधिका-याने सकाळच्या झेंडावंदनाची आणि बुलेटिनची वगैरे माहिती विचारली. तात्या डोईफोडे यांनी माझे नाव सांगितले असल्याची गोष्ट मला सांगितली. त्यांना मी सांगितले,
"हो, मी हे सर्व केले आहे. आणि असे करत राहण्याचा आमचा निर्धार आहे."

पोलिस अधिका-याने हेडमास्तरांना सांगितले,
"मी ह्या विद्यार्थ्याला अटक करतो आहे आणि घेऊन जातो आहे. त्याच्या पालकांना कळवा."

... आणि अशा रीतीने माझी पहिली शास्त्रशुद्ध अटक झाली.
सबंध दिवसभर पोलिस-कचेरीत मला बसवून ठेवले. ते अधूनमधून माझ्याजवळ येत व माझ्याकडून काही अधिक माहिती मिळते का, याची चौकशी करीत. परंतु मी त्यांना काहीही अधिक सांगायचे टाळत होतो. दिवसभर प्रयत्न करूनही माझ्याकडून काही जास्त माहिती मिळत नाही, असे पाहिल्यानंतर रात्र होताच त्यांनी मला तुरूंगात एका कोठडीत ढकलले.

माझ्या घरच्या मंडळींना ही बातमी कळलीच होती. पण त्यांना करता येण्याजोगे काहीच नव्हते.
ती पहिली रात्र मी कशी काढली, याची माझी आठवण अगदी ताजी असल्यासारखी आहे.

दहा बाय् बाराची खोली. अंधाराने भरलेली. पोलिस कस्टडीच्या बाहेर व्हरांड्यात असलेल्या खांबावरच्या दिव्याचे जे काही क्षीण प्रकाशकिरण त्या कोठडीपर्यंत पोहोचत, तेवढाच काय तो प्रकाश. मी खोलीच्या आजूबाजूला पाहिले, तर माझ्याशिवाय आणखी दोन माणसे त्यात होती.

मला वाटले होते, कदाचित मला तात्या डोईफोडे यांच्याबरोबर ठेवतील, परंतु तात्या त्यांत नव्हते. दोन्हीही सामान्य, नित्याचे कैदी असावेत परंतु त्यांतला एक मोठा धिप्पाड गृहस्थ असावा, असे वाटत होते. त्याच्या हातांत व पायांत बेड्या होत्या. पण त्या मला दुस-या दिवशी दिसल्या.

या नव्या गुदमरणा-या वातावरणात सुरुवातीला मला झोप आली नाही. पण गेले चार-पाच दिवस मी इतका फिरत होतो आणि दिवसभर उपाशी असल्यामुळे इतका थकलो होतो, की नंतर झोप केव्हा लागली, हे मला कळलेच नाही.

सकाळी जागा झालो, तेव्हा माझ्या खोलीतील त्या दोन लोकांना मी पाहिले. आम्ही

नंतर एकमेकांशी बोललो. तेव्हा एक निराळाच अनुभव आला. हाता-पायांत बेड्या असणारा हा माणूस कुठल्या तरी संस्थानातील कैदी होता. कराडच्या मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत त्याच्यावर दुसरा खटला होता, म्हणून त्यासाठी त्याला तेथे आणला होता. अंगावर शिक्षा झालेल्या कैद्याचे कपडे होते. हातांत आणि पायांत बेड्या होत्या.
मी त्याला विचारले,
"हे सर्व असे का?"
त्याने सांगितले,
"मी तुरचीचा कृष्णा धनगर आहे."

नाव ऐकताच माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तुरचीचा तात्या आणि कृष्णा ही एक जोडी त्यावेळी नामांकित होती. त्यांच्यापैकी हा असावा.

त्याचे व्यक्तिमत्त्व फार आकर्षक होते. उणा-पुरा सहा फूट उंच, गोरापान, नाक - डोळे अतिशय तरतरीत, हनुवटीवर अणकुचीदार दिसणारी बरीच वाढविलेली दाढी, हातापायांत खळखळ वाजणा-या त्याच्या बेड्या.

हे त्याचे रूप पाहून माझी तबियत मोठी खूश झाली. माझ्या मनात उगीचच विचार येऊन गेला, की 'राजसंन्यास'नाटकाच्या शेवटच्या प्रवेशात बंदी असलेल्या संभाजीचे चित्र असेच काहीसे असले पाहिजे.

मी कराड जेलमध्ये असेतोपर्यंत कृष्णाची आणि माझी मोठी दोस्ती झाली. त्यालाही आम्हां मंडळींच्या चळवळीबद्दल काहीसे कौतुक होते. तो बाहेर चाललेल्या गोष्टींच्या हकीकती विचारू लागला आणि मीही त्या सांगू लागलो.

काही दिवस गेल्यानंतर एके दिवशी मला आणि तात्या डोईफोडे यांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. आम्हांला आमच्यावरचे आरोप वाचून दाखविण्यात आले,

आम्ही गुन्हा कबूल केला. मॅजिस्ट्रेटचे काम सोपे होते. त्याने तातडीने आम्हांला अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली आणि खटल्याचे काम संपले.

एक मिनिटापूर्वी आम्ही कच्चे कैदी होतो. आता पक्के झालो होतो. त्या वयात अठरा महिने घरापासून आणि गावापासून दूर राहण्याची कल्पना मलाही थोडीशी अस्वस्थ करणारी वाटली. आमच्या काँग्रेस पक्षातर्फे हजर असलेल्या वकिलांनी मला सांगितले,
"तुम्हांला जास्त शिक्षा केली आहे. त्याचे कारण इतरांना दहशत बसावी."

हे कदाचित शक्यही असेल, पण आता अठरा महिने राहणे भागच आहे, तेव्हा हे आनंदाने स्वीकारले पाहिजे, असे मी माझ्या मनाला सांगू लागलो.

शिक्षेच्या दुस-या दिवशी आई आणि घरची सर्व मंडळी भेटायला आली. त्यांच्याबरोबर आमच्या मराठी शाळेतले एक जुने शिक्षकही आले होते. पोलिसांनी मला कोठडीतून बाहेर काढले आणि त्यांच्या पहा-यातच मला फौजदार कचेरीकडे नेण्यात आले. फौजदारांच्या उपस्थितीतच आईची भेट झाली. मला पाहताच आईच्या डोळ्यांत पाणी आले. मी वयाने पोरसवदा, त्यातून शिक्षा अशी दीर्घ मुदतीची. त्यामुळे आईचे रडणे स्वाभाविक होते. मास्तर आमचे सांत्वन करीत होते. मध्येच ते मला म्हणाले,
"फौजदारसाहेब दयाळू आहेत. माफी मागितलीस, तर सोडून देतील."

"काय बोलता तुम्ही, मास्तर? माफी मागायची? माफी मागायचे काहीएक कारण नाही. तब्येतीची काळजी घे, म्हणजे झाले, देव आपल्या पाठीशी आहे." आई हे बोलली आणि उठूनही गेली.
आमची भेट संपली.

आईच्या या स्वाभिमानी गुणाचा ठेवा अंतःकरणात जतन करून मी कोठडीत परत आलो. मनाने मी निश्चिंत झालो.

आज हा प्रसंग आठवतो, तेव्हा आईचा हा मोठेपणा मला किती उदात्त वळण देऊन गेला, हे जाणवते.

नंतर माझ्या खोल्या बदलण्यात आल्या. मी ज्यावेळी जेलमध्ये होतो, त्याचवेळी आमच्या कराडमधले प्रसिद्ध समाजसेवक बाबूराव गोखले यांनाही अटक होऊन अशीच काही तरी एक वर्षाची शिक्षा झाली होती. तेही याच जेलमध्ये होते. मला माझ्या कृष्णा धनगराच्या खोलीतून काढून बाबूरावांच्या खोलीत एक दिवसासाठी ठेवण्यात आले. एक-दोन दिवसांत आमची येरवड्यास रवानगी होणार होती.

एका संध्याकाळी पोलिस पहा-यात आम्ही रेल्वेने पुण्याकडे निघालो. वाटेत वेगवेगळ्या स्टेशनवर ठिकठिकाणचे आमच्यासारखेच अटक केलेले कायदेभंगाचे सत्याग्रही आमच्या या ताफ्यात येऊन मिसळत होते. आम्ही पुणे स्टेशनवर पोहोचेपर्यंत जवळजवळ ही संख्या आठ-दहा झाली.

पुण्याहून सकाळी येरवडा जेलमध्ये जाण्यासाठी आलेल्या मोटारीतून आम्ही जेलकडे निघालो. जेलच्या दारासमोर गाडी उभी राहिली आणि आम्ही सर्व मोटारीतून खाली उतरलो. वाघाच्या जबड्यासारखा असलेला तो जेलचा दरवाजा मी प्रथम पाहिला आणि मनाशी म्हटले, आता या जबड्यात प्रवेश करायलाच पाहिजे. जेलचे तपासनीस पुढे आले आणि त्यांनी प्रत्येक कैद्याची पाहणी केली. त्यांपैकी फक्त बाबूराव गोखले यांना 'बी क्लास' असल्यामुळे दरवाज्यातून आत घेतले, आणि आम्हां बाकीच्यांना पुन्हा गाडीत बसायला सांगून हुकूम सोडला.
"या लोकांना कॅम्प जेलमध्ये घेऊन जा,"

मी तर आश्चर्यचकित झालो. मी त्या दरवाज्याच्या आत जायच्या तयारीत असताना हा कॅम्प जेल पुन्हा कसला काढला, या विवंचनेत राहिलो.

येरवडा जेलच्या पाठीमागेच, पण सर्व जेलला चक्कर टाकून आल्यानंतर जे मोकळे मैदान होते, त्यामध्ये तारेच्या काटेरी कुंपणाचे एक मोठे वर्तुळ बांधून तयार केले होते आणि आत सर्वत्र तंबूच्या बराकी उभ्या होत्या.

त्या बराकी पाहून मला काहीसे हलके वाटले. माझ्या मनाशी विचार येऊन गेला, की हा तर सोपा जेल आहे. आमच्या आधी आलेले शे-दोनशे लोक त्या एवढ्या मोठ्या कॅम्प जेलमध्ये इतस्ततः हिंडताना पाहिले. त्यांच्या अंगांवरचे कपडे पाहून ते आमच्यासारखेच सत्याग्रही असावेत, हे उघड होते. या कॅम्प जेललाही असेच मोठे काटेरी तारेच्या कुंपणाचे प्रवेशद्वार होते. त्यातून त्यांनी आम्हांला आत घेऊन शिक्षा झालेल्या कैद्यांचा पेहराव आम्हांला दिला आणि आमचे कपडे व इतर सामान आपल्या ताब्यात घेतले. कोणीतरी येऊन आमच्या हातामध्ये जेलची जेवणाची थाळी, पाणी पिण्याचे भांडे आणि बिस्तरा आणून दिला. काखेत आपापला बिस्तरा आणि थाळी घेऊन आमची रपेट आत निघाली आणि आम्ही कॅम्प जेलचे बराक गावचे रहिवासी म्हणून मुक्कामासाठी बराकीमध्ये प्रवेश केला.

या कॅम्प जेलमध्ये मी १९३२ च्या फेब्रुवारीमध्ये आलो व तेथे संपूर्ण एक वर्ष होतो आणि त्यानंतरचे तीन महिने विसापूर जेलमध्ये होतो. अठरा महिन्यांच्या शिक्षेपैकी पंधरा महिने मला प्रत्यक्ष जेलमध्ये काढावे लागले आणि १९३३ च्या मे महिन्यामध्ये सुटून मी बाहेर आलो.

जेलमधले पंधरा महिन्यांचे माझे जीवन म्हणजे माझ्या जीवनातला एक अत्यंत उत्तम काळ होता, असे आजही मला वाटते. त्याचे कारण मी आता सविस्तरपणाने

सांगू शकतो. मी एक गोष्ट कबूल केली पाहिजे, की माझ्या जीवनात भावनाशीलता कमी होऊन विचारांची खोली वाढविण्याची प्रक्रिया या जेलमध्येच सुरू झाली.

पहिले आठ दिवस मी असेतसेच काढले. तुरूंग हळूहळू भरत होता. एका आठवड्याच्या आत त्या जेलमध्ये जवळजवळ हजाराच्या वर कार्यकर्ते आले. या लोकांची वेगवेगळ्या बराकींमध्ये वाटणी करून त्यांची व्यवस्था लावण्याचे काम आम्हां सत्याग्रहींपैकी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आपल्या हाती घेतले. बराकींना नंबर देण्यात आले. या लोकांची त्यामध्ये बराक नंबर १२ या एका महत्त्वपूर्ण बराकीची निर्मिती झाली. ही बराक नंबर १२ मी जन्मभर विसरू शकणार नाही. जी प्रमुख माणसे जेलमध्ये आली होती, त्यांतील निवडक व नामवंत माणसांना या बराकीत घ्यायचे, असे कोणी तरी पुढाकार घेऊन ठरविले आणि त्याच मंडळींनी हायस्कूल व कॉलेज शिक्षण अर्धवट सोडून याव्या लागलेल्या विद्यार्थ्यांना याच बराकीत ठेवावे, असे सुचविले. त्यामुळे माझी या बराकीत निवड झाली आणि या बराकीतील आमचा बंदिस्त जीवनक्रम सुरू झाला.

प्रत्येक बराकीत शंभर माणसे राहतील, अशी व्यवस्था होती. बारा नंबरच्या बराकीमध्ये अगदी निवडक शंभर माणसे होती. त्यामध्ये प्रमुख नावे सांगावयाची झाली, तर आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन यांची नावे प्रथम सांगावी लागतील. तसेच या बराकीचे सुरुवातीला तेच प्रमुख होते, असे म्हटले, तरी चालेल. रावसाहेबांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि इंग्रजीवरचे प्रभुत्व यांमुळे नवीनच आलेल्या जेल अधिकाऱ्यांनी त्यांना ऑफिसमध्ये येऊन कामात मदत करण्याची विनंती केली. रावसाहेबांनी ती मान्य केली आणि ते रोज ऑफिसमध्ये जाऊ लागले. रावसाहेबांच्या ऑफिसमध्ये जाण्यामुळे एक उत्तम फायदा झाला. त्यांनी अधिकाऱ्यांची मने वळवून राजबंद्यांना वाचण्यासाठी सर्व तऱ्हेची, सर्व विषयांवरील पुस्तके मिळविण्याची व्यवस्था केली. मुंबई, पुणे येथील कार्यकर्त्यांच्या व जाणत्या मित्रांच्या सहकार्यामुळे लायब्ररीतून आणि इतरही काही ठिकाणांहून नानाविध पुस्तके जेलमध्ये येऊ लागली. राष्ट्रीय चळवळीतील काही लोकांनी तर अशा तऱ्हेने

राजकीय कैद्यांना पुस्तके पुरविण्याचे काम हेच आपले राष्ट्रीय काम मानले होते. त्यामुळे थोड्याच दिवसांत बारा नंबरच्या बराकीमध्ये एक चांगल्यापैकी लायब्ररी स्थापन झाली, असे म्हटले, तरी हरकत नाही. अर्थात या पुस्तकांचे महत्त्व मला पहिल्या प्रथम समजले नाही. ही गोष्ट खरी.

जाणते लोक बराकीत येऊन विविध विषयांवर चर्चा होऊ लागल्या आणि जेलमध्ये आमचे वास्तव्य अधिक समृद्ध व सुसंघटीत होऊ लागले. आमच्या दिनचर्या नियमाने बांधल्या गेल्या.

आम्हांला खरे तर सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या होत्या. पण आम्हां सर्वांना देण्यासारखे कठीण कामच तेथे नव्हते. पाच-पन्नास लोकांच्या गटाला ते दोन-चार तास जेलबाहेर घेऊन जात आणि कुठेतरी दगड एकत्र करून नवीन रस्ता बांधण्याचे काम त्यांनी सुरू केले होते, तेथे कामाला लावत. पण तो रस्ता कधीच पुरा झाला नाही.

पुढे तर त्यांनी हे बाहेरील कामही बंद केले. बराकीमध्येच कापडी पट्टे विणण्याचे बैठे काम आम्हांला त्यांनी शिकविले. दररोजचा आमच्या विणकामाचा जो ठराविक वाटा होता, तो बराकीतल्या बराकीत पुरा केल्यावर आम्हांला बाकी सर्व दिवस मोकळा होता.

बराकीतल्या लोकांच्या आता अधिक ओळखी होऊ लागल्या. तेव्हा माझ्या लक्षात आले, की महाराष्ट्रातील फार महत्त्वाची माणसे या बराकीत राहायला आली आहेत. यांमध्ये पुण्याचे श्री. अतीतकर, आयुर्वेदतज्ज्ञ मामा गोखले, श्री. वि. म. भुस्कुटे होते. श्री. एस् .एम्. जोशी होते. तसेच त्यांत टिळक महाराष्ट्र विद्यापीठात व पुण्याच्या आयुर्वेद विद्यालयात शिकणारे काही विद्यार्थी होते. तसेच अहमदनगरच्या राष्ट्रीय शाळेतीलही विद्यार्थी बरेच होते. कोणी अंडरग्रॅज्युएट होते, तर कोणी मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते, कोणी मॅट्रिक परीक्षेला बसणारे माझ्यासारखे

चार-सहा जण होते. या दृष्टीने हा एक मोठा वेगळा स्वरूपाचा संच तेथे जमला होता, असे मला वाटू लागले.

या सर्व मंडळींची ओळख-पाळख व्हायला आठवडा, दोन आठवडे गेले. बराकीत अंथरूणाला अंथरूण लागून बिस्तरे टाकले गेले होते आणि प्रत्येकाचा बिस्तरा म्हणजे जणू काही होस्टेलची रूम, असे त्याचे स्वरूप असे. कामाशिवाय असलेला वेळ आपापल्या बिस्त-यावर बसून किंवा वाचन करून घालवावयाचा, असा कार्यक्रम चालू होता. हळू हळू त्यातून एक संघटित स्वरूप निर्माण झाले. समविचाराची माणसे एकत्र आली. शारीरिक खेळांची, किंवा पत्ते वगैरे बैठ्या खेळांची आवड असणारी माणसे एकत्र आली. गंभीर वाचन करून वैचारिक चर्चा करणाऱ्यांचा एक स्वतंत्र ग्रुप तयार झाला. शंभर माणसांच्या छोटेखानी समान घटकांमध्ये त्यांची वेगवेगळी अशी अंगे प्रस्थापित झाली.

आचार्य भागवत यांनी एकदा मला आणि माझ्याइतकेच शिक्षण झालेल्या लोकांना एकत्र बोलाविले आणि सांगितले,
"तुम्ही तुमचा येथील वेळ, बुद्धी आणि मन संस्कारित करण्याच्या प्रयत्नांत घालवा. परीक्षेला बसता येईल किंवा नाही, हे सांगता येत नाही; पण एवीतेवी तुम्ही देशभक्तीच्या कार्यात उडी टाकलेली आहे, तेव्हा होणा-या परिणामाची पर्वा करू नका. पण जेव्हा केव्हा वेळ मिळेल, तेव्हा येथे असलेल्या माणसांची ओळख करून त्यांच्या सहवासाचा लाभ घ्या. तसेच येथे उपलब्ध होणारी पुस्तके वाचून त्यांचाही उपयोग करून घ्या."

मला तर हेच हवे होते. म्हणून माझ्यासारखीच असणारी जी तरुण मुले होती, त्यांच्याशी मी याबाबत बोललो. त्यांमध्ये पांडुतात्या डोईफोडे होते, सेनापती बापट यांचे चिरंजीव वामन बापट होते, पुण्यातील प्रसिद्ध डॉक्टर लागू यांचे कनिष्ठ बंधू होते, सोलापुरचे भोसले होते, माझे कऱ्हाडचे मित्र कोपर्डेकर होते. आम्ही विचार

केला, की आपण एखाद्या वर्गासारखे एकत्रितपणे काही नवीन काम सुरू करू या आणि त्यासाठी येथे असलेल्या विद्वान मंडळींची मदत घेऊ या.

या वेळेपर्यंत आणखी काही नवे सत्याग्रही आमच्या बराकीत भरती होत होते. त्यांमध्ये माझे मित्र राघूआण्णा आले, शिवाय ह. रा. महाजनी हेही आले. कर्नाटकामधली एक-दोन ज्ञाती मंडळीही या बराकीची सदस्य होती. ह. रा. महाजनी माझ्या जिल्ह्यातले, म्हणून चांगलेच परिचित होते. मी त्यांना आचार्य भागवतांनी मला दिलेला सल्ला सांगितला, 'तुम्ही या कामात सहकार्य कराल काय', असे विचारले. ते स्वतः वाङ्मयविशारद होते. संस्कृतचे मोठे पंडित होते. आधुनिक शास्त्रांचेही वाचन ते करीत होते. आम्ही तर आमच्या जिल्ह्यामध्ये त्यांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे 'महाजनीशास्त्री' या नावानेच त्यांना संबोधीत होतो. महाजनींनी सुचविले, की या सर्व विद्यार्थी मंडळींना जमवून आपण कालिदासाचे 'शाकुंतल'चे वाचन करू या. त्यांच्याजवळ ते पुस्तक होते व ते बरोबरच घेऊन आले होते. आणि मग दुस-या दिवसापासून आमचा हा 'शाकुंतल' वाचनाचा वर्ग सुरू झाला. कालिदासाची आणि माझी जुनी ओळख 'मेघदूता' पासून होती. आता महाजनींसारखा पटाईत संस्कृततज्ज्ञ आणि उत्तम शिक्षक आम्हांला 'शाकुंतल' शिकवू लागल्यामुळे हा वाचन-वर्ग बराच लोकप्रिय झाला. त्यामुळे आम्हां विद्यार्थ्यांखेरीज इतर मंडळीही त्या वर्गाला येऊन बसू लागली.

अशा तऱ्हेचे अनेक बौद्धिक व शैक्षणिक वर्ग बराकीच्या वेगवेगळ्या कोनाकोपऱ्यांत सुरू करण्याचे प्रयत्न झाले.

आमचे 'शाकुंतल' चे वर्ग सुरू झाल्यानंतर काही दिवसांनी आचार्य भागवतांनी आम्हांला शेक्सपियरचे एक नाटक शिकविण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे त्यांनी निवड केली 'ज्यूलिअस सीझर' या नाटकाची. आम्हां विद्यार्थ्यांचे इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंतचे होते, तेव्हा शेक्सपियरच्या अभ्यासासाठी ते उपयोगी पडू शकेल, की नाही, याची आम्हांला शंका होती, पण आचार्य भागवत हे हाडाचे शिक्षक होते.

त्यांनी फार परिश्रम घेऊन नाटकाची पार्श्वभूमी, ज्यूलिअस सीझरचे इतिहासातले महत्त्व आणि या नाटकातील इतर व्यक्तिरेखा व सौंदर्यस्थळे इतक्या कौशल्याने सांगायला सुरुवात केली, की शाकुंतलचा वर्ग जसा लोकप्रिय झाला, तसाच हाही झाला. ज्यूलिअस सीझरच्या आणि शाकुंतलच्या या वर्गाच्या कीर्तीमुळे इतर विद्वान मंडळींनीही अशाच प्रकारचे वर्ग बराकीत सुरू केले.
हे दोन्ही प्रयोग जवळ जवळ महिनाभर चालू होते. त्यानंतर आमचाही आत्मविश्वास वाढला. इतर इंग्रजी पुस्तके वाचण्याची आमची इच्छा जागी झाली. कधी इतरांच्या शिफारशीवरून, तर कधी आपल्या आवडीवरून आम्ही पुस्तके निवडू लागलो व वाचू लागलो. वाचनाची दिशा आणि खोली बदलू लागली.

या जेलच्या वर्ष, सव्वा वर्षाच्या संपूर्ण मुक्कामात पुढच्या विद्यार्थी-जीवनात जितके वाचले नसेल, तितके मी वाचून घेतले.

राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध याचाही आता बराकीमध्ये चर्चेच्या रूपाने व्यासंग सुरू झाला होता.

आचार्य भागवत हे कट्टर गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते आणि गांधीवादाची ते बौद्धिक दृष्ट्या उकल करून सांगत असत. महात्मा गांधी हे निव्वळ राजकीय पुढारी आहेत, असे नसून मानवी विचारांच्या परिपक्वतेत भर घालणारी अशी नवी दृष्टी त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाने दिली आहे असे ते सांगत असत. गांधीवादी विचार हा भारतीय संस्कृतीतून निर्माण झालेला एक नवीन जीवन-दृष्टिकोन आहे आणि त्या विचारांना जशी काही मूलभूत आर्थिक सिद्धांताची बाजू आहे, तशीच राजकीय बाजूही आहे. तसेच त्या विचाराना काही शास्त्रीय पायाही आहे. किंबहुना ते जीवनाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. अहिंसा आणि सत्य हे नुसते दोन शब्द नसून एकाच तत्त्वप्रणालीच्या दोन बाजू आहेत. आचार्य भागवत आपले हे विचार मोठ्या आक्रमक पद्धतीने मांडत असत आणि मग यावरती चर्चा व वाद सुरू होत असे.

आम्ही सर्वच कार्यकर्त्यांनी गांधींचे राजकीय नेतृत्व मान्य केलेले होते; परंतु सर्वांनीच त्यांचे तत्त्वज्ञान स्वीकारलेले होते किंवा सर्वांना ते समजलेले होते, असे म्हणता येण्यासारखे नव्हते. या चर्चांमुळे विचारांतील मूलभूत फरक आणि त्यांतील फरकांच्या सूक्ष्म छटा ध्यानात यायला मदत झाली. आचार्य भागवत प्रतिपादतात, त्या अर्थाने मी गांधीवाद स्वीकारला आहे काय? असा प्रश्न मी स्वतःला विचारू लागलो आणि त्याचे उत्तर होकारार्थी येईना. माझ्या मनात हा संघर्ष पुढे कित्येक वर्षे चालणार होता, याचीही मला यावेळी कल्पना नव्हती.

गांधीवादाच्या चर्चेबरोबर समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सुरू झाली आणि त्याला पोषक असे वाङ्मयही आम्हां लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने नियमित, सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे आणि काय वाचू नये, असे वाटावे, इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला होता. एस. एम्. जोशी, ह. रा. महाजनी ही तरुण मंडळी गांधीवाद स्वीकारलेल्यांपैकी दिसत नव्हती. त्यांच्या मनात त्यासंबंधी अनेक शंका होत्या व ते त्या वेळोवेळी विचारत असत. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का, असे प्रश्न उभे करीत आणि त्यांचे हे प्रश्न बरोबर आहेत असे मला वाटे.

वि. म. भुस्कुटे हे मार्क्सवादाचे नवे भोक्ते होऊ घातले होते. त्यांच्या मताने निव्वळ समाजवादाची पोकळ भाषा बोलून काही काम भागणार नाही, तर समाजवादाचा शास्त्रीय विचार करून त्या विचाराची पद्धती राजकीय लढ्यात स्वीकारल्याशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही, असे विचार ते मांडत.

गांधीवाद, समाजवाद व मार्क्सवाद या तिन्ही गोष्टींपेक्षाही वेगळा दृष्टिकोन ठेवून विचार करणारीही मंडळी होती. त्यांचे म्हणणे असे, की हे असे तात्त्विक आग्रह निरर्थक आहेत. टिळक, गांधी यांनी स्वराज्याची जी मागणी केली आहे, त्या

मागणीसाठी ते जे सांगतील, ते आचरणात आणून इंग्रजांशी लढत राहिले पाहिजे आणि हेच आपणां सर्वांचे काम आहे. तत्त्वज्ञानाच्या घटपटादी वादामध्ये पडण्यात काही अर्थ नाही. यामुळे उगीच बुद्धिभेद आणि माणसे एकमेकांपासून दूर जातात.

आमच्या बराकीत चाललेल्या विविध विचारांचे हे धावते चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर माझे विचारविश्व बनत होते. केव्हा केव्हा असे होई, की ज्यांचे म्हणणे ऐकावे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे, असे वाटे. पण मग सगळ्यांचेच म्हणणे बरोबर कसे असेल? कोणते तरी एकच म्हणणे बरोबर असेल. मग ते कोणते? याचा निर्णय आपणच आपल्या मनाशी केला पाहिजे. शेवटी मी मनाशी ठरविले, की कोणताही निर्णय, कोणी सांगितले, म्हणून आपण स्वीकारावयाचा नाही. विचारांच्या क्षेत्रातील निर्णय हा आपला आपणच केला पाहिजे आणि त्यासाठी आपण वाचन केले पाहिजे. चिंतन केले पाहिजे. जेलमध्ये तर वाचन केलेच पाहिजे; परंतु जेलच्या बाहेर गेल्यानंतरही वाचन व चिंतन सुरू ठेवले पाहिजे. प्रत्यक्ष जनतेत काम करीत असताना आलेल्या अनुभवाच्या आधारे यासंबंधीचे निर्णय घेतले पाहिजेत.

प्रथमतः मला अवघड वाटणा-या आणि माझ्या काहीशा आवाक्याच्या बाहेर असणा-या पुस्तकांच्या वाचनाला मी हात घातला. इग्रंजी शब्दकोशाचा वारंवार उपयोग करून आणि अवतीभोवतीच्या मित्रमंडळींशी चर्चा करून मी बरट्रँड रसेल यांचे 'रोडस् टु फ्रीडम' हे पुस्तक वाचले. जवळ जवळ एक महिनाभर मी हे पुस्तक वाचत होतो. या पुस्तकाच्या वाचनामुळे विचारांच्या दिशा किती व्यापक आहेत, याचा अंदाज आला. आणि स्वातंत्र्याचा हा प्रश्न केवळ हिंदुस्थानपुरता मर्यादित नसून सर्व मानवजातीमध्येच या प्रकारच्या विचाराने खळबळ माजविली आहे, याचीही कल्पना आली. शास्त्रीय दृष्टीने विचार कसा करावा, याचा पहिला अनुभव मला रसेलच्या या पुस्तकाच्या वाचनातून आल्यासारखा झाला.

या पुस्तकाच्या वाचनानंतर आपण आणखी काही इंग्रजी पुस्तके वाचू शकू, असा

आत्मविश्वास माझ्या मनात आला. आणि त्याप्रमाणे गांधीजींच्या जीवनावर, लेनिनच्या जीवनावर असलेली पुस्तके मी पाहू लागलो.

मार्क्सवादाच्या मला समजणा-या वाङ्मयाबरोबर रशियन राज्यक्रांतीबद्दलही मी बरेचसे वाचले. 'टेन डेज, दॅट शुक द वर्ल्ड' हे जॉन रीड् यांचे पुस्तक बाराव्या बराकीत फार लोकप्रिय झाले होते. मी त्या पुस्तकावरील चर्चा आणि त्याचे प्रत्यक्ष वाचन या दोन्ही तऱ्हांनी पुस्तक समजावून घेण्याचा प्रयत्न केला. रशियन राज्यक्रांतीची सगळी कहाणी रोमांचकारी आहे. आणि त्यातील लेनिनचे कार्य जागतिकदृष्ट्या ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची फार मोठी छाप माझ्या मनावर पडली. रशियन राज्यक्रांती ज्या प्रकाराने झाली, त्या प्रकारे इतर देशांत राज्यक्रांती होईल, की नाही, हे सांगणे अवघड आहे. किंबहुना हे काम जरा अवघड आहे, अशीच त्यावेळी माझी भावना होती. परंतु लेनिन यांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून निर्णय घेण्याच्या शक्तीबद्दल अचंबा वाटत राहिला. आणि लेनिनसंबंधी वाटणारी आदराची भावना तेव्हापासून जी मनात बसली, ती त्यानंतरही आजपर्यंत वाढत राहिली आहे.

लेनिनसंबंधीच्या गोष्टी डॉक्टर शेट्टी आणि ह. रा. महाजनी यांच्याशी बोलत असतानाच त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय या हिंदी कम्युनिस्ट नेत्याचा उल्लेख केला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यांनी देशत्याग करून कशा प्रकारे वनवास पत्करला, आणि हे वनवासाचे जीवन भटकत काढत असताना मेक्सिकोमध्ये त्यांनी कम्युनिझमचा स्वीकार कसा केला, त्याचप्रमाणे रशियन राज्यक्रांतीनंतरच्या बांधणीच्या काळात आंतरराष्ट्रीय कम्युनिझमच्या प्रसारानिमित्त उभारलेल्या संघटनेत रॉय यांनी लेनिनच्या बरोबर काही वर्षे काम कसे केले, या संबंधीच्या हकीकती त्यांनी मला विस्ताराने सांगितल्या. या हिंदी नावासंबंधी मला एक नवी जिज्ञासा वाटू लागली. डॉक्टर शेट्टी हे या सत्याग्रहात जेलमध्ये आले असले, तरी ते मानवेंद्रनाथ रॉय यांचे वैचारिक साथी होते, असे नंतर त्यांनी आम्हांला सांगितले. त्याचप्रमाणे मानवेंद्रनाथ रॉय हे त्यावेळी जेलमध्ये

होते, तरी तेथून आपल्या सर्व मित्रमंडळींशी ते पत्रव्यवहाराने कसा संबंध ठेवतात, आणि आपले विचार कळवीत असतात, याची काहीशी गुप्त माहितीही त्यांनी मला सांगितली.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नावाशी माझी पहिली ओळख अशी झाली आणि पुढे त्यांच्या विचारांशी असलेला संबंध काहीसा वाढत गेला. परंतु प्रथमच मी त्यांच्यासंबंधी येथे ऐकले, म्हणून मी याचा उल्लेख या ठिकाणी करीत आहे.

जेलमधून बाहेर पडल्यानंतर मी माझ्या अनेक सहकारी मित्रांच्या सोबतीमुळे आणि आग्रहामुळे काही काळ रॉय यांच्या विचारांचा पाठपुरावा केला होता. पण ती पुढची कहाणी आहे.

या राजकीय स्वरूपाच्या पुस्तकांच्या वाचनाबरोबरच वाङ्मयाच्या वाचनाची माझी आवड जुनी होती. तिला आता नवा अर्थ प्राप्त झाला. आचार्य भागवतांच्या बिछान्याभोवती रोज संध्याकाळी आम्हां अनेक जिज्ञासू सत्याग्रहींचा गराडा पडलेला असे.

आचार्य भागवत हे सर्वंकष बुद्धीचे गृहस्थ होते. प्रखर विद्वत्ता आणि तितकीच परखड वाणी ही त्यांची दोन मोठी आयुधे होती आणि ते अनेक विषयांवर तासन् तास बोलत असत. आणि ते निव्वळ ऐकूनसुद्धा कोणी मनुष्य बहुश्रुत, ज्ञानी झाला असता !

आचार्य भागवतांच्या श्रोत्यांतला मी एक कायमचा श्रोता होतो. बोलण्यापेक्षा ऐकण्यावर मी तेव्हापासून अधिक भर देऊ लागलो.

एकदा बोलता बोलता सहज त्यांनी बॅरिस्टर सावरकर यांच्यासंबंधी उल्लेख केला. त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणावर त्यांनी सपाटून टीका केली. आचार्य भागवतांनी

सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येसंबंधी विश्लेषण केले. या हिंदुत्वाच्या पायावर जर आम्ही राजकारण उभे करण्याचा प्रयत्न केला, तर भारताचे रहिवासी असलेल्या अनेकविध धर्मांतील लोकांची एकता कशी साधणार? जनतेची एकता हा स्वातंत्र्याचा प्राण आहे. या हिंदुत्वाच्या आग्रहामुळे जनता एकसंध राहू शकणार नाही, म्हणून हा प्रतिगामी विचार आहे. भागवतांच्या टीकेचा हा सारांश होता. मला ही टीका पटली. ओघाओघाने कोणी तरी त्यांना विचारले,
"साहित्यिक म्हणून सावरकरांबाबत तुम्हांला काय वाटते?"
मघाशी त्यांच्यावर राजकीय टीका करणारे आचार्य भागवत एकदम बदलून गेले. त्यांच्या मनामध्ये, त्याचप्रमाणे बोलण्यामध्ये एक प्रकारचा हळुवारपणा निर्माण झाला आणि त्यांनी सांगितले,
"मला अत्यंत प्रिय आहेत, ते कवी सावरकर."

एवढेच नव्हे, तर दुस-या दिवसापासून सावरकरांचे 'गोमंतक' आणि 'कमला' यांचे प्रकट वाचन सुरू करणार असल्याचे जाहीर करून ज्यांना कोणाला यायचे असेल, त्याने यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आता 'गोमंतक' आणि 'कमला' या काव्यांच्या वाचनासाठी आम्ही सर्व मंडळी दररोज जमू लागलो.

सावरकरांच्या या काव्याचा आस्वाद घेण्याची संधी मला प्रथमच मिळाली. त्यांतील 'कमला' काव्याची गोडी तर अवीट आहे. त्याची भाषा, त्यातल्या भावना आणि त्याच्यामध्ये असलेली देशप्रेमाची उत्कटता ही तरुण मनाला मोहून टाकणारी होती. मी यापूर्वीच सावरकरांची कविता का वाचू शकलो नाही, याचे मला आश्चर्य वाटू लागले.

या सामुदायिक वाचनानंतर इतरही काही पुस्तकांच्या सामुदायिक वाचनाची पद्धतही आमच्या बराकीमध्ये रूढ झाली. याचे नेतृत्वही आचार्य भागवत यांच्याकडे होते. ते

उत्तम शिक्षक असल्यामुळे आपल्याला जे आवडते आणि माहीत आहे, ते सर्वांना सांगून जाणते करावे, हा त्यांचा स्वभावधर्म होता. आणि त्यामुळे ते मोठ्या आनंदाने हे काम करीत असत. या तऱ्हेने शिक्षण देण्याची त्यांना हौस होती, पण त्याचबरोबर अर्धवट, अपु-या तऱ्हेने वाचन करणा-या लोकांवर त्यांचा राग होता.

मला एकदा आठवते, एक चांगले वकील असलेले गृहस्थ 'गीतांजली' वाचत होते. त्यांना काही शंका उद्भवल्या, म्हणून ते आचार्य भागवत यांना विचारू लागले.

"आचार्यजी, मी 'गीतांजली' वाचतो आहे, परंतु त्यातला दाऊ (Thou) आणि हिम (Him) यांचा नेमका अर्थ काय ?"

"तुम्ही रवींद्रनाथांची 'गीतांजली' वाचता आहात आणि त्यातला दाऊ (Thou) आणि हिमचा (Him) अर्थ तुम्हांला कळत नसेल, तर वाचायचे बंद करा!" असे तुसडे उत्तर देऊन ते मोकळे झाले. जिज्ञासूला शिक्षित करावे, परंतु दांभिकपणाने वाचन करणाऱ्यांचा तिरस्कार करावा, अशी त्यांची मनोवृत्ती होती.

मी भुस्कुटे यांच्याकडेही जाऊन बसत असे आणि त्यांच्याकडून मार्क्सवादाचा विचार समजावून घ्यायचा प्रयत्न करी. भुस्कुटे हे आचार्यांसारखे प्रतिभासंपन्न विद्वान नव्हते. परंतु त्यांनी आपला मार्क्सवादाचा अभ्यास अत्यंत परिश्रमपूर्वक आणि अत्यंत प्रामाणिकपणे चालू केला होता. त्यावरील काही ग्रंथांचे मराठी वाचकांसाठी भाषांतर करण्याच्या कामातही ते गुंतले होते. असहकाराच्या चळवळीत त्यांची वाढ झाली होती. त्यामुळे गांधीवादाच्या परंपरेत ते वाढले होते. परंतु ३२ सालच्या या जेलमधील वास्तव्यास त्यांच्या विचारात परिपूर्ण बदल झाला होता. साम्यवादाचा स्वीकार केल्याशिवाय हिंदुस्थानचे आणि जगाचे प्रश्न सुटणार नाहीत, असे त्यांचे म्हणणे असे. त्यांच्याजवळची समाजवादासंबंधीची काही सोपी सोपी पुस्तके त्यांनी आम्हांला वाचायला दिली. त्यांतली बरीचशी पुस्तके वाचायला आणि समजायला

अवघड असणारी अशी होती. पण त्यांनी दिलेली 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका मी त्यांच्याजवळ बसूनच समजावून घेऊन अभ्यासली.

मार्क्सच्या विचारांचे, पुसट का होईना, दर्शन व्हायला 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका पुरेशी आहे, असे माझे तेव्हापासून मत बनले आहे. इतिहासाच्या विकासाकडे एका नव्या दृष्टीने पाहण्याची नजर मार्क्सने जगाला दिली, असा माझा समज झाला आणि तो आजही कायम आहे. मार्क्सच्या पद्धतीने हिंदुस्थानचे प्रश्न सुटतील, की नाही, याचा माझा निर्णय तेव्हा होत नव्हता. वाटे, की मार्क्सच्या विचाराकडे पाठ न फिरविता हिंदुस्थानने आपले प्रश्न आपल्या अनुभवातूनच सोडविले पाहिजेत.

आज मात्र माझी स्पष्ट भावना झाली आहे, की आज एकोणिसाव्या शतकातल्या मार्क्सच्या विचारांच्या फार पुढे जग गेलेले आहे. मार्क्सवादी म्हणणा-या मंडळींनाही नवीन जगाशी जमवून घ्यावे लागेल, अशी आजची परिस्थिती आहे. पण यामुळे मार्क्सने जगाला दिलेल्या विचारधनाचे महत्त्व कमी होत नाही. किंबहुना त्याने दिलेल्या मूलभूत दृष्टिकोनाची वाट पुसतच आजच्याही विचारवंतांना जावे लागत आहे. गौतम बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्यानंतर एवढ्या मोठ्या मानव समाजाच्या जीवन-पद्धतीवर परिणाम करणारा कोणी तत्त्ववेत्ता झाला असेल, तर तो मार्क्सच, हे कबूल करावे लागेल.

१२ व्या बराकीतील आमचे हे शिक्षण आणि वाचन दिवसेंदिवस असेच वाढत राहिले. त्यातून नवे स्नेही लाभले. महाराष्ट्राच्या विविध विभागांमधून आलेल्या लोकांच्या ओळखीपाळखी झाल्या. सोलापूरचे अनंतराव भोसले हे या ठिकाणी मला एक नवे मित्र मिळाले. आमचे राघूआण्णा लिमये हेही वाचत असत. परंतु त्यांची वृत्ती फार खोलात शिरण्याची नव्हती. मला ते नेहमी म्हणत,
"इतके काय वाचत बसतोस? स्वराज्यासाठी लढायचे, एवढी साधी गोष्ट तुला-मला समजली, एवढी पुरे आहे."

मी त्यांना म्हणे,
"आपण जेव्हा बाहेर जाऊ, तेव्हा तुमचा सल्ला मी मानेन. पण आज येथे असलेल्या वेळेचा उपयोग करून मला जितके वाचता येईल, तेवढे वाचून, समजून घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे."

राघूआण्णांनी १२ व्या बराकीत 'चला-खेळू या' नावाचा क्लब सुरू केला आणि त्यामध्ये हुतूतू, आट्यापाट्या, खो-खो, इत्यादी खेळ संध्याकाळच्या वेळेला बराकीच्या बाहेरच मोकळ्या जागेत आम्ही खेळत असू. बराकीतला अत्यंत आनंदाचा वेळ म्हणजे आंघोळीचा. आंघोळीसाठी आम्हांला प्रत्येक बराकीत छोटे छोटे घाट बांधून दिले होते. तेथे मुबलक पाणी मिळे. बादल्याच्या बादल्या अंगावर ओतून घेऊन आम्ही स्नान करीत असू. घरची मंडळी भेटीला येत, तेव्हा साबण, दंतमंजन अशी काही साधने घेऊन येत असत, तेव्हा ही सगळी व्यवस्था ठीक होती. कपडे उत्तम, स्वच्छ ठेवण्याची स्पर्धाच बारा नंबरच्या बराकीत सुरू झाली होती, असे म्हटले, तरी चालेल. काही मंडळी या स्पर्धेत आघाडीवर असत. अगदी जेलचे कपडे असले, तरी ते परीटघडीचे करून वापरणारेही काही लोक होते. या शर्यतीत मी पुढे नव्हतो, पण फार मागेही नव्हतो. मध्यावर कोठे तरी असेन.

जेलमध्ये दररोज संध्याकाळी सर्व तऱ्हेच्या भाज्यांचा एक संमिश्र काढा मिळत असे आणि तो खाल्ल्यानंतर दात काळे पडत असत. हा काढा म्हणजे दातांच्या आरोग्याचा मोठाच शत्रू होता, असे म्हटले, तरी चालेल.

जेलमध्ये असताना एक वेळ मला माझे वडील बंधू गणपतराव भेटायला आले होते. एकदा आई पण भेटायला आली होती. पाच-दहा मिनिटांच्या अशा या भेटीत कसलेच समाधान वाटत नसे. परंतु नजरभेटीचा जो आनंद होता, तो काही कमी समाधानकारक नव्हता. माझी प्रकृती सामान्यतः उत्तम आहे, या गोष्टीचा आईला आनंद वाटत असे. गणपतरावांनी माझ्यासाठी काही पुस्तके आणली होती.

अधून मधून अशा भेटीमुळे मानसिक समाधान लाभत असे.

शेवटी शेवटी मात्र जेलमध्ये एकाकी वाटू लागले. वाचन जरी करत होतो, तरी शेवटी वाचन तरी किती करणार ?

या जेलमध्ये झालेल्या महाराष्ट्राच्या राजकारणावरच्या चर्चाही मोठ्या अर्थपूर्ण असत. मात्र महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीसंबंधाने येथील पुढारी मंडळी ज्या चर्चा करत, त्यांवरून या शहरी पुढाऱ्यांचा ग्रामीण समाजाबद्दल केवढा गैरसमज आहे, याची मला कल्पना आली. यांतले बरेचसे उच्चभ्रू प्रवृत्तीचे लोक असत. सत्यशोधक चळवळीसंबंधी आणि महात्मा फुले यांच्याबद्दल या लोकांना कमी माहिती आहे, असे मला वाटते. यांमध्ये अपवाद म्हणून समाजवादी विचारसरणीची जी मंडळी होती, त्यांत एस्. एम्. जोशी, ह. रा. महाजनी, भुस्कुटे ही मंडळी काहीशी समजूतदारपणाने बोलत असत.

एस्. एम्. जोशी हे विशेषतः तरूण कार्यकर्त्यांच्या चळवळीकडे आणि त्यांच्या प्रश्नांकडे मोठ्या आत्मीयतेने पाहात असत. ते त्या वेळी 'यूथ लीग'चे पुढारी होते. बारा नंबरच्या बराकीमध्ये एके दिवशी संध्याकाळी युवक चळवळीच्या संबंधाने त्यांचे एक सुरेख व्याख्यान झाल्याची मला आठवण आहे. त्यांची त्या विषयाची तळमळ आणि स्वातंत्र्यासंबंधी असलेल्या भावनेची तीव्रता, सर्व जातींच्या मंडळींना एकत्र घेण्याची वाटणारी गरज या त्यांच्या विचारसरणीने माझ्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. दररोज चाललेल्या वादाच्या खटपटीत ते फारसे भाग घेत नसत. प्रसंगोपात्त ते वादात पडत. परंतु जेव्हा पडत, त्यावेळी मोठ्या हिरिरीने पडत. त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल मला फार मोठा आदर वाटण्यासारखा अनुभव या काळात आला. जेलमध्ये त्यांनी सत्याग्रहींचे केस कापण्याचे आणि दाढी करण्याचे काम आपणहून आपल्याकडे मागून घेतले आणि हळूहळू ते यात थोडे फार तज्ज्ञ झाले, असे म्हणायला हरकत नाही. ते काम ते

मोठ्या आनंदाने आणि हसत खेळत करीत असत. त्यामुळे एस्. एम्. जोशी हे बाराव्या बराकीतील एक लोकप्रिय व्यक्तिमत्त्व होते.

याच वेळी आमच्याबरोबर कोल्हापूरचे वीर माने बारा नंबरच्या बराकीत होते. ते बोलण्यात ओबडधोबड, कमी शिकलेले, परंतु देशसेवेची अत्यंत तीव्र जाणीव असलेले कार्यकर्ते होते. त्यांनी मुद्दाम आमच्या जेलचे संडास साफ करण्याचे काम मागून घेतले होते. एस्. एम्. जोशी, वीर माने यांच्यासारखी माणसे आमच्यांत होती, याचा आम्हांला अभिमान वाटे. वीर माने आणि माझी ओळख पुढे कोल्हापूरला शिक्षणासाठी गेल्यावर अधिक वाढली आणि आमची मैत्री वाढत राहिली.

आमच्या १२ नंबरच्या बराकीमध्ये नुसते चर्चा, वक्तृत्व आणि शिक्षण एवढेच काम चालू होते, असे नाही, तर पुढे पुढे तेथे बराकीचे बुलेटिन निघू लागले. आपल्याला वाटणारे विचार कागदावर किंवा स्लेट पाटीवर लिहून बराकीतील सर्व मंडळींत ते फिरवावे, अशी प्रथा सुरू झाली. ह. रा. महाजनी आपल्याजवळ असलेल्या स्लेट पाटीवर दोन्ही बांजूनी आपल्या सुरेख अक्षरांत त्या दिवसाचा त्यांचा विचार लिहून ठेवत असत आणि तो सर्व बराकीत फिरवला जाई. 'बजरंग' या टोपण नावाखाली ते असे लेख लिहीत. त्यांच्या लेखनातील ते कौशल्य पाहिल्यावर त्यावेळी माझ्या मनाची खात्री झाली, की पुढे हे प्रसिद्ध लेखक होतील. आणि झालेही तसेच. पुढे महाराष्ट्रात 'लोकसत्ता'चे एक प्रभावी संपादक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. त्यांच्या पत्रकारितेचा श्रीगणेशा बराक क्रमांक १२ मध्ये असा झाला होता.

अशा तऱ्हेने जेलमध्ये आमचे दिवस चालले होते. १९३१ साल संपले आणि ३२ उजाडले. यावेळी घडलेली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे ३२ सालामध्ये महात्मा गांधीजींनी केलेला 'कम्युनल ॲवार्ड' संबंधीचा आमरण उपवास. या उपवासाचा आमच्यावर खूप परिणाम झाला. यासंबंधी बराकीमध्ये चर्चा सुरू झाली. शेड्यूल कास्टना स्वतंत्र मतदार संघ देण्याची योजना ब्रिटिश सरकारने जाहीर केली. त्यामुळे देशात मतभेदाचे वातावरण निर्माण झाले. राजकीयदृष्ट्या एक समाज दुस-

या समाजापासून अशा कारणाने वेगळा करून राष्ट्रात दुही पेरण्याचा एक मार्ग, म्हणजे स्वतंत्र मतदार संघ देणे, ही गोष्ट हिंदुस्थानला अनुभवाने माहिती होती. मुसलमान समाजाला वेगळा मतदार संघ देऊन, त्याचा परिणाम शेवटी देशाच्या जीवनामध्ये एक मोठी दुफळी निर्माण होण्यास झाला होता, याचा अनुभव होता.

हिंदू समाजातून पुन्हा एकदा त्यांच्यांतला अस्पृश्य मानला जाणारा समाज राजकीय दृष्टीने कायमचा बाजूला करण्याचा या ब्रिटिश सत्तेने टाकलेला एक डाव आहे, असे आपले मत राष्ट्रीय विचाराच्या मंडळींनी जाहीर केले. आणि हे थांबवले पाहिजे, असा निर्धार व्यक्त केला. ते कसे थांबविणार, हा मोठा प्रश्न होता. महात्मा गांधीजींनी यासाठी उपोषण केले होते. हरिजनांसाठी स्वतंत्र मतदार संघाची योजनाच मुळातून काढून टाकली पाहिजे, असा त्यांचा निर्धार होता.

उपोषण सुरू झाल्यानंतर या प्रश्नाची देशात विशेष चर्चा सुरू झाली आणि सबंध देश चिंतेत पडला. उपोषणाचे दिवस जसजसे जाऊ लागले, तसतशी चिंता अधिक वाटू लागली. महात्मा गांधींचे झालेले वय लक्षात घेता त्यांच्या जीवनास धोका आहे, असे लोकांना वाटू लागले. मग मध्यस्थांच्या खटपटी सुरू झाल्या. डॉक्टर आंबेडकर यांचे मन वळवून काही तडजोड काढावी, असा प्रयत्न सुरू झाला. डॉक्टर आंबेडकरांनी गांधीजींची भेट घ्यावी, असे प्रयत्न सुरू झाले. या संदर्भात आमच्या जेलमध्ये झालेल्या चर्चा मला आठवतात. हरिजन समाज, विशेषतः, डॉक्टर आंबेडकरांना मानणारा समाज हा संपूर्णतः स्वातंत्र्याच्या लढ्याच्या बाहेर होता. ही गोष्ट मी लहानपणापासून पाहात आलो होतो. त्याचे केवढे घोर परिणाम होतात, हे आता अधिक लक्षात आले. काही लोकांच्या मते आंबेडकरांनी तातडीने येऊन महात्मा गांधीजींच्या सूचना मान्य करून त्यांना उपोषण सोडण्यास सांगावे, असे होते. काही जे अतिरेकी होते, ते म्हणत असत, की इंग्रजांचे व त्यांचे हितसंबंध जुळते असल्यामुळे ते काही असे करणार नाहीत.

महात्मा गांधीजींच्या प्राणाला धोका जरूर होता; तरीही हे असे बोलणे अनुदारपणाचे

होते, असे मला त्यावेळीही वाटले. डॉक्टर आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल राष्ट्रीय चळवळीत त्यावेळी बरेच अन्यायकारक गैरसमज होते. त्यांच्या विद्वत्तेबद्दल सर्वांनाच आदर असे, पण दलित समाजाचे प्रतिनिधी म्हणून ज्या अनुभवातून ते गेले होते, त्यानुसार त्यांची राजकीय मते बनली होती. त्यांच्या जीवनाच्या प्रेरणा आणि वेदना समजून घेण्याची आत्यंतिक आवश्यकता होती. आम्ही सगळेच महात्मा गांधीजींचे अनुयायी होतो, त्यामुळे सगळ्यांना काळजी वाटू लागली. आम्ही सगळे सकाळ-संध्याकाळ सामुदायिक प्रार्थना करीत होतो. हिंदुस्थानातील ही दुफळी बंद होऊन राष्ट्रीय प्रवाह हा पूर्ववत रहावा, यासाठी योजिलेला गांधीजींचा हा अखरेचा उपाय आहे, याची आम्हांला कल्पना आली. आपल्या स्वातंत्र्य-चळवळीत काही अपुरेपणा आहे, हेही सर्वांच्या ध्यानात आले.

दलित समाजाच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी, यासाठी काही महत्त्वाची पावले उचलल्याशिवाय हे घडणार नाही, अशी मनोमन जाणीव झाली. सुदैवाने बाहेरच्या लोकांच्या प्रयत्नांना यश आले. विशेषतः, डॉक्टर आंबेडकरांच्या मनाच्या मोठेपणामुळे त्यांनी आपले विचार सोडून देऊन प्रसिद्ध पुणे करारावर सही केली आणि हिंदू समाजाची व राष्ट्रीय जीवनाची ही फाळणी या प्रकारे वाचविली. डॉक्टर आंबेडकरांनी गांधीजींचे प्राण वाचविले, याबद्दल मला डॉक्टर आंबेडकरांच्याबद्दल मनात रूजलेली आदराची भावना दुणावली.

या जेलमध्ये असताना दुसरी एक नमूद करण्यासारखी गोष्ट अशी, की गांधीजी शेजारी येरवडा जेलमध्ये असताना आम्हां कॅम्पवासी सत्याग्रहींना गांधीजींचे चुकूनही दर्शन होत नसे किंवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधता येत नसे. आमच्या कॅम्प जेलच्या प्रमुख प्रतिनिधींनी हा प्रश्न जेल प्रमुख अधिकाऱ्यांसमोर मांडला आणि त्याने याबाबतीत गांधीजींशी चर्चा केली. त्यानुसार अधूनमधून दरमहा किंवा दर दोन महिन्यांनी कॅम्प जेलचे निवडक दोन प्रतिनिधी गांधीजींना भेटण्यासाठी पाठवावयाचे, असे ठरले. आणि पुढे असे लोक जाऊन गांधीजींना भेटत असत आणि तेथून परत आल्यानंतर त्यांची काय चर्चा झाली, याची माहिती प्रत्येक

बराकीत जाऊन देत असत. अर्थात या भेटीमध्ये राजकीय चर्चा न करण्याचे तत्त्व गांधीजींनी स्वीकारले होते. त्यामुळे विधायक कार्यासंबंधीची किंवा काही वैचारिक प्रश्नासंबंधीची चर्चा करणे एवढेच शक्य होते. मला आठवते, गांधीजींचे चिरंजीव श्री. रामदास गांधी आमच्या कॅम्प जेलमध्ये होते. ते एक वेळ कॅम्प जेलचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधीजींच्या भेटीस गेले व त्यांनी येऊन भेटीत काय झाले, याचा वृत्तांत आम्हांला सांगितला.

सत्याग्रहींच्या मनात एक विचार असे, की या सत्याग्रहाचा शेवट कसा होणार, याचा काही अंदाज गांधीजींनी दिला काय? हे समजून घेण्यासाठी आणि त्यासंबंधी काही तरी ऐकायला मिळेल, अशा आशेने अशा भेटणाऱ्यांच्या परतीनंतर त्यांच्याभोवती सत्याग्रहींची गर्दी होत असे. गांधीजींनी काही अंदाज दिला का? गांधीजी आनंदी आहेत का? त्यांची प्रकृती बरी आहे ना ? अशा तऱ्हेचे प्रश्न विचारत असत.

माझे मित्र गौरीहर सिंहासने शेजारच्या तेरा नंबरच्या बराकीमध्ये स्थानबद्ध होते, त्यांना दोन वर्षापेक्षा जास्त शिक्षा झाली होती. त्यांना बराच काळ जेलमध्ये राहायचे असल्यामुळे त्यांनी त्या बराकीत अनेक मित्र जमा केले होते आणि एका अर्थाने त्यांचे ते एक प्रमुख मानले जात होते. त्यांच्या या कर्तबगारीचे मला कौतुक वाटत होते.

एक दिवस त्यांनी मला निरोप पाठविला, की कॅम्प जेलच्या मार्फत गांधीजींना भेटायला जाणा-या मंडळींत या खेपेला त्यांच्या बराकीने त्यांचे नाव सुचविले आहे. मला आनंद झाला. गांधीजींच्या आदेशावरून आम्ही कारागृहात आहोत आणि असे कारागृहात असताना आपली नाही, तरी निदान आपल्या मित्राची गांधीजींशी भेट होत आहे, याचा मला आनंद वाटला.

ठरल्याप्रमाणे सिंहासने गेले आणि गांधीजींची भेट घेऊन आले. त्यांनी या

सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांच्यांत आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले प्रश्न त्यांनी गांधीजींना विचारले. गांधीजींनी त्यांना सल्ला दिला,

'सत्याग्रहात भाग घेणे ही गोष्ट तुम्ही तुमच्या मनाने जर स्वीकारली असेल, तर आता तुमच्या कुटुंबियांवर अवलंबून राहण्याचा तुम्हांला काही अधिकार नाही. तुमचे जीवन तुमचे तुम्ही घडविले पाहिजे. त्याचा बोजा तुमच्या एकत्र कुटुंबावर टाकण्याचा तुम्हांला अधिकार नाही.'

ही हकीकत मला सिंहासने यांनी गांधीजींची भेट घेऊन आल्यानंतर सांगितली. सिंहासने यांचे शिक्षण तसे फार झालेले नव्हते. पण राजकारणातल्या कामाची त्यांची निष्ठा इतकी प्रबल होती, की त्यांनी गांधीजींचा शब्द पुरा करावयाचे आपल्या मनाशी ठरविले.

ही आठवण मला नेहमी आनंदित करते, ती यासाठी, की गांधीजींची जेलमध्ये भेट मिळविली, म्हणजे आपण स्वराज्य मिळविले, अशा आनंदात सिंहासने होते आणि माझ्या मित्राच्या आनंदात मी सहभागी होतो.

या जेलमध्ये काढलेले एक वर्ष म्हणजे माझ्या मताने माझे एक प्रकारे विद्यापीठीय जीवन होते. १९३२ साल उजाडले आणि शिक्षेपैकी एक वर्षाचा कालावधी झाला. एक वर्ष संपल्यानंतर या जेलमधून आमची बदली विसापूर जेलमध्ये होणार, असे जाहीर झाले. विसापूर जेल, म्हणजे अत्यंत कष्टदायी जेल, अशी त्याची ख्याती होती. हवामान चांगले नाही, पाण्याची कमतरता फार, कडक बंदोबस्त व कठोर अधिकारी असलेला जेल, अशी या जेलची ख्यातीहोती. आम्ही विचार केला, एक वर्ष तर आनंदात गेले. राहिलेले दिवस थोडे दुःखात जातील, तर काय बिघडले, म्हणून आम्ही मनाची तयारी केली. ठरलेल्या दिवशी सकाळी विसापूर जेलमध्ये जाणा-या माणसांचे गट करण्यात आले आणि मी ज्यात होतो, असा शंभर माणसांचा गट कॅम्प जेलच्या दाराशी असलेल्या पोलिसांच्या मोटारीत बसण्यासाठी निघाला. त्या

जेलच्या दारातून बाहेर आल्यानंतर मी एकदा परत पाठीमागे फिरून त्या जेलकडे पाहिले. घर सोडताना जसे दुःख होते, त्याच्यापेक्षा काहीसे जास्त दुःख मला हा जेल सोडताना होत होते. ही एक वर्षाची जेलची आनंददायी संगत जन्मभर लक्षात राहील, अशी होती. तेथे भेटलेली माणसे, तेथे वाचलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा, त्यांतून आलेली नवी जाण, या सर्व जीवनाला शक्ती देणा-या व पोषक गोष्टी होत्या, त्यामुळे माझ्या मनामध्ये कृतज्ञतेचा भाव आला आणि माझे डोळे अक्षरशः भरून आले. माझे मला आश्चर्य वाटले.

दुस-या दिवशी आम्ही विसापूरला पोहोचलो. विसापूर जेल दौंड आणि मनमाड या रेल्वे लाईनवर असलेल्या स्टेशनपासून दोन-तीन मैलांवर आहे. एखाद्या ओसाड वाटणा-या माळावर बांधलेला हा जुना जेल ब-याच लांबून पाहिल्यावर मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण करतो. परंतु आम्ही तेथे पोहोचल्यानंतर मात्र आमच्या ध्यानात आले, की गेले वर्षभर तेथे राहणा-या सत्याग्रहींनी त्याला अतिशय वेगळे रूप दिलेले आहे. जेल अधिकाऱ्यांची आणि सत्याग्रहींची एक सहकाराची भावना तेथे निर्माण झाली होती. गुजरात आणि मुंबई येथून आलेले अनेक प्रमुख नेते आणि कार्यकर्ते या जेलमध्ये गेले वर्षभर राहात होते. या जेलला अनेक बराकी होत्या आणि प्रत्येक बराकीला सत्याग्रहींतून एक प्रमुख 'स्पोक्समन' निवडला जात असे. त्या बराकीतील सत्याग्रही कैद्यांचे जे प्रश्न असतील, ते हा पुढारी सोडवून घेत असे. पत्रव्यवहार, पुस्तके मागविणे, आजारपणासाठी लागणारी औषधे मिळविणे अशा स्वरूपाचे हे प्रश्न असत. मी ज्या बराकीत होतो, त्या बराकीचे पुढारी बडोद्याचे प्रसिद्ध कॉंग्रेस नेते श्री. मगनभाई पटेल होते. अत्यंत सज्जन मनुष्य, मनमिळाऊ स्वभाव, मृदु व मधुर भाषण करण्याची सवय, यामुळे सगळ्यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

आम्ही तेथे गेल्यानंतर थोड्याच दिवसांत येरवड्यातील बाराव्या बराकीचे रूप या विसापूरच्या बराकीस देण्याचा प्रयत्न केला. मुंबईचे प्रसिद्ध नेते स. का. पाटील त्यावेळी विसापूर जेलमध्ये होते. त्यांनी जेलमध्ये अतिशय व्यवस्थित आणि संपन्न

अशी लायब्ररी उभी केली होती. शेकडो जुनी पुस्तके दररोज परत जात आणि शेकडो जुनी पुस्तके येत, असा हा सहकार्याचा संबंध येथे प्रस्थापित झालेला मी पाहिला.

आमच्या या बराकीमध्ये कॅम्प जेल १२ मधील बराकीतीलही काही मित्र होते. तात्या डोईफोडे, दयार्णव कोपर्डेकर आणि मी होतो. योगायोगाने ह. रा. महाजनीसुद्धा या बराकीत आले होते. त्यामुळे वाचनाच्या, चर्चेच्या बैठकी येथेही सुरू झाल्या. या बराकीमध्ये राहिल्यानंतर गुजराती मित्रांच्या सहवासामुळे गुजराती बोलणे आम्हांला समजू लागले आणि गुजराती भाषेशी नजीकची ओळख विसापूर जेलमध्ये झाली. त्याचा उपयोग पुढे मला मी द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री झाल्यानंतर फार झाला.

ह. रा. महाजनींनी एक दिवस मला सूचना केली,
"आपण गेले वर्ष, सव्वा वर्ष विविध विषयांवरील पुस्तके वाचतो आहोत, अभ्यासतो आहोत, तेव्हा त्यांचे आपल्या मनावर झालेले परिणाम आणि आपल्या विचारांच्या दिशा इतर लोकांना सांगण्यासाठी बराकीतील मित्रांपुढे एक व्याख्यान दे."

- आणि माझ्या आठवणीप्रमाणे 'गांधीवाद' हा विषय घेऊन मी ३५ ते ४० मिनिटांचे एक भाषण त्या बराकीत दिले. गांधीवादाचे जे वेगवेगळे पैलू होते, त्यांची माझ्या वाचनामधून आणि चिंतनामधून मला जी समज आली होती, तिची मी मांडणी केली. आणि भाषणाच्या शेवटी हे स्पष्ट केले, की मला जो समजला आहे, तो गांधीवाद असा आहे. ही माझी जीवननिष्ठा आहे, असे मी प्रामाणिकपणे म्हणू शकत नाही; पण एक गोष्ट मान्य केली पाहिजेल, की गांधीवादाची सर्वांत महत्त्वाची देणगी - जी मानवी जीवनाला नित्य उपयोगी पडणारी अशी आहे, ती म्हणजे साध्य, साधन, शुचिता. गांधीवादाचे राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम कोणी स्वीकारो अगर न स्वीकारो, पण साध्य, साधन, शुचितेचा सिद्धांत हा नुसता तत्त्वतः श्रेष्ठ वाटतो, असे नव्हे तर व्यवहारतः दैनंदिन आचारासाठीही अत्यंत उपयोगी पडणारा आहे.

असा एखादा नेमका विषय घेऊन त्यावर बोलण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. माझे ते पाऊण तासाचे भाषण झाल्यानंतर अनेकांनी माझे अभिनंदन केले. विशेषतः, ह. रा. महाजनी आणि निपाणीचे अनंतराव कटकोळ-जे गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते, त्यांनी माझे फार कौतुक केले. त्यांच्या कल्पनेपेक्षा, माझ्या वयाच्या आणि शिक्षणाच्या मानाने मी केलेली विषयाची मांडणी त्यांना फार मोलाची वाटली. आणि मला समाधान वाटले, की गेले वर्ष, सव्वा वर्ष आपण जे वाचतो आहोत, त्याचा काही ना काही उपयोग झाला आहे. यापुढे आपण जे वाचू, त्यासंबंधाने असेच बोलत गेले पाहिजे, असा विचार माझ्या मनाशी येऊ लागला. आयुष्यातील हा माझा पहिला महत्त्वाचा अनुभव म्हणून त्याची ही नोंद मी केली आहे.

१९३३ च्या मे महिन्यात आमची शिक्षेची मुदत संपली व आम्ही सजा होण्यापूर्वीचे आमचे घरचे कपडे अंगावर चढवून, विसापूर स्टेशनवर येऊन दाखल झालो. तात्या डोईफोडे आणि मी एकदम जेलमध्ये आलो होतो आणि दोघेही परत चाललो होतो. घरचे कपडे अंगावर घालताच काही क्षण मला चुकल्या चुकल्यासारखे वाटू लागले. पण फक्त थोडा वेळ जेलचे अधिकारी तिकिटे वगैरे काढून देण्याकरता स्टेशनवर आले होते. त्यांच्या मदतीने तिकिटे काढून घेतली आणि दौंडहून पुण्याला जाणा-या गाडीत बसलो आणि या तऱ्हेने कारागृहातील एक लांब मुदतीचा मुक्काम संपवून आम्ही आता आमच्या घरच्या वाटेला लागलो होतो.

घरी परत आल्यानंतर घरच्या माणसांना फार दिवसांनी भेटल्यामुळे आनंद वाटला. नित्याच्या जीवनामध्ये मी रूळत होतो. तोपर्यंत आमच्या घरात एका नव्या पिढीचे आगमन झाले होते. आमच्या थोरल्या बंधूंना मुलगा झाला होता आणि आम्ही सारेजण नव्या बाळाच्या कौतुकात रमलो होतो. आनंदात मग्न होतो. याच वेळी माझे जुने मित्र अहमद कच्छी यांना ब-याच दिवसांनंतर भेटावे, म्हणून त्यांच्या घरी गेलो. कारण मी जेलमध्ये असताना त्यांनी एक-दोन वेळा पत्राने माझ्याशी संबंध ठेवला होता. मी घरी गेल्यानंतर त्यांच्या वडिलांनी सांगितले,

"तो अतिशय आजारी असून मरणोन्मुख आहे."
हे ऐकून मला वाईट वाटले. ते मला त्याच्या खोलीत घेऊन गेले. तेव्हा खरोखरच मी अहमदला जे पाहिले, ते त्याचे सुरेख, गौरवर्णी धडधाकट शरीर मला कुठेही दिसून आले नाही. फक्त हाडांचा सापळा पडल्यासारखा तो मला दिसू लागला. त्याच्या डोळ्यांत मात्र तेज होते. त्यामुळे ती आपली व्यक्ती आहे, हे मनाशी पटले. मी त्याचा हात हातात घेतला, तेव्हा किंचितसे हास्य मला त्याच्या डोळ्यांत दिसले. कोठल्या तरी दुर्धर रोगाने तो आजारी होता आणि फक्त काही दिवसांचाच सोबती होता. मला भरून आले; पण मी तेथे न थांबता उठून बाहेर आलो. इतका सुस्वभावी, बुद्धिमान, राष्टप्रेमी तरुण मुलगा मृत्यूच्या जबड्यात इतक्या लवकर जावा, याचे दुःख माझ्या मनात होते. मी त्याच्या वडिलांशी विशेष काही न बोलता निघून आलो.

जेलमधून परत आल्यानंतर जन्ममृत्यूच्या या परस्परविरोधी दर्शनाने नवजीवनाकडे आनंदाने व आशेने पाहण्याची दृष्टी. तर अंतिम काळाच्या छायेमुळे माझ्या मनामध्ये विषण्णता आणि गांभीर्य अशा संमिश्र भानवांचा कल्लोळ उडाला.

सुट्ट्या संपत आल्या होत्या, त्यामुळे मी शाळेत जाण्याच्या तयारीला लागलो. माझ्या मित्रांना व घरच्या लोकांना जेव्हा मी परत माझे शिक्षण सुरू ठेवणार आहे, असे सांगितले, तेव्हा त्यांना ते खरे वाटेना. मी जरी फक्त पंधरा महिने बाजूला गेलो होतो, तरी शैक्षणिकदृष्ट्या माझी दोन वर्षे फुकट गेलेली होती. त्यामुळे माझ्यापेक्षा ब-याच लहान मुलांच्याबरोबर मी शाळेत बसायला तयार होईन, असे गणपतरावांना वाटत नव्हते. मी त्यांना सांगितले,

"मला काही त्यात चिंता वाटत नाही, कारण त्या वयाची मुले माझ्या माहितीची आहेत. मी त्यांच्याशी जमवून घेईन."

- आणि माझा शाळेत जाण्याचा नित्याचा कार्यक्रम सुरू केला. माझ्या मनाने एक

नक्की घेतले होते, की स्वातंत्र्य-संग्रामाच्या चळवळीत काम करायचे, पण शिक्षणक्रम पुरा केल्यावाचून राहायचे नाही. जर मी शिक्षण अर्धवट सोडून दिले, तर मी कोणाच्याच उपयोगाचा नाही, असे होईल. स्वातंत्र्य-संग्रामामध्येही शिक्षण, ज्ञान, विचारशक्ती, यांची किती आवश्यकता आहे, याचा अनुभव मी जेलमध्ये असताना घेतला होता. त्यामुळे शिक्षण पुरे करण्याचा माझा ध्यास मोठा होता. मला तर वाटे की माझी मॅट्रिकची परीक्षा कोणी ताबडतोब घेतली, तर किती बरे होईल! पण अधेमधे ती कोण घेणार? वर्ष तर काढलेच पाहिजे. मी माझ्यापेक्षा वयाने ब-याच लहान मुलांच्या वर्गात बसू लागलो. शिक्षकवर्ग मला मोठ्या आपुलकीने व प्रेमाने वागवीत होता. पुष्कळ वेळा शिक्षकांची मराठी, इंग्रजी व इतिहास या विषयांची वर्गातील भाषणे ऐकून आपण काही विशेष नवे ऐकत आहो, असे मला वाटत नव्हते. त्यामुळे माझ्या मनाने घेतले, की मला हे वर्ष तरी सोपे जाणार आहे आणि तसे ते गेलेही.

शाळेत जेवढे ऐकत होतो, ते माझ्या अभ्यासाच्या दृष्टीने पुरेसे होते. त्यामुळे बाहेरचे काम करण्याकडे मनाचा ओढा होता. जिल्हयातले, तालुक्यातले कार्यकर्ते भेटू लागले. आमचा त्यांचा जिव्हाळा अधिक वाढू लागला. अधून मधून मी त्यांच्या गावी जाऊन राहू लागलो. ३० सालात पाहिलेली लोकजागृती आणि लोकांचे प्रेम यांमध्ये परिपक्वता आली होती. कायदेभंगाची चळवळ मात्र ओसरल्यासारखी दिसत होती. परत जेलमध्ये जाण्याची गरज उरली नव्हती आणि तसा कोणी प्रयत्नही करीत नव्हते. माझ्या हे लक्षात आले, की आमचा जनसंपर्क पक्का झालेला आहे. त्याला आता नव्या दिशा दिल्या पाहिजेत, म्हणून नवा कार्यक्रम शोधण्याचा प्रयत्न आम्ही करू लागलो.

या दरम्यानच्या काळात महात्मा गांधी जेलमधून सुटून बाहेर आले होते. कायदेभंग किंवा राजकीय कार्य याच्यापेक्षा हरिजन-सेवेवर त्यांनी आता आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. देशामध्ये गांधीजींनी मंदिर-प्रवेशाची एक नवी चळवळ उभी केली होती. त्यांचा राजकीय कार्यक्रम लोकांना जितका आकर्षक वाटत असे, तितका सामाजिक

एकतेच्या क्षेत्रातला हा मंदिर-प्रवेशाचा कार्यक्रम लोकांना उत्साहवर्धक वाटत नव्हता. मी लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा लोक म्हणायचे,
"स्वराज्याची चळवळ चालविण्यासाठी याची गरज आहे काय?"
मी त्यांना सांगत असे,
"स्वराज्य मिळाले, तरी माणसाने माणसाला कशा-कशापासून वंचित ठेवायचे, याला काही मर्यादा आहेत, की नाही?"

या तऱ्हेने चर्चा चालत असे. मी माझ्या ओळखीच्या आणि मैत्रीच्या हरिजन माणसांशी याबाबत बोललो. महार समाजातील माझ्या मित्रांना या मंदिर-प्रवेशाचे मुळीच आकर्षण वाटत नव्हते. ते म्हणायचे,
"तुमच्या विठ्ठलाला आणि रामाला भेटून आमचे पोट थोडेच भरणार आहे? आणि त्यासाठी या गावातील सर्व लोकांचा विरोध का ओढवून घ्या?"

अशा तऱ्हेने ते त्यांचे विचार मांडत. परंतु मंदिर-प्रवेशाचा गांधींचा कार्यक्रम हा प्रतीकात्मक म्हणून बरोबर आहे, अशी माझी भावना होती. समाजाच्या सर्व शाखांना एका मुख्य प्रवाहात आणायचे असेल, तर खाणे, पिणे, धर्म या बाबतीमध्ये माणसाने माणसाला एकमेकांपासून दूर ठेवावे, हे बरोबर नाही. हा गांधींचा विचार बिनचूक होता. अर्थात मंदिर-प्रवेशाच्या दृष्टीने आम्हांला आमच्या जिल्ह्यात तातडीने हाती घ्यावा, असा कुठलाच कार्यक्रम लक्षात आला नाही. एक तर काहीशा सनातनी वृत्तीच्या मंडळींचा अशा कार्यक्रमाला विरोध होता, ही गोष्ट होतीच, परंतु ज्यांच्यासाठी हे कार्यक्रम करावयाचे, त्यांनाही त्यात औत्सुक्य वाटत नव्हते. त्यामुळे हरिजनांसाठी काही नवीन कार्यक्रम आपण घेतला पाहिजे, अशी माझ्या कार्यकर्त्या मित्रांमध्ये चर्चा झाली.

माझे दोन वर्षापूर्वीचे जुने मित्र पुढच्या शिक्षणासाठी बाहेरगावी गेल्यामुळे मी नवे मित्र जोडले होते. हरिजन-सेवेच्या नव्या आंदोलनात आपल्याला काय करता येईल, याचा विचारविनिमय मित्रांशी करत होतो. असा विचार करताना आम्ही दिवसातला

काही वेळ ज्याला हरिजन-सेवा म्हणता येईल, अशा तऱ्हेचे काम करण्यासाठी द्यावा, असे ठरविले. याच वेळी आमच्या तालुक्यातील शेणोली गावी स्थायिक झालेला मूळचंदभाई म्हणून एक गुजराती तरुण आपले कॉलेजचे शिक्षण अर्धवट टाकून हरिजन-सेवेच्या कार्याला वाहून घेण्यासाठी गावी परत आला होता. मी त्यांना भेटायला शेणोलीला गेलो. त्यांची-माझी बरीच चर्चा झाली आणि आम्ही तालुक्यासाठी काम करण्याकरता एक छोटेसे मंडळ स्थापन केले. त्यासाठी गावातील कुणी तरी प्रतिष्ठित माणसाचा पाठिंबा असावा, म्हणून आमच्या शहरातील श्री. पांडूआण्णा शिराळकर - जे आमचा गावातील थोर देशभक्त आणि सर्वांच्या उपयोगी पडणारे धनिक गृहस्थ होते, त्यांना भेटलो. त्यांनी आम्हांला सांगितले, "तुमच्या कायदेभंगाच्या चळवळीला लोकांचा जितका पाठिंबा मिळाला, तितका या कामाला मिळणार नाही. तुम्ही खटपट करीत राहा, माझी मदत राहील."

- आणि आम्ही आमच्या मंडळामार्फत आमच्या कामाला सुरुवात केली.

बरेच दिवस माझ्या असे मनात होते, की आम्ही समाजातील सर्व वर्गांना भेटतो; परंतु या दलित वर्गाशी आमचा काहीच संबंध प्रस्थापित होत नाही. तेव्हा ते करण्यासाठी काही तरी कार्यक्रम योजला पाहिजे. म्हणून सुट्टीच्या दिवशी चार-दोन मित्र बरोबर घेऊन मी आसपासच्या खेडेगावी जाऊ लागलो. विशेषतः हरिजन वस्तीच्या ठिकाणी आवर्जून जाऊ लागलो. हरिजन समाजातील वेगवेगळ्या वर्गात, वेगवेगळे अनुभव येत होते. चांभार समाजात आमचे फार उत्तम स्वागत होई. त्याच प्रमाणात मातंग समाजातही होई. पण महार समाजात मात्र आमच्यासंबंधीची एक प्रकारची उपेक्षा आणि उदासीनता असे, हेही लक्षात आले. श्री. मोहिते नावाचे महार समाजातील एक कार्यकर्ते कराडच्या म्युनिसिपालिटीत नोकरीवर होते. त्यांच्याशी आम्ही संपर्क साधला आणि आमच्यापुढे असलेल्या सर्व शंका आणि प्रश्न त्यांच्यापुढे मांडले. मोहिते मोठा अनुभवी आणि शहाणा माणूस होता. त्यांनी या बाबतीत जी चर्चा केली, त्यावरून, हे काम दिसते, तितके सोपे नाही, हे आमच्या लक्षात आले. हरिजनांतील हा फार मोठा विभाग विचाराने आणि मनाने

आमच्यापासून वेगळा झाला आहे. त्यांच्या आकांक्षा आणि भावना जाग्या झालेल्या आहेत. त्यांच्यामध्ये हळूहळू शिक्षणाचा प्रसारही होऊ लागला आहे. डॉक्टर आंबेडकर यांच्यासारखे एक मोठे व्यक्तिमत्त्व त्यांच्या समाजात निर्माण झाले असून त्या सर्व समाजाचे लक्ष त्या व्यक्तिमत्त्वावर केंद्रित झाले आहे. त्यांचे वर्तमानपत्रांतील लेख आणि भाषणांचे वृत्तांत या लोकांपर्यंत जाऊन पोहोचत असत. मोहिते म्हणाले, "तुम्ही या समाजातीलच कार्यकर्ते मिळविल्याशिवाय या कामात तुम्हांला यश येणार नाही. ते करत रहा."

या उत्तेजनार्थ पण स्पष्ट बोलण्याने आमची चर्चा थांबली.

माझ्या मनाने घेतले, की या समाजाशी संपर्क साधण्याइतके काम आपण निदान कराडमध्ये उभे करायचा प्रयत्न केला पाहिजे. श्री. मूळचंद यांच्या सल्ल्याने आम्ही, जेथे शक्य असेल, तेथे 'नाइट स्कूल' (रात्रीच्या शाळा) सुरू करून लोकांशी संपर्क साधण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्यासाठीसुद्धा माणसे मिळणे तितकेसे सोपे नव्हते. श्री. मूळचंद यांनी आपल्या शेणोली गावी हे काम करायचे ठरविले, आणि मी कराडमध्ये अशी शाळा माझ्या मित्रांच्या मदतीने सुरू करण्याचे ठरविले. अशी शाळा सुरू करायची, तर कोणा मोठ्या नेत्याला निमंत्रण द्यायला पाहिजे, असे मला वाटले. म्हणजे या योजनेकडे लोकांचे लक्ष जाईल व कार्यास चालना मिळेल. या संबंधाने कुणाला बोलवावे, याचा विचार करू लागलो, तेव्हा मनाशी विचार आला, की या कामासाठी कर्मवीर आण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या मोठ्या माणसाला मी आणू शकलो, तर तो एक शुभाशीर्वाद ठरेल.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत श्री. विठठल रामजी शिंदे हे त्यावेळी अग्रेसर होते. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदराची भावना होती, पण प्रत्यक्षात त्यांना भेटायचे कसे आणि कुणाच्या ओळखीने, हा प्रश्न होता. अखेर मी एकट्यानेच ही जबाबदारी घ्यावी, असे ठरले. त्याप्रमाणे एके दिवशी कराडहून रात्रीच्या गाडीने निघून पहाटे पुणे स्टेशनवर उतरलो. उजाडेपर्यंतचा वेळ स्टेशनावरच काढणे सोयीचे होते. तेथील

नळावर हातपाय, तोंड धुतले. पायजमा-कोट-टोपी असा त्यावेळचा माझा वेष असे. तो बदलण्याचे कारण नव्हते, पण जरासा ठीकठाक केला आणि उजाडल्यानंतर चौकशी करत करत आठ सव्वा आठपर्यंत त्यांच्या घरी पाहोचलो. श्री. आण्णासाहेब शिंदे घरीच होते. नमस्कार करून मी येण्याचे कारण सांगितले. ते माझ्याकडे पाहतच राहिले. सुरुवातीस ते फारसे बोलले नाहीत, पण अधूनमधून मी कोण, कुठला, काय करतो, घरी कोण कोण आहेत व त्यांची संमती आहे, की नाही, याबद्दल विचारीत मला तास, दोन तास बसवून घेतले. माझ्या बोलण्या-चालण्याकडे त्यांचे बारकाईने लक्ष होते. अखेर त्यांनी येण्याबद्दल होकार दिला. पण त्याचबरोबर एक अटही घातली. ते म्हणाले,

"माझ्याबरोबरच हरिजनालाही घरी जेवायला आणावे लागेल."

मी लगेच होकार दिला, तेव्हा ते म्हणाले,

"पण घरच्या लोकांना विचारलेस का? "

मी नकार देऊन त्यांना म्हटले,

"सर्व जातींचे मित्र माझ्या घरी येतात. आईची त्याबद्दल काही तक्रार नाही."

अखेर हरिजनाबरोबर पंगत होईल, याची खात्री झाल्यावरच त्यांनी होकार दिला.

ठरल्याप्रमाणे ते आले. मला जणू स्वर्ग मिळाला. स्टेशनवरून टांग्याने गावात आले. ते माझ्याबरोबर पायी हिंडले, फिरले, हरिजनवाड्यात आले आणि कार्यक्रम पार पडला.

कराडात मोठे कुतूहल होते, पण उत्साह नव्हता. राजकीय चळवळीमध्ये मुले, वडीलधारी माणसे येत-जात असत, तसा उत्साह मला दिसत नव्हता; पण मला हेही दिसत होते, की हे चित्र सबंध देशातच होते. हे काही केवळ कराडपुरतेच मर्यादित नव्हते. कर्मवीर आण्णासाहेबांचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. त्यांच्या संगतीतला एक दिवस सार्वजनिक जीवनातील शिक्षणाचा एक महत्त्वाचा धडा होता, असे म्हटले, तरी चालेल. या समारंभाखेरीज त्यांचे एक व्याख्यानही मी करविले होते.

पण माणसांची गर्दी फार नव्हती. पुष्कळ वेळ मनामध्ये विषण्णता येई, की असे का? इंग्रजांच्या विरूद्ध लढण्यासाठी लोकांची जी उत्सुकता होती, तीही आता कमी झाली होती. आणि हे महत्त्वाचे पण साधे काम करायला लोकांची मान्यता दिसत नव्हती. ही एक विसंगती आमच्या सामाजिक जीवनात होती. गांधीजी या गोष्टीला प्राधान्य का देतात, हे त्यामुळे वारंवार लक्षात येई. समाजाच्या दोन्ही बाजूंना उत्साह कमी होता. हरिजनांमध्ये कमी होता, हरिजनेतरांमध्येही कमी होता. हिंदुस्थानातील हजारो वर्षांच्या विषमतेच्या जीवनामुळे आलेला हा नाकर्तेपणा हे आमच्या देशाच्या अवनतीचे मूळ कारण आहे, असे विचार जी मंडळी मांडत आली आहेत, ते किती बरोबर आहे, याचा अनुभव आम्हांला पदोपदी येत होता.

मी दररोज संध्याकाळी साडेसातनंतर कराडमधील महार-वस्तीत शाळा चालविण्यासाठी जात असे. आमच्याजवळ असलेल्या साधनांनुसार काही पुस्तके, एक काळा फळा, खडू, इत्यादी साहित्य जमवून त्या वस्तीत त्यांच्या सार्वजनिक बैठकीची एक जागा होती, त्यामध्ये ठेवले. मी दररोज संध्याकाळी तेथे गेल्यानंतर हे सामान काढून शिक्षणासाठी येणा-या स्त्री-पुरूषांची वाट पाहत बसे. पहिल्या दिवशी फक्त काही मुलेच आली. परंतु ती शाळेत जाणारी असल्यामुळे त्यांना आमच्या कामाबद्दल कौतुक असले, तरी त्यांना काही शिक्षणाची गरज नव्हती. परंतु प्रौढांपैकी ज्यांच्यासाठी आमची शाळा होती, त्यांच्यापैकी कोणीही येईल, असे मला दिसत नव्हते. मग मी आसपासच्या चार घरी मुद्दाम जाऊन यासंबंधाने बोललो, तेव्हा एका ब-याच वयोवृद्ध माणसाला माझी दया आली आणि त्याने आपल्या मंडळींना सांगितले,

"पोराहो, हे रोज आपल्याकडे संध्याकाळी येतात. तेव्हा आपण काही मंडळींनी त्यांच्याकडे शिकायला गेले पाहिजे."

दुस-या दिवसापासून पाच-दहा मंडळी येऊ लागली. मी शिक्षकाचे काम केले. खरे तर त्या कामाचा अनुभव नसतानाही साक्षरतेचा हा वर्ग चालविण्याचा प्रयत्न मी केला.

माझा हा प्रयोग दोन-तीन महिने चालल्यानंतर आपोआप कमी कमी होत गेला. कारण प्रौढ विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली म्हणण्यापेक्षा संपली म्हटले, तरी चालेल. आणि माझ्या दृष्टीने मी मोठ्या उत्साहाने सुरू केलेली शाळा आपोआप बंद पडली.

मला वाटले, ही सर्व हकीकत मी कर्मवीर शिंदे यांना कळविली पाहिजे, नाही तर त्यांना आपली फसगत झाली, असे वाटले, म्हणून मला आलेला अनुभव मी त्यांना एका सविस्तर पत्राने कळविला.

मुख्य समस्या होती, ती ही, की दलितांच्या मनात शेकडो वर्षांच्या अन्यायाविरूद्ध जो सुप्त राग होता, तो कुठे त्यांना श्रीगणेशा शिकविल्यामुळे किंवा कुठे एखाद्या मंदिरात प्रवेश देण्यामुळे जाणार नव्हता. माझ्याबरोबर हायस्कूलमध्ये शिकत असलेल्या पण आता कॉलेजमध्ये गेलेल्या एक-दोघां हरिजन मित्रांची गाठ पडली, तेव्हा मला हे तीव्रतेने जाणवले, की गांधीजींच्या प्रयत्नांचे या मंडळींना एवढे महत्त्व वाटत नाही. त्यांना वाटत होते,
"तुम्हीच अन्याय केला, तेव्हा तुम्हीच त्यांची काय सुधारणा करणार? आम्ही स्वतःच प्रयत्न करून आमच्या समाजाची प्रगती केला पाहिजे. डॉक्टर आंबेडकर आमचे नेते आहेत. त्यांनी शिक्षण घेऊन स्वतःची माणुसकी व स्वाभिमान जागविण्याचा संदेश दिला आहे. राजकारणात संघटित होऊन आपण आपली प्रगती आपणच करायची, असे आम्ही ठरविले आहे. तुमच्या मंदिर प्रवेशाचा आम्हांला काडीइतकाही उपयोग नाही."

त्या समाजाची ही भावना मी समजू शकलो आणि हरिजन-सेवेच्या प्रयत्नांचा माझ्यापुरता तरी तात्पुरता शेवट झाला.

१९३३ चे साल हरिजन-सेवेच्या कामाचे प्रयत्न आणि माझ्या परीक्षेची तयारी यात केव्हा गेले, हे मला कळले नाही. आमच्यानंतर आमचे इतर सत्याग्रही मित्रही हळू

हळू घरी परत येत होते. विशेष म्हणजे श्री. काशिनाथपंत देशमुख, आत्माराम पाटील, श्री. दयार्णव कोपर्डेकर ही मंडळी त्यांत होती. मॅट्रिक झाल्यानंतर पुढे काय करणार, असा या मंडळींचा माझ्या पाठीमागे लकडा होता. मी त्यांना माझे विचार सांगत असे,

"कायदेभंगासारखी चळवळ जर पुन्हा आली, तर गोष्ट वेगळी, नाही तर मी माझा उच्च शिक्षणाचा कार्यक्रम पुरा करणार आहे."

त्या सगळ्यांना तो योग्य वाटत असे, पण मी तो कसा पुरा करणार, याची त्यांना शंका होती. उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणारी आमची सांपत्तिक स्थिती, असावी, तशी अनुकूल नव्हती. त्यासाठी कोल्हापूर किंवा पुणे या दोहोंपैकी एका ठिकाणी जाण्याची गरज होती. शिवाय तिथला दरमहाचा खर्च शेकड्याने येणार होता. तो मी कोठून उभा करणार, असा त्यांचा प्रश्न असे. मी निरूत्तर होत असे. परंतु माझा विचार मी काही सोडत नसे. मी त्यांना म्हणे,

"तुमचे काही काम तातडीने असेल, तर ते तुम्ही मला सांगा. मी त्यात माघार घेतली, तर तुम्ही मला दोष द्या."

१९३४ च्या मार्च-एप्रिलमध्ये माझी परीक्षा झाली. जूनमध्ये मी त्या परीक्षेत पास झालो, असे समजल्यामुळे पुढे काय, हा तातडीचा प्रश्न म्हणून माझ्यापुढे आ वासून उभा राहिला. माझे मित्र राघूआण्णा यांना प्रामाणिकपणे असे वाटत होते, की मी माझे आयुष्य शिक्षणासाठी व्यर्थ घालवत आहे. त्यांचे असे मत होते, की मला आवश्यक तो अनुभव व जागृत विचारशक्ती हे सर्व आता प्राप्त झाल्यानंतर शाळा-कॉलेजच्या वर्गात बसून दिवस न् दिवस आणि महिने न् महिने व्यर्थ घालविण्यात काय अर्थ आहे? कायदेभंगाची चळवळ असताना करावयाचे काम वेगळे, पण एकदा ते व्रत स्वीकारल्यानंतर काही एक दैनंदिन काम आपण स्वतःसाठी बांधून घेतले पाहिजे. तसे काही तरी ठरविण्याची ही वेळ आहे, असे त्यांना मनापासून वाटत होते.

नेमके याच सुमारास श्री. शंकरराव देव हे काही कामासाठी कराडला आले होते. यापूर्वी त्यांची माझी भेट झालेली नव्हती. मात्र राघूआण्णा यांची त्यांची ओळख होती. शंकरराव देव हे श्री. शिराळकरांच्या घरी उतरले होते.

राघूआण्णांनी मला विचारले,
"तुझ्या शिक्षणाबाबत आपण शंकरराव देवांचा सल्ला घेऊ या का?"
मी त्यांना म्हटले,
"माझ्या शिक्षणाचा निर्णय माझा मीच केला पाहिजे. बिचा-या शंकररावांसारख्या मोठ्या माणसाला याची तसदी कशाला?"

पण त्यांनी फारच आग्रह केला, म्हणून मी त्यांच्यासमोर शंकरराव देव यांना भेटण्यासाठी गेलो. म्हटले, निदान ओळख तरी होईल. भेटल्यानंतर पहिले कुशल-समाचाराचे प्रश्न संपल्यावर राघूआण्णांनी माझी माहिती करून दिली.

शंकरराव देवांनी सांगितले,
"आचार्य भागवत यांच्याकडून त्यांच्यासंबंधी ऐकले आहे."

पुढे शिक्षण घेण्याचा माझा विचार आहे, असे राघूआण्णांनी सांगताच शंकररावही म्हणाले,
"कशासाठी वेळेचा दुरूपयोग करता आहात? कुठल्या तरी एका निश्चित कामाला तुम्ही आता वाहून घेतले पाहिजे."

मी विचारले,
"कुठले काम आणि कसले काम?"
ते म्हणाले,

"मी काही विचार केलेला नाही. पण तुम्ही आठ-पंधरा दिवसांत आमच्या सासवडच्या आश्रमात एक वर्षासाठी राहायला या ! म्हणजे तुमच्या-आमच्या चर्चेतून निश्चित कामाची योजना आपण उभी करू."

मग इतर काही गोष्टी झाल्या आणि आम्ही निरोप घेऊन बाहेर पडलो. माझ्या मनावर शंकररावांनी सांगितलेल्या गोष्टीचा अगदीच परिणाम झाला नव्हता, असे नाही. जर काही निश्चित दिशा निघत असेल, तर का विचार करू नये ? असा प्रश्न माझ्या मनाशी येऊन गेला.
तो दिवस मी तसाच जाऊ दिला. दुस-या दिवशी सकाळी मी उठल्यानंतर माझे मन स्वच्छ आहे, असे माझ्या लक्षात आले. आश्रम वगैरे काही नाही. पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला जायचे, हा माझा निर्णय झाला. त्यानंतर दोन दिवसांनी राघूआण्णांना परत भेटल्यानंतर मी त्यांना माझा विचारपूर्वक घेतलेला निर्णय सांगितला. अर्थात मग त्यावर त्यांनी आक्षेप घेतला नाही.

कोल्हापूरच्या कॉलेजात जाण्याचा मी विचार केला खरा, पण त्यात पुष्कळ अडचणी दिसू लागल्या. मी याबाबत माझे बंधू आणि आई यांच्याशी बोललो. अर्थात त्यांच्या कुवतीप्रमाणे त्यांना जे करणे शक्य होते, ते त्यांनी करण्याचे कबूल केले. पण ते काही पुरेसे नव्हते, म्हणून मी माझे मित्र गौरीहर सिंहासने यांच्याकडे माझा उच्च शिक्षणाचा प्रश्न मांडला. ते म्हणाले,
"कसलाही विचार न करता कोल्हापूरला जा. बाकीचे सर्व प्रश्न आम्ही मित्र पाहून घेऊ."

- आणि म्हणून १९३४ च्या जून महिन्याच्या तिस-या आठवड्यात उच्च शिक्षणासाठी मी कोल्हापूरला प्रस्थान केले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या कर्तृत्वामुळे कोल्हापूर शहर हे गोर-गरिबांसाठी एक अतिशय महत्त्वाचे शिक्षण-केंद्र बनले होते. तेथे त्यांनी अनेक वसतिगृहे

चालविण्याची व्यवस्था केली होती. मी जाताना मात्र मनाशी ठरवून गेलो होतो, की या कुठल्याही वसतिगृहात राहायचे नाही. त्यावेळी कोल्हापूरमध्ये वेगवेगळ्या जातींची वसतिगृहे असत. मराठा समाजासाठीसुद्धा काही होती. ती चांगली होती आणि प्रसिद्धही होती, पण माझ्या विचाराची जी धारा होती, त्याप्रमाणे मला अशा एखाद्या जातीच्या वसतिगृहात जाऊन राहणे पसंत नव्हते. मला माझ्या मित्रांचा आधार होता. त्यामुळे कुठे तरी स्वतंत्र खोली घेऊन राहावे, असे मी ठरविले आणि याप्रमाणे पुढची चार वर्षे मी कोल्हापूरमध्ये वेगवेगळ्या भागांत स्वतंत्र खोली घेऊन राहिलो.

माझे पहिले वर्ष मी कोल्हापूर शहरातील प्रसिद्ध शिवाजी पेठेत काढले. आता जेव्हा मी कोल्हापूरच्या मंडळींना हे सांगतो, तेव्हा त्यांना ते खरे वाटत नाही. बाबूआण्णा कोठावळे आणि निपाणीचे श्री. अनंतराव कटकोळ यांनी स्वतःसाठी भाड्याने घेतलेल्या जागेतील दोन खोल्या त्यांनी मला दिल्या. तेथे मी एक वर्ष काढले.

कोल्हापूर हे करवीर संस्थानच्या राजधानीचे शहर होते, त्यामुळे तेथले राजकारण काही वेगळे होते. प्रजा परिषदेचे काही कार्यकर्ते क्रियाशील होते. त्या सर्वांचे आघाडीवर असलेले कार्यकर्ते वीर माने यांची व माझी माहिती होती. प्रजा परिषदेच्या ब-याच कार्यकर्त्यांनी ३२ साली कोल्हापूर संस्थानच्या बाहेर सत्याग्रह केल्यामुळे त्यांना येरवडा जेलमध्ये जावे लागले होते. त्यांतल्या कित्येकांशी तेथे माझ्या ओळखी झाल्या होत्या. कोल्हापूरला आल्यानंतर हे संबंध पुन्हा जागे झाले आणि माझ्या सार्वजनिक कामाचा धागा तेथेही माझ्या दृष्टीने जोडला गेला.

राजाराम कॉलेजमध्ये मी विद्यार्थी म्हणून प्रवेश केला, तेव्हा तेथील एकंदर वातावरणाने मी चांगलाच प्रभावित झालो. शहराच्या मध्यभागी असलेल्या जुन्या राजवाड्यात आमचे हे राजाराम कॉलेज होते. उत्तम शिक्षक-वर्ग, मोकळे वातावरण, समृद्ध लायब्ररी, एवढा सर्व संच असल्यामुळे शिक्षण-संस्थेला महत्त्व का येणार नाही?

त्यावेळी डॉक्टर बाळकृष्ण कॉलेजचे प्राचार्य होते. वृत्तीने राष्ट्रीय, इतिहासाचे विद्वान प्राध्यापक, कुशल कारभारपटू, पल्लेदार वक्तृत्व यांमुळे त्यांना राजाराम कॉलेजमध्ये आणि कोल्हापूर शहरात अतिशय मान असे. आमच्या पहिल्या वर्षाच्या वर्गाला शिकविण्यासाठी ते काही येत नसत, त्यामुळे त्यांचा काही संबंध येईल, असे मला वाटेना, म्हणून एक दिवस मी भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. त्यांनी माझी मोठ्या अगत्याने चौकशी केली. मी त्यांना माझा पूर्वेतिहास सांगितला. माझी दोन-तीन शैक्षणिक वर्षे फुकट गेल्याचे त्यांना सांगितले आणि शिक्षणक्रम पुरा करण्याचा माझा निर्धारही व्यक्त केला. त्यांची सहानुभूती आणि लक्ष असावे, म्हणून भेटण्याची तसदी दिली, असेही त्यांना सांगितले.

मी हे सगळे मोकळेपणाने सांगितले, म्हणून त्यांना आनंद झाला. त्यांनी मला सांगितले,
"लक्षात ठेव, हे संस्थानी राज्य आहे, मी पंजाबातून येथे आलेलो आहे, तू जोपर्यंत शैक्षणिक कामात प्रगती करत राहशील, तोपर्यंत माझा तुला पाठिंबा राहील, पण कृपा करून कोल्हापूर संस्थानच्या राजकारणात भाग घेऊ नकोस."

मी त्यांना सांगितले,
"कोल्हापूर प्रजा परिषदेच्या काही कार्यकर्त्यांशी माझी ओळख आहे, आम्ही जेलमध्ये एकत्र होतो. परंतु येथल्या कामात प्रत्यक्ष भाग घेण्याची माझी इच्छा नाही, त्याचे काही कारणही नाही, पण अधूनमधून माझ्या सातारा जिल्ह्यात जाऊन माझे काम मी करत राहणार आहे. त्याला तुमची काही हरकत नाही ना?"

त्यांनी सांगितले,
"तो तुझा प्रश्न आहे, त्याच्याआड मी येणार नाही."
- आणि त्यांनी मोठ्या आपुलकीने मला निरोप दिला.

त्यांचा माझा हा जो गुरूशिष्य स्नेहाचा आणि जिव्हाळ्याचा संबंध होता, तो पुढे चार वर्षे कायम राहिला. मला अधूनमधून जरूर पडेल, तेव्हा मी त्यांना भेटत असे, तेव्हा ते आपुलकीने चौकशी करत आणि जरूर तेव्हा मार्गदर्शनही करत.

श्री. बाळकृष्णांशी हे संबंध प्रस्थापित झाल्यामुळे मी एका दृष्टीने निर्धास्त झालो आणि माझ्या अभ्यासाच्या पाठीमागे लागलो. पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम कसा अगदी साधा होता. मला फक्त संस्कृत सोडून अर्धमागधी घ्यावे लागले होते, त्यामुळे अर्धमागधीचा अभ्यास करणे जरूर होते. संस्कृत मला मॅट्रिकच्या वेळी सोडून द्यावे लागले होते. त्याचाही एक छोटासा किस्सा आहे.

मी मॅट्रिकचा अभ्यास करीत असताना शाळेतून मिळणारे संस्कृतचे शिक्षण हे अपुरे आहे, असे वाटू लागले, परंतु इतर मुलांनी ज्याप्रमाणे तो विषय बाहेर शिकण्याची व्यवस्था केली होती, तशी मला करता आली नाही. विशेषतः, एक शास्त्री विद्यार्थ्यांना बोलावून संस्कृत शिकवीत असत. त्यांच्याशी माझी ओळख नसल्यामुळे अनंतराव कुलकर्णी यांना मी माझ्यासाठी चौकशी करायला सांगितले होते, कारण तेही आमच्याबरोबर परीक्षेला बसणार होते.

अनंतराव माझा मोठा जिगरी मित्र होता. तो मनाने फार सरळ होता. तो मला पहिल्या प्रथम काही सांगेचना; परंतु मी खोदून खोदून विचारल्यानंतर त्याने सांगितले,
"शास्त्रीबुवा म्हणाले, 'मी अब्राह्मणांना संस्कृत ही देववाणी शिकविणार नाही."

त्याने मला शास्त्रीबुवांचे ते शब्द सांगितले, तेव्हा त्याच्या डोळ्यांत पाणी आले. मी अनंताला सांगितले,
"अंतूकाका, तू माझी बिलकूल काळजी करू नको."

हे सर्व ऐकल्यानंतर मी ठरविले, की संस्कृत सोडून द्यायचे आणि सरळ शुद्ध मराठी घ्यायचे. उरलेल्या चार-दोन महिन्यांत मी परीक्षेला बसायचे ठरविले.

अशा तऱ्हेने माझे संस्कृत सुटल्यामुळे कॉलेजच्या पहिल्या वर्षी मी अर्धमागधीचा अभ्यास करत होतो. डॉक्टर उपाध्ये नावाचे प्राध्यापक आम्हांला अर्धमागधी शिकवीत. ते अतिशय उत्तम शिक्षक होते. थोडे श्रम केल्यानंतर माझ्या लक्षात आले, की अर्धमागधी हा परीक्षेत मार्क मिळविण्यासाठी उत्तम विषय आहे.

त्यावेळी महाराष्ट्राचे आवडते कांदबरीकार ना. सी. फडके हे आमच्या राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. पहिल्या वर्षाला त्यांचा माझा काही संपर्क आला नाही; पण दुस-या वर्षी मी इंटरमीजिएटला गेल्यानंतर आम्हांला ते तर्कशास्त्र शिकवीत होते. ना. सी. फडके हे बाहेर जसे लोकप्रिय होते, तसे ते विद्यार्थ्यांतही अत्यंत प्रिय होते. साधा, खादिधारी, गंभीर प्रवृत्तीचा विद्यार्थी म्हणून मी त्यांच्याजवळ फारसा जाऊ शकलो नाही. परंतु त्यांचे व्यक्तिमत्त्व मी जास्तीत जास्त न्याहाळून पाहण्याचा प्रयत्न करीत असे. कारण त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'जादुगार' आणि 'दौलत' या कादंबऱ्यांचा मी मोठा भोक्ता होतो. अशी मनोज्ञ मराठी लिहिणारा लेखक आपल्याला शिकवायला शिक्षक म्हणून आहे, याचा आम्हांला आनंद वाटत होता. त्यांच्या तर्कशास्त्राच्या तासाला मी वर्गात बिनचूक हजर राहात असे. विषय सोपा आणि मनोरंजक करण्याची त्यांची हातोटी ते उत्तम शिक्षक असल्याची साक्ष देत होती आणि त्यामुळे मराठी, इतिहास यांच्याबरोबरच तर्कशास्त्रही माझ्या आवडीचा विषय झाला.

कॉलेजमधल्या अध्यापनाच्या कामाबरोबरच फडक्यांचे इतरही सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सहकार्याने चालू असत. अधूनमधून त्यांची उत्तम व्याख्याने कोल्हापूरला होत असत. मी ती नेहमी ऐकत असे.

आमच्या कॉलेजमध्ये त्यांनी संगीताची आवड असलेल्या विद्यार्थ्यांचे एक मंडळ बनविले होते. त्या मंडळाचा मी सभासद होतो. कॉलेजच्या वरच्या मजल्यावरील हॉलमध्ये आयोजित केलेली 'गानहिरा' हिराबाई बडोदेकर यांच्या संगीताने भिजून गेलेली आणि रंगलेली एक मैफल अजूनही माझ्या नजरेसमोर तरळते.

त्याच वेळी कोल्हापुरात असलेले दुसरे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्राध्यापक माधवराव पटवर्धन यांचे. हे उत्तम कवी म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. त्यांचे अर्धे इंग्रजी आणि अर्धे मराठीतील 'माधव ज्यूलियन' हे नाव त्यांच्याबद्दल अधिकच औत्सुक्य व कुतूहल निर्माण करत असे. मात्र फडके जसे लोकप्रिय होते, तशा तऱ्हेची लोकप्रियता माधवरावांना नव्हती. पण ते प्रवृत्तीने विद्वान आणि प्रकृतीने गंभीर होते. इंटरमीजिएटच्या वर्गामध्ये ते आम्हांला इंग्रजी कविता शिकवीत असत. परंतु त्यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये जिव्हाळा प्रस्थापित करण्याची जी आवश्यकता असते, ती कधी आढळली नाही. ते वक्तशीर येत, आपल्या तासाच्या वेळी खाली मान घालून आपल्या खुर्चीवर येऊन बसत, हातात पुस्तक घेऊन पुस्तकाकडे पाहत पाहत खाली मान घालून तासभर बोलत राहत आणि आपला वेळ संपला, की तशीच खाली मान घालून निघून जात.

ही दोन्ही आपापल्या परीने मोठी माणसे होती. त्यांच्याबद्दल आम्हांला आदर होता. पण कारण काय, ते मला समजत नाही, त्यांच्याजवळ जाऊन त्यांची दाट ओळख करून घ्यावी किंवा त्यांच्याशी मैत्री संपादन करावी, असे विचार माझ्या मनात कधीच आले नाहीत. स्वभावभिन्नता किंवा आयुष्याकडे पाहण्याचा फरक यांमुळे कदाचित असेल, पण हे घडले खरे.

डॉक्टर बाळकृष्ण यांच्या बाबतीत मात्र मला हा असा अनुभव आला नाही.

पुढे कालांतराने मी मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रोफेसर फडके यांची आणि माझी गाठभेट

झाली होती. त्यांनी जुन्या आठवणी दिल्या घेतल्या, आणि आमचा चांगला स्नेह जमला. नंतर त्यांचे माझे चांगले घनिष्ठ संबंध आले आणि त्यांच्या-माझ्यांत काही पत्रव्यवहारही झाला.

कोल्हापूरच्या शिक्षणक्षेत्रातील आणखी एका महत्त्वाच्या व्यक्तीचा उल्लेख केला पाहिजे. त्यांचे नाव डॉक्टर बोस - हे इंग्रजीचे प्रोफेसर होते. मी बी. ए. च्या वर्गात असताना तेही आम्हांला इंग्रजी कविता शिकवीत असत. हायस्कूलपासून कॉलेजपर्यंतच्या विद्यार्थिदशेत मी अनेकांपासून इंग्रजी कविता शिकलो आहे. परंतु प्रोफेसर बोस यांची शैली कोणाला साधली नाही. त्या प्रकारची काहीशी शैली हायस्कूलमध्ये असताना आमचे शिक्षक श्री. दत्तोपंत पाठक यांच्यामध्ये मला पाहायला मिळाली होती.

प्रोफेसर बोस यांची माझी त्यानंतर भेट दिल्लीमध्ये मी संरक्षण मंत्री असताना झाली. ते दिल्लीमध्ये आहेत, असे कोणी तरी मला सांगितले.

"मी तुमच्या राजाराम कॉलेजचा विद्यार्थी आहे." असे मी त्यांना फोन करून सांगितले व "माझ्या घरी चहाला याल का?" असे विचारले.

त्यांनी ते निमंत्रण आनंदाने स्वीकारले आणि त्यांचा मुलगा, जो दिल्ली युनिव्हर्सिटीमध्ये प्राध्यापक होता, त्याच्याबरोबर येऊन, माझ्या घरी तासभर बसून, ते कोल्हापूरच्या गोष्टी बोलून गेले.
शैक्षणिक जीवनातल्या अशा व्यक्तींचा प्रभाव हा बराच काळ टिकून असतो व एका अर्थाने तो अविस्मरणीय असतो, कारण त्यांच्याकडून घेतलेले संस्कार हे कायम टिकणारे संस्कार असतात.

कोल्हापूरचे राजाराम कॉलेज म्हटले, म्हणजे मला शैक्षणिक क्षेत्रातील या माणसांची नित्य आठवण येते.

कोल्हापूरची उच्च शिक्षणाची ही चार वर्षे माझ्या आयुष्यातील पायाभूत आणि गतिमान अशी वर्षे आहेत. गेल्या तीन वर्षाच्या राजकीय अनुभवानंतर मी आता सर्व परिस्थिती व विचारांतील भेदाभेदांकडे काहीशा तटस्थ वृत्तीने पाहू शकत होतो. उच्च शिक्षण पुरे होईल, की नाही, अशी माझ्या मनात धास्ती होती ती अडचण दूर झाली. कारण मी कोल्हापूर येथे येऊन बराच स्थिर झालो होतो. सांपत्तिक अडचणी चार वर्षे वारंवार येतच राहिल्या. पण माझे बंधू गणपतराव व माझे सर्व मित्र यांच्या मदतीने त्यांना मी तोंड देऊ शकलो. मन केन्द्रित करून अभ्यास करावा आणि वाचन करावे, अशी माझी इच्छा होती आणि या दृष्टीने या चार वर्षांत मी पुष्कळ फायदा करून घेतला, असे म्हटले, तरी चालेल. याचा अर्थ असा नाही, की मी सातारा जिल्ह्यातील माझ्या कार्यकर्त्या मित्रांपासून वा त्यांच्या कामापासून अलग राहू इच्छीत होतो. ते तर मला कदापि शक्य नव्हते. मी तर आता सातारा जिल्ह्यातील काँग्रेस चळवळीचा एक अतूट भाग झालो होतो. कधी मी त्यांच्याकडे साता-याला शनिवारी-रविवारी सुटीच्या दिवशी जात असे किंवा माझ्या मित्रांपैकी काहीजण मला भेटण्यासाठी कोल्हापूरला येत. त्यामुळे ते संबंध तसेच वाढत होते. चळवळीच्या कामापेक्षा मी वाचनासाठी जादा वेळ देत होतो. आणि वाचनाची साधने विपुल असल्यामुळे बौद्धिक आणि वैचारिक शक्ती मिळविण्याच्या कामात मी गर्क होऊन गेलो होतो.

आता माझे वाचन मर्यादित राहिले नव्हते. काय वाचावे आणि काय वाचू नये, असा संभ्रम आता वाटत नव्हता. त्या बाबतीत माझ्या दिशा कायम झाल्या होत्या आणि योजनापूर्वक काही वाचावे, असे मी ठरवले होते. राजकारण, इतिहास आणि वाङ्मय या विषयांची निवडक पुस्तके मी शोधू लागलो. कोल्हापूरच्या लायब्ररीत कित्येक तास बसून ती वाचूही लागलो. कॉलेजमध्ये अभ्यासासाठी नेमलेले काही विषय नवे होते. म्हणून त्यांसाठीही थोडा-फार प्रयत्न करावा लागला; परंतु बरेचसे विषय सामान्य स्वरूपाचे होते. त्या विषयांना धरूनही मी वाचनाचा प्रयत्न करीत असे. मला राजाराम कॉलेजच्या लायब्ररीमध्ये इतिहासविषयक पुष्कळ चांगली पुस्तके

आढळली. समाजवादी विचार समजल्याने इतिहासाकडे पाहण्याची माझी दृष्टी बदलली होती. ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासाबरोबर त्यांना प्रेरित करणा-या सामाजिक व वैचारिक शक्तींचाही आवाका आला पाहिजे, संकुचित व संकीर्ण क्षेत्र व काळ यांपेक्षा देश व जग यांकडे विशाल नजरेने पाहता आले, तर सर्व बाबींचा संदर्भ समजून त्यांचे सम्यक दर्शन होते, असे आता माझे मत झाले होते. या दृष्टीने एच्. जी. वेल्स यांच्या ('Outline of History') 'आऊटलाईन ऑफ हिस्टरी' या सर्व मानवजातीच्या विकासाला आपल्या कवेत पकडणा-या ग्रंथाच्या वाचनाने मी सुरुवात केली. या ग्रंथाच्या वाचनाने मी काहीसा स्तिमित झालो होतो. या तऱ्हेने वाचलेले हे पहिले पुस्तक, म्हणून याची माझी आठवण येथे देत आहे.

वाङ्मयीन क्षेत्रात मी बर्नाड शॉंच्या नाटकांच्या प्रस्तावना वाचल्या. नाटकांच्या संहितांपेक्षा प्रस्तावनाच मोठ्या होत्या. पन्नास पानांचे नाटक, तर १५० पानांच्या प्रस्तावना, असा काहीसा हिशेब बर्नाड शॉंच्या नाटकाबाबत होता. या माणसाची प्रतिभा विशाल होती, त्यामुळे सर्व विषयांत त्यांचा प्रवेश होता. त्यांचे समाजवादावरील एक पुस्तक त्यावेळी खूप नावाजले गेले होते. बर्नाड शॉंची एक विशिष्ट लेखनशैली आहे. त्या शैलीची या निमित्ताने ओळख झाली.

यानंतर फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्यूगो यांच्या 'लॉ मिझराब्ल' आणि इतर एक-दोन कादंब-याही मी वाचल्या.

असे मी सर्वांगीण वाचन करीत होतो. माझे मन सांस्कृतिकदृष्ट्या सुसंपन्न करण्याचा प्रयत्न करीत होतो. त्याचबरोबर राजकीय विषय आणि घडामोडी यांच्याशीही दैनंदिन संबंध ठेवत होतो. तेव्हा प्रसिद्ध होणारे गांधीजींचे साप्ताहिक 'हरिजन'अगदी न चुकता वाचणे हे माझे महत्त्वाचे काम असे. घरून येणा-या पित्याच्या पत्राची ज्याप्रमाणे मुलगा वाट पाहतो, त्याचप्रमाणे लायब्ररीत 'हरिजन' केव्हा येतो, याची मी वाट पाहत असे. गांधीजी 'हरिजन'मध्ये त्यांना महत्त्वाच्या

वाटणा-या सर्व प्रश्नांवर लिहीत असत. त्यांचे सरळ, साधे, सोप्या इंग्रजीमधील गंभीर विचार वाचताना मनाला एक प्रकारे शक्ती मिळत असे.

हे सर्व वाचत असतानाच, जे राजकीय संस्कार घेऊन मी कोल्हापूरला आलो होतो, त्यांचा विकास कसा करावयाचा, हाही माझ्यापुढे प्रश्न होता. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये वाहून घ्यायचे, हा तर निर्णय होताच, परंतु त्या  स्वातंत्र्याचा अर्थ काय, हे निश्चित करण्याची गरज होती. कोट्यवधी गरीब शेतकरी मागासलेपणात बुडून गेले आहेत, त्यांचे भवितव्य काय? माझ्यासारखी अनेक तरुण मुले शिक्षणाची संधी न मिळाल्यामुळे अंधारात आहेत, त्यांना डोळस करून एक नवी दृष्टी दिल्याशिवाय त्यांचे भविष्य उज्ज्वल होणार नाही, त्याचे काय? अशा अनेक प्रश्नांचा मनात एकसारखा संघर्ष चालू होता. विसापूर जेलमधून बाहेर पडताना गांधीवादाबद्दलची आपुलकी आणि समाजवादासंबंधीचे आकर्षण या दोन भावना म्हणा किंवा हे दोन विचार म्हणा, घेऊन मी बाहेर पडलो होतो आणि माझ्या मनात जे हे विचार चालू होते, त्यांच्याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये वारंवार चर्चा करीत होतो. कोल्हापूर प्रजा परिषदेच्या काही कार्यकर्त्यांशी माझा संपर्क होता; पण त्यांचे प्रश्न वेगळे होते. समाजवादाची मीमांसाकरण्यासाठी काही अभ्यास-मंडळे सुरू करावीत, असे मी माझ्या जिल्ह्यापुरते ठरविले आणि त्यासंबंधी मी माझे प्रयत्न सुरू केले. श्री. आत्माराम पाटील बोरगावकर व राघूआण्णा लिमये हे याबाबतीत माझ्या अधिक जवळ होते. श्री. आत्माराम पाटील महिन्यातून एकदा तरी कोल्हापूरला येत. आमच्या अनेक विषयांवर चर्चा होत. जिल्ह्यामध्ये, ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची एक मित्रसंघटना उभी करण्याचा प्रयत्न करायचा निर्णय आम्ही घेतला. परंतु त्याचबरोबर काँग्रेस हाच आपला राजकीय पक्ष मानावयाचा व त्याच्या ध्येयधोरणाबाहेर ही संघटना न्यावयाची नाही, असे बंधन आपण स्वीकारले पाहिजे, अशी त्यांची व माझी चर्चा होत असे. त्याचप्रमाणे ते क्रियाशील राहिले.

पुढे नवे नवे मित्र जोडून ते त्यांना कोल्हापूरला घेऊन येत किंवा आपल्या गावी त्यांच्या बैठका ठरवून कोल्हापूरहून मला बोलावून घेत. हे मित्र-मंडळ बांधण्याचे

आमचे हे क्रियाशील पाऊल पकड घेऊ लागले. त्यामुळे माझ्या मनाला उत्साह वाटू लागला.

शेतकरी कार्यकर्त्यांशी बोलताना समाजवादाचा विचार मांडला, तर त्यांना तो आवडत असे. कारण समाजवादाचा त्यावेळी जास्तीत जास्त जो अर्थ समजला होता, त्याची दोन अंगे होती. एक गरीब-श्रीमंत ही विषमता घालविणे आणि जे मागासलेले आहेत, त्यांना सर्व तऱ्हेच्या उन्नतीची संधी अधिकार म्हणून मिळवून देणे. त्यामुळे अवतीभोवती दिसणारी गरिबी आणि मागासलेपण यांमुळे दबून गेलेल्या त्या कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यांवर मला नवा उत्साह दिसून येई. काँग्रेस संघटनेत राहून समाजवादी मित्रांचा एक संघ बनवावयाचा व हळू हळू त्यांच्या मदतीने सर्व जिल्हा काँग्रेसच समाजवादी विचारांची करावयाची, अशी आमची इच्छा होती. आमच्या कामाची ही दिशा होती आणि एक-दोन वर्षाच्या प्रयत्नांनंतर त्याला काही रंगरूप येऊ लागले. त्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढू लागला, पण त्यामध्ये काही अडचणीही येत होत्या.

माझे मित्र श्री. काशिनाथपंत देशमुख हे कट्टर गांधीवादी होते. त्या बाबतीत ते बिलकूल तडजोड करायला तयार नव्हते. गांधींच्या विधायक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीने ग्रामीण जीवनात शक्ती येईल, असा त्यांचा विश्वास होता. समाजवाद शब्द आम्ही दोन्ही मंडळी वापरीत होतो, पण प्रत्येकाची प्रेरणा, संदर्भ व अर्थ पूर्णतः वेगळा होता. ते जेव्हा असे प्रश्न उपस्थित करत, तेव्हा माझ्या मनात मोठा पेच पडे, की आपण आपल्या स्वतःची फसवणूक तर करून घेत नाही ना? गांधींच्या राजकीय नेतृत्वावर माझी तेवढीच निष्ठा होती. त्यांच्या विधायक कार्यक्रमातून कार्यकर्त्यांना क्रियाशील ठेवण्याचा व जनसंपर्क साधण्याचा मार्ग साध्य होत होता, ही गोष्ट खरी, पण समाजाचे मूलभूत प्रश्न सोडवून देशाला नवे आधुनिक रूप घ्यायचे सामर्थ्य त्या कार्यक्रमात आहे, का नाही, याच्याबद्दल माझ्या मनात शंका असे. तशा तात्विक व वैचारिक चर्चा कार्यकर्त्यांच्या बैठकींतून रंगत असत. कधी कधी मतभेदाला ऊत येई. पण आमच्या मैत्रीत कधी बाधा आला नाही.

कोल्हापूरला माझ्या काही नवीन ओळखी होत होत्या. त्यापैकी एक म्हणजे श्री. बिडेश कुलकर्णी. हे कोल्हापूरला असताना त्यांची माझी भेट व ओळख झाली. ह्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ते मोठे विवादपटु होते. संभाषणातील स्पष्टोक्ती आणि विवाद घालण्यातली चतुरता यांमुळे त्यांच्याशी बोलताना आनंद होई. ते होते सुभाषचंद्र बोस यांच्या विचारसरणीचे.

मी त्यावेळपर्यंत समाजवादाचा विचार करत असल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाकडे आकर्षित झालो होतो. गांधीजींबद्दल आपुलकी आणि हिंदुस्थानच्या सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांकडे नव्या समाजवादी दृष्टिकोनातून पाहण्याचा विचार या दोन गोष्टींच्या संघर्षाचे चक्र माझ्या मनात फिरत होते.

अशाच प्रकारचे संघर्षाचे चित्र मी पं. जवाहरलाल नेहरूंच्या विचारात आणि जीवनात पाहिले. त्यांचे आत्मचरित्र नुकतेच प्रसिद्ध झाले होते. आम्ही काही मित्रांनी ते एकत्र बसून वाचले. मी तर त्याची पुन्हा पुन्हा पारायणे केली. त्यावेळी मनात एक गोष्ट स्पष्ट झाली, की पं. जवाहरलाल नेहरूंच्या मार्गाने जर काँग्रेस गेली, तर त्यात आपण जो समाजवादाचा विचार करतो आहोत, तो यशस्वी होईल. यामुळे पंडित नेहरूंचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे विचार यांचे एक नवे आकर्षण माझ्या मनात निर्माण झाले होते.

श्री. बिडेश कुलकर्णी यांच्याशी बोलताना मी माझे हे म्हणणे मोठ्या आग्रहाने मांडत असे. दुस-याचा विचार सहजासहजी मान्य करण्याइतके ते लेचेपेचे नव्हते. त्यावेळी त्यांनी माझे विचार मान्य असल्याचे कधीच सांगितले नाही. पण पुढे ब-याच वर्षांनी त्यांनी मला एकदा सांगितल्याचे आठवते,

"तुम्ही कोल्हापूरला असताना पंडित नेहरू आणि समाजवादासंबंधाने जे विचार मांडत होता, त्यांचा काहीसा परिणाम माझ्यावर जरूर झाला."

माझे हे वैचारिक प्रकरण इतके साधे नव्हते. गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक आणि माझ्या जिल्ह्यातल्या काही मित्रांच्या साहचर्यामुळे, नाही म्हटले तरी, काहीशा आपुलकीने मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या विचाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अशा एका वैचारिक त्रिकोणात मी या वेळी उभा होतो. या त्रिकोणाचे उत्तर ताबडतोब मिळाले पाहिजे, असा माझा आग्रह नव्हता. कारण ते शक्य नव्हते. परंतु त्यावेळी माझी वैचारिक परिस्थिती काय होती, याचे हे चित्र आहे. विचारांचा गोंधळ कितीही असला, तरी प्रत्यक्ष कार्यामध्ये त्यांची कसोटी लावल्याशिवाय, बरोबर काय आणि चूक काय, हे समजत नाही. म्हणून मी मन मोकळे ठेवून माझ्या सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते आणि मित्रांशी हे सगळे बोलत होतो आणि वागत होतो. प्रत्यक्ष कार्य करताना जे खरे असेल, ते निघेल, असा विचार मनाशी केला. निर्णयाची मला काही घाई नव्हती. जीवन पुढे चालू होते.

देशातील राजकीय परिस्थिती ही कायदेभंगाच्या वातावरणाच्या बाहेर आली होती. विधायक कार्यक्रम, पक्षाची संघटना, आजवर झालेल्या कामाचे समालोचन, विचारांत स्वच्छता आणण्याची आवश्यकता या सर्व गोष्टींची कार्यकर्त्यांना जाणीव झाली होती आणि या दृष्टीने आपापल्या परीने ते प्रयत्न करू लागले होते. मला आठवते, १९३४ साली कायदेभंग चळवळीनतंरचे काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे भरायचे होते आणि त्या अधिवेशनासाठी बाबू राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. मी गेली काही वर्षे कार्य करीत होतो. परंतु राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांशी संबंध प्रस्थापित करावेत, असा योग मला एकदाही लाभला नव्हता. निदान आपण त्यांना एकदा प्रत्यक्ष पाहिले तरी पाहिजे, असे मला वाटे. त्यामुळे मी माझ्या मित्रांपुढे प्रस्ताव मांडला. त्यांनाही तो पटला. या अधिवेशनामुळे मुंबई पाहिल्यासारखी होईल, ही गोष्ट मनामध्ये होती. मीही मुंबई अद्याप पाहिलेली नव्हती. या अधिवेशनासाठी मी मुंबईला गेलो. या अधिवेशनात काँग्रेसचे विशाल रूप मी प्रथम पाहिले. जनमानसात या पक्षाला केवढे मोठे स्थान आहे, याचे विराट दर्शन मला मुंबई

शहरात पाहायला मिळाले. राजेंद्रप्रसाद यांचे मुंबई शहरात झालेले भव्य स्वागत डोळे दिपविणारे असे वाटले. वरळीच्या बाजूला कॉंग्रेसचे हे अधिवेशन होते. आम्ही अधिवेशनाच्या प्रेक्षागारात बसून सर्व चर्चा व भाषणे ऐकली.

त्यावेळी जातीय निवाडा (कम्युनल ॲवार्ड) हा देशात सर्वत्र वादग्रस्त प्रश्न झालेला होता. आणि याचे प्रतिसाद कॉंग्रेसमध्येही उठत होते. ब्रिटिश सरकार हिंदुस्थानसंबंधी १९३५ चा कायदा पास करण्यासाठी एक एक पाऊल पुढे टाकत होते. जातीय निवाडा हा त्यातीलच एक भाग होता. त्याला मान्यता द्यावयाची, की नाही, असा प्रश्न या अधिवेशनापुढे चर्चेसाठी होता आणि तो अतिशय वादळी ठरला. १९३५ च्या या कायद्यामध्ये मुसलमानांना स्वतंत्र मतदार-संघ देण्याची योजना या निवाड्यामुळे मांडली गेली होती. त्याला स्पष्ट विरोध करावा, असा हिंदुनिष्ठांचा आग्रह होता व मत होते. पण कॉंग्रेस वर्किंग कमिटीने राजकीय व्यवहार म्हणून पवित्रा टाकला होता, की आमची मागणी स्वातंत्र्याची आहे, जातीय निवाड्याचा स्वीकार किंवा अस्वीकार यामध्ये आम्हांला रस नाही. प्रथमतः समजायला ही भूमिका अवघड होती. पण हिंदुस्थानातील मुसलमानांचे राजकारण जे वळण घेत होते, ते लक्षात घेता, मोठ्या धोरणीपणाने व अडचणीने ही भूमिका ठरवली आणि वर्किंग कमिटीने त्याला मान्यता दिली होती. खुल्या अधिवेशनात या बाबतीत जेव्हा ठराव आला, तेव्हा त्याला विरोध करणारे अतिशय परिणामकारक असे भाषण पंडित मदनमोहन मालवीय यांचे झाले. लक्षावधी माणसांनी भरलेल्या त्या विशाल पटांगणात एक तासभर अतिशय आर्जवी आणि वक्तृत्वपूर्ण असे त्यांचे भाषण झाले. ते हिंदी भाषेत बोलले. मला तर असे वाटले, की मालवीयजींनी अधिवेशन जिंकले आणि त्यांच्या मताप्रमाणे ठराव नापास होणार, पण प्रत्यक्षात जेव्हा अधिकृतपणे मतदान झाले, तेव्हा मोठ्या बहुसंख्येने प्रतिनिधींनी मूळ ठराव पास केला.

मला मतदानाचा अधिकार नव्हता. कॉंग्रेस अधिवेशनात उपस्थित राहण्याचा माझा हा पहिलाच अनुभव होता. त्याकरता मी तेथील माणसे, तेथील वातावरण सर्व

न्याहाळून मनात साठविण्याचा प्रयत्न करीत होतो. माझे कान तेथे झालेल्या सर्व चर्चा व मोठ्या पुढाऱ्यांची भाषणे हे सर्व काळजीपूर्वक टिपून घेत होते. मतदानाचे ठराव पास झाल्यामुळे कसलाच पेच नव्हता.

या अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील ज्येष्ठ काँग्रेस पुढाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना पाहावयचा व भेटण्याचा योग आला. त्यांमध्ये मी प्रथमतः साने गुरूजींना पाहिले, याची आठवण आहे. माझे मित्र दयार्णव कोपर्डेकर यांच्यामुळे त्यांची माझी ही भेट झाली. मी जसा कोल्हापूरला उच्च शिक्षणासाठी गेलो होतो, त्याचप्रमाणे दयार्णव हा आयुर्वेदाच्या शिक्षणासाठी पुण्याला गेला होता. तेथे तो साने गुरूजींच्या संपर्कात आला. दयार्णव आणि माझा स्नेह तसा फार जुना होता. आमचा एकमेकांशी पत्रव्यवहारही होत होता. तो आपली सुख-दुःखे मला कळवीत असे. तो माझ्यासारखाच परिस्थितीने सामान्य होता, तरी चिकाटीने आयुर्वेदाचे शिक्षण घेत होता. आपल्या खर्चासाठी पैसे मिळविण्यासाठी तो चार-दोन तास काही तरी उद्योगही करीत होता.

त्या काँग्रेस नगरात साने गुरूजींना मी प्रथम पाहिले, तेव्हा ते फारसे प्रसिद्ध नव्हते. पण खानदेशात त्यांना फार मोठा मान होता. अनेक तरुण मुलांना त्यांनी देशसेवेची दीक्षा दिली होती.

मी त्या दिवशी साने गुरूजींना पाहिले, तेव्हा गुडघे पोटाशी धरून, एकटेच एका चटईवर चिंतनात बसावेत, तसे ते दिसले. दयार्णवने माझी साने गुरूजींशी भेट करून देताना माझी माहिती करून दिली. तेव्हा ते हसले आणि मान हलवीत म्हणाले,

"फार फार छान ! "

"हे माझे घनिष्ट मित्र आहेत." दयार्णवने असे त्यांना पुन्हा सांगितले, तेव्हा -

"दयार्णवचे मित्र राहा." असे त्यांनी मला सांगितले.

मी त्यांना नमस्कार करून निरोप घेतला. मुंबईच्या अधिवेशनात माझ्या ज्या काही नवीन ओळखी झाल्या, त्यांत साने गुरूजींची भेट माझ्या कायमची लक्षात राहिली.

या जातीय निवाड्यावरून महाराष्ट्रात पुष्कळ वादग्रस्त चर्चा आणि वादळ झाले. या जातीय निवाड्याच्या प्रश्नावरून महाराष्ट्रामध्ये - विशेषतः पुण्यामध्ये तेव्हा काय वातावरण होते, याचा अनुभव या काँग्रेस अधिवेशनानंतर मुंबईहून परत जाताना योगायोगाने मला पाहायला मिळाला. पुण्यामध्ये आम्ही एक - दोन दिवस थांबलो. तेव्हा सकाळी सहज वर्तमानपत्रात बातमी वाचली, की काँग्रेस अधिवेशनात जातीय निवाड्यासंबंधाने काँग्रेसने पास केलेल्या ठरावावर वर्किंग कमिटीचे एक प्रमुख डॉक्टर अन्सारी यांचे पुण्यात भाषण होणार आहे. आमच्या मनात विचार आला, की एका मोठ्या पुढा-याचे भाषण अगदी जवळून ऐकायची संधी आली आहे, तेव्हा आपण या सभेला जरूर जायचे. ही सभा सदाशिव पेठेतील शिवाजी मंदिरात होती. पुण्यात त्यावेळी ब-याचशा जाहीर सभा त्या ठिकाणी होत असत. आम्ही सभेच्या ठिकाणी जाऊन पोहोचलो, तेव्हा तेथे एक-दोन हजार माणसे जमली होती. काही प्रमुख काँग्रेस कार्यकर्तेही दिसले. परंतु त्यांतले काही जण मला काहीसे अस्वस्थ वाटले. मी त्यांना विचारले,
"या सभेत काही विशेष होणार आहे काय? तुम्ही लोक अस्वस्थ दिसता."
त्यांनी सांगितले,
"सभेमध्ये जमलेले जे लोक आहेत, त्यांत बहुसंख्येने काँग्रेसविरोधी लोक आहेत आणि ते सभा नीट चालू देतील, असे काही आम्हांला दिसत नाही."

आम्हांलाही काही करता येण्यासारखे नव्हते. परंतु आम्ही दहा-पाच जण व्यासपीठाच्या जवळपास जाऊन बसलो. सभा मोडण्याचे पुण्याचे काही एक विशेष तंत्र आहे, असे त्या दिवशी माझ्या लक्षात आले. थोड्या वेळाने शंकरराव देव डॉक्टर अन्सारी यांना सभास्थानी घेऊन आले. सभा सुरू करण्याचे जे प्राथमिक उपचार असतात, ते झाल्यानंतर डॉक्टर अन्सारी हे बोलायला उभे राहिले. भाषणातील

त्यांची पहिली एक-दोन वाक्ये बोलून झाली नाहीत, तोच त्यांच्यासमोर बसलेल्या श्रोतृवर्गातला मोठा समाज एकदम उभा राहिला आणि त्यांनी जातीय निवाड्याविरोधी आणि काँग्रेसविरोधी घोषणा देत धुमाकूळ घातला. घोषणांचा गदारोळ चालू असतानाच काहींनी व्यासपीठावर चढून डॉक्टर अन्सारी व श्री. देव यांना वेढा टाकला. स्थानिक कार्यकर्ते आता पुढे झाले व त्यांनी तो वेढा मोडून काढला. आम्ही बाहेरगावचे जे थोडे लोक होतो, ते काही हे प्रकरण सांभाळू शकत नव्हतो. आणि शेवटी ही सभा उधळली गेली. डॉक्टर अन्सारी भाषण न करताच परत फिरले. त्यांना त्यांच्या मोटारीने सुरक्षितपणे पोहोचविणे या उद्योगामध्ये आम्ही स्थानिक कार्यकर्त्यांना थोडी फार मदत केली. जातीय निवाड्यासंबंधाने पुण्यातील काँग्रेसविरोधी सुशिक्षित मंडळींची भावना व मनःस्थिती काय होती, याची काहीशी चुणूक या प्रसंगाने आम्हांला आणून दिली.

पुण्याच्या सभेत जे आम्ही पाहिले, ते त्यावेळी महाराष्ट्रात बदलत चाललेल्या राजकीय परिस्थितीचे प्रतीकात्मक चित्र होते. पुण्याने नाकारले, ते महाराष्ट्राने नाकारले, अशी तोपर्यंतची प्रथा होती. पण गेल्या चार वर्षांत काँग्रेस ग्रामीण क्षेत्रात मुळे धरू लागली होती आणि नेतृत्वाचे केन्द्र बदलत आहे, याची अजून जाणीव झाली नव्हती. एक अर्थपूर्ण घटना म्हणून या सभेचा मी येथे उल्लेख केला आहे.

हा सर्व प्रकार पाहिल्यानंतर या राजकीय प्रश्नांची वस्तुस्थिती लोकांच्या पुढे मांडणे आवश्यक आहे, म्हणून आम्ही जिल्ह्यात काही दौरे आखले आणि ठिकठिकाणी जाऊन या ठरावाची पार्श्वभूमी लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस वेळोवेळी ज्या अनेक संकटांतून गेली आहे, त्यांतला जातीय निवाड्याचा प्रश्न हा असाच एक अवघड प्रश्न होता. शहरातील हे वातावरण सोडले, तर ग्रामीण जनतेला स्वातंत्र्य-चळवळीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न नीट समजावून सांगितला, तर लोकांना समजत होता आणि पटत होता, हा माझा अनुभव आहे.

कोल्हापूरचे माझे कॉलेजचे दिवस मागे सांगितले, त्याप्रमाणे चालले होते.

कॉलेजमधला अभ्यास आणि जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्य या दोन्हींमध्ये मी गुंतलेला होतो. मी जेव्हा इंटरच्या वर्गात गेलो, तेव्हा सहाध्यायी मला सांगू लागले, "इंटरमीजिएटची परीक्षा तशी अवघड असते, कारण ती युनिव्हर्सिटीची परीक्षा असते आणि तिचा निकाल मोठा कठीण असतो. तेव्हा पहिल्यापासून जरा तयारीत राहा."

मी या वर्षी परीक्षेची तयारी चांगली करायची, म्हणून कामाला लागलो. या वेळी आम्हांला अभ्यासासाठी जी पुस्तके नेमली होती, त्यांतले एक चांगले पुस्तक माझ्या मनातून अजून गेलेले नाही. इंग्रजीच्या अभ्यासासाठी  इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास अतिशय सुलभ आणि वाचनीय अशा शैलीमध्ये लिहिलेला होता. ऐतिहासिक दृष्टीने भाषेचा अभ्यास हा किती उपयुक्त असतो, याची थोडी-फार कल्पना मला यामुळे आली. आणि या विषयावरची दुसरीही काही पुस्तके मिळविण्याचा मी प्रयत्न केला. त्यावेळी मराठीचा असा ऐतिहासिक दृष्टीने विचार केलेला ग्रंथ निदान मला तरी माहीत नव्हता. 'महाराष्ट्र सारस्वत' म्हणून श्री. वि. ल. भावे यांचे एक पुस्तक उपलब्ध होते. चांगले पुस्तक आहे. पण मी वर उल्लेख केलेल्या पुस्तकाच्या तुलनेने मला ते दुबळे वाटले. या माझ्या अभ्यासविषयक लहान गोष्टी मी अशासाठी सांगतो आहे, की यांतल्या प्रत्येक गोष्टीतून माझे विचार, माझ्या सवयी, माझ्या आवडी-निवडी बनत होत्या, म्हणून यांचे महत्त्व आहे.

याच वर्षी प्राध्यापक फडके आम्हांला तर्कशास्त्र शिकवू लागले. गाण्याची मैफल जमावी, तसे फडक्यांचे तर्कशास्त्राचे तास रंगत असत. राजाराम कॉलेजच्या वरच्या मजल्यावर एक मोठा हॉल होता, तेथे हा त्यांचा तास ते घेत. हे या मोठ्या हॉलमध्ये असा वर्ग का घेतात, याची मी चौकशी केली, तेव्हा मला असे सांगण्यात आले, की विद्यार्थी नसलेले, पण ज्यांना या विषयाची आवड आहे, असे बाहेरचे कित्येक लोक या तासाला येऊन बसतात, त्यामुळे हा हॉल नेहमी भरगच्च भरलेला असे. प्राध्यापक फडक्यांची विषय मांडण्याची ही लकब फार थोड्या शिक्षकांमध्ये मला पाहायला सापडली. इंग्लिश उच्चार करण्याची त्यांची जी ढब होती, ती इंग्रजी

घाटाची नसली, तरी खास फडके थाटाची होती. विषय खुलवून तो ते इतका स्पष्ट आणि स्वच्छ करीत असत, की मला त्यांचे व्याख्यान ऐकल्यानंतर घरी जाऊन पुस्तके वाचण्याची कधीच गरज भासली नाही.

मी त्यांच्या तर्कशास्त्राच्या या अध्यापन-कौशल्याबद्दल एवढ्यासाठी लिहिले, की मी जेव्हा इंटरच्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला बसलो, तेव्हा त्या विषयाच्या प्रश्नासंबंधाने मला फार तपशीलवार माहिती झाली होती. मी जेव्हा पेपर लिहायला बसलो, तेव्हा त्यामध्ये मी इतका रममाण होऊन गेलो, की तीन तास केव्हा संपून गेले, हे मला समजले नाही. आणि तासांच्या शेवटी जेव्हा मी तपासून पाहिले, तेव्हा माझ्या लक्षात आले, की शंभर मार्कांच्या प्रश्नांपैकी मी फक्त पासष्ट मार्कांच्याच प्रश्नांची उत्तरे लिहिली आहेत. प्रश्नांची उत्तरे लिहिताना मी जो अव्यवहारीपणा केला होता, त्याची किंमत मला द्यावी लागेल, अशी काळजी मला सांगून राहिली. पण सुदैवाने तसे घडले नाही. ६५ मार्कांच्या उत्तरांतूनही मला परीक्षा पास होण्याइतके गुण निश्चित मिळाले. कांदबरीकार फडके हे सगळ्यांना माहिती आहेत; पण शिक्षक फडके हे असे होते.

याच वर्षी मी दुस-या एका संकटात आलो होतो. १९३५ च्या नोव्हेंबर डिसेंबरमध्ये मी कोल्हापूरला अनपेक्षितपणे आजारी पडलो. सुरुवातीला किरकोळ आजार असेल, म्हणून दुर्लक्ष केले. नंतर माझ्या लक्षात आले, की हे साधे आजारपण दिसत नाही. मी असा आजारी पडलो, की मला घरची आठवण होते, तशी या वेळीही आली. कोल्हापूरला राहण्यापेक्षा कराडला घरी राहायला जावे, असा विचार आला. अंगात ताप फणफणत असतानासुद्धा कोल्हापूरच्या स्टँडवर जाऊन मी कराडच्या गाडीत बसलो आणि पुढे तीन तासांचा प्रवास मी कसा काय केला, तो माझा मलाच माहीत! नीट बसवत नव्हते, उठवत नव्हते, झोप लागत नव्हती, पण मनाचा हिय्या करून तो प्रवास पुरा केला व मी घरी आलो. रात्री डॉक्टर येऊन तपासून गेले. त्यांनी गणपतरावांना सांगितले, की हा आजार विषमज्वराचा आहे आणि याची फार काळजी घेतली पाहिजे. गणपतरावांनी ही गोष्ट मला सांगितली,

"तुला तुझी काळजी घेतली पाहिजे. कारण हा ताप विषमज्वराचा आहे."

त्यावेळी या तापासाठी शुश्रूषा हेच औषध असे. दुस-या कसल्याही औषधाची उपाययोजना तेव्हा नसे. निवांत झोपून राहणे, हलका फळांचा रस असे काही तरी दिवसातून एखाद-दुस-या वेळी घेणे, विशेष हालचाल न करणे एवढीच औषधे यावर होती. मला सांगण्यात आले, की साधारणतः दोन आठवडे हा आजार टिकेल. पण माझा हा आजार दोन आठवड्यांनी संपला नाही. तो ताप उतरायला चार आठवडे लागले. चार आठवड्यांत एक-दोन वेळा मी अतिशय गंभीर परिस्थितीतून गेलो, असे मला नंतर माझ्या घरातील माणसांनी सांगितले. ताप उतरला, पण अशक्तपणा राहिला. लवकर उठता-बसता येणे शक्य होत नव्हते; परंतु आता मी पडून राहायला तर सरावलो होतो. हळू हळू शक्ती यायला सुरुवात झाली आणि संपूर्ण बरा व्हायला मला आणखी तीन आठवडे लागले. मी बरा झालो खरा, पण आता मला खरी काळजी लागली होती कॉलेजची. कॉलेजची टर्म भरण्याकरता जितके दिवस कॉलेजमध्ये उपस्थित असणे आवश्यक होते, तेवढे दिवस मी आजारपणामुळे हजर राहू शकलो नव्हतो. तेव्हा माझे हे वर्ष फुकट जाणार, अशी शंका मला वाटली. काहीशा प्रतिकूल परिस्थितीत मी शिक्षण घेत असताना या आजाराने माझ्यापुढे एवढी आपत्ती का उभी करावी, या विचाराने मी हैराण होऊन गेलो. माझ्या मनाशी विचार आला, की प्रिन्सिपॉल डॉक्टर बाळकृष्णांशी याबाबतीत बोलून पाहिले पाहिजे. त्यासाठी ताबडतोब कोल्हापूरला जाण्यासाठी डॉक्टरांची परवानगी मागितली. डॉक्टरांनी सांगितले,
"तुम्हांला आणखी पंधरा दिवस जाता येणार नाही."

त्यामुळे आणखी चिंतेत पडलो. आणि शेवटी मनाचा हिय्या करून गणपतरावांशी बोललो. माझी चिंता त्यांना सांगितली आणि त्यांना विचारले,
"माझ्यासाठी तुम्ही जाऊन डॉक्टर बाळकृष्णांना भेटून माझा प्रश्न त्यांच्या समोर मांडून याल का ?".

ते म्हणाले,

"ठीक. मी जरूर जाऊन येईन. पण तू जर का कॉलेजला हजरच राहिलेला नाहीस, तर डॉक्टर बाळकृष्ण तरी काय करणार आहेत ?"

मी म्हटले,

"डॉक्टर बाळकृष्ण मला मदत करतील, असा मला विश्वास आहे. राहिलेल्या वेळामध्ये माझ्या परीक्षेची तयारी मी पुरी करीन, अशी मला उमेद आहे. युनिव्हर्सिटीच्या परीक्षेसाठी माझा फॉर्म मुदतीत भरून जाणे जरूरीचे आहे. त्यासाठी तुम्ही जाऊन खटपट करून या, म्हणजे काही झाले, तर होईल."

त्याप्रमाणे गणपतराव डॉक्टर बाळकृष्ण यांना कोल्हापूरला जाऊन भेटून आले. आणि मला येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे, की डॉक्टर बाळकृष्ण यांनी सगळी हकीकत ऐकून मला सर्व तऱ्हेची मदत केली आणि आपले खास अधिकार वापरून माझी टर्म मला दिली. एवढेच नव्हे, तर त्यांनी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेसाठी माझा फॉर्मही पाठविला.

पंचावन्न दिवसांनी मी कोल्हापूरला परत गेलो. आम्ही ज्या भुसारी वाड्यात राहत होतो, त्या वाड्यात राहणारे माझे मित्र श्री. नानासाहेब अयाचित आणि श्री. आनंदराव चव्हाण हेही त्यावेळी माझ्याप्रमाणे त्याच परीक्षेला बसणार होते. त्यांनी-आम्ही एकत्र अभ्यास केला.

मला माझी गैरहजेरी भरून काढण्याकरता रात्रीचे दिवस करावे लागले आणि शेवटी परीक्षेला बसलो. माझी अपेक्षा नसताना मी पास झालो, असे जेव्हा कळले, तेव्हा मला जो आनंद झाला, तो दुस-या कुठल्याही परीक्षेच्या वेळी झाला नाही.

नानासाहेब अयाचित हे आमच्या जिह्यातीलच माझे मित्र आहेत. आजही त्यांची-माझी जिव्हाळ्याची मैत्री आहे. मूलतः ते राष्ट्रीय वृत्तीचे विचारवंत आहेत. त्यांनी

पुष्कळ वेळा माझ्या गैरहजेरीच्या काळात, आजाराच्या वेळी आणि इतर वेळीही पुष्कळ वेळा मदत केली आहे. मी असा राजकारणात गुंतलेला विद्यार्थी आहे, हे त्यांना पहिल्यापासून माहीत होते आणि त्यामुळेही त्यांना माझ्याबद्दल आपुलकी वाटत होती.

श्री. आनंदराव चव्हाण हे पुढे राजकारणात प्रसिद्ध पावले आणि केंद्रिय मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांनी कित्येक वर्षे काम केले.

या दोन्ही व्यक्ती माझ्याबरोबरच अभ्यास करत असत. या अभ्यासाच्या साहचर्यामुळे आमच्यामध्ये वैयक्तिक स्नेहसंबंध निर्माण झाले. पुढल्या काळात आनंदरावांशी माझे राजकीय मतभेद झाले, तरी त्यांच्या विद्यार्थिदशेतील ह्या साहचर्यामुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दल नेहमी आपुलकी आणि जिव्हाळा राहिलेला आहे. ते स्वतः अतिशय बुद्धिमान आणि परिश्रमी विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांनी आपले विद्यार्थिजीवन मोठे यशस्वीरीत्या घालविले होते. त्यांनी आपल्या पदव्युत्तर परीक्षा उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण होऊन नावलौकिक कमावला होता.

मी ज्यूनियर बी. ए. च्या वर्गात असताना १९३६ साली राजकारणाला मोठा वेग आला होता. १९३५ चा कायदा पास होऊन प्रांतिक सरकारे बनविण्याच्या कामात सर्व राजकीय पक्ष गुंतणार, असे वातावरण दिसू लागले. १९३७ च्या प्रारंभी होणा-या या निवडणुकांसाठी सर्व पक्ष आपापल्या तयारीस लागले होते. पुष्कळ चर्चेनंतर आणि वादानंतर या निवडणुका काँग्रेस पक्षाने लढविण्याचे ठरविले. माझ्या मताने ही चांगली गोष्ट झाली. निवडणुकीच्या निमित्ताने महत्त्वाचे प्रश्न लोकांपुढे जाऊन मांडता येतील आणि लोकांच्या मनाचा कौल काय आहे, याचा अंदाज घेऊन त्यामुळे स्वातंत्र्यलढ्यास शक्ती प्राप्त होईल, असे मला वाटत होते. तेव्हा आता या निवडणुकीच्या प्रयत्नांमध्ये आपला जिल्हा पाठीमागे राहता कामा नये आणि आपल्या जिह्यात काँग्रेस विजयी झाली पाहिजे, या प्रयत्नांत आम्ही तरुणांनी गुंतवून घेण्याचे ठरविले. या वर्षी मला युनिव्हर्सिटीची परीक्षा नव्हती, हेही माझ्या

दृष्टीने सोयीचे होते. त्यामुळे मी जिल्ह्यात जाऊन या निवडणुकीसंबंधाने माझ्या मित्रांशी चर्चा करू लागलो.

त्याच्या आधी दीड-दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात अशीच एक मोठी ईर्ष्येची निवडणूक झाली होती. ती होती मध्यवर्ती असेंब्लीची. असेंब्लीच्या या निवडणुकीचे काकासाहेब गाडगीळ आणि केशवराव जेधे हे आमचे उमेदवार होते. ही निवडणूक काँग्रेसने मोठ्या चुरशीने लढविली आणि जिंकली होती. आमच्या जिल्ह्यात सर्व कार्यकर्त्यांनी त्यावेळी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती.

त्यामुळे नव्याने येणा-या निवडणुकीसंबंधाने आमच्या मनात फार उत्कंठा होती. राज्याच्या विधिमंडळाच्या या तऱ्हेच्या निवडणुका या पद्धतीने प्रथमच होणार होत्या. त्यामुळे उमेदवार कोण असावेत, या प्रश्नाला फार महत्त्व निर्माण झाले होते. आमच्या जिल्ह्याचे जे नेतृत्व होते, त्यात भाऊसाहेब सोमण हे प्रमुख होते. त्यांचा सल्ला हा महत्त्वाचा मानला जाई. त्यामुळे याबाबतीत त्यांच्याशी बोलले पाहिजे, असे आम्ही ठरविले. ग्रामीण भागातील आम्हां कार्यकर्त्यांचे जे मित्रमंडळ बनले होते, त्याने या निवडणुकीमध्ये आपला प्रतिनिधी उमेदवार म्हणून असला पाहिजे, असा निर्णय मनाशी केला होता. पण या वडीलधा-या मंडळींचा आशीर्वाद मिळाल्याशिवाय आमच्या निर्णयाला काही अर्थ नव्हता.
निवडणूक दोन-तीन महिने राहिल्यावर एक दिवस मी, आत्माराम बापू पाटील आणि त्यांचे वडील बंधू रामभाऊ पाटील असे भाऊसाहेब सोमण यांना भेटायला गेलो. त्यांनी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि सांगितले,
"तुमच्या मनात आहे, हे ठीक आहे. पण हे घडणार कसे, हे मला समजत नाही. तुम्ही चळवळीत नव्याने शिरलेले आहात. एवढी घाई का? आणि पुन्हा या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीसाठी उमेदवार हा वडीलधारा, पोक्त, ज्याचे नाव सर्वमान्य आहे आणि जो या निवडणुकीसाठी येणारा मोठा खर्च करू शकेल, असा असावा लागेल. तुमची इच्छा मला समजली."

आम्ही निराश होऊन परत फिरलो. भाऊसाहेब आमच्याशी स्पष्ट बोलले होते. त्यांचे उत्तर नकारात्मक होते. याबद्दल आम्ही नाराज झालो. परंतु ते स्पष्ट बोलले, याचे आम्हांला बरे वाटले. परत गेल्यानंतर आम्ही आमच्या मित्रमंडळींची एक बैठक बोरगावला घेतली आणि त्यांना सोमणांच्या घरी जे बोलणे झाले, त्याची माहिती दिली.

या कार्यकर्त्यांच्या बैठकीला निवडक दहा-बारा प्रमुख कार्यकर्ते हजर होते. त्यांतील बरीचशी मंडळी वाळवे तालुक्यातील होती. राघूआण्णा लिमये आणि मी कराडमधून गेलो होतो. पाटणमधूनही कोणी तरी कार्यकर्ते आले असावेत, असा माझा अंदाज आहे. जी चर्चा झाली, त्या चर्चेमध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली, की चळवळीतल्या आम्हा नव्या कार्यकर्त्यांपैकी आत्माराम बापू पाटील हे महत्त्वाचे कार्यकर्ते म्हणून त्यांची उमेदवारी स्वीकारली जावी, असा प्रयत्न करावयाचा. भाऊसाहेबांनी सांगितलेला शब्द हा काही अखेरचा नव्हता. कार्यकर्त्यांमध्ये जरूर तर भेटून आपण एक प्रकारची नवीन आघाडीच निर्माण केली पाहिजे. कार्यकर्त्यांपैकी काही जण सातारच्या पुढारी मंडळींबद्दल काहीसे कटुतेने बोलले. राघूआण्णांनी त्यांची समजूत काढली. लोकांनी मला माझे मत विचारले. सबंध प्रांताच्या नेतृत्वासंबंधाचे माझे जे विश्लेषण होते, ते मी त्यांना सांगितले.

"प्रांताचे नेतृत्व हे स्थित्यंतराच्या परिस्थितीत आहे. हा स्थित्यंतराचा काळ किती असणार, हे सांगणे अवघड आहे. प्रांताच्या पातळीवर गांधींचा विचार न स्वीकारलेले जे जुने नाममात्र पुणेकर काँग्रेस पुढारी होते, त्यांनी अजून व्यवहारतः काँग्रेस सोडलेली नाही, पण त्यांचा काँग्रेसच्या जनआंदोलनांवर विश्वास नाही. त्यामुळे प्रांतिकच्या पातळीवर काहीशी पोकळी निर्माण झालेली आहे."

हे सांगताना माझ्यापुढे केळकर, भोपटकर या मंडळींची नावे होती.

"गांधीजींचे नेतृत्व मानणारे शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ यांचे नेतृत्व अजून निःशंकपणे प्रस्थापित व्हावयाचे आहे. त्यांचा तो प्रवास सुरू आहे. परंतु त्यांची अजूनही नेतृत्व-संघटनेच्या दृष्टीने जिल्ह्याजिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची साखळी निर्माण झालेली नाही. जिल्ह्याजिल्ह्यांतही पहिल्यापासून वृद्ध. यशस्वी वकिलाकडे किंवा डॉक्टरकडे जिल्ह्याचे नेतृत्व असण्याची जी परंपरा आहे, ती आपल्या सातारा जिल्ह्यात अजून चालू आहे."

मी भाऊसाहेब सोमणांबद्दल अतिशय आदराने बोललो. मी त्यांना सांगितले, "जिल्ह्यामध्ये अजूनही गेल्या सहा वर्षांत नवीन कार्यकर्त्यांची जी पिढी निर्माण झाली आहे, त्यांचे काम आणि कर्तृत्व याची त्यांना जेवढी जवळून माहिती असावयास पाहिजे, तेवढी नाही, आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये जवळीकही निर्माण झालेली नाही. ही जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. निवडणुकीचा जो विचार ही मंडळी करीत आहेत, तो ते अगदी जुनाट पद्धतीने करताहेत. खेड्यापुरते बोलावयाचे झाले, तर मोठ्या वाड्यातील लोक या जमीनदार; शहरापुरते बोलावयाचे झाले, तर कोणी पैसेवाला, कोणी व्यापारी, किंवा मोठी प्रॅक्टिस असलेला वकील किंवा डॉक्टर यांच्याकडे ही मंडळी पाहतात. या त्यांच्या जुन्या सवयी आहेत. त्यासंबंधाने रागावून काही उपयोग नाही. आपण नव्या पिढीतील कार्यकर्ते आहोत, म्हणून आपणांस निराश न होता प्रयत्न करीत राहिले पाहिजे. अखेरपर्यंत जावे लागेल. बदललेल्या काळाचे महत्त्व ही मंडळी समजतील आणि मला जे कार्यकर्त्यांचे मन समजले आहे, त्यावरून आत्माराम बापू पाटलांसारखा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी असलेला उमेदवार हा प्रांतिक नेतृत्वाला मान्य करावा लागेल. पण त्यासाठी जिल्ह्यातील नेते मंडळींना आताच आपण दुखविता कामा नये."

मला समजले, त्याप्रमाणे ब-याच लांबलचक परिस्थितीचा वेध घेत, मी माझे मत मांडले.

इतरही ब-याच चर्चा झाल्या आणि आपला प्रयत्न चालू ठेवावयाचा आणि आत्माराम बापू हे आपले उमेदवार हे निश्चित करून, इतर कार्यकर्त्यांशी बोलावयाचे, असा निर्णय करून आम्ही त्या बैठकीतून उठलो.

दिवस भराभर जात होते. वृत्तपत्रांतून उमेदवाराच्या नावांसंबंधीच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आमच्या सातारा जिल्ह्याला दोन मतदार-संघ होतेः एक, सातारा आणि आसपासचे तालुके आणि दुसरा, कराड, वाळवे आणि आसपासचे तालुके असे हे दोन मतदार-संघ होते. आमचा विशेष प्रयत्न अर्थात कराड, वाळवे या मतदार-संघांसाठीच मर्यादित होता. दुस-या मतदार-संघातील तालुक्यांमध्ये दुसरी मंडळी प्रयत्नशील होती. कार्यकर्त्यांशी व लोकांशी जेव्हा आम्ही बसून बोलू लागलो, तेव्हा आत्माराम बापूंच्या उमेदवारीला सहज, उत्स्फूर्त असा पाठिंबा मिळू लागला. निवडणुकीच्या खर्चाचा प्रश्न जेव्हा उभा राहिला, तेव्हा कार्यकर्ते म्हणू लागले, की स्थानिक खर्च आमचा आम्ही करू. त्यामुळे त्या प्रश्नाची फारशी भीती मनात राहिली नाही.

आत्माराम बापू पाटील हे मध्यम शेतकरी कुटुंबातील होते. तीन भावांपैकी ते मधले बंधू होते. त्यांना लहान शेतकरी कुटुंबातील म्हणता येणार नाही, एवढी त्यांची शेती होती. ते मध्यम शेतकरी होते, असे म्हणणे जास्त उचित ठरेल. त्यावेळी ते अविवाहित होते आणि त्यांच्या कुटुंबातील शेतीचा सर्व भार मोठ्या आणि धाकट्या बंधूंवर टाकून सर्व वेळ काम करण्यासाठी त्यांच्या बंधूंनी आत्माराम बापूंना मुक्त केले होते. त्यांच्या कार्याला त्यांच्या दोन्ही बंधूंचा मनापासून पाठिंबा होता.

आत्माराम बापू हे उंचीने किंचितसे कमी, परंतु रेखीव चेह-यामुळे मनात भरणारी व्यक्ती होती. त्यांचे खोल डोळे आणि अणकुचीदार असलेले गरूडासारखे नाक हे त्यांच्या चेह-याचे वैशिष्ट्य होते. त्यांचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेले होते.

कोल्हापूरला शिक्षण झाल्यामुळे वागणे-बोलणे सुसंस्कृत होते. भाषण उत्तम करीत आणि माणसे जोडण्याचे कर्तृत्व त्यांच्यात होते.

१९३० आणि ३२ या दोन्ही आंदोलनांत ते जेलमध्ये जाऊन आले होते. आपले सारे आयुष्य देशकार्याला कायमचे वाहून घ्यायचे, अशी त्यांची प्रतिज्ञा होती. माझ्या मताने आजच्या परिस्थितीमध्ये नेतृत्वाला आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्याजवळ होते.

त्यामुळे आम्हांला अतिशय योग्य माणूस नेतृत्व करायला मिळतो आहे, त्याला लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळवून देणे ही आवश्यक बाब वाटत होती. ते ख-या अर्थाने आमच्या नव्या पिढीतील कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी होते. असा उमेदवार मिळत असताना आमचे ज्येष्ठ काँग्रेस नेते यांच्या नावाचा का विचार करीत नाहीत, हे मला तरी समजू शकले नाही.

आम्ही आमचा प्रयत्न तसाच पुढे चालू ठेवला. सातारचे काँग्रेसचे दुसरे ज्येष्ठ नेते बुवा गोसावी यांच्याशी मी आणि राघूआण्णांनी पुष्कळ वेळ चर्चा केली. मी बोरगावच्या आमच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत माझी जी मीमांसा मांडली होती, तीच त्यांच्यापुढे सांगण्याचा प्रयत्न केला. माझी ही मांडणी बुवासाहेबांना आवडली, की नाही, हे मला सांगता येणार नाही, परंतु त्यांना ती नवी होती. ते त्या मांडणीमुळे काहीसे प्रभावित झाले आणि म्हणाले,
"मी भाऊसाहेबांशी बोलेन. तुमच्या बोलण्यात काही नवीन अर्थ आहे, आणि तो समजून घेतला पाहिजे. भाऊसाहेबांच्या मनाविरूद्ध काही होणार नाही, हे मात्र लक्षात ठेवा."

नंतर आम्ही इतर अनेकांशी बोललो. त्यांमध्ये सातारची दुसरी प्रसिद्ध व्यक्ती श्री. शंकरराव साठे हेही होते. ते उत्तम वकील होते. आम्ही त्यांना आम्हां तरुण मडळींची वकिली भाऊसाहेबांजवळ करण्याची विनंती केली. ते मनाने अतिशय सरळ

गृहस्थ होते. त्यांनी आम्हांला काही शंका विचारल्या आणि त्यांवरून या लोकांच्या मनात नेमके काय आहे, याचा काहीसा अंदाज आम्हांला लागला. त्यांच्या मते जिल्ह्यामध्ये संघटित असलेला जो कूपर गट आहे, त्याचाही एकेक उमेदवार निवडणुकीत उतरणार आहे. करतो म्हटले, तरी त्यांचा पराभव आपण करू शकणार नाही, अशी त्यांची समजूत होती. प्रत्येक मतदार-संघातून चार उमेदवार निवडून जाणार होते. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले,

"हा तुमचा व्यवहार आम्ही समजू शकतो. आम्ही काही चार जागा मागत नाही. आम्ही फक्त एक जागा मागतो आहोत. आणि गेल्या सहा वर्षांच्या राष्ट्रीय चळवळीनंतर कूपर गटाशी भीती बाळगून किंवा हाय खाऊन जर आम्ही निवडणुकांचा विचार करणार असलो, मग आम्ही निवडणुका जिंकणार कशा?"

त्यांनी सांगितले,

"तुम्ही म्हणता, हे जरी खरे असले, तरी जी निवडणूक-पद्धती आहे, तीमध्ये आपण सर्व चारही जागा प्रत्येक ठिकाणी निवडून आणण्यात यशस्वी होऊ शकणार नाही."

मला वाटते, त्यांचे धूर्त निदान बरोबर होते, हे प्रत्यक्ष निवडणुकीच्या निकालाने सिद्ध केले. इतर जागांसाठी मराठा समाजातील एक, ब्राह्मण समाजातील दुसरा आणि इतर अल्पसंख्याक समाजातील तिसरा असे आपण तीन उमेदवार उभे करू शकतो, असे त्यांनी आपले विश्लेषण आम्हांला सांगितले. श्री. शंकरराव साठे फार मोकळे बोलले, व्यवहार्य बोलले. त्यांनी सांगितले,

"मराठा समाजातील उमेदवार आत्माराम पाटील होऊ शकतील काय? याचा तुम्ही विचार करा. जुन्या ब्राह्मणेतर चळवळीतून वाढलेली जी मोठी वजनदार माणसे आहेत, त्यांच्यापैकी कोणा एकाला काँग्रेसचा उमेदवार म्हणून घ्यायची जरूरी आहे, की नाही, याचाही विचार केला पाहिजेल. ही पार्श्वभूमी मनामध्ये ठेवून प्रयत्न करा, मी तुमच्या विरूद्ध नाही. या बाबतीत भाऊसाहेबांशी मी आवश्यक ते सर्व बोलेन, काही काळजी करू नका."

या उमेदवारीसंबंधी झालेल्या चर्चांच्या पाठीमागे ज्या शंका होत्या, त्यांचा सारांश हा असा होता.
सातारचे प्रसिद्ध डॉक्टर आठल्ये यांच्याशीही आमची चर्चा झाली. ते आमच्याशी संपूर्णतया सहमत होते. ह्या वेळपर्यंत पुण्यात जाऊन प्रांतिकाच्या पातळीवर कुणाशी बोलण्याचा आम्ही प्रयत्न केला नव्हता. त्याचे खरे कारण म्हणजे त्या मंडळींशी आमचा कोणाचा निकटचा संबंध आला नव्हता. वरवर ओळखीपाळखी होत्या. पण एकत्र बसून चर्चा करावी, असे संबंध नव्हते. जे संबंध होते, ते आत्माराम बापूंचे होते आणि तेही यूथ लीगच्या काही कार्यकर्त्यांशी किंवा त्यांच्या मित्रांशी होते. त्यांनी या कामासाठी पुण्याला एक चक्कर मारून त्या मंडळींमध्ये आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न केला.

प्रत्यक्ष उमेदवारांच्या निवडीचा प्रश्न जेव्हा आला, तेव्हा श्री. शंकरराव साठे यांनी ज्या गोष्टी सांगितल्या होत्या, तेच मुद्दे पुन्हा पुन्हा पुढे येऊ लागले आणि आत्माराम पाटलांची उमेदवारी मोकळ्या मनाने स्वीकारावी, अशी परिस्थिती काही साता-यात निर्माण होईना. एका अर्थाने पुढारी व कार्यकर्ते यांमधील हा एक संघर्ष उभा राहिला होता, असे म्हटले, तरी चालेल, अशी परिस्थिती होती. त्या वेळच्या वृत्तपत्रांतून याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्या, आणि त्यांमुळे आत्माराम बापू पाटील हे उमेदवार होऊ इच्छितात, याची खूप प्रसिद्धी होऊन गेली.

भाऊसाहेब सोमणांनी ही सर्व परिस्थिती प्रांतिकच्या लोकांना कळवून निर्णय त्यांच्यावर सोपवावा, अशी भूमिका घेतली. हीसुद्धा आमच्या दृष्टीने काही कमी प्रगती नव्हती. महाराष्ट्र प्रांतिकची जी कर्ती माणसे होती, त्यांत त्यांच्या अधिक जवळ श्री. बुवासाहेब गोसावी होते, तेव्हा त्यांना समजावीत राहणे हा एक मार्ग आम्ही पत्करला. आत्माराम बापू पाटील स्वतः उमेदवार होऊ इच्छिणारे असल्यामुळे ते बरेच हिंडत फिरत होते. पुणे-सातारा अशा त्यांच्या गाठीभेटी चालू होत्या. भेटीत काय होत होते, ते मला कोल्हापूरला येऊन सांगत असत.

ठरल्याप्रमाणे दर शनिवार-रविवारी सातारा जिल्ह्याचा प्रवास हा माझा नित्यक्रम झाला होता. निवडणूक अगदी तोंडाला जरी आली, तरी या उमेदवाराचा निर्णय होत नव्हता. काय कारण असेल, ते मला माहीत नव्हते. पण ग्रामीण भागामध्ये नवीन माणसे नव्या विचाराने आणि शक्तीने उभी राहिली आहेत, हे अजून प्रांतिकच्याही नेतृत्वाने मनाने स्वीकारले नव्हते. हे एक कारण असले पाहिजे, आणि दुसरे, ही सर्व मंडळी या तऱ्हेने एवढ्या मोठ्या निवडणुका प्रथमच लढवीत असल्यामुळे त्यांना परिस्थितीचे खरे निदान होत नव्हते. पुण्याला जेव्हा या उमेदवारीच्या निर्णयासाठी चर्चा केल्या गेल्या, तेव्हा आम्ही चार-सहा मंडळी पुण्याला गेलो होतो. आमच्या उमेदवारीचा मुद्दा हा आम्हां कार्यकर्त्यांच्या इज्जतीचा प्रश्न झाला होता. त्यामुळे ही गोष्ट करून घेतली पाहिजे व त्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत, असा आमचा निर्धार झाला होता.
आत्माराम बापू पाटील यांनी प्रांतिक पुढाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी काही निर्णयात्मक सांगितले नाही. पाहू काय होते, असे म्हणून त्यांनी सोडून दिले होते. या भागातील आमच्या मतदार-संघातील दुसरी एक-दोन जुन्यातील मोठी जमीनदार माणसे होती. त्यांच्या नावांची चर्चा तेथे चालू होती. आमच्यांतील काही मंडळींनी त्यांनाही जाऊन भेटण्याचा प्रयत्न केला. त्या लोकांची मी आता नावे देत नाही. त्यांना निवडणुकीबाबत एवढीशीही उत्सुकता नव्हती. आम्ही आमच्या पुढाऱ्यांना हे सांगितले, पण आमच्यावर विश्वास ठेवणार कोण ?

शेवटी आम्ही सातारला बसून निर्णय घेतला, की या बाबतीत आपण सरदार वल्लभभाई पटेल यांच्यापर्यंत आपले म्हणणे मांडले पाहिजेल. वर्तमानपत्रांतून येणाऱ्या वृत्ताच्या आधाराने, सरदार वल्लभभाई पटेल मुंबईला केव्हा येतात, इकडे आम्ही लक्ष लावून होतो.

त्या सुमारास ते मुंबईला आले आहेत, असे जेव्हा आम्ही वाचले, तेव्हा आत्माराम बापूंनी सुचविले, की मी एकट्याने मुंबईला जाऊन सरदार पटेलांशी या बाबतीत बोलून यावे.

मी म्हटले,
"अहो, यापूर्वी फक्त एकदाच मी मुंबईला गेलो आहे. तशी मला मुंबईची माहितीही नाही, सरदार पटेल मला भेटतील तरी का ?"

त्यांनी सांगितले, की प्रयत्न करून पाहा, नाही भेटले, तर नाही भेटले, पण आपल्या हातात आहे, ते शेवटी आपण सर्व करून पाहिले, एवढे तरी समाधान होईल.

ह्या वेळेपर्यंत आत्माराम पाटलांच्या उमेदवारीबद्दल लोकांमध्ये अनुकूल कल निर्माण झाला होता, आणि आम्हांलाही आत्मविश्वास निर्माण झाला होता, की ते निश्चित निवडून येतील. सरदार पटेलांना भेटण्याची सूचना मी भीतभीतच स्वीकारली आणि मुंबईला गेलो.

आमच्या जिल्ह्यातले मुंबईत काम करत असलेले एक प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. बाबूराव गोडसे यांच्याकडे मी गेलो आणि त्यांच्या घरी उतरलो. सरदार पटेलांना मला भेटायचे आहे, याची कल्पना मी त्यांना दिली. त्यावर ते म्हणाले,
"मला त्यांची तितकीशी माहिती नाही, पण त्यांच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत तुम्हांला नेऊन पोहोचविण्याचे काम माझे. पुढे भेट मिळविण्याचे वगैरे कौशल्य तुमचे तुम्ही दाखविले पाहिजे." सरदार पटेल त्यावेळी मुंबईमध्ये त्यांच्या चिरंजीवांकडे एका आलीशान इमारतीमध्ये उतरत असत. श्री. गोडसे यांनी मला श्री. डाह्याभाई पटेल यांच्या राहण्याच्या जागेपर्यंत नेऊन पोहोचविले. तेथे कार्यकर्त्यांची तर रीघ लागलेली होती. सहजासहजी भेट मिळेल, असे चिन्ह दिसेना.

सर्व मंडळी भेटून जाईपर्यंत मी तेथे तास, दीड तास बसून राहिलो. आणि मी तेथे एकटा राहिलेलो पाहून मला श्री. डाह्याभाईंनी येऊन विचारले,
"तुमचे काय काम आहे?"

त्यांना मी माझी माहिती दिली आणि 'सरदारांशी मला फक्त दोन मिनिटे बोलावयाचे आहे. वेळ मिळेल का,' असे मी विचारले.

डाह्याभाई स्वभावाने तुसडे होते, पण का, कोण जाणे, त्या दिवशी त्यांना माझी दया आली असावी. ते थोडा वेळ आत गेले आणि नंतर त्यांनी मला आत बोलावून घेतले.

एका सोईस्कर अशा खुर्चीवर सरदार पटेल यांची गंभीर मूर्ती बसली होती. मी त्यांना इतक्या जवळून प्रथमच पाहिले. त्यांच्याशी बोलायला मला माझा आवाजच सापडेना, पण शेवटी धैर्य करून मी त्यांना सांगितले,
"मी महाराष्ट्रातला एक कार्यकर्ता आहे. आमच्या सातारा जिल्ह्यातल्या निवडणुकीत नव्या कार्यकर्त्यांचा प्रतिनिधी जो शेतकरी उमेदवार आहे, त्याला मान्यता मिळावी, याकरता आम्ही प्रयत्न करतो आहोत. त्या सर्व कार्यकर्त्यांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे. आमच्या जिल्ह्यातील आणि प्रांतातील नेते काय करतील, यासंबंधी आमच्या मनात शंका आहे आणि म्हणून तुमच्या कानांवर ही गोष्ट घालावी, म्हणून आलो."

तेवढ्या वेळातच त्यांनी मला दोन-तीन महत्त्वाचे प्रश्न विचारले. माझी माहिती विचारली आणि हसत हसत त्यांनी शेवटी विचारले,
"हा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी पडला, तर त्याची जोखीम कोण घेणार?"
मी सांगितले,
"आम्ही जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते त्यांची जबाबदारी घेऊ."

दहा-पंधरा मिनिटांत आमची मुलाखत संपली आणि मी त्याच रात्रीच्या गाडीने पुण्याला परत गेलो. सातारमध्ये कार्यकर्ते माझी वाट पाहत होते, म्हणून सकाळच्या मोटारने मी तडक सातारला पोहोचलो. माझी सरदारांशी झालेली मुलाखत मी

सविस्तरपणे आत्माराम बापूंना आणि इतर मित्र-मंडळींना सांगितली. सर्वांना समाधान वाटले. आपल्या हाती जे शक्य होते, ते सर्व केले आहे, आता व्यर्थ चिंता कशाला करायची, असा सर्वांचा रोख दिसला आणि मीही माझ्या कॉलेजसाठी कोल्हापूरला निघून गेलो.

थंडीचे दिवस चालू होत होते. फैजपूरची काँग्रेस नुकतीच झाली होती, त्यामुळे श्रेष्ठी मंडळी काहीशी थकून गेल्यासारखी झाली होती.

मी कोल्हापूरला पोहोचल्यानंतर एक-दोन दिवसांतच मला निरोप समजला, की श्री. आत्माराम बापूंचे नाव उमेदवार म्हणून स्वीकारले गेले आहे. वर्तमानपत्रांत ही बातमी आली.

पुढे काही दिवसांनी मला समजले, की माझ्या मुंबईच्या सरदार पटेलांशी झालेल्या भेटीचा या संदर्भात चांगलाच उपयोग झाला होता.

या तऱ्हेने उमेदवारीची ही एक लढाई सातारा जिल्ह्यात आम्ही जिंकली होती. निवडणुकीचे तिकीट मिळविण्याकरता कराव्या लागणा-या खटपटी-लटपटी यांच्या चर्चा आजही वर्तमानपत्रांत नेहमी वाचायला आणि ऐकायला येतात. पण मी ही जी तपशीलवार हकीकत दिली आहे, तिचे कारण जनजीवनाला ढवळून काढणा-या एका आंदोलनानंतर त्या आंदोलनात सैनिक असणा-या कार्यकर्त्याला जर लोकप्रतिनिधी म्हणून मान्यता मिळाली नसती, तर त्या आंदोलनाचा तो अपमान झाला असता.

आज जेव्हा मी पाठीमागे वळून पाहतो, तेव्हा सातारा जिल्ह्यातील नव्या ग्रामीण नेतृत्वाचा उदय या उमेदवारीने केलेला आहे, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. ही उमेदवारी आत्माराम पाटलांना न मिळता जर जुन्या ब्राह्मणेतर चळवळीतील कुणा जुन्या प्रतिष्ठिताला मिळाली असती, तर चळवळीमध्ये एक प्रकारचे निराशेचे वातावरण निर्माण झाले असते.

आत्माराम बापूंच्या या उमेदवारीचे स्वागत सबंध सातारा जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहाने झाले. आम्ही सातारला जाऊन भाऊसाहेब सोमण आणि सर्व मंडळींचे आभार मानून आलो. कारण आम्हांला जिल्ह्याच्या नेतृत्वाशी सुखकर संपर्क राहावा, अशी इच्छा होती. त्यांनी समाधान व्यक्त केले आणि निवडणुकीच्या तयारीसाठी कार्यशील राहा, असे सांगितले.

या निवडणुकीसारखी निवडणूक क्वचितच झाली असेल. तीमध्ये ईर्ष्या होती. विरोधी बाजूला श्री. आण्णासाहेब कल्याणी व एक नवे वकील श्री. शंकरराव मोहिते हे उमेदवार म्हणून उभे होते. काँग्रेसचे तीन उमेदवार हे, शंकरराव साठे यांनी जातवार उमेदवार उभे करण्याची जी स्ट्रॅटेजी सांगितली, त्यानुसार एक मराठा, एक जैन आणि एक ब्राह्मण असे होते. ब्राह्मण होते, ते श्री. शिराळकर, जैन होते, ते श्री. भाऊसाहेब कुदळे. तत्त्वतः विचार करता अशा तऱ्हेने जातवार वाटणी करणे म्हणजे जातीयवादाला प्रोत्साहन देण्यासारखे होते व वैचारिक पराभवाला निमंत्रण देण्यासारखे होते. आम्ही आत्माराम बापू पाटलांकरता प्रयत्न करीत होते, ते काही मराठा म्हणून नव्हे, तर ग्रामीण जनतेत जे राष्ट्रीय आंदोलन झाले, त्याचा प्रतिनिधी म्हणून आत्माराम पाटील यांचे नाव आम्हां सर्वांच्या डोळ्यांपुढे होते.

निवडणूक मोठ्या अटीतटीने झाली. आमच्याजवळ प्रवासाची साधने नव्हती. आत्माराम पाटलांनी त्यांच्यासाठी थोडे दिवसांसाठी एक मोटार कशी तरी मिळविली होती. बाकी आम्ही सर्व सर्व्हिस मोटारी आणि सायकली यांच्या जिवावर प्रवास करीत होतो. मी कराड आणि पाटण या दोन तालुक्यांमध्ये प्रचाराला गेल्याचे आठवते. सभांतून फक्त काँग्रेस पक्षाचाच प्रचार सुरू असे आणि आम्ही काँग्रेसच्या तिन्ही उमेदवारांसाठी प्रचार करीत होतो. विरोधी पक्षाच्या प्रचाराची तऱ्हा अजब होती. प्रमुख माणसे बोलावून कराड किंवा इस्लामपूर अशा ठिकाणी नेऊन त्यांच्याशी वाटाघाटी होत असत. गावोगाव निरोप पाठविले जात असत. आम्हांला तसे करून चालणार नव्हते. आम्हांला अजून लोकांकडे प्रत्यक्ष जाण्याची गरज होती

आणि हौसही होती आणि त्याप्रमाणे आम्ही गावोगाव जात असू. लोकांना जमवून जाहीर सभा घेत असू.

लोकांत हळू हळू उत्साह वाढत गेला आणि आमच्या सभांना गर्दी होऊ लागली. दिवसातून चार-पाच तरी सभा मी जवळ जवळ तीन आठवडे करीत होतो. सर्व समाज ढवळून निघाला होता, असे म्हटले; तरी चालेल.

या निवडणुकीच्या निमित्ताने मी समाजाच्या सर्व थरांमध्ये अगदी खोल उतरू शकलो. माझ्यापेक्षा तरुण असलेल्या नव्या मुलांच्या ओळखी झाल्या. आणि या जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनात माझे स्वतःचे असे स्थान निर्माण झाल्याची जाणीव मला झाली.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट कराड व सातारा या ठिकाणी झाली. पंडितजींची कराडची सभा सकाळी आठ वाजता होती. अनेक तालुक्यांतून रात्रीचा प्रवास करून शेतकरी आले होते. एक लाखावर समाज कृष्णाकाठच्या स्वामीची बाग व वाळवंट या परिसरात जमला होता. कराडात प्रथमच या सभेमध्ये लाऊड स्पीकरचा वापर केला गेला. आमचे काँग्रेसचे उमेदवार श्री. शिराळकर हे सधन गृहस्थ होते. त्यामुळे हा खर्च करता येणे आम्हांला शक्य झाले. अशा तऱ्हेची कराडमधली ही पहिली विराट सभा झाली. पंडितजींच्या या भाषणाने लोकांत एक अपूर्व चैतन्य निर्माण झाले.

या प्रचारासाठी आम्हांला दुसरे महत्त्वाचे पाहुणे लाभले, ते म्हणजे मानवेंद्रनाथ रॉय. मी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराबद्दल आणि त्यांच्या क्रांतिकारी पूर्व जीवनाबद्दल पुष्कळ ऐकले होते आणि काहीसे वाचलेही होते. त्यांची काही पत्रे आणि लेख यांची माहिती आमच्या जिल्ह्यातले त्यांच्या विचारांचे जे भक्त होते, त्यांच्याकडून मिळाली होती. त्यामुळे मी मागे सांगितल्याप्रमाणे मनामध्ये या व्यक्तिमत्त्वाबद्दल एक प्रकारचे राजकीय आकर्षण निर्माण झाले होते. या

निवडणुकीच्या प्रचाराच्या दिवशी मी त्यांना प्रथम पाहिले व भेटलो. त्यांच्या बरोबर श्रीमती मणिबेन कारा ह्याही प्रवास करीत होत्या. त्यांच्याशी चार-दोन मिनिटांचे काही औपचारिक बोलणे, हीच त्यांची-माझी पहिली ओळख. सहा फुटांपेक्षा जास्त उंची असलेला, चेह-यावर बुद्धिमत्तेचे तेज सहजदर्शनी दिसणारा हा पुरुष प्रकृतीने काहीसा खालावलेला होता, पण स्वभावाने गंभीर म्हणून प्रभावी वाटला.

निवडणुकीचा प्रचार यथासांग पार पडला आणि आमच्या काँग्रेसच्या उमेदवारांपैकी आत्माराम पाटील सर्वांत जास्त मते मिळवून निवडून आले. श्री. पांडूआण्णा शिराळकर हेही निवडून आले. आमचे तिसरे काँग्रेसचे उमेदवार भाऊसाहेब कुदळे यांचा मात्र पराभव झाला. आम्हांला आमच्या काँग्रेसच्या या एका उमेदवाराच्या पराभवाची खंत लागून राहिली. परंतु उमेदवार निवडणुकीचा जो व्यूह रचला होता, तो चुकीचा असल्यामुळे बिचा-या कुदळे यांना पराभवाचे शल्य स्वीकारावे लागले.

१९३७ ची ही निवडणूक सर्व राज्यांत, त्याचप्रमाणे आमच्या जिल्ह्यात घडलेली एक अतिशय महत्त्वाची घटना होती, यात शंका नाही. कारण त्यामुळे राजकीय चळवळीचे पाऊल पुढे पडले होते. यातून काँग्रेसचे सरकार बनणार होते. काँग्रेसने मंत्रिमंडळ बनवावे, की नाही यासंबंधाने चर्चा सुरू झाल्या. माझी स्वतःची त्यावेळची भावना मला माहीत आहे. १९३५ च्या कायद्याकडे आम्ही विरोधाच्याच भावनेने पाहत होतो, परंतु त्या कायद्याखाली मिळालेल्या सत्तेच्या आधारावर सरकार बनवून जनतेची शक्ती अधिक संघटित करण्याची संधी त्यामुळे मिळणार होती. स्वातंत्र्य-चळवळीच्या दृष्टीनेही ते अत्यंत युक्त आहे, असे माझे मत होते. सत्तेपासून लांब राहावे, या मोहात गुंतू नये, असे म्हणणा-या संन्याशांचा एक वर्ग होता, परंतु त्यामध्ये काही राजकीय विचार दिसत नव्हता. सत्तेपासून दूर राहण्याचा जो एक पोकळ सोवळेपणा असतो, तोच त्यात होता.

ही राजकारणी वृत्ती आमच्या जिल्ह्यापुरती किंवा महाराष्ट्रापुरती मर्यादित नव्हती, तर देशाच्या पातळीवरही हे विचार मांडणारे समाज नेते होते. जवाहरलालजींनीही

व्यक्तिशः आपली अशीच भावना असल्याचे व्यक्त केले होते. पण वर्किंग कमिटीचा ठराव सत्ता स्वीकारावी, असा झाला. तेव्हा त्यातून जनतेला निश्चित प्रकारचे मार्गदर्शन झाले. आमच्या जिल्ह्यातून कोणी मंत्री होईल, असे आम्हांला कधीच वाटले नव्हते किंवा आमची तशी अपेक्षाही नव्हती. परंतु आमचा तरुण नेता आत्माराम बापू पाटील हे विधिमंडळात जाऊन शेतकरी समाजाचे आणि गरीब लोकांचे प्रश्न पोटतिडकीने मांडेल आणि आपल्या कर्तृत्वाने आपल्याभोवती तेथल्या अनेक मंडळींची शक्ती उभी करेल, अशी आशा होती. आत्माराम बापूंनी सुरुवात तर चांगली केली होती. आणि त्यांच्याबद्दल लोकांमध्ये एक कौतुकमिश्रित आदराची भावना निर्माण झाली होती. आमच्या जिल्ह्यातील लोक जिल्ह्याचा एक नवा नेता या दृष्टीने त्यांच्याकडे पाहू लागले आणि ग्रामीण नेतृत्वाचे एक नवे केंद्र निर्माण झाले, असा माझा अनुभव आहे. अनेक प्रश्न घेऊन लोक आत्माराम बापू यांच्याकडे तर जातच, आता ते आमच्याकडेही येऊ लागले आणि माझ्या असे लक्षात आले, की मीसुद्धा सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा घटक बनलो आहे, ही भावना मनाला प्रसन्न करणारी होती आणि त्याचबरोबर त्या क्षेत्रात अधिक उमेदीने काम करण्याकरता प्रोत्साहन देणारी अशी शक्ती होती.

१९३७ चे सबंध वर्ष मी माझ्या बी. ए. च्या अखेरच्या परीक्षेच्या तयारीत घालविले. जिल्ह्यातल्या आणि इतर ठिकाणच्या पाहुण्यांची कोल्हापूरला माझ्याकडे ये-जा होती. या संदर्भातली एक आठवण सांगितली पाहिजे. पुण्याचा माझा मित्र दयार्णव कोपर्डेकर मी मागे सांगितल्याप्रमाणे साने गुरूजींच्या निकटवर्तीयांपैकी झाला होता. एक दिवस दयार्णव कोपर्डेकर आणि त्याची नियोजित वधू असे दोघे जण कोल्हापूरच्या भुसारी वाड्यातील माझ्या खोलीवर आले. मला आंनद आणि आश्चर्यही वाटले. दयार्णवने इतक्या लवकर लग्न करायचे ठरविले, हे ऐकून मला थोडे नवल वाटले. साने गुरूजींच्या परिचयातल्या कुटुंबातीलच ही मुलगी होती आणि साने गुरूजींच्या आशीर्वादाने हे लग्न ठरले होते, असे त्याने मला सांगितले. माझ्या शक्तीप्रमाणे मी त्यांचा दोन-तीन दिवस पाहुणचार केला. साने गुरूजी आणि दयार्णव यांचा निकट संबंध इतका झाला होता, की साने गुरूजींची 'श्यामची आई'

ही कादंबरी दयार्णवने प्रकाशित करावी, म्हणून त्यांनी त्याच्याकडे दिली होती. आयुर्वेदाचे शिक्षण घेता घेता दयार्णव प्रकाशक झाला होता. त्याने येताना 'श्यामची आई'चे हस्तलिखित आपल्याबरोबर आणले होते. ते त्याने मला दाखविले. एका मोठ्या वहीत आपल्या स्पष्ट हस्ताक्षरात साने गुरूजींनी ही कांदबरी लिहिली होती. दयार्णवने मला ती वाचण्याचा आग्रह केला. तोपर्यंत साने गुरूजींचे लेखक म्हणून नाव काही प्रसिद्ध नव्हते. लेखक या नात्याने त्यांचा माझा परिचय नव्हता. म्हणून ते हस्तलिखित वाचण्याची फारशी उत्सुकता माझ्यामध्ये नव्हती खरी; दयार्णवच्या आग्रहाकरता मी ती त्याच्या दोन-तीन दिवसांच्या मुक्कामात वाचून काढली. ते हस्तलिखित वाचताना मात्र मी मराठी वाङ्मयात काही नवीन वाचतो आहे, असे मला जरूर वाटले.

'श्यामची आई' वाचत असताना अनेक वेळा माझे डोळे पाणावून आले. 'आई' हा शब्दच असा आहे, की त्याच्या साध्या उच्चारानेसुद्धा मी भावनेने दुबळा बनतो. आणि त्यात साने गुरूजींचे प्रत्येक वाक्य भावनेने ओथंबून गेलेले व आईच्या प्रेमाने ओसंडून चाललेले होते. मी तर दयार्णवला मिठीच मारली आणि सांगितले,

"साने गुरूजी फार मोठे साहित्यिक आहेत. मला त्यांचे हस्तलिखित वाचायला मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो. तुझे हे प्रकाशन यशस्वी होईल, याची मला खात्री आहे."

साने गुरूजींच्या 'श्यामची आई' या कादंबरीचा आणि माझा असा ऋणानुबंध आहे.

बी. ए. च्या परीक्षेसाठी मी राजकारण, इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. अर्थशास्त्रावरची काही पुस्तके मी पहिल्या प्रथम तेव्हा वाचली. माझ्या आतापर्यंतच्या वाचनात हा विषय विशेष आला नव्हता. समाजवादाचा अभ्यास करताना अर्थरचनेच्या प्रश्नांचे महत्त्व मी समजून चुकलो होतो. किंबहुना समाजाच्या अर्थजीवनाची शक्ती समाजाच्या इतर कामांवरही सतत आणि

महत्त्वाचा परिणाम करत असते, याही मताशी मी परिचित होतो. परंतु अर्थशास्त्र हा स्वतंत्र विषय म्हणून मी यापूर्वी वाचला नव्हता. तो या निमित्ताने अभ्यासावा लागला. अर्थात आम्हांला शिकविले जाणारे अर्थशास्त्र हे समाजवादी अर्थशास्त्रापासून मूलतः वेगळे आहे. परंतु त्या क्षेत्रातल्या परिभाषेची या निमित्ताने ओळख झाली आणि पुढे मला स्वतंत्रपणाने अधिक काही वाचण्याची आवश्यकता वाटली, तर त्याची तयारी झाली. माझ्या पुढच्या राजकीय आयुष्यामध्ये अर्थशास्त्राच्या मुलभूत तत्त्वांचा केलेला अभ्यास माझ्या उपयोगी पडला.

मी सवड काढून पुणे येथे भरलेल्या कौन्सिलच्या अधिवेशनासाठी गेलो होतो. श्री. आत्माराम बापू पाटील यांनी मोठ्या अगत्याने बोलावून नेले होते आणि त्यांचा पाहुणा म्हणून मी तेथे राहिलो होतो. मी तेथे असताना मुख्यमंत्री श्री. खेर यांना भेटण्यासाठी 'महार वतन नष्ट करा' या आंदोलनाचा एक मोठा मोर्चा आला होता, तो मी पाहिला होता. डॉक्टर आंबेडकर हे त्यामध्ये स्वतः होते, की नाही, हे मला आठवत नाही, पण त्यांच्या अनुयायांनी काढलेला तो मोर्चा होता. मी त्या मोर्च्यातील काही मंडळींना जाऊन भेटलो आणि यांच्याशी बोललोही. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. बाळासाहेब खेरांनीही मोर्च्याला मोठ्या अगत्याने भेट दिली. पण त्या निमित्ताने डॉक्टर आंबेडकरांच्या आमच्या जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांशी ओळख झाली. जमिनी वतन म्हणून देऊन त्या मोबदल्यात जन्मभर आणि पिढयान् पिढ्या गावगाड्याचे काम करून घ्यायचे, हे या महार-वतनाचे खरे स्वरूप होते आणि ते बदलणे अत्यंत आवश्यक होते. त्यांची मागणी रास्त होती.

मला अशी आशा होती, की त्यांची ही सरळ व साधी मागणी आमचे काँग्रेस सरकार मान्य करेल आणि त्यामुळे राष्ट्रीय चळवळीपासून बाजूला राहिलेला हा समाज मुख्य प्रवाहात येईल. मी आत्माराम बापू पाटील यांच्याशी याबाबत बोललो होतो. त्यांनाही माझ्यासारखेच वाटत होते. तेव्हा त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न करावा, असा मी आग्रह केला. त्यांनी आपल्या मताचे चार-दोन आमदार तयार केले. परंतु त्यांचे कोणी ऐकून घेईल, असे त्यांना दिसेना.

त्यावेळी माझ्या लक्षात आले, की आत्माराम बापू पाटील हे आमदार झाले असले, तरी सरकारची धोरणे बदलण्याच्या प्रक्रियेत ते असहाय आहेत. सरकारची नवी धोरणे तयार व्हायची असली, तर त्यांच्यावर परिणाम करणारी परिस्थिती निर्माण केल्याशिवाय निव्वळ कायदे मंडळाच्या सभासदत्वाचा काही उपयोग नाही, अशी भावना पहिल्या प्रथम त्यावेळी माझ्या मनात येऊन गेली. आणि आपली आमदारकी अपुरी आहे, याची जाणीव आत्माराम बापूंनाही त्यावेळी झाली असली पाहिजे. आत्माराम बापूंनी केलेला हा प्रयत्न तेथेच राहिला. आमचे राजकारण या नव्या जाणिवेने पुढे जात राहिले.

१९३८ साली मी बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर पुढे कायद्याचा अभ्यास कुठे करावा, असा माझ्यापुढे प्रश्न उभा राहिला. पदवीधर तर झालो होतो आणि आता पुढे काय करायचे, म्हणून एल्. एल्. बी. व्हायचे, असा मी विचार केला होता.

मी बी. ए. चा अभ्यास करीत असतानाही हा प्रश्न माझ्या पुढे उभा राही. पुढे काय करणार, असा प्रश्न जेव्हा विचारला जाई, तेव्हा मी माझ्या मित्रांना सांगत असे, की माझ्या मनात दोन गोष्टी आहेत : एक, सातारा किंवा कराड येथे एखादे वृत्तपत्र काढून तेथे संपादक म्हणून काम करायचे. किंवा ग्रामीण भागात एखादी शिक्षण-संस्था काढून राष्ट्रीय वृत्तीचा उत्तम शिक्षक व्हायचे. त्यावेळी वकील होण्याचा विचार माझ्या मनात आला नव्हता. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर पुन्हा या गोष्टीवर चर्चा झाली, तेव्हा मित्रांनी मला सांगितले,
"तुला शिक्षक वा संपादक व्हायचे असले, तरी कायद्याचे ज्ञान काही तुझ्या आड येणार नाही. कायद्याची परीक्षा देऊनही तू त्या मार्गाने जाऊ शकशील. फक्त पदवीधरच राहिलास, तर अध्र्यावर लोंबकळत राहशील."

मीही विचार केला, की मला शेवटी स्वातंत्र्य-चळवळीचे राजकारण करायचे आहे. राजकारण आणि वकिली हातात हात घालून चालते, हेही मी पाहात होतो.

- आणि अशा ब-याच विचारानंतर कायद्याचा अभ्यास करावा, असा निर्णय मी घेतला.

कायद्याचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी मी काही वेळ पाठीमागच्या काळात जाऊन माझ्या शैक्षणिक प्रगतीबरोबर राजकीय विचारांचा प्रवास कसा झाला, याची नोंद येथे घेऊ इच्छितो.

जेलमधून बाहेर पडताना १९३३ साली मी फक्त काँग्रेसमन राहिलो नव्हतो. तर माझ्या काँग्रेस-निष्ठेला समाजवादी निष्ठेचीही जोड मिळाली होती. काँग्रेस-निष्ठा या शब्दाचा अर्थ येथे स्पष्ट सांगण्याची गरज आहे. हिंदुस्थानातील राष्ट्रीय जन-आंदोलनाची जी चळवळ होती, त्या चळवळीने काँग्रेसचे रूप घेतले होते. जवळ जवळ पन्नास वर्षे या चळवळीने प्रवास केला होता आणि त्या पन्नास वर्षांमध्ये हिंदुस्थानची जनता आणि इंग्रज यांचे संबंध कसे असावेत, यासंबंधीच्या कल्पना बदलत गेल्या होत्या. काँग्रेसच्या इतिहासाचे सार हे आहे, की जसजसा काळ पुढे जात गेला, तसतशी काँग्रेसची चळवळ ही अधिक जनताभिमुख होत गेली आणि ख-या अर्थाने जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब बनत गेली आणि या बदलाबरोबरच अंतिम राजकीय ध्येय व त्यासाठी कराव्या लागणा-या चळवळींच्या साधनांचे स्वरूपही बदलत गेले. अर्ज-विनंत्यांनी आपले प्रश्न सोडवावेत, असे म्हणणा-या काँग्रेसची 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या टिळकांच्या घोषणेतून हिंदुस्थानमधून ब्रिटिश सत्तेने जाऊन संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे, अशी मागणी करण्याच्या स्तरापर्यंत प्रगती झाली होती. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांसंबंधी कोणाचे काहीही विचार असले, तरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा मूलभूत असल्यामुळे तो काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात राहूनच सोडवावा लागेल, यासंबंधी जवळजवळ एकमत होते, असे म्हटले तरी चालेल. वेगळे वेगळे, छोटे मोठे, विचारप्रवाह काँग्रेसमध्ये होते. पण मतभेद कितीही तीव्र झाले, तरी काँग्रेस अंतर्गत राहूनच हे मतभेद चालावयाचे, असा जणू काही नियमच बनला होता.

सुरुवातीच्या काळात जहाल-मवाळ, पुढे फेर-नाफेर आणि आता जेव्हा ३० ची चळवळ सुरू होऊन काँग्रेसच्या इतिहासाने एका नव्या पर्वामध्ये प्रवेश केला होता, तेव्हा समाजवादाच्या विचाराने या मतभेदांची जागा घेतली. समाजवाद हा शब्द जेव्हा तो स्वीकारला, असे मी म्हणतो, तेव्हाही तो शब्द अतिव्याप्त अशा स्वरूपात आम्ही वापरत होतो. कारण समाजवाद या शब्दाच्या पाठीमागे विचारांचे इतके वेगवेगळे पदर आहेत, की त्या चर्चेत पडणे सुतराम् शक्य नाही. मी जेव्हा म्हणतो, की मी स्वातंत्र्य-सैनिक म्हणून काँग्रेसचे व्यासपीठ हे मूलभूत मानतो आणि त्याच वेळी समाजवादही स्वीकारतो, तेव्हा त्याचा एक मर्यादित अर्थ असतो; आणि हा मर्यादित अर्थ एवढाच आहे, की राजकीय स्वातंत्र्य म्हणजे निव्वळ इंग्रजांचे राज्य जाऊन या देशातील जनतेची प्रगती होणार नाही. त्याचबरोबर आमच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनामध्ये मूलभूत फेरफार करावे लागतील आणि त्यासाठी स्वातंत्र्याचा अर्थ निश्चित करण्याची गरज आहे, असा विचार आम्हां मंडळींच्या मनात आला.

एकदा हा अर्थ निश्चित झाला, म्हणजे त्या अर्थाप्रमाणे त्या स्वातंत्र्याची प्राप्ती कशी करायची, याचा मार्ग सुनिश्चित करून घेतला पाहिजे. या मर्यादित अर्थाने आम्ही समाजवादाचा विचार स्वीकारला होता.

त्यावेळी समाजवादाचा विचार करणारे आणि त्यासाठी स्वतःला बांधून घेतलेले काँग्रेसच्या बाहेर कम्युनिस्ट पक्षासारखे दुसरे पक्षही होते. ते लहानमोठे असतील; परंतु त्यांचे अस्तित्व स्वतंत्र होते. महात्मा गांधींचे नेतृत्व म्हणजे त्यांच्या अहिंसात्मक सत्याग्रहाच्या कल्पनेचा स्वीकार आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा आग्रह, ही काँग्रेस कार्यकर्त्यांची मूळ भूमिका. त्याला जोडून सामाजिक आणि आर्थिक बदलाची नवी भूमिका घेऊन मी इतरांबरोबर जेलमधून बाहेर पडलो. शास्त्रीय समाजवादाचा स्वीकार करावा, असा आग्रह करणारी माणसे भेटली, की त्यांच्याशी चर्चा करताना आमची गडबड उडे.

परंतु त्या खोलात शिरण्याची त्यावेळी मनाची तयारी नव्हती. मी स्वतःलाच बजावले होते, की विचारात जे बदल व्हावयाचे असतील, ते शेवटी जनआंदोलनाच्या अनुभवांतून झाले पाहिजेत. काँग्रेसची मूळ निष्ठा आणि समाजवादाचा दृष्टिकोन यांचा मेळ घालून आपण कार्य करावयाचे. मी समाजवाद स्वीकारला, याचा त्यावेळी एवढाच मर्यादित अर्थ होता.

आम्ही जेलमधून आल्यानंतर काही महिन्यांनी मला समजले, की १९३२ सालीच देशातल्या काही प्रमुख तरुण नेत्यांनी जेलमध्येच एकत्र विचार करून काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा संकल्प सोडला होता. हा पक्षही काँग्रेस-अंतर्गत पक्ष होता. परंतु स्वातंत्र्यासाठी काँग्रेस संघटनेला समाजवादी विचारांची दृष्टी देऊन एक शक्तिशाली शस्त्र बनवावयाचे, असा या मंडळींचा विचार असावा. यावेळची माझी जी मनोभूमिका होती, ती या विचारांशी मिळतीजुळती अशी होती. त्यामुळे माझे मित्र राघूआण्णा यांनी एक दिवस मला सुचविले,
"हा जो नवा विचार आणि संघटना जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव वगैरे पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाने निघत आहे, त्याच्याशी आपण समरस झाले पाहिजे."
मी त्यांना सांगितले,
"असेच काहीसे विचार माझ्याही मनात आहेत."
मग त्यांनी विचारले,
"अडचण कोठे आहे ?"
मी सांगितले,
"माझी अडचण एवढीच आहे, की आपण ज्या कार्यकर्त्यांबरोबर काम करतो आहोत, त्यांना हे पटविल्याशिवाय असे पाऊल उचलल्याने आपण एकाकी तर नाही पडणार?"

- आणि आज पन्नास वर्षांनंतरही मी हे कबूल केले पाहिजेल, की माझ्या

आतापर्यंतच्या अनुभवाने ही कसोटी माझ्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाची आणि व्यवहार्य कसोटी म्हणून नित्य वावरत राहिली आहे.

पुढेही असे अनेक प्रसंग माझ्या राजकीय आयुष्यात आले, तेव्हा मी या कसोटीवरच माझ्या पुढील पर्यायांचा स्वीकार करावयाचा, की नाही, हे ठरवीत आलो आहे. नंतर आम्ही दोघेही इतर मित्रांशी बोलत राहिलो. तेव्हा त्यांचा याला फारसा विरोध नाही आणि उत्साहही नाही, असे आमच्या जिल्ह्यापुरते माझ्या लक्षात आले. शेवटी मी राघूआण्णांना होकार दिला आणि त्यापूर्वी त्या पक्षाचे काम करणा-या कार्यकर्त्यांना भेटावे, असे सुचविले. राघूआण्णा मला पुण्याला घेऊन गेले आणि त्यांच्यासमवेत काँग्रेस समाजवादी विचारांच्या त्यांच्या मित्रांशी भेट आणि चर्चा घडवून आणली. ही सर्व मंडळी देशभक्त तर होतीच, पण बुद्धिमानही वाटली. परंतु त्याची मांडणी बरीचशी पुस्तकी आहे, असे माझ्या लक्षात आले आणि या पुस्तकी विचाराला शहरी झालरही लागल्यासारखे मला वाटले. त्यामध्ये जनतेमधील आंदोलनाच्या कार्याचा अनुभव मुळीच नव्हता.

आम्ही परत आल्यानंतर राघूआण्णांना ही गोष्ट मी सांगितली, तेव्हा ते म्हणाले, "तुझे काहीतरीच आहे. त्यांच्या शहरी झालरीशी आपल्याला काय कर्तव्य आहे? आपला संबंध विचारांशी आहे."
- आणि शेवटी राघूआण्णांच्या प्रेमाखातर मी काँग्रेस समाजवादी पक्षाचे सदस्यत्व घ्यावयाचे ठरविले आणि घेतलेही. राघूआण्णा पुण्याहून आले, म्हणजे त्यांचे तेथील स्नेही एस्. एम्. जोशी आणि ना. ग. गोरे यांच्याशी त्यांच्या झालेल्या चर्चा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी अनेक गोष्टी सांगून आमच्यावर प्रभाव पाडीत असत.

ज्यावेळी राघूआण्णा आणि मी हे करीत होतो, त्यावेळी माझे दुसरे मित्र आत्माराम बापू पाटील आणि इतर मंडळी हे दुस-या विचाराच्या संपर्कात आलेली होती आणि तो विचार म्हणजे मानवेंद्रनाथ रॉय यांचा विचार. आमच्या जिल्ह्यातील बरेचसे प्रमुख कार्यकर्ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांच्या प्रभावाखाली गेले होते. तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, ह. रा. महाजनी, वामनराव कुलकर्णी वगैरे मंडळी मानवेंद्रनाथ रॉय यांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात केलेले काम आणि त्यांचे क्रांतिकारक जीवन यांचे मोठे आकर्षक चित्र आमच्या डोळ्यांपुढे उभे करीत असत.

राघूआण्णांच्या सहवासामुळे आणि प्रेमामुळे मी कॉंग्रेस समाजवादी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले असले, तरी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराच्या प्रभावाखाली असलेल्या माणसांशी माझा निकटचा संपर्क होताच. ह. रा. महाजनी हे आता आमच्या जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस म्हणून सातारला राहायला आले होते. तेही वारंवार माझ्याशी येऊन बोलत असत. त्यांचेही समाजवादी विचारांची वाढ करण्याचे धोरण होते. परंतु आता त्यात अधिक बारकावे निर्माण झाले होते.

कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या पंखांखाली मी जातो आहे, ही गोष्ट माझ्या या मित्रांना फारशी पसंत नव्हती. त्यांचे म्हणणे असे होते, की ही मंडळी खरा समाजवाद देशात आणू शकणार नाहीत. हे गांधींचा अहिंसावाद समाजवादाच्या परिभाषेत मांडण्याचा फक्त प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या  वैचारिक भूमिकेत मूलभूत असे काही क्रांतिकारकत्व नाही. हिंदुस्थानचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटायचे असतील, तर स्वराज्याची चळवळ अशा कार्यक्रमावर व अशा पद्धतीने बांधायला पाहिजेल आहे, की तिची जसजशी प्रगती होईल, तसतसे त्यातून समाजवादाचे स्वप्न साकार व्हायला मदत होईल. मी या दोन्ही विचारांची मनाशी तुलना करीत असे; आणि नाही म्हटले, तरी मला लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, ह. रा. महाजनी हे जे म्हणत असत, त्याचा अर्थ अधिक पटल्यासारखा वाटे. मनाची द्विधा अवस्था म्हणतात, ती ही होती. आणि मनाची अशी द्विधा अवस्था झाल्याशिवाय विचारांचा विकास होत नाही, असे मी मानतो.

दोन्हीही विचारप्रवाह माझ्या मनावर संस्कार करीत होते, त्यावेळी मी श्री. आत्माराम पाटील आणि राघूआण्णा या दोघांशी या बाबतीत जरूर बोलत असे.

राघूआण्णा हे भावनाप्रधान गृहस्थ होते. त्यांची एस्. एम्. जोशी आणि ना. ग. गोरे यांच्याशी वैयक्तिक मैत्री होती, म्हणून त्यांच्या प्रभावाखाली ते होते. मी असा शंकित होतो, हे त्यांना पटत नव्हते. तेव्हा त्यांनी एक मार्ग काढला. ते म्हणाले, "आपल्या पुण्याला समाजवादी पुढाऱ्यांना काँग्रेस समाजवादी पक्षाचे महाराष्ट्राचे अधिवेशन घ्यावयाचे आहे. आपण ते कराडला घेऊ या."

या वेळपर्यंत कार्यकर्ता म्हणून माझा बोलबाला झाला होता. मला मानणारे काही कार्यकर्ते तालुक्यात आणि जिल्ह्यात होते. माझ्या सहकार्याची त्यांना अपेक्षा होती, याची मला कल्पना होती आणि मी राघूआण्णांच्या प्रेमापोटी त्यांना होकार दिला आणि अशी परिषद आम्ही कराडमध्ये माझ्या कल्पनेने १९३५ साली भरविली. राघूआण्णांच्याबरोबर या परिषदेचा सरचिटणीस म्हणून मी काम केले. आम्हांला शक्य होती, तितकी उत्तम तयारी केली. बाहेरून येणा-या पाहुण्यांच्या स्वागताची तयारी केली.

या परिषदेचे अध्यक्ष म्हणून श्री. युसूफ मेहेरअल्ली हे आले होते. परिषदेचे काम दीड दिवस चालले. पुढाऱ्यांची भाषणे झाली. जे काही ठराव त्यांना करावयाचे होते, ते त्यांनी मंजूर करून घेतले आणि दुस-या दिवशी परिषद संपून पाहुणे मंडळी निघून गेली.

परिषदेचा एक चिटणीस या नात्याने युसुफ मेहेरअल्लींची माझी प्रथमच भेट आणि ओळख झाली होती. मोठा उमदा तरुण, आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि तितकेच आकर्षक वक्तृत्व, त्याचबरोबर १९३०-३२ च्या चळवळीतून केलेल्या स्वार्थत्यागाची पार्श्वभूमी यामुळे पुढारीपणाला आवश्यक असलेले सगळे गुण त्यांच्याजवळ होते, असे मला दिसून आले. व्यक्ती म्हणून त्यांनी माझ्यावर प्रभाव पाडला.

ज्यावेळी ही परिषद कराडमध्ये होत होती, त्याच वेळी आमच्या जिल्ह्यात रॉयवादी

मंडळींनीही आपला मुक्काम कराडमध्येच ठेवला होता. परिषदेमध्ये झालेल्या चर्चेवर ते टीका-टिपण्णी करीत होते. त्या संदर्भात ते माझी काहीशी उलटतपासणीही करीत होते. मूलतः त्यांनी हा प्रश्न विचारला,
"स्वतंत्र परिषद घेऊन तुम्ही कोणता नवीन विचार मांडला, हे सांगाल काय? उद्या या जिल्ह्यामध्ये कार्यक्रमाची आखणी करण्याकरता जेव्हा तुम्ही कार्यकर्त्यांपुढे जाल, तेव्हा या तुमच्या परिषदेने काही नवीन कार्यक्रम द्यायचा प्रयत्न केला आहे काय ?"

हे त्यांचे प्रश्न रास्त होते आणि मजजवळ त्यांची उत्तरे नव्हती.

परिषद संपून गेल्यानंतर आमच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी माझी बरीच उलटसुलट चर्चा झाली आणि मी या मताशी आलो, की काँग्रेस समाजवादी पक्षाचा सदस्य म्हणून काम करणे मला शक्य होणार नाही, यावेळी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रभावाखाली काम करणा-या कार्यकर्त्यांचा विचार मनात अधिक वावरत होता, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. त्यामुळे ही परिषद संपून गेल्यानंतर एक-दोन आठवड्यांतच काँग्रेस समाजवादी पक्षाचा राजीनामा देऊन मी यातून मुक्त झालो. राघूआण्णांना मी सांगितले,
"तुमच्याबद्दलच्या वैयक्तिक आदरामुळे आणि प्रेमामुळे मी या परिषदेची जबाबदारी स्वीकारली होती. आता परिषदेचे कार्य यशस्वीरीत्या पार पडले आहे. माझे आजचे जे विचार आहेत आणि जिल्ह्यातील कार्यकर्त्यांबद्दल जो अनुभव आहे, त्यांवरून यापुढे या पक्षाशी संबंध ठेवणे मला शक्य नाही. यामध्ये त्या पक्षाच्या धोरणावर किंवा त्यांच्या नेतृत्वावर टीका करण्याचा माझा उद्देश नाही. हे सर्व काँग्रेसमधील मोठे कार्यकर्ते आहेत. त्यांच्याबद्दल मला आदरच राहील. परंतु या संघटनेचा एक सदस्य म्हणून काम करणे माझ्याच्याने होणार नाही."

राघूआण्णांना वाईट वाटले; पण माझे हे प्रामाणिक मत त्यांनी स्वीकारले आणि ते म्हणाले,

"तुम्ही सर्वच मंडळी जर या विचाराची असाल, तर मीही हळूहळू त्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न करीन. कारण या जिल्ह्यात तुम्ही-आम्ही सर्वांनी एकत्र मिळून काम करावयाचे आहे."

मी सांगितले,

"समाजवादाचा पाठपुरावा करण्याची माझी भूमिका कायम आहे. परंतु त्याकरता काँग्रेस-अंतर्गत एखादा पक्ष काढावा, ही कल्पना मला पटत नाही."

वैचारिक दृष्ट्या काँग्रेसला प्रभावित करण्याकरता काँग्रेसच्या अंतर्गत असा काही गट असला, तर चालेल, हीही माझी त्यापाठीमागची भूमिका होती, ती राघूआण्णांनी ऐकून घेतली आणि अशा रीतीने काही निमित्ताने माझा समाजवादी पक्षाशी काही काळ आलेला संबंध संपला.

आता मी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराच्या प्रभावाखाली अधिक जात होतो. पण हे सर्व होत असताना महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि त्यांचे राजकारण यासंबंधीची माझी भावना पहिल्यासारखीच जिव्हाळ्याची नि आपुलकीची राहिली. रॉयवादाचे मला जे आकर्षण वाटले, ते मी समजून घ्यावयाचा प्रयत्न केला. रॉय त्यावेळी पत्रव्यवहाराने आपले विचार त्यांच्या कार्यकर्त्यांना, मित्रांना कळवीत असत. ते त्यावेळी इंग्रजांच्या जेलमध्ये सात वर्षांची शिक्षा भोगत होते. परंतु त्यांनी जेलमधूनसुद्धा आपल्या बाहेरच्या कार्यकर्त्यांशी फार संघटित संपर्क ठेवला होता आणि आपले विचार, देशातील घडलेल्या घटना आणि त्यांवरील त्यांच्या प्रतिक्रिया, देशामध्ये काँग्रेस-अंतर्गत बांधणी कशी करावी, यासंबंधी त्यांच्या कल्पना ते आपल्या सहकाऱ्यांना कळवीत असत. त्याच आधारावर त्यांची मंडळीही माझ्याशी बोलत असत. रॉय यांचेविचार आम्हांला आकर्षित करीत होते, त्यांच्यापेक्षाही जास्त त्यांचे क्रांतिकारक म्हणून व्यक्तिमत्त्व होते, त्याचे आम्हांला अधिक आकर्षण होते. तरुणपणी एक क्रांतिकारक म्हणून ते हिंदुस्थानमधून बाहेर पडले आणि आपल्या तीव्र बुद्धिमत्तेच्या जोरावर बाहेर-परदेशात असताना त्यांनी मार्क्सवादाचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास करून त्यामध्ये प्रावीण्य मिळविले. इतकेच नव्हे, तर

मेक्सिको या देशातील कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्याच्या कामात त्यांचा सिंहाचा वाटा होता, ही गोष्ट आता सर्वश्रुत आणि मान्य झाली आहे. पुढे मेक्सिकोहून प्रवास करीत करीत रशियन राज्यक्रांती झाल्यानंतर ते रशियात पोहोचले आणि लेनिनचे एक वैचारिक सहकारी म्हणून त्यांनी तेथे काम केले.

रशियन राज्यक्रांतीनंतर आशियातील पूर्वेकडील देशांमध्ये भांडवलशाहीला विरोध करण्यासाठी चळवळी कशा उभ्या करावयाच्या, यासंबंधाने जेव्हा त्यांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये चर्चा होत, त्यांमध्ये ते महत्त्वाचा भाग घेत असत.

याबाबतीत लेनिनच्या बरोबरीने त्यांनी आपले विचार मांडले आणि केव्हा केव्हा त्यांचा स्वीकारही झाला, असा त्यांचा लौकिक होता. आणि त्यामुळे माझ्या तरुण दृष्टीपुढे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक प्रकारचे वलय प्राप्त झाले होते.

असे जरी असले, तरी मी काही त्यांच्या विचारांची बांधिलकी स्वीकारलेली नव्हती. माझे मित्र श्री. आत्माराम बापू पाटील हे मात्र पूर्णतया रॉयसाहेबांना वाहून घेण्याच्या मनःस्थितीत होते. त्यांच्या-माझ्यांत अधूनमधून जेव्हा चर्चा होत असे, तेव्हा मी त्यांना म्हणत असे,
"बापू ,काँग्रेस समाजवादी पक्षासंबंधी माझी जी परिस्थिती झाली, ती तुमची या बाबतीत होणार नाही, याची काळजी घ्या. काँग्रेस संघटनेत राहून जर आपल्याला काम करावयाचे असेल, तर त्याच्याशी सुसंगत अशा त्यांच्या काही कल्पना असल्या, तर त्यांचा आपण जरूर स्वीकार करू या. तुम्ही तर जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी आहात. सामान्य जनतेपासून बाजूला पडाल, असे काही करू नका."

परंतु या चर्चा अशाच मोघम राहिल्या.

मी एक-दोन वेळा या बाबतीत ह. रा. महाजनी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व

वामनराव कुलकर्णी यांच्याशी माझी ही भावना आणि शंका स्पष्ट केली. तेव्हा त्यांनी त्या संबंधात रॉयसाहेबांच्या विचारांचे काही वाङ्मय मला वाचायला दिले. त्या वाङ्मयाचा आशय पुढीलप्रमाणे होता :

मार्क्सवादी पद्धतीने सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची लढाई ही समाजवादी क्रांतीच्या पूर्वीची लोकशाही क्रांतीची लढाई आहे आणि ती करत असताना कामगार-वर्ग, गरीब शेतकरी यांना एकत्र घेऊन त्यांच्या सामर्थ्यावरच ही क्रांती उभी करता येईल आणि या क्रांतीचे उद्दिष्ट साध्य होईल. पण हे व्हावयाचे असेल, तर कामगारवर्गाच्या बरोबर शेतकरी-वर्गही या लढ्यात साथीला असला पाहिजे. हिंदुस्थानचा मुख्य प्रश्न हा या विशाल देशात पसरलेल्या कोट्यवधी गरीब व लहान शेतकऱ्यांना संघटित करण्याचा आहे. त्यांना संघटित करणे म्हणजे त्यांच्या वर्गहिताच्या ज्या मागण्या आहेत, त्यासंबंधी त्यांना शिक्षित करावे लागेल. हे ऐतिहासिक कार्य काँग्रेस करू शकेल आणि या अर्थाने काँग्रेस संघटना ही इतिहासाने हिंदुस्थानला दिलेली एक देणगी आहे. काँग्रेस संघटनेत काम करणा-या कार्यकर्त्यांनी हे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून काम केले पाहिजे. जाणीवपूर्वक असे कार्य झाले, तर काँग्रेस संघटनेचे स्वरूप हळूहळू असे बनेल, की क्रांतिकाळात जी घटना समिती सत्तांतर करण्याचे काम करते, त्या घटना समितीचे रूप तिला येईल. लोकशक्तीच्या बळावर सत्तांतर करणारी यंत्रणा हे स्वरूप काँग्रेसला येईल. काँग्रेस संघटना ही राजकीय दृष्ट्या समांतरशक्ती म्हणून जेव्हा इंग्रजी सत्तेच्या विरूद्ध उभी राहील, तो क्षण क्रांतीचा असेल.

मला हे घटना समितीच्या रचनेचे तत्त्व आणि तंत्र मोठे आकर्षक वाटले. आणि मी रॉयवादाच्या काही काळ का होईना, समीप राहिलो, ते या आकर्षणामुळेच.

काँग्रेसमध्ये पर्यायी नेतृत्व उभे केल्याशिवाय हे शक्य होणार नाही, असे जेव्हा ही मंडळी प्रतिपादन करीत, तेव्हा मला दाट शंका येई, की हे विद्वान पंडित लहान लहान प्रश्नांवर जर इतके मतभेद निर्माण करतात, तर केव्हा तरी शेवटी आमची जी मूळ संघटना राष्ट्रीय काँग्रेस, तिला तर ते कमजोर करणार नाहीत ना ?

या मंडळींचा दुसरा एक महत्त्वाचा विचार होता, तोही असाच स्वीकारण्यासारखा होता. त्यांचे म्हणणे असे होते, की राज्यक्रांती करावयाची असेल, तर देशामध्ये विचारक्रांती केल्याशिवाय समाजवादाची क्रांती होणार नाही. त्याच्यासाठी आवश्यक ते डोळसपणाचे वातावरण निर्माण केले पाहिजे. परंपरावादी दृष्टीने आंधळेपणाने गोष्टी स्वीकारण्याची मनोवृत्ती काढून टाकली पाहिजे, असा एक विचार ते मांडत असत आणि या विचारांशी माझे संपूर्ण सहमत होते. या विचाराचा पुरस्कार यापूर्वीच्या माझ्या बोलण्या-वागण्यात केला होता. वैचारिक क्रांतीच्या विचारसरणीला मी इतके महत्त्व देत होतो, की या विचारांच्या प्रचाराने लोकशिक्षण केले पाहिजे, असे आम्ही ठरविले व हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून 'लोकक्रांती' या नावाचे साप्ताहिक सुरू केले. श्री. आत्माराम बापू पाटील या साप्ताहिकाचे संपादक होते. या साप्ताहिकाच्या प्रथम अंकाचे प्रकाशन आम्ही मोठ्या उत्साहाने केले. या प्रथम अंकातील अग्रलेख 'लोकक्रांतीचा जीवनहेतू' या शीर्षकाखाली मी लिहिल्याचे स्मरते. कऱ्हाडला व्यापारी प्रेसमध्ये हे साप्ताहिक आम्ही छापून घेत असू. पहिले काही आठवडे मी त्या साप्ताहिकाचे काम पाहिले, पण पुढे कायद्याच्या अभ्यासासाठी पुण्याला जावयाचे असल्यामुळे अग्रलेख वगैरेची सर्व जबाबदारी श्री. भय्याशास्त्री वाटवे यांनी स्वीकारली. हे पत्र वर्षभर चालले असेल, पण पुढे राजकारणात जसे मतभेदांनी अंतर निर्माण केले, तसे हे साप्ताहिकही बंद झाले, पण विचारक्रांती हा भारताच्या नवजीवनाचा प्राण आहे, या भूमिकेचा मी सातत्याने पुरस्कार केला आहे. या सर्व विचारांच्या हकीकती यासाठी सांगितल्या, की आत्माराम बापूंना वैयक्तिक मित्रसंबंध व ह. रा. महाजनी आणि लक्ष्मणशास्त्री जोशी वगैरे विद्वान मंडळींबद्दलचा थोर आदर यांमुळे त्यांना मी सांगितले,

"या जिल्ह्यात तुमच्याबरोबर काम करावयास तयार आहे. पण एक गोष्ट तुमच्या-आमच्यांत स्पष्ट असली पाहिजे, की इंग्रज सत्तेच्या विरूद्ध लढण्यासाठी हिंदुस्थानच्या आजच्या संदर्भात मूलभूत प्राधान्य असले पाहिजे, ही मी मूळ स्वीकारलेली भूमिका कधीच सोडणार नाही."

त्यांनी त्याला विरोध केला नाही आणि आम्ही एकत्र काम करू लागलो.

१९३७ साली रॉय हे सुटून आल्यानंतर त्यांनी जसा निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्रात दौरा केला, तसाच देशाच्या इतर भागांतही त्यांनी दौरा केला. काँग्रेस नेतृत्वाने त्यांचे मनापासून स्वागत केलेले मला दिसले नाही. त्याचवेळी माझ्या मनात पाल चुकचुकली. १९३१ साली कराची काँग्रेसमध्ये मूलभूत हक्काचा जो ठराव पास झाला, त्यावेळी रॉयसाहेब भूमिगत अवस्थेत कराचीत होते व तो ठराव करण्यासंबंधी पंडितजी आणि त्यांच्यांत काही चर्चा झाली होती. त्या ठरावाच्या मांडणीमध्ये त्यांचा काहीसा हात होता, असे रॉयवादी मंडळी मला सांगत असत. त्यामुळे असे वाटत असे, की काँग्रेसचे नेतृत्व रॉयसाहेबांच्या सहकार्याची अपेक्षा करील. परंतु हे होणे शक्य नाही, असे आता स्पष्ट दिसू लागले. पुढे रॉयनी स्वतःचे 'इंडिपेंडंट इंडिया' नावाचे साप्ताहिक सुरू केले आणि त्या साप्ताहिकात ते ज्याप्रमाणे घटना समितीच्या (Constituent Assembly) प्रस्थापनेवर प्रचार करत होते, त्याचबरोबर काँग्रेसच्या हल्लीच्या नेतृत्वाला पर्यायी नेतृत्व उभे केले पाहिजे, असाही विचार मांडत होते.

मी रॉयवादी मित्रांच्या बरोबर जिल्ह्यात काम करीत असलो, तरी पर्यायी नेतृत्वाच्या कल्पनेसंबंधाने माझ्या मनात मूलभूत शंका होत्या आणि त्या मी ह. रा. महाजनी आणि आत्माराम बापू पाटील यांच्याशी स्पष्टपणे बोलत असे. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा-माझा चांगला परिचय होता. परंतु ते रॉयसाहेबांच्या आंतरगोटात असल्यामुळे उच्च नेतृत्वाच्या वर्तुळात होते. त्यामुळे त्यांची भेट होणेही मुश्किल असे. तेव्हा त्यांच्याकडून या प्रश्नासंबंधीचा अधिक खुलासा करून घेण्याचा मी फारसा प्रयत्न केला नाही. याच्यापूर्वी मी एका वैचारिक त्रिकोणात उभा होतो, असे सांगितले, ते या क्षणी. मी या त्रिकोणातील जीवन तसेच चालू ठेवले, कारण दैनंदिन कामामध्ये त्याची अडचण येत नव्हती. साता-यातील इतर सर्व प्रमुख कार्यकर्त्यांशी माझे स्वतंत्र संबंध प्रस्थापित झाले होते आणि मी त्यांच्याशी या वैचारिक बाबीही बोलत असे. प्रत्यक्षात काय अनुभव येतो, ते पाहू. आज होय, की नाही, असा निर्णय घेण्याची गरज नाही, असे त्यांचेही मत पडले.

रॉयसाहेबांनी पुणे येथे मार्क्सवादावर तीन व्याख्याने दिली. त्या व्याख्यानांना मी हजर राहिलो व ती मी काळजीपूर्वक ऐकली. रॉयसाहेब गाढे विद्‌वान होते, पण उत्तम वक्ते नव्हते. त्यांनी तर्कदृष्ट्या सुसंगत असे आपले विचार मांडले आणि माझ्याप्रमाणे पुण्यातील इतरांवरही त्यांचा प्रभाव पडला.

१९३९ च्या मे महिन्यात सातारा जिल्हयाची एक राजकीय परिषद आम्ही तासगाव येथे घेतली. त्यावेळी जिल्हयात काँग्रेस कमिटीमध्ये आम्हां मित्रांचे वर्चस्व होते. या राजकीय परिषदेला अध्यक्ष म्हणून कोण पाहुणे बोलवावयाचे, याचा निर्णय आम्हांला घ्यावयाचा होता. रॉयसाहेबांचे आमच्यावर ताजे संस्कार असल्यामुळे आम्ही रॉयसाहेबांना निमंत्रण द्‌यावयाचे ठरविले आणि लक्ष्मणशास्त्री जोशी वगैरेंना सांगून त्याला मान्यता मिळविण्याची विनंती केली. त्यांची मान्यता मिळाली आणि त्याप्रमाणे ते या महत्त्वाच्या राजकीय परिषदेला हजर राहण्यासाठी तासगावला आले. तेथे त्यांची माझी दुसरी भेट थोड्‌या वेळासाठी झाली. मी त्यावेळी काँग्रेसच्या पर्यायी नेतृत्वाची कल्पना परिषदेत वादग्रस्त होण्याची शक्यता आहे, हे त्यांच्या नजरेस आणून दिले. त्यांना ते रूचले नाही. पण मी हे काम तेवढ्‌यावरच सोडून दिले. कारण ते आमचे पाहुणे होते. आमच्या परिषदेचे अध्यक्ष होते. परिषद कशी यशस्वी करणे शक्य आहे, या एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करून आम्ही काम करू लागलो.

या परिषदेला आम्ही रॉयसाहेबांना अध्यक्ष म्हणून बोलाविले, हे ऐकताच आमच्या जिल्हयात विरोधाची एक मोठी लहर जुन्या-नव्या काही काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये येऊन गेली. वाळवे तालुक्यातील आत्माराम बापूविरोधी असणा-या नाना पाटील आदी मंडळींनी या बाबतीत आपला विरोध असल्याचे जाहीर केले आणि त्यामुळे ही परिषद वादग्रस्त होणार, हे स्पष्ट झाले. आत्माराम बापूंनाही याची जाणीव झाली. आणि तेही इतर रॉयवादी मंडळींबरोबर खूप परिश्रम करीत होते. पण शेवटी परिषदेमध्ये हिंदुस्थानच्या पर्यायी नेतृत्वाच्या संबंधीचा ठराव काही मंडळींनी

मांडण्याचा प्रयत्न करताच वाद निर्माण झाला. काही भाषणे आधी होऊन गेली होती. हाच त्यातला एक चांगला भाग होता. रॉयसाहेबांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारा ठराव मांडला गेला व तो पास झाला, की नापास झाला, हे सांगणे अवघड होते. अशा परिस्थितीत ती परिषद विरोधी मंडळींनी उधळून लावली. जिल्ह्यातून आलेल्या सर्व लोकांच्या मनात एक प्रकारची निराशा व नाराजी निर्माण झाली. एवढ्या परिश्रमाने परिषद उभी केली आणि एवढा मोठा माणूस अध्यक्ष म्हणून बोलावला असताना ही परिषद अशा पद्धतीने मोडावी, याचे दुःख मलाही फार झाले. रॉयसाहेबांची समजूत काढण्याचा प्रश्न आम्ही ज्येष्ठ मंडळींकडे सोपवून दिला.

या परिषदेच्या अनुभवानंतर आमच्या जिल्ह्यात उघड उघड दोन गट झाले व आमच्या विरोधी असलेल्या मंडळींनी असा प्रचार सुरू केला, की ही जिल्हा काँग्रेस गांधीजींच्या नेतृत्वाच्या विरोधी आहे. त्यांना असे म्हणायला जागा होती, ही गोष्ट नाकारता येणार नाही. परंतु ज्या तऱ्हेने परिषद मोडली, हे काही चांगले नव्हते, ही गोष्ट तितकीच खरी आहे. याचा एक परिणाम माझ्या बाबतीत असा झाला, की माझ्या मनातील वैचारिक त्रिकोण आता संपणार, असे माझ्या मनाने घेतले. आज प्रस्थापित असलेल्या काँग्रेसच्या नेते मंडळींशी जर रॉयसाहेबांचा संघर्ष होणार असेल, तर आपण कुठे ? असा जर प्रश्न कुणी मला विचारला असता, तर माझे स्वच्छ उत्तर असे होते, की जेथे गांधी-नेहरू, तेथे मी. आमच्या विरोधात असलेल्या मंडळींची समजूत काढण्याचाही मी प्रयत्न करीत होतो. परंतु त्यामध्ये मला फारसे यश आले नाही.

याच सुमाराला जिल्ह्यात काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची निवडणूक होती आणि आमच्यातर्फे जो उमेदवार उभा केला होता, त्याचा पराभव करण्याचा सातारा जिल्ह्यातील बुवासाहेब गोसावी, नरूभाऊ लिमये, व्यंकटराव पवार वगैरे मंडळींनी चंग बांधला आणि या तासगाव परिषदेनंतरचा दुसरा पराभव या जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षाच्या निवडणुकीत आम्हांला स्वीकारावा लागला. आमच्यातर्फे उभे असलेले उमेदवार गांधीनिष्ठ कार्यकर्ते श्री. पांडू मास्तर यांचा पराभव करून श्री. व्यंकटराव

पवार हे अध्यक्ष म्हणून निवडून आले. यामध्ये माझा आणि आत्माराम पाटील यांचा पराभव झाला, असा प्रचार जिल्ह्यात सुरू झाला आणि एका अर्थाने तो झाला होता, हे आम्हांला मान्य करणे जरूर होते.

या निवडणुकीनंतर आत्माराम बापूंशी मी फार मोकळे आणि तपशीलवार असे बोललो आणि सांगितले, की आपल्या जिल्ह्यातील वातावरण आणि आपल्या देशातील परिस्थिती अशी आहे, की आपण रॉयसाहेबांच्या धोरणाच्या पाठीमागे फार काळ राहू शकणार नाही. मी असे बोललेले श्री. आत्माराम पाटील यांना रूचले नाही. त्यांनी सांगितले,
"तुमची माझी मैत्री आहे. तुम्ही मला चांगल्या प्रकारे सहकार्य दिले आहे. पण या बाबतीत जर तुमचा माझा मतभेद झाला, तर मी रॉयसाहेबांच्या बरोबर जाणार आहे, हे ध्यानात ठेवा."

मी एवढ्या परिश्रमाने आणि भावनेने आत्माराम पाटील यांची राजकीय मैत्री जोडलेली होती, ती आता संकटात येणार, की काय, या शंकेने मी व्यथित झालो, आणि नाही म्हटले तरी आमच्यामध्ये हळूहळू अंतर येऊ लागले. परंतु प्रश्न अटीतटीला न्यायचे नाहीत, असाही आम्ही दोघांनी विचार केला. पुढे पाठीमागे पाहून घेऊ, जेव्हा महत्त्वाचे असे प्रश्न उभे राहतील, तेव्हा त्यांचा विचार करू, असे मनाशी योजून आम्ही पुढे काम करू लागलो.

## प्रकरण तिसरे

## निवड

माझ्या वैचारिक प्रवासाचे सिंहावलोकन करीत असताना मी कालदृष्ट्या थोडा पुढे गेलो आहे. मी कायद्याच्या अभ्यासाचा विचार पक्का केला.

कायद्याच्या अभ्यासासाठी जाण्याचा निर्णय करण्यापूर्वी त्याच्या आर्थिक बाजूची तयारी करणे आवश्यक होते. विट्याला आमची वडिलोपार्जित शेतजमीन होती. आम्हांला तिचे उत्पन्न फारसे येत नव्हते. माझ्या दोन्ही बंधूंनी सुचवले, "तुझा दोन वर्षाचा खर्च निघेल, इतकी त्या शेतीची जरूर किंमत येईल. तेव्हा आपण ती जमीन विकून टाकू या."

माझी तर मान्यता होतीच. आम्ही तिघेही विट्याला जाऊन जमिनीचे विक्रीखत करून आलो. माझ्या लॉ कॉलेजच्या दोन वर्षाच्या खर्चाची याप्रकारे तयारी झाली. परंतु हे शिक्षण कोठे घ्यावे? कोल्हापूरला, की  पुण्याला, असा माझ्यापुढे प्रश्न होता. कोल्हापूरला काढलेली चार वर्षे सुरेख गेली होती. कोल्हापूर शहर व कोल्हापूरची माणसे यांबद्दल एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण झाला होता. मी तशी काही खास मित्रमंडळी निर्माण केली नव्हती. पण कोल्हापूर शहराचे, शहर म्हणून, एक व्यक्तिमत्त्व आहे, की त्याने एकदा तुमच्यावर पकड घेतली, म्हणजे ती लवकर सुटत नाही. माझे तसेच काहीसे झाले होते. माझ्या मनामध्ये दुसरा विचार येत होता. आता चार वर्षांनंतर कोल्हापूर सोडून पुण्याला गेले पाहिजेल. नवे वातावरण आणि त्याचा अनुभव हाही महत्त्वाचा ठरेल.

पुणे हे एक ऐतिहासिक शहर आणि महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. अनेक राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी या पुण्याहून सुरू होत असतात व तेथे या कायद्याच्या परीक्षेच्या निमित्ताने जर दोन वर्षे राहता आले, तर त्यामुळे माझा दृष्टिकोन अधिक व्यापक व्हायला मदत होईल.

शेवटी पुण्याला जाण्याचा मी निर्णय केला. परंतु हा निर्णय घ्यायला मदत झाली आत्माराम बापू पाटील यांची. या दरम्यान आत्माराम बापू पाटील यांचा आंतरजातीय विवाह झाला होता. पुणे जिल्ह्यातील तळेगावचे श्री. पिंगळे या नावाचे देशभक्त ब्राह्मण घराणे आहे. त्यांची मुलगी शांताबाई आणि आत्माराम पाटील

यांचा प्रेमविवाह ठरला. स्वाभाविकपणे त्याला दोन्ही बाजूंनी त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे जो विरोध व्हायचा, तो झाला. या प्रेमप्रकरणाची माहिती आत्माराम बापू मला सांगत होते.
मी म्हटले,
"तुमचा हा निर्णय असेल, तर लग्न करून टाका. परंतु त्या मुलीला विचार करावयास वेळ द्या. घाईघाईने निर्णय घेऊन नंतर पश्चात्ताप होण्यापेक्षा थोडा अवधी दिला, तर बरे होईल."

तसा बराच अवधी होऊनही गेला होता. १९३७ साली आत्माराम बापू पाटलांच्या निवडणुकीनंतर हा विवाह सातारा येथे रजिस्टर पद्धतीने झाला. या विवाहाचे साक्षीदार म्हणून मी व डॉक्टर आठल्ये असे होतो. या लग्नानंतर आत्माराम पाटील यांनी पुण्यात बिऱ्हाड केले. पुण्याला कायद्याच्या अभ्यासासाठी मी येणार, असे कळताच त्यांनी मी त्यांच्याबरोबर त्यांच्या घरी राहावे, असा आग्रह केला. त्यांचे अगत्य पाहून मी तो स्वीकारला आणि जवळ जवळ एक वर्ष मी त्यांच्या कुटुंबात राहिलो. त्यातील काही दिवस आम्ही शुक्रवार पेठेतील एका चांगल्या घरात राहत होतो. राहण्याच्या मुदतीची अट मात्र सहा महिन्यांची होती. श्री. स. आ. जोगळेकर यांचे ते घर होते. त्यांच्या माडीवरचा एक मजला त्यांनी आम्हांला दिला होता.

अभ्यासास उत्तम वातावरण होते. पुण्याला मी तसा नवा नव्हतो. पण पुण्याचे लॉ कॉलेज मात्र मी पहिल्या प्रथम पाहिले, तेव्हा नुकतीच लॉ कॉलेजची इमारत झाली होती. त्यामुळे मी पहिल्या दिवशी कॉलेजला हजर राहिलो, तेव्हा इमारत पाहताच मन प्रसन्न झाले. हनुमान टेकडीच्या उतरणीवर जवळ जवळ अर्धे पुणे दृष्टिक्षेपात येईल, अशा ठिकाणी ती इमारत बांधली होती. मी इमारत पाहात पाहात कॉलेजच्या लायब्ररीत जेव्हा गेलो, तेव्हा तर मी काहीसा चकितच झालो. इतकी चांगली लायब्ररी, वाचनाची केलेली व्यवस्थित सोय आणि इतके उत्तम वातावरण मी इतरत्र क्वचितच पाहिले असेल. आता त्या लायब्ररीचे वातावरण कसे आहे, हे मला माहीत नाही, पण मी पाहिले, त्या वेळची परिस्थिती ही अशी होती.

मी नित्यनियमाने कॉलेजला जाऊ लागलो. सायकलवरून शुक्रवार पेठेतून कॉलेज-टेकडीला जायला अर्धा एक तास लागायचा. मी हा प्रवास सायकलवरून करीत असे, त्यामुळे माझा मी मालक होतो. कायद्याचे शिक्षण घेत असताना शिक्षक मंडळी ब-यापैकी होती. त्यांमध्ये लक्षात राहतील, असे एक प्राध्यापक म्हणजे पुण्याचे प्रसिद्ध वकील श्री. ल. ब. भोपटकर हे होते. ते आम्हांला टॉर्ट (Tort) हा विषय शिकवीत असत. अनुभवी वकील, विषयावर व भाषेवर प्रभुत्व असले, म्हणजे उत्तम शिक्षक होऊ शकतो, याचे हे उदाहरण होते. दिवसातून दोन तास कॉलेजमध्ये राहावे लागत असे आणि इतर सर्व वेळ माझ्यासाठी मोकळा होता. मी सकाळी कॉलेजचे दोन तास करण्याकरता जात असे आणि नंतर तेथल्या लायब्ररीत बसून तेथेच वाचन करीत असे. प्रथमतः कायद्याची पुस्तके, नियतकालिके वगैरे पाहात असे. नंतर त्या लायब्ररीत असलेली दुस-या इतर विषयांची पुस्तके मी पाहू लागलो. वाचनासाठी आणि ज्ञानार्जनासाठी तेथे मोठे विशाल क्षेत्र होते.

हळूहळू पुण्यातल्या इतर काही व्यक्तींच्या ओळखी होऊ लागल्या. तेथे चाललेली वाङ्मयीन आणि राजकीय अभ्यास मंडळे, सभा, संमेलने यांस मी हजर राहू लागलो. पुण्याचे कम्युनिस्ट नेते श्री. विष्णुपंत चितळे हे आमच्या कराडमध्ये पुष्कळ वर्षे राहिले होते. त्यांची-माझी विशेष मैत्री होती, असे मी म्हणणार नाही; परंतु सुरेख स्नेह होता. कारण कराडमध्ये असताना मी त्यांच्याकडे जाऊन मार्क्सवाद समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असे. त्या वेळी त्यांनी सुचविलेली काही पुस्तके मी पुण्यामध्ये मिळविली आणि त्या विषयाचे अध्ययन सुरु केले. पुण्यात बरीच अभ्यास मंडळे सुरू असत. निदान त्या काळात तरी ही अभ्यास मंडळांची पुण्यामध्ये एक फॅशनच होती असे म्हटले, तरी चालेल. यांतल्या काही मंडळांमध्ये अधूनमधून मी जात असे. अर्थात ही अभ्यास मंडळे बहुधा राजकीय विचारांची असत. वेगवेगळ्या राजकीय तत्त्वज्ञानांचा तौलनिक विचार या अभ्यास मंडळांतून ऐकायला मिळे. त्यामुळे मन पुष्कळ प्रबुद्ध झाले.

अशा तऱ्हेने पुण्यात माझा काळ चालला होता आणि पुण्यामध्ये माझे मनही रमले होते. पूर्वी कोल्हापूरहून सातारा जिल्ह्यात मी वारंवार जात होतो, तसे आता जाता येणे अवघड होते. तरी पण महिना, दोन महिन्यांतून जाऊन मी माझ्या कार्यकर्त्या मित्रांशी माझा संबंध ठेवला होता.

१९३८ साल हे कसे गेले, ते कळलेच नाही. पण नंतर माझ्या लक्षात आले, की या साली कायद्याच्या अभ्यासापेक्षा मी इतर गोष्टींचाच अभ्यास जास्त करीत होतो. याचा परिणाम असा झाला, की १९३९ सालच्या माझ्या पहिल्या वर्षाच्या कायद्याच्या परीक्षेमध्ये मी उत्तीर्ण होऊ शकलो नाही.

निकालानंतर ही गोष्ट माझ्या मनाला लागून गेली. या प्रकारचा हा माझा पहिलाच अनुभव होता. कायद्याचा अभ्यास हा सर्वसामान्य वाचन करण्याकरता अभ्यास नसतो. त्याच्यामध्ये नेमकेपणा असावा लागतो आणि त्यासाठी बरेच पाठांतर करावे लागते. या पाठांतराची मला गोडी नव्हती. त्यामुळे एका विषयात मला मार्क कमी पडले होते. मी विचार केला, की चला, पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहू. माझ्या पास-नापास होण्याचा माझ्या घरावर काही परिणाम झाला नव्हता, कारण मी त्यांना खरे ते सगळे सांगितले होते. हे सबंध वर्ष मी आत्माराम पाटील यांच्या घरी काढले. त्यांतील सहा महिने शुक्रवार पेठेत आणि पुढचे सहा महिने टिळक रोडवरील 'ॲक्सिडेंट' नावाच्या बंगल्यात आम्ही राहत होतो. मी माझी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो नाही, याचे आत्मारामबापूंना आश्चर्य वाटले. त्यांना मी सांगितले, की मी स्वतंत्रपणे राहूनच माझा अभ्यास केला पाहिजे. नाही तर माझे दिवस फुकट जातील. हे एका अर्थाने बरोबर होते. कुठल्या तरी एखाद्या कुटुंबात राहून असा अभ्यास करणे हे अवघड आहे आणि त्याप्रमाणे मी माझ्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली. आणि पुढच्या सहा महिन्यानंतर मी ही परीक्षा उत्तीर्ण झालो.

हीच वेळ होती, की जेव्हा आत्माराम बापू पाटील आणि माझ्यामध्ये राजकीय अंतर

निर्माण व्हायला सुरुवात झाली होती. त्यामुळे मी स्वतंत्र राहायला गेलो, हेही एका अर्थाने बरे झाले. विचारांचे प्रश्न जेथे येतात, तेथे वैयक्तिक भीड किंवा निकटचे संबंध हे आड येऊ देता कामा नयेत. हे अतिशय रास्त होते आणि या पद्धतीने मी डेक्कन जिमखान्यावर खोली घेऊन राहत असताना सप्टेंबर महिन्यातील एका संध्याकाळी एक अकल्पित आणि सर्वांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. इंग्लंड-फ्रान्स विरुद्ध जर्मनी असे युद्ध सुरू झाल्याचे जाहीर झाले. हे दुसरे महायुद्ध होय.

हिंदुस्थान सरकारने घोषित केले, की तेही या युद्धात सामील आहेत आणि या एका घटनेमुळे जसे पुढे जगाचे चित्र बदलले, तसे हिंदुस्थानच्या राजकारणाचे चित्रही बदलायला सुरुवात झाली. प्रत्येक राजकीय पक्ष आणि पुढारी आपापल्या परीने या युद्धाची मीमांसा करू लागले.

युद्ध जाहीर झाले, त्यावेळी पंडित नेहरू चीनमध्ये प्रवास करीत होते. त्यांच्या परत आगमनानंतर त्यांच्या सल्ल्याने काँग्रेस वर्किंग कमिटीने एक निवेदन प्रसिद्ध केले. या निवेदनामध्ये जागतिक परिस्थितीचा आढावा घेऊन लोकशाही व फॅसिझम यांमध्ये लोकशाहीचा विजय होणे इष्ट असले, तरी गुलामगिरीत राहिलेल्या हिंदुस्थानला या युद्धाशी काही कर्तव्य नाही. लोकशाहीवर निष्ठा असेल, तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचार ब्रिटिश सत्तेने करावा, अशा तऱ्हेचे विचार या निवेदनात मांडले होते आणि माझ्या कल्पनेने मूलत: काँग्रेसची हीच भूमिका अखेरपर्यंत राहिली.

या युद्धात अनेक पक्षांची मोठी पंचाईत झाली. सर्वांत मोठी अडचण रॉयवाद्यांची झाली. रॉय यांनी एक पुस्तिका लिहून या युद्धाच्या स्वरूपाची मीमांसा केली आणि असे प्रतिपादन केले, की ही लढाई साम्राज्यवादी लढाई नाही. युद्ध होण्याची शक्यता होती, ती जर्मनीचा फॅसिझम व रशियाचा कम्युनिझम यांच्यामध्ये.

रॉयसाहेबांचे असे मत होते, की जो फॅसिझम युरोपमध्ये वाढत होता, तो कम्युनिझमचा नाश करण्याकरता भांडवलशाहीचे शस्त्र, म्हणून. पण जर्मनीविरुद्ध इंग्लंड अशी लढाई सुरू झाली आहे. हा इतिहासातील क्वचित घडणारा एक अपघात आहे आणि म्हणून या युद्धात फॅसिझमविरुद्ध लढण्यासाठी ब्रिटिश सत्ता उभी राहिली, तर त्यांच्याशी आपण सहकार्य केले पाहिजेल आहे, हा त्यांच्या विचारांचा मथितार्थ होता.

आमच्या रॉयवादी मित्रांमध्ये याबाबत खूपच चर्चा झाल्या. त्यांमध्ये बराच वैचारिक गोंधळ होता. रॉयसाहेबांनी लिहिले, ते चुकीचे कसे असेल, असे एका गटाचे म्हणणे होते, तर दुसरा गट असा होता, की त्यांचे समर्थन न करता गप्प राहणे हा उत्तम मार्ग; असे मानणारा होता.

युद्धाचा काळ जसजसा वाढत चालला, तसतसे लोक सगळ्या पक्षांची एका अर्थाने परीक्षा करू लागले. शेकडो वर्षे भारतीयांना गुलामगिरीत टाकणा-या इंग्रजांची लढाई ही आमची लढाई नाही, ही सर्वसामान्य माणसांची भावना होती. काँग्रेस पक्षाची आणि नेत्यांची हीच भावना होती. परंतु  त्या बाबतीत राजकीय दृष्ट्या कोणते पाऊल उचलावयाचे, यासंबंधाने एकमताने काही निर्णय होत नव्हता.

युद्धाच्या ऐन सुरुवातीला कम्युनिस्ट पक्ष हा एक पक्ष असा होता, की ज्याने उघड अशी भूमिका घेतली होती, की हे साम्राज्यशाही युद्ध आहे आणि या युद्धप्रयत्नाला विरोध केला पाहिजे आणि या युद्धाविरुद्ध जनतेत मोठी चळवळ उभी केली पाहिजे. ही कम्युनिस्ट पक्षाची १९३९ची भूमिका होती.

पुढे १९४१ साली जर्मनीने रशियावर आक्रमण केल्यानंतर त्यांची ही भूमिका बदलली आणि त्यानंतर ते त्याला लोकशाहीच्या संरक्षणाचे युद्ध असे संबोधू लागले.

१९४१ मध्ये रॉयवादी व कम्युनिस्ट यांच्या मतांत साम्य निर्माण झाले. सर्वसामान्य

उथळ मीमांसा करणा-या लोकांची मोठी अडचण झाली. हे युद्ध ही एक जबरदस्त घटना होती. तिचा अर्थ निदान आमच्या देशातील राजकीय पक्षांना लवकर कळला नाही, ही वस्तुस्थिती होती.

मी अतिशय अस्वस्थ होऊन गेलो होतो. देशाच्या इतिहासातील ही अतिशय महत्त्वाची घटना आहे आणि स्वातंत्र्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असणारी जी माणसे आहेत, त्यांनी काही तरी करायचा काळ हाच आहे, या विचाराने मी अस्वस्थ झालो. आमच्या रॉयवादी मित्रांशी चर्चा करताना मी त्यांना हे स्पष्ट सांगितले. ही अपघाती युद्धाची मीमांसा साफ चूक आहे. रॉयना हिंदुस्थानच्या जनमनाची कल्पना नाही. त्यामुळे ते तसे बोलले आणि त्यांच्या विचारांच्या लोकांना त्यामुळे ते संकटात टाकणार आहेत.

विशेषत:, आत्माराम बापूंशी माझी पुष्कळ चर्चा झाली. त्यांच्या माझ्यामध्ये वाढते अंतर आता कायमच्या अंतराचे स्वरूप घेणार, असे स्पष्ट दिसत आहे. मला वाटत होते, की या महायुद्धाच्या प्रसंगाने जी राजनीती रॉयसाहेब सांगत आहेत, ती चूक आहे, असे निदान आत्माराम बापूंना वाटेल, कारण ते स्वातंत्र्य-संग्रामातल्या वातावरणात आणि परंपरांत वाढले होते. परंतु आत्माराम बापू हे, रॉयवादी विचारांची जी मंडळी होती, त्यांच्या मानसिक वर्चस्वाखाली पुरे गेले होते. त्यामुळे त्यांना सरळ, सोपे, राजकीय सत्य दिसले नाही आणि त्यांनी मला सांगितले, "यशवंतराव, तुमचे आणि आमचे रस्ते आता वेगळे झाले आहेत." हे केव्हा तरी घडणार, हे मला वाटतच होते. त्यामुळे मी त्यांना सांगितले, "तुमच्या राजकीय साहचर्यापासून मी दु:खाने मुक्त होत आहे."

रॉयवादी राजकारणाशी आणि त्यांच्या मित्रांशी माझा संबंध यापुढे कमी कमी होत गेला. हे आमचे युद्ध नव्हे, ही काँग्रेसने घेतलेली भूमिका मूलत: बरोबर होती. त्यानुसार आता जो कार्यक्रम नेते देतील, त्याचा अगदी मनापासून पाठपुरावा

करावयाचा, हा माझा निर्णय झाला. आणि माझ्या पुढचा वैचारिक त्रिकोण मूलत: येथे संपला.

पण हा त्रिकोण संपण्यापूर्वीच्या एका महत्त्वाच्या घटनेची नोंद केली पाहिजे. युद्ध आमचे नव्हे, ते साम्राज्यवाद्यांचे आहे, हे जरी काँग्रेस नेतृत्वाने मान्य केले होते, तरी युद्धविरोधाचा कार्यक्रम ते देत नव्हते. मला आणि माझ्या काही मित्रांना प्रत्यक्ष कृतीची घाई झाली होती. या पार्श्वभूमीवर आपण कम्युनिस्ट पक्षात प्रवेश करावा असा प्रबळ विचार माझ्या मनात एकदा येऊन गेला व त्या दृष्टीने पुणे शहरातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशी माझी चर्चाही झाली. परंतु असले महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी आपल्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी मनमोकळे बोलले पाहिजे. म्हणून मी जिल्ह्यात जाऊन आठ दिवस सर्व मित्रांशी चर्चा करून आलो. मूलभूत गोष्टींचा घाईघाईने विचार करून मी असा एकांगी व चुकीचा निर्णय घेऊ नये, असा त्यांचा स्पष्ट सल्ला मिळाला. एका टोकाला जाण्याचा माझ्या मनाला आलेला विचार मी सोडून दिला.

या सर्व चर्चांनंतर मात्र रात्री मी निवांत झोपू लागलो. काँग्रेस पक्षाने जरी मूलभूत भूमिका घेतली होती आणि ती बरोबर होती, तरीही जनतेसाठी दैनंदिन कार्यक्रम त्यांच्याकडून अजून मिळत नव्हता आणि ते स्वाभाविकही होते. असा कार्यक्रम ठरवायला पुष्कळ तयारी करावी लागते. तेव्हा त्या तयारीच्या कामात नेतृत्व असेल, अशी माझी भावना होती. १९३९ साल या विचारात गेले. परंतु मी मनाने अतिशय अस्वस्थ होतो. तासन् तास कुठे तरी बसून या काळात काय केले पाहिजे आहे, या विचारात मी दिवस काढले.

कित्येक दिवस मी कॉलेजमध्येसुद्धा जात नव्हतो. माझे लक्षच लागत नव्हते. पुन्हा आपले वर्ष वाया जाईल काय, अशी मला धास्ती होती. पण मला त्याची पर्वा नव्हती. आमच्या जिल्ह्यात कम्युनिस्ट श्री. विष्णुपंत चितळे यांनी माझे जे काही मित्र होते, त्यांच्याशी संपर्क वाढविला होता. त्यांना त्यांनी सांगितले, की तुमचा

काँग्रेस पक्ष या संकटकालीन परिस्थितीत काही मार्गदर्शन करणार नाही. यावेळी या देशात फक्त कम्युनिस्ट पक्षच मार्गदर्शन करू शकेल आणि त्यांनी युद्धविरोधी चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सुरू केला. या प्रयत्नात माझे एक-दोन महत्त्वाचे स्नेहीही सामील झाल्याचे चित्र मी पाहिले. आपण काहीच न करता असे बरेच दिवस राहिलो, तर आपला पक्ष जिल्ह्यात राहील, का नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. मी जिल्ह्याच्या प्रमुख कार्यकर्त्यांना जाऊन व्यक्तिश: भेटलो आणि कम्युनिस्ट पक्षाच्या या डावपेचाला फसू नये, असे त्यांना सुचविले. हे महायुद्ध बरीच वर्षे चालणार आहे. तेव्हा या बाबतीत घ्यावयाचे निर्णय तुम्हांला आम्हांला तातडीने घेतलेच पाहिजेत, हे खरे नाही. काँग्रेसच्या नेतृत्वाने मूळ भूमिका रास्त घेतलेली आहे. निश्चित काय करायचे, यासंबंधी त्यांच्यांत कदाचित मतभेद असले, तरी त्यांच्या निर्णयाची वाट तुम्हां-आम्हांला संयम राखून पाहिली पाहिजे.

दुस-या महायुद्धाचे पहिले वर्षही पहिले काही आठवडे सोडले, तर रेंगाळल्यासारखेच चालले होते. लढाई सुरू होताना जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले आणि एक-दोन आठवड्यांतच त्यांना जो पोलंडचा भाग घ्यावयाचा होता, तो घेऊन लढाई तेथेच थांबविली होती. पोलंडचा उरला सुरला भाग रशियाने घेतला असल्यामुळे त्याही बाजूला एका अर्थाने मामला थंड होता.

सामान्य लोकांच्या दृष्टीने लढाई संपली, की चालू आहे, हे समजत नव्हते. ब्रिटन आणि फ्रान्सने लढाई जाहीर केली होती. परंतु प्रत्यक्ष आक्रमक असे पाऊल त्यांना उचलणे शक्य नसल्यामुळे ते स्वस्थ होते. त्यांच्यापुढे एक प्रकारचा पेच होता. आणि त्यामुळे लढाई चालूच नाही, असे लोकांना वाटावे, अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले होते.

मोठ्या युद्धाचे प्रकरण असेच गुंतागुंतीचे असते. ब्रिटिश राज्यसत्तेचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी मात्र येथील जनतेमध्ये आणि वेगवेगळया पक्षांमध्ये फूट पाडून लढाईच्या कामासाठी हिंदुस्थानचे सहकार्य मिळविण्याच्या खटपटीत होते. हिंदुस्थानातील राजे-

रजवाडे व हिंदु महासभा, मुस्लिम लीग यांसारख्या पक्षांनी त्यांच्या युद्धप्रयत्नाला सहकार्य देण्याची मान्यता दर्शविली होती.

सुभाषचंद्र बोस आणि त्यांच्या फॉरवर्ड ब्लॉक यांनी युद्ध-प्रयत्नांना विरोध करण्याचे जाहीर केले होते. यावेळी काँग्रेसमध्ये मूळ भूमिका घेतल्यानंतरही निश्चित काय करावे, यासंबंधी चर्चा चालू होत्या. त्यांनी सप्टेंबर महिन्यात म्हणजे युद्ध सुरू झाल्यावर पंधरा दिवसांच्या आतच वर्किंग कमिटीच्या सभेमध्ये इंग्लंड आणि जर्मनी यांच्यामध्ये लढाई सुरू झाली असली, तरी हिंदुस्थानच्या जनतेला न विचारता आणि विश्वासात न घेता हिंदुस्थानच्या वतीने युद्ध जाहीर केले, याबद्दल त्यांचा निषेध केला. याच बैठकीमध्ये, हे युद्ध सुरू झाले, त्याचा उद्देश काय आहे व त्यातून काय निष्पन्न करण्याचा त्यांचा विचार आहे, आणि विशेषत: जगातील लोकशाही आणि हिंदुस्थानातील लोकशाही यांची वाढ करण्याकरता ते काय करणार आहेत, हे जाणून घेण्यासंबंधी खुलासे मागितले.

अशा ठरावांनी देशामध्ये लोकमत तयार व्हायला मदत होते. याला प्रतिसाद म्हणून लॉर्ड लिनलिथगो यांनी १७ ऑक्टोबर १९३९ रोजी एक निवेदन जाहीर केले व वसाहतीचे स्वराज्य हे हिंदुस्थानच्या बाबतीत आपले अंतिम ध्येय असल्याचे ब्रिटिश सत्तेने जाहीर केले आहे, याची घोषणा केली.

ब्रिटिशांकडून जे प्रयत्न होत होते, त्यांत हिंदुस्थानच्या जनमनाची त्यांना काही जाणीव आहे, असे  दिसून येत नव्हते.

१९३० पासून जवळजवळ पाच-दहा वर्षे देशात चालेलल्या तीव्र आंदोलनानंतर सुद्धा अजून ते वसाहतीच्या स्वराज्याची - आणि तेही पुढे केव्हा तरी - या थाटात विचार करीत होते. परकीय देशावर स्वामित्व प्रस्थापित करणा-या लोकांमध्ये एक प्रकारचा आंधळेपणा असतो, तो असा.

आपल्या स्वत:च्या देशात लोकशाही चालविणा-या इंग्लंडला एवढ्या मोठ्या जगद्व्याप्त युद्धात हिंदुस्थानचे यत्किंचितही सहकार्य घ्यावयाचे असले, तरी त्यांना लोकशाहीचे आणि स्वातंत्र्याचे हक्क देणे हे किती गरजेचे आहे, हे त्यांना पटायला हवे होते. वर्किंग कमिटीची हीच तक्रार होती.

या निवेदनाला प्रत्युत्तर म्हणून सात-आठ दिवसांत म्हणजे २ ऑक्टोबरला वर्किंग कमिटीची बैठक बोलावून सडेतोड उत्तर दिले. त्यात त्यांनी लिनलिथगोने दिलेली वसाहतीच्या स्वराज्याच्या आश्वासनांचा अस्वीकार केल्याचे जाहीर केले आणि त्यांना बजावले, की तुमची धोरणे ही अजूनही जुन्या साम्राज्यवाद्यांची धोरणे आहेत. अशा परिस्थितीत ब्रिटनला मदत न करण्याचे धोरणच आम्हांला स्वीकारणे भाग आहे, असेही स्पष्ट केले. आणि प्रत्यक्ष कृतीचे पहिले पाऊल म्हणून अनेक प्रांतांतील जी काँग्रेसची मंत्रिमंडळे होती, त्यांना राजीनामा देण्याचे आदेश देऊन प्रत्यक्ष कृतीला सुरुवात केली होती.

काँग्रेस राज्य सरकारांनी राजीनामे दिल्यामुळे काँग्रेस पक्ष कृती करू लागला, अशी भावना सर्वत्र निर्माण झाली. हे स्वाभिमानाचे पाऊल टाकल्याबद्दल काँग्रेस पक्षाबद्दल सर्वत्र चांगले बोलले जाऊ लागले. माझ्याही मनात आशा पालवल्या, की आश्वासने आणि त्यांचा अस्वीकार असा हा नुसता खेळ चालणार आणि प्रत्यक्ष कृती काही होणार नाही, अशी जी शंका होती, तिचे निरसन झाले आणि आता कार्यकर्त्यांमध्ये जाऊन आपल्याला त्यांची तयारी करावयास जागा झाली, असे मला वाटले. म्हणून मी ताबडतोब ओळीने आठ-पंधरा दिवस कॉलेज सोडून सातारा, कराड आणि कोल्हापूर या बाजूला माझ्या कार्यकर्त्या मित्रांना भेटण्यासाठी निघून गेलो.

आत्माराम बापूंचे आणि आमचे मतभेद जाहीर झाल्यापासून कार्यकर्ते मोठ्या अडचणीत सापडल्यासारखे झाले होते, त्या सर्व मंडळींना एकत्रित करून पुन्हा संघटनेला काही स्वरूप आणले पाहिजे, हा विचार माझ्या मनात होता. सर्व कार्यकर्ते

जसे त्यांचे मित्र होते, तसे माझेही मित्र होते. त्यामध्ये वैयक्तिक मैत्रीचा काही भाग होता, ही गोष्ट जरी खरी असली, तरी राजकीय पक्ष आणि त्यासंबंधीचे विचार हेच आम्हांला एकत्र ठेवणा-या गोष्टी होत्या. विचारांचे अनुबंध मोकळे झाले, म्हणजे मैत्री ही, नाही म्हटले, तरी पोकळ ठरू लागते. तेव्हा याच वेळी जाऊन, या सर्व मित्रांशी बोलून त्यांना सावरले पाहिजे. कारण त्यांना सावरायचे, म्हणजे मला स्वत:ला सावरण्यासारखे होते.

मी जिल्ह्यातील जवळ जवळ प्रत्येक तालुक्यातील आमचे म्हणून जे कार्यकर्ते होते, त्यांना भेटलो. सर्वांची काँग्रेसनिष्ठा ही प्रमुख भावना होती. त्यामुळे आत्माराम बापूंनी काँग्रेस सोडून रॉयसाहेबांबरोबर जाण्याचा जो निर्णय घेतला, त्याबद्दल एक प्रकारचे असमाधान आणि आश्चर्य वाटत होते. मी त्यांना सर्व परिस्थितीचे विवरण केले.

"मला रॉय यांच्या बुद्धिमत्तेचे व समाजवादी विचारांचे आकर्षण होते; तरी माझे पाय मी जमिनीवर ठेवून होतो, त्यामुळे वाहत गेलो नाही." असे त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले.
युद्धाचे पुढे काय होणार, अशा तऱ्हेचे प्रश्न लोक विचारीत, मी त्यांना सांगत असे, "हे जागतिक युद्ध आहे व ते काही एकदम सर्वत्र गतीने चालते, असे नाही. युद्धाच्या डावांनी सबंध युरोप जाळ्यात सापडला आहे. आपापली तयारी करण्यात ते देश गुंतले आहेत. तेव्हा त्या युद्धाचे काय होईल, त्याचा विचार करण्यापेक्षा युद्ध वाढले, तर आपल्या देशाचे काय होईल, याचा विचार झाला पाहिजे. आणि जेव्हा प्रत्यक्ष कृतीची वेळ येईल, त्यावेळी ती कृती करण्यासाठी आपण मनाने तयारीत असले पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व तऱ्हेने संघटितही असले पाहिजे, याची जरुरी आहे."

लोकांना हे सगळे समजत होते, कळत होते आणि काँग्रेस राज्य मंत्रिमंडळांनी दिलेल्या राजीनाम्यांमुळे हळूहळू यातून काही तरी कार्यक्रम निघणार आहे, अशी त्यांची भावना होती.

मला आठवते, या काळात मी वाळवे तालुक्यातील आमचे दुसरे आमदार श्री. चंद्रोजी पाटील ऊर्फ कारभारी यांना भेटलो. ते स्वत: युद्धाच्या बाबतीत सुभाषचंद्र बोसांच्या भूमिकेशी एकमत होते. त्यांचा माझा चांगला स्नेह होता. आणि त्यामुळे एकमेकांशी राजकारणावर फार मनमोकळेपणाने चर्चा करू शकत होतो. माझ्यापुढे आता कसलेच वैचारिक संदेह राहिले नसल्यामुळे मी त्यांना निश्चितपणाने सांगत होतो, की काँग्रेसला निश्चित कार्यक्रम घ्यावा लागेल. परंतु तोपर्यंत आपल्यामध्ये अंतर्गत मतभेद होऊ देता कामा नयेत, याची आपण काळजी घेतली पाहिजे. त्याच वेळी मी त्यांना हेही सुचविले, की आपण नवे कार्यकर्ते मिळविले पाहिजेत. कॉलेजमध्ये जाणा-या नवीन तरुण मंडळींशी संपर्क साधला पाहिजे. त्यांना ही गोष्ट मान्य होती. आणि त्यांना सांगितले, की आपल्या जिल्ह्याच्या दृष्टीने काही प्रयत्न करावयाचे असले, तर मी तुम्हांला होतकरू मंडळींची माहिती करून द्यायला तयार आहे. कारण, नाही म्हटले; तरी आत्माराम बापूंच्या बरोबर जी थोडी-फार मंडळी काँग्रेस सोडून गेली होती, तेथे त्यांच्या जागी नव्या, जाणत्या, तरुण कार्यकर्त्यांची आम्हांला आवश्यकता होती. गेली होती ती मंडळी संख्येने किंवा गुणांनी जास्त होती, अशी परिस्थिती नव्हती. पण फूट पडली आहे आणि आमची आघाडी काहीशी कमजोर झाली आहे, अशी भावना जिल्ह्यात निर्माण झाली होती. त्यामुळे नवे कार्यकर्ते मिळविले पाहिजेत, अशी माझ्या मनाची धारणा होती.

याच माझ्या भेटीत मी चंद्रोजी पाटील यांच्या सांगण्यावरून कोल्हापूरला गेलो आणि तेथे कॉलेजमध्ये शिकणा-या जिल्ह्यातील काही तरुणांना भेटून त्यांच्या ओळखीपाळखी करून घेतल्या. या नव्या ओळखींमध्ये झालेली एक ओळख अतिशय महत्त्वाची अशी मला वाटली. ती म्हणजे चंद्रोजी पाटील यांच्याच गावचे, कामेरीचे, श्री. के. डी. उर्फ केशवराव पाटील यांची ओळख ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची होती.

पुढे जवळ जवळ सात-आठ वर्षे त्यांचा माझा अतिशय गाढ स्नेह होता आणि राजकारणात त्यांनी माझ्याशी खूप सहकार्य केले.

केशवराव माझ्यासारखे लॉ कॉलेजचे विद्यार्थी होते. एका मध्यम स्थितीतील शेतक-याचे एकुलते एक चिरंजीव होते. वर्णाने किंचित सावळे, पण नीटनेटका चेहरा, उत्तम बांधीव शरीर, कुरळ्या केसांचा पाडलेला सुरेखसा भांग, उत्तम कपडे वापरण्याचा शौक यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व मोठे परिणामकारक होते. त्यांची माझी ओळख नुसती ओळख न राहता तिचे मैत्रीत रूपांतर झाले. त्यांच्या आग्रहावरून मी चार दिवस कोल्हापूरला राहिलो. त्यांनाही राजकारणात रस होता. चंद्रोजी पाटलांची आणि माझी मैत्री आहे, हे त्यांना माहीत होते. त्यामुळे एक प्रकारची आपुलकी निर्माण झाली होती. तासन् तास आम्ही राजकारणासंबंधाने बोलत राहिलो. माझी त्यावेळची विचारसरणी काय आहे, त्याची त्यांना ओळख करून दिली आणि आपण नवी शक्ती मिळविली, या भावनेने मी पुण्याला परतलो.

पण यापूर्वी दुस-या एका महत्त्वाच्या चर्चेचा मला येथे उल्लेख करायला पाहिजे. या काळात आमच्या जिल्ह्यात एक विद्वान, तरुण वकील, तासगावचे श्री. विठ्ठलराव पागे यांच्याशी या काळात माझे झालेले बोलणे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. विठ्ठलराव पागे यांचा आणि आमचा जवळजवळ सर्व जन्माचा सहकार्याचा योग आहे. आजही त्यांची माझी मैत्री आहेच, पण त्या वेळी त्यांच्या-माझ्यांत झालेल्या चर्चेचा मला फार उपयोग झाला, म्हणून त्याची मी नोंद करत आहे.

श्री. पागे हे पहिल्यापासून स्वातंत्र्य-सैनिक होते. ते अतिशय व्यासंगी होते. त्यांचे वक्तृत्व पहिल्या प्रतीचे असल्यामुळे मी त्यांना काहीसा दुरूनच पाहत होतो. त्यांच्या-माझ्यामध्ये तो वेळपर्यंत फारशी जवळीक नव्हती. पण युद्धाच्या परिस्थितीतून निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीसंबंधाने मी त्यांच्याशी बोललो, तेव्हा त्यांनी जे विश्लेषण केले, ते मूलत: माझ्या विचाराशी जुळणारे होते. ते प्रथमपासून एक निष्ठावान गांधीवादी होते. समाजवादाचा तात्त्विक विचार पुढे त्यांनी स्वीकारला, पण तो पुस्तकी पद्धतीने नव्हे.

गरिबांना रोजगार देण्याच्या बाबतीत त्यांनी आपल्या पुढील आयुष्यात फार मोठे कार्य केले आहे. त्या काळात विठ्ठलरावांना माझ्यासारखे वैचारिक त्रिकोण-चौकोन असल्या उद्योगातून जावे न लागल्यामुळे त्यांचे मन साफ होते. त्यांनी त्या वेळी मला एक अचूक अंदाज सांगितला. त्यांनी सांगितले, "महात्मा गांधी हे अतिशय हुशार सेनापती आहेत. ते काळ आणि साधने यांची योग्य वेळी निवड करतील आणि आपल्या पाठीमागे यायचा आदेश देतील. तोपर्यंत धीर न सोडता विश्वासाने वागले पाहिजे."

श्री. पागे यांचे हे शब्द मला त्या वेळी अर्थपूर्ण वाटले, त्यामुळे लक्षात राहिले. आणि आजही ते इतिहासाने खरे ठरविले आहेत.

मी या सर्व प्रवासाचा आणि चर्चेचा उल्लेख अशासाठी केला, की माझ्या आयुष्यातला हा एक मोठा संक्रमण-काळ होता. कारण काही तरी घडावे, अशी मनाची तीव्रतम अपेक्षा आणि प्रत्यक्षात काही घडत नाही, अशी वस्तुस्थिती, या अडचणीत मी सापडलो होतो. त्यामुळे, नाही म्हटले, तरी मनाची कुचंबणा होत होती. ही कुचंबणा नाहीशी व्हायला या चर्चेने मदत केली.

काँग्रेसच्या कार्यक्रमाची वाट पाहत असे बरेच दिवस गेले. पुढे मार्च १९४० मध्ये रामगडमध्ये काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन झाले. या काँग्रेसमधून काही निघेल, अशी अपेक्षा होती. ती खरी ठरली नाही. जरूर पडली, तर प्रत्यक्ष आंदोलन सुरू करण्याचा विचार या काँग्रेसने बोलून दाखविला. परंतु निश्चित कार्यक्रमाची रूपरेखा मात्र दिली नाही.

फॉरवर्ड ब्लॉकने या संधीचा फायदा घेऊन एप्रिल महिन्यामध्ये राष्ट्रीय सप्ताहात आपल्या कार्यकर्त्यांना युद्धविरोधी कार्यक्रम दिला. आमच्या जिल्ह्यातले कार्यकर्ते अस्वस्थ तर झालेच होते, कारण अशा परिस्थितीत कार्यक्रम नसला, तर

कार्यकर्त्यांची मोठी अडचण होते. इतर पक्ष-विशेषत: कम्युनिस्ट आणि फॉरवर्ड ब्लॉक यांनी कार्यक्रम दिल्यानंतर अत्यंत क्रियाशील असलेले असे जे कार्यकर्ते होते, त्यांना मोठे गोंधळल्यासारखे झाले.

अशा परिस्थितीमध्ये आमच्या तालुक्यामध्ये, विशेषत: काले आणि इंदोली या भागांतल्या कार्यकर्त्यांमध्ये ब्रिटिश सरकारविरोधी काहीतरी कृती करण्याची घाई झाली होती. काले येथे हळू हळू कम्युनिस्ट गट तयार होत होता. मला त्याची काही फारशी चिंता वाटली नाही. परंतु आम्हां काँग्रेस कार्यकर्त्यांचे केन्द्र असलेल्या इंदोली येथेही कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली काही करण्याचा प्रयत्न सुरू झाला, तेव्हा स्वाभाविकच आम्ही काळजी करू लागलो.

इंदोलीचे आमचे प्रमुख कार्यकर्ते मित्र श्री. दिनकरराव निकम यांना भेटण्यासाठी मी मुद्दाम त्यांच्या गावी गेलो आणि बराच वेळ त्यांच्याशी चर्चा केली. एक रात्र तेथे राहिलो. श्री. निकमांचे मी पूर्ण समाधान करू शकलो नाही, पण तातडीने त्यांनी काही न करण्याचे कबूल केले. काँग्रेस पक्षामध्ये अशा तऱ्हेने फुटीरता आली, म्हणजे ऐन मोक्याच्या वेळी जेव्हा काही महत्त्वाची कृती करावी लागणार आहे, त्यावेळी आपण शक्तिहीन असू, याच एका मुद्दयावर मी विशेष जोर देत होतो.

दिनकरराव निकम यांना हा मुद्दा पटत होता. पण कार्यकर्ते निश्चित बसू देत नव्हते. ही त्यांची अडचण होती. आम्ही काही तडजोड काढली आणि त्यांच्या एक-दोन कार्यकर्त्यांनी जेलमध्ये जावे आणि आपली क्रियाशीलता जागी ठेवावी, असे ठरले. कार्यकर्त्यांमध्येही किती अस्वस्थता होती, याचे नमुना म्हणून मी हे उदाहरण सांगितले आहे.

या पद्धतीने १९४० सालचे पहिले चार महिने गेले असतील, नसतील, तोच महायुद्धाला युरोपात विलक्षण गती आली. ही पोकळ लढाई आहे, असे म्हणणा-या

लोकांना धक्का बसावा, अशी या लढाईत जर्मनीच्या बाजूने प्रगती सुरू झाली. मी या दिवसांत सुट्टीच्या निमित्ताने कराडला गेलो होतो.

जर्मनीने शेवटी जेव्हा फ्रान्सवर अतिक्रमण केले, तेव्हा लोक डोळ्यात तेल घालून लढाईची प्रगती पाहत होते. विशेषत:, ज्यांनी फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास वाचून फ्रान्सबद्दल आणि पॅरिसबद्दल काही ध्येयवादी जिव्हाळा बाळगला होता, त्या मंडळींना आता फ्रान्सचे काय होणार, अशी चिंता वाटू लागली.

मला हे कबूल केले पाहिजे, की फ्रान्सवर जेव्हा जर्मनीचे अतिक्रमण सुरू झाले, तेव्हा आपल्याच देशाच्या सरहद्दीवर जर्मन घुसले आहेत, अशा तऱ्हेच्या चिंतेचा मला स्पर्श होऊन गेला. इतिहासाच्या वाचनाने निर्माण झालेले जिव्हाळ्याचे संबंध किती मनस्वी असतात, याचा मला अनुभव आला. पूर्वेकडे फ्रान्सने अजिंक्य अशी 'मॅझिनो लाईन' नावाची संरक्षणाची भिंत उभी केली होती, असे वृत्तपत्रांत आणि पुस्तकांत आम्ही वाचत होतो. ती भिंत अभेद्य आहे, अशा तऱ्हेची रसभरित वर्णने आम्ही वाचली होती. त्यामुळे काही आश्वासन वाटत होते.

हिटलरच्या सैन्याची तयारीच अशी विलक्षण होती, की त्याने या 'मॅझिनो लाईन'च्या या संरक्षण-तटाला खिंडार पाडून फ्रान्समध्ये प्रवेश केले आणि वृत्तपत्रांत एके दिवशी बातमी आली, की पॅरिस पडले आणि फ्रान्स जर्मनीने जिंकले ! मी फार कष्टी झालो. काही स्थाने, काही घटना, काही माणसे यांच्याशी असे काही बौद्धिक व भावनात्मक ऋणानुबंध निर्माण झालेले असतात, की ते देशप्रेमाइतकेच किंवा रक्ताच्या नात्यासारखेच अतूट बनतात. माझ्यासारख्याच जगभर लोकशाहीवादी असणा-या अनेक मंडळींना मनस्वी दु:ख झाले असले पाहिजे आणि मला वाटते, हिंदुस्थानातही अनेक लोकांची अशीच भावना झाली असली पाहिजे.

या युद्धाला आमची सहानुभूती नव्हती, हे जरी खरे असले, तरी फ्रान्सच्या पराजयामुळे युरोपमधील राजकीय पारडे एकदम उलट झाले. युद्धाने अशी गती

घेतल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून हिंदुस्थानच्या राजकारणात - विशेषत: काँग्रेस पक्षामध्ये आणि त्यातल्या त्यात नेतृत्वामध्ये मोठ्या वेगाने वैचारिक मंथन सुरू झाले.

युरोपमध्ये घडत असलेल्या घटनांनी जागतिक लोकशाही संकटात आहे, असा एक विचार काँग्रेसमध्ये बळावू लागला. योग्य संधी व सन्मान ठेवून स्वातंत्र्याची हमी मिळत असेल, तर युद्धामध्ये सहकार्य द्यावे, अशा तऱ्हेचा विचार वर्किंग कमिटीमध्ये मांडला गेला आणि त्यामुळे महात्मा गांधी आणि वर्किंग कमिटी यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. महात्मा गांधी यावेळी या क्षणाला, युद्ध हे त्यांच्या शांततावादाच्या तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध असल्याने त्यात भाग घेणे इष्ट नाही, या भूमिकेवर अडून राहिले होते; आणि या मतभेदाला जाहीरपणे काहीशी वाच्यताही मिळाली.

काँग्रेस वर्किंग कमिटीची १० ते २० जून या काळात वर्धा येथे सभा झाली आणि तीन महत्त्वाच्या अटींवर युद्धास सहकार देऊ केला आणि काँग्रेसच्या इतिहासात क्वचित घडणारी गोष्ट घडली आणि ती म्हणजे गांधीजी आणि वर्किंग कमिटी यांच्यामधले मतभेद जाहीर झाले. या वर्किंग कमिटीच्या सभेनंतर देशभर अधिक चर्चा झाल्या.

काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्रतम खळबळ माजली. गांधीजींबद्दल विवेकपूर्ण निष्ठा असूनसुद्धा ज्या कारणासाठी युद्धापासून बाजूला राहावे, असे ते म्हणत असत, त्याच्याशी माझेही मन सहमत होत नव्हते. परंतु वर्किंग कमिटीची भोळी आशा कशी पुरी होणार, याचीही माझ्या मनात शंका होती.

वर्किंग कमिटीची पुन्हा दिल्ली येथे ३ ते ७ जुलै या दिवशी बैठक झाली आणि त्या बैठकीमध्ये राष्ट्रीय सरकार बनविण्याची मागणी हिंदुस्थान सरकारला केली. अशा

तऱ्हेचे राष्ट्रीय सरकार बनले, तरी संपूर्ण अधिकार असलेले हे सरकार लढाईच्या कामामध्ये सहकार्य करील, असा त्याचा अर्थ होता.

राजकीय प्रश्न काही निश्चित रूप घेत होते. त्यामुळे विचारांना खाद्य मिळत होते. यातून काही निश्चित दिशा मिळेल, अशीही अपेक्षा होती. या ठरावासंबंधाने देशात जी उलटसुलट चर्चा चालू होती, आणि विशेषत: काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जे दुमत झाले होते, त्या दृष्टीने ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक पुण्याला बोलाविण्यात आली. तिला फार महत्त्व आले. बैठक पुणे येथे २७-२८ जुलै रोजी झाली. या बैठकीला एक महत्त्वाचा कार्यकर्ता म्हणून मला निमंत्रण होते.

निव्वळ सभासदांसाठी व निमंत्रितांसाठी घेतलेली अशी ही बैठक होती. या बैठकीमध्ये उलटसुलट दोन्ही बाजू फार परिणामकारकरीत्या मांडल्या गेल्या. जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, राजाजी आणि विशेष करून सरदार वल्लभभाई पटेल ही सर्व मंडळी या राष्ट्रीय सरकारच्या ठरावाच्या बाजूला होती.

काँग्रेसमधील हे चित्र काहीसे अनोखे असे वाटले. पण त्यामुळे मनाला आश्वासनही मिळत होते, की देशातले हे नेते राष्ट्रीय संकटाच्या काळात एकमेकांतील लहानमोठे मतभेद विसरून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत होते. चांगली गोष्ट होती. परंतु त्याचबरोबर गांधीजी त्यांच्याबरोबर नाहीत, त्यामुळे टाकलेले हे डावपेच व्यर्थ जाणारे आहेत, हीही भावना मनापासून दूर जात नव्हती.

ठरावाच्या चर्चेमध्ये ही गोष्ट अनेकांनी बोलून दाखविली. वर्किंग कमिटीच्या वतीने हा ठराव राजाजी यांनी मांडला. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण हे त्यांच्या वक्तृत्वाचा आणि वादविवाद-कौशल्याचा एक उत्कृष्ट नमुना होता. या प्रकारच्या राजकीय चर्चांमध्ये मी अशा गुणवत्तेची अनेक भाषणे ऐकली आहेत. पण त्या दिवशीचे राजाजींचे भाषण हे मी ऐकलेल्या उत्कृष्ट भाषणांपैकी एक असे होते. या भाषणामध्ये संकटकाळात मार्गदर्शन करणारी दूरदृष्टी होती, तशीच तळमळ होती,

तर्कसंगत बुद्धिचापल्य होते, उपरोध होता, विनोद होता - सर्व काही होते आणि असे उत्कृष्ट भाषण केल्यानंतर तो ठराव पास होईल, यात मलाच काय, पण कोणालाही काही शंका वाटली नाही. मतदान झाले. ठराव मंजूर झाला. सगळे कार्यकर्ते आणि पुढारी आपापल्या ठिकाणी निघून गेले.

तर्कदृष्ट्या आताच्या जागतिक आणि हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीमध्ये अशा प्रकारचे सरकार बनावे, ही गोष्ट योग्य दिसत होती. पण वास्तवत:, हे सरकार बनेल, असे काही सांगता येत नव्हते. चांगली भाषणे आणि भरघोस मतदान यांच्या पाठिंब्यावर मागितलेल्या या मागणीच्या यशस्वितेबद्दल मात्र सगळ्यांच्या मनात द्विधा होती. देश पुढच्या घटनेकडे डोळे लावून बसला होता. विशेषत:, ब्रिटिश सत्ता राष्ट्रीय सरकारच्या या मागणीसंबंधाने काय धोरण घेते, याकडे सर्व विचार करणा-या माणसांचे लक्ष लागून राहिले होते. गांधीजींशी मतभेदाचा धोका पत्करूनही वर्किंग कमिटीने हे महत्त्वाचे पाऊल टाकले होते. कारण त्यांना प्रामाणिकपणाने असे वाटत होते, की जागतिक लोकशाही अशा संकटात आहे, की या वेळी राष्ट्रीय सरकार बनवून जर हिंदुस्थानला स्वातंत्र्याची हमी मिळणार असेल, तर जर्मनीचा पराभव करायला हातभार लावला पाहिजे.

पण या मतप्रवाहाची निराशा होणार होती, हे उघड होते. कारण ऑगस्ट महिन्याच्या मध्याला राष्ट्रीय सरकारच्या मागणीला उत्तर म्हणून लॉर्ड लिनलिथगोंनी 'ऑगस्ट ऑफर' म्हणून जी प्रसिद्ध आहे, ती जाहीर केली. ती मध्ये त्यांनी एका अर्थाने राष्ट्रीय सरकारच्या मागणीची चेष्टाच केली होती, असे म्हटले, तरी चालेल. व्हॉईसरायच्या कार्यकारी मंडळाची पुनर्रचना करण्याचे तीमध्ये आश्वासन होते; परंतु स्वातंत्र्याच्या हमीबाबत आणि राष्ट्रीय सरकार बनविण्याबाबत स्पष्ट नकार होता.

काँग्रेसने घेतलेल्या तडजोडीचा आणि व्यवहार्य भूमिकेचा असा निकाल लागला होता. कम्युनिस्ट आणि फॉरवर्ड ब्लॉकची कार्यकर्ती मंडळी काँग्रेसच्या नेतृत्वावर सपाटून

टीका करू लागली आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना या टीकेला उत्तर देणे अवघड जाऊ लागले.

पण यातून एक चांगली गोष्ट निर्माण झाली आणि ती म्हणजे वर्किंग कमिटी आणि गांधीजी यांच्यामध्ये जे मतभेद निर्माण झाले होते, ते या 'ऑगस्ट ऑफर' मुळे संपले. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाकडे पुन्हा वर्किंग कमिटीचे नेते आणि हिंदुस्थानची जनता अपेक्षेने पाहू लागली. रामगड काँग्रेसच्या ठरावानुसार महात्मा गांधींनी असहकार चळवळीचे पुन्हा नेतृत्व करावे, अशी वर्किंग कमिटीने इच्छा व्यक्त केली आणि त्याप्रमाणे महात्मा गांधीजींकडून काय कार्यक्रम मिळतो, याकडे लोकांचे लक्ष लागले.

या काळात महात्मा गांधीजींची मन:स्थिती अशी होती, की यावेळी चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू करण्यामध्ये त्यांना अहित दिसत होते. त्यामुळे अशी चळवळ सुरू करावयास ते उत्सुक नव्हते. त्यांना दिलेल्या अधिकाराप्रमाणे मार्ग काढण्यासाठी त्यांनी त्यांच्या नेहमीच्या तंत्राप्रमाणे स्वातंत्र्याची हमी वगैरे मोठे प्रश्न बाजूला ठेवले आणि प्रतीकात्मक अशी एक महत्त्वाची गोष्ट स्वीकारली आणि ती म्हणजे 'भाषण-स्वातंत्र्याचा हक्क'. त्यासंबंधाने निश्चित काही करण्यापूर्वी त्यांनी लिनलिथगोंची भेट मागितली आणि त्याप्रमाणे १९४० सालच्या सप्टेंबरमध्ये महात्मा गांधी लिनलिथगोंना भेटले व त्यांनी ही भाषण-स्वातंत्र्याची मागणी तत्त्व म्हणून स्वीकारण्याचा त्यांना आग्रह केला.

अर्थात या भाषण-स्वातंत्र्याचा उपयोग स्वातंत्र्य मिळेतोपर्यंत युद्धाला विरोध हीच खरी भूमिका असल्यामुळे लिनलिथगोंनी ती स्वीकारली नाही. महात्मा गांधींच्याही पुढेही एका अर्थाने पेच होता. जनसंग्राम न करण्याचा त्यांचा विचार पक्का होता. म्हणून ऑक्टोबर महिन्यामध्ये त्यांनी सत्याग्रहाची एक नवी कल्पना अमलात आणावयाचे ठरवले. त्यांच्या परंपरेतल्या एका अत्यंत उत्कृष्ट माणसाची निवड

करून त्याने सर्व देशातर्फे सत्याग्रह करावा, असे त्यांनी ठरविले आणि या दृष्टीने हा प्रतीकात्मक सत्याग्रह करण्याचे काम श्री. विनोबा भावे यांच्यावर सोपविले.

श्री. विनोबा भावे तोपर्यंत त्यांच्या आश्रमात त्यांचे अंतेवासी म्हणून काम करत होते. आदर्श गांधीवादी आणि अद्‌वितीय व्यासंगी व ज्ञानी असा त्यांचा आश्रमात लौकिक होता. त्यांच्या वैयक्तिक श्रेष्ठतेबद्दल सर्वांनाच मान होता. काँग्रेसच्या इतर सर्व स्वराज्याच्या चळवळींत गांधीजींप्रमाणे त्यांनीही भाग घेतला होता. परंतु यावेळी सबंध देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा अपूर्व सन्मान त्यांच्याकडे चालून आला. ते इतके थोर कार्य जरी करीत होते, तरी त्या मानाने ते कमी प्रसिद्ध होते.

विनोबांच्या निवडीने सबंध जगाचे लक्ष त्यांच्याकडे गेले. सत्याग्रही युद्धाच्या तंत्राप्रमाणे गांधीजींनी टाकलेला हा अतिशय महत्त्वाचा पवित्रा होता. नैतिक दृष्ट्या ब्रिटिश सत्तेची भूमिका किती कमजोर आहे, हे त्यांनी पुन्हा एकदा जगापुढे मांडण्याचा प्रयत्न केला.

विनोबांच्या सत्याग्रहानंतर काही दिवसांनी प्रातिनिधिक स्वरूपाने सत्याग्रह करण्याची इतर कार्यकर्त्यांनाही गांधीजींनी मुभा दिली. व्यक्तिश: त्यांना जेलमध्ये जाण्याची घाई नव्हती. त्यामुळे वैयक्तिक सत्याग्रह करणाऱ्यांची यादी निवडीचे काम त्यांनी स्वत:कडे घेतले आणि सर्व देशभर वेगवेगळ्या प्रांतांतील व जिल्ह्यांतील अनेक माणसे सत्याग्रह करून तुरुंगात जाऊ लागली.

जनतेमध्ये यासंबंधाने फारसा उत्साह दिसत नव्हता. परंतु काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये कृतिशून्यता संपली, याचे समाधान होते. आमच्या सातारा जिल्ह्यातून अनेक प्रमुख लोक या वैयक्तिक सत्याग्रहात गेले. श्री. विठ्ठलराव पागे, स्वामी रामानंद भारती, भाऊसाहेब सोमण, श्री. वसंतदादा पाटील, सिंहासने व व्यंकटराव पवार अशी अनेक मंडळी या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये सामील झाली.

श्री. व्यंकटराव पवार हे आमच्या जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते जेलमध्ये गेल्यानंतर सर्व प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांनी जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी मी स्वीकारावी, असा मला आदेश दिला.

या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये कोणी सत्याग्रह करावा, याची निवड खुद्द गांधीजी करीत असत. आमच्या प्रांतातर्फे प्रमुख म्हणून श्री. बुवासाहेब गोसावी हे काम पाहत असत. बुवासाहेब गोसावी हे वर्ध्यास जाऊन गांधीजींकडून नावे स्वीकृत करून घेत असत आणि अशी मंडळी नंतर जाहीर सभेमध्ये घोषणा करून जेलमध्ये जात असत. सर्व महाराष्ट्रभर असे शेकडो कार्यकर्ते निवडून सत्याग्रही बनले. बुवासाहेब गोसावींनी मला एकदा विचारले, "या वैयक्तिक सत्याग्रहात जाण्याची तुमची इच्छा आहे काय?" मी सांगितले, "मी जरूर जाईन. तुम्ही कोणी तसा आदेश देत असाल, तर माझी सर्व तयारी आहे. पण निव्वळ प्रतीकात्मक अशा चळवळीमध्ये माझे काही मन नाही."

त्यांनी सांगितले, "अशा परिस्थितीत मी तुमचे नाव सुचविणे योग्य नाही. तुम्ही आपले जिल्हा काँग्रेसच सांभाळा."

माझा मुक्काम त्यावेळी कायद्याच्या अभ्यासाकरता पुण्याला होता. त्यामुळे जिल्ह्यातून अटक होऊन येणा-या सत्याग्रहींचे पुणे स्टेशनवर स्वागत करावे, त्यांना सुताचे हार घालून त्यांचा सन्मान करावा आणि त्यांची मानाने जेलमध्ये रवानगी करावी, अशा तऱ्हेचे औपचारिक स्वरूपाचे  काम मी करीत होतो. माझे हे कायद्याच्या परीक्षेचे दुसरे वर्ष होते. त्यातील पहिले सहा महिने माझे अभ्यासाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले होते. त्यातील पहिले काही दिवस प्रवास, चर्चा, अस्वस्थ मन, यामुळे अभ्यास न करण्यात वेळ गेला होता. त्यावेळी मी लॉ कॉलेजच्या समोर असलेल्या 'अध्यात्म भवन' या नावाच्या इमारतीत राहत होतो. माझे मित्र श्री. नानासाहेब अयाचित, मी आणि त्यांचे एक तरुण नातेवाईक अशा तिघांच्या

भागीदारीत एक मोठी खोली आम्ही भाड्याने घेतली होती. माझ्याकडे येणा-या-जाणा-या लोकांची वर्दळ जास्त, त्यामुळे नानासाहेबांच्या अभ्यासात व्यत्यय येत असे; पण ते इतके सज्जन मित्र होते, की त्यांनी यासंबंधी कधी तक्रार केली नाही. श्री. अयाचित यांचे जे नातेवाईक कायद्याचे विद्यार्थी होते, त्यांना आणि मला वाद घालण्याची मोठी हौस होती. सदर तरुणाचे मन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे झुकलेले होते आणि मी पक्का संघविरोधी होतो. जरी आर्. एस्. एस्. वाले वाटले, तरी ते मोठे सज्जन तरुण होते. देशात चाललेल्या प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची आर्. एस्.ए स्. वाल्यांची एक वेगळी नजर होती, हे त्यावेळी माझ्या विशेष लक्षात आले.

त्यांचे आमचे हे असे पक्षभेद असले, तरी आम्ही 'अध्यात्म भवनात' काही महिने सलोख्याने राहिलो, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. माझ्याकडे तेथे नेहमी येणारे माझे मित्र श्री. बिडेश कुलकर्णी हे तर, तेथे आले, म्हणजे या तरुण गृहस्थाला उद्देशून हाक मारणार,
"काय, खाकसार, चर्चा करायची काय?"

- आणि मग या दोघांमध्ये तुडुंब चर्चा होई. बिडेश कुलकर्णींचा आर्. एस्. एस्. वाल्यांकरता निवडून काढलेला शब्द 'खाकसार' हा अतिशय उचित शब्द होता. त्या वेळी हैदराबादमध्ये खाकसारांची चळवळ अशीच एकांगी तऱ्हेने वाढत होती, असे आम्ही वाचत होतो. त्यामुळे 'खाकसार' शब्दाची टोपी आमच्या संघवाल्यांना छान बसत होती.

आर्. एस्. एस्. च्या विचारासंबंधी आणि चळवळीसंबंधीची माहिती यापूर्वी मला जरूर झाली होती. मला आठवते, मी कोल्हापूरला कॉलेजला असताना एका सुट्टीत कराडला आलो होतो. त्यावेळी संघ-संस्थापक डॉक्टर हेडगेवार यांची कराडला भेट चालू होती. १९३४-३५ सालचे ते दिवस असतील. कसे काय, कोण जाणे, घाटावरच्या रामाच्या मंदिरात त्यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वेळी मलाही बोलावले होते आणि मी

गेलोही होतो. डॉक्टर हेडगेवारांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी वाटले. परंतु त्यांनी सांगितलेल्या विचारांचा माझ्या मनावर काही परिणाम झाला नाही. मी त्यांना काँग्रेसच्या दृष्टिकोनातून काही प्रश्न विचारले. त्यांनी त्यांच्या पद्धतीने त्याला उत्तरे दिली. ते आग्रहाने सांगत होते, की 'आमची हिंदुस्थानची व्याख्या मानणारे सगळे आमच्यांत सामील होऊ शकतील आणि - आसिंधू सिंधू....' वगैरे, ही बॅरिस्टर सावरकरांची व्याख्या पायाभूत धरून ते बोलत होते. 'या व्याख्येत जो जो बसेल, तो तो हिंदुस्थानचा खरा निष्ठावान नागरिक, अशी आमची भूमिका आहे,' असे त्यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते.

मी त्यांना एक प्रश्न विचारला, "या व्याख्येत बसत नाहीत, अशी कोट्यवधी माणसे जर या देशात असतील, तर त्यांचे काय करायचे?"
हेडगवारांनी सांगितले, की तो प्रश्न जेव्हा उभा राहील, तेव्हा पाहता येईल. माझी खात्री झाली, की ही चर्चा व्यर्थ आहे. मी समजलो, की यांना फक्त एका विशिष्ट वर्गाच्या लोकांची फॅसिस्ट संघटना बनवायची आहे. आपल्याला यात काही कर्तव्य नाही. तेव्हापासून आर्. एस्. एस्. म्हटले, की चार पावले दूर राहिलो आहे. माझ्या संपर्कात येणा-या कार्यकर्त्यांना आणि मित्रांना मी त्या विचारापासून बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

'अध्यात्म भवनाची' वरील आठवण लिहीत असताना, सहज ओघात आले, म्हणून डॉक्टर हेडगेवार यांच्याशी आलेल्या या अनपेक्षित संपर्काची स्मृती ताजी होऊन मनाशी आलेली एक घडलेली हकीकत म्हणून ती नोंदणे माझे कर्तव्य आहे.

'अध्यात्म भवन' मधील हे सोबती थोडे दिवस तेथे राहिले आणि नंतर ते गेले. माझ्या चाललेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या कामात त्यांची सहानुभूती होती, असे मला दिसले.

"या खाकसाराबरोबर तुम्ही येथे राहता कसे?" असे मला एकदा बिडेश कुलकर्णी यांनी विचारले.
तेव्हा मी त्यांना म्हटले,
"ते चांगले गृहस्थ आहेत. त्यांच्या मताचा माझ्या येथे राहण्यामध्ये किंवा अभ्यासामध्ये व्यत्यय येत नाही आणि ते नानासाहेब अयाचित यांचे जवळचे नातेवाईक आहेत, त्यामुळे आमचे जमून जाते."

थोड्याच दिवसांचा हा अर्थपूण सहवास म्हणून माझ्या लक्षात राहिला आहे.

१९४० चे वर्ष संपत आले आणि मग मात्र मी अगदी खोली बदलून कायद्याच्या दुस-या वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. माझ्या आईचे मला सारखे निरोप येत होते. 'आता तुझी परीक्षा होईपर्यंत कृपा करून निदान तुरुंगात जाऊ नकोस. परीक्षा झाल्यावर तुला काय करावयाचे, ते तू जरूर कर.' यावेळी आईचे मानण्याचे मी ठरविले आणि बाकीची इतर सर्व कामे सोडून देऊन तीन महिने मी माझी परीक्षेची तयारी करण्यात गुंतलो. अभ्यास करू लागल्यानंतर विषयामध्ये रस निर्माण होतो आणि मग त्यातील सौंदर्यस्थळे लक्षात यायला लागतात. मी 'एव्हिडन्स ॲक्ट'चा पुरावा कायद्याचा अभ्यास करीत असताना मला त्या कायद्याची रचना ज्या पद्धतीने केली आहे, त्याबद्दल विशेष आकर्षण निर्माण झाले. शेवटी कायद्याच्या कक्षेत पुरावा या गोष्टीला फार महत्त्व आहे. पुराव्याच्या अभावी काहीही घडले, तरी ते सिद्ध करता येत नाही. तेव्हा पुरावा या संकल्पनेचे जे विश्लेषण वेगवेगळ्या व्याख्यांद्वारे या कायद्यामध्ये केले आहे, त्या गोष्टी पाहून मला अचंबा वाटे.

या तीन महिन्यांत मी कायद्याच्या अभ्यासात रमून गेलो. एप्रिलमध्ये परीक्षा झाली आणि मी पुणे सोडून कराडला परत आलो. माझ्यावर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी होती. त्या निमित्ताने मी जिल्ह्यांत वारंवार हिंडत होतो.

परीक्षेचा निकाल लागणार होता. त्यामुळे पाठीमागे काही निकडीचे घरचे काम नव्हते.

त्या सुमारास मला कराडमध्ये एक मजेदार अनुभव आला. आमच्या कराडमधील खादीभंडार चालविणारे श्री. वालचंद गांधी नावाचे एक काँग्रेस कार्यकर्ते होते. त्यांचे नाव वैयक्तिक  सत्याग्रहासाठी मंजूर होऊन आले होते. एका जाहीर सभेमध्ये युद्धविरोधी घोषणा देऊन जेलमध्ये जाण्याचा त्यांनी संकल्प सोडला. माझी त्यांची भेट झाली, तेव्हा त्यांनी मला विचारले,

"मी ज्या सभेत युद्ध-विरोधी घोषणा करून जेलमध्ये जाणार आहे, त्या सभेमध्ये या 'वैयक्तिक सत्याग्रहाची' सगळी पार्श्वभूमी सांगणारे भाषण करायला याल का?"

मी सहज हो म्हणून गेलो आणि जेव्हा प्रत्यक्ष सत्याग्रहाचा दिवस उजाडला, त्या दिवशी माझ्या ध्यानात आले, की मी जे भाषण करणार आहे, तेही सत्याग्रहात बसू शकते. जर पोलिसांनी मलाही अटक करायचे ठरविले, तर त्यांना नाही म्हणता येणार नाही. आता मी आईच्या शब्दांतून मोकळा झालो होतो. तेव्हा मला त्याची फिकीर नव्हती आणि त्या सभेत भाषण करायला गेलो. वैयक्तिक सत्याग्रह, म्हणजे एका अर्थाने समारंभाने जेलमध्ये जाणे, असाच प्रकार तो होता.

वालचंद गांधींनी रविवार चौकात सभेची व्यवस्था करून ठेवली होती. त्यांना तेथे अटक होणार, म्हणून त्यांना निरोप देण्याकरता त्यांची मित्रमंडळी, कुटुंबीय आणि बराचसा व्यापारी समाज जमला होता. समारंभाला सुरुवात झाली. मला भाषण करण्यासंबंधी सुचविले. मी युद्ध झाल्यापासून काँग्रेसने कशा कशा भूमिका घेतल्या आणि या युद्धामध्ये कमीत कमी भाषण-स्वातंत्र्याचा हक्क असावा, ही महात्मा गांधींनी केलेली मागणी ब्रिटिश सत्तेने कशी नाकारली, याची सर्व हकीकत सांगितली; आणि आम्हाला आमचे मन बोलून दाखविण्याचा जेथे अधिकार नाही, तेथे आमच्याकडे युद्धास सहकार्य मागण्याचा ब्रिटिश सरकारला काय अधिकार आहे,

असा प्रश्न मी उपस्थित केला. हा भाषण करण्याचा आमचा मूलभूत अधिकार आहे आणि हिंदुस्थानातील प्रत्येक स्वाभिमानी नागरिक तो बजावल्याशिवाय सोडणार नाही, असे मी स्पष्टपणे सांगितले आणि माझे भाषण संपविले.

मला वाटत होते, की पोलीस मला म्हणतील, की 'तुम्हांला अटक केली आहे;' पण तसे काही घडले नाही. माझ्या भाषणानंतर श्री. वालचंदशेठजी उठले आणि त्यांनी युद्धविरोधी घोषणा दिल्या. ताबडतोब पोलीस आले आणि त्यांनी त्यांना अटक केली. मला हा सर्व प्रकार विनोदी आहे, असे वाटले. मी तेथे आलेल्या पोलीस अधिका-याला विचारले, "माझ्या भाषणात आणि त्यांच्या घोषणांत तुम्हांला काय फरक वाटला?" त्यांनी सांगितले, "इतक्या बारकाव्यात कोण जातो? तुम्ही फक्त भाषण केले, पण त्यांनी तर तेथे घोषणा केल्या, म्हणून आम्ही त्यांना पकडत आहोत. तुम्ही तुमच्या घरी जा."

हा एक मजेदार अनुभव पुष्कळ सांगून जातो. वैयक्तिक सत्याग्रहाच्या प्रतीकात्मक स्वरूपाने त्याला एक तांत्रिक, औपचारिक स्वरूप आले होते.

एक-दोन महिन्यांनंतर माझ्या परीक्षेचा निकाल आला आणि मी उत्तीर्ण झालो. माझ्या आईला अतिशय आनंद झाला. मी योजले होते, त्याप्रमाणे माझे शिक्षण मी पुरे केले. माझ्या राजकीय नादामुळे माझी तीन-चार वर्षे फुकट गेली होती. त्यामुळे थोड्याशा वाढत्या वयात वकिलीचा अभ्यास मी पुरा केला होता. याची मलाही जाणीव होती.

आता माझी आई माझ्या मागे लागली. "बाबा आता लग्न करून घे." मी म्हटले, "आतां, ठीक आहे. चांगली मुलगी आली, तर मी जरूर लग्न करीन."

- आणि मग ती मुली पाहण्याच्या उद्योगाला लागली. तिने ते काम

गणपतरावांच्यावर सोपविले आणि सांगितले, की- "आता धाकट्या भावाची काळजी घे."

मला काही मुली सांगून आल्या होत्या; पण मला त्यांमध्ये फारसे आकर्षण न वाटल्यामुळे मी तिकडे दुर्लक्ष केले.

दिवस असेच चालले होते.

युद्धाने तोपर्यंत फारच गती घेतली होती. जर्मनीच्या सैन्याने आता आपला मोर्चा पूर्वेकडे वळविला होता. फ्रान्सची सर्व भूमी त्यांच्या आधिपत्याखाली आली होती. त्यामुळे त्यांना पश्चिमेकडून कसलेही तातडीचे लष्करी संकट दिसत नव्हते, आणि ही वेळ पाहून त्यांना जे शेवटी साध्य साधावयाचे होते, ते म्हणजे युरोपमधील कम्युनिझमचे वर्चस्व दूर करावयाचे. त्यासाठी हिटलरने आपली सर्व शक्ती एकवटून रशियावर हल्ला चढविला. रशियाचा नेता स्टॅलिन यांना हे आक्रमण काहीसे अनपेक्षित होते, असे लक्षात आले. त्यांनी संकटकाळी उपयोगी पडावा, म्हणून पोलंडचा काही भाग आपल्या ताब्यात घेऊन ठेवला होता. कधी काळी हिटलरने आक्रमण केले, तर बचावाची तयारी म्हणून त्याचा उपयोग व्हावा, हा त्याच्या पाठीमागे लष्करी उद्देश असावा. परंतु हिटलरचे आक्रमण इतके शक्तिशाली आणि वेगवान होते, की पहिल्या दोन आठवड्यांतच जर्मनीच्या सैन्याने रशियाचा फार मोठा प्रदेश पादाक्रांत केला. हिंदुस्थानमध्ये या गोष्टीच्या प्रतिक्रिया झाल्या. साम्राज्यशाही युद्ध म्हणून आरडाओरडा करणारे कम्युनिस्ट आता हे लोकशाहीवादी युद्ध झाले, म्हणून सांगू लागले. त्यांच्या विचारसरणीच्या दृष्टीने तत्त्वत: हे कदाचित बरोबरही असेल, परंतु भारतीय नागरिकांना आतापर्यंत हे युद्ध मोडून काढले पाहिजे, असे जे सांगत होते, तेच आता या युद्धाला मदत केली पाहिजे; असे सांगू लागले. तेव्हा लोकांमधील त्यांची प्रतिष्ठा गेली. हिंदुस्थानमधल्या कम्युनिस्ट पक्षाला हिंदुस्थानच्या जनमताची नाडी केव्हाच समजली नव्हती. त्यांनी ज्या अनेक चुका केल्या, त्यांमध्ये दुस-या महायुद्धाच्या वेळची त्यांची ही चूक त्यांना फार

महाग पडली. पुढच्या वीस-पंचवीस वर्षांच्या राजकारणात त्यांना ही गोष्ट सारखी नडत राहिली.

हिंदुस्थानच्या दृष्टीने लढाईला अधिक संकटाचे स्वरूप जे आले, ते पुढे १९४१ सालच्या डिसेंबरमध्ये जेव्हा जपानने युद्धप्रवेश करून एकापाठोपाठ अनेक देश गिळंकृत करायला सुरुवात केली, तेव्हा. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर जवळजवळ दोन वर्षे तटस्थ राहून युरोपातील घडामोडींचा कसा उपयोग करून घ्यावयाचा, याचा व्यूह बरोबर रचून इतर प्रमुख युरोपियन राष्ट्रे महत्त्वाच्या संग्रामात जेव्हा गुंतली आहेत, तेव्हा जपानने युद्धप्रवेश केला आणि काही आठवड्यांच्या आतच सिंगापूर, मलेशिया, ब्रह्मदेश असे एका पाठोपाठ एकेक देश पादाक्रान्त केले. जर्मनी आणि जपान यांच्या चढाईचे जे गतिमान तंत्र होते, त्यामुळे सर्व जग दिपून गेले होते, पण आता मात्र हिंदुस्थानच्या जीवनामध्ये खरेखुरे संकट निर्माण झाले होते. ब्रह्मदेशाच्या मागून आता हिंदुस्थानची पाळी आहे काय, असा प्रश्न लोकांच्या मनात येऊ लागला. आणि जर जपानी हिंदुस्थानमध्ये आले, तर? या प्रश्नाचे उत्तर इतके सोपे नव्हते. अशा प्रश्नांची उत्तरे तर्काने देता येत नाहीत. राष्ट्रनिष्ठेच्या परिभाषेतच त्याला उत्तर दिले पाहिजे. जितकी ब्रिटिश साम्राज्यशाही आम्हांला त्याज्य आहे, तितकाच जपानच्या साम्राज्यशाहीचा आम्ही तिरस्कार करतो, ही माझ्या मनाची भूमिका होती. नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांची आझाद हिंद सेना यांच्या संबंधीच्या आकर्षक गोष्टी प्रसिद्ध होत होत्या. त्या काळी त्यांनी एक ऐतिहासिक कार्य केले, हे आज पाठीमागे वळून पाहता स्पष्ट होते. सुभाषबाबूंच्याबद्दल आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या प्रेमाबद्दल मनामध्ये अतीव आदर होता. पण जपानचे हिंदुस्थानवर आक्रमण झाले, तर त्याचे स्वागत होऊ शकणार नाही, असा मनाचा कौल होता.

जपानच्या या युद्धाच्या प्रगतीनंतर ब्रिटिश सरकार काहीसे जागे झाले. असे सांगतात, की अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांना

गळ घातली होती, की हिंदुस्थानशी तडजोड करा. आणि त्याचा परिणाम म्हणून हिंदुस्थानला भेट देण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स मिशन येईल, असे जाहीर झाले.

माझ्या आयुष्याशी संबंध असलेल्या व त्याला पार्श्वभूमी म्हणून असणा-या राष्ट्रीय घटनांचा आढावा घेत मी १९४२ सालच्या मार्चपर्यंत पाहोचलो आहे. पण आमच्या सातारा जिल्ह्यातील ग्रामीण जीवनातल्या एका महत्त्वाच्या सत्तास्पर्धेच्या राजकारणाच्या माहितीसाठी मला १९४१ मध्ये परत गेले पाहिजे.

आमच्या काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने १९४१ साल हे वैयक्तिक सत्याग्रहाचे वर्ष होते. मी जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने काम पाहत होतो आणि योगायोगाने त्याच वेळी मी माझी कायद्याची शेवटची परीक्षा पास होऊन शिक्षणपूर्तीच्या कार्यक्रमातून मुक्त झालो होतो. वकिलीची परीक्षा देऊन एक दोन महिने झाल्यानंतर माझे मित्र कामेरीकर के. डी. पाटील यांचा निरोप आला, की 'आपण आपल्या सनदा हायकोर्टातून आणण्यासाठी मुंबईला जाऊ या'. मी त्यांना कळविले, की 'जिल्ह्यात महत्त्वाच्या घटना घडत आहेत, तेव्हा तुम्हीच कराडला या, म्हणजे आपल्याला काही बोलता येईल.' मी जसे के. डी. पाटील यांना बोलाविले, तसेच किसन वीर यांनाही बोलावून घेतले. आमच्यापुढे प्रश्न असा होता, की सातारा जिल्ह्यात जिल्हा लोकल बोर्डाचे राजकारण हे श्री. धनजी कूपरच्या सत्ताकारणामुळे एक वादग्रस्त केंद्रविषय होऊन बसले होते.

त्या वेळच्या कायद्याप्रमाणे, मर्यादित अधिकाराचे का होईना, परंतु शिक्षण क्षेत्रात विकेंद्रित संघटना म्हणून स्कूल बोर्ड संस्था अस्तित्वात आली होती आणि स्थानिक स्वराज्याच्या क्षेत्रात जिल्हा लोकल बोर्ड ही संस्था काम करत होती. त्यांच्या हातात शिक्षकांच्या बदल्या, शाळांच्या इमारती, खेडेगावांना रस्ते, अशी कामे दिलेली होती. या कामांसाठी लागणारी साधने व संपत्तीची व्यवस्था सरकारकडून फारच मर्यादित स्वरूपात होत असे. म्हणजेच मर्यादित स्वरूपाच्या या स्थानिक स्वराज्य संस्था होत्या. परंतु महत्त्वाची गोष्ट ही होती, की जिल्हा लोकल बोर्डाच्या सदस्यांच्या

नेमणुका होत नसत. तर त्यांना लोकमतावर आधारलेल्या प्रत्यक्ष निवडणुकीचा आधार घ्यावा लागत असे. या निवडणुकांनंतर त्यांतून जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष आणि स्कूल बोर्डाचा चेअरमन ही दोन महत्त्वाची अधिकारपदे निर्माण होत असत व त्यामुळे दोन्ही पदे ग्रहण करणा-या व्यक्ती मोठ्या मातबर मानल्या जात असत.

१९३७ सालपर्यंत कूपर, ज्यांचा उल्लेख मी पूर्वी केला आहे, त्यांनी मोठ्या कौशल्याने या संस्था आपल्या ताब्यात ठेवल्या होत्या आणि त्यामुळे त्यांचे एक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय असे वर्चस्व निदान १९३७-३८ पर्यंत होते, असे म्हटले, तरी चालेल. ते १९३७ च्या कौन्सिल निवडणुकीस उभे राहिले होते आणि निवडूनही आले होते. १९३५ सालच्या कायद्याखाली पहिले मुंबई सरकार बनले, त्यात ते काही महिनेपर्यंत पहिले मुख्यमंत्री म्हणून राहिले. पुढे काँग्रेसने अधिकार ग्रहण करावयाचे ठरविल्यानंतर त्यांना बाजूला व्हावे लागले, ही गोष्ट निराळी. तसा हा लांब पल्ल्याच्या नजरेचा माणूस होता. परंतु इंग्रजधार्जिणा असल्यामुळे आम्हांला तो नकोसा होता. जिल्ह्याच्या राजकारणावरील आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आपली पकड सोडायची नाही, हा त्यांचा नेहमीचा डाव होता. १९३७ साली कौन्सिलच्या निवडणुका जिंकल्यानंतर लोकमतात बराच फरक पडला आणि सातारा जिल्हा बोर्डाची निवडणूक आम्ही सातारा जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षातर्फे लढविली. फिरलेले वारे लक्षात घेऊन कूपरच्या पाठीमागे असणारे काही लोक आमच्याही पाठीमागे लागले. त्यावेळी पहिल्या प्रथम राष्ट्रीय वृत्तीचा जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष निवडण्याची संधी लोकांना मिळाली होती. १९३७ सालच्या कौन्सिल निवडणुकीच्या वेळच्या माझ्या कामामुळे निवडणुकीच्या कामातला छोटासा तज्ज्ञ म्हणून माझाही हळूहळू लौकिक बनत चालला होता. त्यामुळे १९३७ सालच्या जिल्हा लोकल बोर्डात निवडून आलेल्यांपैकी श्री. धुळाप्पा आण्णा नवले, सखाराम बाजी रेठरेकर आणि गौरीहर सिंहासने हे माझे महत्त्वाचे मित्र झाले होते. जवळ जवळ चार-सहा महत्त्वाच्या जिल्हा बोर्डाच्या सभासदांचा मी राजकीय सल्लागार मानला जाई. त्यामुळे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष कोण असावे, या चर्चांमध्ये माझे हमखास स्थान असे.

१९३७ सालच्या जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी आमचे काम सोपे होते. पक्षाने निवडणूक लढविली होती आणि पक्षापुढे उमेदवारही उत्तम होते. कौन्सिलच्या चुरशीच्या निवडणुकीमध्ये उत्तर सातारा मतदारसंघातून निवडून आलेले आमदार बाबासाहेब शिंदे हे जिल्हा बोर्डातही निवडून आले होते आणि त्यांनी हे अध्यक्षपद स्वीकारावे, असे सर्वसामान्य मत होते आणि तसे ते झालेही.

बाबासाहेब शिंदे हे १९२१ सालापासून राष्ट्रीय चळवळीशी संबंध असलेले आमच्यांतले जुने कार्यकर्ते होते. त्यांना ग्रामीण जनतेमध्ये मोठा मान असे. एक खादीधारी राष्ट्रभक्त पुढारी असा त्यांचा त्यावेळी लौकिक होता. त्यांच्या या निवडणुकीच्या वेळी त्यांचा माझा पहिला संबंध आला आणि हळूहळू त्या संबंधाचे रूपांतर गाढ स्नेहात झाले.

मी १९३७ सालची आमची ही हकीकत एवढ्यासाठी सांगितली, की या पार्श्वभूमीवर १९४१ साली आमच्यापुढे जे प्रश्न उभे होते, त्याची कल्पना यावी.

१९४१ साली युद्धकालीन परिस्थितीमुळे आमचा पक्ष कोणत्याही निवडणुका लढविण्याच्या मन:स्थिती नव्हता. त्यावेळी आमच्यांतले पुष्कळसे महत्त्वाचे कार्यकर्ते कारागृहात होते. त्यामुळे पक्षातर्फे निवडणूक लढविण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. पण जेलच्या बाहेर क्रियाशील अशी आम्ही जी मंडळी होतो, त्यांना या प्रश्नाकडे दुर्लक्षही करता येत नव्हते. श्री. के. डी. पाटील, श्री. किसन वीर यांना निमंत्रण दिल्याचे मी जेव्हा सांगितले, ते या गोष्टीचा विचार करण्यासाठी. आम्ही एकत्र बसून जो विचार केला, तो हा, की प्रत्यक्ष पक्षातर्फे अधिकृत उमेदवार तर उभे करता येणार नाहीत. पण जनतेमध्ये महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या या सत्तास्थानांमध्ये कूपरची मंडळी म्हणजे एका अर्थाने सरकारपक्षीय मंडळी ही बिनधोक येऊ दिली, तर आपल्या राष्ट्रीय चळवळीचे काम अडचणीचे होईल. तेव्हा त्याची काळजी घेतली पाहिजे, हा चर्चेचा मुख्य मुद्दा होता आणि त्यांच्या-आमच्या

चर्चेतून आम्ही असे ठरविले, की वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये निवडून येतील, अशी, परंतु खंबीरपणे राष्ट्रीय धोरणाबरोबर राहतील, अशी काही मंडळी निवडणुकीसाठी उभी केली पाहिजेत आणि त्यांना निवडून येण्यासाठी मदत केली पाहिजे. या निर्णयाप्रमाणे वाळवे, तासगाव, कराड, वाई आणि सातारा, जावळी या तालुक्यांतून आमचे काही मित्र निवडणुकीला उभे राहतील, अशी आम्ही व्यवस्था केली. ते सर्व लोक चांगले कार्यकर्ते असल्यामुळे आपल्या परिश्रमांनी आणि काँग्रेसच्या अप्रत्यक्ष पाठिंब्याने निवडून आले आणि जेव्हा सर्व जिल्ह्याच्या निवडणुकीचा हा तक्ता समोर आला, तेव्हा लोकांच्या लक्षात आले, की जिल्हा बोर्डाच्या अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी जे काही मनुष्यबळ लागते, त्यातला एक चांगलासा गट आमच्या म्हणण्याप्रमाणे काम करणारा आहे. या जिल्हा लोकल बोर्डाच्या राजकारणातल्या पटावरील सोंगट्या मोठ्या मजेदार बसल्या होत्या.

या वेळी एक दुसरे आश्चर्य घडले. ते म्हणजे कूपर यांचे गटातच मतभेद झाले. त्यांचे प्रसिद्ध सहकारी श्री. अण्णासाहेब कल्याणी आणि सरदार पाटणकर हे त्यांच्यापासून अलग झाले आणि अध्यक्षपदाचा खेळ सुरू झाला.
अध्यक्षपदासाठी जिल्ह्यातील दोन तरुण, नवे वकील लढाईच्या मैदानात उभे राहिले. एक श्री. आनंदराव चव्हाण आणि दुसरे श्री. बाळासाहेब देसाई. या दोघांपैकी श्री. आनंदराव चव्हाण हे माझे विद्यार्थिदशेपासूनचे मित्र होते. इंटर आणि बी. ए. च्या परीक्षेच्या वेळी आम्ही एकत्र अभ्यास केला होता. विद्यार्थिदशेतच आनंदरावांनी आग्रहाने मला कुंभारगावातील त्यांच्या घरी नेले होते आणि मोठ्या प्रेमाने त्यांच्या कुटुंबियांच्या ओळखी करून दिल्या होत्या. तसे म्हटले, तर त्यांचा-माझा पहिल्यापासून जुना वैयक्तिक स्नेह होता. पण त्यांच्या पाठीमागे ज्या शक्ती उभ्या राहिल्या, त्यांचे अप्रत्यक्ष नेतृत्व कूपर करत होते. मी आनंदरावांशी बोलून त्यांना हे सांगितले. परंतु त्यांना पाठिंबा देणारी दुसरी जी महत्त्वाची माणसे होती, त्यांच्या प्रेमाखातर त्यांना ते संबंध काही तोडता आले नाहीत. श्री. बाळासाहेब देसाई हेच आमचे या परिस्थितीतील उमेदवार ठरले. तसे आम्ही बाळासाहेबांना बोललोही. श्री. बाळासाहेब हे पाटण तालुक्यातील होते, परंतु त्यांचे शिक्षण कोल्हापूरला झाले होते.

आनंदराव आणि बाळासाहेब या दोघांचा तालुका एकच आणि दोघांचेही शिक्षण कोल्हापूरला झाले होते. त्यांची नाती-गोतीही कोल्हापूरच्या सरदार घराण्यांशी होती. तसे म्हटले, तर या दोघांनी एकत्र बसून मार्ग काढावयास काहीच हरकत नव्हती, पण तसे झाले नाही. श्री. बाळासाहेब देसाई हे मुख्यत: पाटणला वकिली करीत. परंतु त्यांनी आपले घर कराडला ठेवले होते. माझे बंधू गणपतराव यांचा त्यांचा चांगलाच परिचय होता. माझी त्यांची कराडला ओळख झाली होती.

शेवटी निवडणुकीच्या राजकारणामध्ये चढाओढ सुरू झाली. माणसे जमविण्याची शर्यत सुरू झाली आणि अखेरीस निवडणुकीच्या दिवशी मतदान होऊन बाळासाहेब देसाई निवडून आले. त्यांच्या निवडीला आम्हां काँग्रेस कार्यकर्त्यांनी फार मोठी मदत केली होती. बाळासाहेबांना त्याची जाणीव झाली आणि त्यातून त्यांचे आमचे सहकार्य हळूहळू वाढत गेले. सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे ते अध्यक्ष झाल्यामुळे स्वाभाविकच ते जिल्ह्यातले एक प्रमुख नागरिक बनले. त्यांचा आणि आमचा जिल्ह्यातला गट एक असे मानले जाऊ लागले. त्यावेळी आम्ही सर्वजण प्रथमच प्रत्यक्ष निवडणुकीत कूपर गटाचा पराभव करू शकलो, याचा आम्हांला आनंद होता. परंतु या सर्व प्रकरणामध्ये माझे जुने मित्र आनंदराव चव्हाण यांना मात्र मी दुखवून बसलो, याची खंत होती.

आनंदराव आणि बाळासाहेब ही दोन्ही महत्त्वाची माणसे होती आणि भविष्यातील राजकारणामध्ये दोघांचीही गरज लागणार होती. बाळासाहेब देसाई हे ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीच्या परंपरेतले होते. त्यांनी त्यावेळी तत्त्व म्हणून, कोणत्याही राजकीय पक्षाचा स्वीकार केलेला नव्हता. काँग्रेसशी, आमच्याशी आलेल्या संबंधामुळे जी काही जवळीक झाली होती, तेवढीच. या निवडणुकीच्या निमित्ताने ते आणि आम्ही एकत्र आल्यानंतर आम्ही त्यांना हळूहळू खेचत राहिलो. तसे ते मैत्रीला चांगले गृहस्थ होते. जिल्हा लोकल बोर्डाचे कामही त्यांनी आपले वजन ठेवून पार पाडायचा प्रयत्न केला आणि त्यात त्यांचा लौकिकही झाला. पण मूलत: त्यांचा पिंड सरकार-विरोधकाचा नव्हता. जिल्ह्याचे प्रमुख सरकारी अधिकारी म्हणजे कलेक्टर.

या कलेक्टरच्या अधिकाराला व प्रतिष्ठेला ते फार जपत. मी तर इंग्रजविरोधी चळवळ्या आणि त्यांचा मित्रही, अशा काही कठीण अवस्थेत त्यांची आमची मैत्री वाढत होती. मी काही वेळा त्यांच्याकडे उतरत असे. तेव्हा मी पाहिले आहे, की कलेक्टरकडून काही लिफाफा आला आहे, असे पाहिले, की ते एकदम अस्वस्थ होत आणि उघडून पाहून त्यात काय आहे, नाही, हे पाहिल्याशिवाय त्यांना कोणाशी बोलणे किंवा इतर कामे करणे कधी सुचत नसे. आम्ही मित्रमंडळी त्यांची थट्टा करीत असू, की

"तुम्ही एका अर्थाने जिल्हाप्रमुख आहात. कलेक्टरची एवढी मिजास तुमच्या मनामध्ये कशासाठी?" ते हसून म्हणत, "अहो, या स्थानिक स्वराज्य संस्थेचा मी अध्यक्ष आहे ना? तिच्या सुरक्षिततेसाठी मला हे सगळे केले पाहिजे."

असा त्यांचा माझा स्नेह सुरू झाला. पुढे तो जवळ जवळ तीस-पस्तीस वर्षे वाढत राहिला आणि टिकला. दुर्दैवाने आज ते हयात नाहीत. शेवटी शेवटी ते मजवर नाराज होऊन काहीसे दूर होते.  पण एक घरोब्याचा स्नेही आणि जनतेच्या हितासाठी तळमळीने कार्य करणारा लोकनेता, ही त्यांची आठवण कायम राहील. त्यांच्या प्रत्यक्ष राजकारणातील जी पहिली पावले त्यांनी टाकली, त्यावेळी त्यांचा साथीदार म्हणून मी होतो, याची मला मोठ्या आनंदाने आठवण होते.

बाळासाहेब देसाईंच्या निवडणुकीने पाटण तालुक्यातील लोकांना मोठा आनंद झाला. मागासलेला तालुका, डोंगराळ भाग, म्हणून त्यामध्ये विकास कमी, अशी तेव्हाची परिस्थिती होती. बाळासाहेबांच्या गावी त्यांच्या सत्काराचा फार मोठा समारंभ झाला. त्यावेळी बाळासाहेबांनी मला आग्रहाने समारंभाचे अध्यक्षस्थान घ्यायला लावले. या सगळ्या जुन्या आठवणी मनाशी गर्दी करून येतात, याचे कारण आमच्या जिल्ह्यातील सर्व प्रमुख कार्यकर्ते जेलमध्ये असताना जिल्ह्याच्या राजकारणात आम्ही राष्ट्रीय प्रवृत्तीची इज्जत राहील, अशा तऱ्हेने स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात ठेवण्याचे काम केले होते आणि त्यामुळे किसन वीर, के. डी. पाटील आणि मी यांना एक प्रकारचा आनंद वाटत होता.

माझे स्वत:चे असे निदान होते, की आम्ही ही जी स्थानिक स्वराज्य संस्था हातांत ठेवतो आहोत, याचा केव्हा ना केव्हा तरी राष्ट्रीय चळवळीला उपयोग होईल. गेली दोन-तीन वर्षे माझ्या मनात  जी अस्वस्थता आहे, असे मला सारखे वाटत होते, त्याचे कारण माझे मन मला सांगत होते, की दिवसेंदिवस देशाचे राजकारण अपरिहार्यपणे एका मोठ्या जनआंदोलनाच्या दिशेने चालले आहे, आणि त्यामुळे नवी तरुण माणसे जोडणे, जनमानसातील आमच्या कामाचा पाया अधिक खोल  व मजबूत होईल, याचा प्रयत्न करणे, यासाठी या स्थानिक स्वराज्य संस्थांसारख्या संस्थांशी आपला संबंध प्रस्थापित करणे हे आपले तातडीचे काम आहे.

१९४१ सालच्या जिल्हा बोर्डाच्या निवडणुकीत जी नवी माणसे माझे निकटचे साथी झाले, त्यांत श्री. यशवंतराव पार्लेकर यांचा मला आवर्जून उल्लेख केला पाहिजे. आजपर्यंतच्या माझ्या सर्व कार्यांत तेव्हापासून ते माझ्या बरोबर एकसारखे आहेत. १९४२ सालच्या संग्रामात त्यांचे अनमोल सहकार्य मला मिळाले होते. यापूर्वीही-विशेषत: कॉलेजच्या दिवसांत जे संबंध वाढविण्याचा प्रयत्न केला, त्याच्या पाठीमागेसुद्धा सर्व मित्रांची ही एक शक्ती मला कामाला प्रवृत्त करीत होती. त्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था आमच्या ताब्यात घेतल्यामुळे जिल्ह्यातील सर्व भागांतल्या कार्यकर्त्यांशी वाढते घनिष्ट संबंध आले आणि त्यामुळे सातारा जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात माझे एक व्यक्तिमत्त्व आहे आणि ते स्वीकारण्यासारखे आहे, अशी माझी प्रतिमा तयार झाली. राजकीयदृष्ट्या पुढील आयुष्यात जे काम करावयाचे होते, त्याची एक तऱ्हेने तयारी आणि शिक्षण मिळत होते आणि पाया घातला जात होता, असे म्हटले, तरी चालेल.

या निवडणुकीनंतर श्री. आनंदराव चव्हाण यांची आणि माझी काही भेट झाली नाही. कारण ते माझ्यावर किंचितसे रागावले होते. त्यानंतर थोड्याच महिन्यांनी ते इंदूर संस्थानमध्ये महत्त्वाच्या जागी काम करण्याकरता, सरकारी नोकरीत रुजू होण्याकरता म्हणून गेले आणि त्यानंतर जवळ जवळ दहा वर्षे ते तिकडेच राहिले.

परंतु सातारा जिल्ह्यात जेव्हा ते परत आले, तेव्हा संस्थाने विलीन झाली होती आणि १९५२ सालच्या निवडणुकीची तयारी चालू होती. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातले राजकारण कसा आकार घेत होते, त्याची ही पार्श्वभूमी आहे.

सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांचे शिष्टमंडळ काही राजकीय सुधारणेच्या योजना घेऊन आले होते, हे खरे आहे. त्या योजनेचे स्वरूप काही तात्पुरते आणि काही लांब मुदतीचे, असे दुहेरी होते. लांब मुदतीच्या गोष्टीसंबंधाने फारसा कोणी गंभीरपणे विचार करीत नव्हते. त्या वेळच्या राजकीय परिस्थितीमध्ये प्रमुख पक्ष तातडीने कोणत्या प्रकारचे सत्तांतर होणार, या एकाच कसोटीवर सर्व योजनांची परीक्षा करीत होते. त्याचप्रमाणे क्रिप्स मिशनच्या योजनांचेही झाले. गांधीजींसह सर्व प्रमुख काँग्रेस नेते क्रिप्स यांच्याशी बोलून आले. त्याचप्रमाणे बॅरिस्टर जीना, डॉक्टर आंबेडकर, हिंदूमहासभेचे पुढारी हेही सर्व पुढारी आपापल्या दृष्टिकोनातून त्यांच्याशी चर्चा करून आले. प्रत्येकाचे दृष्टिकोन वेगवेगळे होते, कसोट्या वेगवेगळ्या होत्या. त्या योजनांमध्ये युद्धकाळामध्ये सत्तेचा महत्त्वाचा भाग हा भारतीय प्रतिनिधींना देण्याचा प्रामाणिक हेतूच नसल्यामुळे त्या योजना कोणीच स्वीकारल्या नाहीत. आपापल्या कारणासाठी प्रत्येकाने त्या योजनेचा त्याग केला. याला अपवाद म्हणजे फक्त एम्. एन्. रॉय होते. अपेक्षेप्रमाणे सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स जसे आले, तसे गेले. तसे ते अपयश पदरात घेऊन गेले. परंतु हे अपयश सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांचे वैयक्तिक होते, असे मी म्हणणार नाही. हे अपयश ब्रिटिश सत्तेचे होते. प्रधान मंत्री चर्चिल यांचे होते. युद्धाने जरी उलटी दिशा घेतली असली, तरी सत्तांतर करण्याचा त्यांचा सुतराम् हेतू नव्हता. याचा परिणाम जो व्हायचा, तोच झाला. देशामध्ये असंतोष वाढू लागला आणि वाढत्या युद्धाच्या परिणामाबद्दल चिंता फक्त पुढाऱ्यांच्याच मनात राहिली नाही, तर ती जनतेच्या मनातसुद्धा निर्माण झाली.

याच सुमाराला महात्मा गांधींच्या विचारामध्ये फार महत्त्वाचा फरक पडला. क्रिप्स यांना चर्चेच्या प्राथमिक अवस्थेत ते भेटल्यानंतर पुन्हा ते क्रिप्सना भेटायला गेले नाहीत. कारण त्यांची खात्री झाली होती, की ब्रिटिशांना काही करावयाचे नाही आहे.

गांधीजींनी आतापर्यंत प्रतीकात्मक  सत्याग्रह, प्रातिनिधिक सत्याग्रह, या तऱ्हेचे मार्ग शोधून जनआंदोलन टाळण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांच्या मनामध्ये विलक्षण खळबळ होती.

पूर्वेकडील जपानचे युद्ध जसे आक्रमक स्वरूप धारण करू लागले, तसे त्यांच्या चिंतनाला दुसरे वळण लागले; असे दिसते. एका मौनाच्या सोमवारी ते आपल्या चिंतनात असताना त्यांच्या मनामध्ये विचार आला, की मोठे जनआंदोलन करून ब्रिटिशांना या देशातून बाहेर जाण्याचे आवाहन केले पाहिजे. त्यांनी हा आपला विचार आपल्या एका इंग्रजी मित्राला कळविला होता. क्रिप्स मिशन नंतर प्रसिद्ध झालेले. १९४२ च्या एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांतील 'हरिजन' मधले त्यांचे लेख मी वाचत होतो. तेव्हा त्यांच्या विचारात झालेला हा महत्त्वाचा बदल माझ्या लक्षात आला. तसा तो कोणाच्याही लक्षात आला असता, इतका स्पष्ट होता. जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसे लेख अधिक तीव्र, अधिक स्पष्ट, अधिक जहाल होत गेले. ते स्पष्ट शब्दांमध्ये, ब्रिटिश सत्तेने हिंदुस्थानमधून आपल्या मनाने निघून जाण्याची हीच वेळ आहे, असा खडखडीत इशारा देऊ लागले.

गांधीजींचे हे विचार जसजसे प्रसिद्ध होत होते, तसतसे देशातील राजकीय हवामान गरम होत होते आणि जनआंदोलन होणार, असे जे माझे निदान होते, तेही खरे होणार, अशी मला खात्री वाटू लागली. त्यावेळी जर जनआंदोलन झाले नाही, तर हिंदुस्थानपुढे आलेली अत्यंत उत्कृष्ट संधी हिंदुस्थान गमावणार आहे, अशा तऱ्हेची भावना मी आणि माझ्या भोवतालचे कार्यकर्ते यांचीही झाली होती.
त्यामुळे या तीन महिन्यांच्या काळात काँग्रेसच्या नेतृत्वात झालेल्या विचारविनिमयाकडे आमचे लक्ष वेधले आणि यातून निश्चित निर्णय केव्हा येतो, याकडे आमचे लक्ष लागून राहिले.

१९४२ सालच्या एप्रिल महिन्याच्या शेवटी अलाहाबाद येथे वर्किंग कमिटी आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटी यांची बैठक झाली. इतिहास घडविणारा तो काळ

होता. जगाच्या भविष्याला कलाटणी देणा-या या युद्धाच्या अत्यंत कठीण समयी हिंदुस्थानचे नेते देशाच्या भवितव्याचा विचार करण्यासाठी बसले होते. प्रामाणिक वैचारिक देवाणघेवाण आणि संघर्षाची पर्वा न करता आपली मते स्पष्टपणे एकमेकांना सांगण्याचा विक्रम येथे घडला.

या दृष्टीने अलाहाबादच्या या बैठका ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाच्या आहेत. यावेळी काँग्रेस नेत्यांमध्ये वेगवेगळे विचार आहेत, याची स्पष्ट कल्पना आम्हां लोकांना आली. गांधीजींनी आपले विचार एका ठरावाच्या मसुद्याच्या रूपाने पाठवून दिले होते. त्यामधील महत्त्वाचा भाग असा होता, की आता ब्रिटिश सत्तेने हिंदुस्तानमधून ताबडतोब निघून जावे आणि आमच्यावर आक्रमण करणारी जपानसारखी दुसरी सत्ता असली, तरी त्याबद्दल काय करावयाचे, ते आमचे आम्ही पाहून घेऊ. अशा तऱ्हेची भूमिका त्या ठरावामध्ये होती.

पंडित जवाहरलाल नेहरूंना स्वातंत्र्याची हमी हवी होती. तातडीने सत्तांतरही हवे होते. परंतु ताबडतोब ब्रिटिशांनी युद्धकाळात हिंदुस्थानातून निघून जावे, असे म्हणण्यामध्ये त्यांच्या मनात काही वैचारिक विकल्प होते. ब्रिटिशांनी हिंदुस्थानातून ताबडतोब निघून जावे, हे सुचविण्यामुळे फॅसिस्ट जपानशी हिंदुस्थान काही तडजोड तर करू इच्छित नाही ना, अशी कुशंका लोकशाहीवादी राष्ट्रांत व जगतात निर्माण होऊ नये, याची चिंता नेहरुजींना होती.

काँग्रेस पक्षाने जागतिक फॅसिझमविरुद्ध अत्यंत स्पष्ट भूमिका अनेक वर्षे घेतली होती व या परंपरेचा काँग्रेसला अभिमान होता. या परिस्थितीत याच्याशी विसंगत असे काही घडू नये, असा त्यांचा आग्रह होता. विशेषत: हिंदुस्थानचे नेते जपानशी समेट करायला तयार आहेत, अशा तऱ्हेचा गैरसमज पश्चिमेकडील देशांत झाला, तर ते इष्ट नव्हे, ही पंडित जवाहरलाल नेहरूंची भावना होती. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूंनी राजकीय परिस्थितीवरचा आपला वेगळा ठराव वर्किंग कमिटीपुढे ठेवला.

हा ठराव त्यांनी प्रथम पाठविला नव्हता. त्यांनी फक्त आपले विचार वर्किंग कमिटीपुढे मांडले होते. तेव्हा मौलाना आझाद काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी नेहरूंना सुचविले, की तुमचे जे विचार आहेत, ते तुम्ही ठरावाचा मसुदा म्हणून पाठवा. त्यामुळे हा ठराव पंडितजींच्याकडून आला होता.

वर्किंग कमिटीमध्ये जेव्हा चर्चा झाली, तेव्हा पंडितजींच्या ठरावाच्या पाठीमागे बहुमत नव्हते, असे दिसून आले आणि आता काँग्रेस नेतृत्वात फूट पडणार, अशी सर्वांची भावना झाली. परंतु मौलाना आझाद यांनी आपल्या कौशल्याने ही फूट टाळली.

नेहरूंच्या ठरावाच्या बाजूने बहुमत नव्हते, तरी वर्किंग कमिटीच्या सभासदांचे मन वळवून त्यांनी तो ठराव वर्किंग कमिटीकडून पास करून घेतला. हा ठराव एका अर्थाने समेटाच्या स्वरूपात होता.

अलाहाबादच्या या घटनेमुळे गांधीजी नाराज झाले, असे तेव्हाच्या 'हरिजन'च्या लेखांतून व्यक्त होत होते. वृत्तपत्रांत आणि आमच्या खाजगी चर्चांतही अशा हकीकती ऐकत होतो. अलाहाबादचा हा ठराव झाला असला, तरी लोकांच्या मदतीने प्रसंग पडला, तर काँग्रेसच्या नेतृत्वाला बाजूला ठेवून एक प्रचंड जनआंदोलन आपण या देशात उभे करून ब्रिटिशांना हिंदुस्थानातून माघार घ्यायला लावली पाहिजे, या निर्णयाप्रत गांधीजी आले होते. त्यांनी आपले हे विचार त्यांच्या काही जवळच्या सहकारी मित्रांना बोलूनही दाखविले होते आणि एका अर्थाने त्याची थोडी-फार तयारीही करण्याची मन:स्थिती त्यांनी दाखविली होती. त्यांना मानणारे जे पुढारी होते, ते म्हणजे डॉक्टर राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल वगैरे मंडळींशी ते याबाबत फार मोकळी चर्चा करीत असत.

हे सर्व त्यासंबंधीचे त्यावेळचे वाङ्मय वाचले, म्हणजे लक्षात येते. गांधींच्या

तोलामोलाचा माणूस जनआंदोलनाचा निर्णय घेण्याच्या मन:स्थितीत येतो, तेव्हा त्यांना जनमनाची संपूर्ण कल्पना आली असली पाहिजे, हा त्याचा अर्थ आहे.

गांधीजींच्या बाबतीत एक गोष्ट स्पष्ट आहे, की ते जेव्हा स्वत: निर्णय घेत असत, तेव्हा त्या निर्णयासाठी प्रसंग पडला, तर एकटे जायची पाळी आली, तर ते जायला नेहमी तयार असत. अनेक नेते निर्माण करणारा हा नेता होता. त्यामुळे त्यांच्या जवळपासच्या त्यांनीच निर्माण केलेल्या नेत्यांपैकी काहींचा मतभेद असला, तरी त्याने गांगरून जाण्याइतके ते काही दुबळे नव्हते.

अलाहाबाद अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वेळी आणखी एक दुसरी महत्त्वाची घटना घडली, तिचा उल्लेख केला पाहिजे आणि ती म्हणजे राजाजींचे झालेले विलक्षण मतपरिवर्तन. १९२१ ते १९३० सालच्या काळात गांधीजींच्या नाफेरवादाचे आणि त्यांच्या अहिंसात्मक सत्याग्रहाच्या सिद्धांताचे कौशल्यपूर्ण समर्थन काँग्रेसच्या वेगवगळ्या बैठकींत राजाजींनी केलेले होते, तो इतिहास प्रसिद्ध आहे.

पण आता राजाजी अलाहाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसमध्ये आणि वर्किंग कमिटीमध्ये जे बोलले आणि जी बाजू मांडली, त्यावरून  देशावर एका बाजूने दुस-या परकीय सत्तेचे आक्रमण होत असल्याचे चिन्ह दिसत असताना ते अहिंसेवर आपला पूर्वीचा विश्वास राहिलेला नाही, असे म्हणू लागले. त्यामुळे त्यांनी दोन ठराव मांडले होते. एक मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी तत्त्वत: मान्य करावी व त्यावर आधारित राष्ट्रीय सरकार हिंदुस्थानमध्ये  बनवावे; व दुसरा ठराव, आपल्या मद्रास राज्यात काँग्रेस सरकारने जो राजीनामा दिला होता, तो परत घेऊन तेथे लोकांचे सरकार प्रस्थापित करावे. असे हे वेगवेगळे दोन ठराव आणले होते. त्यांनी दुसरा ठराव नंतर मागे घेतला. परंतु पाकिस्तानच्या कल्पनेचा स्वीकार करण्याच्या ठरावाला ते घट्ट धरून राहिले.

या अखिल भारतीय काँग्रेसला गेलेल्या काही महत्त्वाच्या कार्यकर्त्यांची माझी भेट

झाली. त्यांतील विशेषत: श्री. बुवासाहेब गोसावी यांच्याशी झालेले बोलणे मला स्मरते. त्यांनी सांगितले, की राजकीय वास्तवता आणि तर्कसंगती याच्या आधारावर राजाजी आपली भूमिका इतकी उत्तम मांडत असत, की त्यांच्यावर बौद्धिक आक्षेप घेणे अवघड जात असे. परंतु भावनेला त्यांचे म्हणणे पटत नसल्यामुळे अखिल भारतीय काँग्रेसच्या सभासदांनी त्यांना मदत केली नाही. राजाजींचा हा ठराव नापास झाला आणि त्यांनी ताबडतोब वर्किंग कमिटीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि त्यानंतर दोन महिन्यांनी काँग्रेसचाच राजीनामा देऊन ते मुक्त झाले.

अलाहाबादच्या बैठकीनंतर गांधीजींच्याकडे देशातल्या नेत्यांची एकसारखी रीघ लागली. 'हरिजन'मध्ये त्यांचे प्रसिद्ध होणारे लेख वाचून राष्ट्रीय दर्ज्याचे नेते हादरून गेले होते. त्यामुळे ही सर्व मंडळी त्यांचे मन आणि मत जाणून घेण्यासाठी वर्ध्याला जात होती.

या चर्चेनंतर वर्ध्याला जुलैमध्ये वर्किंग कमिटीची बैठक घ्यावी, असे ठरले. त्याप्रमाणे जुलै महिन्यात वर्किंग कमिटीची बैठक वर्ध्यास झाली. या खेपेला गांधीजींनी वर्किंग कमिटीच्या बैठकीला हजर राहण्याचा निर्णय घेतला आणि वर्किंग कमिटीच्या चर्चांमध्ये पहिल्यापासून अखेरपर्यंत भाग घेतला. या चर्चेतून जो वर्किंग कमिटीने ठराव पास केला, तो ठराव अतिशय महत्त्वाचा आणि ऐतिहासिक स्वरूपाचा झाला. हिंदुस्थानमधून ब्रिटिशांनी माघार घ्यावी आणि ती तातडीने घ्यावी, अशी आपली भूमिका गांधीजींनी स्पष्ट केली आणि इतर सर्व नेत्यांनाही ती भूमिका मान्य करावी लागली.

गांधीजींची ही भूमिका होती, की ब्रिटीशांची सत्ता हिंदुस्थानांतून गेल्यानंतर सुद्धा अहिंसेचे तत्त्व सोडावयाचे नाही, याही गोष्टीवर त्यांनी भर दिला. जागतिक लोकशाहीमध्ये गैरसमज होऊ नये, ही जी चिंता नेहरूंना लागली होती, त्याची काळजी घेईल, अशा तऱ्हेने शब्दरचना ठरावात करण्यात येऊन काँग्रेसमध्ये फूट पडण्याचे संकट वाटत होते, ते टळले आणि तो ठराव एकमताने पास केला.

अलाहाबाद ते वर्धा हा मतभेदाचा आणि विचार-संघर्षाचा प्रवास होता. लोकशाही पद्धतीने होणारी चर्चा आणि नेते मंडळींना परस्परांबद्दल असणारा वैयक्तिक आदरभाव, प्रत्येकाची आपापल्या विचारातील प्रामाणिक निष्ठा, यामुळे याला संघर्षाचे स्वरूप यावेळी आले नाही. एकमेकाच्या वैचारिक देवाणघेवाणीमुळेच ठराव एकमताने पास होऊ शकला.

पुढे ७ ऑगस्टला मुंबईला 'छोडो भारत'चा ठराव पास होणार होता. या ऐतिहासिक निर्णयाचा शुभारंभ हा वर्ध्याच्या सभेत झाला, म्हणून वर्ध्याची ही सभा फार महत्त्वाची आहे. गांधीजींचा हा मोठा राजकीय विजय होता.

गांधीजींच्या मनामध्ये जनआंदोलनाचा निश्चित कार्यक्रम काय असावा, यासंबंधाने नेते मंडळींनी चौकशी केली, पण तेव्हा गांधीजींनी स्पष्ट कल्पना दिली नाही. परंतु त्यांचा एक विचार स्पष्ट होता, की जर इंग्रज सत्तेने बेपर्वाई दाखवून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा तिरस्कार केला, तर त्यांच्याशी संपूर्ण असहकार केल्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नाही. ही भावना त्यांनी बोलून दाखविली. कार्यक्रम त्यातून हळूहळू निघेल, असेही त्यांनी बोलून दाखविले.

वर्ध्याचा हा निकाल झाल्यानंतर सगळ्या देशभर एक नवे वातावरण निर्माण झाले आणि आम्ही आमच्या जिल्ह्यातले सर्व कार्यकर्ते एकमेकांशी चर्चा करून भवितव्यात घडणा-या जनसंग्रामाची चर्चा करू लागलो.

परंतु याच्या आधी आमच्या वैयक्तिक आयुष्यामध्ये एक महत्त्वाची घटना घडली होती. या सगळ्या राजकीय चर्चा, आंदोलने वगैरे गोष्टी चालू असताना हे सर्व समजून घेण्यात मी काहीसा व्यग्र होतो. परंतु माझ्या आईचा माझ्या लग्नासाठी पाठीमागे असलेला आग्रह काही कमी झाला नव्हता. आईचा विजय झाला, आणि मी शेवटी लग्नास तयार झालो. फलटण येथील कै. रघुनाथराव मोरे यांची कन्या

वेणूबाई हे स्थळ मला सांगून आले होते. मी त्यांना कबूल केले, की मुलगी जर सातारला आणली, तर मी साता-याला जाऊन तिला पाहीन. मे महिन्याच्या सुरुवातीस ठरल्याप्रमाणे मी मुलगी पाहिली.

वधू-पसंतीचा माझा एक दृष्टिकोन होता. माझ्या घरात आणि विशेषत: माझ्या आईशी जमवून घेईल, अशा संस्कारांतील मुलगी पाहिजे, अशी माझी धारणा होती. कै. रघुनाथराव मोरे हे फलटणचे असले, तरी त्यांचा परिवार मुंबईत राहत असे. एक वर्षापूर्वीच त्यांचे निधन झाले होते. बडोदे राजघराण्याच्या खाजगी खात्यामध्ये ते महत्त्वाचे गृहस्थ होते. त्यांची फलटणला उत्तम शेती होती, वर्षातून दोन महिने आपल्या गावी जाऊन तेथील घरंदाज संस्कार मुलींना मिळतील, याची ते काळजी घेत असत. मोरे परिवाराची ही पार्श्वभूमी होती.

शिक्षित, पण एकत्र कुटुंबात रमून जाईल, अशी वधू मला पाहिजे होती. साता-यात यादो गोपाळ पेठेतील त्यांच्या नातेवाइकांच्या घरी मी सौ. वेणुबाईला प्रथम पाहिले. काही प्रश्नोत्तरे झाली. मी वकील असलो, तरी राजकीय कार्यकर्ता आहे, हे मी स्पष्ट केले. तिच्या चेह-यावर मला विलक्षण सौम्य प्रसन्नता दिसली. दिव्यासारखे लखलखणारे तिचे मोठे डोळे पाहून माझ्या मनाने होकार दिला.

कराडला परत जाऊन माझा होकार मी माझ्या आईला कळविला. मेच्या सुरुवातीस हे सर्व घडले आणि २ जून रोजी माझा व सौ. वेणूबाईचा विवाह कराड येथे झाला.

आज जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा एका बाजूने जनआंदोलनाच्या बाजूने आपले मन तयार करणारा मी, हे जनआंदोलन असे उंबरठ्यावर आले असताना लग्नाला कसा उभा राहिलो, हा विचार केव्हा केव्हा माझ्या मनाशी येऊन जातो. परंतु निर्णय घडला, हे खरे, आणि त्यातून माझे पुढचे जीवन घडत गेले, हेही खरे. तर्क आणि जीवन नेहमीच हातात हात घालून चालते, हे खरे नाही, हाच त्याचा अर्थ.

- आणि एका दृष्टीने जनआंदोलनाचा जो वादळी संसार मला पुढे पाहायचा होता, त्यासाठी आवश्यक ती जोडीदारीण मला मिळणार होती. त्याचा हा योगायोग होता किंवा अर्थ होता, असे म्हटले, तरी चालेल.
माझ्या विवाहासाठी जिल्ह्यातले हजारो कार्यकर्ते मोठ्या आनंदाने आणि प्रेमाने जमले होते आणि माझ्या विवाहास मला आशीर्वाद देण्यासाठी म्हणून आलेले स्वामी रामानंद भारती यांनी विवाह-समारंभाच्या शेवटी भाषण केले, त्यामध्ये होणा-या जनआंदोलनाचा अतिशय सूचक असा उल्लेख केला.

पूर्वी के. डी. पाटील आणि माझ्यात ठरल्याप्रमाणे १९४१ सालच्या मे महिन्यात हायकोर्टातून आमच्या वकिलीच्या सनदा आणाव्यात, म्हणून मुंबईला गेलो. मुंबईलाच जायचे, म्हणून आपले काही दोस्त बरोबर घ्यावयाचे, असे ठरले. त्यांनी आम्हां दोघांचे स्नेही कोरे बंधू यांच्यापेकी एक आणि मी माझ्याबरोबर माझे नवे झालेले मित्र श्री. यशवंतराव पार्लेकर असे आम्ही मुंबईला गेलो. ही माझी मुंबईला तिसरी किंवा चौथी भेट असेल.

यापूर्वी जेव्हा मी मुंबईला गेलो होतो, तेव्हा कुणाच्या तरी ओळखीने कुठे तरी थांबत असे. या खेपेला मात्र आठवडाभर मुंबईत काढावयाचा, असे ठरवून आल्यामुळे कुठेतरी राहणे जरूर होते. आमच्या खिशाला परवडणारे ठिकाण म्हणजे 'माधवाश्रम' होते. म्हणून प्रार्थना समाजजवळच्या 'माधवाश्रमा'त आम्ही आश्रयाला गेलो. तो सबंध आठवडा आम्ही 'माधवाश्रमा'त काढला. त्या काळच्या परिस्थितीमध्ये आमच्या कल्पनेने पुरेशी व्यवस्था तेथे होती.

यावेळी आम्ही सर्व मुंबई पाहावयाची असे ठरविले होते आणि जितके फिरता येईल, तितके फिरावयाचे, अशी आमची कल्पना होती. पहिल्या एक-दोन दिवसांत हायकोर्टात जाऊन आम्ही आमच्या वकिलीच्या सनदा घेतल्या. हातात सनद आल्यानंतर एक वेगळी भावना मनात येऊन गेली, की कुठल्याही कोर्टात हक्काने

हजर राहण्याची परवानगी आम्हाला या निमित्ताने मिळते आहे. एक प्रकारचा नवा आत्मविश्वास मनात निर्माण झाला. दुसरे जे महत्त्वाचे काम आम्ही केले, ते म्हणजे आम्हांला आवश्यक असणारी कायद्याची पुस्तके खरेदी करण्याचे. वकिलीचा उद्योग सुरू करावयाचा, म्हणजे महत्त्वाची कायद्याची पुस्तके जी असतील, त्यांची मूळ गरज होती आणि ती लायब्ररीत जाऊन पाहण्यापेक्षा आपल्या घरी असलेली बरी, म्हणून अशी प्रत्येकी दहा पंधरा पुस्तके  के. डीं. नी आणि मी आमच्यासाठी खरेदी केली. त्या सबंध आठवडाभरात आम्ही मुंबई शहरातील सर्व महत्त्वाच्या भागांत फिरून आलो. एवढे मोठे शहर. त्याचा उद्योगधंद्याचा व व्यापाराचा पसारा मी प्रथमच पाहिला. मुंबईच्या कहाण्या आम्हांला ऐकून माहीत होत्या. परंतु हे शहर प्रत्यक्ष पाहिल्यानंतर, त्याचा जो काही परिणाम माझ्या मनावर झाला, तो म्हणजे या शहरामध्ये जबरदस्त श्रीमंती आहे; तितकीच विलक्षण गरिबी पण आहे. आमच्या ओळखीचे सातारा जिल्ह्यातील कामगार होते. त्यांतील एक-दोघांकडे त्यांच्या आमंत्रणावरून जेवायला गेलो. तेव्हा तेथे ही मंडळी कशी राहतात आणि जेवणखाण कसे करतात, याची थोडी-फार कल्पना आली. फार थोडे लोक आपल्या कुटुंबासह तेथे राहत असत. एखादी खोली आणि त्यामध्ये पाचपंचवीस माणसे आणि कुठल्यातरी खानावळ चालविणा-या बाईच्या घरी सकाळ-संध्याकाळचे भाजी-भाकरीचे जेवण ही त्यांची जिवाची मुंबई होती. दिवसभर कष्ट करावेत आणि जेथे जागा सापडेल, तेथे रात्र काढावी, असा आयुष्यक्रम ही कामगार मंडळी जगत असताना आम्ही पाहिली. अशांचाही आम्ही मोठ्या आपुलकीने पाहुणचार घेतला. कारण त्यांना आमच्याबद्दल जिव्हाळा होता. जसे गिरगाव पाहिले, तसेच मुंबई बंदर व तेथे चाललेले काम पाहिले. बंदरात कष्ट करणा-या लोखंडी जथ्थ्यातील गाववाल्यांनाही भेटलो. मरीन ड्राईव्ह व मलबार हिलकडेही एक चक्कर मारून झाली. या अफाट व अजब शहराबद्दलच्या संमिश्र भावना मनामध्ये गर्दी करून आल्या.

'माधवाश्रमा'तले ते पाच-सात दिवस सहज निघून गेले. मुंबई पाहून झाली होती.

तेव्हा आता आपापल्या गावी जाऊन, आता सनद घेतलीच आहे, तर वकिलीचा उद्योग सुरू केला पाहिजे, या जाणिवेने परत फिरलो.

माझ्या पुढे माझ्या मित्रांच्या चर्चेवरून प्रश्न निर्माण झाला होता, की मी प्रॅक्टिस कोठे सुरू करावी. मी आता तसा सबंध जिल्हयात माहीत झालो होते. तेव्हा काही मित्रांचा सल्ला होता, की सातारला जिल्हा न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरू करावा. पण माझे मन मला सांगत होते, की इतक्या गंभीरपणाने वकिली करण्याकरिता जर मला सातारला जायचे असेल, तर नीट बस्तान बसेपर्यंत पाच-दहा वर्षे वाट पाहण्याची माझी तयारी असली पाहिजे आणि या पाच-दहा वर्षांत वकिलीच्या व्यवसायाशिवाय दुसरे कुठलेही काम मी करता कामा नये. असे केले, तरच माझे वकिलीचे काम साता-यामध्ये ठीक चालेल. हा सर्व विचार करून माझा मी निर्णय घेतला, की वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी माझे आयुष्य आहे, असे मला वाटत नाही. झालोच आहे वकील, तर कराडला वकिली करावयाचा प्रयत्न करू. त्याला जोडून राष्ट्रीय चळवळीचे आपले नेहमीचे कार्य करीत राहावयाला कराड सोईस्कर आहे. सातारा न्यायालयाचा नाद मी सोडून दिला आणि कराडला प्रॅक्टिस करण्याचा निर्णय घेतला. कराडमध्ये गुरुवार पेठेत कोळेवाडीकर देशपांडे यांचे घर आहे. ते घर मी भाड्याने घेतले आणि तेथे 'वकील' म्हणून माझ्या नावाची पाटी लावून, त्या घरात मी राहावयास आलो.

१९४१ सालचा जुलै महिना असेल. या वेळी मी एक वर्षभर वकिलीचा व्यवसाय केला. कारण १९४२ सालच्या ऑगस्ट महिन्यात आमचे दुसरे रामायण सुरू होणार होते. त्यामुळे एक वर्षाचा माझा जो वकिलीचा अनुभव आहे, तो काही फारसा नोंदण्यासारखा आहे, असे मला वाटत नाही. माझ्या घरी गर्दी असायची, परंतु ती तालुक्यातील आणि जिल्हयातील कार्यकर्त्यांची. त्या कार्यकर्त्यांना मोठा अभिमान वाटत असे, की मी त्यांच्यांत राहून वकिलीच्या पेशामध्ये प्रवेश केला. एवढ्याच एका गोष्टीचा त्यांना आनंद होता. त्यामुळे मी कोर्टात जाईतोपर्यंत हे लोक माझ्याभोवती गर्दी करून बसलेले असायचे.

हळूहळू फौजदारी खटले माझ्याकडे येऊ लागले आणि वकिलीच्या पेशात चार पैसे मिळतात, याचा मला अनुभव येऊ लागला. त्या वेळी मी या वकिलीच्या क्षेत्रात असे पाहिले, की या धंद्यामध्ये विलक्षण स्पर्धा आहे. जुनी माणसे नव्या माणसांना संधी देत नव्हती. नवी माणसे एकमेकांच्या केसेस् काढून घेण्याच्या खटपटीत असत. फौजदारी न्यायदानाचे कामही मोठे विलक्षण व चमत्कारिक स्वरूपाचे होते. या सगळ्या अनुभवांतून मी जायचा प्रयत्न करीत असताना आपण फार खालच्या स्तरावर या पेशाचे काम सुरू केले, याची थोडीशी बोचणी माझ्या मनात सुरू झाली. कारण ज्या तऱ्हेची स्पर्धा तेथे चालू होती, त्या स्पर्धेत मी भाग घेऊ शकत नव्हतो. लॉ कॉलेजच्या लायब्ररीत बसून कायद्याच्या तत्त्वांचा अभ्यास आणि हायकोर्टाच्या निर्णयांचा केलेला व्यासंग यांचा या दैनंदिन कामाशी कुठे संबंध येतो आहे, असे मला दिसेना.

माझ्या एका फौजदारी खटल्याचा अनुभव सांगतो. म्हणजे चित्र कसे होते, याची कल्पना स्पष्ट येईल. एका सरकारी खटल्यात सरकारी पोलिस जमादार प्रॉसिक्यूटर म्हणून काम करीत होते. ज्याचा मूळ खटला होता, त्याला त्यांच्याबद्दल विश्वास वाटेना. म्हणून विश्वासाचा वकील म्हणून त्याने मला निवडले. मी त्या माणसाला सुरुवातीलाच सांगितले,
"तुझा खटला चालविण्याचे काम पोलिस जमादार प्रॉसिक्यूटर करीत आहेत. त्यांचे सहकार्य जर मला मिळाले नाही, तर मी तुला कशी मदत करणार?" त्याचा आग्रह पडला, म्हणून मी त्याचे वकीलपत्र घेतले. अर्थात पोलीस जमादार प्रॉसिक्यूटर हेही तेथे होते. त्यांची काम करण्याची पद्धत पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आले, की प्रॉसिक्यूटर सरकारी साक्षीदारांच्या ज्या साक्षी घेत होते, त्यांवरूनच त्यांचा आणि आरोपीचा आतून काही करार झाला आहे. एका गरीब शेतक-याची बैलगाडी त्याच्या शेजारचा एक दांडगेश्वर उचलून घेऊन गेला होता. हा या खटल्याचा विषय होता. सरकारचे साक्षीदार जे आले, तेच सांगू लागले, की गाडी फिर्यादीची नव्हतीच मुळी. मी समजून चुकलो, की या खटल्याचा निकाल काय लागणार आहे. मी माझे

वकीलपत्र त्यातून काढून घेतले. मी त्या माणसाला सांगितले, की 'तुझा यात निभाव लागणार नाही.' माझा तेव्हा असा पक्का समज झाला, की पोलिस प्रॉसिक्यूटर, आरोपीचे वकील आणि मॅजिस्ट्रेट यांनी या केसचा निकाल काय द्यावयाचा, हे आधीच ठरविलेले आहे. मी हा एक नमुना सांगितला. सर्वच काही असे असेल, असे माझे म्हणणे नाही; पण बरेचसे असे काही होते, हे मात्र खरे. मी त्यावेळच्या धंद्याचीही परिस्थिती सांगितली आहे.

मी वर्षभर काही फौजदारी खटले चालविले. माझ्या या एक वर्षाच्या मुदतीच्या दृष्टीने १९४२ सालच्या जून महिन्यापर्यंत मी महिना चार-पाचशे रुपये मिळवू लागलो होतो. घरच्या लोकांना माझी मदत होऊ लागली होती. मीही स्वत: पैसे मिळवू लागलो, याचे समाधान माझ्या मनात होते. दिवाणी दाव्यांकडेही मी थोडे-फार लक्ष दिले. पण त्यात मी काही फारशी प्रगती करू शकलो नाही. दहा-पाच किरकोळ स्वरूपाचे दावे माझ्याकडे होते. त्यांसाठी बराच वेळ कोर्टाच्या बाररूममध्ये जाऊन बसण्याची पाळी मला येत होती. बाररूममधील वकील लोक काही जुने होते, काही नवीन होते. ही चांगली माणसे होती. माझी त्यांची या पूर्वीची ओळख होती. कार्यकर्ता म्हणून माझे नाव प्रसिद्ध होते. त्यामुळे त्यांच्या मैत्रीचा फायदा मिळत होता. पण पुष्कळ वेळा तेथे चालणा-या चर्चा ज्या पद्धतीने चालत, ते पाहिले, तेव्हा माझ्या मनाशी विचार येऊन जाई, की जर आपले सगळे आयुष्य या वातावरणात असेच जाणार असेल, तर माझ्या ज्या आशा व आकांक्षा मनामध्ये धरून मी शिक्षण पुरे केले, ते एका अर्थाने व्यर्थ आहे. हळूहळू माझ्या मनावर निराशा पकड घेऊ लागली आणि मला हे पक्के दिसून आले, की या वकिलीच्या व्यवसायात मी कधीच रमणार नाही. माझ्या अंतर्मनात काय चालू होते, त्याचे हे दिग्दर्शन केले आहे.

अधून मधून मी इतरही कोर्टांत जाण्याचा प्रयत्न करू लागलो. कोल्हापूर संस्थानच्या वकिलीचीही मी सनद काढली होती आणि पन्हाळा तालुक्याच्या कोर्टापुढे दोन-चार फौजदारी केसेस् चालविण्याकरता मी जात असे. पंधरा दिवसांतून

एखादा शनिवार-रविवार इस्लामपूरला के. डी. पाटील यांच्याकडे मी जात असे. के. डी. पाटील यांचेही माझ्यासारखेच चालले होते. पण त्यांना इस्लामपूरमधील मोठे प्रख्यात वकील श्री. रानडे यांचे सहकार्य लाभले होते. के. डीं. नी माझी आणि रानडे यांची ओळख करून दिली. अतिशय हुशार वकील, प्रकृतीने व प्रवृत्तीने धीरगंभीर, कामामध्ये यश हटकून मिळत असे. त्यामुळे पक्षकारांची त्यांच्याकडे गर्दी असे. केसची मांडणी करण्याची हातोटी उत्तम. फौजदारी खटल्यातील उलटतपासणी करण्याचे त्यांचे कौशल्य नमुनेदार होते. परंतु संध्याकाळी सातनंतर पिण्याच्या शौकामुळे त्यांची भेट बंद असे. के. डी. आणि मी श्री. रानडे यांना रविवारी दुपारी भेटत असू आणि ते मुख्यत: वकिलीच्या पेशाकरता नव्हे, तर त्यांना राजकारणामधील आमचे विचार व अनुभव ऐकावयाची इच्छा असे. त्यामुळे मी वकील म्हणून 'ज्यूनियर' असलो तरी कार्यकर्ता म्हणून या जिल्ह्यात माझी 'सीनिऑरिटी' सर्वांनी स्वीकारलेली होती.

माझ्या वकिलीचे हे पहिले वर्ष अशा पद्धतीने गेले. या वर्षात मी काही नवे थोडे-फार शिकलो. मनुष्यस्वभाव, न्यायदानाच्या पद्धतीचे स्वरूप, पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराची अंदाधुंदी, ही मी फार बारकाईने पाहून घेतली आणि माझ्या अनुभवामध्ये ही एक नवी भर पडली.

साहित्य संमेलनाशी माझे साहचर्य फार जुने आहे. या काळात म्हणजे १९४२ साली कराडला दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन मोठ्या उत्साहाने साजरे झाले. कराडच्या साहित्यिक परंपरा जुन्या आहेत. वाङ्मयीन कार्यांमध्ये भाग घेणारा एक जाणता संच कराडमध्ये तेव्हा काम करीत असे. कवी बालकृष्ण, पु. पां. गोखले, पंडित सप्रे, शंकरराव करंबेळकर, कृष्णराव सरडे, वगैरे नावे सहज डोळ्यांपुढे येतात. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सांगलीचे सुप्रसिद्ध कवी साधुदास होते. महाराष्ट्रातील काही सुप्रसिद्ध साहित्यिक व विद्‌वान या संमेलनास अगत्याने आले होते. माझी वाङ्मयीन विषयांची ओळख तर चांगली होतीच, पण साहित्यिक क्षेत्रामध्ये चाललेल्या चळवळींची माहिती करून घेण्याचा मला छंद होता. वेगवेगळ्या ठिकाणी भरलेल्या साहित्य संमेलनांची वर्णने मी रस घेऊन वाचत असे व त्या क्षेत्रातील

काम व माणसे यांच्याबद्दल कुतूहल व आदर असे. यामुळे कराडमध्ये भरलेल्या संमेलनामध्ये मी क्रियाशील होऊन भाग घेतला. या संमेलनामध्ये दोन परिसंवाद योजले होते. एका परिसंवादाचे अध्यक्षपद प्रसिद्ध विद्वान व भाषाशास्त्रज्ञ श्री. कृ. पां. कुलकर्णी यांच्याकडे होते व दुस-या परिसंवादाचे अध्यक्षपद मजकडे होते. माझ्या आठवणीप्रमाणे या परिसंवादाचा विषय 'बहुजनसमाज व साहित्य' असा होता. दोन्ही परिसंवाद चांगलेच रंगले. आमचा परिसंवाद तर फारच सुरेख झाला. माझे अध्यक्षीय समारोपाचे भाषण मी व्यासंगपूर्ण असे केले. माझे हे भाषण श्री. कृ. पां. कुलकर्णी यांना फार आवडले. तसे त्यांनी मला सांगितलेही. मी हे सर्व विसरून गेलो होतो. पण परवा कृ. पां. चे आत्मचरित्र 'कृष्णाकाठची माती' चाळत होतो तेव्हा त्यांनी या परिसंवादाचा मोठा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, हे जेव्हा मी पाहिले, तेव्हा आठवण ताजी झाली आणि आनंद झाला.

वकिलीचा धंदा हा असा चालू असताना राजकारण, मी पूर्वी सांगितले, त्याप्रमाणे अधिक स्पष्ट झाले होते आणि जनआंदोलनाच्या दिशेने चालले होते. राजकारणाकडे मी काही पाठ फिरवली नाही. त्या सालच्या एप्रिलमध्ये झालेल्या अलाहाबाद काँग्रेसनंतर निर्माण झालेल्या सर्व प्रश्नांचा अन्वयार्थ लावण्यासाठी आपण एकत्र बसले पाहिजे, असे के. डीं. नी सुचविले, तेव्हा आम्ही एका शनिवारी-रविवारी आमच्या चार-सहा मित्रांना निमंत्रण करून कोल्हापूर संस्थानातील कोडोली येथील आमच्या दोघांचे स्नेही श्री. विश्वनाथराव कोरे यांच्याकडे जायचे ठरविले.

विश्वनाथराव ऊर्फ तात्यासाहेब कोरे हे एक उत्कृष्ट सहकारी कार्यकर्ते म्हणून आज विख्यात आहेत आणि त्यांचा आणि माझा सर्व जन्मभर ऋणानुबंध वाढत गेलेला आहे. त्या वेळी ते व्यापार आणि शेती यांमध्ये लक्ष घालीत होते. त्यांचा 'डागमळा' म्हणून वारणाकाठी अत्यंत उत्तम प्रकारचे उसाचे पीक काढणारा शेतीचा उद्योग होता.

आम्ही योजलेली आमची ही बैठक आम्ही त्या डागमळ्यामध्येच घेतली. मला आठवते, के. डी., तात्या कोरे आणि इतर मित्रमंडळी हजर होती. अलाहाबादच्या काँग्रेसचा मला समजलेला अर्थ मी त्यांना स्पष्ट करून सांगितला. आणि या मतभेदांतून एक तर काँग्रेस फुटेल तरी, नाही तर गांधीजी आपल्या इच्छेप्रमाणे जनआंदोलन सुरू करतील, हा माझा कयास मी त्यांना सांगितला. त्यावेळच्या वातावरणाने आम्ही सगळे भारून गेलो असल्यामुळे के. डीं. नी तर त्याच ठिकाणी कबूल केले, की असे आंदोलन होणार असेल, तर तुमच्याबरोबरच आम्हीही आमच्या वकिलीला रामराम ठोकू. तात्यासाहेब कोरे यांची आम्हांला सहानुभूती होती.

आमच्या मित्रांपैकी परिस्थितीने सुखी असलेले ते गृहस्थ होते. पण मैत्रीला अत्यंत उत्तम. राष्ट्रीय विचार त्यांनी निष्ठेने स्वीकारलेले होते. त्या दिवसाची ती दुपार आणि संध्याकाळ या अनेकविध राजकीय व इतर चर्चांमध्ये रंगल्याची आठवण मला नेहमी होते. तात्या कोरे आम्हांला थट्टेने म्हणत,
"तुम्हांला हे उद्योग करावयाचे होते, तर वकिलीच्या पाट्या कशाला लावून बसलात?"

मी त्यांना सांगितले, "वकिलीचा अभ्यास करण्याचा निर्णय करण्यापूर्वी मी हा विचार केला, की वकिली आणि राजकारण हे एकत्र करता येते. जे चांगल्या तऱ्हेने करता येईल, ते करावयाचे. पण आमच्या जीवनात राजकारणाला प्राधान्य आहे. कारण राजकारण हे स्वातंत्र्याचे राजकारण आहे आणि आम्ही त्याला मनाने वाहून घेतले आहे."

अशा चर्चांमुळे आमचे जे निर्णय झालेले होते, ते अधिक स्पष्ट आणि स्वच्छ होत होते. के. डीं. शी ज्याप्रकारे माझे बोलणे होत होते, तसेच जिल्ह्यातील इतर मित्र-विशेषत: १९४२ सालच्या चळवळीमध्ये माझ्याशी संपूर्ण साथ केलेले माझे मित्र श्री. शांताराम इनामदार यांच्याशी या बाबतीत मी खूप चर्चा करत असे. माझ्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव असे आणि सर्व कामांत ते मला सहकार्य करीत होते.

कोर्टाची वेळ संपली, म्हणजे संध्याकाळी या मित्रांना बरोबर घेऊन राजकारणावरील गप्पा झोडीत बसणे हा आमचा आवडता उद्योगच होता. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे एका बाजूला राजकारण वेगाने पुढे जात होते आणि त्या वेगाच्या प्रवाहात आम्ही सापडून तिकडे खेचले जात होतो.
वर्धा वर्किंग कमिटीचा ठराव १९४२ च्या जुलैमध्ये पास झाला आणि आम्ही सर्व मित्रमंडळी पुन्हा एकदा कराडमधील आमच्या घरी एकत्र जमलो. त्यावेळी मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक होणार, असे जाहीर झाले होते, आणि या अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीमध्ये जितके जास्तीत जास्त मित्र घेऊन जाता येईल, तेवढे न्यायचे, असा माझा विचार होता.

के. डी. पाटील, आमदार चंद्रोजीराव पाटील, तात्या कोरे किंवा त्यांचे बंधू या सर्वांनी आमच्याबरोबर मुंबईला यावे, असे मी योजिले आणि मुंबईला जायच्या तयारीला लागलो. तेव्हा माझे लग्न होऊन एक-दीड महिना झाला होता. नवीन घरात नवीन लग्न झालेली तरुण पत्नी होती. तिच्याशी अजून हे सर्व राजकारणातील प्रश्न बोलू शकलो नव्हतो. पण आमचे आयुष्य कोणत्या दिशेला जाणार, हे केव्हा तरी तिला सांगितले पाहिजे, असे माझ्या मनात येत होते.

गणपतरावांना माझ्या विचारांची कल्पना मी दिली. त्यांनी सांगितले, की 'हे एकदम वेणूबाईला सांगून तू तिला घाबरवू नकोस, जसजशी परिस्थिती येईल, तसतसे पाहत राहू.' आईलाही थोडी-फार कल्पना द्यावयाचा मी प्रयत्न केला. ती थोडी दु:खी झाली. परंतु कदाचित अजूनही हे चळवळीचे संकट टळेल, अशी आशा ती मनात बाळगून राहिली.

जुलै महिना जसजसा जात होता, तसतसे देशातील राजकीय क्षेत्रात अपेक्षांचे वातावरण निर्माण झाले होते आणि या अपेक्षा अशा होत्या, की गांधीजींच्या निर्णयाचा विचार करून सरकार काही पावले पुढे येईल किंवा आपला जुना हट्ट कायम ठेवून देशामध्ये एक प्रकारचा विस्फोट होईल. अशा दोन्ही तऱ्हेच्या भावनांनी

वातावरण भरलेले होते. ७ ऑगस्टला मुंबईला आम्ही जाण्यापूर्वी जे चित्र होते, ते हे असे होते.

मुंबईच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सभेसाठी आम्ही बरेचजण जाणार होतो, म्हणून आमची राहण्याची व्यवस्था आम्ही खेतवाडीतील पानबाजारमध्ये श्री. कोरे यांच्या माहितीने केली होती. त्याच बिल्डिंगमध्ये माझे काही नातेवाईक राहत होते. त्यामुळे मलाही तेथे राहणे सोयीचे होते. आम्ही जवळजवळ दहा-बारा जण असे एकत्र राहत होतो. पानबाजाराच्या तिस-या किंवा चवथ्या मजल्यावरील दोन खोल्या आमच्यासाठी मोकळ्या करून दिल्या होत्या. आम्ही त्यांत जाऊन राहिलो.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक दिनांक ७ ऑगस्टला दुपारनंतर सुरू झाली, गवालिया टँकवरील ही अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची ऐतिहासिक बैठक मोठ्या थाटामाटाने सुरू झाली. लोकांमध्ये अमाप उत्साह होता. सर्व प्रमुख नेते मुंबईमध्ये आले असल्यामुळे त्यांच्या दर्शनासाठी लोकांची गर्दी फार होती.

आम्ही कार्यकर्ते म्हणून अधिवेशनाला हजर राहण्यासाठी लागणा-या प्रवेशपत्रिका मिळविल्या होत्या. त्यामुळे लवकर चांगली जागा मिळावी, म्हणून अधिवेशन सुरू होण्याच्या अगोदर जवळ जवळ दोन तास आम्ही आधीच मंडपात जाऊन पोहोचलो.

आज काय घडणार, या अपेक्षेमुळे आणि चिंतेमुळे माझे मन व्यग्र झाले होते. आज काही तरी नवीन, क्रांतिकारक घडणार, अशी भावना मनामध्ये होती. त्या दिवशी सकाळीच वर्किंग कमिटीची सभा झालेली होती आणि प्राथमिक औपचारिक गोष्टी झाल्यानंतर वर्किंग कमिटीतर्फे ठराव मांडण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू उभे राहिले.

त्यांनी 'भारत छोडो' अशा अर्थाचा प्रसिद्ध असलेला ठराव मांडला आणि त्यावर

त्यांनी दीर्घ भाषण केले व ठरावाची भूमिका स्पष्ट केली. आज त्यांच्या भाषणातील सर्व भाग माझ्या लक्षात नाही, पण त्यांनी असे सांगितल्याचे स्पष्ट स्मरते, "आमचा हा ठराव म्हणजे कोणाला धमकी नाही. हे सहकाराचे निमंत्रण आहे.'

हिंदुस्थानच्या राजकारणातील हे खरे सौंदर्यस्थळ होते. 'करू किंवा मरू' अशा तऱ्हेचा निर्धार करून लढ्यासाठी तयार झालेला देशाचा नेता त्या लढ्याची भूमिका मांडताना ती वैराच्या भावनेने तो मांडत नाही, तर सहकाराच्या भावनेने मांडतो आहे. गांधीजींच्या नेतृत्वाने हिंदुस्थानला जी देणगी दिली आहे, ती ही होय, असे वाटले. पंडितजींनी आपल्या भाषणात आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा वेध घेतला आणि स्वच्छ केले, की-
"आम्हांला फॅसिझमविरुद्ध लढण्याची इच्छा आहे. परंतु आम्ही ब्रिटिशांचे गुलाम म्हणून लढू इच्छीत नाही. फॅसिझमचा पराभव करण्यामध्ये भाग घेऊ इच्छितो - परंतु स्वतंत्र देशाचे सैनिक, म्हणून !'

या ठरावापर्यंत कसा प्रवास झाला, याचीही माहिती त्यांनी आपल्या भाषणात सांगितली. कोणते मतभेद झाले, वगैरे त्यांचा जाता जाता खुलासा त्यांनी केला आणि आपले भाषण संपविले. त्या ठरावाला पाठिंबा देण्याकरता म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांनी भाषण केले. त्यामुळे हा ठराव अखिल भारतीय काँग्रेस कमिटीपुढे संपूर्ण एकमताने मांडला जात होता, हे स्पष्ट झाले. पण या सर्वांमध्ये मौलाना आझाद यांनी प्रथमत: जे भाषण केले, ते त्यांच्या प्रामाणिकपणाचे, बुद्धिचापल्याचे आणि उत्कृष्ट वक्तृत्वाचे एक सुंदर चित्र होते. त्यांनी एका गोष्टीचा खुलासा केला आणि सांगितले,
" 'छोडो हिंदुस्थान' या घोषणेचा निश्चित अर्थ विचारण्याकरता म्हणून आम्ही वर्ध्याला जाऊन गांधीजींना भेटलो. तेव्हा त्यांनी आम्हांला असे स्पष्ट सांगितले, आम्ही ब्रिटिशांना हिंदुस्थानातून जा, असे सांगतो, याचा अर्थ इंग्रज माणसांनी आत्ताच्या आत्ता ताबडतोब हिंदुस्थान सोडला पाहिजे, असा नाही, तर ते हिंदुस्थानात राहू शकतात. पण माझ्या मनात आहे, ते ब्रिटिशांनी आपल्या सत्तेचा

ताबडतोब त्याग करावा. हिंदुस्थानात राज्यकर्ते म्हणून जे ब्रिटिश आहेत, ते हिंदुस्थानमध्ये मित्र म्हणून राहू शकतात."

गांधीजींनी त्यांना काय सांगितले होते, याचा उल्लेख त्यांनी मुद्दामहून एवढ्यासाठीच केला, की परदेशात आणि सरकारच्या बाजूने या संबंधाने पुष्कळसा गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला जात होता. सात तारखेची ही संध्याकाळची सभा महत्त्वाची भाषणे झाल्यानंतर स्थगित झाली.

आठ तारखेला सकाळी आणि दुपारनंतर अधिवेशन झाले. सकाळच्या अधिवेशनामध्ये ब-याच उपसूचना मांडल्या गेल्या. त्यांमध्ये कम्युनिस्टांच्या दोन-तीन उपसूचना होत्या. कम्युनिस्टांनी त्यांच्या बदललेल्या भूमिकेस अनुसरून ठरावातील लढ्याचा आदेश गाळला जाईल व त्याचे मूळ रूप बदलून टाकील, अशा या उपसूचना दिल्या होत्या.

आजपर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या सबबीचा वापर ब्रिटिश सरकारचे समर्थक करीत होते. आश्चर्य त्या दिवशी असे होते, की कम्युनिस्टांच्या उपसूचनांमध्ये जास्त भर या प्रश्नावर होता. जणू काही काँग्रेस हिंदू-मुसलमान ऐक्याच्या विरोधीच होती ! प्रश्न होता, तो आता प्राधान्य कशाला आहे? आता प्राधान्य हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीला आहे. आणि त्याला कसलाही अवधी लागता कामा नये, ही साधी गोष्ट आहे. ती कम्युनिस्ट समजू शकले नाहीत.

महात्मा गांधींनी या अधिवेशनात दोन भाषणे केली. मला जे स्मरते आहे, त्याप्रमाणे ठराव पास करण्याकरता प्रतिनिधींच्या पुढे मांडून त्यांनी तो ठराव स्वीकारण्यापूर्वी त्यांच्या जबाबदा-या कोणत्या आहेत, त्यांवर त्यांनी भाषण केले. आणि ठराव पास झाल्यानंतर जवळ जवळ दीड तास हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये ते बोलले. सभा चित्रासारखी तटस्थ बसली होती.

जेव्हा गांधीजी बोलत होते, तेव्हा एवढा मोठा सभामंडप माणसांनी चिक्कार भरून गेला होता. परंतु सुई पडली असती, तरी तिचासुद्धा आवाज ऐकू आला असता, अशी शांतता होती. मी तर माझे प्राण कानांत आणून ते भाषण ऐकले. माझ्या मनावर कायमचा परिणाम करणारे असे हे त्यांचे भाषण होते. त्यांनी ठरावाची भूमिका स्पष्ट मांडली. परंतु आता लोकांवर कोणती जबाबदारी आहे, ही गोष्ट स्पष्ट केली.

"मी काही तुमचा सेनापती म्हणून हे भाषण करीत आहे, असे नाही." असे त्यांनी स्पष्ट केले.

"मी एक सेवक आहे. मला जर काम करावयास संधी दिली, तर मी जसजसे प्रसंग येतील, तसतसे कार्यक्रम देईन. पण तुम्हांला एक गोष्ट स्वच्छच सांगू इच्छितो, की आजपासून तुम्ही सर्वजण स्वतंत्र झाला आहात, असे समजून काम करावयास लागा. हा शेवटचा लढा आहे आणि या लढ्याचा मंत्र 'करू किंवा मरू' असा आहे."

हे त्यांचे शब्द लोकांच्या अंत:करणात विजेसारखे चमकून गेले. मौलाना आझादांनी यानंतर एक भाषण केले आणि ठरावाला मान्यता मिळून ते अधिवेशन संपले.

भारून गेलेल्या मनाने आणि एका नव्या जबाबदारीच्या जाणिवेने आम्ही तो मंडप सोडला आणि आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी आलो. बरोबर श्री. के. डी. पाटील, चंद्रोजीराव पाटील, गौरीहर सिंहासने, शांताराम इनामदार आणि जिल्ह्यातील आणखी काही प्रमुख कार्यकर्ते होते. आम्ही परत आल्यानंतर, मध्यरात्र होऊन गेली, तरी अधिवेशनात झालेल्या भाषणांवर आणि त्यांतून आपल्यावर पडलेल्या जबाबदारीवर चर्चा करीत बसलो आणि थकून झोपी गेलो.

दुस-या दिवशी ऐतिहासिक नऊ ऑगस्टची सकाळ जी उजाडली, ती एका नव्या क्रांतीचे रूप घेऊनच. आम्ही ज्या इमारतीमध्ये राहत होतो, तेथून खाली गेलो, तेव्हा

मुंबई शहरातली सारी जनता रस्त्यावर आली असल्याचे दिसले. महात्मा गांधी आणि इतर नेते यांना आदल्या रात्री अधिवेशन संपताच पकडून मुंबईच्या बाहेर नेले होते, याची तोपर्यंत आम्हांला बातमी नव्हती, परंतु आता ती बातमी वा-यासारखी सर्व मुंबई शहरभर पसरली.

सगळीकडे हरताळ व रस्त्यांवर गर्दी करून घोषणा देणारी तरुण माणसे असे चित्र, आम्ही ज्या भागात राहत होतो, त्या भागात पाहिले. मुंबईचे हेही रूप एकदा पाहून घ्यावे, म्हणून मी माझ्याबरोबर एक-दोन माणसांना घेऊन चालत चौपाटीपर्यंत गेलो. चौपाटीवरून परत फिरून गिरगावच्या बाजूलाही जाण्याचा प्रयत्न केला, परंतु मोकळे हिंडणे एवढे सोपे नव्हते. जिकडे तिकडे कडक पोलिस बंदोबस्त होता. दगडफेक, लाठीमार, अश्रुधूर यांचा जीवघेणा खेळ सुरू झालेला होता.

तेथून आम्ही परत आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी आलो. ती दुपार आम्ही आमचा परतीचा कार्यक्रम कसा ठरवावयाचा, त्या चर्चेत घालविली. आमचा पहिला निर्णय असा होता, की आम्ही सगळेजण मिळून आलो होतो; पण जाताना असे मिळून, गर्दी करून जायचे नाही.

प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने आपापल्या गावी किंवा कार्यक्षेत्री जायचे, असे ठरले. हेतू हा होता, की ब्रिटिश सरकारने दडपशाहीचा नंगानाच सुरू केलेला आहे. त्यामध्ये भोळेपणाने जाऊन, पोलिसांच्या तावडीत सापडून, तुरुंगात जाण्याचा खेळ करावयाचा नाही. माझ्या मनात जे विचार होते, ते मी माझ्या मित्रांना सांगितले, आपण आजपर्यंत जे झगडे दिले, त्यांपेक्षा एका वेगळ्या पद्धतीने संघटना बांधली पाहिजे.

परत जाऊन, शक्य तितक्या सगळ्या कार्यकर्त्यांना तुरुंगात जाण्यापासून परावृत्त करून भूमिगत जीवन जगण्याची तयारी करायला सांगितली पाहिजे. तुरुंगाच्या जाळ्यात न सापडणे हे पहिले पाऊल. यामध्ये पुष्कळ कार्यकर्ते बाहेर राहिल्यानंतर मग प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम काय करावयाचा, हे आपण ठरवू. परत जिल्ह्यामध्ये

गेल्यानंतर एकमेकांना भेटण्याची गरज भासली, तर कसे भेटावयाचे, याच्या काही खाणाखुणा ठरवून आम्ही परत जायची योजना आखली आणि एक-दोन, एक-दोन अशी मुंबई सोडून आपापल्या कार्यक्षेत्राकडे निघालो. एकाच दिवशी सर्वांनी निघणे शक्य नव्हते. तेव्हा वेगवेगळ्या वेळी जाणे इष्ट, असे ठरवून त्याप्रमाणे कार्यक्रम ठरवला.

मी त्यानंतर एक दिवस मुंबईत जास्त राहिलो आणि दहा तारखेच्या रात्री पुण्यामध्ये पोहोचलो. पुण्यामध्येही लोकांची अशीच उत्स्फूर्त निदर्शने झाल्याचे मी ऐकले. पुढे रात्री रेल्वेच्या तिस-या वर्गाच्या गर्दीत बसून मी कराडच्या दिशेने माझा प्रवास सुरू केला आणि कराड स्टेशनच्या अलीकडे असणारे शिरवडे म्हणून स्टेशन आहे, तेथे पहाटे उतरलो. तेथून मसूर गाव जवळ होते. मसूर गावामध्ये बरेच प्रसिद्ध कार्यकर्ते होते. त्यांनाही अटक झाल्याची बातमी मला कोणी तरी सांगितली. तेव्हा मसूरमध्ये न जाता इंदोलीला जावे, असा मी माझ्या मनाशी बेत केला आणि हातात असलेली छोटीशी बॅग घेऊन मी पायीच इंदोलीच्या दिशेने निघालो.

लोकांमध्ये भावना जागृत झाल्या होत्या. नव्या जाणिवा निर्माण झाल्या होत्या. जसा एखादा विचार जादूने सगळीकडे एकदम पसरावा, तसा 'छोडो भारत'चा संदेश सगळीकडे जाऊन पोहोचला होता, असे मला दिसले. कारण मी बॅग घेऊन चालताना उजाडल्यानंतर मला कोणी तरी पाहिले आणि येऊन विचारले,
"इकडे कुठे जाणार?"
मी त्याला सांगितले,
"जास्त चर्चा करू नका. तुम्हांला यायचे असेल, तर माझ्याबरोबरच चला."
अनोळखी तरुण माणूस, पण त्याने माझी बॅग घेतली. मी त्याला सांगितले,
"माझ्याबरोबर इंदोलीला चला."

मध्ये आम्हांला कृष्णा ओलांडून जायचे होते. तेव्हा एके ठिकाणी जेथे उतार होता, अशा ठिकाणी त्या माणसाने मला नेले आणि बराच वेडावाकडा रस्ता काढून आम्ही

पेर्ल्याहून सातारा रस्ता ओलांडून इंदोलीच्या आसपास आलो. मी गावाच्या बाहेर थांबून गावातील माहिती काढावयाचा प्रयत्न केला आणि तेथील आमचे कार्यकर्ते पुढारी दिनकरराव निकम यांना निरोप पाठवून बोलावून घेतले. बराच वेळ जाऊ दिल्यानंतर दिनकरराव आपल्या एक-दोन मित्रांसह आले आणि आम्ही एकमेकांना मोठ्या प्रेमाने भेटलो. मी त्यांना मुंबईत काय घडले, याचा इतिहास सांगितला. भविष्यात कोणत्या पद्धतीने काम करावयाचे आहे, याविषयी माझी कल्पना दिली. दिनकररावांना तर आंदोलनाचा कार्यक्रम पहिल्यापासूनच हवा होता. त्यामुळे ते एक प्रकारे उत्सुकच होते. मग तेथून उठून आम्ही एका बाजूच्या शेतीच्या ठिकाणी गेलो. त्यांनी सुचविले,
"गावामध्ये जाऊन लगेच बैठक मारणे ठीक होणार नाही. तुम्ही प्रवास करून आला आहात, तर थोडा विसावा घ्या. मग पुढे काय करावयाचे, याचा आपण विचार करू."

या तऱ्हेने माझ्या भूमिगत जीवनाचा श्रीगणेशा झाला. याच्यापुढे काय काय करावयाचे, याची मी मनाशी योजना करू लागलो. माझे पहिले काम हे होते, की पहिल्या प्रथम कराडमध्ये जाऊन कराडच्या माझ्या सर्व कार्यकर्त्या मित्रांना नव्या झगड्याचे रूप आणि कार्यक्रमाची रूपरेषा द्यावयाची. ते मी तातडीने केले पाहिजे आहे. तो दिवस मी इंदोलीत काढून दुस-या दिवशी आधी निरोप पाठवून कराडला गेलो.

यावेळी एक गोष्ट सांगितली पाहिजे, की मुंबईतून निघण्यापूर्वी मी सौ. वेणूबाईला एक सविस्तर पत्र लिहून घडलेल्या गोष्टी आणि नवीन येणारे संकटाचे जीवन याची थोडी-फार कल्पना दिली. तिला घेऊन मी एका वादळात शिरत आहे, याबद्दल तिची क्षमा मागितली आणि ते पत्र घरच्या पत्त्यावर पोस्टात टाकून दिले होते. ते तिने वाचल्यानंतर तिला काय वाटले, ते मी नंतर विचारले नाही. परंतु आमच्या घरात आता येऊन तिला दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ झाला होता. तिला थोडी-फार कल्पना आली असली पाहिजे.

मी ज्या दिवशी कराडला गेलो, त्या दिवशी, आम्ही ज्या वाड्यात राहत होतो, तेथेच राहणारे आमचे मित्र नाराणराव घाटगे त्यांच्या घरी जाऊन मी माझा मुक्काम केला. गेल्या तीन-चार  दिवसांमध्ये मी इतका प्रवास पायी, सायकलने आणि रेल्वेने केला होता, की एकदम थकून गेलो होतो. मी त्यांना सांगितले, की मला चांगली सहा तास झोप मिळेल, अशी व्यवस्था करा. घाटगे मंडळींनी मी आल्याची बातमी फक्त गणपतरावांना दिली आणि माझी निवांत झोपण्याची व्यवस्था करून ते आपल्या कामाला निघून गेले. मला आठवते, की त्यावेळी मी त्या दिवशी अखंड दहा तास झोपलो होतो. जाग आल्यावर ताजातवाना झालो आणि कामाची आखणी सुरू केली. शांताराम इनामदार यांना बोलावून घेतले आणि कराडमधील आपल्या सगळ्या कार्यकर्त्यांना त्या रात्री कुठे तरी भेटले पाहिजे आहे, त्याची व्यवस्था करायला सांगितली. शांताराम बापू या योजना करण्यात मोठे तरबेज होते. त्या रात्री आम्ही आमचे वर्गबंधू विंगकर यांचा मोठा वाडा होता, त्या वाड्याच्या माडीवर निरोप पाठवून बैठक घेण्याची व्यवस्था केली. मी त्या रात्री तेथे गेलो, तेव्हा तेथे पंचवीस एक माणसे जमली होती. मी जे सांगत होतो, ते चळवळीचे रूप सगळ्यांना नवीन होते. परंतु  त्यांना आनंद यात होता, की अशा प्रकारच्या चळवळीत प्रत्येकाला काही ना काही काम करता येईल. त्या बैठकीला कराडमधले जुन्यापैकी श्री. वामनराव फडके वकील हे हजर होते, असे मला स्मरते आहे.

कामाची आखणी कशी करावयाची, याची बोलणी झाली आणि मी त्यांना सांगितले, की पहिले काम मी हे ठरविले आहे, की जितक्या ठिकाणी जाता येईल, तितक्या ठिकाणी जाऊन तेथील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना भेटता येईल, तेवढ्या कार्यकर्त्यांना भेटावयाचा मी लवकरात लवकर प्रयत्न करणार आहे. मग प्रवास कसे करावयाचे, याचे सगळे बारकावे ठरले आणि दुस-या दिवशी पहाटेस मी कराडमधून बाहेर पडलो. किंचितसा अंधार, किंचितसा प्रकाश अशा वेळी कृष्णेच्या संगमावर आलो, तेव्हा माझ्यासाठी तेथे नाव उभी होती, असे दिसले. नावेत बसून मी संगमावरून गोट्याला गेलो. हे एक छोटेसे गाव आहे. हे सातारा रोडला जवळ पडते.

गोट्याहून मी पिकापिकांतून सातारा रस्त्याच्या जवळ आलो. तेव्हा थोड्या अंतरावर श्री. शंकरराव बेलापुरे म्हणून माझे स्नेही होते, ते उत्तम मोटार-सायकल चालवीत असत, ते माझी तेथे वाटच पाहात होते. मी आल्याची खूण करताच ते मोटार-सायकल घेऊन माझ्या जवळ आले. त्यांनी मला सांगितले,
"बसा पाठीमागे. निघू या आपण."
आमच्या भूमिगत आयुष्यातील भटकंतीची ही अशी सुरुवात झाली.

कराडला पोहोचल्यापासून पहिल्या आठ दिवसांत मी कवठे, तांबवे, येळगाव अशा अनेक ठिकाणी जाऊन आलो. कवठ्याची भेट मला आठवते आहे. मी आधी श्री. किसन वीरांना निरोप पाठविला होता, की मी येतो आहे. त्याप्रमाणे ते माझी वाट पाहत होते. आम्ही चळवळीच्या पहिल्या दीड दोन महिन्यांत जे भूमिगत जीवन जगत होतो, ते त्या वेळच्या परिभाषेत ठीक आहे, परंतु खरे म्हणजे आम्ही फार मोकळेपणाने हिंडत फिरत होतो. लोकांची मने भारावलेली होती त्यामुळे भूमिगत राहणे म्हणजे लपून छपून राहणे असे त्याला स्वरूप तेव्हा नव्हते.

पुढे पुढे ऑक्टोबरच्या सुमारास पोलिसांचे अत्याचार आणि छळ वाढल्यानंतर मात्र त्याला ख-याखु-या अर्थाने भूमिगत जीवनाचे साहसी स्वरूप आले. या पहिल्या काही आठवड्यांत आम्ही भूमिगत होतो, याचा अर्थ, एवढाच होता, की पोलिसांच्या समोर उभे राहून 'मी यशवतं चव्हाण' किंवा आणखी कोणी, असे सांगून पकडण्याचे निमंत्रण आम्ही त्यांना देत नव्हतो. कारण छोटे छोटे पोलीस कॉन्स्टेबल जे आम्हांला ओळखत होते, त्यांनी आम्हांला किती तरी वेळा, हिंडता फिरताना पाहिले होते. जे मिळेल, ते वाहन-त्याने प्रवास करावयाचा, असा आमचा परिपाठ होता. कधी बैलगाडी, कधी सायकल, तर कधी मोटार-सायकल, तर कधी रेल्वे, तर कधी पायीसुद्धा असा आमचा प्रवास चालत असे. कवठ्याला मी असाच सायकलवरून जाऊन पोहोचलो होतो. सातारा शहराची हद्द ओलांडेपर्यंत एका मित्राच्या मोटारीतून गेलो आणि तेथून पुढचा प्रवास मी सायकलवरून केला. कवठ्याला पोहोचल्यानंतर मी पाहतो, तर आबांनी जाहीर सभाच बोलावून ठेवली होती. माझ्या आठवणीप्रमाणे

कवठे गावातील ती माझी पहिलीच जाहीर सभा होती. पूर्वी मी कवठ्याला येऊन गेलो असेन, चर्चेत भागही घेतला असेन, पण माझी जाहीर सभा ही अशी ती पहिलीच होती. भूमिगत यशवंतराव आले आहेत, अशी गावामध्ये हाळी दिली होती आणि कवठे आणि त्याच्या आसपासच्या गावांतील मंडळी त्या सभेला जमली होती. मी निवांत पाऊण तास त्या सभेत बोललो आणि ती सभा संपविली. मग मात्र आबा म्हणू लागले,

"आपण आता गावात थांबावयाचे नाही. मी बाहेर तुमची व्यवस्था केली आहे."

त्यांना शंका होती, की जाहीर सभेची बातमी कळताच कदाचित तालुक्याचे ठाणेदार आपला फौजफाटा घेऊन तेथे येतील. ते त्या रात्री आले नाहीत, पण दुस-या दिवशी सकाळी आलेच. पण ती रात्र त्यांनी आम्हांला सवड दिली, ही गोष्ट खरी आहे. त्या रात्री किसन वीरांशी माझी जी जी बोलणी झाली, त्यांमध्ये आम्हां सर्वांच्या पुढे महत्त्वाचा विषय होता, तो हा, की या चळवळीला निश्चित रूप काय द्यावयाचे? सर्व कार्यकर्त्यांना तुरुंगात जाण्यापासून परावृत्त करण्याचे काम पुष्कळ यशस्वी झाले होते आणि त्यामुळे हळूहळू भूमिगत कार्यकर्त्यांचा एक फौजफाटाच तयार झाला होता, असे म्हटले, तरी चालेल. तालुक्या-तालुक्यांतून, गावा-गावांतून स्वत:ला भूमिगत समजणारे अनेक कार्यकर्ते उभे राहिले होते. पण या कार्यकर्त्यांच्या शक्तीवर कसा उठाव करावयाचा, हा आमचा पुढचा महत्त्वाचा प्रश्न होता. आबांची आणि माझी याच प्रश्नावर त्या रात्री चर्चा झाली. मला त्या वेळी चार-सहा महत्त्वाचे कार्यक्रम डोळ्यांपुढे दिसत होते. चळवळीच्या पाठीमागे जोपर्यंत जनतेचा स्वयंस्फूर्तीने उघड-उघड पाठिंबा उभा आहे, तोपर्यंत ब्रिटिश सत्तेची प्रतीकात्मक अशी जी सत्तास्थाने असतील, त्यांच्याविरुद्ध काही तरी उठाव केले पाहिजेत, असे मला वाटत होते आणि म्हणून मी सर्व कार्यकर्त्यांसमोर मोर्च्याची कल्पना मांडत होतो. माझी मोर्च्याची कल्पना अशी होती, की निवडक, सर्व नव्हेत, जे कार्यकर्ते विशेषत: वेळ पडली, तर जेलमध्ये गेले, तरी चालतील, अशा कार्यकर्त्यांच्या पाठीमागे जनतेचा मेळावा घेऊन त्यांनी ब्रिटिश सत्तेचे जे तालुक्याचे केंद्र आहे, त्या केंद्रापुढे जाऊन निदर्शन करावे आणि त्या मोर्च्याचे नेतृत्व करणा-या

कार्यकर्त्याने तालुक्याच्या मामलेदार कचेरीवर झेंडा लावायचा प्रयत्न करावा. ब्रिटिश सत्तेचा पाडाव झाला, अशी भावना लोकांत निर्माण करणे आणि त्यांच्यांत आत्मविश्वास वाढविणे याची गरज होती, म्हणून या कार्यक्रमाचा मला मोह होता. आबांना मी ही कल्पना सांगितली आणि त्यांना ती फक्त पहिले पाऊल म्हणून मान्य झाली. त्यांनी मला सांगितले, की एक-दोन तालुक्यांत प्रत्यक्ष करून दाखवा, म्हणजे इतरत्र फैलाव होईल. आमच्यापुढे दुसरे कार्य जे होते, ते पुढे हळूहळू क्रियाशील होऊ लागले; पण त्यातील मोर्च्याची जी चळवळ होती, ती ह्या भूमिगत चळवळीचे पहिले पाऊल होते.

मी कवठ्याहून परत कराड तालुक्यात गेलो आणि कराडचा मोर्चा २४ ऑगस्टला मामलेदार कचेरीवर न्यायचा, या दृष्टीने तयारीचे काम सुरू केले. यासाठी मला तांबव्याला जाऊन श्री. काशिनाथपंत देशमुख यांच्याशी बोलावे लागले. त्यांनाही ही कल्पना पसंत होती. कारण हा लढा अहिंसात्मक पद्धतीने चालावा, ह्या गोष्टीवर त्यांचा भर होता. माझाही त्यांच्याशी काही मतभेद नव्हता. परंतु अहिंसेचा फार तांत्रिक आणि मर्यादित अर्थ करून चालणार नाही, असे मी त्यांच्याशी आग्रहाने मांडत होतो. परंतु त्यांचा मोर्च्याच्या कल्पनेला पाठिंबा असल्यामुळे माझे काम सोपे झाले. कारण ते अतिशय लोकप्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी तांबवे आणि आसपासच्या खेड्यांतील लोक मिरवणुकीने २४ ऑगस्टला मामलेदार कचेरीवर येतील, अशी व्यवस्था केली. आम्हां कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होऊन या मोर्च्याचे नेतृत्व कोणी तरी प्रौढ व पोक्त माणसाने करावे, म्हणून कराड तालुक्यातील काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते श्री. बाळासाहेब पाटील उंडाळकर यांनी या मोर्च्याचे नेतृत्व करावे, असे ठरले. कराड शहरातून या मोर्च्यामध्ये अनेक माणसांनी भाग घ्यावा, अशी आम्ही तयारी केली होती. श्री. शांतारामबापू, कासेगावकर वैद्य, सदाशिवराव पेंढारकर आणि तरुण पिढीतील नवीन मुलांची एक सेनाच कराड शहरात उभी राहिली होती, असे मी पाहिले. या तरुण सेनेचे नेतृत्व श्री. महादेव जाधव यांनी केले. पुढे आम्ही त्यांना माधवराव जाधव असे संबोधू लागलो. उत्कृष्ट खेळाडू आणि निधड्या छातीचे क्रांतिकारक असा त्यांचा पुढे लौकिक झाला.

कराड आणि आसपासच्या खेडेगावांतील लोक हजारोंच्या संख्येने कराडच्या मामलेदार कचेरीपुढे जमले. मामलेदार कचेरीच्या मैदानात झेंडा घेऊन गेले. पोलिसांनी श्री. बाळासाहेब उंडाळकरांना अटक केली. त्यांच्या समवेत असलेल्या आणखी काही लोकांना अटक झाली. लाठीधारी पोलिसांची एक मोठी रांगच्या रांग मामलेदार कचेरीच्या आतील बाजूला उभी केली होती. सर्व लोक आपला विजय झाला, या भावनेने आपापल्या गावी परत गेले. आमचा हा मोर्च्याचा पहिला प्रयत्न होता आणि तो यशस्वी झाला.

या मोर्च्यानंतर जिल्ह्यात इतर ठिकाणी असेच मोर्चे काढावयाचे, असे ठरले. तशी सूचना आम्ही आमच्या मित्रमंडळींच्या द्वारे आणि पत्राने इतर तालुक्यांच्या ठिकाणी दिल्या. किरवे गावाच्या शेजारी तालुक्यातील विठ्ठलबुवा मावशीकर आणि सुपने येथील बाबा शिंदे वगैरे अनेक भूमिगत कार्यकर्त्यांची एक बैठक त्याच सुमारास मी घेतली. अवती-भोवती पिकांची दाटी होती आणि समोर संगमाचा डोह होता. यामुळे तेथे चर्चेसाठी निवांत जागा होती. ही सभा माझ्या लक्षात राहण्याचे कारण म्हणजे पाटणच्या मोर्च्याची तयारी करण्याचे काम श्री. विठ्ठलराव मावशीकर आणि त्यांचे सहकारी यांनी कबूल केले होते. त्या ठिकाणी या चळवळीची पुढे वाढ कशी करावयाची, यासंबंधीचे अनेक प्रश्न कार्यकर्त्यांनी विचारले आणि त्या प्रश्नांची मी जी उत्तरे दिली, त्याची स्मृती अजून मला आहे. मी त्यांना त्या वेळी सांगितले, की या मोर्च्याच्या चळवळीनंतर आपल्याला दुसरेही काही कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. म्हणून मी त्यांना पाच-सहा कलमी कार्यक्रमांची कल्पना दिली. यावेळी समाजवादी पक्षातर्फे राष्ट्रीय स्तरावर जे काम चालू होते, त्याच्या पत्रिका आणि सूचना यांचा प्रसार होत होता. त्याच्या आधारे मला काही मंडळींनी प्रश्न विचारले. माझी भूमिका स्पष्ट होती. अगदी त्यांच्या सूचना व हुकूम याप्रमाणे काम करण्याची आपल्याला गरज नाही. आपण काँग्रेसच्या नेतृत्वाखाली काम करीत आहोत, तेव्हा काँग्रेसच्या मूळ धोरणाला सुसंगत असे जे कार्यक्रम असतील, तेच आपण स्वीकारू आणि करीत राहू. जनमनावरचे ब्रिटिश सत्तेचे वर्चस्व कमी

करावयाचे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. ब्रिटिश सत्ता ही हिंदी जनसामान्याच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल जे भय आहे, त्या भयावर त्या सत्तेचे अस्तित्व आहे. लोकांच्या मनातून हे भय दूर झाले, म्हणजे ब्रिटिशांची सत्ता आपोआपच कोलमडून पडेल. ही एक दृष्टी, आणि दुसरे म्हणजे जे युद्ध त्यांनी आमच्यावर लादलेले आहे, तो युद्धप्रयत्न यशस्वी होणार नाही, अशा तऱ्हेचे प्रयत्न करणे. यासाठी जे काही करता येईल आणि काँग्रेसच्या ध्येय-धोरणात जे बसेल, ते आपणांस केले पाहिजे. शेतकऱ्यांची संघटना आपण बांधू शकलो, तर करबंदीसारखी चळवळसुद्धा आपण हाती घेऊ शकू. त्यासाठी सरकारधार्जिणी असणारी जी खेड्यांतील वर्चस्व असणारी मंडळी आहेत, त्यांना लोकमतापुढे कमजोर करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. अशा तऱ्हेच्या चर्चा तेथे झाल्या आणि जेव्हा जेव्हा कार्यकर्त्यांपुढे पुढले दोन-तीन महिने मला बोलावे लागले, तेव्हा मी त्यांना माझा हा दृष्टिकोन सांगत असे.

कराडचा मोर्चा झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात मोर्च्यांची एक मोठी चळवळ उभी राहिली, असे म्हटले, तरी चालेल. कराडनंतर पाटणला मोर्च्याचा कार्यक्रम झाला व त्यानंतर अत्यंत यशस्वी असा मोर्चा तासगावला झाला. या मोर्च्यामध्ये श्री. विठ्ठलराव पागे, कृष्णराव कुऱ्हाडे, गोविंदराव खोत ही मंडळी प्रमुख होती. विठ्ठलराव पागे यांची माझी गाठ पडली नव्हती. त्यामुळे त्यांची माझी या बाबतीत चर्चा झाली नव्हती.

मोर्च्याच्या आदल्या दिवशी किर्लोस्करवाडीला माझ्या इतर एक-दोन सहकाऱ्यांच्या सोबतीने, आमच्या नेहमीच्या पद्धतीने सायकलवरून अधलेमधले रस्ते काढत या मोर्च्याच्या तयारीची बैठक किर्लोस्करवाडीत घेतली. गोविंदराव खोत हे किर्लोस्करवाडीपासून जवळच असलेल्या अमणापूर गावचे मोठे प्रसिद्ध कार्यकर्ते होते. किर्लोस्करवाडीतील कामगार मंडळींत त्यांना मोठा मान होता.

कृष्णराव कुऱ्हाडे हे पलूस येथील प्रमुख कार्यकर्त्यांमधील एक अग्रेसर कार्यकर्ते होते. ते आणि इतरही कार्यकर्ते त्या बैठकीस हजर होते. मी पाठीमागे या चर्चांचा उल्लेख

केला, त्या चर्चा येथेही झाल्या. चळवळ पुढे कशी वाढवावयाची, त्यांची सुरुवात मोर्च्यापासून करणे कसे आवश्यक आहे, या सर्व गोष्टी मी स्पष्ट  केल्या. त्या मंडळींनी आमचा निरोप घेतला आणि तो दुसरा दिवस आम्ही किर्लोस्करवाडीमध्येच काढला. आमचा मुक्काम तेव्हा किर्लोस्करवाडीतच आमच्यांत काम करीत असलेल्या भूमिगत कार्यकर्त्यांतील एक प्रमुख कार्यकर्ते श्री. सदाशिव पेंढारकर यांच्या राहत्या जागी होता.

दुस-या दिवशी तासगावच्या मोर्च्याच्या ज्या हकीकती आम्हांला किर्लोस्करवाडीला कळल्या, त्यांवरून तो मोर्चा फारच यशस्वी झाला, असे म्हटले पाहिजे. लोकांनी आपल्या प्रचंड शक्तीने तेथील महसूल अधिकारी श्री. निकम म्हणून होते, त्यांना नैतिक दृष्ट्या जिंकले. निकमांच्या डोक्यावर गांधी टोपी घालून मामलेदार कचेरीवर तिरंगी झेंडा फडकविला आणि गांधींच्या जयजयकाराच्या जल्लोशात हा मोर्चा परत फिरला.

माझ्या कल्पनेने तासगावचा हा मोर्चा चळवळीच्या यशाचे मोठे प्रतीक होते. त्याचं श्रेय तालुक्यातील कार्यकर्ते आणि पुढारी यांना आहे. या यशामुळे मोर्च्याची कल्पना सर्व जिल्ह्यामध्ये फैलावू लागली. माझ्या कल्पनेप्रमाणे, तासगावच्या या यशस्वी मोर्च्याने ब्रिटिश सत्तेचे सर्व प्रमुख अधिकारी फार अस्वस्थ झाले, हे त्यानंतर त्यांनी केलेल्या उपाययोजनेमुळे स्पष्ट झाले. कारण त्यानंतर इस्लामपूर आणि वडूज या दोन ठिकाणी जे मोर्चे झाले, त्या ठिकाणी पोलिसांकडून जो अत्याचार झाला, त्यावरून हे स्पष्ट होते, की ब्रिटिश सरकारने या मोर्च्याची एक प्रकारची हाय घेतली होती.

वडूजच्या मोर्च्याच्या आदल्या रात्री मी आणि गौरीहर सिंहासने आणि इतर सर्वजण जयरामस्वामींचे वडगाव येथे भेटलो. मोर्च्याच्या नेतृत्वाचा निर्णय आधीच झाला होता. श्री. परशुराम घार्गे हे त्या तालुक्यातील अतिशय माननीय असे पुढारी होते. त्यांनी ह्या मोर्च्याचे नेतृत्व करावे, असे ठरले होते.

काँग्रेसच्या तत्त्वाप्रमाणे आम्ही अत्यंत शांततेने मोर्चा काढणार आहोत, असा निरोप आधी श्री. बंडोपंत लोमटे यांनी सरकारी अधिकाऱ्यांना पाठविला होता. वडगावच्या लोकांनी एक मिरवणूक  काढून श्री. परशुराम घार्गे व त्यांच्या साथीदारांना निरोप दिला. वडगावच्या निरोप-समारंभानंतर मी पुसेसावळीला श्री. अयाचितांकडे गेलो.

त्या वेळचा प्रवासही मी असाच एका मोटार-सायकलच्या पाठीमागे बसून केला होता. त्या वडूजच्या मोर्च्याचा इतिहास आता प्रसिद्ध झाला आहे. त्या ठिकाणी अमानुषपणे गोळीबार करून कित्येक माणसे ठार मारली. त्यांमध्ये परशुराम घार्गे आणि त्यांचे इतर साथीदार हे प्रमुख होते. परशुराम घार्गेंचे हौतात्म्य हा आमच्या १९४२ च्या चळवळीचा एक मानबिंदू होता. त्यांचे नाव अमर झाले.

इस्लामपूरच्या मोर्च्याबाबतही असाच प्रकार घडला. तासगावच्या मोर्च्याच्या आदल्या रात्री आम्ही किर्लोस्करवाडीमध्ये असताना सदाशिवराव पेंढारकरांचे एक मित्र श्री. पंड्या इंजीनियर हे आमच्यामध्ये येऊन बसत. ते मूळचे उत्तर प्रदेशातले, परंतु किर्लोस्करवाडीला एक तज्ज्ञ म्हणून नोकरीसाठी आले होते. हा शरीराने बलदंड, बुद्धिमान व देशभक्त असा तरुण होता.

दुस-या दिवशी तासगावच्या मोर्च्याची हकीकत ऐकून त्यांना एकदम अशी स्फूर्ती आली आणि त्यांनी जाहीर केले, की तासगावच्या मोर्च्यात जाऊ शकलो नाही, म्हणून आता इस्लामपूरच्या मोर्च्यात आपण सामील होणार. त्याप्रमाणे ते दोन-तीन दिवसांतच झालेल्या इस्लामपुरच्या मोर्च्यात सामील होण्यासाठी गेले आणि त्या मोर्च्यात जी दोन माणसे पोलिसांच्या गोळीबारात बळी पडली, त्यांत श्री. इंजीनियर पंड्या हे एक होते. मला ही गोष्ट वारंवार अस्वस्थ करते, ती ही, की त्यांनी मोर्च्यामध्ये जाण्याचा जेव्हा निर्णय घेतला, तेव्हा मी तेथे हजर होतो. त्यावेळी माझ्या मनात येऊन गेले, की त्यांना त्यापासून परावृत्त करावे. मी त्यांना तसे सुचविलेही, परंतु ते त्यांनी मानले नाही. ते म्हणाले,

"मला एकदा पाहायचे आहे तुमच्या महाराष्ट्रातील जनतेची चळवळ कशी असते, कशी चालते. तीमध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन अनुभव घेतल्याशिवाय ते समजणार नाही."

मी ही गोष्ट अशासाठी नोंदतो आहे, की त्या गोष्टीची माझ्या मनाला अजूनही चुटपुट लागून आहे, की मी त्यांना परावृत्त करू शकलो असतो, तर बरे झाले असते. तरुण पत्नी घरात ठेवून ते इस्लामपूरला गेले आणि पुन्हा कधीच परतले नाहीत.

इस्लामपूरच्या मोर्च्याची तयारी श्री. पांडू मास्तर म्हणून आमच्या जिल्ह्याचे फार मोठे नेते होते, त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. येडे निपाणीच्या डोंगराजवळ मोर्चेवाले हजारोंनी जमले होते. सर्व मोर्च्यांच्या माझ्या परिपाठाप्रमाणे मी व के. डी. पाटील येडे निपाणीच्या त्या ठिकाणी, ज्या ठिकाणाहून मोर्च्याची सुरुवात होणार होती, तेथे हजर राहिलो होतो आणि त्यांच्याबरोबर चालत चालत कामेरीच्या पुढे मैलभर इस्लामपूरच्या बाहेर थांबलो होतो. या मोर्च्यामध्ये प्रत्यक्ष भाग घेण्यास लोक मला मज्जाव करीत असत, म्हणून मी बाहेर थांबत असे. इस्लामपूरच्या मोर्च्यावर गोळीबार करून मोर्चा पांगविण्याचा प्रयत्न सरकारी अधिकाऱ्यांनी केले. त्यात ते यशस्वी झाले. श्री. पांडू मास्तर व त्यांचे काही साथीदार यांना पोलिसांनी अटक केली आणि तेथून परतलेल्या माझ्या मित्रांनी आम्ही जेथे थांबलो होतो, तेथे येऊन काय काय घडले, ते सर्व मला सांगितले. लोक पांगून जरी परत आले होते, तरी सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबाराच्या अत्याचारामुळे ते चिडून गेले होते. त्यांनी परत जाऊन उत्साहाने काम करण्याचा आपला मनोदय जाहीर केला. आम्ही एकमेकांचा निरोप घेतला आणि आपापल्या ठिकाणी निघून गेलो.

कराड, पाटण, तासगाव, वडूज आणि इस्लामपूर या ठिकाणी झालेले हे मोर्चे १९४२ च्या चळवळीच्या इतिहासातले एक सोनेरी पान आहे, असे मी मानतो.
जनआंदोलनाने उग्र स्वरूप घेतल्यानंतर लोक कुठल्याही स्वार्थत्यागाला कसे तयार

होतात, याचे विराट दर्शन या निमित्ताने आम्हां सर्वांना झाले. परंतु सरकारी अत्याचाराने संघटित रूप घेऊन भूमिगत चळवळीवर प्रखर प्रहार करण्याचा निर्णय घेतलेला दिसला. त्याची सुरुवात ह्या गोळीबारामुळे झाली, असे म्हटले पाहिजे. या सर्व गोष्टींच्या चर्चा करण्यासाठी आम्ही सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी असे ठरविले, की कुठे तरी एके ठिकाणी बसून सरकारने घेतलेल्या या धोरणानंतर आपण पुढचे पाऊल कसे टाकावे, याचा विचार केला पाहिजे. ह्या वेळपर्यंत जिल्ह्यामध्ये आपापल्या स्वतंत्र नेतृत्वाखाली वेगळे वेगळे गट स्वयंस्फूर्तीने काम करीत होते. मी कराड हे केन्द्र करून त्याच्या आसपास काम करीत होतो. परंतु अधूनमधून निरोप पाठवून, कधी पत्र पाठवून, कधी प्रत्यक्ष भेटीचा प्रयत्न करून या सर्व गटांशी अप्रत्यक्ष संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो.

कुंडल हे केंद्र धरून क्रांतिवीर नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली काम करणारी फार मोठी कार्यकर्त्यांची संख्या होती. त्यांच्यामधून क्रांतिवीर जी. डी. बापू यांनी पुढे फार मोठ्या स्वरूपाचे काम केले.

सांगलीला श्री. वसंतराव पाटील यांना केंद्र समजून त्यांच्या भोवती एक तरुण कार्यकर्त्यांचा असाच एक मोठा संच काम करीत होता. श्री. वसंतराव पाटील यांचे या चळवळीतील कार्य एका पराक्रमी पुरुषाचे होते. त्यांचे संघटना-कौशल्य हे त्यांच्या पुढच्या यशस्वी जीवनात अधिकच डोळ्यांत भरते.

वाळवे तालुक्यातील बरडे गुरुजी हे एक स्वतंत्र प्रवृत्तीचे क्रांतिकारी होते. त्यांनी आपल्या पद्धतीने शिराळा पेटा आणि वाळवे तालुक्यातील काही भाग यांमध्ये काम करावयास सुरुवात केली होती.

एक गोष्ट मला येथे नमूद केली पाहिजे, ती म्हणजे या वेळी कवठ्याला किसन वीरांशी आम्ही बोलणे करून आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांच्या पुण्याच्या प्रवासात ते पकडले गेले आणि आमची एक प्रकारे मोठी निराशा झाली. जेलमधून

त्यांचे निरोप येऊ लागले, की 'आम्ही तयारी करीत आहोत, संधीची वाट पाहत आहोत, प्रसंग पडला, तर आम्ही जेल फोडून बाहेर येऊ.' किसन वीर हे आमच्यांतून जेलमध्ये गेल्यामुळे आमच्या कार्याची शक्ती कमी झाली होती. ते बाहेर येण्याची आशा दाखवीत होते, पण ते कितपत शक्य आहे, याची आम्हांला कल्पना नव्हती.

पुढे तीन महिन्यांनंतर त्यांनी आपला दिलेला शब्द खरा केला आणि श्री. छन्नूसिंग, पांडू मास्तर वगैरे इतर मित्रांसह ते येरवडा जेल फोडून बाहेर आले. किसन वीर जेल बाहेर येऊन जेव्हा सातारा जिल्ह्यामध्ये आले, तेव्हा त्यांना प्रथम कराडच्या आसपास आणण्याची व्यवस्था मी केली होती आणि त्यांना भेटून त्यांच्या गैरहजेरीत सातारा जिल्ह्यात काय काय घडले, याची हकीकत मला जशी माहीत होती, तशी त्यांना सांगितली.

भूमिगत चळवळ ही आरंभी जनतेची चळवळ म्हणून उघडपणाने चालली होती. तिचे मूळ स्वरूप आता बदलू लागले. गनिमी काव्याची ती चळवळ बनली पाहिजे, अशी परिस्थिती निर्माण झाली. सुरुवातीला आम्ही सुद्धा जे उघडपणाने हिंडण्या-फिरण्याचा प्रयत्न करीत असू, ते आता गुप्त जागा शोधून तेथे मुक्काम करण्याचा प्रयत्न करू लागलो. अशी परिस्थिती सुरू असताना रेठरे बुद्रक येथे श्री. शरदराव ढवळे यांच्या मळ्यात आम्ही कार्यकर्त्यांची एक फार महत्त्वाची बैठक बोलावली. अनेक महत्त्वाचे कार्यकर्ते तेथे जमले होते. श्री. शरदराव ढवळे यांनी फार मोठा धोका पत्करून त्याच गावचे सखाराम दाजी या माझ्या मित्राच्या साहाय्याने या बैठकीची तयारी केली होती.

या बैठकीत काशिनाथपंत देशमुख, तासगावहून कुऱ्हाडे आणि माझे फार वर्षांचे मित्र श्री. धुळाप्पा नवले, वाळवे तालुक्यातील श्री. बरडे व कासेगावकर वैद्य, पाटणहून विठ्ठलराव घाडगे, कराड तालुक्यातील सर्व प्रमुख सहकारी - विशेषत: शांताराम इनामदार, पेंढारकर, व्यंकटराव माने, माधवराव जाधव आणि इतर बरेचजण हजर होते.

आम्ही तिथे ज्या चर्चा केल्या, त्या दृष्टीने कार्यकर्त्यांची ही बैठक फार महत्त्वाची होती. जवळ जवळ दीड महिन्यात झालेल्या चळवळीचा आढावा घेण्यात आला. वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या गटांचे प्रतिनिधीही या बैठकीत हजर होते. त्यामुळे बैठकीला एक प्रकारचे प्रातिनिधिक स्वरूप आले होते. या बैठकीमध्ये पहिला विचार जो मांडला गेला, तो असा, की मोर्च्याच्या चळवळीने जनतेच्या भावनेचा उद्रेक जरी व्यक्त झालेला असला, तरी त्यामध्ये मनुष्यहानी होते. तेव्हा अशा स्वरूपाचे कार्यक्रम पुन्हा हातांत घेऊ नयेत. सरकारी गोळीबाराला माणसे बळी जाऊ देता कामा नयेत. जरूर पडली, तर मग गोळीला गोळीने उत्तर देण्याची तयारी असल्याशिवाय असे कार्यक्रम अंगावर घेऊ नयेत.

युद्धप्रयत्न कमजोर करण्याच्या दृष्टीने घ्यावयाचे कार्यक्रम व त्याबद्दलचा दृष्टिकोन यावर पुष्कळ मनमोकळी चर्चा झाली. युद्धोपयोगी साहित्य घेऊन जाणा-या मालगाड्या रोखण्याचा प्रयत्न करणे किंवा रेल्वे-रस्ते बंद करणे किंवा रेल्वे-स्टेशनची नासधूस करणे किंवा पोस्ट खात्याचे काम बंद पाडता येईल, अशी तजवीज करणे अशा तऱ्हेचे कार्यक्रम हाती घ्यायला हरकत नाही, असे स्पष्टपणे मांडले गेले.

गोळीबारात मनुष्यहानी होऊ देता कामा नये, या मताशी मीही सहमत झालो होतो. पहिले पाऊल म्हणून मोर्च्याचा कार्यक्रम आवश्यक होता. परंतु त्याची पुनरावृत्ती करण्याचे काही प्रयोजन नाही, असा सर्वांचा सूर होता. अर्थात त्यांत मीही सहभागी होतो.

काही कार्यकर्त्यांनी या बैठकीमध्ये अहिंसेच्या प्रश्नाचा उच्चार केला. आपण अहिंसेचा त्याग कसा करू शकतो? हा मुद्दा उपस्थित केला. मी स्वत: या मताला आलो होतो, की अहिंसेची व्याख्या या लढ्याच्या कार्यक्रमासाठी अधिक व्यापक करण्याची गरज आहे. स्वसंरक्षणासाठी आपल्याजवळ हत्यार असेल, तर ते वापरावे, हे युक्त होते. परंतु कुणाची तरी हत्या करावयाची, या विचाराने कार्यक्रम आखले

जाऊ नयेत, याची काळजी घेतली पाहिजे, असे मी आग्रहाने मांडले. युद्धप्रयत्नात अडथळा निर्माण करण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा, हे तत्त्वत: मान्य झाले आणि त्यासाठी ज्यांना ज्यांना जसजसे मार्ग सुचतील व व्यवहारत: अमलात आणता येतील, त्या प्रकारे त्यांनी प्रयत्न करावेत, असे ठरले. विचारांच्या दृष्टीने ही बैठक मला महत्त्वाची वाटली.

या चर्चेच्या आधारावर मी माझ्याशी संबंधित असणारे विखुरलेले जे कार्यकर्ते होते, त्यांना पत्रव्यवहाराने हे सर्व विचार कळविले. मी या कार्यक्रमाची रूपरेषा देणारे एक पत्र तासगावचे डॉक्टर यशवंत सोहनी यांनाही लिहिले होते. डॉ. यशवंत सोहनी हे अत्यंत निर्भय आणि साधे कार्यकर्ते होते. ते भूमिगत होते. पण त्यांनी भूमिगतपणाचे कसलेच बहाणे केले नव्हते. ते उघड उघड रेल्वेने प्रवास करीत होते. आपला नित्याचा पोशाख त्यांनी कायम ठेवला होता. त्यामुळे माझे पत्र त्यांच्या हाती गेल्यानंतर रेल्वेच्या एका प्रवासात पोलिसांनी त्यांना अटक केली आणि त्यांच्या खिशात असलेले माझे पत्र हे त्यावेळी पोलिसांनी जप्त करून नेले. कच्च्या कैदेतून डॉ. यशवंत सोहनींनी हा निरोप माझ्याकडे पाठवून दिला. भूमिगत चळवळीच्या कामात असे कधी तरी होणे शक्य असते, तसे ते झाले होते. मी त्यासंबंधी काही फारशी काळजी केली नाही.

ते पत्र मला अजून काही पुन्हा पाहता आलेले नाही. पण या १९४२ सालच्या आंदोलनाचे संशोधन करणारे काही संशोधक यांनी ते पत्र पाहिले आहे, असे त्यांनी मला सांगितले आहे. त्या पत्रामध्ये रेठ-याच्या बैठकीमधील झालेल्या चर्चेचा सारांश होता, असे म्हटले, तरी चालेल. वैयक्तिक हत्या आणि सार्वजनिक मालमत्ता, जिचा युद्धप्रयत्नांशी संबंध नाही, अशांचा नाश करू नये, असा एक विचार मी त्या पत्रात व्यक्त केला होता. आमची चळवळ विचारत:, कार्यक्रमाच्या दृष्टीने काय रूप घेत होती, याची काहीशी कल्पना यामुळे येऊ शकते.

भूमिगत चळवळीची ही दुसरी अवस्था निर्माण झाल्यामुळे तिच्याशी सुसंगत अशी

आमची संघटना उभी करण्याचे काम आम्हांला अधिक काळजीपूर्वक करावे लागले. क्रांतिवीर नाना पाटील यांची या बाबतीतील ही संघटना अतिशय चोख आणि जबरदस्त होती. त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांना निरोप पाठवून भेटणे किंवा काही निरोप पाठविणे सोपे होते. पण प्रत्यक्ष नाना पाटलांना भेटणे कधीच सोपे गेले नाही. माझ्या भूमिगत जीवनाच्या काळात त्यांना भेटून त्यांच्याशी विचारविनिमय करावा, अशी माझी फार इच्छा हाती, परंतु ते मला कधीच करता आले नाही. त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा जो ससेमिरा होता, या दृष्टीने ते काळजी घेत होते, ते युक्तच असले पाहिजे, असा विचार करून हा विषय मी तेथेच सोडला.

दुस-या प्रमुख कार्यकर्त्यांची अधूनमधून भेट होत असे. त्यांची संघटना आणि कार्यकर्त्यांचे गट हे वेगळे होते. तरी त्यांच्याशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विचारविनिमय घडण्याची शक्यता होती. कराडमध्ये मी माझ्याभोवती जी संघटना उभी केली होती, तीमध्ये व्यक्तिश: माझेही एकलेपण मला फार जाणवत होते. कारण आता सरकारने मला पकडण्यासाठी एक हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्यामुळे पोलिसांच्या चौकशीचा ससेमिरा पाठीमागे होता. त्यामुळे मी चार-दोन माणसांपेक्षा जास्त लोकांच्या संबंधात येण्याचे टाळू लागलो. माझ्याशी नित्य संबंधांत होते, ते म्हणजे श्री. शांताराम बापू इनामदार. माझे सर्व प्रवास, ठिकठिकाणी राहण्याच्या जागा हे ठरविणे, ज्यांना कुणाला मला भेटावयाचे असेल, त्यांची माझी गाठ घालून देणे, ही सर्व कामे मी त्यांच्यावर सोपविली होती. चळवळीला आर्थिकदृष्ट्या मदतीची थोडी-फार गरज होती. परंतु ती आम्ही स्थानिक प्रयत्नांतून पुष्कळदा उभी करण्याचा प्रयत्न केला.

देशभक्तीची भावना असणारी, परंतु प्रत्यक्ष कार्य करू न शकणारी अशी कित्येक कुटुंबे होती. ती या चळवळीला आर्थिक मदत नित्यनियमाने देत असत. परंतु आमच्या गटाला उघड मदत करणारे, त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या धनिकांपैकी श्री. व्यंकटराव ओगले हे एकच गृहस्थ होते. केंद्रीय संघटनेशी संबंध प्रस्थापित करण्याचा आम्ही थोडा-फार प्रयत्न केला आणि त्यात काहीसे यशही आले, आणि

तेही अगदी योगायोगाने. त्या केंद्रीय संघटनेशी संबंधित असणारे त्यांचे क्रियाशील असे कार्यकर्ते श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हे होते. श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हे महाराष्ट्रातील विख्यात विधायक कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी भूमिगत संघटनेला महाराष्ट्रात फार मोठे सहकार्य केले, यात शंका नाही. ते महिना, दोन महिन्यांनी वेगवेगळ्या जिल्ह्यांत जात असत. तसे ते एकदा सातारा जिल्ह्यात आले असता त्यांची आणि माझी दोन वेळा भेट झाली. मी केव्हा तरी मुंबईला येऊन केंद्रीय स्तरावर काम करणा-या नेत्यांना भेटावे, असे त्यांनी सुचविले. मी त्यांना नोव्हेंबरमध्ये येईन, असे कबूल केले. त्यांनी आमच्या गटाला आर्थिक साहाय्य देण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा मी त्यांना सुचविले, की आमच्या गटासाठी जर काही मदत करायची असेल, तर ती श्री. व्यंकटराव ओगले यांच्याकडे पोहोचती होईल, अशी व्यवस्था करा, म्हणजे आम्हांला ती नियमितपणे मिळत जाईल. त्यांनी तशी थोडी-फार व्यवस्था केली आणि तिचा आम्हांला उपयोगही झाला.

कराडच्या गटामध्ये आम्हांला दोन नवे शक्तिशाली कार्यकर्ते ऑगस्टनंतर मिळाले, ते म्हणजे श्री. लक्ष्मणराव कासेगावकर वैद्य आणि सदाशिव पेंढारकर हे होत. श्री. लक्ष्मणराव कासेगावकर वैद्य यांना मी कराडमध्ये असताना ओळखत होतो. परंतु ते भूमिगत चळवळीत कधी लक्ष घालण्यासारखे कार्य करतील, अशी मला कल्पना आली नव्हती. ते व त्यांचे वडील हे तत्त्वत: राष्ट्रभक्त आणि खादीधारी होते. माझा उगीचच चुकीचा समज होता, की ते हिंदुसभावादी आहेत. त्यांची माझी भेट झाल्यानंतर माझा तो समज चुकीचा आहे, हे माझ्या लक्षात आले. वैद्य म्हणून ते नामांकित असल्यामुळे त्यांच्याबद्दल त्यांचा अशा भूमिगत चळवळीशी संबंध असेल, अशी शंकासुद्धा येईल, ही परिस्थिती नव्हती. त्यामुळे भूमिगत चळवळीचे पहिल्या काही महिन्यांचे उघड उघड कार्य करण्याची त्यांनी जबाबदारी घेतली. ते अतिशय निधड्या छातीचे, परिश्रमाला नित्य तयार असलेले, प्रामाणिक, तळमळीचे कार्यकर्ते होते, असा त्यानंतरचा त्यांचा मला अनुभव आला. आमच्या कृष्णेच्या आषाढ-श्रावणातला महापूर ऐल-पैल पोहून जाणा-या कित्येक मंडळींपैकी ते एक होते. तेव्हा त्यांच्या धैर्याबद्दल वेगळे काही सांगितले पाहिजे, असे नाही. ते आमच्या कराड

गटातील एक प्रमुख कार्यकर्ते झाले आणि पुढे प्रति-सरकारच्या आंदोलनात त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली.

श्री. सदाशिव पेंढारकर हे असेच महत्त्वाचे सहकारी आम्हांला मिळाले. श्री. सदाशिव पेंढारकर हे पदवीधर होते. कराडच्या एका सुखवस्तू घराण्यात सुखात वाढलेला मोठा मुलगा, असा त्यांचा लौकिक होता. त्यांचे कॉलेज-शिक्षण पुण्याला झाले होते. ते पुण्याच्या सर परशुराम भाऊ महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. उत्तम क्रिकेटियर म्हणून त्यांचा लौकिक होता. किंबहुना एस्. पी. महाविद्यालयाच्या क्रिकेटच्या टीमचे ते कॅप्टन होते. त्यांनी अत्यंत विचारपूर्वक या चळवळीत भाग घ्यावयाचे ठरविले आणि तसे त्यांनी मला येऊन सांगितले. त्यांना असे वाटत होते, की ही शेवटची लढाई आहे, त्यात आपण भाग घेतला नाही, तर आपला जन्म व्यर्थ आहे. या तीव्र जाणिवेने त्यांनी काम करायचे ठरविले होते. ते त्या वेळी किर्लोस्करवाडीच्या कारखान्यामध्ये एक अधिकारी म्हणून काम करीत होते. भूमिगत चळवळीमध्ये एक अधिकारी म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी राहण्याची माझी जी ठिकाणे होती, त्यांमध्ये किर्लोस्करवाडीमध्ये त्यांचे घर हाही एक माझा महत्त्वाचा अड्डा होता.

रेठ-याच्या बैठकीनंतर सामान्यत: एका ठिकाणी दोन दिवसांपेक्षा जास्त राहावयाचे नाही, असा नियम मी पाळू लागलो. कराडमध्ये असलो, तर एका घरी एका दिवसापेक्षा जास्त राहावयाचे नाही, असाही निर्णय मी घेतला होता. आणि असे राहण्यासाठी कराडमध्ये दहा-पाच घरे मी मुक्रर केली होती, त्या सर्व ठिकाणी माझे आनंदाने स्वागत होत असे. या तऱ्हेची संघटना बांधावयास पुष्कळ परिश्रम करावे लागतात. तरी साध्या निरोपाने ही कामे आम्हांला करता येत होती. हा आमचा अनुभव आहे. इतकी त्यासंबंधी लोकांची आपुलकी होती. मला आठवते, की एकदा कराड शहरात राहणे निव्वळ अशक्य झाले, तेव्हा मला कुठे तरी बाहेरगावी जाणे आवश्यक होते. म्हणून मी आमच्या पार्लेकर श्री. यशवंतराव पाटील यांच्याकडे एक-दोन दिवस राहिलो होतो. पण त्यांचा माझा स्नेह इतका प्रसिद्ध होता, की

त्यांच्याकडे राहणे हे फार धोक्याचे होते, असे त्यांना आणि मलाही वाटत होते. म्हणून मी मसूर-खराडे गावाच्या हद्दीत जाऊन राहिलो. तेथे माझी राहण्याची व्यवस्था करावयाचे काम मसूरचे १९३० सालापासूनचे स्वातंत्र्य-सैनिक असलेले काटकर दांपत्य यांनी आपल्या अंगावर घेतले होते. श्री. दत्तोबा काटकर व त्यांची पत्नी पार्वतीबाई या दोघांनी १९३० सालच्या चळवळीत जेल भोगलेले होते, आणि त्यांचा अतिशय दाट स्नेह होता. त्यामुळे घरगुती जिव्हाळाही होता. दत्तोबांची थोडी-फार शेती होती. मसूर रेल्वे लाईनच्या पश्चिम पिकात एक छोटीशी झोपडी बांधून त्यांनी माझी राहण्याची व्यवस्था केली होती आणि तिथे त्या भागातील कार्यकर्त्यांशी माझी चर्चा होत असे. अशा चळवळीमध्ये कार्यकर्त्यांना वारंवार भेटत राहणे आणि त्यांचा उत्साह कायम राखणे हे अतिशय गरजेचे असते. पोलिसांचा ससेमिरा आहे, म्हणून लोकांशी आणि कार्यकर्त्यांची गाठभेट बंद झाली, तर चळवळ बंद झाली, असा लोकांचा गैरसमज होण्याची शक्यता असते. दत्तोबांच्या शेतातील त्या झोपडीत मी निदान दहा गावांतील प्रमुख कार्यकर्त्यांना त्या दोन-तीन दिवसांच्या मुक्कामात भेटलो असेन. आमचे चरेगावचे श्री. व्यंकटराव माने त्यांपैकी एक होते. अत्यंत धाडसी आणि देशभक्तीने प्रेरित झालेला हा कार्यकर्ता होता. मी तर त्यांचे भूमिगत नाव 'वाघ' असे ठेवले होते. तसे माझे राहण्याचे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे आमच्या कराड शहराच्या शेजारी दोन मैलांवरचे गाव कार्वे हे होते. तेथे उसाची शेती होती. उसाच्या शेतीसाठी आज ते संपन्न असे प्रसिद्ध गाव आहे. राष्ट्रीय वृत्तीची परंपरा त्या गावाला आहे. त्या गावचे प्रमुख कार्यकर्ते आणि माझे मित्र श्री. संभाजीराव थोरात यांनी चळवळीच्या सुरुवातीलाच जेलमध्ये जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे मी त्यांना भूमिगत चळवळीच्या व्यापातून मुक्त केले होते. दुसरे माझे कार्व्यातील मित्र श्री. आत्माराम बापू जाधव हे मात्र भूमिगत चळवळीत पुष्कळ दिवस अत्यंत हुशारीने काम करीत राहिले. ते बुद्धीने अतिशय तल्लख होते. योजना ठरविण्यात तयार. कोणत्या वेळी काय करावे, याची झटकन् सूचना करण्यात तरबेज, अशा या व्यक्तीचा मला फार उपयोग झाला. श्री. आत्माराम बापूंच्या जोडीनेच मला उल्लेख केला पाहिजे, अशी व्यक्ती म्हणजे श्री. माधवराव जाधव. श्री. माधवराव जाधव यांनी आपले स्वत:चे व्यक्तिमत्त्व या

चळवळीत तयार केले. अक्षरश: शेकडो कार्यकर्त्यांचे एक जाळेच त्यांनी आपल्या भोवती बांधले होते आणि धाडसाने ते युद्धप्रयत्नांना नवेनवे अडथळे आणण्याचे काम करू लागले होते. कराडच्या पोस्ट ऑफिसमध्ये भर दिवसा जाऊन तेथील साहित्य घेऊन जाण्यात त्यांनी जे धैर्य, जे कौशल्य दाखविले, त्यामुळे सबंध कराड शहरात तो चर्चेचा विषय झाला. त्यांनी अशी अनेक धाडसाची कामे केली आहेत. पुढच्या काळात म्हणजे १९४४ मध्ये तर ते चुकून पोलिसांच्या तावडीत सापडले असताना कराडचा जेल फोडून ते बाहेर पडले. या सर्व मंडळींचा उल्लेख केल्याशिवाय माझ्या भूमिगत जीवनातील वातावरणाचे स्वरूप ख-या अर्थाने स्पष्ट होणार नाही, म्हणून मी हे लिहिले आहे.

या काळात काही तरी धाडसाचा कार्यक्रम केला पाहिजे, अशी माझ्यामध्ये आणि श्री. कासेगावकर वैद्य यांच्यामध्ये चर्चा झाली आणि शिरवडे रेल्वे स्टेशन जाळण्याचा कार्यक्रम त्यांनी आणि श्री. सदाशिवराव पेंढारकर यांनी आपल्या नेतृत्वाखाली पार पाडावा, असे ठरले. कासेगावकर वैद्य यांनी या कामाचे नेतृत्व शेवटी श्री. सदाशिवराव पेंढारकर यांना दिले आणि सदाशिवराव पेंढारकरांनी हे काम मोठ्या धाडसाने आणि यशस्वी रीतीने पार पाडले. त्यांनी दहा-पाच तरुण कार्यकर्त्यांचे सहकार्य मिळविले होते. त्यात माझा भाचा बाबूराव कोतवाल हाही सामील होता, असे मला नंतर कळले. त्यांच्यामध्ये राष्ट्रीय वृत्ती पहिल्यापासून होती. परंतु मी त्याला कधी 'तू हे कर'असे सांगितले नव्हते. त्याने स्वयंस्फूर्तीनेच हे काम करावयाचे ठरविले होते आणि त्यात तो पडतो आहे, त्याचा मला एक प्रकारचा आनंदही झाला. त्यावेळी तो हायस्कूलचा विद्यार्थी होता. आणि हायस्कूलचा विद्यार्थी असतानाच राष्ट्रीय चळवळीत काम करणे ही आमच्या कुटुंबाची परंपरा असल्याने मला त्यात आश्चर्य वाटले नाही. या सर्व मंडळींनी एका संध्याकाळी शिरवडे रेल्वे स्टेशनवर हल्ला केला. तेथे असलेल्या बंदूकधारी पोलिसांना आपल्या ताब्यात घेऊन त्यांच्या बंदुका पळविल्या आणि रेल्वे स्टेशन जाळले.

ज्या दिवशी हा कार्यक्रम होणार होता, त्या दिवशी मी ओगलेवाडीला श्री. व्यंकटराव

ओगले यांच्या घरी होतो. श्री. शांताराम बापू आणि कासेगावकर वैद्य या दोघांना याची कल्पना होती.

श्री. व्यंकटराव ओगले हा खरोखरीच मनाचा मोठा दिलदार माणूस होता आणि नखशिखांत राष्ट्रभक्त होता. बाहेरचे लोक त्यांना कदाचित उद्योगपती म्हणून ओळखत असतील. परंतु मी या गृहस्थांना एक भूमिगत कार्यकर्ताच समजत होतो. आम्हांला जेव्हा दुसरीकडे उतरण्याची सोय नसे, तेव्हा तास, दोन तासांच्या नुसत्या निरोपाने आम्ही त्यांच्या घरी पोहोचत असू. आम्ही त्यांच्या चेह-यावर नेहमी हास्यच पाहिले आहे. तसे ते मोठे कलाकार होते. ते उत्तम चित्रकार होते. त्यांना संगीताचे उत्तम ज्ञान होते. त्यांच्या घरी कलाकारांचे नेहमी येणे-जाणे असे. त्यामुळे त्या माणसाचे व्यक्तिमत्त्व मला मोठे आकर्षक वाटे. आम्ही त्यांच्याकडे मुक्कामाला असलो, की संध्याकाळी ते आमच्यांत गप्पा मारायला येऊन बसत आणि भूमिगत जीवनामध्ये गप्पा मारणारी काही माणसे भेटल्याशिवाय वेळ जात नाही, असा माझा अनुभव आहे.

भूमिगत जीवन हे मोठे एकाकी जीवन असते. वेळ जाता जात नाही. जेव्हा काही करावयाचे असते किंवा जेव्हा कुणाला भेटावयाचे असते किंवा जेव्हा प्रवास करावयाचा असतो, तेव्हा वेळ केव्हा जातो, ते कळत नाही. परंतु एखाद्या ठिकाणी जाऊन बसल्यानंतर वेळ जाणे मोठे कठीण असते. मी कायद्याचा विद्यार्थी होतो, तेव्हापासून सिगारेट्स् ओढायला लागलो होतो. भूमिगत चळवळी मध्ये सिगारेट्स ओढणे अधिक वाढले होते. जेव्हा सिगारेट्स मिळत नसत, तेव्हा मी विडीचाही उपयोग केला आहे. श्री. व्यंकटरावांच्याकडे असल्यानंतर सिगारेटची कमतरता कधी भासली नाही.

ज्या दिवशी शिरवडे रेल्वे स्टेशन जाळण्याचा कार्यक्रम झाला, त्या रात्री आम्ही असेच बराच वेळ बोलत बसलो होतो, तेव्हा आम्हांला बातमी समजली, की शिरवडे

स्टेशन जाळले. व्यंकटरावांनी मला जेव्हा बातमी म्हणून ही गोष्ट सांगितली, तेव्हा मी हसलो. तेव्हा त्यांना समजले, की मला ही गोष्ट अगोदरच माहीत होती.

मी त्यांना तपशील मिळवण्याकरता सूचना केली. कुणी जखमी झाले आहे काय? किंवा कोणी पकडले गेले आहे काय? याची चौकशी करा, असे सांगितले. त्यांनी थोड्या वेळात बातमी दिली, की असे काहीही झाले नाही. त्यानंतर आम्ही थोडा वेळ गप्पा मारत बसलो आणि मी शेवटी झोपी गेलो. पहाटेच्या सुमारास एका कार्यकर्त्याने येऊन सांगितले, की एक बंदुकधारी कार्यकर्ता आला आहे आणि तो तुम्हांला भेटू इच्छितो. मला अशा कुणा माणसाची कल्पना नव्हती. तरी मी विचारले, की यात काही दगाफटका नाही ना? त्यावर त्या कार्यकर्त्याने सांगितले, की तसे दिसत नाही. मी त्या स्थानिक कार्यकर्त्याला सांगितले, की त्या गृहस्थाला मजकडे घेऊन ये. ते गृहस्थ म्हणजे कुंडलचे श्री. रामूमामा पवार हे होते. शिरवडे स्टेशनवर हल्ला करणाऱ्यांपैकी ते एक होते. पोलिसांच्या बंदुका काढून घेऊन वेगवेगळ्या दिशेने जे कार्यकर्ते गेले, त्यांत रामभाऊ हे शिरवड्याच्या समोर असलेल्या डोंगरावर चढून प्रवास करू लागले. रात्रीच्या वेळी रस्ता चुकले आणि योगायोगाने ओगलेवाडीत आले. रामूमामांना मी जवळ घेतले. पोलिसांची काढून आणलेली बंदुक त्यांच्याजळ होती. ती आम्ही दुस-या एका खोलीत ठेवून दिली आणि शिरवडे स्टेशनच्या बाबतीत एकंदर प्रकार कसा काय झाला, त्याची हकीकत मी त्यांना विचारली. त्यांनी मुलांच्या बहादुरीचे वर्णन करून सांगितले. मला त्याचा अभिमान वाटला. श्री. शांताराम बापूंना बोलावून मी त्यांची सर्व व्यवस्था करवली आणि ती बंदूक घेऊन त्यांनी कुंडलला कसे परत जायचे, त्याची योजना करा, असे ठरले आणि ते प्रकरण संपले.

शिरवडे स्टेशनच्या या घटनेनंतर कराड तालुक्यात पोलिसांनी धुमाकूळ घातला. रोज रात्री कुठे ना कुठे तरी आम्हां लोकांना पकडण्याकरता ते धाडी घालत असत. आणि त्यात अयशस्वी झाल्यामुळे चिडून लोकांचा छळ करीत असत. स्वाभाविकच त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांच्या रक्षणाची काळजी वाढली होती. अडचण होती, ती ही,

की आम्हां वडीलधा-या लोकांची जी तरुण मुले होती, ती लोकांच्यांत मिळून मिसळून अशी जात असत, की त्यांना स्पर्श करणेसुद्धा पोलिसांना शक्य होत नसे. भूमिगत संघटना ही लोकजीवनावरती आधारित होऊन समरस झालेली असली, म्हणजे तिचा पाडाव करणे इतके शासन-यंत्रणेला शक्य होत नाही, याचा अनुभव आम्हांला या काळात आला.

माझ्या मित्रांनी मला सल्ला दिला, की कुठे तरी दूर जाऊन यावे. कारण माझ्या रक्षणाची त्यांना आता अधिक चिंता वाटत होती आणि जबाबदारीही होती. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी मला मुंबईला येण्याचे निमंत्रण दिले होते. ते स्वीकारावयाचे, असे ठरवून मुंबईला जाण्याच्या माझ्या योजना मी आखल्या. पोलिसांच्या जाळ्यातून इतका लांबचा प्रवास करणे तसे सोपे नव्हते. पण मी एका माझ्या धनिक मित्राच्या- श्री. नीळकंठराव कल्याणी यांच्या सुंदरशा गाडीतून निवांत प्रवास करून नोव्हेंबरचा दुसरा किंवा तिसरा आठवडा असेल मुंबईत पोहोचलो.

मुंबईत पाहोचल्यावर श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी निरोप देण्याच्या ज्या खाणा-खुणा दिल्या होत्या, त्यांचा उपयोग करून मी मुंबईत आलो असल्याची बातमी त्यांच्यापर्यंत पाहोचविली. मुंबईत तसे सुरक्षित राहणे मला साता-यापेक्षा सोपे होते. मुंबईचा आमच्या जिल्हयातील कामगार-वर्ग हा मुंबईच्या वेगवेगळ्या भागांमध्ये विखुरलेला आहे. एक संध्याकाळ एका विभागात, तर दुसरी संध्याकाळ दुस-या विभागात, अशी आमची राहण्याची व्यवस्था आम्ही करून घेतली. श्री. शांताराम बापू हे माझ्याबरोबर मुंबईला आले होते. त्यामुळे माझी बरीचशी सोय झाली होती. कारण ते माझ्या गाठीभेटीच्या आणि इतर सर्व गोष्टींची व्यवस्था करीत होते. चार दिवसांनंतर मुंबईत असलेल्या प्रमुख पुढाऱ्यांच्या भेटीला सुरुवात झाली. भूमिगत अवस्थेतील माझा मुंबईतील हा पहिला मुक्काम होता. तशी मुंबईची मला थोडी-फार माहिती झालेली होती. सातारा जिल्हयातल्या कामगारांपैकी ज्यांचा या भूमिगत चळवळीशी संबंध होता, असे बरेचसे कार्यकर्ते तिथे होते. सातारा जिल्हयातील इतर गटांचे प्रतिनिधीही मुंबईमध्ये येऊन पोहोचले होते आणि त्यांचेही

वेगवेगळ्या विभागांत संबंध होते. त्यामुळे त्यांतल्या काही प्रमुखांच्या गाठीभेटी मुंबईमध्ये झाल्या, परंतु प्रमुख पुढाऱ्यांची भेट होण्याचा जो हेतू होता, तो सफल होईल, असे काही दिसेना. विशेषत:, जिल्ह्यातील माझा अनुभव सांगून काही नवीन कार्यक्रम उभा करण्याची शक्यता आहे का, या संबंधाने मी विचारविनिमय करू इच्छित होतो आणि त्यासाठी शक्य असेल, तर श्री. अच्युतराव पटवर्धनांना भेटावे, असे माझ्या मनात होते. परंतु भूमिगत यंत्रणेतले मुंबईतील काम साहजिकपणेच इतके गुंतागुंतीचे करून ठेवले होते, की श्री. अच्युतराव पटवर्धन भेटणे शक्य नाही, असे मला सांगण्यात आले.
श्री. एस्. एम्. जोशींना मी एक वेळ भेटलो. त्यांना भेटून मला आनंद झाला. मी त्यांना सातारा जिल्ह्यातील कामाची माहिती सांगितली. ते तेव्हा मुसलमान म्हणून वावरत होते. बोहरी मुसलमानाला शोभेल, अशी दाढी, टोपी, विजार, लांब कोट अशा वेषात ते मला भेटले होते, असे मला स्मरते. त्यांच्याकडून मला असे कळले, की श्री. गोरे, श्री. साने गुरुजी अधूनमधून मुंबईत येत असतात. त्यांना तुम्हांला भेटावयाचे असल्यास मी व्यवस्था करेन, परंतु मी काही तसा आग्रह धरला नाही.

एके दिवशी एका संध्याकाळी एका रेस्टॉरंटमध्ये डॉक्टर राम मनोहर लोहियांची व माझी गाठ श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या मध्यस्थीने पडली. डॉक्टर राम मनोहर लोहियांना मी त्यापूर्वी पुणे येथे जाहीर सभेत एक भाषण करताना ऐकले होते आणि पाहिले होते. पण प्रत्यक्ष भेटण्याचा योग काही आलेला नव्हता.

डॉक्टर लोहिया इतके मोकळे गृहस्थ होते, की त्यांनी आपल्या वेषातही फारसा बदल केलेला नव्हता. रेस्टॉरंटमधील कोप-यातील एका टेबलाजवळ बसून हलक्या आवाजात ते सर्व देशातील परिस्थितीची हकीकत मला सांगू लागले. पूर्व यू. पी. आणि बिहार येथे झालेल्या चळवळीचा वृत्तांत त्यांनी मला सांगितला. सर्व देशभर क्रांतीचे उधाण कसे वाढते आहे, याचे उत्साहजनक चित्र त्यांनी माझ्या डोळ्यांपुढे उभे केले. मीही त्यांना सातारा जिल्ह्यातील माझे चळवळीचे अनुभव सांगितले.

मी त्यांना स्पष्ट  केले, की मी एका मर्यादित क्षेत्रात काम करतो आहे. परंतु जनतेची मुळे जेथे असतात, अशा ठिकाणी मी काम करीत असल्यामुळे माझ्या अनुभवाला काही एक वेगळा जिवंत अर्थ आहे. मोर्च्याची चळवळ, त्यात झालेले अत्याचार व नंतर आता युद्धप्रयत्नाला विरोध करण्याकरता चालू असलेले कार्यक्रम याची माहिती मी त्यांना दिली. मोर्च्याचा कार्यक्रम त्यांना ऐकून माहिती होता. ते म्हणाले,

"मनुष्यहानी झाली, ही गोष्ट खरी आहे आणि ती टाळण्याचा तुमचा निर्णयही बरोबर आहे. पण जनआंदोलन वाढवण्याकरता पहिले पाऊल म्हणून काही त्याग धैर्याने करावा लागतो. तुफान वादळामध्ये जशी नौका टाकून द्यावयाची असते, तसाच काहीसा प्रयत्न एका जबरदस्त लष्करी शक्तीशी लढताना करावा लागतो आणि म्हणून क्रांतीच्या चळवळीत काही बलिदान अपरिहार्य असते. झालेल्या मनुष्यहानीबद्दल तुम्हांला दु:ख होणे स्वाभाविक आहे. पण त्याने मन मोडून घेऊ नका. या चळवळीच्या निमित्ताने समाजातील जे गरीब, दलित व मागासलेले वर्ग आहेत, त्यांच्यापर्यंत जा. त्यांच्यातील कार्यकर्ते उभे करा."

जवळ जवळ तासभर डॉक्टर लोहिया आणि माझी ही बैठक झाली आणि त्यांचा माझ्यावर जो परिणाम झाला, तो लोकनेता कसा असावा, याचे मूर्तिमंत चित्रच मी त्यांच्या रूपाने पाहिले, असे माझ्या मनाने घेतले. त्यांची भेट प्रयत्नांती पण होऊ शकते, हे विशेष होते. भूमिगत अवस्थेत असताना जर कार्यकर्त्यांना पुढाऱ्यांना भेटता आले नाही, तर त्या पुढाऱ्यांची गरज काय आहे, असा काहीसा विचार माझ्या मनाशी येऊन गेला. त्यांनी केलेले विचारांचे मार्गदर्शन फार उपयुक्त होते. ते मनाशी मी जोखून पाहिले आणि त्याचा मनाशी साठा केला.

त्यानंतर श्री. आण्णासाहेबांच्याकडून निरोप आला, की 'चार-दोन दिवसांत एक महत्त्वाची बैठक होणार आहे, तेव्हा दोन-चार दिवस मुंबई सोडून जाऊ नका.' मीही

मुंबईच्या भूमिगत कार्यकर्त्यांच्या वर्तुळात रंगून गेलो होतो. मुंबई शहरच आपल्या या राजकीय चळवळीचे केन्द्र व्हावे, असेही मनात येऊन गेले. चार दिवसांनी श्री. आण्णासाहेबांच्याकडून निरोप आला, की 'त्यांचा कोणी एक स्वयंसेवक माझ्या राहण्याच्या ठिकाणी येऊन मला घेऊन जाईल आणि त्या ठिकाणी मी त्या सभेला यावे.' आणि त्या संध्याकाळी पाच वाजता त्यांचा स्वयंसेवक मला घेऊन जाण्यासाठी आला. त्या वेळी क्रॉफर्ड मार्केटच्या बाजूला मी राहत होतो. तेथून काही वेळ ट्रामने, पुढे बसने असे आम्ही माहीमपर्यंत गेलो. तेथून चालत एक-दोन वेडीवाकडी वळणे घेत सहा-सव्वासहाच्या सुमाराला एका टुमदार घरात आम्ही प्रवेश केला. तेथल्या बैठकीच्या जागेमध्ये श्री. आण्णासाहेब होते आणि त्यांच्याबरोबर आणखी आठ-दहा माणसे होती. त्यांनी माझी तेथल्या मंडळींशी ओळख करून दिली. अर्थात या ओळखीमध्ये धारण केलेली नावे खोटी किती आणि खरी नावे किती, याचा मला काही अंदाज आला नाही. मी मात्र माझे खरे नाव सांगितले आणि सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ता आहे, असेही सांगितले. अर्थात लोक मला नावाने चांगलेच ओळखत होते. साताराच्या चळवळीचे हळूहळू नाव काढत होते. त्यामुळे लोकांनी मला माझे अनुभव विचारले. त्यापूर्वी आणखी चार-दोन नवी मंडळी त्यांत येऊन दाखल झाली. तेथे आलेल्या लोकांपैकी एक नाव माझ्या चांगले लक्षात आहे. आणि ते म्हणजे कुलाबा जिल्ह्यातील श्री. कोतवाल यांचे - जे पुढे हुतात्मा कोतवाल म्हणून प्रसिद्ध झाले. तेथे बसलेल्या मंडळींमध्ये सर्वांच्या पाठीमागे भिंतीला टेकून शांतपणे बसणारे हे साधे गृहस्थ मी पाहिले. त्यांनी मला एक-दोन प्रश्न विचारल्याचे स्मरते. विशेषत: 'युद्धप्रयत्नांच्या विरोधी घातपाताचे जे कार्यक्रम आखले जातात, त्याच्यासाठी ट्रेनिंगची वगैरे व्यवस्था तुम्ही काय करता,' असा प्रश्न त्यांनी मला विचारला होता. मी त्यांना सांगितले,

'किर्लोस्करवाडी आणि ओगलेवाडी या कारखान्यांत काम करणारे बरेचसे कामगार आमचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या अंगच्या कौशल्यावरच आमचा भर आहे. याच्यापेक्षा तांत्रिक स्वरूपाचे शिक्षण देण्याचे कार्यक्रम आमच्याकडे आम्ही अजून घेतलेले नाहीत. आमचा सर्व भर काम करणा-या माणसांच्या धैर्यावार आणि साहसावर अवलंबून आहे."

जेथल्या तेथल्या स्थानिक परिस्थितीप्रमाणे हे कार्यक्रम करावे लागतात, असे सर्वांचे मत पडले. ती दहा-पंधरा माणसांची बैठक जवळ जवळ दोन तास चालली होती. तीमध्ये झालेली एक चर्चा मला आठवते. ती म्हणजे त्यातल्या एका कार्यकर्त्याने उठून ग्रामीण भागामध्ये सरकारच्या हातामध्ये वाटणीसाठी धान्य जाऊ देता कामा नये, अशी काही योजना आखली पाहिजे, असा विचार मांडला होता. विचार मी समजू शकतो, पण त्याची अंमलबजावणी कशी करावयाची, असा जेव्हा प्रश्न आला, तेव्हा रशियात जर्मन आक्रमणापुढे शरण जाण्यापूर्वी सर्व पिके जाळून टाकण्याचा (Scorch the earth) जो कार्यक्रम घेतला होता, तोच येथे घेतलेला बरा, अशी त्यांची सूचना होती. आणि त्या वेळी या प्रमुख केंद्राकडून जी सूचना-पत्रके आली होती, त्यांत या योजनेचा उल्लेख होता, याची मला आठवण आहे. मी या कल्पनेला अत्यंत स्पष्ट शब्दांत विरोध केला. मी सांगितले,
"ही अत्यंत अव्यवहार्य अशी योजना आहे. उभी पिके आहेत, ती काही ब्रिटिश सेनेसाठीच नाहीत. ती हिंदुस्थानातील जनतेसाठी आहेत. प्रत्यक्ष शेतकऱ्यांसाठी आहेत. पिके जाळण्याचा कार्यक्रम हाती घेणे म्हणजे लोकांशी लढाई सुरू करणे असा त्याचा अर्थ होईल आणि लोक आपल्याबरोबर न येता उलट सरकारला मदत करतील. वर्तमानपत्रांत वाचलेल्या पुस्तकी कार्यक्रमांचा अवलंब करून ही चळवळ चालविता येणार नाही."

"मी तरी निदान या कार्यक्रमाशी सहमत राहणार नाही. आणि या विचारांचा प्रचार करणार नाही. कोणी तसे जर करीत असेल, तर मी हा न व्हावा, असाच प्रयत्न करीन. त्यामध्ये अंतिमत: लोकलढ्याचे नुकसान आहे, अशी माझी खात्री आहे."

श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांना माझा विचार पटला. बराच वेळ चाललेली ही बैठक संपली. तीत झालेल्या धारदार चर्चेनंतर आम्ही एकमेकांचा प्रेमाने निरोप घेतला आणि एकमेकाला नमस्कार करून बाहेर पडलो. श्री. कोतवालांशी हस्तांदोलन केले. त्यावेळी मला हे माहीत नव्हते, की थोड्याच आठवड्यांत हे वीर मृत्यूला

कवटाळणार आहेत. श्री. कोतवालांची आणि माझी ही पहिली आणि शेवटची भेट. माहीमची ही बैठक माझ्या लक्षात राहिली आहे, त्याचे कारण श्री. कोतवालांची भेट आणि पिके जाळण्याच्या चळवळीसंबंधीची चर्चा या दोन गोष्टी आहेत. बैठक संपल्यानंतर परत जाताना ज्याने त्याने आपापल्या पद्धतीने जावे, असा संकेत होता. त्याप्रमाणे मी माझा सगळा प्रवास बसने करून क्रॉफर्ड मार्केटच्या चौकात उतरलो आणि माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी गेलो. कामगारवर्गामध्ये या चळवळीला जो पाठिंबा होता, तो पाहून मला अतिशय आश्चर्य वाटले आणि आनंदही वाटला. आणि माझ्या असे लक्षांत आले, की सातारा जिल्ह्यातल्या भूमिगत चळवळीचे अर्ध्यापेक्षा जास्त काम मुंबईतूनच चालते. फक्त मीच त्यात उशिरा सामील झालो होतो. विशेषत:, कुंडल गटाच्या कार्यकर्त्यांच्या सहकाऱ्यांना, नाना पाटलांना, किसन वीरांना आणि मला मानणा-या लोकांची मोठी संख्या मी कामगार-वर्गात पाहिली.

मुंबईतला माझा मुक्काम संपवून मी मोठ्या प्रयत्नाने परत सातारा जिल्ह्यात पोहोचलो. येताना जितक्या सहज पद्धतीने मी आलो होतो, तितके जाताना सोपे नव्हते. या खेपेला सातारला परत गेल्यानंतर मी ठरविले, की एकदा सातारा जिल्ह्यातील दक्षिण भागात जाऊन आले पाहिजे आणि तेथली परिस्थिती पाहिली पाहिजे. माझी आणि श्री. के. डी. पाटील यांची बरेच दिवसांत गाठभेट नव्हती, म्हणून मी कराडला आल्यानंतर एका रात्री मोटार-सायकलच्या पाठीमागे बसून शिराळ्याला गेलो. तेथून चिखलीला गेलो. तेथे श्री. आनंदराव नाईक यांच्या मळ्यामध्ये दोन दिवस राहिलो व तेथून मधल्या वाटेने श्री. के. डीं. ना आधी निरोप पाठवून कामेरीला पोहोचलो. श्री. के. डी. पाटलांना मी मुंबईत झालेल्या माझ्या चर्चेची सर्व हकीकत सांगितली आणि देशात आंदोलन किती प्रखर होत चालले आहे, याची त्यांना माहिती दिली. त्यांना फार आनंद झाला. वाळवे तालुक्यात भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये वेगवेगळे गट झाले होते. मला त्याची चिंता वाटली आणि मी श्री. के. डी. पाटील यांना तसे बोलूनही दाखविले. तालुक्यातील वारणाकाठचा हा भाग मोठा गुंतागुंतीचा होता. यामध्ये गुन्हेगार प्रवृत्तीचे फरारी लोक हे बरेच दिवस आधीपासून संघटित होते आणि त्यांनी आपली काही शक्ती

जमवून ठेवली होती. त्यांच्या बाबतीत काय करावे, हा भूमिगत चळवळीतील आमच्या कार्यकर्त्यांपुढे खरा प्रश्न होता. माझे मत जेव्हा मला विचारले, तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगितले,

"सुरुवातीला त्यांच्याशी सहकार्य करणे जरी सोयीचे वाटले, तरी आपल्या चळवळीच्या शुद्धतेच्या दृष्टीने त्यांच्यापासून अलिप्त राहणे हे अतिशय योग्य आहे."

त्यातून कोणी शंका काढली, की यामुळे त्यांच्याशी संघर्ष करावा लागला, तर काय करायचे?

"जरूर पडली, तर संघर्ष करावा, पण शक्य असेल, तर टाळावा. कारण हे सर्व आपल्या शक्तीवर अवलंबून आहे. आपली शक्ती सरकार आणि या टोळ्या या दोन्हींविरुद्ध लढण्याइतकी प्रखर असली, तर जरूर संघर्ष अंगावर घ्यावा."

अशा तऱ्हेची चर्चा झाली. या चर्चा श्री. के. डी. पाटील आणि चंद्रोजी पाटील यांच्याशीही झाल्या होत्या. अर्थात या चर्चा अलग अलग झाल्या होत्या. कराडच्या बाजूला युद्धप्रयत्नांच्या विरोधी कशा तऱ्हेचे काम चालू आहे आणि श्री. माधवराव जाधवांच्या नेतृत्वाखालील सेना या बाबतीत किती उत्तम तऱ्हेने काम करीत आहे, याची मी त्यांना कल्पना दिली. श्री. केशवराव नेहमीसारखे आत्मविश्वासी असलेले दिसले. त्यांनी आपल्या भोवती भूमिगत कार्यकर्त्यांचा एक संच उभा केला होता व ते सर्व क्रियाशील होते, असे दिसले. माझ्या दोन दिवसांच्या मुक्कामात नंतर कामेरीचा हा भाग सोडून जावे, असे माझ्या मनाने घेतले आणि एका कोवळ्या चांदण्या रात्री केशवरावांनी दिलेली सायकल घेऊन, डोक्याला फेटा बांधून, मी सरळ पुणे-बंगलोर रस्त्याने कराडला परतलो. मी एकटाच होतो, त्यामुळे मला कोणी अडविले नाही, किंवा वाटेत कोणी शंका पण घेतली नाही. कराडमध्ये एकदम कोठे जावे, असा प्रश्न मनामध्ये होता. आधी निरोप पाठवू शकलो नव्हतो. काही अधिक विचार न करता सरळ मी माझ्या घरी गेलो. मला पाहून घरची सर्व मंडळी

आश्चर्यचकितच झाली. त्यांना काळजी वाटत होती, की मी असा घरी राहिलो, तर सापडलो जाईन. मी त्यांना सांगितले, की मी, माझा निरोप पाठविण्याची व्यवस्था करून आणि घरचे जेवण घेऊन, तेथून निघून जाईन. मला पाहून आईला फार आनंद वाटला. माझे दोन्ही बंधू घरीच होते. त्यांना चिंता वाटत होती. परंतु माझ्या भेटीचा आनंद मी त्यांच्या डोळ्यांत पाहिला.

थोरल्या बंधूंची आणि माझी ही दुर्दैवाने शेवटचीच भेट ठरणार होती, हे त्यावेळी मला समजले नाही. थोडा वेळ मी त्यांच्याशी बोललो. माझ्या प्रकृतीची ते चौकशी करीत होते. मी फारच छान आहे, म्हणून सांगितले आणि जेवण करून, घर सोडून निघून गेलो. पुन्हा या घरी जवळ जवळ वर्षभर मला यायचे नव्हते, असा योगायोग होता.

१९४२ सालच्या डिसेंबरमधले दिवस होते. कार्यकर्त्यांचे कामाच्या दिशा ठरल्याप्रमाणे काम चालू होते. विध्वंसाची काही कृत्ये अधून-मधून होत होती. महत्त्वाचे भूमिगत कार्यकर्ते सापडत नव्हते. त्यामुळे पोलीस चिडल्यासारखे झाले होते आणि त्यांनी आता माझ्या कुटुंबियांविरुद्ध आपला मोर्चा वळविला. एके दिवशी त्यांनी माझे मधले बंधू श्री. गणपतराव यांना अटक करून विजापूरच्या तुरुंगात पाठवून दिले. मी ओळखले, की हा माझ्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न आहे. श्री. गणपतराव माझ्यावरील प्रेमामुळे हळूहळू राष्ट्रीय चळवळीत सामील झाले होते; परंतु विध्वंसाच्या वगैरे असल्या कुठल्या कामात ते भाग घेत नव्हते. आता मी त्यांचा भाऊच होतो, म्हणून माझ्याबद्दल आणि माझ्या मित्रांबद्दल त्यांना सहानुभूती होती, यात त्यांचा काय दोष? त्यांना पकडून नेल्यामुळे माझ्या घरच्या लोकांची मोठी असहाय परिस्थिती झाली. एकत्र कुटुंब मोठे होते आणि मिळवते एकटे गणपतरावच होते. थोरल्या बंधूंची सरकारी नोकरी होती. ती त्यांनी मध्येच सोडून दिली होती. त्यामुळे आमच्या कुटुंबावर हा मोठा आघात होता. मी मनाशी म्हटले,
'जे काही व्हायचे असेल, ते होईल, आपले काम आपण करीत राहिले पाहिजे.'

माझ्या एक-दोन मित्रांनी घरची काळजी करू नका, असे आश्वासनात्मक निरोप पाठविले. पण यामुळे माझे थोडेच समाधान होणार होते? कर्तव्यबुद्धीने आपल्या नित्याच्या भूमिगत यंत्रणेच्या कामात गुंतून राहिलो.

डिसेंबर महिन्यात जिल्ह्यामध्ये सर्वत्र पोलीस दडपण फार मोठ्या प्रमाणावर आले. आम्ही डिसेंबरच्या शेवटी शेवटी एका रात्री कार्वे येथे काही प्रमुख मंडळी बसलो असताना असा निर्णय घेतला, की काही आठवड्यांसाठी काही प्रमुख मंडळींनी जिल्हा सोडून बाहेर जावे. पोलिसांचा बंदोबस्त जेव्हा अधिक कडक होतो, तेव्हा प्रवासही त्यामुळे जास्त अवघड होत असे. कुठे जायचे, असा माझ्यापुढे प्रश्न होता. मी पुणे-मुंबईचा पर्याय मान्य केला आणि पुण्याला जायची योजना करू लागलो. मोटारीचा किंवा मोटार-सायकलचा प्रवास अगदी अशक्य होता. निदान माझ्याबरोबर महिना, दोन महिने पुरतील, इतके कपडे घ्यावयाचे होते. त्यामुळे शेवटी रेल्वेने प्रवास करावयाचे निश्चित झाले. माझे मित्र आत्माराम बापू जाधव कार्वेकर यांनी जास्त धाडसाचा सल्ला दिला. ते म्हणाले,
"रेल्वेमध्ये इकडे तिकडे कुठे तरी जाऊन बसण्यापेक्षा सरळ कराड स्टेशनवर जाऊन रात्रीची मेल पकडावयाची."

मीही तो सल्ला स्वीकारला आणि एक-दोन दिवसांतच एका अंधा-या रात्री श्री. आत्माराम बापू व मी माझी मध्यमशी बॅग घेऊन कराड रेल्वे स्टेशनच्या बाहेर उभ्या पिकांमध्ये जाऊन बसलो. आमच्या बरोबरच्या एका माणसाला पुण्याचे दुस-या वर्गाचे तिकीट काढायला सांगितले. मेल गाडीला दुस-या वर्गाचा एखाद-दुसरा डबा मोकळा जातो, असा आमचा अनुभव होता. वेळेप्रमाणे मेल आली. आम्ही काही वेळ जाऊ दिला. माझ्या अंगावर मी जोधपुरी कोट आणि डोक्याला फरची टोपी असा वेष घेतला होता. हातात बॅग घेऊन मी सरळ स्टेशनमध्ये शिरलो, तो दुस-या वर्गाचा डबा कोठे दिसतो का ते पाहत जरा पाठीमागच्या दिशेने चालू लागलो. तो दुस-या वर्गाचा एक डबा मला रिकामा असल्याचे दिसले. मी तो उघडून आत शिरलो

आणि वरच्या बर्थवर बॅग टाकून खाली बसून राहिलो. मी तिकिटाची वाट पाहत होतो. तिकीट काढणारा मनुष्य स्टेशन मास्तरशी भांडण्यात गुंतला होता. कारण स्टेशन मास्तरनी ऐन वेळी दुस-या वर्गाचे तिकीट देण्याचे नाकारले होते. स्टेशन मास्तरचे आणि त्याचे झालेले हे बोलणे सांगण्याकरता श्री. आत्माराम बापू आणि तो मी जेथे बसलो होतो, तेथे दाराशी टक टक करू लागले. म्हणून मी दार उघडून त्यांच्यापाशी चौकशी केली. तेव्हा त्यांनी वस्तुस्थिती सांगितली. मी म्हटले,
"काय होईल, ते होईल; आता चिंता करून नका. पाहू या, काय होते, ते. आता तुम्ही जा."

मी त्यांना परत पाठवून दिले. सुदैवाने त्यावेळी त्या डब्यामध्ये माझ्याखेरीज दुसरे कोणी नव्हते. गाडीने सुटण्याचा आवाज दिला आणि ती सावकाश सुरू झाली. तेव्हा कुणी तरी झटदिशी दुस-या वर्गाच्या डब्याच्या पायरीवर उडी टाकून दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे माझ्या लक्षात आले. मी काहीशा चिंतेने आणि काहीशा जिज्ञासेने काय होत आहे, याची वाट पाहू लागलो. दार उघडून एक हेड-कॉन्स्टेबल आत आला. मी समजलो, की माझ्या भूमिगत जीवनाची समाप्ती आता होणार. तो आत आला आणि त्याने मला विचारले,
"तुम्ही कुठे जाणार आहात?"
मी म्हटले,
"पुण्याला. काय काम आहे तुमचे?"
तो चौकशी करू लागला, की मजजवळ तिकीट आहे, की नाही.
मी त्याला सांगितले,
"तिकीट काढण्यासाठी माणसाला पाठविले, पण तिकीट मिळाले नाही. आता पुढच्या स्टेशनवर उतरून, गार्डला सांगून, तिकिटाचे पैसे भरणार."
तेव्हा तो पडल्या आवाजात म्हणाला,
"गार्डला कशाकरता पैसे देता? मी तुम्हांला निवांतपणे पुण्याला पोहोचवितो."

तेव्हा माझ्या लक्षात आले, हा काही मला अटक करायला आलेला नाही, तर याला पैसे हवे आहेत. गार्डने पैसे खायचे, की हेड-कॉन्स्टेबलने पैसे खायचे, एवढाच प्रश्न होता. मला पुण्याला सुखरूप पोहोचायचे होते. त्यामुळे मी त्याला सांगितले,

"माझी काही हरकत नाही. माझ्या तिकिटाचे पैसे मी तुम्हांला जरूर देईन. परंतु गार्डची काळजी तुम्ही घेतली पाहिजे."
- आणि त्याने सांगितले,
"तुम्ही निवांत झोपून जा. तुमची सर्व काळजी मी घेतो."
- आणि अखेर घडलेही तसेच. रात्रभर मी निवांतपणे झोपलो. पुन्हा कोणी माझी चौकशी करावयाला आले नाही. पुणे स्टेशनच्या अलीकडे, घोरपडी स्टेशनवर हेड-कॉन्स्टेबलसाहेब माझ्यापाशी आले आणि म्हणाले,
"आता तुम्ही येथेच उतरा."

त्याने माझे रात्रभर रक्षण केले असल्यामुळे मी त्याचा आभारी होतो. मी त्याच्या हातावर तिकिटाचे पैसे ठेवले आणि त्याने केलेला एक सलाम घेऊन मी घोरपडी स्टेशनवर उतरलो.

शेवटी पुण्यात तर पोहोचलो. यापुढचे माझे बरेच आठवडे पुण्यातच गेले. सातारा जिल्ह्याशी मी दर आठवड्याला संपर्क ठेवत होतो. पत्राने, निरोपाने चाललेल्या कामाची माहिती मिळत होती. दर आठवड्याला श्री. शांताराम बापू मला भेटत होते. त्यामुळे जिल्ह्याच्या चळवळीशी माझा तसा संपर्क राहिला होता. परंतु कार्यक्षेत्रापासून दूर गेल्यानंतर जो एकाकीपणा वाटतो, तो मला जरूर वाटू लागला. मी पुणे शहर आणि जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांशी संपर्क साधता येतो का, हे पाहण्याचा प्रयत्न करीत होतो. पुण्यातील मुक्कामात मी वेगवेगळ्या ठिकाणी न राहता एकाच ठिकाणी बरेच दिवस राहिलो आणि ते घर माझे मित्र श्री. बबनराव गोसावी यांचे होते. दारूवाला पुलाच्या शेजारी ऐन रस्त्यावर हे घर होते. त्यांच्या

घराच्या माडीचा पुढचा भाग त्यांनी माझ्या ताब्यात देऊन ठेवला होता. दिवसभर मी त्या घरात असे आणि रात्री चळवळीतील मित्रांना भेटण्यासाठी म्हणून बाहेर पडत असे. श्री. शांताराम बापूनी दिलेल्या माहितीच्या आधारे श्री. सदाशिवराव पेंढारकर हे पुण्यात आहेत, असे समजले. मी त्यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना एक वेळ भेटून त्यांच्याशी तास दोन तास गप्पा मारल्या. शिरवडे स्टेशनच्या विध्वंसानंतर श्री. सदाशिवराव पेंढारकर यांचा पोलिसांनी फार पाठलाग चालविला होता. तेव्हापासून ते सातारा जिल्ह्याच्या बाहेर होते. श्री. कासेगावकर वैद्य आणि त्यांचा एकमेकांशी संपर्क होता. मधल्या काळातील झालेल्या घडामोडींची हकीकत आम्ही एकमेकांना सांगितली आणि आम्ही निरोप घेतला. सदाशिवराव पेंढारकर हे मोठे उमेदीचे तरुण होते आणि या भेटीच्या वेळी तर मला ते फारच खुशीत दिसले. या चळवळीत काही तरी महत्त्वाचे काम आपण केले आहे, याचे त्यांना समाधान होते आणि त्यांना परिणामाची फारशी पर्वाही नव्हती.

१९४३ च्या जानेवारीतले माझे दिवस असे चालले होते.

१५ जानेवारीला मला कराडहून निरोप आला, की १४ जानेवारीला-म्हणजे संक्रांतीच्या दिवशीच कराड पोलिसांनी माझी पत्नी सौ. वेणूबाई हिला अटक करून कराड जेलमध्ये ठेवले आहे. पोलीस येथपर्यंत जातील, अशी माझी अपेक्षा नव्हती आणि त्यातल्या त्यात तिच्या लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीच्या दिवशी माझ्या गैरहजेरीत तिला या प्रकारे जेलमध्ये जावे लागले, याचे काही मला फारसे बरे वाटले नाही. मला चिंता होती, की याचा परिणाम तिच्या प्रकृतीवर आणि मन:स्थितीवर कसा होईल? आमच्या घराला चळवळीचा अनुभव होता, किंवा नाही म्हटले, तरी नाद होता, असे म्हटले, तरी चालेल. परंतु ती ज्या घरातून आमच्या घरी आली होती, ते घर आमच्यापेक्षा अधिक सुस्थितीत होते. तिचे वडील नुकतेच वारले होते; पण ते बडोदा महाराजांच्या खाजगीत काम करणारे त्यांच्या विश्वासातले गृहस्थ होते. तेव्हा त्यांचे राहणीमान आणि जीवनपद्धतीचा विचार करता लग्नानंतर इतक्या लवकर तुरुंग पाहायला लागणे ही गोष्ट फारच अनोखी आणि मानसिक यातना

देणारी होती, असे काहीसे विचार माझ्या मनात येऊन गेले. पण मी मला समजावले, की प्रत्यक्ष जिवाचे बलिदान करण्याचे काम लोक या चळवळीत करतात, तर ही एवढीशी किरकोळ गोष्ट मी माझ्या मनावरती तिचे फारसे ओझे ठेवू न देता बाजूला केली.

सौ. वेणूबाईंना पोलिसांनी जवळ जवळ सहा आठवडे कराड आणि इस्लामपूर येथील जेलमध्ये ठेवले होते.

चळवळ संपल्यानंतर मी जेव्हा तिला विचारले,
"तुला पोलिसांनी कशी वागणूक दिली?"
तेव्हा तिने सांगितले,
"पोलीस जशी वागणूक देतात, तशीच दिली."

विशेषत:, ते जेव्हा चौकशीचे प्रश्न विचारत असत, तेव्हा प्रश्न विचारण्याच्या पद्धतीमध्ये उद्धटपणा होता, असेही तिने सांगितले. पण त्यामुळे जो काही थोडा-फार त्रास तिला झाला असेल, तेवढाच.

भूमिगत चळवळीचा आघात अशा पद्धतीने आमच्या कुटुंबावर हळूहळू पडू लागला. श्री. गणपतराव विजापूरला जेलमध्ये होते. सौ. वेणूबाई कराड किंवा इस्लामपूर जेलमध्ये होती आणि मी असा कुठे तरी भ्रमंती करीत भटकत हिंडत आहे, याचे काहीसे शल्य माझ्या मनाला लागून राहिले होते.

याच्यातून पुढे दोन महिन्यांनी एक दुसरी मोठी आपत्ती आमच्या कुटुंबावर आली. माझे थोरले बंधू श्री. ज्ञानदेव यांचा माझ्यापेक्षा माझे मधले बंधू श्री. गणपतराव यांच्याशी फार जिव्हाळ्याचा संबंध होता. माझ्या आणि त्यांच्या वयांत अंतर होते आणि त्यांचे आणि माझे साहचर्यही तसे फारसे झाले नव्हते. परंतु श्री. गणपतराव यांच्यावरती त्यांचे फार प्रेम होते. मी यापूर्वी जेलमध्ये गेलो किंवा आता इतके

महिने भूमिगत राहिलो, त्यामुळे ते फारसे काळजीत पडले नाहीत, पण श्री. गणपतरावांना पकडल्यापासून त्यांचा जीव वा-यावर उडाला. ते घरी सांगत,

"यशवंता तर लढाईत उतरला आहे. त्याला जे काय करावयाचे, ते सरकारने करावे, पण श्री. गणपतरावांनी त्यांचे काय केले आहे? त्याला सोडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे."
त्यांना कोणी सल्ला दिला,
"तुम्ही आजारी असल्याचे डॉक्टरचे सर्टिफिकेट देऊन अर्ज केला, तर कदाचित श्री. गणपतरावांना सोडून देतील."

- आणि ही कल्पना त्यांच्या मनात खोल जाऊन बसली. कराडमध्ये महिना, दोन महिन्यांनी छोटी ऑपरेशन्स् करण्यासाठी बाहेरून डॉक्टर येत असत आणि एकाच दिवशी पाच-पंचवीस ऑपरेशन्स् करून जात असत. आमच्या कराडचे ज्येष्ठ डॉक्टर दातार अशा ऑपरेशन्स्ची व्यवस्था कराडमध्ये करीत असत.

आमच्या दादांच्या पाठीला एक लहानसे आवाळू होते, ते हळूहळू वाढत होते. तेव्हा त्यांच्या मनाने घेतले, की या आवाळूचे ऑपरेशन करून घ्यावे आणि त्याचे सर्टिफिकेट देऊन सरकारकडे अर्ज करावा, म्हणजे श्री. गणपतराव सुटून येतील. हा सगळा त्यांच्या मनाचाच खेळ होता. त्यांनी कुणाही जाणत्या माणसाशी सल्लामसलत केली नाही. ऑपरेशन करण्याचा त्यांचा विचार त्यांनी फक्त आईला आणि आपल्या पत्नीला सांगितला. त्या दोघींनाही तो पसंत नव्हता. त्यांचे म्हणणे होते, आपल्या घरातील कोणी कर्ते माणूस जवळ नसताना तुम्ही हे करू नये. पण त्यांच्या मनात भावाच्या सुटकेसाठी हे सारे करावयाचे आहे, असे होते. त्यामुळे त्यांनी कोणाचे ऐकले नाही. ऑपरेशनच्या दिवशी ते डॉक्टरकडे गेले आणि मला ऑपरेशन करावयाचे आहे, असे सांगू लागले. मुलगा ऑपरेशन करतोच आहे, म्हणून माझी आई ऑपरेशनच्या वेळी जाऊन बसली. या ऑपरेशनसंबंधाने तिचे मन फार शंकित होते. पण मोठा मुलगा ऐकत नाही, मग करणार काय, अशा आपत्तीत ती

होती. खरे म्हणजे डॉक्टरांनी विचार करायला पाहिजे होता. अशा तऱ्हेचे ऑपरेशन, ऑपरेशन नंतरची काळजी घेण्याची साधने आणि व्यवस्था नसताना करावे का, याचा निर्णय त्यांनी त्यांच्या शास्त्राप्रमाणे करावयाला पाहिजे होता. पण त्यांनी तो केला नाही आणि त्यांनी दादांचे ऑपरेशन केले. ऑपरेशननंतर अर्धा-पाऊण तास तेथे ठेवून घेतले आणि नंतर टांग्यात बसवून घरी पाठवून दिले. या मोठ्या जखमेची काळजी घरात कोण घेणार होते? डॉक्टरने सांगितलेल्या गोळ्या आणि पुड्या देण्याचे काम माझी आई करत बसली. इतर लोकांना जेव्हा ही गोष्ट कळली, तेव्हा त्यांनाही धक्का बसला. कारण दादांची प्रकृती ऑपरेशननंतर बिघडू लागली. जखम सेप्टिक झाली आणि त्यात त्यांना न्यूमोनियाचा ताप भरला. दादा त्या जखमेशी आठ-दहा दिवस झगडत राहिले व शेवटी त्यातच त्यांचा अंत झाला.

ही सारी हकीकत त्यांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ पंधरा दिवसांनी मला पुणे येथे समजली. मधल्या काळात परस्परांशी संबंध ठेवणे इतके सोपे राहिले नव्हते. पुण्याला जेथे मी राहत होतो, तेथे एके दिवशी रात्री शांताराम बापू आले आणि त्यांनी मला तुम्हांला एक वाईट बातमी सांगायची आहे, म्हणून सांगितले व दादांच्या मृत्यूची सर्व हकीकत सांगितली. मला फार दु:ख झाले. आमच्या दादांनी आईच्या बरोबरीने आमच्या लहानपणापासून आमचे पालन-पोषण केले. त्यांचा असा करूण अंत व्हावा, आम्ही दोन्ही भाऊ जवळ नसताना व्हावा, आणि त्यांच्या मृत्यूची बातमी दोन आठवड्यांनी मला कळावी, याचे मला अतिशय वाईट वाटले.

दादांच्या मृत्यूने आमच्या कुटुंबावरील संकटाचा एका अर्थाने कळस झाला होता. माझ्या डोळ्यांपुढे माझ्या आईची दु:खी, करुण मूर्ती उभी राहायची आणि मी अस्वस्थ होऊन जायचो. शांताराम बापूंच्या बरोबर मी निरोप पाठविला, की मी एक वेळ आईला भेटावयास येईन. पण शांताराम बापू आणि इतर सर्व कार्यकर्त्यांनी त्याला पूर्ण विरोध केला आणि आईला भेटण्याचा माझा विचार सोडून देऊन मला पुण्यातच राहावे लागले.

या काळात सातारा जिल्ह्यात भूमिगत चळवळ ही स्पष्टपणे गनिमी काव्याची सशस्त्र चळवळ होण्याच्या मार्गाला लागली होती आणि याच चळवळीला पुढे 'पत्री सरकार' असे नाव मिळाले. काही कार्यकर्त्यांनी हत्यारे जमविली होती आणि सरकारबरोबर आणि सरकारधार्जिण्या समाजकंटकांशी लढणे हेही एक आपले महत्त्वाचे काम आहे, असा त्यांचा निर्णय झाला होता. त्यामुळे ते आपल्या भागामध्ये त्या दृष्टीने क्रियाशील झाले होते. मी समजलो, की मला ज्या पद्धतीने चळवळ चालवावयाची होती, तिच्यात काही फरक पडतो आहे. पण तो फरक हा परिस्थितीमुळे अपरिहार्य आहे, याचीही मला जाणीव झाली. जिल्ह्यामध्ये जाऊन सर्व कार्यकर्त्यांशी पुन्हा बोलावे, अशी परिस्थिती नव्हती.

जिल्ह्यात जाणे शक्य नव्हते. म्हणून मी एक-दोन आठवडे मुंबईची भेट ठरवली. मी जवळ जवळ तीन-चार महिन्यांनी मुंबईला येत असल्यामुळे सातारा जिल्ह्यातील जे प्रमुख कार्यकर्ते मुंबईला होते, त्यांची भेट घेणे मला अतिशय उपयुक्त वाटले. जिल्ह्यातल्या पोलिसांच्या दडपशाहीमुळे बरेचसे प्रमुख कार्यकर्ते मुंबईस मुक्काम ठोकून होते. मुंबई शहर, तसे म्हटले, तर भूमिगतांचे मायपोट होते. येथे गुप्त राहण्याची सोय करणे सोपे होते. तसेच आर्थिक दृष्ट्या संरक्षण देणारी माणसे होती. अनेकविध मंडळींचा संपर्क राहत असे. अशा चळवळीचे केंद्र मुंबई शहर करणे हे फार सोईस्कर होते. पत्री सरकारची चळवळ म्हणून जी पुढे प्रसिद्ध झाली, तिचा हा संक्रमण-काळ होता. जिल्ह्यातील चळवळीच्या एकंदर स्वरूपामध्ये होत असलेला बदल अपरिहार्य आहे, असे माझ्या मित्रमंडळीजवळ मी कबूल केले. परंतु कुणी तरी चळवळीच्या कार्यपद्धतीवर अत्यंत कसोशीने नजर ठेवली पाहिजे, असे विशेषत: श्री. किसन वीर यांच्याशी मी बोललो. श्री. आबांनाही ही गोष्ट मान्य होती आणि योग्य वेळी जिल्ह्यात जाऊन हे काम करण्याचे त्यांनी ठरविले होते.

माझी स्वत:ची मन:स्थिती मात्र घरगुती प्रश्नांनी व्यापून गेली होती आणि आतापर्यंत आलेल्या अडचणींमध्ये एक नवीनच मानसिक यातना निर्माण झाली. ती

म्हणजे सौ. वेणूबाईच्या प्रकृति-अस्वास्थ्याची. आमच्या दादांच्या मृत्यूपूर्वी थोडेच दिवस तिची सुटका झाली होती आणि ती त्यांच्या शेवटच्या आजारात त्यांच्या जवळ बसून होती. आतापर्यंत आलेल्या संकटांनीच ती मनाने हलून गेली होती. त्यात दादांचा आठ-दहा दिवसांच्या आजाराने झालेला मृत्यू तिने शेजारी बसून पाहिला होता. त्यामुळे दादांचा मृत्यू झाला, त्या क्षणी ती कित्येक तास बेशुद्ध पडली आणि माझ्या घरच्या माणसांच्या यातनांमध्ये आणखी एक भर पडली. या सर्व हकीकती पुढे मला समजत गेल्या, तेव्हा मला स्वाभाविकच मानसिक त्रास झाला आणि पती म्हणून मी तिच्या आजाराची काळजी घेतली पाहिजे, या जबाबदारीच्या जाणिवेने अस्वस्थ झालो. मुंबईतला माझा चर्चेचा पंधरा दिवसांचा मुक्काम संपवून मी पुन्हा पुण्याला परत आलो व तेथे माझ्या एका नातेवाइकांच्या मार्फत गाडी पाठवून वेणूबाईला, मी जेथे राहत होतो, तेथे घेऊन आलो. कराडच्या त्या वेळच्या डॉक्टरांवर माझा विश्वास उरला नव्हता. तेव्हा पुण्यामध्ये कुण्या चांगल्या डॉक्टरला तिला दाखवता आले, तर पाहावे, म्हणून मी हा उद्योग केला. भूमिगत अवस्थेमध्ये माझी जबाबदारी आणि माझ्या आजारी पत्नीची जबाबदारी घेण्याचे ज्या माझ्या पुण्याच्या मित्रांनी कबूल केले आणि पार पाडले, त्यांचा मी नेहमी ऋणी राहीन. पुण्यातल्या एक-दोन नामांकित डॉक्टर्सना मी सौ. वेणूबाईची तब्बेत दाखविली. काही निश्चित निदान होईना. परंतु ती अतिशय अशक्त होत चालली होती. चार सहा, चार सहा, तासांनी बेशुद्ध पडे. शुद्धीवर आणण्याकरता परिश्रम करावे लागत. डॉक्टर्स औषधे देत होते. परंतु त्यांचा काही फारसा उपयोग होत नव्हता. मी आठ-दहा दिवसांचा हा प्रयोग केल्यानंतर माझ्या नातेवाइकांच्या बरोबर तिला फलटणला-तिच्या माहेरी पाठवून दिले. कारण कराडला माझे घर दु:खी होते, आणि वेणूबाईच्या प्रकृतीच्या देखरेखीच्या गोष्टी कोणी करू शकेल, असा कर्ता माणूस तेथे कुणी नव्हता. आईच्या अडचणीत आणखी भर घालावी, अशी माझी इच्छा नव्हती. त्यामुळे तिच्या माहेरी-फलटणला जाणे हाच एक मार्ग मला दिसत होता. माहेरी पण तसे कोणी कर्ते मनुष्य नव्हते. परंतु तिची एक वयस्कर चुलती, एक धाकटी बहीण आणि मुंबईला शिकत असलेला धाकटा भाऊ असे त्यांचे कुटुंब होते. दुस-या दोन सावत्र बहिणी होत्या; परंतु त्या आपापल्या गावी होत्या. निदान

तिची आपुलकीने चौकशी करणारी माणसे तरी त्या ठिकाणी होती, त्यामुळे मला माझा निर्णय चुकीचा वाटला नाही.

सौ. वेणूबाईला मी फलटणला पाठवून दिल्यानंतर माझी प्रकृती ढासळली. मी डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यांनी काही औषधपाणी दिले आणि मला सांगितले, की तुम्ही पुण्यात न राहता आजूबाजूच्या एखाद्या गावी जाऊन राहा. या डॉक्टर मंडळींना मी माझी राजकीय परिस्थिती सांगितली होती आणि त्यांनी ती गुप्ततेने पाळली होती, हे विशेष आहे, हे येथे नमूद केले पाहिजे. पुण्याच्या शेजारच्या घोडनदी या गावी एक-दोन आठवडे मी एका सामान्य कुटुंबाच्या घरी विश्रांतीसाठी काढले. डॉक्टरांनी दिलेली औषधे बरोबर होती. परंतु वातावरण बदलण्याची गरज होती. त्यामुळे या नव्या, मोकळ्या वातावरणामध्ये मी मनाने पुष्कळ हलका झालो.

पंधरा दिवसांनंतर पुण्याला जेव्हा परत आलो, तेव्हा सातारच्या हकीकती कळू लागल्या. शिरवडे  स्टेशनच्या जळिताच्या खटल्यातील बहुतेक सर्व लोक पकडले गेले होते. श्री. सदशिवराव पेंढारकर आणि त्यांच्या बरोबर असलेले त्यांचे सर्व साथीदार यांना पकडून त्यांच्यावर खटले सुरू झाले होते. या आरोपींमध्ये माझा भाचा बाबूराव कोतवाल हाही होता. जिल्ह्यातील माझ्या गैरहजेरीत श्री. आत्माराम बापू पकडले गेले होते. विशेषत: बाबूराव कोतवाल, श्री. आत्माराम बापू जाधव आणि श्री. बाबूराव काळे मालदणकर यांचा पोलिसांनी अनन्वित छळ केला. त्यांच्या कहाण्या जेव्हा मी ऐकल्या, तेव्हा माझ्या अंगावर काटा उभा राहिला. त्या हकीकती त्यांच्या तोंडूनच मी पुढे ऐकल्या. तो सगळा छळ त्या मंडळींनी सहन केला, तो माझ्यासाठी आणि त्यांच्या राष्ट्रनिष्ठेपोटी. त्यांना प्रमुख प्रश्न विचारला जात असे, की मी कुठे आहे? सुदैवाने त्यांना माहिती नव्हते, की मी कुठे आहे; त्यामुळे ते काही सांगू शकले नाहीत. ज्या तऱ्हेचा छळ होत होता, त्यामुळे मन कितीही बळकट असले, तरी शरीर थकून जाते आणि माणसे बोलायला लागतात. मी कुठे आहे? कोणत्या गावात आहे? याची त्यांनाच माहिती नसल्यामुळे ते बिचारे काय सांगणार? शिरवडे स्टेशनाच्या जळिताच्या खटल्याचा निकाल लागला आणि श्री.

सदाशिवराव पेंढारकरांना सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झाली. त्यांच्या साथीदारांना कुणाला चार वर्षे, तर कुणाला तीन वर्षे अशा तऱ्हेच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. इतका छळ झाला किंवा या शिक्षा झाल्या, तरी ही तरुण मंडळी काही दबून गेली नव्हती, असे मला निरोप येत होते.

मी पुणे शहर आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागातील काही क्षेत्रांत भूमिगत पद्धतीने काम करावे, अशा तऱ्हेने सर्व संपर्क जोडावयाचा प्रयत्न करीत होतो. अशा वेळी एके दिवशी मे महिन्याच्या मध्यात मला फलटणहून निरोप आला, की सौ. वेणूबाईची प्रकृती फार बिघडली असून ती मरणोन्मुख आहे. तो सबंध दिवस आणि रात्र मी काही झोपू शकलो नाही. माझे कर्तव्य काय, याचा मी माझ्या मनाशी विचार करू लागलो. कुटुंबासाठी माझी काही जबाबदारी आहे, की नाही, या एका विचाराने मी अस्वस्थ झालो आणि दुस-या दिवशी रात्री फलटणला जाण्याचा निर्णय केला. रात्री भाड्याची टॅक्सी करून मी फलटणला निघालो. मुंबईहून मी नुकताच जाऊन आलो असल्यामुळे मजजवळ थोडे पैसे होते. रात्री आठला टॅक्सी काढून निघालो, तो ती नीरा स्टेशनजवळ बंद पडली. गाडीमध्ये काही बिघाड झाला होता. पहाट होत आली, तरी ती काही दुरुस्त होईल, असे चिन्ह दिसेना. तेव्हा मी मोठ्या अडचणीत पडलो. काय करावे, समजत नव्हते. सुदैवाने टॅक्सी-ड्रायव्हरच्या खटपटीस यश आले, गाडी सुरू झाली आणि आम्ही पुढे फलटणला निघालो. पंचवीस-तीस मैलांचे जेवढे अंतर होते, तेवढे कापून जवळ जवळ सूर्योदयापूर्वी फलटणच्या घरी जाऊन पोहोचलो. माझा पहिला बेत असा होता, की रात्री घरी जाऊन, वेणूबाईला भेटून, पहाटेसच तेथून परत फिरायचे. परंतु आता ते शक्य नव्हते. मी टॅक्सीवाल्याचे पैसे देऊन त्याला परत पाठवून दिले आणि मी फलटणमध्येच थांबलो.

मी फलटणला आल्याचा वेणूबाईंच्या प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. तिच्या मनाचा धीर वाढला. तिचा आजार जसा शारीरिक होता, तसा तो मानसिक पण होता. मी तिला कबूल केले, की आजचा दिवस येथे राहीन व रात्री निघून जाईन. फलटण येथे डॉक्टर बर्वे म्हणून प्रसिद्ध देशभक्त होते. मी त्यांना बोलावून घेतले.

मला पाहून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. मी त्यांना सगळी परिस्थिती आणि माझी मन:स्थिती सांगितली. मी त्यांना सांगितले,
"कुणा तरी चांगल्या डॉक्टरकडे ही केस सोपवून जावे, म्हणून मी येथे आलो आहे. तुम्ही वेणूबाईची काळजी घ्या."

त्यांनी कबूल केले आणि तो दिवस मी तेथे थांबलो. माझ्या कल्पनेने मी तेथे आल्याची माहिती फारच थोड्यांना असावी. पण सांगता येत नाही. आजूबाजूच्या घरांतील कोण्या मंडळींनी मला पाहिले असले पाहिजे. कारण दुस-या दिवशी दुपारच्या प्रहरी वेणूबाईची काळजी घेत बसलो असताना फलटण संस्थानच्या पोलिसांनी माझ्या सासुरवाडीच्या घराला वेढा घातला.

माझा धाकटा मेहुणा बाबासाहेब मोरे तेव्हा फलटणमध्येच होता. त्याने मला येऊन सांगितले, की पोलीस आलेत. मी समजून चुकलो, की माझे भूमिगत आयुष्य संपले. मला फक्त आता एवढीच काळजी होती, की माझ्या अटकेचा परिणाम वेणूबाईच्या प्रकृतीवर काय होतो? कारण पोलिसांनी येऊन तिच्या देखतच मला अटक केली. मी तिची समजूत घातली.
"मला काही होणार नाही. तू काळजी करून नकोस. आता तू आपल्या प्रकृतीची काळजी घे आणि फलटणमध्ये फार वेळ न थांबता कराडला आईकडे जा."

तिची प्रकृती बरी नव्हती. पण तिने माझ्या अटकेचा झालेला प्रकार मोठ्या धैर्याने सहन केला आणि त्या रात्री फलटण संस्थानने बांधलेल्या नव्या जेलखान्यामध्ये पहिला राजबंदी म्हणून माझा मुक्काम झाला.

आश्चर्य असे, की त्या रात्री मी जेलमध्ये गाढ झोपी गेलो. दहा महिन्यांचे माझे भूमिगत जीवन संपुष्टात आले होते. माझ्या जबाबदा-या आणि चिंता संपल्या होत्या. आता सरकारच्या हाती काय असेल, आणि ते जे करतील, ते पाहत राहायचे, असा मोकळा विचार माझ्या मनात येऊन गेला.

तिस-या दिवसापासून सातारा जिल्हा आणि पुणे सर्कलमधील सी. आय्. डी. चे प्रमुख पोलीस अधिकारी माझ्या उलट तपासणीसाठी मला येऊन भेटू लागले. मला वाटले होते, हे वरिष्ठ अधिकारी मला काही हुशारीने प्रश्न विचारतील. त्यांना काही राजकीय विचारांची पार्श्वभूमी असेल, असा माझा समज होता, परंतु त्यांचे प्रश्न मला निर्बुद्धपणाचे वाटले. चळवळीत कामे करणा-या माणसांची नावे विचारणे, त्यांची ठिकाणे विचारणे असे अगदी मामुली प्रश्न ते मला विचारीत बसले होते.

मला वाटले होते, ते या चळवळीचे रूपांतर कसेकसे होत आहे, वगैरे त्यांना जाणून घेण्याची इच्छा असेल; पण तसे काही दिसले नाही. त्यामुळे माझी सोय झाली. ते माझा छळ करतील, अशी शंका मला वाटत नव्हती. परंतु कोण जाणे, त्यांच्या मनात आले, तर ते काहीही करतील, असे केव्हा तरी मनात येऊन जाई. पण शेवटी तसा काही प्रकार झाला नाही. मी जेलमध्ये आहे, असे समजल्यानंतर कराडहून आई मला भेटायला आली. मी जेलच्या प्रमुख अधिकाऱ्यांना विनंती केली, की मी जेव्हा माझ्या आईला भेटेन, तेव्हा तेथे कोणी हजर असता कामा नये. ती दु:खाने भरून गेलेली आहे. तिला मोकळे व्हायचे आहे. म्हणून तेथे कोणी तिसरा माणूस असणे बरे नाही. तो जेलचा अधिकारी माणुसकी असणारा होता. त्याने सांगितले, की मी तशी व्यवस्था करतो. मी जवळ जवळ सहा महिन्यांनी आईला भेटत होतो. दादांच्या मृत्यूचे दु:ख तिने आकांत करून हलके केले. मी तिची समजूत घातली. माझी प्रकृती बरी आहे, असे पाहून आईला त्यातल्या त्यात समाधान झाले आणि या दु:खात मी इतके दिवस माझ्या आईला भेटलो नव्हतो, ही जी माझ्या मनाला लागून राहिलेली टोचणी होती, ती कमी झाली.

आठ-दहा दिवस मला फलटणच्या जेलमध्ये राहावे लागले. नंतर ते मला सातारा जेलमध्ये घेऊन गेले. माझ्यावर खटले भरावे, की मला स्थानबद्ध म्हणून पाठवावे, असा काही तरी सरकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद चालू होता, असे मला नंतर कळले. जवळ जवळ दोन आठवडे मी सातारच्या जेलमध्ये राहिलो. त्या जेलमध्ये असलेले जिल्ह्यातले बरेचसे कार्यकर्ते सत्याग्रही भेटले. पण अधिकाऱ्यांनी मला त्यांच्या

कुणाच्याही संगतीत ठेवले नाही. नुकतेच पकडलेले, दरोडेखोर म्हणून नामांकित असलेले म्हातारबा रामोशी कोतावडेकर यांच्या खोलीत मला त्यांनी ठेवले.

म्हातारबा रामोशी यांचे नाव मी ऐकून होतो. माझ्यापेक्षा पाच एक वर्षांनी ते वयाने मोठे होते. किंचितसा सावळा वर्ण, सहा फुटांपेक्षा जास्त उंची, अंगकाठी सडसडीत, बोलणे अतिशय प्रौढ, अंगावरचे कपडे पांढरे स्वच्छ, ब्राह्मणी पद्धतीने नेसलेले धोतर हे त्या माणसाच्या पोशाखातील वैशिष्ट्य पाहून मला मोठी मजा वाटली. दोन दिवसांत त्यांच्या माझ्यात मैत्री झाली. मी म्हातारबांना त्यांच्या धंद्यातील कौशल्याबद्दल काही प्रश्न विचारले. माझेही नाव ते ऐकून होते. त्यांनी माझ्याजवळ फार मोकळे निवेदन केले. ते चौघेजण भाऊ होते. दरोडे टाकण्याचे त्यांचे काम पिढीजात चालू होते. त्यांनी मला त्यांच्या धंद्याचे काही नियम सांगितले आणि मला आश्चर्य वाटले, की दरोडे घालण्यातसुद्धा काही नियम असतात. ते नियमाने कायदे मोडतात ! हा एक मला नवा अनुभव होता. त्यांनी सांगितले, की दरोडा घालण्यापूर्वी पंचांग पाहून ते दिवस ठरवीत असत, दिशा ठरवीत असत आणि मग योग्य त्या ठिकाणी पाहणी करीत असत. पण ठिकाण ठरविताना त्यांचा एक महत्त्वाचा नियम असा होता, की ज्या पोलीस स्टेशनखाली त्यांचे गाव आहे, त्या, आणि शेजारच्या पोलीस ठाण्याच्या बाहेर जाऊन दरोडे घालावयाचे. स्त्रियांच्या अंगावर हात टाकावयाचा नाही आणि दरोड्यातून मिळालेल्या मिळकतीपैकी चवथा हिस्सा गोरगरिबांना वाटून टाकावयाचा. हे सर्व नियम त्यांनी दोन पिढ्या तरी पाळले होते.

एका आठवड्यांनंतर मला म्हातारबांच्या खोलीतून काढून इतर कार्यकर्त्यांबरोबर ठेवले. कारण त्यांनी बघितले, की माझी आणि म्हातारबांची चांगलीच दोस्ती झाली आहे. त्यांना ते कदाचित योग्य वाटले नसेल.

कार्यकर्त्यांच्या खोलीत गेल्यानंतर मग तुरुंगातले गांधीप्रणीत वातावरण त्या खोलीत सुरू झाले. पहाटे साडे चार वाजता उठून प्रार्थना म्हणाव्यात, 'रघुपति राघव...'

भजन करावे आणि त्या वातावरणामध्ये डोळे झाकून स्वस्थ बसावे. जणू काही समाधिस्त होत आहोत, अशा भावनेने. माझे फक्त दोनच आठवडे सातारा जेलमध्ये गेले. परंतु मला त्यांची चांगलीच आठवण राहावी, असे ते दिवस होते. म्हातारबांची आणि माझी त्यानंतर कधीच गाठ पडली नाही. पण त्यांचा लौकिक मी पुढे ऐकत राहिलो होतो.

सातारहून पुढे मला कराडला घेऊन गेले. तोपर्यंत सरकारी निर्णय झाला होता, की मला स्थानबद्ध न करता माझ्यावर खटले भरावेत. त्यासाठी ऑगस्ट १९४२ मध्ये तांबवे येथील सभेत मी केलेल्या भाषणाबद्दल माझ्यावर खटला दाखल करण्यात आला. खटला अर्धा तास चालला. खटल्यात केलेले आरोप मी मान्य केले. कारण ते खरे होते. सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा मला देण्यात आली आणि माझा पेशा वकिलीचा असल्यामुळे न्यायाधीशांनी मला 'बी' वर्ग दिला.

चार-सहा दिवसांनी माझी येरवडा जेलला रवानगी झाली. यावेळी मात्र कॅम्प जेल किंवा इतरत्र कोठे न नेता जो प्रमुख जेल होता, त्याच्या अवाढव्य दरवाज्यातून मी प्रथमच आत गेलो आणि तेथल्या एका आवारामध्ये 'बी' क्लास राजबंद्यांसाठी ज्या राहुट्या बांधल्या होत्या, त्यांमध्ये माझी रवानगी केली. मला आश्चर्य वाटले, की जेलमध्ये आल्यानंतर राहुट्यांमध्येच राहण्याचा माझा योग दिसतो आहे. १९३२ सालीही मी अशाच तंबूत राहिलो होतो. आता पुन्हा तशीच एक राहुटी माझ्यासाठी देण्यात आली होती.

या आवारातील राजबंद्यांची ही राहुटीची वसाहत म्हणजे एक छोटेसे खेडेगाव होते. प्रत्येकाला एक राहुटी अशा हिशेबाने आम्ही तेथे वीस एक राजबंदी असू. जुने शिक्षा संपलेले लोक जात असत. नवे येत असत. असा नित्यक्रम सुरू होता. मी ज्या वेळी गेलो, त्यावेळी लांब मुदतीचे शिक्षा झालेले बरेच प्रमुख कार्यकर्ते तेथे होते. श्री. सदाशिवराव पेंढारकर तेथे होते, श्री. स्वामी रामानंद तेथे होते. माझे सोलापूरचे मित्र श्री. पुल्ली तेथे होते. ही सर्व मंडळी तेथे असल्यामुळे ओळखीच्या घरी गेल्यासारखे

वाटत होते. श्री. सदुभाऊंच्याकडून त्यांच्या खटल्याच्या हकीकती ऐकल्या. त्यांना झालेल्या लांब मुदतीच्या शिक्षेचा त्यांच्या मनावर किती परिणाम झाला आहे, असे मी विचारले. त्यांनी सांगितले,
"शिक्षा कमी-जास्त असल्या, तरी आपण सर्वजण एका चळवळीतले आहोत. सर्व शिक्षा पुरी होईपर्यंत जेलमध्ये राहावे लागेल, असे वाटत नाही."

अकरा वर्षांपूर्वी मी जेलमध्ये असताना माझा जो अनुभव होता, तो आणि या वेळचा अनुभव यांत पुष्कळ गुणात्मक फरक होता, असे म्हटले पाहिजे. या वेळी मला नवीन शिकण्याचा ध्यास होता. मन पुष्कळ संस्कारक्षम होते. आता तसा मी राहिलो नव्हतो. माझी काही निश्चित मते, धोरणे बनत चालली होती. आवडी-निवडी नक्की होत चालल्या होत्या. माझ्या राजकीय अनुभवामध्ये खूपच भर पडली होती. त्यामुळे हा पाच महिन्यांचा 'ब' वर्गाचा जेलचा अनुभव मला काहीसा वेगळा वाटला. नेहमीप्रमाणे याही जेलमध्ये वाचण्याची व्यवस्था उत्तम होती. आमच्या आवाराच्या शेजारीच पहिल्या वर्गातील स्थानबद्धांचा कॅम्प होता. त्यांच्याकडूनही आमच्याकडे पुस्तके येत असत. मी ज्या वेळी त्या जेलमध्ये गेलो, तेव्हा तेथे आलेल्या काही मंडळींत एका पुस्तकावर विशेष चर्चा चालू होती. ते लोकप्रिय झालेले पुस्तक म्हणजे 'आर्थर कोस्लर'चे 'डार्कनेस ॲट नून' ही कादंबरी. या कादंबरीवर वाचकांच्या उड्या पडताना मी पाहिल्या. पुस्तक हातात यायला वेळ लागला. पण मी ते मोठ्या उत्सुकतेने वाचले. कम्युनिस्ट राजवटीने केलेल्या राजकीय छळाची ती एक हृदयद्रावक कहाणी होती. या कादंबरीत, कम्युनिस्ट रशियाचे, मानवी मूल्ये संपलेली राजवट अशा तऱ्हेचे चित्र रंगविले गेले आहे. पुस्तक कलापूर्ण आहे. लेखकाच्या तळमळीबद्दल कुणाला शंका येणार नाही. पण हे पुस्तक वाचून त्याचा माझ्यावर जो परिणाम राहिला, तो हा, की हे काहीसे प्रचारकी थाटाचे पुस्तक आहे. अर्थात हे माझे मत, मला माहीत होते, की अनेकांना ते आवडणार नाही. आर्थर कोस्लर बद्दल मनात नितांत आदर आहे. परंतु एका देशातल्या राजकीय परिस्थितीचे निदान एखाद्या कादंबरीच्या रूपाने करता येणे शक्य नाही. आजही पाठीमागे वळून पाहताना, स्टालिनने युद्धाच्या काळात दडपशाहीचे जे भयानक सत्र सुरू केले होते,

त्याचे कोणीच समर्थन करणार नाही; पण ही गोष्ट खरी, की त्या वेळी आम्ही जेलमध्ये हे पुस्तक वाचत होतो, त्याच वेळी चाललेल्या भयानक जागतिक युद्धामध्ये स्टालिनच्या नेतृत्वाखालीच रशियन सेना महापराक्रम करून फॅसिझमच्या पराभवाची शक्यता निर्माण करत होती. मी माझे मत आमच्या कॅम्पमधील काही मंडळींशी बोललो. त्यांनी स्टालिनच्या आताच्या युद्धकाळातील कार्याचे महत्त्व मान्य केले.

"पण खटल्यांची सत्रे सुरू करून सहकाऱ्यांना मृत्यूची वाट दाखविणा-या स्टालिनचे समर्थन करणे केवळ अशक्य आहे."
मी म्हटले,
"ही रास्त प्रतिक्रिया आहे. ऐतिहासिक परिस्थिती आणि माणसे यांचे मूल्यमापन करताना एक घटना किंवा काही घटना एकत्र करून त्यांचे एक आगळे रूप दाखविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे ऐतिहासिक मीमांसा होणार नाही." एवढेच मला मर्यादित स्वरूपात म्हणावयाचे होते आणि स्टालिनच्या व्यक्तिमत्त्वाचे वस्त्रहरण पुढे रशियन राज्यकर्त्यांनीच-विशेषत: क्रुश्शोव्ह यांनी आपल्या कारकीर्दीत करून इतिहासाला योग्य वळण दिले, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. 'डार्कनेस ॲट नून' या कादंबरीच्या वाचनामुळे आमच्या त्या छोट्याशा कॅम्पमध्ये झालेली वैचारिक वादळे अजून मनाशी येतात, म्हणून त्यांचा येथे उल्लेख केला आहे.
मला आता येथे बरेच दिवस राहावे लागणार, असा हिशेब करून होतो, कारण सहा महिन्यांची माझी शिक्षा संपल्यानंतर सरकार काही मला सोडेल, असे वाटत नव्हते. पुन्हा प्रतिबंधक कायद्याखाली डांबून ठेवण्याचा प्रयत्न जरूर होईल. तेव्हा योजनापूर्वक काही तरी वाचले पाहिजे, असे मी ठरविले. म्हणून इंग्लंडची औद्योगिक क्रांती, फ्रान्सची राज्यक्रांती आणि त्याचप्रमाणे रशियाची राज्यक्रांती यांच्यासंबंधीचे वाङ्मय तेथे मिळविण्याचा प्रयत्न केला. प्रयत्नांती चार-सहा पुस्तके मिळाली. ती मी त्या पाच महिन्यांत वाचली आणि त्यामुळे जागतिक इतिहासाचे एक पुरेपूर चित्र डोळ्यांपुढे पुन्हा ताजे झाले. १९४३ सालच्या चालू युद्धाच्या घटनांसंबंधीच्या चर्चाही आठवतात. युद्धामध्ये अमेरिका, रशिया, इंग्लंड यशस्वी

होतील, अशी त्या वेळी फक्त आशा व्यक्त होत होती. कारण त्यावेळी लढणा-या देशांमध्ये-विशेषत: दोस्त राष्ट्रांनी युरोपमध्ये दुसरी लष्करी आघाडी उघडावी, अशी रशियाच्या मनामध्ये प्रबळ इच्छा होती आणि ती आघाडी सुरू होत नाही, त्यामुळे त्यांच्या हेतूविषयी शंकाही ते व्यक्त करत होते. या बातम्या वृत्तपत्रांतील लेखांतून हळूहळू बाहेर येत होत्या. मला कबूल केले पाहिजे, की माझ्या मनामध्ये रशियाबद्दल विलक्षण सहानुभूती होती आणि दोस्त राष्ट्र काही कावेबाजपणाने ही दुसरी आघाडी उघडण्याचे टाळत तर नाहीत ना, अशी शंका माझ्या मनात येत होती. या युद्धासंबंधाने माझ्या मनात काय विचार होते, याची नोंद व्हावी, त्यासाठी मी एवढे लिहिले आहे.

श्री. सदुभाऊ पेंढारकर, मी आणि रामानंद भारती यांच्यामध्ये सातारा जिल्ह्याच्या परिस्थितीसंबंधाने खूप तपशीलवार चर्चा होत असे. मी त्यांना मुंबईत माझी गाठ पडलेल्या मित्रांच्या मुलाखतींची माहिती सांगितली आणि साताराचा लढा हा थांबणार नाही. आम्ही कुणीही तुरुंगात आलो असलो, तरी हा लढा मागे पडणार नाही. नवे नवे कार्यकर्ते आणि निष्ठेने लढायला उभे राहिलेले नेते हा झगडा चालू ठेवतील. मात्र या लढ्याचे स्वरूप बदलत चालले आहे. जरूर तर शस्त्रास्त्रे वापरून हा आक्रमक लढा चालेल, असे मी माझे निदान सांगितले. सरकारला मदत करणा-या आणि लोकांच्या जीवनाचा गैरफायदा घेणा-या समाज कंटकांना शिक्षा देण्याचा प्रयत्न हे पत्री सरकार निश्चित करील, अशी माझी जी जाण होती, तीही मी या मंडळींना सांगितली. यातून निश्चित काय घडेल, यासंबंधाने ही सर्व मंडळी चिंता व्यक्त करीत असत.
मी सांगितले,
"त्याची चिंता तुम्ही व मी करून काय उपयोग? जो रणभूमीत उभा आहे, तो त्याचे निर्णय घेईल आणि किसन वीर आबा आणि त्यांचे इतर सहकारी शेवटी काही राष्ट्रीय मूल्यांवर विश्वास ठेवून काम करणारी माणसे असल्यामुळे ते या चळवळीला चुकीच्या मार्गाने भरकटू देणार नाहीत, असा मला विश्वास आहे."

श्री. सदुभाऊ पेंढारकर यांना माझ्यासारखेच वाटत होते. ते म्हणाले,
"जोपर्यंत लढा संपलेला नाही, तोपर्यंत लढा चालविण्यासाठी काही विचारांच्या मर्यादा ठेवून जितके जास्तीत जास्त पुढे जाता येईल, तितके जाण्याचा प्रयत्न त्या लोकांनी केल्याशिवाय त्यांना गत्यंतर नाही. आपण जे लोक तुरुंगात आलो आहोत, ते एका अर्थाने सुरक्षित आहोत. त्या सर्वांचे प्राण तेथे धोक्यात आहेत. तेव्हा आपण त्यांना नैतिक पाठिंबाच दिला पाहिजे."

सदुभाऊंचे हे म्हणणे बरोबर आहे, असे मलाही वाटले.

अशा तऱ्हेच्या चर्चांत आणि वाचनात माझ्या शिक्षेचे पाच महिने केव्हा निघून गेले, ते मला समजलेसुद्धा नाही.

- आणि एके दिवशी सकाळी ऑफिसमधले लोक मला येऊन सांगू लागले, की "तुमची शिक्षा संपलेली आहे व तुमची सुटका झाली आहे आणि आम्ही तुम्हांला घेऊन जाण्यासाठी येथे आलेलो आहोत."

मी त्यांना म्हटले,
"सरकारकडून प्रतिबंधक कायद्याखाली काही हुकूम तर आला नाही ना?"

"आमच्याकडे काही हुकूम वगैरे आला नाही. तेव्हा तुम्हांला सोडून देणेच आम्हांला भाग आहे."

सदुभाऊ म्हणाले,
"प्रतिबंधक कायद्याचा हुकूम आला नाही, ही काही वाईट गोष्ट नाही. तुम्ही जरूर जा."

जेलमध्ये राहतो म्हटले, तरी राहता येत नाही. अशी काहीशी माझी मन:स्थिती झालेली होती. मी माझ्या सगळ्या राजबंदी मित्रांचा निरोप घेऊन येरवड्याच्या जेलमधून बाहेर पडलो. सरकारने दिलेले प्रवासाचे वॉरंट बरोबर घेऊन, रेल्वेत बसून, निवांतपणे कराडला जाऊन पाहोचलो आणि १९४४ सालच्या जानेवारीच्या सुमारास मी कराड स्टेशनवरून एका टांग्यात बसून जेव्हा कराडकडे जाऊ लागलो, तेव्हा मला असा प्रवास करताना पाहून रस्त्यात भेटणा-या सर्वांना एक प्रकारचा आनंद झाला होता. ते माझे स्वागत करत होते. मी घरी गेलो आणि सुमारे वर्षभरानंतर घरातील सर्व मंडळींना मोठ्या प्रेमाने भेटलो.

गणपतरावांची सुटका होऊन तेही घरी परत आले होते. परंतु तुरुंगातून बाहेर येताना त्यांनी एक जबरदस्त आजार बरोबर आणला होता. जेलचे जीवन सहन न झाल्यामुळे म्हणा, किंवा त्यांनी केलेल्या चिंतेमुळे म्हणा, जेलमध्ये असतानाच त्यांना क्षयाचा विकार जडला होता, आणि ते परत आल्यानंतर त्यांनी डॉक्टरला वगैरे दाखवून निश्चित निदान करून घेतले होते. परंतु प्राथमिक अवस्था आहे, बरे होईल, असा डॉक्टरांचा सल्ला होता. मी बाहेर कुणाला दाखविले नाही. पण या बातमीने मला काहीसा धक्का बसला. मी अनपेक्षितपणे अगोदरच सुटून आल्यामुळे पुढे काय करावे, याचा अजून निर्णय झाला नव्हता. स्वाभाविकपणे कार्यकर्ते अधूनमधून भेटायला येत होते. त्यांच्याशी चर्चा करीत होतो, त्यांना साधेपणाने पुढे कसे गेले पाहिजे, हे सांगत होतो. याप्रकारे दोन-तीन आठवडे गेले आणि नंतर सौ. वेणूबाईंच्या आग्रहामुळे ती व मी आम्ही दोघेही दोन दिवसांच्या मुक्कामाकरता फलटणला गेलो. आश्चर्य असे, की फलटणमध्ये असतानाच पुन्हा सातारा जिल्ह्यातील पोलीस अधिकारी प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याचे वॉरंट माझ्यावर बजाविण्यासाठी, ज्या ठिकाणी मला पहिल्याप्रथम पकडले होते, त्याच ठिकाणी आले. सौ. वेणूबाईला तर धक्काच बसला. तिला वाटले, की मी फलटणला आलो, म्हणजे मला पकडले जाते. 'मी तुम्हांला फलटणला यायचा कशाला आग्रह केला....' असे ती दु:ख करू लागली. मी तिला समजावले आणि तिच्यासह परत कराडला निघालो. मी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले,

"मी माझ्या पत्नीला घरी सोडीन आणि तेथे तुमच्या ताब्यात येईन. तोपर्यंत मला तुमचा बंदोबस्त माझ्याभोवती ठेवायला माझी काही हरकत नाही."

त्याप्रमाणे घडले आणि माझा येरवड्याचा प्रवास पुन्हा सुरू झाला.

या खेपेला 'ब' वर्ग दिलेला नव्हता. येरवड्याच्या 'क'वर्गाच्या कैद्यांसाठी जे तिसरे वर्तुळ आहे, त्यामध्ये एका बराकीत माझी रवानगी झाली. या बराकीत असताना मला जिल्ह्यातले अनेक कार्यकर्ते मित्र भेटले. मला आठवतं, की श्री. आत्माराम जाधव, हरिभाऊ लाड नि असे अनेक कार्यकर्ते तेथे भेटले. आत्माराम बापूंनी झालेल्या छळाची कहाणी मला येथेच सांगितली. त्याच आवारातील आमच्या समोरच्या बराकीमध्ये श्री. ना. ग. गोरे आणि त्यांचे इतर सहकारी होते. त्यांची आमची अधूनमधून भेट होत असे.

या तिस-या सर्कलमध्ये मी तीन महिने काढले असतील. या तीन महिन्यांमध्ये माझे काही विशेष वाचन झाले नाही. मला कार्यकर्त्यांचा सहवास लाभला होता. त्यामुळे त्यांच्याशी गप्पा मारणे, माझे अनुभव सांगणे, त्यांचे अनुभव ऐकणे यांतच आमचा सारा वेळ निघून गेला. या तीन महिन्यांत माझी प्रकृतीही फारशी चांगली राहिली नाही. घराकडून गणपतरावांच्या प्रकृतीची बातमी येत होती. डॉक्टरकडून ते औषधपाणी घेत होते आणि घर-संसार चालविण्याचा प्रयत्नही करीत होते. माझ्या मनामध्ये विचारसंघर्ष सुरू झाला, की माझ्यासाठी माझ्या कुटुंबाचा किती छळ मी होऊ देणार आहे? दादा गेले, गणपतराव गंभीर रोगाने आजारी आहेत, सौ. वेणूबाईची प्रकृती बरी नाही, आई काही न बोलता सर्व सहन करीत होती, पण ती दु:खी आहे. माझ्यापासून तिने खूप अपेक्षा केल्या असतील, परंतु मी तिची कुठलीच अपेक्षा पुरी केली नाही. मनातील हा जो विचार चालू होता, तो मी माझ्या जेलमधल्या मित्रांशीही बोललो.

१९४४ साल पुढे पुढे चालू होते. लढाईनेही हिटलरविरोधी आक्रमक रूप धारण केले

होते. युरोपमधील दोस्त राष्ट्रांची दुसरी जबरदस्त आघाडी उघडण्याची सर्व चिन्हे दिसत होती. त्यामुळे युद्धाचा निर्णय फॅसिझमविरोधी लागणार, असे निश्चित वाटू लागले आणि त्यामुळे वर्षभरात भारताच्या राजकारणामध्ये महत्त्वाचे बदल घडतील, अशा गोष्टी बोलल्या जाऊ लागल्या. या सर्व राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कुटुंबासाठी मी काही तरी केले पाहिजे, असे विचार माझ्या मनात घर करू लागले आणि तीन महिन्यांनंतर इतर मंडळी जशी पॅरोलवर सुटत होती, तशी मला पॅरोलवर सोडण्याची अनुज्ञा आली आणि मी बाहेर पडलो.

मी कराडला जाऊन विचार केला, की पॅरोलची मुदत काही तरी दोन महिने होती. ह्या दोन महिन्यांच्या मुदतीमध्ये माझ्या घरची जबाबदारी पुरी करण्याच्या दृष्टीने काही तरी पावले टाकली पाहिजेत. या काळामध्ये माझे मित्र आबासाहेब वीर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करून मी त्यांना माझी मन:स्थिती आणि परिस्थिती कळविली. त्यांचाही निरोप आला, की तुम्ही बाहेर राहणे आवश्यक आहे. तुमच्या घरच्या प्रश्नाकडे तुम्हांला दुर्लक्ष करता येणार नाही. राजकीय चळवळीशी तुमचा आहे तो संबंध आम्ही योग्य प्रकारे सांभाळून नेऊ. तुम्ही पॅरोल वाढविण्याचा प्रयत्न करा आणि आपल्या वकिलीच्या व्यवसायाकडे लक्ष द्या. कारण त्याच्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. गणपतरावांना मिरज किंवा कुठे तरी चांगल्या ठिकाणी नेऊन उत्तम औषधोपचार करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय यातून दुसरा रस्ताच दिसत नव्हता. मी जर काही केले नाही, तर हे घर मोडून पडणार, असे चित्र मी पाहिले आणि पॅरोलची मुदत वाढविण्यासाठी मी गृहखात्याला लिहिले. त्याचा काय निकाल येईल, याची मला कल्पना नव्हती. परंतु पुढे दोन महिन्यांनी त्यांनी माझ्या विरुद्धचा प्रतिबंधक कायद्याखालचा आदेश मागे घेतला, असे त्यांचे मला उत्तर आले आणि मग मी स्थिर मनाने घराच्या प्रश्नाकडे लक्ष देऊ लागलो.

गणपतरावांना मिरजेला चांगल्या डॉक्टरच्या नजरेखाली ठेवले. माधवनगर येथे एक घर भाड्याने घेतले आणि तेथे नेऊन त्यांची व्यवस्था केली. गणपतरावांच्या बरोबर त्यांची व्यवस्था करण्याकरता माझी थोरली बहीण तेथे राहिली. त्यांची पत्नीही

त्यांच्याबरोबर गेली. आता मला कराडचे घर आणि माधवनगरचे घर अशी दोन्ही घरे चालवावयाची होती. वकिलीला पुन्हा सुरुवात करताना एकदम सर्व उत्तम चालण्याची शक्यता नव्हती. त्यामध्ये प्रगती जी होणार, ती हळू हळूच होणार होती. परंतु तेथे स्थिर झालेले दोन ज्येष्ठ वकील श्री. पंडितराव भद्रे आणि श्री. अब्बास भाई शेख यांची मला खूप मदत झाली. आणि त्यामुळे मी माझ्या फौजदारी गुन्ह्याच्या वकिलीचा जम थोडा-फार बसवू शकलो. दोन्ही घरांचा चालू खर्च चालविण्याइतके उत्पन्न मी महिन्याला मिळवू लागलो आणि हे १९४४ साल केव्हा निघून गेले, हे लक्षातसुद्धा आले नाही.

माझ्या वैयक्तिक जीवनामध्ये १९४४ साल जरी केव्हा गेले, हे मला कळले नाही, तरी सातारा जिल्ह्यातील पत्री सरकारची वा प्रति सरकारची जी संघटना आकार घेत होती, तिचे स्वरूप व काम या वर्षात अधिक विस्तृत आणि परिणामकारक बनत चालले होते, त्यांनी ठिकठिकाणी न्याय समित्या स्थापन केल्या होत्या व गोरगरिबांवरील अन्याय दूर केल्याची उदाहरणे लोकांच्या डोळ्यांपुढे येऊ लागली होती. ग्रामीण भागात लोकांना त्रास देणा-या गुंड लोकांनाही एक प्रकारची दहशत निर्माण झाली होती आणि भूमिगत चळवळीत काम करणा-या कार्यकर्त्यांचा दबदबा एक प्रकारे वाढत जात होता.

श्री. किसन वीर हे संघटनात्मक प्रमुख म्हणून भूमिगत चळवळीचे नेतृत्व करीत होते. माझा त्यांच्याशी संपर्क होता. अशा संघटना जेव्हा सत्ताधा-यासारख्या वागू लागतात, तेव्हा त्यांत दोषही निर्माण व्हायला लागतात. असे काही दोष याही भूमिगत चळवळीत निर्माण होऊ लागले होते. श्री. आबांना मी निरोपाकरवी अशा काही गोष्टी कळवीत असे. तेही त्याची काळजी घेत असत. या भूमिगत चळवळीमध्ये हळूहळू जो महत्त्वाचा दोष वाढत गेला, तो हा होता, की कार्यकर्त्यांमध्ये वेगवेगळे गट पडले आणि त्यांच्यांत स्पर्धा सुरू झाल्या. कोणत्या क्षेत्रासाठी कोणत्या गटाने काम करावयाचे, या संबंधाने काही वादग्रस्त प्रश्नही उपस्थित झाले. पण राजकीय दृष्ट्या माझ्या मताने ही किरकोळ गोष्ट होती.

जिल्ह्यामध्ये भूमिगत कार्यकर्त्यांची एक प्रकारची सत्ता स्थापन झाली आहे- विशेषत: ग्रामीण भागामध्ये - असे वातावरण निर्माण झाले होते. कराड पाटण, वाळवे, तासगाव, वाई, सातारा, कोरेगाव आणि शिराळा या तालुक्यांत याचा विशेष परिणाम दिसून येत असे, ज्यांचा उल्लेख केला पाहिजे, असे अनेक कार्यकर्ते आहेत, पण त्या सर्वांच्या नावांचा उल्लेख, त्यांचा या कामात माझ्याशी व्यक्तिश: संबंध आला नसल्याने, मी करू इच्छीत नाही. परंतु असंख्य कार्यकर्ते या चळवळीचे सैनिक म्हणून  काम करीत होते, हे उघड होते आणि जसजशी त्यांची शक्ती वाढत गेली, तसतशी सरकारी यंत्रणाही अधिक चिडत गेली. परंतु त्याचा काही उपयोग होत नव्हता. माझ्या माहितीप्रमाणे जिल्ह्यातल्या या कार्यकर्त्यांना भेटण्याकरता स्वत: श्री. अच्युतराव पटवर्धन सातारा जिल्ह्यात एकदा येऊन गेले, असे मी ऐकले होते. ते किती खरे-खोटे, हे मला माहीत नाही. परंतु ही वार्ता त्यावेळी जिल्ह्यात खूप पसरली होती. अशा वार्तेनेही अशा चळवळीचा दबदबा वाढतो, कारण या चळवळीला केंद्रीय संघटनेचा पाठिंबा आहे, याची जाणीव लोकांना होते, आणि त्यामुळे अशा चळवळीची शक्ती वाढते.

सातारा जिल्ह्यातल्या या भूमिगत चळवळीची अशी प्रगती होत असताना ज्या पार्श्वभूमीवर ही चळवळ चालली होती, त्या युद्धाची काय परिस्थिती होत होती, हेही पाहण्यासारखे आहे. १९४४ च्या जून महिन्यात युरोपमध्ये दोस्त राष्ट्रांनी आपली दुसरी आघाडी उघडली. फ्रान्सच्या नॉर्मंडीच्या किना-यावर मोठ्या बहादुरीने सैन्य उतरवून आगेकूच करीत हे सैन्य पॅरिसच्या दिशेने जाऊ लागले. रशियाने गेली तीन वर्षे हिटलरच्या रणगाड्यांच्या आणि विमानांच्या ताफ्यांशी एकाकी झुंज दिली होती आणि त्यात त्यांना फार किंमत मोजावी लागली होती. रशियन भूमीवर शेकडो मैल जर्मन सैन्य आत घुसले होते. स्टॅलिनग्राडला वेढा पडला होता. मॉस्कोपासून काही मैलांवर सैन्य येऊन पोहोचले होते. अशा परिस्थितीतही आपले धैर्य न खचू देता आणि अशा तऱ्हेचे युद्ध करण्याकरता आवश्यक असणारी जी औद्योगिक यंत्रणा असते, तिची क्षमता कमी होऊ न देता युद्धसाधनांचे उत्पादन चालू ठेवले आणि युद्धाच्या आघाडीवर सैनिकांच्या मार्फत पराक्रमाची शर्थ केली. ही दुसरी आघाडी

युरोपमध्ये उघडल्यानंतर रशियावर असणारा जर्मन सैन्याचा दबाव कमी झाला आणि नवी सामग्री आणि उभे राहिलेले नवे सैन्य यांचे, जसा महापुराचा लोंढा वाहत जातो, तसे रशियन सैनिकांचे लोंढे पोलंडमध्ये आणि बाल्कन देशांमध्ये घुसू लागले. १९४४ सालची ही राजकीय पार्श्वभूमी पाहताना पुढचे १९४५ हे साल निर्णायक वर्ष ठरणार, असे माझ्या मनाने घेतले. युरोपमधील युद्धाचा निकाल लागण्यास आता फक्त काही महिन्यांचा अवधी राहिला होता. गेली सहा वर्षे युद्ध ज्या चढ-उतारांतून गेले होते, त्यांचे बरेवाईट परिणाम ब्रिटिश जनतेने भोगले असल्यामुळे ब्रिटिश सत्ताधारी नसले, तरी ब्रिटिश जनता यातून  काही नवीन शिकली असली पाहिजे, अशी आशा माझ्या मनात निर्माण झाली होती. हे युद्ध संपल्यानंतर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटावयाचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास मनामध्ये वाटत होता. या घडामोडींची प्रत्यक्ष प्रक्रिया काय राहील, यासंबंधाचे चित्र मात्र डोळ्यांपुढे येत नव्हते. पण जागतिक परिस्थितीच असे आगळे वेगळे रूप घेत होती, की यातून नव्या हिंदुस्थानचा जन्म व्हावा.

१९४५ साल जसजसे जुने होऊ लागले, तसतसे ज्यांना हिंदुस्थानचे राजकारण समजत होते, अशा जाणत्यांना सत्तांतराची चाहूल लागली, असे म्हटले, तरी हरकत नाही. पूर्वेकडे ब्रह्मदेशामध्ये जपानच्या विरोधी दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांना छोटे-मोठे विजय मिळू लागले, हेही एक सुचिन्ह होते. युरोपच्या युद्धाबरोबर जपानचे युद्ध संपणार नाही, हे स्पष्टच होते. त्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील, हेही उघड होते. परंतु तो काही महत्त्वाचा अडथळा ठरणार नाही, अशी सर्वांची समजूत होती. प्रत्यक्षात ॲटम बॉम्बने जपानी युद्धाचा शेवट जसा झाला, त्याची मात्र कुणाला काहीच कल्पना नव्हती. १९४५ च्या जून-जुलै महिन्यांमध्ये ब्रिटिश अंतर्गत राजकारणामध्ये मोठी उलथा-पालथ झाली. ज्या राष्ट्रीय सरकारने जर्मनीचा पराभव करी तो पर्यंत युद्धाचे नेतृत्व केले होते, ते राष्ट्रीय सरकार संपुष्टात आले. जपानचा पराभव होई तो पर्यंत राष्ट्रीय सरकार चालवावे, अशी सूचना चर्चिलने मजूर पक्षाचे नेते श्री. ॲटली यांना केली होती. पण ती त्यांनी साफ नाकारली. ॲटलींच्या त्या नकारामुळे दूरदृष्टी आणि योग्यवेळी योग्य राजकीय निर्णय घेण्याची शक्ती

त्यांच्यामध्ये होती, हे स्पष्ट होते. श्री. ॲटलींचे व्यक्तिमत्त्व हे चर्चिल यांच्या तुलनेने कमी आकर्षक होते. परंतु विचारांची स्पष्टता असणारे आणि मजूर पक्षाची वसाहतवाद्यांच्या प्रश्नाकडे पाहण्याची जी मूळ दृष्टी होती, त्या दृष्टीने काम करणारे ते प्रामाणिक पुढारी होते. चर्चिलपेक्षा काही बाबतीत ते मोठे होते, अशी माझी नेहमीच भावना राहिली आहे.

मी संरक्षण मंत्री म्हणून पुढे लंडनला गेल्यानंतर त्यांना मी एक खाना दिला होता आणि त्यांच्याशी भारताच्या काही संरक्षण-प्रश्नांवर बोलण्याची संधी मिळाली होती, याचा मला रास्त अभिमान आहे.

ॲटली यांनी १९४५ साली राष्ट्रीय सरकार पुढे चालू न ठेवता निवडणुका घेणे अपरिहार्य ठरविले, त्यामुळे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडवायला फार मोठी मदत झाली आहे, ही गोष्ट लक्षात यावी, म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कामाचा येथे मी उल्लेख केला आहे. चर्चिल या निवडणुकीला फारसे उत्सुक नव्हते. युद्धाचे नेतृत्व करण्यास लागणारे वक्तृत्व, लढाईच्या तंत्राचे ज्ञान आणि लोकांना लढाईच्या काळामध्ये हवे असणारे ढंगदार नेतृत्व देण्याचे कौशल्य हे सर्व त्यांच्याजवळ होते. पण प्रत्यक्ष लोकमताच्या परीक्षेची वेळ जेव्हा जवळ आली, तेव्हा ती टाळावी, असाच त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या युद्धाच्या आठवणींच्या शेवटच्या ग्रंथामध्ये दिलेला एक प्रसंग सहज माझ्या ध्यानात येतो. निवडणुका जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करून ते पोटसँडम येथील बैठकीकरता चालले असताना वाटेत स्पेनच्या सीमेवर एका अतिशय सुंदर स्थळी विश्रांतीसाठी थांबले होते आणि वेळ जावा, म्हणून त्यांचा चित्रकलेचा जो नाद होता, तो पुरा करण्यासाठी हातामध्ये ब्रश घेऊन ते त्यांच्या आवडीची दृश्ये टिपत होते. त्यांनी सांगितले आहे, की

'या कामात मी गुंतलो असतानासुद्धा ही निवडणूक दारावर टकटक करते आहे, किंवा खिडक्यांतून वाकून बघते आहे, असे मला वाटू लागले.'

चर्चिलने निवडणुकीची किती धास्ती घेतली होती, याचा यापेक्षा आणखी काय पुरावा पाहिजे आहे? १९४५ च्या जुलैच्या आठवड्यात निवडणुकींचा निकाल लागला आणि युद्धकाळाचा हा इंग्लंडचा परमश्रेष्ठ नेता एका पराभूत पक्षाचा नेता ठरला. हिंदुस्थानातील सत्तांतराच्या राजकीय हालचालींनी ह्या क्षणी जन्म घेतला, असे म्हटले, तरी चालेल.

१९४५ साल सुरू झाल्यानंतर स्थानबद्ध असलेल्यांपैकी पुष्कळ लोक सुटून येऊ लागले. वर्किंग कमिटीचे बरेच नेते सुटून बाहेर आले आणि एक प्रकारचे मोकळे वातावरण राजकारणामध्ये सुरू होऊ लागले. मला आठवते, याच काळात गांधीजी विश्रांतीसाठी पाचगणीला आले होते. त्यावेळी सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीसंबंधाने सरकारी प्रचार अगदी एकांगीपणाने चाललेला होता. भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना बदनाम करण्याचा संघटित प्रयत्न सरकारने सुरू केला होता आणि त्याला ते प्रसिद्धि देत होते. या भूमिगत चळवळीची माहिती गांधीजींच्या कानांवर गेली होती. एवीतेवी ते आता आपल्या जिल्ह्यात आलेच आहेत, तेव्हा त्यांच्याशी जाऊन भेटून बोलले पाहिजे आहे, असे मी आणि माझ्या मित्रांनी श्री. भाऊसाहेब सोमण यांना आग्रहाने सांगितले आणि पाचगणीला गांधीजींशी आम्ही मुलाखत मागितली. गांधीजी तेथे विश्रांतीसाठी आले होते, त्यामुळे त्यांना जास्त त्रास द्यावयाचा नाही, असे सामान्यत: धोरण होते. पण अर्ध्या तासाचा वेळ त्यांनी आमच्यासाठी दिला आणि ते आमच्याशी फार मोकळे वागले. शांतपणे आमचे बोलणे त्यांनी ऐकून घेतले. भूमिगत चळवळीच्या लोकांची बाजू मांडण्याचे काम श्री. भाऊसाहेब सोमण आणि मी केले. गांधीजींनी आम्हांला सांगितले,

"मी या संबंधाने सगळे ऐकले आहे. या चळवळीच्या सर्व प्रकारांबद्दल मी माझे मत देऊ इच्छीत नाही. पण या चळवळीत काम करणारे सर्व देशभक्त आहेत, हे मी मान्य करतो. त्यांच्या पद्धती ह्या माझ्या पद्धती नाहीत, हेही मला स्पष्ट केले पाहिजे..." वगैरे वगैरे.

आम्हांला एवढेही पुरेसे होते. गांधीजींच्या तोंडून भूमिगतांच्या कार्यक्रमाला आशीर्वाद मिळविणे शक्य नव्हते आणि आवश्यकही नव्हते. परंतु भूमिगतांच्या सर्व क्रियाशीलेतेच्या पाठीमागे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीची ऊर्मी होती, ही गोष्ट या देशाच्या सर्वश्रेष्ठ नेत्याने मान्य केली, यात सर्व काही पोहोचले, अशी आमची भावना आहे.

त्यानंतर वृत्तपत्रांत पंडित नेहरूंची भूमिगत चळवळी संबंधीची मुलाखत वाचली आणि अभिमानाने ऊर भरून आला.

'जेव्हा राष्ट्र दडपशाहीखाली दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जात होता, तेव्हा जनता जर बंड करून उठली नसती, तरच आश्चर्य होते. हिंसे-अहिंसेचे हे प्रश्न तांत्रिक आहेत.' अशा अर्थाचे पत्रक त्यांनी काढले होते आणि भूमिगत चळवळीला आणि कार्यकर्त्यांना नैतिक पाठबळ दिले होते.

या तऱ्हेने देशात आणि जगात राजकारणाने खूपच वेगळे रूप घेतले आणि स्वाभाविकपणे त्याचे आमच्या जिल्ह्यातही परिणाम होऊ लागले. जे फार कडवे भूमिगत होते, ते झालेला बदल अजून समजू शकत नव्हते. परंतु त्यांचा जीव धोक्यांत असल्यामुळे त्यांची ही गोष्ट समजण्यासारखी होती. १९४५ साल जसजसे पुढे जाऊ लागले, तसतसे हिंदुस्थानामध्येही निवडणुकी होणार, अशा चर्चा सुरू झाल्या. ॲटलींच्या मंत्रिमंडळाचे एक शिष्टमंडळ चर्चा करण्यासाठी हिंदुस्थानामध्ये येऊन गेले आणि राजकारणामध्ये नव्या नव्या घटना घडविणारा एक नवा वेग निर्माण झाला. आपल्या देशात आणि योग्य त्या क्रमाने आपल्या जिल्ह्यातही निवडणुका होणार, हे स्पष्ट झाले. याचा जो परिणाम व्हायचा, तो संघटनेच्या कार्यकर्त्यांवर आणि भूमिगत चळवळीवरही झाला. भूमिगत चळवळीतील कार्यकर्ते या निवडणुकीच्या प्रश्नाकडे समजुतीने पाहत होते. परंतु त्यांना त्यात विशेष रस वाटत नव्हता. त्यांतील काही लोकांशी माझी बोलणी झाली, तेव्हा त्यांनी सांगितले,

'याच्यातून हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त होईल, असे आम्हांला अजूनही वाटत नाही. स्वातंत्र्यासाठी क्रांतीचे वातावरण सतत तेवत ठेवले पाहिजे, आणि ते कठीण काम आम्ही लोक करीत राहू,' हा त्यांचा दावा होता. मी या वादविवादात फारसा पडलो नाही. पण मी त्यांना माझ्या दृष्टीने समजाविण्याचा प्रयत्न केला. त्यांना सांगत राहिलो, की 'तुमच्या कामात आता अधिक काही गुंतागुंत होईल, असे काही होऊ देऊ नका. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा आता फक्त वर्ष, दोन वर्षाचा प्रश्न आहे. उजाडण्यापूर्वीची ही पहाट आहे.' अर्थात हे ते सर्वच मान्य करत नव्हते, परंतु माझी बाजू ते ऐकून घेत होते. १९४५ साली मी मुख्यत: माझ्या घरच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करून वकिली करण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु भूमिगत नेत्यांशी अधून मधून संबंध ठेवण्याचे योग येत असत. मीही ते ठेवीत असे आणि तेही ठेवीत असत.

या वेळेला आमच्या कराड शहरामध्ये एक नवे छोटेसे काम निर्माण करण्याची संधी मला प्राप्त झाली. एका शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षक आणि संस्थाचालक यांच्यामध्ये संघर्ष उभा राहिला. मी गावातील एक प्रमुख तरुण कार्यकर्ता, म्हणून शिक्षक मंडळी माझ्याकडे आली. त्या शिक्षक मंडळींचे नेते श्री. शंकरराव करंबेळकर होते. त्यांनी त्यांच्या संस्थेच्या चालकांशी झालेल्या संघर्षाची कारणे मला सांगितली. तेव्हा न्याय मला त्यांच्या बाजूला दिसून आला. मी शिक्षकांची बाजू घेतली. यातून माझा आणि श्री. शंकरराव करंबेळकरांचा जन्मभराचा जिव्हाळ्याचा स्नेहभाव सुरू झाला. या संघर्षाच्या निमित्ताने 'शिवाजी एज्युकेशन सोसायटी' ही शिक्षणसंस्था गावातील श्री. रामविलास लाहोटी, श्री. शंकरराव करंबेळकर, राजाराम पाटील, श्री. यशवंतराव पार्लेकर, श्री. अरब साहेब, श्री. गौरीहर सिंहासने या मित्रांच्या मदतीने सुरू झाली. कराड शहरामध्ये आज ही संस्था चांगले काम करून राहिली आहे. या संस्थेची आज तीन महाविद्यालये आहेत, पाच-सहा माध्यमिक शाळा आहेत. शिक्षणप्रसार करण्याचे काम या संस्थेने आपल्या शक्यतेनुसार उत्तम प्रकारे पार पाडले आहे, अशी माझी समजूत आहे. मला पुढे कराड सोडून जावे लागले, म्हणून या संस्थेचा ट्रस्टी म्हणून माझा जेवढा संबंध राहिला, तेवढाच आहे. प्रत्यक्ष काम

श्री. शंकरराव करंबेळकर आणि त्यांचे साथी करीत होते. आज हे काम मुख्यत: श्री. पी. डी. पाटील हे लक्ष घालून करत असतात. १९४५ साली अशा घडामोडींच्या काळातही एक स्थानिक स्वरूपाचे नवीन कार्य आम्ही सुरू केले आणि ते टिकून राहिले, यात मला आनंद आहे.

श्री. गणपतरावांच्या प्रकृतीसंबंधाने मी माझी जबाबदारी जरी पार पाडीत असलो, तरी त्यांच्या प्रकृतीमध्ये हवा तसा फरक दिसून येत नव्हता. ते दोन-तीन महिने माधवनगरला राहायचे आणि परत कराडला यायचे. औषधपाणी घेत राहायचे, त्यामुळे प्रकृतीची प्रगती थांबल्यासारखे होत असे. त्यांच्या प्रकृतीत योग्य दिशेने फरक होत नाही, याची मी मिरजेच्या डॉक्टरांशी जाऊन एकदा तपशीलवार चर्चा करून आलो. मी एकटाच गेलो होतो. मला त्यांच्या प्रकृतीचे खरे स्वरूप समजावून घ्यायचे होते. कायमचे मिरजेस राहा, असे त्यांना मला आग्रहाने सांगता येत नव्हते. बरे वाटू लागले, की
"माझी प्रकृती चांगली आहे. मला माझे नित्याचे काम केले पाहिजे." म्हणून ते कराडला येत.

"घरचे तू एकटा किती करणार?" असे सांगून काही व्यापार-धंदा करायला त्यांनी सुरुवात केली होती. तो करण्यासाठी ते परत येत असत. धंद्याच्या कामातही ते बरेच तरबेज होते. त्यामुळे मिरजेस पडून राहून वेळ व्यर्थ घालविण्यापेक्षा कराडला येऊन काम केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. त्यांना डॉक्टरांनी सांगितलेले पथ्य म्हणजे सिगारेट्स न ओढण्याचे. ते त्यांना जमले नाही. मी जेव्हा मिरजेला डॉक्टरांशी चर्चा केली, तेव्हा डॉक्टरांनी मला सांगितले,
"खरे म्हणजे ते आता दोन वर्षांचेच सोबती आहेत. त्यांची दोन्ही फुफ्फुसे पोखरली गेली आहेत. रोगी म्हणून अंथरुणावर पडून राहण्याचा त्यांचा स्वभाव नाही आणि ज्याला हातखंडा म्हणता येईल, असे औषध अजून तरी आमच्या हाती आलेले नाही."

मी मोठा निराश होऊन परत आलो. मला हे कुणाला सांगता येईना. श्री. गणपतरावांशी बोलणे अवघड होते. फक्त गपणतरावांच्या एक-दोन मित्रांशी या डॉक्टरांशी झालेल्या चर्चेतील काही भाग सांगितला आणि त्यांना सल्ला देण्याचा प्रयत्न करण्यास सांगितले. त्याचा कधी कधी उपयोग होत असे, कधी कधी उपयोग होत नसे.
१९४५ च्या शेवटी त्यांची प्रकृती पुन्हा खालावली, म्हणून मी त्यांच्याशी प्रेमाचे भांडण केले आणि त्यांना सांगितले, की
"तुमच्या आजाराची काळजी घ्यावी, म्हणून मी माझे आवडते काम सोडून येथे राहिलो, तर तुम्ही हे काय करता आहात?"

माझ्या आग्रहाकरता ते परत मिरजेला गेले आणि त्याच वेळी जिल्ह्यामध्ये निवडणुकीच्या खटपटींना जोर चढला. मी १९३७ साली श्री. आत्माराम पाटील यांना उमेदवारी मिळावी, म्हणून त्यांच्याकरता केलेल्या खटपटींची मला आठवण झाली. पण का, कोण जाणे, अशी खटपट आपण आपल्याकरता करावी, असे मला कधीच तीव्रतेने वाटले नाही. माझे बहुतेक सर्व मित्र हे गृहीत धरून होते, की मी उमेदवार म्हणून निवडला जाणार. त्यांच्या मताने ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ होती. पण मी त्यात रस घेत नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटे. मी त्यांना सांगत असे, की १९३७ साल आणि १९४६ साल यांच्यामध्ये फार मोठा फरक झालेला आहे. एक मोठे जनआंदोलन, एक मोठे युद्ध होऊन गेलेले आहे. त्यामुळे उमेदवाराची निवड ही काही दर्जेदारपणाने आणि सर्वांच्याच सल्लामसलतीने व्हायला पाहिजे. आमचे अनेक साथीदार अजून भूमिगत आहेत, काही अजून जेलमध्ये आहेत. अशा परिस्थितीत याला उमेदवारी द्या आणि याला देऊ नका, अशा तऱ्हेच्या चर्चेत निदान मी तरी पडणार नाही आणि मी उमेदवार आहे, असेही मी मुद्दाम कुणाला सांगायला जाणार नाही.

निवडणुका काही आठवड्यांवर आल्यावर स्वाभाविकच उमेदवारीच्या चर्चा सुरू

झाल्या. सर्व कार्यकर्त्यांचा एकत्र बसून सल्ला घ्यावा, असा विचार मान्य असणारे स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली वाळवे तालुक्यात एका गावी - त्या गावाचे नाव आज माझ्या लक्षात नाही - एक मोठी सभा झाली आणि खूप चर्चाही झाली, असे मी ऐकले. मी या सभेला गेलो नव्हतो. घाई करून आपण या सभेला उपस्थित राहू नये, असे काही तरी माझ्या मनात घर करून बसले होते.
त्याचप्रमाणे श्री. गणपतरावांना आजारी टाकून मी निवडणुकीच्या राजकारणात पडावे, ही कल्पनाही मला बरी वाटत नव्हती. त्या सभेमध्ये ज्या चर्चा झाल्या, त्या चांगल्याच उलट-सुलट, नरम-गरम अशा झाल्या आणि शेवटी उमेदवारीच्या नावांबाबत कार्यकर्त्यांनी मतदानही केले. मला त्या संध्याकाळी मिरजेत भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले. सर्वांत जास्त मते माझ्या नावाला पडली होती.
'तेव्हा आता कृपा करून पुढे पाऊल टाका आणि निवडणुकीची तयारी करा.' हा सल्ला देण्यासाठी ही मंडळी मुद्दाम त्या सभेतून मी मिरजेला होतो, तेथे आली होती. या माझ्या होकार-नकाराच्या चर्चेत शेवटी श्री. गणपतरावांना मध्यस्थी करावी लागली आणि त्यांनी सांगितले,
"माझ्या आजारासाठी तू जर ही निवडणूक लढविणार नसलास, तर या दवाखान्यात मी एक क्षणही राहणार नाही. आयुष्यात काही गोष्टी केव्हा केव्हा आपणहून चालत येतात, तेव्हा त्यांना नकार न देता सामोरे जावे लागते. त्या पुन्हा अशा येतीलच, याची खात्री नसते. दुराग्रह सोड."

श्री. गणपरावांचा शब्द मी मानला आणि त्यानंतर निवडणुकीचा उमेदवार होण्याच्या दृष्टीने मी कामाला लागलो. माझ्या सर्व मित्रांना आनंद झाला. इतर कोण उमेदवार असावेत, या चर्चेतही जिल्हयाच्या प्रमुख नेते मंडळींनी माझे मत विचारले. माझ्या मताने वाळवे तालुक्यातर्फे श्री. के. डी. पाटील यांना उमेदवार म्हणून निवडले पाहिजे, असे होते. स्वातंत्र्य-सैनिकांचा त्यांच्या नावाला पाठिंबा होता. जिल्हा काँग्रेसचे जुने अध्यक्ष व्यंकटराव पवार हेही एक उमेदवार असावेत. त्याचप्रमाणे कराडचे श्री. बाबूराव गोखले अशा कार्यकर्त्यांच्या सूचना आल्या आणि यावेळी

त्यानंतर फारसे वादविवाद न होता सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागासाठी माझ्या नावासह चार नावे मान्य झाली.

गेली जवळ जवळ ४० वर्षे मी निवडणुकीचे राजकारण करतो आहे. परंतु इतकी सरळ, बिनखर्चाची, तत्त्वनिष्ठ व जनतेच्या स्वयंस्फूर्त पाठिंब्यावर आधारलेली अशी कोणती निवडणूक असेल, तर ती १९४६ ची निवडणूक होय, हे मला कबूल केले पाहिजे.

१९४२ च्या उग्र आंदोलनानंतर होत असलेली ही पहिली निवडणूक असल्यामुळे या निवडणुकीचा प्रचार हा या चळवळीच्या यशाचा प्रचार होता. लोकांचे मन उत्साहाने इतके तुडुंब भरून गेले होते, की आम्ही उमेदवार भाषण करण्याऐवजी नुसता नमस्कार करण्याकरता जरी लोकांच्या पुढे राहिलो, तरी टाळ्यांचा कडकडाट होत असे. लोकांचे प्रेम काठोकाठ भरून आले होते. आम्ही जेथे जाऊ, तेथे हजारोंनी माणसे ताटकळत वाट पाहत बसलेली असत. शक्यतो प्रयत्न करून आम्ही चारही उमेदवार एकत्र प्रचारासाठी हिंडलो आणि त्याचाही अतिशय योग्य तोच परिणाम झाला. माझे निवडणुकीचे काम सुरू झाल्यानंतर श्री. गणपतरावांनी हॉस्पिटल सोडून दिले आणि सरळ कराडमध्ये मुक्काम ठोकून ते निवडणुकीच्या कामात लक्ष घालू लागले. त्यांना मी सांगून बघितले, पण त्याचा उपयोग झाला नाही. आपला भाऊ मुंबई विधानसभेसाठी निवडणूक लढवितो आहे, याचाच त्यांना अतिशय आनंद झाला होता. त्यांच्या त्या आनंदात काही कमतरता यावी, अशी इच्छा माझ्याही मनात नव्हती. म्हणून मी तो प्रश्न तसाच तेथे सोडून दिला.

गेल्या ४० वर्षांत राज्य विधानसभेची धरून, दहा निवडणुका मी लढविल्या. कधी चुरशीच्या, कधी थोड्या मतांनी, कधी लाख मतांनी, तर कधी बिनविरोध अशा सर्व निवडणुका मी जिंकल्या आहेत. प्रत्येक निवडणुकीतील अनुभव वेगळा, राजकीय कसोट्या वेगळ्या, त्या वेळचे विरोधी राजकीय पक्षही वेगळे, अशा होत्या. पण १९४६ सारखी सर्वमान्य निवडणूक कधीच झाली नाही. ही आणि नाशिकची

पार्लमेंटची निवडणूक सोडली, तर माझ्या सर्व निवडणुका मोठ्या वादळी होत्या. प्रतिपक्षांनी आपापल्या मुलुखमैदानी तोफा डागल्या होत्या. अभद्र आणि कटुतेच्या प्रचाराचा त्यांनी कळस केला. या सर्व निवडणुकांत माझा सर्वांत मोठा प्रचारक माझा मीच असे. संभाषणशैलीतील मनमिळाऊ, सुसंस्कृत, तत्त्वनिष्ठ आणि प्रांजळ प्रचार ही माझी मोठी शक्ती आहे, असे माझ्या लक्षात आले; आणि या सर्व वादळात जनतेच्या आशीर्वादाने व माझ्या कार्यकर्त्या मित्रांच्या संघटित सहकार्याने मी अपराजित ठरलो. लोकशाहीच्या राजकारणात याच्यापेक्षा अधिक काय अपेक्षा करावयाची?

लोकसभेसाठी १९६३ साली नाशिक जिल्ह्यातून मी निवडणूक लढविली, तेव्हा मी बिनविरोध निवडून आलो; परंतु त्यामुळे लोकांमध्ये प्रचारासाठी जाण्याचे कारण पडले नाही व जनसंपर्क आला नाही, ही त्या निवडणुकीतील एक उणीव मला भासली. नाशिककरांनी मला बिनविरोध निवडून दिले, याचा मला नेहमीच अभिमान वाटत आला आहे. नाशिकच्या या निवडणुकीनंतर  नाशिक येथे भरलेल्या एका सभेत कवी कुसुमाग्रज यांनी काढलेले पुढील उद्गार मी कधीच विसरणार नाही : "भूगोलात कृष्णा-गोदावरीचा संगम नाही, पण या निवडणुकीने हा संगम इतिहासात घडून आला."

१९४६ मधील या निवडणुकीच्या मतमोजणीच्या वेळी मी कराडमध्ये राहिलो. मतमोजणी सातारा येथे होती. माझे प्रतिनिधी म्हणून मी माझे बंधू श्री. गणपतराव यांना पाठवून दिले. त्यांची इच्छा होती आणि हौस होती. मलाही बरे वाटले, की ते हे काम पाहायला गेले. निवडणुकीचा निकाल तर स्पष्टच होता. फक्त तांत्रिक दृष्ट्या, कायदेशीर दृष्ट्या तो जाहीर व्हायचा होता.

आम्ही काँग्रेस पक्षाचे चारही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आलो आणि मी जीवनाच्या एका नव्या आणि अनोख्या पण आकर्षक क्षेत्रात पदार्पण केले. यामुळे माझ्या जीवनाला संपूर्ण वेगळे वळण लागणार आहे, असे तेव्हा माझ्या लक्षात

आले नाही. परंतु या निवडणुकीने माझ्या जीवनामध्ये संपूर्ण बदल केला, ही गोष्ट मला मान्य केली पाहिजे. माझ्या बंधूंचा सल्ला न मानता मी किंचित बाजूला राहण्याचा प्रयत्न केला असता, तर ती आयुष्यातील फार मोठी चूक झाली असती, असे मला प्रामाणिकपणे कबूल केले पाहिजे.

माझ्या निवडणुकीच्या यशानंतर मी माझ्या आईच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला.
त्यानंतर अनेक महिलांनी येऊन मला ओवाळले.

माझी पत्नी सौ. वेणूबाई हिनेही येऊन मला ओवाळले. तेव्हा माझे डोळे पाणावले.
मी तिलाच ऐकू जाईल, असे सांगितले,
"वेणूबाई, या यशात तुझाही वाटा आहे."
ती किंचितशी हसली आणि म्हणाली,
"अशी वाटणी करावयाची नसते."

स्वातंत्र्य-लढ्यातले माझे अनेक मित्र आले. डोळ्यांत आनंदाश्रू आणून नि माझ्या गळ्यात पडून माझे अभिनंदन करून गेले.

या यशाचा जो आनंद मी अनुभवला, तो काही वेगळाच होता.

जीवनात असे क्षण क्वचितच येतात.

आमची ही निवडणूक १९४६ च्या मार्च महिन्यात झाली आणि मार्चच्या ३० तारखेला कॉंग्रेस पार्लमेंटरी पार्टीची सभा मुंबईला प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात भरणार आहे, असे निमंत्रण मिळाले. आमच्या सातारा जिल्ह्यातून निवडून आलेले बहुतेक सर्व उमेदवार एकत्र जमलो आणि सर्वजण मिळून मुंबईला

निघालो. आमच्या निवडणुकीसाठी जी मोटार आम्ही भाड्याने ठरविली होती, ती तोपर्यंत आमच्याच ताब्यात होती. तेव्हा ती मोटार घेऊनच आम्ही मुंबईस गेलो. बरोबर आमच्या जिल्ह्यातील वृद्ध पुढारी श्री. भाऊसाहेब सोमण हे अत्यंत अगत्याने आले आणि आम्ही त्यांच्यासह सातारा ते मुंबई प्रवास मोठ्या आनंदात केला.

मुंबईत आल्यानंतर आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी राहायला गेलो. श्री. के. डी. पाटील, श्री. सिंहासने आणि मी मात्र 'माधवाश्रमात' मुक्कामाला गेलो.

पक्षाची सभा ही एक औपचारिक सभा होती. श्री. बाळासाहेब खेरांची पक्षनेता म्हणून औपचारिक निवड झाली. त्यावेळी सरदार पटेल हजर होते. त्यांनी आशीर्वादात्मक भाषण केले आणि सभा संपली. दुस-या दिवसापासून आम्ही पुन्हा मुंबईमध्ये भटकंती करायला सुरुवात केली. मंत्रिमंडळ बनविण्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. पण त्यामध्ये श्री. बाळासाहेब खेरांशी जाऊन भेटावे व बोलावे, असे माझ्या मनातही आले नाही. कारण त्यांची माझी ओळखही नव्हती. श्री. भाऊसाहेब सोमण जे आले होते, ते आमचे हरिजन उमेदवार श्री. गणपतराव तपासे यांच्यासाठी प्रयत्न करण्यासाठी आले होते, असे त्यांनीच मला सांगितले होते. त्यामुळे त्यांनी माझ्यासाठी कुणाला सांगावे, बोलावे, असा प्रश्नच निर्माण झाला नाही. पण श्री. के. डी. पाटील यांची मात्र इच्छा होती, की आपण काही प्रयत्न करावा. त्यांची आणि श्री. मोरारजीभाई देसाईंची येरवडा जेलमधील दाट ओळख होती. श्री. मोरारजीभाईंना भेटावे, असे त्यांच्या मनात आले. पण मी त्यांना आवरले. मी त्यांना सांगितले,
"आपले काम आणि नावे पुढाऱ्यांना माहीत असली पाहिजेत. नाही तर ते पुढारी कसले? आपण कृपा करून माझ्यासाठी प्रयत्न करण्यासाठी जाऊ नका. तुम्हांला स्वत:साठी जाऊन प्रयत्न करावयाचा असेल, तर जरूर करा."
ते म्हणाले,
"मला मंत्रिमंडळात जाण्याची मुळीच इच्छा नाही. प्रयत्न करावयाचा असेल, तर तो तुमच्यासाठी."

असाच एक दिवस गेल्यानंतर आमच्या जिल्ह्यातून निवडून आलेले आमदार श्री. बाबासाहेब शिंदे आणि आमच्या शिराळा पेठ्यातील मुंबईत वकिली करत असलेले श्री. माधवराव देशपांडे हे माधवाश्रमात आमचा शोध करीत आले. श्री. के. डी. पाटील कुठे तरी बाहेर गेले होते. म्हणून मी एकटाच तेथे होतो. श्री. बाबासाहेबांनी मला आपल्या बरोबर चलण्याचा आग्रह केला. ते म्हणाले,
"श्री. माधवराव देशपांडे हे तुम्हांला नेण्यासाठी आले आहेत. त्यांच्या बरोबर आपण जाऊ या."

कशासाठी? कुठे? असे मी त्यांना विचारले, पण त्यांनी उत्तर देण्याची टाळाटाळ केली. ते गाडी घेऊन आले असल्यामुळे त्यांच्या गाडीतूनच मी गेलो. मला वाटले, कुठे तरी जवळपास प्रवास असेल. गाडी बराच वेळ उत्तरेच्या दिशेने पुढे पुढे जात राहिली, तेव्हा मी जरा आग्रहाने त्या मंडळींना विचारले,
"आपण कुठे चाललो आहोत?"
श्री. माधवराव म्हणाले,
"आपण उपनगरात चाललो आहोत. श्री. बाळासाहेब खेरांनी तुम्हांला बोलावून आणायला सांगितले आहे. म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे."

ह्या वेळपर्यंत आम्ही श्री. बाळासाहेबांच्या बंगल्याच्या दाराशी पोहोचलो होतो. मी काहीसा आश्चर्यचकित झालो होतो व काहीसा गोंधळून गेलो होतो. माझ्या बरोबरच्या या दोन ज्येष्ठ मित्रांबरोबर मी त्या घरात प्रवेश केला आणि आम्ही बाळासाहेबांच्या बैठकीत जाऊन उभे राहिलो. तो साध्या पोशाखातील श्री. बाळासाहेब खेर नेहमीप्रमाणे हसून नमस्कार करीत पुढे आले आणि म्हणाले,
"या. चव्हाण, या. बसा."
आम्ही बसलो. नंतर त्यांनी माझ्याकडे वळून सांगितले,
"मी तुम्हांला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही. पण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मी तुमची निवड केली आहे."

हे सर्व मला अगदीच अनपेक्षित होते, त्यामुळे आपण काय बोलावे, हे चटकन् माझ्या लक्षात आले नाही. म्हटले,
"ठीक आहे. मी घरी जाऊन येतो. मी काही तातडीने हजर होणार नाही."

आज जेव्हा मी या घटनेचा विचार करतो, तेव्हा पार्लमेन्टरी सेक्रेटरीपद मला दिले, या संबंधाने मला काही फारसे बरे वाटले नव्हते, ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. माझे काम आणि माझी जाण यांच्या तुलनेने हे किरकोळ काम आहे, अशी माझी भावना झाली.

पण या बाबतीत तेथेच चर्चा न करता आम्ही तेथून निघालो. श्री. बाळासाहेबांचे मी आभार मानले. माझ्या दोन्ही मित्रांचेही आभार मानले. श्री. बाबासाहेब शिंदे यांना माझी मन:स्थिती समजली असावी. बाहेर आल्यानंतर ते मला म्हणाले,
"यशवंतराव, चूक कराल हं ! नाही म्हणू नका, तुमच्या सवडीने का होईना, पण येऊन हजर व्हा."

बाबासाहेबांचा माझ्यावर फार वर्षांचा लोभ होता. मी त्यांचेही आभार मानले आणि टॅक्सी करून परत माधवाश्रमात आलो. श्री. के. डी. तेथे परत आले होते. त्यांना मी झालेला सर्व वृत्तान्त सांगितला. श्री. के. डी. हा मोठा व्यवहारी मनुष्य होता. मी त्यांच्याजवळ माझी भावना स्पष्ट केली. तेव्हा ते म्हणाले,
"तुमची भावना मी समजू शकतो; परंतु श्री. बाबासाहेब शिंदे यांनी दिलेला सल्ला मानून चालू या."

मला त्यांचे सर्व काही बोलणे समजत होते, पण पटत नव्हते. मी सांगितले,
"मला या बाबतीत विचार केला पाहिजे. मी काही घाईघाईने हजर होणार नाही. आपण तूर्त परत जाऊ या."

श्री. बाळासाहेबांनी नावांची घोषणा केली. त्यांमध्ये माझे नाव पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून प्रसिद्ध झाले आणि या प्रसिद्धीच्या वातावरणात मी दुस-या दिवशी कराडला पोहोचलो.

श्री. गणपतरावांचीही काहीशी निराशा झालेली दिसली. मी त्यांना, मला काय वाटत होते, ते सांगितले. त्यांनीही बाबासाहेबांचा सल्लाच मान, असे मत व्यक्त केले.

त्यानंतर जवळ जवळ दहा दिवस मी कराडमध्ये होतो आणि इतर मित्रांशी चर्चा करीत होतो. सर्वांचा मनोदय, मी जावे, असाच मला दिसला.

सौ. वेणूबाईच्या मनात काय आहे, हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला. ती म्हणाली,
"आजपर्यंत एवढे कठीण निर्णय घेतलेत, तेव्हा तुमच्या मनात चलबिचल नव्हती; मग आताच असे का?"
मी याचा अर्थ समजलो.
मी माझ्या आईला शेवटी विचारले. ती म्हणाली,
"मला तुझ्या राजकारणातले काही समजत नाही. पण तुला काही नवे काम करायची संधी आली आहे, तर आता नको म्हणू नकोस."

माझ्यासाठी हा आमच्या वरिष्ठ न्यायालयाचा आदेश होता. त्यामुळे मी मुंबईस निघण्याचा निर्णय केला.

दुस-या दिवशी संध्याकाळी सर्वांचा निरोप घेऊन, आईच्या पायांवर मस्तक ठेवून मी घराबाहेर पडलो आणि पुणे मार्गे रेल्वेने मुंबईच्या वाटेला लागलो. दुस-या दिवशी सकाळी पुणे स्टेशनवर त्या गाडीला जोडून असणारी मुंबईला जाणारी डेक्कन क्वीन गाठली आणि त्या गाडीत जाऊन बसलो.

गाडीत निवांत बसल्यानंतर माझ्या मनात विचारांचे काहूर उठले. भूतकाळातील सुख-दु:खांची धूसर क्षणचित्रे डोळ्यांपुढे येऊ लागली. त्याचप्रमाणे अनोळखी पण रंगतदार भविष्याची बोटेही आपल्याला पालवताहेत, असे वाटले. माझ्या मनात येऊन गेले, की माझ्या जीवनात मोठा बदल झाला आहे. कृष्णाकाठी वाढलो. हिंडलो, फिरलो, झगडलो, अनेक नवी कामे केली, मैत्री केली, माणसे जोडली, मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता. आता मी कृष्णकाठ सोडून नव्या क्षितिजाकडे चाललो आहे. आता ती क्षितिजे रंगीबेरंगी दिसत आहेत. परंतु प्रत्यक्षात तेथे पाहोचेपर्यंत ती तशीच राहतील का? कोण जाणे!

मी अशा विचारांच्या तंद्रीत असतानाच आमच्या जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे एक पुढारी रावसाहेब मधाळे हे मजजवळ आले आणि म्हणाले,
"कुठे चाललात?"
मी त्यांना सांगितले,
"अर्थातच मुंबईला. नवे काम अंगावर घ्यायला."
त्यांनी आनंद व्यक्त केला आणि ते म्हणाले,
"तुम्ही फार चांगल्या दिवशी हे नवे काम अंगावर घेत आहात."
मी म्हटले,
"मी काही पंचांग पाहून निघालो नाही; पण आज असा कोणता महत्त्वाचा दिवस आहे?"
ते म्हणाले,
"आज १४ एप्रिल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आज जन्म-दिवस आहे."
मी म्हटले,
"फारच चांगला योगायोग आहे !"
माझ्या ध्यानी-मनी सुद्धा नसताना हा दिवस निवडला गेला, ही माझ्या जीवनातील महत्त्वाची घटना आहे, असे मी मानतो.

**- आणि आमची डेक्कन क्वीन खंडाळ्याच्या घाटातून एकापाठोपाठ एक बोगदे मागे टाकत वेगाने पुढे चालली होती.**

**कधी अंधार, तर कधी प्रकाश असा खेळ खेळत आमचा प्रवास चालला होता.**
**पुढच्या जीवनाचे हे प्रतीक तर नव्हते**?